# दानशूर महाराजा सयाजीराव

संपादक
यमाजी मालकर

लेखक
डॉ. राजेंद्र मगर



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# दानशूर
# महाराजा सयाजीराव



संपादक

**यमाजी मालकर**

लेखक

**डॉ. राजेंद्र मगर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव :** दानशूर महाराजा सयाजीराव

➢ **संपादक :** श्री. यमाजी मालकर

➢ **लेखक :** डॉ. राजेंद्र मगर

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-०४-९

➢ **प्रथमावृत्ती :** २०२२

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

➢ **© प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी. पी. ओ. नजीक, पुणे - ४११ ००१.

➢ **किंमत : रु.२०४**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे मनोगत

## लक्ष्मी आणि सरस्वतीची सांगड घालणारे प्रज्ञावंत सयाजीराव

महाराजा सयाजीराव गायकवाड हे एक विद्याव्यासंगी राजा होते. लक्ष्मी आणि सरस्वती एका ठिकाणी गुण्यागोविंदाने नांदणे हे अपवादाने सापडणारे उदाहरण म्हणजे या प्रज्ञावंत राजाचा आयुष्यभराचा जनकल्याणाचा प्रवास. प्रजा सुखी व्हायची असेल तर अज्ञानाचा अंधकार दूर सारण्यासाठी तिला शिकविले पाहिजे, हे ओळखून हा राजा स्वत: चिकाटीने शिकला. त्यांना शिकविणारे गुरुजीही उत्तम लाभले. त्यांनी या हिऱ्याला पैलू पाडण्याचे काम केले. या शिष्याने निसर्गदत्त बुद्धिवैभवाचे कष्टाने पुढे सोने केले. गुरुजींनी मनावर ठसविलेला विद्यार्जनाचा ठसा या विद्यार्थ्याने आयुष्यभर सरस्वतीची साधना करत सांभाळला. यातून एक दूरद्रष्टी राजा, चौफेर ज्ञानलालसा असलेला चौकस लेखक, विचारवंत घडत गेला. त्याने ज्ञानाची महती ओळखून ज्ञान प्रबोधन हेच सुप्रशासनाचे साधन आहे हे तरुणपणात ओळखून ते प्रजाजनांसाठी देण्याचा प्रयत्न केला. यातून सयाजीराव महाराजांचे अलौकिक बुद्धिमत्तेचे व्यक्तिमत्त्व घडत गेले आणि सरस्वतीच्या कृपादृष्टीने प्रज्ञावंत राजा निर्माण झाला.

सयाजीराव राजा बनले त्यावेळी बडोदा राज्य काही लक्ष रुपये तोट्यात होते. सहा वर्षांच्या शिक्षण आणि प्रशासनाच्या शिक्षणातून, टी. माधवराव या हुशार दिवाणाच्या मार्गदर्शनाखाली, इलियट या गुरुवर्यांच्या मदतीने आणि राजमाता जमनाबाईंच्या आशीर्वादातून या राजाने अठराव्या वर्षी राज्यकारभार बघायला सुरुवात केली. वेगवेगळ्या विषयांतील तज्ज्ञ मंडळीच्या मदत, मार्गदर्शनातून प्रशासनाची उत्तम घडी बसवली. शिक्षण, साहित्य, कला, शेती-उद्योग, प्रशासन, अर्थनियोजनाची सांगड घालत लक्षणीय बदल करत गेले.

काटकसर आणि अर्थनियोजनातून वीसेक वर्षांत राज्याचे उत्पन्न वाढवून श्रीमंत बनलेल्या या राजाने आयुष्यभर शिक्षण, शेती, उद्योग, शिष्यवृत्ती, साहित्य-कला, ग्रंथालये, ग्रंथ प्रकाशन, संस्था आणि गरजू व्यक्तींना सर्व प्रकारची मदत करून जगावेगळ्या दातृत्वाचे उदाहरण जगापुढे

दाखवून दिले. राजवाड्यातील अनाठायी खर्चात कात्री लावत धर्मादाय खात्यातील काटकसर करत दुष्काळ अन् अतिवृष्टीच्या नैसर्गिक संकटावर नियोजनाने मात केली.

सार्वभौम राजा असलेले सयाजीराव स्वातंत्र्ययोद्ध्याचे जसे पाठीराखे होते; तसेच शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक अन् वाङ्मयीन कलांचे आश्रयदातेही होते. त्यांनी पितामह दादाभाई नौरोजी, जमशेटजी टाटा, ना. गोखले, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, पं. मालवीय, कर्मवीर भाऊराव, स्वा. सावरकर, राजर्षी शाहू, महर्षी शिंदे, महर्षी कर्वे या आणि अनेक युगपुरुषांना, संस्थांना, विद्यार्थ्यांना, गरजूंना, कोट्यवधींची मदत केली. प्रशासन अन् अर्थनियोजनाने जगातील सातव्या क्रमांकाचे श्रीमंत झालेल्या सयाजीराव यांचे एकूण दातृत्व थक्क करून टाकणारे आहे.

बडोदा येथील दस्तऐवजांचा अभ्यास करून आमचे तरुण अभ्यासक डॉ. राजेंद्र मगर यांनी महाराजा सयाजीराव दातृत्व हा ग्रंथ मेहनतीने तयार केला आहे. शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी जनकल्याणाचा ध्यास घेतलेला एक दूरद्रष्टी राजा वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ती-संस्था, विद्यार्थी, अभ्यासकांना ८९ कोटींच्या आसपास मदत करतो, ही आज विश्वास बसणार नाही अशी गोष्ट आहे. या मदतीचे आजचे मूल्य दीड लक्ष कोटीहून अधिक होते, ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. यातील मोठी रक्कम राजाच्या खानगी खात्यातूनही दिलेली आहे. ज्याकाळात हिंदुस्थानातील राजेरजवाडे हौसमौज करत आपल्या ऐश्वर्याच्या प्रदर्शनात मश्गूल होते, त्याकाळात एक प्रज्ञावंत राजा आपल्या धनलक्ष्मीचा उपयोग जनकल्याणाच्या कामासाठी जगावेगळे दातृत्व दाखवून बलसंपन्न भारताचे स्वप्न पाहत होता. हा नवा इतिहास जगासमोर आणण्याची संधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मिळतेय याचा खूप आनंद आहे. हे सांस्कृतिक जबाबदारीचे काम केलेल्या डॉ. राजेंद्र मगर या तरुण अभ्यासकास पुढील कामास शुभेच्छा देतो.

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई



महाराजा सयाजीराव गायकवाड

# संपादक व लेखक अल्पपरिचय

यमाजी बाळाजी मालकर

दैनिक सकाळ, पुणे आणि औरंगाबादचे माजी संपादक. दैनिक दिव्य मराठीचे माजी सल्लागार संपादक. अर्थक्रांती प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि अर्थपूर्ण मासिकाचे संपादक.

'ड्रीम्स फ्रॉम माय फादर' या अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांच्या इंग्रजी आत्मचरित्राचा मराठी अनुवाद प्रसिद्ध, 'डेडलाईन', 'आहे, उत्तर आहे', 'मराठवाड्याच्या यशकथा' ही पुस्तके प्रसिद्ध. 'झपाटलेपण ते जाणतेपण' या पुस्तकाचे सहलेखक. 'सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र' (२०१०) या कॉफी टेबल बुकचे संपादक. अर्थक्रांती चळवळीत सक्रिय. जागर ब्लॉगवर लेखन.

डॉ. राजेंद्र मगर

*(M.A.,D.ED.,B.ED., PH.D.)*

डॉ. राजेंद्र मगर महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, औरंगाबाद येथे 'संशोधन सहायक' म्हणून कार्यरत. 'महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्यावरील चरित्रांचा अभ्यास' या विषयावरील प्रबंधास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून 'पीएच.डी.' पदवी प्रदान. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे व्यक्तिमत्त्व, सुधारणासंबंधी अनेक वृत्तपत्रे, नियतकालिकांत लेख आणि शोधनिबंध प्रकाशित. राज्यस्तरीय विविध चर्चासत्रात शोधनिबंधांचे सादरीकरण.

**ग्रंथ लेखन**

१) प्रज्ञावंत महाराजा सयाजीराव (मराठी, हिंदी आणि इंग्रजी)
२) महाराजा सयाजीराव यांच्या सुधारणा - आपत्ती निवारण
३) महानायक गंगारामभाऊ म्हस्के
४) दानशूर महाराजा सयाजीराव

**ग्रंथ संपादन**

१) महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रसंग्रह भाग-१
२) श्री.महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र (बृहत प्रकल्प : खंड -२)
३) समाजशिल्पशास्त्रज्ञ सयाजीरावांची ओळख
४) भाषा आणि साहित्य : माझी भूमिका - महाराजा सयाजीराव गायकवाड
५) बडोद्याचा राज्यकारभार
६) सयाजीरावांचे जागतिक वेगळेपण (लेखसंग्रह)
७) इ.स. १८६४ ते इ.स. १९४७ सालांमध्ये प्रकाशित झालेल्या चरित्र आणि इतिहासविषयक दुर्मिळ ग्रंथ (बृहत प्रकल्प : खंड १ ते ३)

**संपर्क**

rajmagar81@gmail.com

# संपादकांचे निवेदन

## समृद्ध समाजाच्या उभारणीसाठीचे दातृत्व

बडोदा संस्थानाचे महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांची ६४ वर्षांची कारकीर्द ही राजा कसा असावा याचे आदर्श असे उदाहरण आहे. राजेशाहीचा त्याग करून आजच्या जगाने लोकशाहीचा स्वीकार केला आहे; पण लोककल्याणाच्या योजनांची परिणामकारकता अजूनही सत्तेवर बसलेल्या व्यक्तींच्या चारित्र्य आणि संवेदनशीलतेवर अवलंबून आहे. लोकशाहीत खरे म्हणजे लोककल्याणाच्या योजना समन्यायी व्यवस्थेने हाती घ्यायला हव्यात; पण तो टप्पा आपण अद्याप पूर्णपणे गाठू शकलेलो नाही. सामान्य जनतेला सत्ताधारी पालक वाटले पाहिजेत, यासाठी व्यवस्थाच अशी बसवली पाहिजे, की जनतेच्या अडीअडचणींच्या वेळी तिने स्वत:हून काम केले पाहिजे. राजेशाहीत अशी व्यवस्था बसविण्याचे जगावेगळे कार्य महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केले होते, म्हणून ते आदर्श राजे ठरले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रशासनातील अनेक चांगल्या गोष्टी भारतीय प्रशासनाने बडोदा संस्थानातून घेतल्या, त्याचे कारणच हे आहे. अर्थात, महाराजा सयाजीराव यांच्याकडे एक माणूस म्हणून असलेली संवेदनशीलता, एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा ते बडोद्याचे राजे ही पार्श्वभूमी आणि स्वतंत्रपणे राज्यकारभार पाहण्यापूर्वी त्यांचे झालेले शास्त्रशुद्ध पद्धतीचे शिक्षण, असा योग राजाची कारकीर्द म्हणून जुळून येणे केवळ अशक्य आहे. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या कारकिर्दीतून राज्यकारभार कसा असावा, याचा एक वस्तुपाठ घालून दिला. लोककल्याणकारी लोकशाही राज्यात, जे जे काही केले गेले पाहिजे, असे आज आपण म्हणतो, अशा बहुतांश सर्व विषयांना सयाजीरावांनी गेल्या शतकाच्या सुरुवातीलाच हात घातला होता. बडोदा संस्थान हे आकाराने फार मोठे संस्थान नव्हते; पण त्या मर्यादित भूभागात स्वतंत्र भारतातील लोककल्याणकारी उपक्रमांची मुहूर्तमेढ घातली जात होती, असे सयाजीरावांची कारकीर्द जाणून घेतल्यावर म्हणता येते.

महाराजा सयाजीराव हे इतर संस्थानिक राजांपेक्षा किती वेगळे राजे होते, यासंबंधी बरेच लिहिले गेले आहे आणि अजून बरेच लिहिण्यासारखे आहे. महाराजांच्या दातृत्वाचा उल्लेख त्यांच्या चरित्र लेखनामध्ये वेळोवेळी येतो, याचे कारण त्यांनी केलेले प्रचंड दान. अशा घटना इतक्या आहेत की, एक राजा इतक्या देणग्या देऊ शकतो, या विचाराने आपण स्तंभित होतो. पण जेव्हा या देणग्यांचा अधिक खोलात जाऊन आपण विचार करू लागतो तेव्हा महाराजा सयाजीराव एक राजा म्हणून कुटुंबप्रमुखाची भूमिका किती जबाबदारीने बजावत होते, हे लक्षात येऊ लागते. आपली प्रजा खाऊन पिऊन सुखी असली पाहिजे, असे राजाला वाटलेच पाहिजे; पण ती जीवनाच्या सर्व बाजूंनी समृद्ध असली पाहिजे, यासाठी महाराजा सयाजीराव आयुष्यभर प्रयत्नशील असतात, हे ते वेगळेपण आहे. 'ललित कला राष्ट्राच्या संस्कृतीची चिन्हे आहेत व त्यांच्यापासून राष्ट्राला प्रकाश व चैतन्य प्राप्त होते, असे माझे ठाम मत आहे', असे महाराज म्हणतात, त्यात म्हणूनच मोठा अर्थ दडला आहे.

महाराज सयाजीराव यांच्या दातृत्वाच्या अनेक नोंदी उपलब्ध आहेत, त्यामुळे त्यांच्या चरित्रलेखनात त्या, या ना त्या निमित्ताने येतातच; पण त्यांची संख्या इतकी अधिक आहे की, त्यांच्या या दातृत्वाचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जाण्याची गरज आहे. 'दानशूर महाराजा सयाजीराव' हा ग्रंथ ही त्याचीच सुरुवात आहे, असे म्हटले पाहिजे.

अशा सर्व नोंदी या ग्रंथात डॉ. राजेंद्र मगर यांनी एकत्रित केल्या आहेत; पण केवळ नोंदी एकत्र करणे, इतका मर्यादित उद्देश या ग्रंथाचा नाही. महाराजा सयाजीराव यांच्या दातृत्वाला किती व्यापक पैलू होते आणि त्यातून केवळ बडोदा संस्थानातील प्रजेचेच नव्हे, तर भारतीय समाजाचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पोषण कसे झाले, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

समृद्ध समाजाची निर्मिती होण्यासाठी शिक्षणाचे किती महत्त्व आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. महाराजा सयाजीराव यांनी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करून त्याचा पाया घातला. राजपदावर विराजमान झाल्यावरच अक्षर ओळख झालेल्या सयाजीरावांना शिक्षणाचे महत्त्व लहानपणीच उमजले आणि ते सर्वांना मिळाले पाहिजे, याचा त्यांनी आपल्या कारकिर्दीत सतत ध्यास घेतला. शिक्षणासाठी होणारी तरतूद वाढली पाहिजे, याची गरज आपण आजही व्यक्त करतो; पण एका शतकापूर्वी उत्पन्नाचे नवनवे स्रोत निर्माण करून त्यांनी शिक्षणाला सर्वोच्च महत्त्व दिले. महाराजांनी आपल्या संस्थानाची आर्थिक घडी कशी बसविली, हा स्वतंत्र लेखनाचा विषय आहे. प्रजेकडून अनेक अमानुष कर वसूल केले जात होते, अशावेळी सयाजीराव गादीवर बसले. प्रजा त्रस्त आहे, अशी कुणकुण लागली तेव्हा त्यांनी 'हुजूर सवारी' काढून जनतेचे गाऱ्हाणे स्वत: समजून घेण्याचा निर्णय घेतला. राजा प्रजेचे म्हणणे ऐकण्यासाठी सर्व राज्य पालथे घालतो आहे, ही दुर्मिळ बाब आहे. महाराजांनी राज्य तर पालथे घातलेच; पण त्याच्या नोंदी ठेवून लगेच प्रजेला दिलासा मिळावा म्हणून उपाययोजना जाहीर केल्या. शेतीतील सुधारणांसाठी 'सर्व्हे सेटलमेंट', शेतीमालाला अधिक भाव मिळावा यासाठी प्रयत्न, अंतर्गत व्यापारावरील निर्बंध दूर करण्यासाठी आधी जकात दर कमी करून नंतर ती रद्दच करण्याचा

निर्णय, बारखळी खाते काढून जमिनीची मोजणी, दुष्काळ पडताच लगेच तगाई (उचल) अशा या उपाययोजना होत.

इंग्रज अमलातील संस्थाने इंग्रजांना द्यावी लागणारी खंडणी आणि मुळातच तुटपुंजे असलेले आर्थिक स्रोत यामुळे आर्थिक ताणात होती. बडोदा संस्थानही त्याला अपवाद नव्हते; पण महाराजा सयाजीराव यांनी या स्थितीचा अतिशय बारकाईने अभ्यास करून आधी तिजोरीला लागलेली गळती थांबविली. त्याची सुरुवात त्यांनी स्वत:पासून केली. राजाच आपल्या खर्चात बचत करतो आहे म्हटल्यावर त्याचा परिणाम होण्यास वेळ लागत नाही. तिजोरी भरण्यासाठी शेतीचे उत्पन्न वाढेल, अशा उपाययोजना हाती घेतल्या. बँकिंगला प्रोत्साहन दिले. तिजोरीतील शिलकी रकमेला व्याजाचे उत्पन्न मिळेल, अशी व्यवस्था केली. महाराजांच्या अशा या आर्थिक उपाययोजनांचा विचार केल्याशिवाय, महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत केलेल्या प्रचंड दातृत्वाचा शोध घेता येणार नाही. त्यामुळे अशा सर्व उपाययोजनांचा 'धर्मादाय खात्यातील काटकसर' या पहिल्याच प्रकरणात आढावा घेण्यात आला आहे. महाराजांनी बडोदा संस्थानाचे आर्थिक व्यवस्थापन किती बारकाईने केले होते, हे त्यावरून लक्षात येते.

राजेमहाराजे देत असलेल्या देणग्या आणि महाराज सयाजीराव यांचे दातृत्व, यात कमालीचा फरक होता. दानधर्म हे राजाचे आणि राज्याचे भूषण आहे, असे ते मानत होतेच; पण हे सर्व दान सत्पात्री गेले पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष होता. अनेक राजे मोक्षप्राप्तीसाठी किंवा दयाबुद्धीने दान करत. महाराजा सयाजीराव दानाकडे विवेकाने आणि राज्याची जबाबदारी म्हणून पाहत होते. हिंदू समाजाच्या धर्मभावनांचा पाया परोपकार आणि भूतदया आहे, हे त्यांना माहीत होते; पण आपण करत असलेल्या दातृत्वाचा आधार केवळ तो असता कामा नये, याची त्यांनी काळजी घेतली. योग्य आणि पात्र तसेच गरजवंताला दान दिले, की त्याची जाहिरात करण्याची गरज नाही, त्या संबंधीचा अहंकार नको, हे त्यांच्या आज्ञापत्रातील उल्लेख त्यादृष्टीने महत्त्वाचे ठरतात. जातीधर्मावर आधारित दानधर्म हा त्यावेळी किती संवेदनशील विषय असेल, याची आपण कल्पना करू शकतो; पण महाराजांनी त्यातही काटकसर केली आणि पारदर्शी व्यवहाराचा आग्रह धरला. एवढेच नव्हे, तर आपल्या कुटुंबातील व्यक्तींकडून होणाऱ्या अशा खर्चाला नाराजी स्वीकारून कात्री लावली. समाज समृद्ध करण्यासाठी महाराजांचा पुढील सहा दशकांतील दातृत्वाचा पाया असा आकार घेत होता.

झाडाचे बीज जसजसे मोठे होते, तसतसे त्याचे फायदे आपल्याला कळू लागतात आणि ते झाड अनेक पिढ्यांची सेवा करते. महाराजा सयाजीरावांच्या दातृत्वाला या बीजाची उपमा दिली जाऊ शकते. भविष्यातील समृद्ध समाजाची उभारणी करण्यासाठी शिक्षणासोबत ग्रंथालयांची एक साखळीच बडोदा संस्थानात त्यांनी तयार केली. भारतातील विविध भाषांमध्ये संवाद व्हावा, यासाठी भाषांतर शाखा सुरू केली. इतिहास संशोधनासाठी प्राच्यविद्या संस्था (ओरिएंटल) सुरू केली. कलाभवनाची स्थापना करून समाजाच्या सांस्कृतिक उभारणीला महत्त्व दिले. महाराजांचे मोठेपण असे, की अशा वेगळ्या गोष्टी करण्यासाठी त्यांनी जरूर तेथे खासगी खात्यातून

तरतूद केली. हे असे खाते होते, ज्यातून राजा हौसमौज करत असे. सुधारणा केवळ बडोदा संस्थानात नव्हे तर भारतात जेथे जेथे म्हणून अशी कामे चालली आहेत, अशा सर्व ठिकाणी झाल्या पाहिजेत, असा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळेच सयाजीरावांच्या दातृत्वात संस्थानाच्या बरोबरीने संस्थानाबाहेरील शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, प्राच्यविद्या संस्था, लेखक, कलाकार, समाजसुधारक, क्रांतिकारक अशा सर्वांचा समावेश आहे. राष्ट्र या संकल्पनेचा भारतीय संदर्भात मला अभ्यास करावयचा आहे, असे महाराज म्हणत असत. अनेक संस्थानांपैकी एक असलेल्या संस्थानाच्या राजाला त्यावेळी असे वाटणे आणि त्याने त्यासाठी अथक प्रयत्न करणे, हे महाराजांच्या दातृत्वाचे वेगळेपण आहे.

महाराजा सयाजीराव यांनी कोणकोणत्या संस्था आणि व्यक्तींना मदत केली होती, याची काही उदाहरणे पाहिली तरी त्यांच्या अखिल भारतीय दृष्टीची आणि दूरदृष्टीची कल्पना येते. अशा प्रमुख संस्थांमध्ये बनारस विश्व विद्यालय (अलाहाबाद), भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था (पुणे), डेक्कन एज्युकेशन सोसायटी (पुणे), महाराजा जमनाबाई बोर्डिंग (सातारा) अशा संस्थांचा समावेश आहे. रायगडावरील धर्मशाळा आणि सज्जनगडावरील सभामंडपही त्यांच्याच देणगीतून बांधला गेला. ज्या व्यक्तींना सयाजीरावांनी मदत केली, त्यात महात्मा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, रियासतकार गो.स. सरदेसाई, रवींद्रनाथ टागोर, अरविंद घोष, गंगारामभाऊ म्हस्के यांचा समावेश आहे. हे पुस्तक वाचताना महाराजांच्या दातृत्वाचे असे विविध पैलू आणि आधुनिक भारताच्या पायाभरणीच्या संदर्भाने त्याचे महत्त्व अधोरेखित होईल, अशी खात्री आहे. स्वतंत्र भारतात ज्या-ज्या सामाजिक, धार्मिक , शैक्षणिक, आर्थिक सुधारणा केल्या गेल्या आणि ज्यांचा उच्चार आजही केला जातो आहे, अशा सर्व सुधारणांना महाराजांनी आपल्या प्रचंड दातृत्वाने त्यावेळी बळ दिले होते, हे यावरून लक्षात येते. महाराजांच्या या दातृत्वाचा शोध घेण्यासाठी लेखक डॉ. राजेंद्र मगर यांनी केलेले संशोधन म्हणूनच अमूल्य आणि महत्त्वाचे आहे. महाराजांनी दिलेल्या देणग्यांचे हिशेब काटेकोर पद्धतीने ठेवण्यात आले असल्यानेच त्या त्या नोंदी उपलब्ध झाल्या आहेत. अर्थात, ते मिळविण्यासाठी लेखकाला अनेक रिपोर्ट आणि पुस्तकांचा धांडोळा घ्यावा लागला. त्याची संदर्भ सूची त्यांनी सोबत दिली आहेच.

एक राजा आपल्या जनतेच्या पालकत्वाची भूमिका किती जबाबदारीने बजावू शकतो आणि राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या तयारीचा किती बारकाईने विचार करू शकतो, तसेच राज्यकर्त्यांच्या दातृत्वाला मानवकल्याण आणि खऱ्या अर्थाने समृद्ध जीवनाची दिशा देऊ शकतो, हे समजून घेण्यासाठी डॉ. राजेंद्र मगर लिखित ‘दानशूर महाराजा सयाजीराव’ हा ग्रंथ उपयुक्त ठरेल, अशी खात्री वाटते.

- यमाजी मालकर

# लेखकाचे निवेदन

## सयाजीराव महाराजांची काटकसर आणि प्रचंड दातृत्व

महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांच्या व्यक्तिमत्त्वात विद्वत्ता, उद्योगशीलता, चतुरस्र बुद्धी, हिंमत, व्यासंग अशा अनेक गुणांचा समुच्चय होता. योगायोगाने राजगादी मिळालेल्या या राजाने आपल्या ६४ वर्षांच्या कारकिर्दीत बडोदा संस्थानात केलेल्या सुधारणा नजरेत भरणाऱ्या होत्या. त्यांनी वयाच्या बारा वर्षांपर्यंत एका खेडेगावात शेतकऱ्याच्या मुलाप्रमाणे विनाशिक्षण जीवन व्यतीत केले. राजगादीवर विराजमान झाल्यावर दत्तकमाता महाराणी जमनाबाईसाहेब, दिवाण टी. माधवराव, तत्कालीन इंग्रज अधिकारी आणि शिक्षक यांनी त्यांना राज्यकारभारासाठी तयार केले. या शिक्षणकाळात त्यांना एफ.ए.एच. इलियट यांच्यासारखे धोरणी आणि राज्याचा सर्वंकष विकास पाहणारे आदर्श गुरू लाभले. या तिघांच्या दूरदृष्टीमुळे सयाजीराव महाराजांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळाले.

सयाजीराव महाराजांना वयाच्या बाराव्या वर्षापासून ते अठराव्या वर्षापर्यंत शिक्षण मिळाले. या काळातच या राजाला त्यांच्या गुरुजनांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. 'शिक्षणाशिवाय मानवाची उन्नती होऊ शकत नाही.' हे त्यांनी ओळखले होते. हिंदुस्थानातील लोकांच्या अवनतीला फक्त शिक्षणाचा अभाव कारणीभूत आहे हे अनुभवांती त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे राजसत्ता पूर्णपणे हाती आल्यावर त्यांनी आपल्या राज्यातील प्रजेला सुशिक्षित आणि ज्ञानी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी सरकारी पैशांतून सर्वांना मोफत शिक्षण देण्यासाठी कायदा केला. राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले.

त्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळाल्यामुळे आणि त्यांच्या अंगी असणाऱ्या चौकस बुद्धीमुळे संस्थानची सुधारणा झाली. ते स्वत: बुद्धिवंत आणि प्रज्ञावंत राजा असल्यामुळे दुसऱ्याच्या तंत्राने चालण्याच्या पद्धतीला त्यांनी प्रारंभापासूनच तिलांजली दिली. प्रत्येक निर्णय बुद्धीच्या कसोटीवर घासून आणि तपासून घेतला. त्यामुळे हुजरेगिरी किंवा खुशामत करणाऱ्या अधिकारी आणि प्रजाजन यांच्यापासून त्यांना कायमच दूर राहता आले.

राज्यकारभार हाती येताच बडोदा संस्थानाची 'हुजूर सवारी' केली. राज्याचा प्रत्येक भाग त्यांनी काही ठराविक अंतराने पाहिला. हे संस्थानात प्रथमच घडत होते. राजा आपल्यापर्यंत आला आहे याचे प्रजेला कुतूहल, नवल आणि आश्चर्य वाटत होते. त्यामुळे प्रजेला राजाविषयी प्रेम, माया आणि ममत्व वाटू लागले. हा राजा इतर राजांप्रमाणे नसून आपला तारणहार आहे हे प्रजेच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. त्यामुळे आपोआपच राजा आणि प्रजा यातील दरी कमी झाली.

राज्याचे पाहणी दौरे करत असताना सयाजीराव महाराजांच्या लक्षात आले, की संस्थानातील प्रजेला सुधारणांची आवश्यकता असून लोकांना सोयीसुविधा लवकरच उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. या सुविधा उपलब्धतेसाठी त्यांनी अपार कष्ट आणि मेहनत घेतली. प्रत्येक विभागात सुधारणा करण्यासाठी त्यांनी या समस्यांचा मुळातून अभ्यास केला. यामुळे त्यांना त्या-त्या विभातील समस्यांची जाणीव झाली. यावर उपाययोजना करण्यासाठी पैशांची आवश्यकता आहे हे त्यांच्या लक्षात आले. राज्याच्या तिजोरीत जर धन मुबलक असेल तर या धनातून सुधारणा होऊ शकतात हे वास्तव त्यांनी स्वीकारले; परंतु राज्याची तिजोरी भरावयाची म्हणजे प्रजेवर अमानुष कर लादून भरणे योग्य नाही, याचीही त्यांना कल्पना होती. त्यांनी राज्याच्या पूर्वीच्या आणि पारंपरिक उत्पन्नाच्या स्रोतामध्ये असणाऱ्या त्रुटी शोधल्या. नवीन उत्पन्नाचे मार्ग तयार केले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांनी स्वतःला, राजवाड्यातील नातेवाईकांना आणि राज्यातील अधिकाऱ्यांना बचतीची सवय लावली.

## राज्याचे उत्पादन वाढवले

सयाजीराव महाराजांनी राज्याचे उत्पादन वाढविण्यासाठी अनेक पारंपरिक पद्धतीत सुधारणा केल्या. ज्या लोकांच्या पिढ्यानपिढ्या संस्थानच्या उत्पादनावर आपली उपजीविका चालवत होते, ज्यांनी आजपर्यंत संस्थानात कधीही कर भरला नव्हता, त्यांना महाराजांनी योजलेल्या नवीन नियमांप्रमाणे करपात्र केले. यामुळे संस्थानातील ऐतखाऊ आणि सनातनी लोकांनी खळखळ केली; परंतु महाराजांनी प्रत्येक गोष्ट ही पूर्वतयारीनिशी केल्याने आणि प्रशासनावर त्यांचा वचक असल्यामुळे या गोष्टी त्यांना साध्य करता आल्या.

राज्यकारभार हाती आल्यावर संस्थानात सुधारणा करण्याचा महाराजांनी धडाका सुरू केला. त्यामुळे त्यांना अडचणींचा सामना करावा लागला; परंतु त्यावर खुबीने मात करत त्यांनी राज्याच्या उत्पादनाला शिस्त लावली. त्यातील एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे त्यांनी शेतकऱ्यांकडून घेण्यात येणाऱ्या शेतसाऱ्यात आणलेली नियमितता आणि पारदर्शकता. पूर्वीच्या काळी शेतकऱ्यांकडून मिळणारा शेतसारा हेच राज्याचे मुख्य उत्पन्न होते. शेतसारा हाच राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत असल्याने वसुलीसाठी अधिकाऱ्याकडून जबरदस्ती होत असे. वसुलीचे ठराविक आणि पारदर्शी धोरण नसल्यानेही बऱ्याच वेळा शेतकऱ्यांची फसगत होत असे. अशा अन्यायकारी वसुलीमुळे शेतकरी सावकारांच्या कचाट्यात सापडत असे.

महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्याच्या दुसऱ्याच वर्षी शेती सुधारणेसाठी 'सर्व्हे-सेटलमेंट' नावाचे नवीन खाते निर्माण केले. त्यामार्फत त्यांनी शेतीसंबंधित सुधारणा सुरू केल्या. पूर्वीच्या शेतसारा पद्धतीत आमूलाग्र बदल केले. शेतसारा ठरवण्याची सोपी आणि सर्वसमावेशक पद्धत सुरू केली.

शेतीमालाला अधिक भाव मिळण्यासाठी राज्याच्या अंतर्गत व्यापारावरील निर्बंध दूर केले. राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंवरील जकात प्रथम कमी केली. कालांतराने रद्द केली. अशा उपाययोजनांनी शेतकऱ्याला कर्जबाजारीपणाकडे जाण्यापासून रोखले.

देवस्थानासाठी देण्यात आलेल्या जमिनी, बक्षीस म्हणून त्यांच्या पूर्वजांनी दिलेल्या जमिनी आणि पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी करमाफी दिलेल्या बड्या सरदार आणि असमदार यांच्या जमिनी करपात्र केल्या. यासाठी गुरू इलियट यांच्या प्रमुखत्वाखाली 'बारखळी खाते' निर्माण केले. या अंतर्गत आतापर्यंत न मोजलेल्या जमिनीची मोजणी झाली. त्यावर कर बसविला. ज्या जमिनी लागवडीखाली नाहीत, त्या लागवडीखाली याव्यात म्हणून शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. अशा जमिनीचा शेतसारा काही वर्षांसाठी माफ केला. दुष्काळानंतर शेतकऱ्यांना शेतीत उत्पादन घेता यावे यासाठी आगाऊ रक्कम (तगाई) देण्याची पद्धत सुरू केली. राज्यात अनेक छोटे-मोठे उद्योग सुरू करण्यासाठी अनुदान दिले. इंग्रजांना द्यावा लागणारा काही वस्तूंवरील कर मुत्सद्देगिरीने कमी करून घेतला. राज्याच्या उत्पनाचे इतर स्रोतही त्यांनी शोधून काढले. अशा प्रकारे पारदर्शी आणि भविष्याचा वेध घेणाऱ्यानियोजनबद्ध धोरणामुळे राज्याचे उत्पन्न वाढले.

## राज्याच्या उत्पादनवाढीसाठी हुकूम

भविष्यात येणाऱ्या अडचणी आणि करावयाच्या सुधारणा यासाठी राज्यात अधिक धनराशी शिल्लक पाहिजे. यासाठी महाराजांनी राजसत्ता हाती आल्यापासूनच उपाययोजना केल्या. राज्याचे उत्पन्न आणि खर्च विचारात घेऊन बचत करावी यासाठी त्यांनी काढलेला हुकूम महत्त्वाचा आहे, तो पुढीलप्रमाणे : 'राज्यकारभार चालवण्यासाठी लागणारा खर्च भागवण्यासाठी राज्यात उत्पन्नाच्या बाबतीत सुधारलेल्या देशास अनुसरून व न्यायसर अशा पायावर ठरवून उत्पन्न वसूल करण्यात येत असावे; परंतु असे ठरलेले उत्पन्न वसूल करण्यानेच केवळ आपले कर्तव्य संपले असे अंमलदारांनी न समजता, ते उत्पन्न योग्य मर्यादेत वाढविण्याला कोणकोणते मार्ग आहेत हेही पाहत असले पाहिजे; व ज्या खात्याचा संबंध उत्पन्नाच्या बाबतीशी असेल त्या सर्व खात्यांनी त्या विषयाकडे नेहमी लक्ष देत असावे. दुसऱ्या देशी राज्याचे उत्पन्न निरनिराळ्या कारणांनी वाढत असते, तसे मार्ग आपल्याकडेही सापडण्यासारखे आहेत व त्याशिवाय दुसरे शोधून काढण्यासारखे आहेत. उदाहरणार्थ १) पडतर जमिनींची लागवड करणे, २) वेरा, कर, वगैरे यात फेरफार करणे, ३) व्यापारास उत्तेजन व सवलती देणे, ४) सेव्हिंग बँका काढून पैसे एकत्र करणे, ५) शेतीच्या पद्धतीत सुधारणा करून पीक वाढवणे, ६) शेतकरी लोकांच्या पेढ्या काढून त्यांची स्थिती ती सुधारणे, ७) जंगलांची स्थिती ती सुधारून व ती व्यवस्थिती त करून

उत्पन्न वाढविणे, ८) तलाव, कुवे, रस्ते वगैरे नवे करणे व जुने दुरुस्त करणे, ९) सरकारांतून जथाबंद झाडे लावणे व तसे करण्यास लोकांना उत्तेजन देणे, १०) अबकारी खात्याचे उत्पन्न योग्य प्रमाणात वाढविणे, ११) जंगलातील लाख काढण्याची तजवीज चांगल्या पायावर करून ते उत्पन्न वाढविणे.' अधिकारी आणि कर्मचारी यांनी राज्याचे ठरलेले उत्पादन वसूल करावे. तसेच ते वाढविण्याचे मार्ग शोधावेत अशा अर्थाचा हा हुकूम महत्त्वाचा आहे.

राज्याच्या तिजोरीत नेहमी भर पडत जावी असे महाराजांना वाटत होते. राज्याची जी शिल्लक राहते ती नेहमी वाढत राहावी याकडे त्यांचे लक्ष असे. याबाबत त्यांनी आणखी एक महत्त्वाचा हुकूम बजावला. 'राज्याची शिल्लक व्याजी लावण्याकडे लक्ष असावे व पूर्वीपेक्षा अधिक व्याज मिळण्यासारख्या पेढ्या, संस्था किंवा दुसऱ्या बाजू असतील, त्यांच्या शोधात राहून तेथे रकमा ठेवीत जावे. मात्र जास्ती व्याज मिळवण्याच्या खटपटीत त्या संस्थांची स्थायिकता व पत आणि आपल्या रकमेची सुरक्षितता चिकित्सापूर्वक पाहण्यास चुकू नये.' महाराजांनी राज्यात शिल्लक राहणाऱ्या रकमेतून आणखी पैसे वाढावेत यासाठी अशा स्वरूपाचा मार्ग काढला. पण तो मार्ग सुरक्षित आणि योग्य असावा असाही विचार त्यांनी केला होता. दरवर्षीच्या उत्पन्नातून प्रजेच्या सुधारणेसाठी काही पैसे शिल्लक ठेवावेत. हे ठेवलेले पैसे पुढे दुष्काळ किंवा अन्य संकटांच्या काळात उपयोगी येतात असे महाराजांचे मत होते. त्याबद्दल पुढीलप्रमाणे हुकूम काढला : 'सामान्यत: दरसाल राज्याच्या उत्पनांतून खर्च वजा जाता पंधरा लक्षांची बचत राहील अशी योजना असावी; म्हणजे राज्याची आर्थिक बळकटी अधिकाधिक वाढत जाईल व सांपत्तिक अडचणी पडणार नाहीत.' अशा प्रकारच्या नियमांमुळे राज्यात शिल्लक रक्कम वाढू लागली. त्याचा उपयोग विकास कामांसाठी करता येऊ लागला.

## काटकसर स्वत:पासून

महाराजांनी राज्याचे फक्त उत्पादनच वाढवले नाही, तर राज्यात होणाऱ्या अवास्तव खर्चावर मर्यादा आणल्या. त्यात काटकसर केली. याची सुरुवात त्यांनी स्वतःपासून केली. राज्यकारभाराच्या प्रारंभी सुरू केलेल्या पहिल्या हुजूर स्वारीपासूनच याची सुरुवात झाली. ही संस्थानाच्या प्रमुखाची पाहणी असल्यामुळे त्यांच्याबरोबर असणाऱ्या साहित्याची आणि काम नसणाऱ्या सेवकांची खूप गर्दी होत असे. त्यावर खूप खर्चही होत असे. हा लवाजमा महाराजांनी टप्प्याटप्प्याने कमी केला. यातील एक उदाहरण महत्त्वाचे आहे. महाराजांच्या स्वारीत त्यांनी दत्तकविधानापासून वापरलेल्या बुटांच्या जोडांसाठी एक बैलगाडी आणि काही नोकर होते. महाराजांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी अधिकाऱ्यांना तारतम्याने वागण्याच्या सूचना दिल्या. महाराजांनी पुढे एका भाषणात नोकरांनी व्यावहारिकदृष्ट्या वागून आणि समाजातील प्रत्येकाने कशी काटकसर करावी याबद्दल मार्गदर्शन केले. 'मी एकवीस वर्षांचा असताना एकदा प्रांतांत दौऱ्यावर गेलो होतो. तेव्हा या मंडळींपैकी काही नोकरांना बोभाटा होऊ नये व महाराज कोणत्या वेळी काय मागतील त्याचा नेम नाही म्हणून माझे सोळाव्या वर्षांचे कपडे व पादत्राणेही

प्रांतस्वारीत नेली होती. कोणत्या वेळी महाराजांना काय वस्तू लागतात त्याचे अज्ञान या लोकांत असते; परंतु महाराजांकडून कदाचित होणाऱ्या बोभाट्याच्या खोट्या सबबीखाली नोकर लोक आपले अज्ञान झाकण्याचा प्रयत्न करतात व अप्रत्यक्षपणे यजमानास कमीपणा आणतात. अशा रीतीने बोभाट्याचा आव आणून पैच्या ठिकाणी रुपया खर्च करणे हे समंजसपणाचे मानता येणार नाही. या पद्धतीने आपण आपले व्यवहार करू लागलो तर काय परिणाम होईल हे वर्णन करून सांगण्याची आवश्यकता नाही. 'आयजीच्या जिवावर बायजी उदार,' असे न करता जणू आपलेच घर आहे असे समजून सर्व प्रकारचे खर्च काटकसरीने केले पाहिजेत हे लक्षात ठेवा.' समाजातील प्रत्येकाने व्यवहार करताना काटकसर केली पाहिजे याबाबत महाराज नेहमीच आग्रही असत. अशा प्रकारचा अवास्तव खर्च त्यांनी राज्यकारभाराच्या प्रारंभीच कमी केला.

महाराज प्रत्येक गोष्टीची सुरुवात स्वत:पासूनच करत, त्यामुळे इतरांना विशेषत: राजवाड्यातील नातेवाईक आणि संस्थानातील अधिकाऱ्यांना मनात नसतानासुद्धा त्याचा स्वीकार करावा लागत असे. राजवाड्यात महाराज, महाराणी आणि कुटुंबातील इतरांच्या सेवेत खूप सेवक असत. हा आकडा साधारणपणे चारशेच्या आसपास होता. त्यामुळे विशेषत: महाराजांची सोय न होता गैरसोयच अधिक होत असे. कोणावरही एका कामाची जबाबदारी नसे, प्रत्येकजण काम दुसऱ्यावर ढकलून रिकामा होत असे. महाराजांच्या चाणाक्ष नजरेतून ही बाब सुटली नाही. त्यामुळे बिनकामाच्या आणि केवळ हुजरेगिरी करणाऱ्या सेवकांना त्यांनी दुसऱ्या खात्यात वर्ग केले किंवा कामावरून कमी केले. चारशे नोकरांचा आकडा जवळजवळ चाळीस वर आणला. त्याचप्रमाणे महाराज देशांतर्गत प्रवास करताना आणि परदेश प्रवास करताना केवळ दिखाऊपणा आणि डामडौलासाठी खूप मोठा लवाजमा त्यांच्या सोबत असे. महाराजांच्या ही बाब लक्षात येताच हा लवाजमाही कमी केला.

महाराजांकडे सदतीस वर्षे नोकरी केलेल्या रियासतकार गो.स. सरदेसाई यांनी प्रवासाच्या खर्चाबाबत दिलेले एक उदाहरण महत्त्वाचे आहे. 'पूर्वी सामान्यत: असा प्रकार होता की, राजधानीत स्वारी असता जशी खाशांची तजवीज असते तशीच तजवीज सर्वस्वी स्वारीत उठवून द्यावयाची. सर्व कारखाने (खाती) व त्यांचा अजबाब (चीजवस्तू), गाड्या, घोडे, जनावरे, नोकरचाकर, कपडालत्ता, जवाहीर, नाच, गाणी असे बडोद्यात असणारे सर्व प्रकार स्वारीत तयार करावयाचे, म्हणजे स्वारीची तजवीज लागण्यास काळ, खर्च, त्रास किती होत असेल याची कल्पनाच केली पाहिजे. अशा तजविजी लावण्यास आगाऊ एक-दोन महिने स्वारीस जाण्याचा निश्चय करावा लागे. प्रांतांत किंवा महाबळेश्वर, निलगिरी वगैरे ठिकाणी स्वारीचा मुक्काम व्हावयाचा म्हणजे त्या ठिकाणी एक लहानसे शहरच वसत असे. सन १८८२ च्या हिवाळ्यात महाराजांची स्वारी प्रथम कडी प्रांतात दोन महिने फिरावयास गेली, तेव्हा स्वारीत लोकसंख्या २३६७, जनावरे ९१० व स्वारीचा खर्च १,३४,६४७ रुपये झालेला आहे. सन १८८८ साली निलगिरीस स्वारी गेली आणि तेथेच श्री.मा. महाराणीसाहेब (दुसऱ्या) यांची प्रथम प्रसूती होऊन जयसिंहराव यांचा जन्म झाला. त्यावेळी स्वारीचा लवाजमा असाच अवाढव्य असून साडेतीन

महिन्यांचा खर्च रु. १,६६,००० झाला. हल्ली (इ.स.१९२५) तशाच स्वारीतील लोकांची संख्या बहुधा १००चे वर जात नाही. मोटार झाल्यापासून जनावरे बहुतेक कमी झाली आहेत; आणि तीन महिन्यांचा खर्च अलीकडच्या महागाईतसुद्धा पन्नास हजारावर जात नाही. पहिल्या विलायतच्या स्वारीत लोकांची संख्या ५० होती ती हल्ली सुमारे १० असते; आणि त्यावेळी दरमहा एक लाख खर्च लागला, ती हल्ली २५ हजारांचे वर जात नाही.' सरदेसाई यांनी दिलेले उदाहरण प्रातिनिधिक आहे. महाराजांनी जिथे जिथे काटकसर करता येईल तेथे त्यांनी केली. पुढे-पुढे अनेक वेळा महाराज फक्त पाच-सहा सेवक घेऊन प्रवास करत.

महाराजांनी बचतीची सुरुवात स्वतःपासून केली. यासाठीचा आणखी एक पुरावा म्हणजे त्यांनी स्वत:साठी एक नियम केला, तो पुढीलप्रमाणे : 'खुद्द हुजूरस्वारीचा खर्च फार मोठा आहे. अशा स्वाऱ्या नेहमी होऊ लागल्या, तर ही खर्चाची बाब मोठी होणार आहे, हे चांगले नाही. याचा विचार खानगी कारभारी यांनी करून कमी खर्चाचा रस्ता दाखविला पाहिजे.' (इ.स.१८९५). काही कारणांमुळे खर्च वाढला तर तो इतर ठिकाणी भरून काढावा यासाठी हुकूम काढला. 'काही अनिवार्य कारणांमुळे खर्च वाढविणे जरूरीचे पडले, तर दुसऱ्या कोणत्या तरी कामात तितकाच खर्च कमी करण्याचे धोरण ठेवावे. इतकेच नव्हे, तर कोणा खाशांस काही नवीन खर्च करणे असेल, तर त्यांस बांधून दिलेल्या रकमेत काटकसर करून त्या बचतींतून तसा खर्च करावा.' (इ.स. १९०५). याचप्रमाणे कोठेही वायफळ खर्च होत असेल तर त्यावरही निर्बंध घालण्यासाठी हुकूम काढला. 'खानगी खात्यात फाजील निरर्थक खर्च होत नाही, हे पाहण्याचे काम अंमलदारांचे आहे. तसा होत असलेला खर्च दाखवून तो बंद करण्यास सुचविण्याचे काम ऑडिट खात्यानेही केले नाही, तर त्याने आपले कर्तव्य चुकविल्यासारखे होईल.' (इ.स.१९०८). सयाजीराव महाराजांनी अशा प्रकारे बचतीची सुरुवात स्वतःपासून केली. त्यामुळे 'यथा राजा तथा प्रजा' या म्हणीप्रमाणे महाराजांच्या कुटुंबातील सदस्य आणि अधिकारी वर्ग यांनासुद्धा बचतीची सवय लागली.

## राजवाड्यातील काटकसर

महाराजांच्या काटकसरीची काही उदाहरणे पाहिली म्हणजे महाराज राज्याच्या खर्चाबाबत किती दक्ष होते हे समजेल. यामध्ये सर्वप्रथम त्यांनी खासगी खर्चात कपात केली. राजवाड्यात होणारे अवास्तव खर्च कमी केले. या बचतीची उदाहरणे खूप बोलकी आहेत. महाराजांच्या दत्तक मातुःश्री महाराणी जमनाबाई यांना विडा खाण्याची सवय होती. यासाठी राजवाड्यात दररोज दोन शेर चुना मागवण्यात येई. तसेच राजवाड्यात जेवण करणारी माणसे आठ होती; परंतु जेवणानंतर त्यांच्या मुखशुद्धीसाठी २ डझन सफरचंद मागवावी लागत असत. महाराजांच्या चाणाक्ष नजरेतून या बाबी सुटल्या नाहीत; परंतु अशा खर्चावर ताबडतोब नियंत्रण आणणे शक्य नव्हते. अशा वेळी त्यांनी महाराणी जमनाबाई यांना समजावून सांगितले. त्यांनी अशा बाबी टप्प्याटप्प्याने कमी केल्या. त्यावर नियंत्रण आणले.

महाराजांनी नियंत्रण आणताच जुनाट रूढी आणि परंपरांना चिकटून राहणाऱ्या आणि परंपरावादी विचारसरणीच्या राजवाड्यातील नातेवाईकांनी तक्रारीचा पाढा वाचण्यास सुरुवात केली. त्यावेळी महाराजांनी त्यांना कधी सबुरीने, तर कधी नियमाने नवीन धोरण आणि योजना यांचा स्वीकार करण्यास भाग पाडले. महाराजांनी राजकुटुंबातील सदस्यांसाठी एक हुजूर हुकूम काढला. 'राजकुटुंबातील दरेक खाशाच्या खर्चाची रक्कम बांधून देण्यात येते, त्यांच्या आतील बाबतीत ज्या त्या खाशास आपल्या सोयीप्रमाणे फेरफार करून घेण्यास हरकत नाही. त्यांस काही नवीन खर्च करणे असेल तर त्यांना बांधून दिलेल्या रकमेत काटकसर करून त्यांनी बचत करावी व तीतून असा खर्च करावा.' या हुकुमामुळे राजकुटुंबातील सदस्यांच्या खर्चावर आपोआपच बंधने आली. अशा वेळी अनेक कुटुंबांतील सदस्यांनी खासगीत या बंधनांवर नाराजी व्यक्त केली. त्यावर महाराज म्हणत, 'हा राजकोष माझा एकट्याचा नसून प्रजेचा आहे. त्याचा वापर योग्य कारणांसाठी झाला पाहिजे.'

राजवाड्यात चालणारे अमाप खर्च महाराजांनी हळूहळू कमी केले. त्यावर नियंत्रण मिळवले. राजवाड्यात असणाऱ्या सामानांची नोंद करण्याची प्रथा नव्हती. यामुळे मौल्यवान साहित्य अचानक गायब होत असे. खानगीतील नोकरांचा यात सहभाग असे. गायब झालेले साहित्य किंवा दागिने पुन्हा खरेदी करण्यासाठी राजकोषातील धन वापरले जात असे. महाराजांनी अशा सर्व साहित्याची नोंद सुरू केली. साहित्याची नोंद आणि खातरजमा यामुळे मौल्यवान वस्तू गायब होण्याचे प्रमाण कमी झाले. या सुरू केलेल्या नवीन पद्धतीमुळे बचत होऊ लागली.

राजवाड्यात कोणतेही साहित्य खरेदी करावयाचे झाले म्हणजे ते सामान लिलाव पद्धतीने खरेदी करावे असे महाराजांनी ठरवले. त्यामुळे ते साहित्य कमीत कमी पैशात खरेदी व्हावे असे त्यांना वाटत होते. ही पद्धत अवलंबल्यामुळे पैशाची बचत व्हावी असे महाराजांचे मत होते. पूर्वी अनेक लोकांस राजवाड्यातून गाड्या, घोडे, सिधे, सणांसाठी साहित्य आणि इतर अनेक वस्तू देण्याचा प्रघात होता; परंतु हे साहित्य खरेदी करत असताना त्यात खूपच अफरातफर होत असे. त्यामुळे या वस्तू महाग पडत असत. यासाठी महाराजांनी नवीन नियम लागू केला. असे खर्च नक्की करून त्या-त्या व्यक्तींना पगाराबरोबर देण्याचे ठरवले. त्यामुळे राजवाड्यातील खर्चावर चाप बसला.

राजवाड्यात आणि राज्याचे काम करणारास किरकोळ साहित्य लागत असे. त्यामध्ये भांडी घासण्याचे साहित्य, कपडे स्वच्छ ठेवण्यासाठी लागणारे साहित्य, पूजा करण्यासाठी लागणारे साहित्य, राजवाड्यातील गाड्या, घोडी तसेच इतर साहित्य स्वच्छ करण्यासाठी लागणारे साहित्य अशा खूपच साहित्याची गरज पडत असे. त्याची नोंद ठेवणे खूप अवघड जात असे. त्यामुळे महाराजांनी त्यासाठी वेगळा नियम केला. गरज असणारे साहित्य त्या-त्या नोकराने खरेदी करावे. त्याबदल्यात त्यांना रोख स्वरूपात पैसे द्यावेत असे ठरले. यामुळेही पैशाची बचत होऊ लागली.

राजवाड्यातील प्रत्येक नोकरास गरज पडणाऱ्या साहित्याची यादी करायला लावून त्यासाठी रोख पैसे दिले; परंतु यानंतरही काही मागण्या येऊ लागताच त्याबाबत चौकशी करण्यासाठी काही लोकांची नेमणूक केली. महाराजांना आणि राजवाड्यातील लोकांना काही लोक अनेक मौल्यवान वस्तू नजर करत. त्याची पूर्वी मोजदाद नव्हती. त्यामुळे अशा वस्तू परस्पर गायब होत असत म्हणून अशा वस्तूंची मोजदाद सुरू केली.

महाराजांनी प्रत्येक नोकराची जबाबदारी निश्चित केली. अमूक एका अव्यवस्थेला कोण कारणीभूत आहे याबाबत लगेचच खुलासा होत असे. महाराज राजवाड्यातील अनेक लोकांची आणि खात्याची चौकशी स्वत: करत किंवा इतरांकडून करून घेत. या व्यवस्थेमुळे नोकरांत एक प्रकारची शिस्त निर्माण झाली. कमी लोक नोकरीस लागू लागले. परिणामी खर्चाची बचत झाली.

महाराजांनी खर्चात काटकसर केली; याच्या उलट राज्याचे उत्पन्न वाढावे म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केले. यामध्ये महाराजांनी योजलेला एक-एक उपाय पाहिला म्हणजे खात्री पटते. जनावरांच्या पायाखालील कचरा, बागांतील गवत, फळे, फुले, भाज्या, प्रत्येक खात्यातून निरुपयोगी होणारे साहित्य अशा सर्वांचा लिलाव करून येणारी रक्कम सरकारमध्ये जमा करण्याची पद्धत सुरू केली. अशा सूक्ष्म नियोजनामुळे राजकोषात कायमच भर पडत असे.

राजवाड्यातील नातेवाईकांनी गरजेपुरता खर्च करावा, तसेच राज्याचे उत्पादन वाढवून प्रजेच्या सुधारणा करता याव्यात यासाठी महाराजांनी कायमस्वरूपी जमा आणि खर्च या दोन्हीवर नियंत्रण ठेवले होते. खासगी खात्यातील खर्च कमी व्हावा यासाठी महाराजांनी अनेक प्रकारे प्रयत्न केले. याबाबत रियासतकार सरदेसाई यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. ‘सन १९०४ पासून वर्ष-सव्वावर्षपावेतो मि. हार्डिंग हे खानगी कारभारी होते; परंतु त्यांच्या कामाचा विशेष परिणाम खात्यात दिसून आलेला नाही. सन १९०५ साली श्रीमंत संपतराव यांची नेमणूक या खात्यावर झाली, ती मध्यंतरी अनेक फेरफार होऊन सन १९१३ पावेतो चालली. त्यांच्या वेळचे मुख्य काम म्हणजे रिटेंचमेंट कमिटी (काटकसर समिती) नेमण्यात येऊन सन १९०६-०७ सालांत तमाम खर्चाची व व्यवस्थेची नवीन रचना करण्यात आली, हे होय. वरील आठ वर्षांच्या कौटुंबिक व्यवहारात संपतरावांचेच मुख्य अंग मुख्यत: होते.’ खासगी खात्यात काटकसर करावी म्हणून काटकसर समितीची स्थापना करावी हे महाराजांच्या कारभाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

राजवाड्यात डामडौलाच्या नावाखाली राजकुटुंबाचे सदस्य, नातेवाईक आणि अधिकारी वायफळ खर्च करत. याला प्रत्येक वेळी लगाम घालणे शक्य नव्हते. महाराज राजधानीच्या किंवा राज्याबाहेर असताना खर्च वाढत असे. राजवाड्यातील व्यक्ती याबाबत काळजी घेत नसत. त्यामुळे महाराजांनी आर्थिक बाबींचा जेथे-जेथे प्रश्न येत असे अशा सर्वच आस्थापनेला नियम केले. हे सर्वच हुजूर हुकूम ‘आज्ञापत्रिकेत' प्रसिद्ध केले (सयाजीराव महाराज गादीवर आल्यावर जे-जे नियम करत त्या सर्वच नियमांची प्रसिद्धी या पत्रकात दर आठवड्याला केली जात असे). त्यातील काही हुजूर हुकुमांचे विषय पुढीलप्रमाणे- १) लहान मुलांचे मेळावे राजवाड्यात आयोजित

केल्याप्रसंगी 'बक्षीस देण्याबाबत नियम (इ.स.१९०४), २) वस्त्रदानासंबंधी नियम (इ.स.१९३०), ३) अहेर-बहुमान-पोशाख नियम (इ.स.१९१४), ४) तीळगुळासंबंधी नियम (इ.स.१९१७), ५) सत्कारद्रव्यसंचयसंबंधी नियम (इ.स.१९२५-२६) (महाराजांना काही ओवाळण्या पैशाच्या किंवा इतर द्रव्याच्या रूपाने येत, त्याची वाटणी महाराजांच्या सेवेतील हुजरे करून घेत. त्यात पुढे अनियमितता येऊ लागली. काही हुजरे गुपचूप ओवाळण्या हडप करू लागले. हा सर्व पैसा महाराजांनी एकत्र करून बँकेत ठेवला व त्याच्या व्याजातून सेवेतील नोकरांच्या मुलांना शिष्यवृत्ती सुरू केली.), ६) श्रीमंत सरकार महाराजसाहेब यांच्या खानगी हिशेबी कचेरीतील कामाची अंतर्व्यवस्था (इ.स.१९३०), ७) अक्षत व सुपारी देण्याघेण्याच्या प्रघातासंबंधी नियम (इ.स.१९३५), ८) शिकारखान्याच्या अंतर्व्यवस्थेचे नियम (इ.स.१९३२), ९) नगारखान्याचे अंतर्व्यवस्थेचे नियम (इ.स. १९३५), १०) सिंहाच्या व वाघाच्या शिकारीसंबंधी नियम (इ.स.१९२९), ११) शिकारीचे नियम (इ.स.१८९५), १२) राजवाड्यातील व्यवस्थेसंबंधी नियम (इ.स.१९३२), १३) सरकार खानगी कचेरी गोठगस्ते यांचे कामासंबंधी नियम (इ.स.१९१२), (राजवाड्यात होणाऱ्या नित्यनैमित्तिक कामाची नोंद ठेवणाऱ्या व्यक्ती), १४) सादिलवार (कंटिजंट) खर्चाबाबत नियम (इ.स.१९३२), १५) Rules for the management of the palace Garage (1913), १६) खानगी खाते निधी नियम (इ.स. १८८६ आणि १९३९), १७) Rules for the management of the royal stables (1910), १८) राजमहल कामगारी कारकुनांच्या कर्तव्यासंबंधी नियम (इ.स.१९१५), १९) खानगी खात्याचे ताब्यातील कारखान्यांच्या कामाच्या माहितीसंबंधाने परीक्षेचे नियम (इ.स.१९१५), २०) पाळीव कुत्र्यांचे नियम (इ.स.१९१५), २१) श्रीमंत गायकवाड सरकार यांच्या खानगी खात्यातील कढईसंबंधी नियम (इ.स.१९१५), २२) लढाऊ जनावरांच्या खेळांचे नियम (इ.स.१९२४), २३) खासे घोडे बग्गीखात्याचे नियम (इ.स.१९००-०१), २४) मानकरी मंडळींच्या कर्तव्यासंबंधी नियम (इ.स.१९०८), २५) मकरपुरा येथील राजवाडा आणि बागेसंबंधी नियम (इ.स.१८९४), २६) खानगी खात्यातील सेवकांच्या पोशाखासंबंधी नियम (इ.स.१९२२), २७) खानगी खात्यातील वस्तूंच्या फुटतुटीसंबंधी नियम (इ.स.१९१४-१५), २८) खास बग्गीखान्यातील नोकरांच्या कामकाजासंबंधी नियम (इ.स. १८८९), २९) खास फरासखान्याच्या तजविजीबद्दल नियम (इ.स.१८८९) असे खानगी खात्यातील आणि राजवाड्यातील प्रत्येक आर्थिक बाबीसंबंधी महाराजांनी नियम केले. नियमबाह्य खर्च करणाऱ्याला कायद्याने शिक्षा करण्याची तरतूद करण्यात आली. त्यामुळेही खर्चात बचत झाली. खर्च योग्य कारणांवर होऊ लागला.

## महाराणींना बचतीचा सल्ला

सयाजीराव महाराज स्वतःबरोबर कुटुंबातील इतरांनी बचत करावी यासाठी आग्रही असत. ते नेहमीच कुटुंबातील सदस्यांना बचतीबाबत मार्गदर्शन करत. महाराणी चिमणाबाई यांना एका पत्रातून बचत करण्याविषयी सांगितले. महाराजांनी हे पत्र महाराणी चिमणाबाई यांना लिहिले

नसले तरी त्यातून स्पष्टपणे त्यांनी बचत करावी याबद्दल उल्लेख केला आहे. महाराज पत्रात लिहितात, 'महाराणी आणि राजघराण्यातील इतर व्यक्तींनी खर्च करताना त्यांच्यासाठी ठेवण्यात आलेल्या निधीतूनच करावा. त्यांची मागची जयपूरची सहल ही निव्वळ मौज करण्यासाठी होती. त्यामुळे त्याचा खर्च त्यांनी स्वत: करणे अपेक्षित आहे. कारण त्यांच्या स्वत:च्या खर्चासाठी निधी राखून ठेवलेला आहे. मात्र, खानगी अधिकाऱ्याला हे स्पष्टपणे लक्षात आणून द्यायचे धाडस नाही. त्यामुळे मला ही भीती वाटते की, अधिकाऱ्यांमध्ये जर नैतिक धैर्य आणि युक्तीने काम करण्याचा गुण नसेल तर खास व्यक्तींची अनावश्यक गैरसोय होऊ शकते. याची दुरुस्ती करण्यासाठी चुकीच्या पद्धतीने व्यवहार करणाऱ्यांना शिक्षा द्यावी लागेल. महाराणींनी त्यांच्यासोबत जास्तीचा स्टाफ आणि इतर खास व्यक्तींना नेण्याची गरज नाही आणि त्या लोकांनी स्वत:चा खर्च स्वत: करण्याऐवजी तो राज्यावर टाकणे योग्य नाही. मग निधीची स्वतंत्र तरतूद करण्याचा उपयोग काय? महाराणींनी स्वत: या बाबी समजून घ्यायला हव्यात. त्यांना हे सांगण्याची गरज भासू नये. मी हे सांगतोय ते यामुळे नाही की, मी माझ्या कुटुंबाचा सहानुभूतीने विचार करीत नाही. कदाचित ते तसा विचार करतील; पण जोपर्यंत केलेल्या तरतुदीतच खर्च करण्याची प्रत्येकाला सवय लागणार नाही, तोपर्यंत आज्ञापालन आणि शिस्तीचीही अपेक्षा करता येणार नाही.' महाराजांनी अशा प्रकारे महाराणी चिमणाबाई यांच्याकडूनही बचतीची अपेक्षा ठेवली होती. त्यांनी जास्तीचा आणि अनावश्यक खर्च करू नये म्हणून त्यांना स्वतंत्र निधी राखून ठेवला होता. त्यातील निधीचा वापर करावा असे सुचवले होते. त्याचबरोबर त्यांनी जास्तीचा वायफळ खर्च करू नये आणि त्याचा भार राज्याच्या तिजोरीवर टाकू नये असे त्यांना वाटत होते.

## राजपुत्रांना बचतीची सवय लावली

सयाजीराव महाराजांचे सर्वच राजपुत्र परदेशात शिक्षण घेत होते. त्यामुळे त्यांच्या शिक्षणासाठी आणि खर्चासाठी महाराज खासगीतून पैसे पाठवत होते. यात राजपुत्रांच्या हातून कधी-कधी जास्त पैसे खर्च होत असत. महाराजांनी जास्त खर्च करणाऱ्या राजपुत्रांना पुढील पैसे देताना कमी करून दिले. याबाबतचे एक उदाहरण महत्त्वाचे आहे. लंडन येथे शिकायला गेलेल्या राजपुत्रांना खर्चासाठी प्रति महिना ४० पौंड पाठवले जात; परंतु एका महिन्यात या राजपुत्राने दहा पौंड जादा खर्च केले. महाराजांनी राजपुत्राच्या गार्डियनला पत्रातून कळवले. 'असा वाढीव खर्च मंजूर केला जाणार नाही. राजपुत्रांनी मंजूर केलेल्या रकमेतच आपला खर्च भागवावा.' अशा प्रकारची ताकीद गार्डियनला दिली.

राजपुत्र जयसिंगराव परदेशात शिक्षण घेत होते. त्यावेळी महाराजांनी लिहिलेल्या पत्रातून राजपुत्रांना अगदी कमी वयापासून बचतीची कशी सवय लावली हे स्पष्टपणे दिसते. महाराज लिहितात, 'तुम्हाला अकरा पौंड किमतीचा फोनोग्राफ (रेकॉर्ड प्लेयर) विकत घेऊन द्यावा असे मी इलियट यांना लिहीत आहे. कारण तुम्ही चांगली प्रगती दाखवली आहे. पुढच्या वेळी मी

तुम्हाला असे महागडे खेळणे घेऊ देणार नाही. कारण तुम्ही अशा अनावश्यक व महागड्या वस्तू खरेदी करू नयेत असे मला वाटते. तुम्ही आरामात राहावे; पण स्वतःला अशा महागड्या सवयी लावून घेऊ नयेत. सुरुवातीला जरी तुम्हाला आपल्या इच्छांवर नियंत्रण ठेवणे कठीण वाटले तरी तुमच्या भविष्यासाठी हे कल्याणकारी होईल.' महाराज सर्व राजपुत्रांना अशा प्रकारे बचतीची आणि कमी खर्च करून त्यात आपले जीवनमान व्यतीत करावे आणि सुधारावे यासाठी मार्गदर्शन करत.

महाराजांचे पुतणे आबासाहेब (बंधू संपतराव यांचा मुलगा) यांच्याविषयी महाराजांनी दिवाण मनुभाई मेहता यांना लिहिलेल्या पत्रात त्यांच्यावरील खर्च कमी करावा किंवा बंद करावा असे स्पष्टपणे म्हटले आहे. 'संपतरावांच्या मुलाने स्वतःच्या पायावर उभे राहणे गरजेचे आहे. त्याविषयी आपली जबाबदारी संपतरावांना विसरून चालणार नाही. नैतिक दृष्टिकोनातूनही त्यांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष करणे मला संयुक्तिक वाटत नाही. ते लक्ष देणार नसतील तर आपल्याला त्यांना तसे करण्यास भाग पाडावे लागेल.' सयाजीराव महाराजांना राजघराण्यातील मुलांविषयी आपुलकी वाटणे साहजिक आहे. त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी स्वतःच्या पायावर उभारून संस्थानातून दिला जाणारा खर्च कमी केला पाहिजे असे त्यांना वाटत होते.

महाराजांचे राजपुत्र जास्त खर्च करत. त्यांना बचतीची शिस्त लागावी म्हणून कधी-कधी कठोर शब्दांतसुद्धा महाराजांनी पत्रे लिहिली आहेत. राजपुत्र धैर्यशीलराव यांना महाराज एका पत्रात लिहितात, 'तुझा तुझ्या कुटुंबाला किंवा राज्याला कसलाही उपयोग होत नाही. याउलट तू चिंता, काळजी आणि अधोगतीचेच कारण राहत आला आहेस. हे वाचायला दु:खद वाटत असले तरी ती वस्तुस्थिती ती आहे. गेल्या दोन पिढ्यांपासून मी कार्यरत आहे. मात्र तुमच्यापैकी कोणाचीही मला मदत झालेली नाही. हे सर्व असतानाही तू कोणत्याही वाजवी कारणाशिवाय पैशाची मागणी करीत आहेस. तू स्वत: काम करून पैसे का कमवत नाही? तुझ्या गरजांसाठी तू राज्यावर का अवलंबून राहतो? राज्याने आतापर्यंत खूप केले आहे. राज्याच्या साधनसंपत्तीलाही मर्यादा आहेत.' महाराज राज्याची साधनसंपत्ती ही प्रजेची आहे असे समजत होते, त्यामुळेच त्यांनी उधळपट्टी करणाऱ्या राजपुत्रांना अशा प्रकारे सुनावले आहे.

सयाजीराव महाराजांनी राजवाड्यातील सर्वच लोकांना सेवकांपासून ते नातेवाईकांपर्यंत बचतीची सवय लावली. या बचतीतून त्यांनी मोठ्या प्रमाणात गरजवंतांना दान दिले.

## दानधर्मात कपात

महाराज राजगादीवर येण्यापूर्वी बडोदा संस्थानात मोठ्या प्रमाणावर दानधर्म चाले. तसेच श्रावण महिन्यात देशभरातून आलेल्या सर्व ब्राह्मणांना दक्षिणा दिली जात असे. नको त्या कारणांसाठी आणि गरज नसलेल्या व्यक्तींना दान दिले जात असे. त्यामुळे खऱ्या गरजवंत लोकांना या दानाचा फायदा होत नव्हता. परिणामस्वरूप केलेले बहुतांशी दान वाया जात असे. अभ्यासांती ही बाब महाराजांच्या लक्षात आली. तसेच त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत

अवगत करून चौकशी करण्याचे आदेश दिले. या चौकशीत दानधर्माचा फोलपणा त्यांच्या लक्षात आला. त्यामुळे त्यांनी यात मोठ्या प्रमाणात कपात केली; परंतु गरजू व्यक्तींना हा दानधर्म महाराजांनी सुरू ठेवला (याबाबत अधिक निवेदन 'धर्मदाय खात्यातील काटकसर' या प्रकरणात केले आहे).

## महाराजांचे दानधर्मविषयक विचार

सयाजीराव महाराजांनी ज्यावेळी राज्यकारभार हाती घेतला त्यावेळी बडोदा संस्थानात दान करण्याचे अनेक प्रकार प्रचलित होते. या प्रकारांना कोणत्याही प्रकारचा शास्त्रीय आधार नव्हता. अशा प्रकारचा अवाजवी आणि अशास्त्रीय आधारावर चाललेला दानधर्म त्यांनी राज्यकारभाराच्या सुरुवातीलाच बंद केला. हा सर्व दानधर्म त्यांनी विधायक आणि लोककल्याणासाठी वापरला. याबाबतचा त्यांचा विचार त्यांनी 'श्राद्धविधीसंबंधी माहिती' या हुजूर हुकुमात दिला आहे. 'ब्राह्मणास दाने द्यावी असा प्राचीनकाळी जो नियम करण्यात आला त्याच्या मुळाशी तरी हेच तत्त्व आहे. त्यावेळच्या गुणकर्म विभागाप्रमाणे ब्राह्मण स्वत: अध्ययन व यजन करून इतर लोकांसाठी अध्यापन व याजन करीत असत. अर्थात, स्वत: शिकून लोकसमाजास शिकवण्याचे काम करीत असत. म्हणूनच परोपकारासाठी झटणाऱ्या अशा सत्पात्र वर्गास लोकही खुशीने दान देत असत. सांप्रतकाळी खरे ब्राह्मण कोण व ज्या इसमास चालू रूढीस अनुसरून आपण दान देतो त्यापैकी कोण खऱ्या ब्राह्मणत्वाचा व धर्मग्रंथात सांगितलेल्या सत्पात्रत्वाच्या कसोटीस उतरतात व कोण केवळ नामधारी ब्राह्मण आहेत याचा आपण अवश्य विचार केला पाहिजे. निरुद्योगीपणास उत्तेजन न मिळता, समाजास उपयुक्त होईल अशा प्रकारचे यथाशक्ती व सत्पात्र दान केले पाहिजे. यादृष्टीने पाहता अनाथाश्रम व उपयुक्त विद्यापीठे स्थापने, शिक्षणाचे कामी मदत करणे, अपंग लोकांचे पोषण करणे, दवाखाने काढणे, वैद्यकीय मदत करणे इत्यादी प्रकारची दाने हल्लीच्या काळी योग्य होत.' महाराजांनी हुकुमाच्या रूपात दान कोणाला करावे आणि कशासाठी करावे यासंबंधी माहिती सांगितली.

सयाजीराव महाराजांनी बडोद्यातील 'पिलाजीराव अनाथाश्रम' उघडण्याचा जो कार्यक्रम झाला, त्यामध्ये त्यांनी केलेल्या भाषणांत विविध धर्मग्रंथात दानधर्माचा असलेला अर्थ सांगितला. त्यांनी या भाषणाच्या सुरुवातीलाच दान कोणी घ्यावे किंवा दानधर्मासाठी कोण पात्र ठरतो, यावर शास्त्रशुद्ध पद्धतीने विचार मांडले. 'समाज हा त्रिविध आहे. त्यात तीन प्रकारचे लोक ठळकपणे दिसतात. एक सर्व समाजाचे नशीब ज्यांच्या मुठीत आहे असे धुरीण व प्रसिद्ध लोक, दुसरे बहुसंख्य; पण सामान्य असे स्वावलंबी लोक आणि तिसरे स्वतःच्या पोटापाण्यासाठी दुसऱ्याच्या दानधर्मावर अवलंबून असलेले कंगाल लोक. यापैकी तिसऱ्या प्रकारच्या लोकांचा विचार आज प्रस्तुत आहे. जे लोक नेहमीच काही आपल्या हाताने पायावर धोंडा पाडून घेऊन कायमचे कंगाल-बनत नसतात, त्यांचा स्वतःचा दोष बहुश: फारसा, छे! मुळीच नसतो. ज्या कारणामुळे ते जन्माचे भिकारी बनतात, त्यातली काही उदाहरणे म्हणून

सांगतो. १) शारीरिक किंवा मानसिक जन्मजात वैगुण्य, २) बुद्धीचा आणि नीतिमत्तेचा अभाव; ३) जीवनशक्ती शोषून घेणारा आजार किंवा हाती घेतलेल्या कामात एकसारखे अपयश अथवा मुळी कामच न मिळाल्यामुळे निराशेच्या व चिंतेच्या पायी हळूहळू होत जाणारा अधःपात; ४) प्लेग, दुष्काळ इत्यादी आपत्तीच्या वेळी येणारी सांपत्तिक व नैतिक हलाखी आणि ५) वार्धक्य. आणखी पुष्कळ कारणे असतात.' अशा सर्व लोकांना दानधर्माची आवश्यकता असते असे महाराजांचे स्पष्ट मत होते. पूर्वी म्हटल्याप्रमाणे जे लोक धडधाकट आणि कोणत्याही प्रकारचे शारीरिक आणि मानसिक पंगुत्व नसते; अशा लोकांना या दानधर्मातून वगळले पाहिजे हा नियम महाराजांनी सुरुवातीपासूनच अवलंबला होता.

सयाजीराव महाराजांना दान हे सत्पात्री असावे असे वाटत होते. त्यामुळे त्यांनी दानधर्म करतेवेळी उपयोगिता तपासून पाहिली. त्याचा उपयोग हा अनाथ, गरीब आणि अस्पृश्य लोकांसाठी झाला पाहिजे असे त्यांना नेहमी वाटत होते. 'राजसेवकांची कर्तव्ये' या विषयावर महाराजांनी २३ फेब्रुवारी १९३८ रोजी केलेल्या भाषणात दानधर्माविषयी स्पष्टपणे सांगितले, 'पूर्वी दानधर्म व देवस्थाने याकडे वाजवीपेक्षा फाजील खर्च होत असे. आपल्याकडील समजुतीप्रमाणे दानधर्म हे राजाचे व राज्याचेही भूषण होत. त्यामुळे राजाच्या अंगी असलेल्या उदात्त गुणांची सहज साक्ष पटते. तथापि, अशा धर्मादाय संस्था, त्यांच्या संस्थापकांचा हेतू, त्यांची कालमानानुसार असणारी आवश्यकता व त्यांचा होत असलेला प्रत्यक्ष उपयोग यांचा विवेकबुद्धीने विचार करावयास पाहिजे. तसे न करता केवळ लौकिक लालसेने किंवा अंधश्रद्धेने अशा धर्मादाय संस्था चालू ठेवणे किंवा त्यात इष्ट असेही फेरफार न करणे, हे समंजसपणाचे नाही. दानधर्म हा 'देशे काले च पात्रेच' या तीन गोष्टी लक्षात घेऊन करावयास पाहिजे. ज्या दानधर्मापासून चिरकालीन फलप्राप्ती होते व दारिद्र्य, आळस इत्यादी हानिकारक गुणांची वाढ न होता त्यांचे निरसन होण्यास जो कारणीभूत होतो तोच योग्य दानधर्म होय. मोठमोठे जलाशय बांधणे, औषधालये स्थापणे अथवा ज्ञानार्जनाच्या कामी मदत करणे अशा बाबतीसाठी होणारा दानधर्म उच्च प्रकारचा होय. याच धोरणाने देवघरात अंधश्रद्धा व वेडगळ समजुती यांच्या आधारावर होत असलेले विधी व आचार काही अंशी बंद केले असून फक्त लौकिक व व्यावहारिकदृष्ट्या योग्य असे आचार व विधी चालू ठेविले आहेत. यातदेखील अद्याप सुधारणा करण्यास बरीच जागा आहे. सर्वांस धर्म पाहिजे आहे, मात्र तो नैतिक असून ऐदीपणास उत्तेजन देणारा नसला पाहिजे.' सयाजीराव महाराज बुद्धिवंत राजे असल्यामुळे त्यांनी प्रचलित सर्व धर्मातील दानाविषयी असणाऱ्या संकल्पना समजावून घेतल्या होत्या. त्यामुळे दानधर्माबाबत त्यांच्या संकल्पना सुस्पष्ट होत्या. धर्माचा धाक दाखवून आणि शापाच्या भीतीने जबरीने दान वसूल करणाऱ्या लोकांपासून महाराज नेहमीच सावध राहिले. त्यांनी शास्त्रीय आधारावर आणि जे फक्त गरजवंत आहेत त्यांनाच दान दिले.

दान दिल्यामुळे मोक्षप्राप्ती होते, त्यातून पुण्य लाभते यावर महाराजांचा विश्वास नव्हता. यामुळे मोक्षप्राप्तीसाठी जर दानधर्म करत असाल तर ते अधिक धोकादायक आहे असे त्यांना

वाटत होते. २० जानेवारी १९१५ रोजी पाटण येथे प्रसूतिगृहाची कोनशिला बसविण्याच्या समारंभात महाराज म्हणाले, ‘हिंदू लोकांच्या धर्मभावनांचा पाया परोपकार व भूतदया हाच आहे. प्रथम परोपकाराचा विचार करू. खरा परोपकार कोणता? मोक्षप्राप्तीचा हेतू मनात धरून गरिबांना व धंदेवाईक भिकाऱ्यांना सर्रास दानधर्म करीत सुटणे, पात्रापात्रविवेक अजिबात न करणे हा काही खरा परोपकार नव्हे. खरा परोपकार जेव्हा एखाद्या विशिष्ट हेतूसाठी करावयाचा असतो, तेव्हा तो जाती-पंथातीत असावा, संघटित असावा, श्रीमंतांच्या हजारी आकड्याबरोबर त्यात धर्मवासनेने दिलेल्या गरिबांच्या पया-दमड्यादेखील दाखल केलेल्या असाव्यात आणि नेहमीप्रमाणे तो सत्पात्रीही घडावाच. इतके साधले तर परोपकाराचा मूळ हेतू साध्य होतो. एखाद्या परोपकारी संस्थेशी आपले नाव निगडित करावे, अशी नावलौकिकाची हाव बाळगून त्या संस्थेला पुरेशी नव्हेच; पण अगदी तुटपुंजी रक्कम देऊन व संस्था कशीबशी उभी करून आपल्या दातृत्वाची जाहिरात करण्यात अर्थ नाही. जेव्हा एकाची रक्कम अपुरी असेल तेव्हा दुसऱ्या दानशील गृहस्थांची मदत घेऊन दोघा-चौघांनी मिळून एखादी परोपकारी संस्था भक्कम पायावर काढलेली बरी. असे करण्यात त्याची नावलौकिकाची हौस सर्वस्वी पुरी होणार नाही हे खरे; पण ती हौस किती घातक आहे याचा विचार त्यांनी करावयाला हवा. उत्तम धर्मकार्य घडण्याकरता थोडीशी हौसेची मोडतोड झाली तर काही बिघडत नाही. इतकी मीपणाची भावना हवी कशाला? कीर्तीच्या प्राप्तीसाठी नेहमी अहंपणाचे दस्तऐवजी पुरावे लागत नसतात.’ योग्य, पात्र आणि गरजवंताला दान केले पाहिजे याविषयी महाराज ठाम होते. थोडक्यात, प्रत्येक दान हे सत्कारणी लागून सत्पात्री झाले पाहिजे यावर महाराज ज्या प्रकारे मत मांडत; त्याचप्रमाणे दान देणारांनी सुद्धा यातून आपण खूप मोठे काम करून मोक्षप्राप्ती करून घेतो आहोत हा अहंकार बाळगणे योग्य नाही, हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

## महाराजांचे प्रचंड दातृत्व

सयाजीराव महाराजांनी राजवाड्यापासून ते राज्यकारभारापर्यंत काटकसर केली. त्यांनी अपव्यय होणाऱ्या पैशाची बचत केली. राज्याचे उत्पन्न वाढवले. ही जमा झालेली धनराशी स्वतःची किंवा राज्याची श्रीमंती दाखवण्यासाठी नाही, तर या धनराशीचा उपयोग जनकल्याणासाठी करावयाचा आहे हे त्यांनी ठरवले होते. सुयोग्य कारणांसाठी आणि लायक व्यक्तीला गरज असणाऱ्या ठिकाणी प्रचंड दान दिले.

बडोदा राज्यात पूर्वापार सुरू असलेल्या दानधर्माचा त्यांनी अभ्यास केला. अभ्यासांती त्यांच्या लक्षात आले की, सरसकट दानधर्म देण्यापेक्षा गरजवंतांना दान देणे फायदेशीर आहे. तोच दानधर्म शास्त्रशुद्ध आहे. यामुळे दान गरजू लोकांपर्यंत पोहचून बराचसा अनावश्यक खर्च वाचतो. याची सुरुवात महाराजांनी स्वतःपासून केली. यातून बचत झालेल्या पैशाचा उपयोग लोककल्याणार्थ वापरला. अनेक आधुनिक आणि प्रजेच्या उपयोगाच्या योजना महाराजांना सुरू करता आल्या.

शिक्षणामुळे व्यक्तीची, समाजाची प्रगती होऊ शकते हे महाराजांनी त्यांच्या स्वतःच्या शिक्षणकाळात जाणले होते. प्रजेची प्रगती करायची असेल तर त्यांना शिक्षण देणे महत्त्वाचे आहे हे ओळखून शिक्षण सरकारी खर्चाने सुरू करणारे सयाजीराव महाराज पहिले आहेत. त्यांनी संस्थानात प्राथमिक, माध्यमिक आणि उच्चशिक्षण सुरू केले. शेतीच्या शिक्षणाबरोबर तंत्रशिक्षणही सुरू केले. एवढेच नव्हे, तर शिष्यवृत्ती देऊन अनेकांना देश-परदेशात पाठवले. देशातील अनेक शैक्षणिक संस्थांच्या उभारणीत लाखो रुपयांची देणगी दिली. महाराजांच्या दातृत्वामुळे देशभरात शिक्षण घेतलेली एक नवी पिढी तयार झाली. महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान असणाऱ्या व्यक्ती होत्या. त्यामध्ये विनोबा भावे, दादासाहेब फाळके, राजारामबापू पाटील, कृष्णराव धुळप, दादासाहेब जगताप, रावसाहेब शिंदे, अण्णासाहेब शिंदे, उत्तमराव पाटील, बी.जे. खताळ अशा अनेकांचे शिक्षण बडोद्यात झाले.

शिक्षणासाठी आणि मानवाच्या उत्कर्षासाठी आवश्यक असणारी गोष्ट म्हणजे साहित्य होय. महाराजांनी जगभरातील साहित्याचा अभ्यास केला होता. त्यांनी युरोपातील समृद्ध साहित्य वाचले. अशा प्रकारचे समृद्ध साहित्य देशी भाषेत निर्माण होण्यासाठी महाराजांनी संस्थानात 'भाषांतर शाखा' काढली. साहित्यिकांना मदत केली. महाराजांना दातृत्वामुळे अनेक साहित्यिकांना पाठबळ मिळाले. आर्थिक स्थैर्य लाभले. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारात साहित्य निर्माण झाले. थोडक्यात, महाराजांच्या काळात साहित्यिकांना दिलेल्या राजाश्रयामुळे आणि दातृत्वामुळे बडोद्यातील वातावरण साहित्यमय होऊन गेले होते.

महाराजांनी निर्माण केलेल्या साहित्यविषयक वातावरणामुळे बडोद्यात अनेक साहित्यिकांना आश्रय मिळाला. साहित्यिकांचे मेळावे होऊ लागले. नवनवीन विषयांवर साहित्यनिर्मिती होऊ लागली. निर्माण झालेले साहित्य आणि सुशिक्षित पिढीला वाचण्यासाठी आवश्यक असणारे परदेशातून आणलेले साहित्य ठेवण्यासाठी ग्रंथालयांची गरज निर्माण झाली. याच दरम्यान महाराजांनी अमेरिका दौऱ्यावर असताना तेथील सार्वजनिक आणि मोफत ग्रंथालयांची योजना पाहिली आणि तशीच योजना राज्यभर उभारली. महाराजांनी राज्यभर ग्रंथालयांचे जाळे उभारताना राज्याच्या तिजोरीतून धनराशी उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर प्राच्यविद्येच्या अभ्यासाकरिता संशोधकांना सर्वच प्रकारची मदत केली. प्राच्यविद्या संस्था (ओरिएंटल इन्स्टिट्यूट) स्थापन करून दुर्मिळ, ऐतिहासिक आणि उपयुक्त ठेवा जतन केला आणि सर्वांपर्यंत पोहोचवला.

राज्यकारभाराच्या प्रारंभीच शेती हा राज्याच्या उत्पादनाचा मुख्य भाग आहे हे महाराजांच्या लक्षात आले. शेती ही मुख्यत: पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने त्यामधील उत्पादनात अनियमितता असते हेही त्यांनी जाणले. पूर्वी शेतसारा ठरवण्याच्या पद्धतीत आणि वसुलीत ठराविक असे पारदर्शी धोरण नव्हते. त्यात आमुलाग्र बदल केला. शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात येणाऱ्या शेतसाऱ्यात पूर्ण राज्यभर एकसूत्रीपणा आणला. अनेक वेळा शेतसारा माफ केला. शेतीसुधारणेसाठी, आधुनिक पद्धतीने शेती व्हावी यासाठी शिष्यवृत्ती देऊन विद्यार्थ्यांना

पुढारलेल्या देशात शिक्षणासाठी पाठवले. दुष्काळात शेतकऱ्यांना खूप मदत केली. शेतीबाबत महाराजांनी दाखवलेल्या दातृत्वामुळे बडोदा राज्यातील शेतकरी भाग्यवान ठरला. सयाजीराव महाराजांनी शेतकऱ्यांना मदत करताना तो परावलंबी होण्यापेक्षा स्वावलंबी कसा होईल याकडे लक्ष दिले.

बडोदा राज्यात ज्या-ज्या वेळी संकटे आली, त्यावेळी सयाजीराव महाराजांनी आपल्या दातृत्वाने यावर मात केली. दुष्काळ, साथीचे रोग आणि पूर अशा संकटप्रसंगी खास निधीची तरतूद उभारून प्रजेला मदत केली. या काळात स्वत: राज्यभर फिरून लोकांना दिलासा दिला. अधिकाऱ्यांनीनी संकट काळात प्रजेला मदत करावी यासाठी हुकूम काढले. नैसर्गिक संकटे टाळता येत नसली तरी; त्याचा परिणाम अनेकांवर होऊ नये म्हणून त्यावर उपाययोजना केल्या. यासाठी लागणारा निधी राज्यातून उपलब्ध करून दिलाच, त्याचबरोबर स्वत: खानगीतून लाखो रुपयांचा निधी दिला.

लोककल्याणार्थ कार्य करणाऱ्या संस्थांना महाराजांनी मदत केली. अशा संस्थांच्या माध्यमातून अनेक पिढ्या घडण्याचे कार्य होते हे त्यांनी ओळखले होते. यामध्ये शैक्षणिक, सामाजिक आणि इतर संस्थांना मदत केली. महाराजांनी ज्या संस्थांना मदत केली त्या संस्थांमधून लाखो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले, या संस्थांची अनेकांना मदत झाली. या केलेल्या मदतीमुळे सयाजीराव महाराज हे आधुनिक भारताचे शिल्पकार ठरतात.

'ललित कला राष्ट्राच्या संस्कृतीची चिन्हे आहेत व त्यांच्यापासून राष्ट्राला प्रकाश व चैतन्य प्राप्त होते असे माझे ठाम मत आहे.' सयाजीराव महाराजांच्या या वाक्यावरून संस्थानात ललितकलांना खूप मदत केल्याचे लक्षात येते. महाराजांनी संस्थानात सर्वच कलांना आश्रय देताना या कलांमध्ये आधुनिकता कशी येईल आणि या कला सर्वांपर्यंत कशा पोहोचतील याकडे लक्ष दिले. त्यांनी केलेल्या मदतीमुळे या कलांना राजाश्रय मिळाला. ललित कलांची भरभराट झाली.

संकट काळात महाराज प्रजेच्या सोबत होते, त्याचप्रमाणे स्वतःच्या आनंदातही त्यांनी प्रजेला सामील करून घेतले. वेगवेगळ्या आनंद महोत्सवाच्या प्रसंगी त्यांनी प्रजेला मदत जाहीर केली. या आनंदाच्या प्रसंगी त्यांनी अनेक वेळा थकलेले कर्ज माफ केले. शेतसारा आणि इतर करांत सवलती दिल्या. या प्रसंगाच्या निमित्ताने नवनवीन उद्योगधंदे उभारले. ग्रामीण भागातील लोकजीवन सुधारणेसाठी वेगळा निधी उभारला. यामुळे अनेक भागांत सुधारणा झाल्या. आनंदउत्सवाप्रीत्यर्थ लोककल्याणाच्या सुधारणा जाहीर केल्या. त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून दिला.

सयाजीराव महाराजांनी आपल्या राजसत्तेचा उपयोग लोककल्याणार्थ करण्याचे ठरवले होते. समाजसेवेसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना महाराजांनी सर्व प्रकारची मदत केली. ही मदत अनेक वेळा व्यक्तिगत पातळीवरील असली तरी मदत घेणारी व्यक्ती समाजासाठी कार्य करत असल्याने ती मदत महाराजांनी मुक्तहस्ते केली. यामध्ये त्या काळातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय,

आर्थिक आणि इतर क्षेत्रातील लोकांचा समावेश होता. अशा समाजधुरिणांना मदत केल्यामुळे त्या व्यक्तींनी सुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

जगातील अनेक देशांचा प्रवास सयाजीराव महाराजांनी केला होता. या प्रवासात अनेक गरजवंत लोक महाराजांना भेटत असत. त्यांची निकड पाहून महाराज त्यांना मदत करत. प्रवासात महाराजांनी केलेली मदत ही देशातील लोकांना होतीच, त्याचबरोबर परदेशातील लोकांनाही केली होती.

विद्वान, प्रतिभावान आणि प्रज्ञावंत राजा म्हणून सयाजीराव महाराजांकडे पाहिले जात असे. त्यांचा वाचन व्यासंग, ज्ञानोपासना यामुळे अनेक वेळा त्यांच्याकडे जगभरातून मार्गदर्शनपर मदत मागितली जात असे. महनीय अनुभव आणि प्रवास यांमुळे महाराज सर्वांना मार्गदर्शन करत. यामध्ये नातेवाईक, अधिकारी, संस्थानचे प्रमुख, इंग्रज अधिकारी आणि सामान्य लोक यांचा यात समावेश होत असे. महाराज भाषण करताना प्रजेला सुधारणा करण्यासाठी सुद्धा मार्गदर्शन करत. महाराजांचे मार्गदर्शन करणे हे एक प्रकारचे दातृत्वच आहे.

सयाजीराव महाराजांनी स्वतःपासून ते राज्याच्या प्रशासनात खूप काटकसर केली. राज्याचे उत्पादन वाढावे, राज्याचा तिजोरीतील धनाचा गैरवापर होऊ नये म्हणून त्यांनी काळजी घेतली. अनावश्यक खर्चाला आळा घातला. यासाठी हजारो हुजुरहुकूम काढले. बचत झालेल्या धनाचा वापर लोककल्याणासाठी करण्याचे त्यांनी ठरवले. राज्याचे वाढलेले उत्पादन प्रजेच्या सुधारणा करण्यासाठी वापरले. त्यामधून त्यांनी शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक , शेती, कारखाने, छोटे-मोठे उद्योग यांचा विकास केला. प्रजेच्या जीवनात सर्वांगीण बदल घडावा यासाठी आयुष्यभर कष्ट घेतले. एवढे करत असताना त्यांनी सुधारणांचा विचार फक्त संस्थानापुरता मर्यादित न ठेवता काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि मुंबईपासून कलकत्त्यापर्यंत संपूर्ण हिंदुस्थान डोळ्यासमोर ठेवला आणि लोकांच्या कल्याणासाठी आणि सुधारणांसाठी वेळोवेळी तत्काली ८९ कोटींचे दान केले.

महाराजांचे हे दान देशांच्या सीमा ओलांडून अगदी सातासमुद्रापार गेले. गरजवंतांना मदत करताना त्यांच्या मनात कधीही जात, धर्म, वंश आणि देश अशा प्रकारचे क्षुल्लक भेद आले नाहीत. त्यांनी अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी राज्याच्या तिजोरीचा वापर केला. ज्या काळात इतर संस्थानिक स्वतःच्या खुशालीत आणि मौजमस्तीत मश्गुल होते, त्यावेळी महाराजांनी स्वतःच्या खासगीतून लक्षावधी रकमा दान दिल्या. त्यांच्या या दानामुळे महाराजा सयाजीराव गायकवाड आधुनिक काळातील कर्णच ठरतात.

सयाजीराव महाराजांनी आयुष्यभर खूप मोठे दान लोककल्याणार्थ दिले. हे दान अनेक प्रसंगी आणि विविध माध्यमांतून केल्यामुळे दातृत्वाच्या नोंदी एका ठिकाणी सापडणे कठीण होते. त्या नोंदी विषयवार करून त्यामुळे समाजातील कोणकोणत्या घटकांचा फायदा झाला हे 'दानशूर महाराजा सयाजीराव' या ग्रंथात नोंदवले आहे. या सर्व नोंदी एकत्रित करण्याचा प्रयत्न या ग्रंथात केला आहे. महाराजांचे दातृत्व प्रचंड असल्यामुळे त्यांनी दिलेल्या सर्वच रकमांची नोंद या ग्रंथात आली नाही. या ग्रंथातील नोंदींशिवाय दातृत्वाच्या इतरही वेगळया नोंदी असू शकतील.

'दानशूर महाराजा सयाजीराव' हा ग्रंथ सिद्ध करण्यासाठी महाराजांची विविध चरित्रे, बडोदा राज्याचे ६४ वर्षांचे प्रशासकीय अहवाल, मदत मिळालेल्या व्यक्तींची चरित्रे, वेळोवेळी प्रकाशित झालेले लेख, श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचा खासगी व कौटुंबिक वृत्तांत, राज्यातील सर्व खात्यासंबंधाने हुजुराच्या झालेल्या हुकुमांची नोंद (१९१७-१९३९), विविध संस्थांचे अहवाल, नियतकालिके, सयाजीराव महाराजांनी काढलेले हुजूरहुकूम, महाराजांनी प्रकाशित केलेले नानाविध विषयांवरील ग्रंथ, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीने अलीकडेच प्रकाशित केलेले २५ खंड (एकूण ५० पुस्तके) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेला चरित्रसंग्रह अशा साधनसामग्रीचा उपयोग झाला.

या ग्रंथासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष आणि महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीचे सचिव मा.श्री. बाबा भांड यांनी वेळोवेळी अनमोल मार्गदर्शन केले. त्यांच्या कार्यकाळात हा प्रकल्प मंजूर झाला आणि मा.डॉ. सदानंद मोरे यांच्या कार्यकाळात या प्रकल्पाची छपाई होत आहे. त्याबद्दल दोघांविषयी ऋण व्यक्त करतो. माझे पीएच.डी.चे मार्गदर्शक प्रा.डॉ. शिरीष लांडगे पाटील यांनी केलेल्या सूचना आणि मार्गदर्शनामुळे हे लेखन शक्य झाले. संदर्भसामग्री उपलब्धतेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनस्वी आभार. या ग्रंथाचे संपादक यमाजी मालकर यांनीही वेळोवेळी मदत केली त्याबद्दल त्यांचेही आभार.

- डॉ. राजेंद्र मगर

# अनुक्रमणिका


अध्यक्षांचे मनोगत / ७

संपादकांचे निवेदन / ९

लेखकाचे निवेदन / १३

१) धर्मादाय खात्यातील काटकसर / ३३

२) शिक्षण क्षेत्रातील दातृत्व / ४६

३) साहित्यनिर्मितीतील दातृत्व / ९४

४) ग्रंथालय आणि प्राच्यविद्येला मदत / १४१

५) शेती आणि शेतकऱ्यांना मदत / १६५

६) संकटकाळातील मदत / १७९

७) महाराजांची मदत मिळालेल्या काही व्यक्तींची आणि संस्थांची छायाचित्रे / २४१

८) संस्थांना मदत / २४९

९) ललित कलांना मदत / २८०

१०) आनंदोत्सवाप्रीत्यर्थ केलेले दान / २९३

११) व्यक्तिगत मदत / ३०३

१२) प्रवासातील दातृत्व / ३३२

१३) सयाजीराव महाराजांची मार्गदर्शनपर मदत / ३४४

परिशिष्टे /


१) श्री सयाजीमालेतून प्रकाशित ग्रंथांची यादी / ३६३

२) सयाजीराव महाराजांचा राजाश्रय लाभलेले मराठी लेखक / ३७६

३) गायकवाड ओरियेंटल सिरीजमधून प्रकाशित ग्रंथ / ३७९

४) सयाजीराव महाराजांचे दानधर्माविषयी भाषण / ३९५

५) दातृत्वासंबंधी काही पत्रे / ४०३

६) संदर्भ सूची / ४१८

# प्रकरण १ ले

# धर्मादाय खात्यातील काटकसर

तत्कालीन हिंदुस्थानातील कोणत्याही संस्थानचा धर्मादाय खात्यात मोठ्या प्रमाणात खर्च होत होता. त्यास बडोदा संस्थान अपवाद नव्हते. सयाजीराव महाराजांचा राज्याभिषेक होण्यापूर्वी आणि नंतरही बडोदा संस्थानात मोठ्या प्रमाणात धर्माच्या नावाखाली दान दिले जात होते. ही प्रथा पूर्वापार सुरू होती. यामध्ये गरजवंत आणि पात्र कोण आणि अपात्र कोण याचा विचार केला जात नव्हता. खेडोपाड्यातील आणि दुर्गम भागातील गरजू लोकांना याचा लाभ मिळत नव्हता; परंतु गरज नसणारे याचा लाभ घेत होते. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा भार पडत असे.

## खंडेराव महाराजांचे दान

सयाजीराव महाराजांच्या पूर्वीचे महाराज खंडेराव हे धार्मिक वृत्तीचे असल्याने याबाबत त्यांचा हात अधिकच ढिला होता. खंडेराव महाराज यांना पुत्र न झाल्यामुळे तो होण्याच्या इच्छेने ते मुसलमान फकिरांच्या नादी लागले होते. ते धर्मांतर करून मुसलमान होतात की काय, अशी लोकांना भीती वाटत होती. त्याचे एक उदाहरण दाजी नागेश आपटे यांनी सयाजीराव महाराजांच्या चरित्रात दिले आहे. ‘मुसलमान फकीर लोकांसाठी त्यांनी मोतीबागेजवळ एक भोजनशाळा बांधली व शहराच्या प्रत्येक दरवाजाला कुराणातील पवित्र वाक्ये फारसी अक्षरांनी कोरलेले चिरे बसविले. मुसलमानी धर्माची श्रद्धा त्यांच्या अंत:करणात दृढ करण्याचे काम हबीबुल्ला मुनशी या नावाचा एक इसम करीत असे. या इसमासच फक्त श्रीमंतांच्या एकांतात जाण्याची परवानगी होती. आपणास खुदाचा साक्षात्कार आहे असे तो महाराजांस भासवी.’ *(आपटे, खंड-१,१९३६, पृ. ४५).* थोडक्यात, खंडेराव महाराजांच्या धार्मिक वृत्तीचा फायदा संस्थानातील लोक घेत. त्यांना या बाबींवर अधिक खर्च करण्यास भाग पाडले जात असे.

याचेच आणखी एक उदाहरण आपटे देतात, ‘या गोष्टीचा फायदा त्यावेळचे दिवाण भाऊ शिंदे चांगल्या रीतीने करून घेत असत. त्यावेळची अशी एक आख्यायिका आहे की, ‘भाऊ शिंदे यांनी महाराजांचे बिछान्यात एक मोहोरांनी भरलेली पिशवी ठेविली व खुदाने रात्री आपणास स्वप्नात येऊन स्वत: सदर पिशवी ठेवल्याचे सांगितले असे म्हणून दुसऱ्या दिवशी मुनशीकडून ती पिशवी त्यांच्या बिछान्यातून काढविली व अशा रीतीने त्यांच्या धर्मभावनेचा फायदा घेतला.



एच-४८
३

या धर्मभावनेमुळे हिंदू मंदिरांच्या उत्पन्नाच्या रकमांतूनही मुसलमान साई फकीर वगैरेंना धर्म केला जाई, अशी हकीकत घडत असे.' *(आपटे, खंड-१,१९३६, पृ. ४५)*. खंडेराव महाराजांच्या भावनिक स्वभावाचा फायदा धार्मिक आणि मतलबी लोक घेत. त्यावर त्या काळात टीकाही होत असे. त्यावेळी 'मुंबई गॅझेट' वर्तमानपत्राच्या तारीख ०५/०३/१८६८ च्या अंकात यावर टीका आली. 'The Gaekwar is also in the habit of expending in charity on Mohamedan faquirs and beggars, swarms of whom infest the city of Baroda, about twenty-five lacs of rupees annually, the funds for which are provided as well from the revenues of the State, as also from grants and allowances to Hindu temples and charitable institutions of ancient date, which grants and allowances are stopped or withdrawn for that purpose.' त्याचा मराठी अर्थ- 'गायकवाड सरकार मुसलमान फकीर व भिकारी यांना दरवर्षी पंचवीस लक्ष रुपयांचा दानधर्म करतात व ही रक्कम सरकारी तिजोरीतून व फार पुरातन काळापासून चालत असलेल्या हिंदू मंदिरांच्या व इतर धार्मिक संस्थांच्या वार्षिक उत्पन्नातून खर्च केली जाते. त्यासाठी हिंदू मंदिरांची व संस्थांची उत्पन्ने अजिबात बंद करण्यात अथवा परत खेचून घेण्यात आली आहेत.' *(आपटे, खंड-१, १९३६, पृ. ४५)*. खंडेराव महाराजांवर अशा प्रकारची टीका झाली तरी त्यांना या बाबींची फिकीर नव्हती. त्यांचा धार्मिक ओढा कमी होत नव्हता. पुढे तर यावर त्यांनी कळस चढविला.

खंडेराव महाराज यांनी मक्केस महंमदाच्या कबरीवर घालण्यासाठी हिरे, मोती, माणके वगैरे जडविलेली सुमारे सहा लक्ष रुपये किमतीची एक बहुमोल चादर तयार केली. या त्यांच्या धार्मिक दानाचा त्या काळात सुद्धा गाजावाजा झाला. त्याचे पडसाद वृत्तपत्रांत पडले. त्याचा एक पुरावा आपटे यांनी दिला आहे. 'तारीख ०४/०३/१८६८ च्या 'मुंबई गॅझेट' वर्तमानपत्रात पुढीलप्रमाणे मजकूर आला. 'The wonderful chudder of the Gaekwar of Baroda is not according to the Times of India destined for the tomb of the Great Mohomed, the great shrine at Mecca, but is intended to deck the mausoleum of two inferior prophets of a sect of Mohomedans; the donor being a Hindu!' *(आपटे, खंड-१,१९३६, पृ. ४६)*. अशा उधळपट्टीवर जनमानसात अतिशय राग होता; परंतु त्याबद्दल कोणालाही काही बोलता येत नव्हते. पुढे ही योजना अनेक कारणांमुळे मागे पडली; परंतु त्यांनी आपला विविध धर्मासाठी करण्यात येणारा दानधर्म कमी केला नाही.

## महाराणी जमनाबाई यांचा दानधर्म

खंडेराव महाराजांच्या मृत्यूनंतर मल्हारराव महाराज गादीवर आले. त्यांनीही पूर्वापार चालू असलेल्या परंपरा पुढे सुरू ठेवल्या. त्यांच्या पदच्युतीनंतर सयाजीराव महाराजांची राजवट सुरू झाली; परंतु महाराज लहान असल्याने आणि त्यांना राज्यकारभाराचे शिक्षण द्यायचे असल्याने राज्याचा कारभार महाराणी जमनाबाई आणि दिवाण टी. माधवराव पाहत होते. या काळात

सुद्धा या धर्माच्या नावाखाली खूप मोठा खर्च राज्याच्या तिजोरीतून होत होता. याबाबतच्या नोंदी प्रशासकीय अहवालात आहेत. 'इ.स. १८७७-७८ साली धर्मादायासाठी ४,७४,२५८ रुपये आणि मंदिरांसाठी ५३,१९५ रुपये दान दिले. पुढील वर्षांची आकडेवारीही अशाच प्रकारची खूप धक्कादायक आहे. इ.स. १८७८-७९ साली धर्मादायसाठी ४,६५,६६७ रुपये आणि मंदिरांसाठी ६६,८४७ रुपये दान दिले होते. इ.स. १८७९-८० साली धर्मदायसाठी ३,६८,२३० रुपये आणि मंदिरांसाठी ६६,१११ रुपये दिले गेले.' *(B.A.R.,1877-78 and 1879-80)*. थोडक्यात, खंडेराव महाराजांच्या नंतरही हा दानधर्म महाराणी जमनाबाई यांनी सुरू ठेवला. फक्त खंडेराव महाराज मुस्लिम धर्मावर करत असलेला दानधर्म जमनाबाई यांनी हिंदू धर्मातील लोकांवर आणि मंदिरांवर केला.

सयाजीराव महाराजांचा राज्याभिषेक झाल्यावर गव्हर्नर लॉर्ड नॉर्थब्रुक यांची बदली होऊन लॉर्ड लिटन यांची नेमणूक करण्यात आली. या दरबारासाठी महाराज आपल्या मातुःश्री व भगिनीसह १४ डिसेंबर १८७६ रोजी दिल्लीस पोहोचले. हा दिल्ली समारंभ आटोपून परत येताना महाराजांनी महाराणी जमनाबाई यांच्यासह अनेक धार्मिक स्थळांना भेटी दिल्या. या भेटीत महाराणी जमनाबाई यांनी अनेक धार्मिक स्थळी खूप दान दिले.

सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यावरसुद्धा खानगी खाते महाराणी जमनाबाई यांच्याकडे होते. त्यावेळी महाराजांच्या मनात असूनसुद्धा हा खर्च त्यांना कमी करता आला नाही. महाराणी जमनाबाई मुळातच धार्मिक प्रवृत्तीच्या असल्याने त्यांचा दानधर्माकडे अधिकच ओढा असे. त्यांच्या काळात जो दानधर्म करण्यात येत असे त्याची माहिती पुढील कोष्टकावरून लक्षात येईल.

| साल | दानधर्मावरील खर्च |
|---|---|
| इ.स. १८८०-८१ | २,९०,१०९ |
| इ.स. १८८१-८२ | ३,१०,०२९ |
| इ.स. १८८२-८३ | ३,३०,३४८ |
| इ.स. १८८३-८४ | ३,१३,२३४ |
| इ.स. १८८४-८५ | ३,२८,३४२ |
| इ.स. १८८५-८६ | २,९९,३८४ |
| इ.स. १८८६-८७ | ३,२२,१८३ |
| इ.स. १८८७-८८ | ४,२३,१७२ |
| इ.स. १८८८-८९ | ४,५०,५८६ |
| इ.स. १८८९-९० | ४,७५,०४० |
| इ.स. १८९०-९१ | ३,६८,९३३ |
| इ.स. १८९१-९२ | ३,८९,९७४ |
| इ.स. १८९२-९३ | ३,५४,६६८ |
| इ.स. १८९३-९४ | ३,४८,५४८ |

| | |
|---|---|
| इ.स. १८९४-९५ | २,९६,९५६ |
| इ.स. १८९५-९६ | ३,०१,४९४ |
| इ.स. १८९६-९७ | २,७२,७३२ |
| इ.स. १८९७-९८ | २,६०,४४५ |
| इ.स. १८९८-९९ | २,४४,४०३ |

*(B.A.R., 1880-81 to 1897-98)*

या आकडेवारीवरून महाराणी जमनाबाई बडोद्यात किती मोठ्या प्रमाणात दानधर्म करत होत्या हे लक्षात येते. महाराणी जमनाबाई यांचा मृत्यू २९ नोव्हेंवर १८९८ साली झाला. त्यानंतर महाराजांनी या खात्यातील खर्च टप्प्याटप्प्याने कमी केला.

## सयाजीराव महाराजांची धर्मादाय खर्चात कपात

सयाजीराव महाराजांनी खानगी खाते त्यांच्या ताब्यात येताच यातील अनेक खर्चांवर नियंत्रण मिळवले. त्यामध्ये सर्वाधिक खर्च दानधर्मावर होत होता. तो कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या. त्यासाठी कायदा केला. याबाबत आपटे म्हणतात, 'सन १९१० च्या सुमारास खिचडीची रक्कम मिळणाऱ्या लोकांची संख्या ९७१ असून, त्यांना देण्यात येणारी एकंदर रक्कम २३ हजार रुपये असल्याचे सरकारी दाखल्यांवरून दिसून येते. त्यानंतरच्या अलीकडील काळात ही खिचडी घेणारे बहुतेक लोक कालवश झाले आहेत व त्यामुळे या सदरी होणारा खर्च बहुतेक कमी झाला आहे. या बाबतीत महाराजांनी सावधगिरीने व योग्यायोग्य विचाराने पाऊल टाकले. त्यामुळे लोकांनाही त्यांच्या कृतीचे रहस्य पटले व तिजविरुद्ध फारसा असंतोष उत्पन्न झाला नाही. अशा रीतीने अनेक प्रकारे खर्चात काटकसर करण्यात आली. त्यासंबंधी केलेल्या हुकुमात महाराजांनी वेळोवेळी म्हटले आहे की, अनियमित धोरणावर वाढलेले खर्च किंवा जे खर्च चालू ठेवण्याचे विशेष प्रयोजन नाही, असे खर्च कमी करण्याविषयी हुकूम झाल्यावर, ते पुन्हा वाढविण्यात येणार नाहीत इकडे लक्ष देत असावे. उदाहरणार्थ ग्यारमी, खिचडी वगैरेकडे होणारा फाजील खर्च कमी करण्याबद्दल तजवीज करण्यात आली. तसा खर्च पुन्हा न वाढू देण्याबद्दल खबरदारी घेण्यात यावी.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ.६१८)*. या खात्याकडे जास्त लक्ष पुरवून त्यांनी बचत केली.

महाराजांनी यात कशा प्रकारे बचत केली हे पुढील खर्चाच्या आकडेवारीवरून लक्षात येईल.

| साल | दानधर्मावरील खर्च |
|---|---|
| इ.स. १८९९-१९०० | २,१५,०२५ |
| इ.स. १९०२-०३ | १,३६,०२३ |
| इ.स. १९०३-०४ | १,०९,२७३ |
| इ.स. १९०४-०५ | ६६,६१८ |
| इ.स. १९०५-०६ | ५५,८४१ |
| इ.स. १९०६-०७ | ३७,८१४ |

*(B.A.R., 1899-1900 to 1905 -06)*

महाराणी जमनाबाई यांच्याकडून खासगी खात्याचा कारभार हाती आल्यावर महाराजांनी अनेक नवे हुकूम काढत या खात्यातील अनावश्यक खर्चाला चाप लावला. या खात्यातून जे पैसे शिल्लक राहिले त्याचा उपयोग त्यांनी इतर कामांसाठी केला.

## अपंग आणि गरीब लोकांना धर्मादाय

'गायकवाड परकीय प्रांतांत राज्य करत असल्यामुळे तेथील सर्व संपत्ती स्वतःसाठी वापरणे योग्य नाही. हिंदू धर्माप्रमाणे ब्राह्मणास अन्न दिले असता पुण्य लाभते.' असा समज बडोद्यात होता. तसेच गायकवाडांच्या पूर्वापार धार्मिक वृत्तीमुळे ब्राह्मणांस दररोज राजवाड्यात भोजन देण्यात येत असे. पुढे लोकांची खूप गर्दी होऊ लागल्यामुळे ही पद्धत बंद केली. त्याबदल्यात कोरडी खिचडी (२ भाग तांदूळ, १ भाग डाळ याप्रमाणे) श्री. केदारेश्वर मंदिराजवळ वाटण्यास सुरुवात झाली. हे वाटप इ.स.१८०८ पासून सुरू झाले होते. पुढे याचे स्तोम खूपच वाढले. याअगोदर पाहिल्याप्रमाणे खंडेराव महाराजांची मुस्लिम धर्मावर श्रद्धा होती. यामुळे त्यांच्यासाठी इ.स. १८५८ साली ग्यारमीचा कारखाना काढला. यावर लाखो रुपये खर्च होऊ लागले.

बडोद्यातील धार्मिक दानधर्म महाराणी जमनाबाई यांच्या अधिकाराखाली चालत असे. हिंदू आणि मुसलमान लोकांना अनुक्रमे खिचडी आणि ग्यारमी दररोज वाटली जात असे. हिंदूंना दिलेल्या खिचडीत तांदूळ आणि डाळ असे, तर मुसलमान लोकांना हेच धान्य शिजवून दिले जात असे. यामध्ये कधीही खंड पडू दिला जात नसे. अनेक वर्षांपासून हा दानधर्म सुरू होता. दररोज फुकट मिळत असे, त्यामुळे धडधाकट लोकही याचा लाभ घेत असत. ते दान घेऊन बाहेर पडले की विकत. अनेक मंडळींनी या दानाची खरेदी करण्यासाठी दुकाने उघडली होती. गरज नसणारे लोक इथून दान घेत आणि बाहेर लगेच विकून टाकत. त्यातून पैसे कमवत. हेच दुकानदार पुन्हा राजवाड्यात या धान्याची विक्री करत. अनेक वेळा या दानधर्माचा फायदा सरकारी नोकरही घेत. या दानामुळे राजाला आणि राजमातेला याचकांचे आशीर्वाद लाभतात असा समज बडोद्यात होता. महिन्याला लाखो रुपयांची खिचडी आणि ग्यारमी या रूपाने वाटली जात असे. हा खर्च राज्याच्या सुधारणा करताना खूपच अडचणींचा ठरत होता. राज्याच्या एकूण खर्चाच्या प्रमाणात हा आकडा खूपच मोठा होता.

या मोठ्या खर्चामुळे महाराजांचे आपोआपच लक्ष याकडे गेले. त्यांनी या खर्चाचा अहवाल हायकोर्टाचे न्यायाधीश य.वा. आठल्ये यांना सादर करण्याचे आदेश दिले. हा अहवाल धक्कादायक होता. त्यामुळे महाराजांनी या खर्चावर बंधणे आणण्याचे ठरवले. मातुःश्री जमनाबाईसाहेब यांना समजावून सांगितले. 'आपण हा दानधर्म चालूच ठेवू; परंतु अपंग, निराधार, वृद्ध आणि अंध यांनाच देऊ. धडधाकट आणि ऐतखाऊ यांचे बंद करू.' वर्षानुवर्षे सुरू असलेली परंपरा बंद करण्याची परवानगी मनात नसतानाही महाराणींनी दिली. यासाठी महाराजांनी हुकूम काढला. 'खिचडी आणि ग्यारमी पुढे वर्णीलेल्या लोकांना दिली जाईल. १) पंगू इसम, २) ज्या रोग्यांच्या पोषणाची सोय सरकारने इतरत्र केली नाही ते, जसे रक्तपितीचे रोगी,

३) निराश्रित स्त्रिया, ४) निराश्रित मुले, ५) अंध व्यक्ती ६) संकटग्रस्त लोक जसे आगीत, चोरीत किंवा साथीत सर्व द्रव्य नष्ट झालेले.' महाराजांचा हा हुकूम 'आज्ञापत्रिकेत' प्रसिद्ध होताच बडोद्यात खळबळ माजली. अनेक लोकांनी इंग्रज अधिकाऱ्याकडे तक्रारी केल्या. लेखी अर्ज दिले. काहींनी महाराणी जमनाबाई साहेब यांच्याकडे 'हा राजा धर्म बुडवायला निघाला.' अशा शब्दांत कान भरवले; परंतु महाराज आपल्या निर्णयावर ठाम राहिले. काही काळ यावरून गोंधळ माजला; तरी महाराजांच्या ठाम भूमिकेमुळे हा खर्च लाखो रुपयांवरून इ.स. १९०६-०७ साली सदतीस हजारांवर आणला. पुन्हा कमी करत इ.स. १९०९-१० साली तेवीस हजारांवर आणला. यामुळे राज्याच्या पैशाची खूप मोठी बचत झाली.

## श्रावणमास दक्षिणा बंद

वरील धर्मादाय व्यतिरिक्त श्रावण महिन्यात ब्राह्मणांना पुन्हा वेगळी दक्षिणा वाटली जात असे. मोठ्या प्रमाणात फुकट दक्षिणा मिळत असल्यामुळे हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यातून अनेक ब्राह्मण मंडळी बडोद्यात येत असत. आलेल्या प्रत्येकाला काहीतरी दान दिलेच पाहिजे अशी पूर्वापार परंपरा होती. त्याबाबत आपटे वस्तुनिष्ठ माहिती देतात, 'श्रावणमासात प्रतिवर्ष निरनिराळ्या विषयांत उमेदवारांची परीक्षा घेण्यात यावी व त्यात प्रशस्तीपत्रे मिळविणारांनाच दक्षिणा देण्यात यावी, असा नियम करण्यात आला. अशा रीतीने एक वेळ परीक्षेत पास झालेल्या पंडितांना मिळणारी दक्षिणा पुढे पाच वर्षेपर्यंत पुन्हा परीक्षा न देता मिळत राहण्याची व्यवस्था तेव्हा करण्यात आली; पण त्यानंतर ही पाच वर्षांची मुदत कमी करून तीन वर्षांवर आणण्यात आली व अलीकडे तीही कमी करून दरवर्षीच्या परीक्षेत पास होणाऱ्यांना त्या वर्षापुरतीच दक्षिणा देण्यात येते. यामुळे आपले अध्ययन ताजे ठेवण्याची जबाबदारी या पंडितांवर टाकली जाते, अशी व्यवस्था करण्यात आली. त्याबरोबरच या दक्षिणेची श्री. मल्हाररावांच्या वेळी खर्च होणारी रक्कम कमी करून ती आठ हजारांवर आणण्यात आली व अलीकडे (इ.स.१९३६) ती पाच हजारांवर आणली गेली आहे.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ.६१५)*. परीक्षा आणि या विषयातले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठीची अट यामुळे आपोआपच दक्षिणा मागायला येणाऱ्या लोकांची संख्या कमी झाली. यातूनही मोठी बचत झाली. ही बचत धर्माची शास्त्रशुद्ध पुस्तके लिहावीत यासाठी महाराजांनी वर्ग केली.

त्याचप्रमाणे राजाने नियमित दान केलेली गायी-वासरे घेण्यासाठी, अनुष्ठान करणारे आणि राजाची दृष्ट काढणारे यांची मोठी रांग लागत असे. राजघराण्यातील पुरुषांच्या ओवाळण्या, स्वर्गातील वडीलधाऱ्या लोकांना स्वास्थ्य लाभावे म्हणून मुंग्यांना साखरेची पोती रिचवणे, अशा धर्मार्थ आणि दानासाठी लाखो रुपयांचा खर्च होत असे. याकडेही महाराजांचे लक्ष गेले. अशा भोळसट आणि शास्त्रीय आधार नसणाऱ्या परंपरा कायद्याने बंद केल्या.

## अनुष्ठानात नियमितता

राजवाड्यात अनुष्ठानाचे (धार्मिक कार्ये) स्तोम अतिशय माजले होते. त्यावर खूप खर्च होत होता. याबाबतची हकिगत रियासतकार सरदेसाई यांनी लिहून ठेवली आहे. 'गोप्रदान, वरण्या, ब्राह्मण भोजने, दक्षिणा, ग्रहांच्या शांती, प्रायश्चित्ते, खाशा स्त्रियांच्या यात्रा, पूजा, व्रते, खिचडी, ग्यारमी, देवस्थाने वगैरेंच्या संबंधाने मोठमोठे अव्यवस्थित खर्च हरहंमेशा चालू असत. अनुष्ठानाच्या संबंधाने आरंभी मोठा घोटाळाच माजलेला होता. बेचराजीची अनुष्ठाने पैदा करण्यात कोण खटपटी चालत त्याची आज कल्पनाही होणार नाही. शिवाय काही गोष्टी साध्य करावयाची असली की, ब्राह्मणद्वारा अनुष्ठाने करण्याचा प्रघात होता. विनायकराव बहुलकर नावाचे गृहस्थ मि. पेस्तनजी यांचे हुकुमाने पुण्यास अनुष्ठान करीत असत. येथे पूर्वी मथुर जोशी म्हणून ज्योतिषी होते, त्यांस दिवाण मणीभाईंनी अनुष्ठानाकरिता खानगीतून मंजुऱ्या दिल्या आहेत. श्रावणमास दक्षिणा, गोप्रदाने, वरण्या बेचराजीची व दुसरी अनुष्ठाने, खिचडीचा कारखाना, ग्यारमी व भाकरीच्या संस्था, खाशांची दृष्ट काढणे, मुंग्यांस साखर घालणे इत्यादी नानाप्रकारचे खर्च पूर्वापार अव्यवस्थित प्रकाराने चालू होते. त्या सर्वांची यथावकाश योग्य झडती घेऊन कालक्रमानुसार पूर्वीच्या दानधर्मातील खर्चाचे अनिष्ट स्वरूप काढून त्याऐवजी प्रस्तुत काळास शोभतील असे नवीन फेरफार हुजुरांनी केले.' *(सरदेसाई, १९२५, पृ.१३४)*. असे अनेक धार्मिक खर्च परवानगीसाठी महाराजांकडे येत असत. प्रथम-प्रथम याबाबतीत महाराजांना काही न बोलता या अनावश्यक खर्चाला परवानगी द्यावी लागत असे.

पुढे महाराजांनी यावर सर्व बाबतीत धर्मकार्य करणाऱ्या लोकांना शास्त्रीय आधार विचारला; परंतु या क्षेत्रातील अधिकार प्राप्त कोणासही ठोस पुराव्यानिशी उत्तर सांगता येत नव्हते. धर्मकार्य करताना म्हटले जाणारे मंत्र याचा अर्थही त्यांना माहीत नव्हता. बऱ्याच वेळा कोणते कार्य कशासाठी करत आहोत याची माहिती विचारली असता, त्यासही कोणाला उत्तर देता येत नव्हते. महाराजांनी या सर्व अव्यवस्थेचा अभ्यास केला. त्यांना यातील पोकळपणा आणि फोलपणा लक्षात आला आणि लागलीच हे सर्व प्रकार त्यांनी बंद केले. त्यामुळे खासगीतून होणाऱ्या खर्चात मोठ्या प्रमाणात बचत झाली.

## वेदोक्त प्रकरणातील बचत

बडोद्याच्या राजवाड्यात पुराणोक्त पद्धतीने सर्व धार्मिक विधी चालत असत. ते विधी याअगोदर म्हटल्याप्रमाणे कोणत्या कारणासाठी केले जात आणि त्याचा अर्थ काय हे पूजा करणाऱ्याला समजत नसत. त्यामुळे राजवाड्यातील विधी हे वेदोक्त पद्धतीने झाले पाहिजेत असे महाराजांना वाटू लागले. यास शास्त्रीय आधारही होता.

परंतु धार्मिक विधी राजवाड्यात वेदोक्त पद्धतीने करावयाचे म्हटल्यावर बडोद्यात विशेषत: ब्राह्मण लोकांत खळबळ माजली. त्यामधील अनेकांनी अशा प्रकारचे विधी करण्यास प्रथम होकार दिला; परंतु सयाजीराव महाराजांनी प्रत्यक्षात जेव्हा वेदोक्त पद्धतीने विधी करण्यास

सांगितले त्यावेळी अनेक सबबी सांगत त्यास नकार दिला. त्यामधील राजवाड्याच्या देवघराचे प्रमुख राजारामशास्त्री टोपले यांनी राजीनामा दिला. त्यामुळे बडोद्यात सुधारक आणि प्रतिगामी असे दोन गट पडले. प्रतिगामी व्यक्तींनी बडोद्यात या विरोधात सभा घेतल्या. कोणत्याही प्रकारे वेदोक्त पद्धतीने धार्मिक विधी होऊ द्यायचे नाहीत यावर ते ठाम राहिले. बाहेरील ब्राह्मण लोकही बडोद्यात येऊ द्यायचे नाहीत अशा प्रकारची खटपट बडोद्यात सुरू केली; परंतु महाराज कोणताही निर्णय विचारपूर्वक घेत. त्यांना या प्रकरणात माघार घेणे शक्य नव्हते.

दरम्यानच्या काळात महाराजांनी खासगी कारभारी म्हणून अप्पासाहेब मोहिते यांची नेमणूक केली. महाराजांना या कामी सल्ला देण्यासाठी मोहिते यांच्याबरोबर नारायणराव घाडगे, आनंदराव पवार, तात्यासाहेब घाडगे, गोविंदराव दळवी, रामचंद्र धामणसकर, वणीकर इत्यादी महत्त्वाच्या व्यक्ती होत्या. काही दिवसांनंतर राजारामशास्त्री टोपले पुन्हा कामावर रुजू झाले. महाराजांनी हा वेदोक्ताचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना सांगितले. त्यांनी अनेक शास्त्री आणि पंडित यांच्याबरोबर चर्चा करून जो उपाय महाराजांना सांगितला तो सरदेसाई यांनी उद्धृत केला आहे. 'वेदोक्तकर्म करण्यास हरकत नाही; परंतु आज पुष्कळ वर्षांचा प्रचार मोडून नवीन उपक्रम करावयाचा आहे; त्यास वाई, नाशिक, काशी वगैरे ठिकाणांहून मोठमोठे विद्वान शास्त्री, पंडित वगैरे मंडळी एकत्र करून त्यांच्या संमतीने हे काम करावे. अशी मंडळी जमा करून योग्य दक्षिणा वगैरे देऊन त्यांचा संतोष केल्याशिवाय ही गोष्ट सिद्धीस जाणार नाही. असे करण्यास निदान लाख दोन लाख तरी खर्च होईल; आणि असा खर्च करून महाराजांनी आपला लौकिक वाढविला म्हणजे वेदोक्त यशस्वी होईल.' *(सरदेसाई, १९२५, पृ.१४०)*. राजारामशास्त्री यांनी सांगितलेला उपाय म्हणजे थोडक्यात, लाच देऊन त्यांना वश करण्यासारखे होते. महाराजांना हा उपाय कधीच पटला नाही. त्यांनी हे दोन लाख रुपये दिले नाहीत. यातून राज्याची बचत केली. महाराजांना माहीत होते की, सर्वच सुधारणा ह्या पैशांतून होत नसतात.

पुढे महाराजांनी मसुरी स्वारीत असताना इ.स. १८९६ मध्ये राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने व्हावेत यासाठी हुकूम काढला. या हुकुमाची अंमलबजावणी खानगी कारभारी अप्पासाहेब मोहिते यांनी सुरू केली. या हुकुमाची अंमलबजावणी सुरू केल्यावर राजवाड्यातील अनेक पुरोहितांनी राजीमाने दिले. महाराजांनी त्यावर उपाय करत नवीन पुरोहित नेमले. यामुळे राज्याची बरीचशी बचत झाली. याबाबत त्यांनी इ.स. १८९६-९७ मध्ये हुकूम काढला. तो पुढीलप्रमाणे, 'देवघरात असलेली आश्रित मंडळी सरकारच्या हेतूप्रमाणे पूजा वगैरे करण्यास अनुकूल नसल्याने ती कमी करून नवीन मंडळी ठेवण्यात यावी. या हुकुमाप्रमाणे जी मंडळी नवीन ठेवण्यात आली व जी प्रतिकूल झाली त्यांची पगारासह नावे - प्रतिकूळ मंडळी कमी केली ती- नारायणशास्त्री -३०, केशवभट उपासनी - ३०, राजारामबुवा - २५, बालंभट हतगळकर - २०, गणेश मोरो जोशी - १६-१०-८, बाळाराम द्रविड -१५, बाळंभट - ८, नारायण गोपाळ - ६-४-० आणि नवीन मंडळी ठेविली ती - शिवदत्त - ४०, रेवाशंकर -२५, जयशंकर

नारोशंकर - २५, रामचंद्र बुवा -२५, जयशंकर जोशी - १६, मोतीलाल छोटालाल जोशी - १५.' *(सरदेसाई, १९२५, पृ.१४७)*. महाराजांनी अशा प्रकारे निर्माण झालेल्या संकटाला धीरोदात्तपणे तोंड दिले. कमी खर्च करून राज्याची बचत केली.

## धर्मदानासंबंधी हुजूर हुकूम (नियम)

सयाजीराव महाराजांनी प्रत्येक बाबतीत नियमितता आणि पारदर्शकता येण्यासाठी नियम केले. धर्मादाय दानासंबंधीही नियम केले. या हुजूरहुकुमास 'गोप्रदानाचे नियम' असे म्हटले आहे. दानधर्म करताना महाराज नेहमीच त्यात अपहार किंवा अनियमितपणा येऊ देत नसत. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे हा नियम होय. यामुळे हा नियम मुळातून पाहणे योग्य ठरेल.

१) उद्देश

हल्ली राजवाड्यात दानधर्म वगैरे करण्यात येतो त्यापैकी कित्येक बाबतीबद्दल निष्क्रिय देण्यात येतो. अपंग, निराश्रित वगैरे लोकांना या निष्क्रियाचा लाभ निःपक्षपातीपणे मिळावा, या हेतूने हे नियम करण्यात येत आहेत.

२) संज्ञा

या नियमास 'गोप्रदानाचे नियम' अशी संज्ञा देण्यात येत आहे.

३) मंजुरी

हे नियम श्रीमंत सरकार महाराजसाहेब यांनी तारीख १ माहे डिसेंबर सन १९०३ च्या हुकुमाने मंजूर केले आहेत.

४) अंमल होण्याची तारीख

या नियमांचा अंमल तारीख १ माहे एप्रिल सन १९०४ यापासून होण्याचा आहे.

५) कमिटी नेमणे

गोप्रदानाच्या रकमेची व्यवस्था करण्याकरिता खानगी कारभारी यांनी एक कमेटी मुक्रर करावी व तीत खाली दर्शवल्याप्रमाणे सभासद असावेत-

१) देवस्थान धर्मादाय कामदार.

२) सरकारी आश्रित मंडळींपैकी किंवा इतर संभावित गृहस्थांपैकी दोन

६) गोप्रदानाच्या रकमेतून मदत घेणारास पास देणे

गोप्रदान देण्याच्या आदल्या दिवशी नेमलेल्या कमिटीने, गोप्रदानाच्या रकमेतून मदत घेण्यास लायक असलेल्या इसमांपैकी तीन इसम निवडून त्यांना आपल्या सहीचे नि.(ब)चे पास द्यावेत व त्यांनी गोप्रदान घेण्यास केव्हा व कोठे हजर राहावयाचे याबद्दल त्यांना समज द्यावी. पासावर निदान दोन सभासदांच्या सह्या असाव्यात व त्यापैकी एक देवस्थान धर्मादायच्या कामदाराची असावी.

७) गोप्रदानाची रक्कम वाटण्याचे ठिकाण

श्रीमंत सरकार महाराजसाहेब यांचा मुक्काम बडोदे किंवा मकरपुरा येथे ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी गोप्रदानांची रक्कम वाटण्यात यावी; विशेष कारणामुळे सदरहू ठिकाणी वाटणी करण्यास अडचण आल्यास देवघरात किंवा खानगी कारभारी ठरवतील त्या ठिकाणी वाटण्यात यावी.

८) गोप्रदानाच्या रकमेतून मदत घेण्याबद्दल पात्रता

खाली दर्शविलेल्या स्थितीचे व प्रकारचे लोक गोप्रदानाच्या रकमेतून मदत मिळवण्यास पात्र आहेत.

१) ज्यांना कोणतेही निर्वाहाचे साधन नाही ते.

२) जे शरीराने अशक्त व अपंग किंवा निराश्रित आहेत ते.

९) दररोजच्या गोप्रदानाची रक्कम

श्रीमंत सरकार महाराजसाहेब यांच्या हस्ते दररोज गोप्रदानाबद्दल सोळा रुपयांच्या रकमेचे उदक सोडले जाईल व तीतून रक्कम रुपये १५, वर दर्शविलेल्या लोकांस वाटण्यास पात्र होईल. सदरहू रक्कम दररोज शागिर्द किंवा भट यांनी कमेटीत वाटण्यास्तव रुजू करावी.

१०) एक इसमास कमीत कमी व जास्तीत जास्त देण्याची रक्कम

गोप्रदानांच्या रकमेची वाटणी गोप्रदान घेणारांच्या संख्येच्या मानाने कमी जास्त करण्यात येईल; परंतु केव्हाही एका इसमास पाच रुपयांपेक्षा कमी रक्कम देण्यात येऊ नये. मदत घेणारांची स्थिती वगैरे लक्षात घेता पाच रुपयांहून जास्त रकमेची मदत देणे रास्त आहे असे कमिटीस वाटल्यास प्रत्येकी दहा रुपयांपर्यंत देण्याचा अधिकार कमिटीस आहे, मात्र त्याबद्दल योग्य कारणे शेऱ्यात कोष्टकात लिहून ठेवावीत.

११) एका इसमास दहा रुपयांपेक्षा जास्त मदत देण्याबद्दल हुजुरांत शिफारस

एखाद्या इसमाची स्थिती फार वाईट असल्यामुळे किंवा इतर काही कारणांमुळे त्याला दहा रुपयांहून जास्त मदत मिळावी असा अभिप्राय झाल्यास त्याबद्दल हुजुरांस शिफारस करावी व हुजूर फर्मावतील ती रक्कम दररोजच्या किंवा साचलेल्या रकमेतून त्यास देण्यात यावी. दहा रुपयांपेक्षा जास्त रक्कम हुजुराच्या खास आज्ञेवाचून कमिटीने केव्हाही एका इसमास द्यावयाची नाही.

१२) रक्कम वाटण्याच्या वेळी सभासदांची समक्षता

कमिटीकडून पास मिळालेले इसम मुक्रर केलेल्या ठिकाणी व वेळी मदतीची रक्कम घेण्यास हजर होतील त्यावेळेस तेथे कमिटीच्या सभासदांनी हजर राहिले पाहिजे. काही अनिवार्य कारणांमुळे सर्व सभासदांना हजर राहण्यास सवड नसल्यास त्यांच्यापैकी निदान एक तरी सभासद हजर असला पाहिजे. या सभासदाने व पूजा सांगणाऱ्या ब्राह्मणाने पास दिलेल्या इसमास

गोप्रदानाची रक्कम आपले समक्ष देववून नि.(अ) च्या पत्रकावर समक्षतेच्या सह्या कराव्या. एकापेक्षा जास्त सभासद हजर असल्यास पूजा सांगणाऱ्याब्राह्मणाने सही करण्यास जरूर नाही. हजर असलेल्या सर्व सभासदांनी सह्या केल्या म्हणजे चालेल.

१३) एकास एक वर्षातून फक्त दोनदा मदत देणे

गोप्रदानाच्या रकमेतून मदत एकाच इसमास एका वर्षात दोहोंपेक्षा जास्त वेळा देऊ नये.

१४) सहा महिन्यातून फक्त एकदा मदत देणे

ज्या इसमास एकदा गोप्रदानातून मदत देण्यात आली असून पुन्हा त्याच इसमास देण्याची असेल तर, पहिले गोप्रदान दिल्या तारखेपासून सहा महिन्यांचे आत देऊ नये.

१५) सरकारी उत्पन्न असणाऱ्यांना मदत न देणे

ज्या लोकांना सरकारातून कोणत्याही प्रकारची मदत मिळत असेल, त्यांना गोप्रदानाच्या रकमेतून मदत देऊ नये.

१६) पात्रतेबद्दल कमिटीची जबाबदारी

ज्याला मदत द्यावयाची तो मदत मिळण्यास पात्र असल्याबद्दलची खात्री कमिटीने करून घेण्याची आहे व त्याबद्दलची जबाबदारी कमिटीवर राहील.

१७) पात्रतेबद्दल सभ्य गृहस्थाकडून शिफारस

एखादा इसम सदरहू प्रकारची मदत मिळवण्यास योग्य आहे असे कोणाही सभ्य गृहस्थास आढळून येईल, तर त्याने त्यांच्याकडील कमिटीकडे शिफारस करावी. कमिटीने सदर शिफारशीप्रमाणे लायकी पाहून मदत देण्याचे करावे.

१८) गोप्रदानाची रक्कम उगवून आणणे

गोप्रदानाकडेस लागणारी रक्कम देवस्थान कामदार यांनी जवाहिरखान्यातून चॅरिटी फंडाच्या रकमेतून एक महिन्याची आगाऊ उगवून आणून आपल्या ताब्यात ठेवावी; परंतु तशी सवड होईपावेतो देवस्थान धर्मदाय कामदार यांनी आपल्या कारखान्याच्या जाथूच्या रकमेतून दररोज खर्च करून मास अखेर रक्कम जवाहिरखान्यातून उगवून घ्यावी.

१९) हिशीबेकडे दाखला देणे

मास अखेरपावेतो आणलेल्या रकमेपैकी झालेल्या गोप्रदानांच्या नावानिशीचा दाखला पाहण्याकरिता खानगी खात्यात मूळ देणे यादीचे ऑडिट होते वेळी नि.(अ) चे पत्रक रुजू करीत जावे.

२०) रजिस्टरवर मदत घेणारांच्या सह्या घेणे

गोप्रदानाच्या वाटणीसंबंधाने सोबत दिलेल्या नि.(अ) च्या नमुन्याचे एक एकुणात बांधलेले शिक्के केलेले रजिस्टर ठेवण्यात यावे. या रजिस्टरवर ज्या त्या नावापुढे गोप्रदान घेणारांची सही अथवा लिहिणारा नसल्यास अंगठ्याची खूण करून घ्यावी.

२१) पासाचे दाखले बुक

नि.(ब) च्या नमुन्याप्रमाणे प्रत्येक गोप्रदानातून मदत घेणारास पास देण्यात यावेत. सदरहू पासाचे एक छापील फॉर्मचे डबल कॉपीचे बुक ठेवण्यात यावे. एक प्रत गोप्रदान घेणारास देऊन एक प्रत दाखल्यासाठी बुकात राहत जावी.

२२) जातवारीचे सहामाही पत्रक पाठवणे

दर सहामाहीला नि.(ब) च्या रजिस्टरवरून जातवारी समजण्यासाठी नि.(क) च्या नमुन्याप्रमाणे एक पत्रक तयार करून खानगी कारभारी यांजकडे पाठविण्यात यावे. या पत्रकाच्या योगाने सर्व जातींच्या लोकांस निःपक्षपातीपणे मदत मिळते किंवा कसे हे पाहण्यास त्यांना सुलभ होईल.

२३) कमिटीच्या कामाची तपासणी

गोप्रदानाची कमिटी आपली कामे कशी करते हे पाहण्यास्तव दर महिन्यातून निदान एकदा खानगी कारभारी यांनी कमिटीच्या कामांची तपासणी करीत जावी.

सदरहू नियम श्रीमंत सरकार सयाजीराव महाराजसाहेब यांच्या आज्ञेने प्रसिद्ध करण्यात आले आहेत. बडोदे, ता.२६/०२/१९०४ - अप्पासाहेब मोहिते, ना.खा. कारभारी (टीप - नि. (अ), नि.(ब), नि.(क) म्हणजे माहिती कशी द्यायची यांचे नमुने आहेत. *(संदर्भ - गोप्रदानाचे नियम, सरकारी छापखाना, १९०४)*. सयाजीराव महाराजांनी कोणत्याही अनावश्यक बाबींवर जास्त खर्च होत असेल तर अशा प्रकारचे हुजूरहुकूम देऊन त्यात नियमितपणा आणला. गरजवंतांना कशा प्रकारे मदत देता येईल यासाठी जास्तीचे नियम करत मदत दिली.

## गोप्रदान बंद

सयाजीराव महाराज हे कमालीची आधुनिकता असणारे राजे होते. त्यामुळे एखादी गोष्ट कालानुरूप नसेल किंवा कालबाह्य झाली तर त्यात कालसुसंगत बदल करत. यामुळे महाराजांचे कायदे हे काळाच्या पुढे दृष्टी असणारे होते. याचेच एक उदाहरण म्हणजे महाराजांनी इ.स. १९०४ मध्ये केलेला गोप्रदानाचा कायदा इ.स. १९३० मध्ये रद्दबातल ठरविला. त्यासाठी त्यांनी दुसरा कायदा केला. नवीन हुजूरहुकूम पुढीलप्रमाणे - ‘दानधर्म ही केवळ ऐच्छिक बाबत असून बदलत्या धर्मभावनेप्रमाणे दानधर्म करण्याच्या प्रकारातही बदल होत असतो. गोप्रदान हा दानधर्माचाच एक प्रकार असून ‘देशे काले च पात्रेच’ या वचनाप्रमाणे खरोखरच अपंग व निराश्रित अशा लोकांना करण्याचा दानधर्म नियमितपणे व्हावा या हेतूने सन १९०४ मध्ये गोप्रदानाचा नियम करण्यात आला. या नियमानुसार श्रीमंतांचे हस्ते दररोज रु.१५ पावेतो रक्कम अपंग व निराश्रित लोकांना वाटण्यात येऊन असा खर्च देवघर कारखान्यात असलेल्या गोप्रदानाच्या रु. ५,४७५ च्या रकमेत पडत असे; परंतु परिस्थितीनुसार धर्मसंबंधीच्या कल्पनांत बदल होत गेल्याने गोप्रदान रूपाचे दानधर्म करण्याचे हळूहळू कमी झाले व सन १९३० पासून गोप्रदानाची रक्कम वाटण्याचे राजाज्ञेने बंद करण्यात आले.’ *(खानगी खाते निधी नियम, १९३९, पृ. ८)*. अशा

प्रकारे कालसुसंगत बदल करत सयाजीराव महाराजांनी दानधर्मात खूप बदल केले. त्यामुळे पैशाची खूप बचत झाली. सरकारच्या दानधर्मावर ऐतखाऊ लोकांचे लाड यामुळे बंद झाले.

सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार घेतला त्यावेळी त्यांना ज्या बाबींवर कारणांशिवाय खर्च होत होता त्या बाबींवर लक्ष केंद्रित केले. यामध्ये सर्वप्रथम त्यांनी धर्मादाय खात्याकडे लक्ष देऊन यावर दरवर्षी होणारा लाखो रुपयांचा खर्च वाचवला. राज्याच्या तिजोरीतून असा अनाठायी होणारा खर्च बंद केला. राज्याचे उत्पन्न वाढले. या वाढलेल्या उत्पन्नाचा उपयोग त्यांनी प्रजेच्या सुधारणा करण्यासाठी केला. यातून समाजोपयोगी कामासाठी दानधर्म केला.

❍❍❍

# प्रकरण २ रे

# शिक्षण क्षेत्रातील दातृत्व

सयाजीराव महाराजांनी त्यांच्या शिक्षणकाळातच विद्येचे महत्त्व जाणले. शिक्षण घेतल्याने मनुष्यात सकारात्मक बदल होतो, तो चांगल्या विचारांची संगत धरून समाजाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करू लागतो हे महाराजांनी अल्पावधीत ओळखले. त्यामुळे त्यांनी संस्थानातील प्रजेला चांगल्या प्रकारे शिक्षण देण्यासाठी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. त्यांनी शिक्षण क्षेत्रात किती उत्तुंग प्रगती केली होती, याबाबतचे एक उदाहरण पाहिले म्हणजे त्याची व्यापकता लक्षात येईल. महाराजांचे दत्तकविधान होण्याअगोदर म्हणजे इ.स.१८७१ पर्यंत संस्थानमार्फत फक्त २ गुजराती आणि २ मराठी शाळा चालवल्या जात होत्या. एवढ्या मोठ्या संस्थानात या फक्त चार शाळा म्हणजे शाळा असून नसल्यासारख्या होत्या. सयाजीराव महाराजांचे इ.स.१८७५ मध्ये दत्तक विधान झाले. त्यानंतर संस्थानातील शिक्षणाला गती आली.

बडोदा संस्थानातील शिक्षणविषयक प्रगती पाहण्याअगोदर महाराजांच्या पूर्वी शिक्षणाची स्थिती काय होती हे पाहणे संयुक्तिक ठरेल. यापूर्वी पाहिल्याप्रमाणे बडोदा संस्थानात महाराजांच्या दत्तकविधानापूर्वी बडोद्यातील शिक्षणाची अवस्था चांगली नव्हती. 'इ.स.१८७० मध्ये शैक्षणिक खातेही नव्हते, इतकेच काय कोणतीही शासकीय शैक्षणिक संस्थाही अस्तित्वात नव्हती. जवळजवळ दोनशे प्राथमिक खासगी शाळा म्हणजे 'पंड्याजीनी शाळो' वाचन, लेखन आणि अंकगणित वरवरपणे शिकवत होत्या व त्यात आठ हजार मुले शिकत होती.' *(हिंगुराव, २०१५, पृ.६८)*. थोडक्यात, बडोद्यात शिक्षणाची जबाबदारी संस्थानमार्फत उचलली जात नव्हती. काही खासगी शाळांतून जरी शिक्षण दिले जात असले, तरी त्यामध्ये सुसंगतपणा नव्हता. त्यावर संस्थानचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नव्हते. या शाळा भरमसाट फी घेत असल्यामुळे गरीब किंवा शहरापासून दूर राहणाऱ्या लोकांना शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होत नव्हती.

महाराजांच्या पूर्वी मल्हारराव महाराजांच्या काळात सर्वप्रथम इ.स.१८७१ मध्ये बडोद्यात सरकारमार्फत शिक्षणाचे प्रयत्न केले गेले. त्यावेळी पाच शाळा स्थापन करण्यात आल्या. त्यापैकी एक हायस्कूल व दोन मराठी आणि दोन गुजराती शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या. या सरकारी शाळांमधून ८२२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. मल्हारराव महाराजांच्या राज्यकाळात संस्थानात अनागोंदी कारभार होता, तरीसुद्धा थोड्या संथ गतीने का होईना; परंतु सरकारमधून शिक्षणासाठी थोडेफार प्रयत्न सुरू होते. 'इ.स.१८७३ मध्ये मल्हारराव महाराजांनी धार्मिक

ज्ञानाला उत्तेजन देण्यासाठी चार वेदशाळा सुरू केल्या. तसेच सरकारी शाळांमध्ये व्याकरण, तर्कशास्त्र, कायदा यांचा अभ्यासही सुरू करण्यात आला.' *(हिंगुराव, २०१५, पृ. ६८)*; परंतु हे प्रयत्न लोकसंख्येच्या प्रमाणात अत्यंत तुटपुंजे आणि सर्वसमावेशक नव्हते. त्यानंतर इ.स. १८७५ मध्ये मल्हारराव महाराजांना इंग्रजांनी पदच्युत केल्यावर सयाजीराव महाराज (तिसरे) यांना दत्तक घेण्यात आले.

सयाजीराव महाराजांना दत्तक घेतल्यावर दिवाण टी. माधवराव यांनी संस्थानात सुशासन निर्माण करत संस्थानची घडी बसवली. प्रजेला शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या जाऊ लागल्या. याच दरम्यान इ.स. १८७५ मध्ये बडोदा संस्थानात मुलींसाठी गुजराती आणि मुस्लिम मुलींसाठी उर्दू शाळा काढण्यात आल्या. 'इ.स. १८७५ मध्ये नऊ संस्कृत, तीन मराठी, तीन गुजराती आणि दोन उर्दू शाळा उघडण्यात आल्या; त्याचबरोबर उच्च माध्यमिक शिक्षणासाठी हायस्कूल चालू करण्यात आले व तो त्याकाळचा एकमेव प्रयत्न होता. काही शाळा पेटलाद, पाटण आणि इतर ठिकाणीही सुरू करण्यात आल्या. याचवर्षी 'देशी केळवणी खात्या'ची स्थापनाही करण्यात आली. या खात्याच्या नियंत्रणाखाली इ.स. १८७५ मध्ये ५५ शाळा, इ.स. १८७६ मध्ये ७०, इ.स. १८७७ मध्ये १०५, इ.स. १८७८ मध्ये १०५ शाळा होत्या.' *(हिंगुराव, २०१५, पृ. ६९-७०)*. महाराजांचे शिक्षण सुरू असताना बडोदा संस्थानात हळूहळू का होईना शाळांची संख्या वाढत होती. त्यानंतर महाराजांनी इ.स. १८८१ मध्ये  राज्यकारभार हाती घेतला. राज्यकारभार हाती घेतल्यावर महाराजांनी टप्प्याटप्प्याने प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण आणि औद्योगिक शिक्षणात खूप प्रगती केली. त्यांनी सरकारी पैशातून शिक्षण देणे सुरू केले. अनेकांना शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवले. हे सर्व पाहण्याअगोदर महाराजांनी प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि उच्च शिक्षणात काय-काय प्रगती केली याबाबत माहिती करून घेणे योग्य ठरेल. कारण यासाठी महाराजांनी सरकारी खजिन्यातील खूप मोठ्या रकमेची गुंतवणूक केली होती.

## प्राथमिक शिक्षण

सयाजीराव महाराजांना २८ डिसेंबर १८८१ रोजी राज्यकारभार देण्यात आला. त्यावेळी त्यांचे वय होते अठरा वर्षे. त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून राज्यकारभाराचे धडे देण्यात आले होते. व्यक्तीची प्रगती ही केवळ शिक्षणामुळे होऊ शकते यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच त्यांनी संस्थानात शिक्षणाला अतिउच्च स्थान दिले. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सेवासुविधा निर्माण केल्या. त्यांनी राज्यकारभार हाती घेतला त्या वर्षी फक्त ८० प्राथमिक शाळा अस्तित्वात होत्या आणि या शाळांमधून ७,४६८ मुले शिक्षण घेत होती. ही स्थिती काहीशी समाधानकारक वाटत असली तरी संस्थानचा विस्तार आणि लोकसंख्या यांच्या तुलनेत ही सुविधा अल्पप्रमाणात होती.

महाराजांनी राज्यकारभार हाती येताच प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाकडे आपले लक्ष केंद्रित केले. स्व-भूमीचे निरीक्षण करण्यासाठी त्यांनी ज्यावेळी संस्थानच्या वेगवेगळ्या प्रांतांचे दौरे

सुरू केले, त्यावेळी प्रजेच्या दारिद्र्याचे प्रमुख कारण लक्षात आले. ते कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव आणि अज्ञानाचा सुकाळ. एक-दोन दौरे झाल्यानंतर अस्पृश्य आणि मागासवर्गांना शिक्षित केले पाहिजे हे त्यांच्या प्रकर्षाने लक्षात आले. याची सुरुवात त्यांनी हुकूम काढून केली. त्याबद्दल महाराजांचे चरित्रकार आपटे लिहितात, 'मागासलेल्या वर्गांसाठी विशेषत: त्यातील अस्पृश्य गणलेल्या लोकांसाठी महाराजांनी अगदी आरंभीच म्हणजे सन १८८२-८३ साली शाळा उघडण्याची व्यवस्था केली. त्या लोकांना फीची संपूर्ण माफी देण्यात येऊन पाट्या, पुस्तके वगैरे साधनेही त्यांना मोफत पुरविण्याचा हुकूम करण्यात आला. तसेच भिल्ल लोकांसाठी एक स्वतंत्र वसतिगृह स्थापन करण्यात आले.' *(आपटे, खंड-१, १९३६, पृ. ३५५)*. संस्थानिकांच्या वतीने सयाजीराव महाराजांनी मागास समाजातील लोकांना मोफत शिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणले. त्यांचा हा प्रयत्न आणि प्रयोग संस्थानिकांच्या वतीने हिंदुस्थानातील पहिलाच होता. त्यांनी सुरू केलेल्या या प्रयत्नाला त्यांच्या वतीने आणि बडोदा सरकारच्या वतीने निधी कमी पडू दिला नाही. बडोदा संस्थानचे प्रशासकीय अहवाल पाहिल्यावर या सगळ्याची वास्तविकता लक्षात येते. 'महाराजांनी १८७९-८० साली २,१४,१५४ रुपये, १८८०-८१ साली ४,३४,३४७ रुपये, १८८१-८२ साली ३,४२,६१५ रुपये आणि १८८२-८३ साली ४,१२,४५३ रुपये शिक्षणावर खर्च केले.' *(B.A.R., 1882-83, p. 69)*. महाराजांनी राज्यकारभाराच्या प्रारंभीच्या एवढ्या मोठ्या प्रमाणातील रकमा शिक्षणावर खर्च केल्याने शिक्षणातील त्यांचे दातृत्व नजरेत भरते.

अस्पृश्य जनतेच्या शिक्षणाची सोय करून महाराज थांबले नाहीत तर त्यांनी पुढचे पाऊल उचलत प्रथम अमरेली प्रांतात सक्तीचे आणि मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले. प्राथमिक शिक्षणाबाबतचा महाराजांचा हा निर्णय हिंदुस्थानातील नव्हे, तर जगातील पहिला क्रांतिकारी निर्णय ठरला. सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाची हिंदुस्थानातील ही सुरुवात होती. त्यामागे सयाजीराव महाराजांचे दातृत्व फार मोठे आहे. पालकांनी प्राथमिक शिक्षणासाठी शाळेत मुला-मुलींना पाठवले नाही तर त्या पालकांना दंड केला जात असे. या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यावर काही पालकांनी याबाबत तक्रारी सुरू केल्या; परंतु महाराज सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाबद्दल आग्रही होते. त्यांनी संस्थानातील धुरंधर अधिकाऱ्यांच्या मदतीने समर्थपणे या कायद्याची अंमलबजावणी केली.

## सक्तीचे आणि मोफत प्राथमिक शिक्षण

सयाजीराव महाराजांनी या सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाला फारच महत्त्व दिले होते. त्याचे प्रतिबिंब त्या काळी लिहिलेल्या पत्रातून दिसते. त्यावेळचे त्यांनी आपले विचार दिवाण मणीभाई जसभाई यांना ता. १६ मार्च १८९३ रोजी लिहिलेल्या पत्रात व्यक्त केले. 'गेल्या पुष्कळ काळपर्यंत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रयोग सर्व बडोदे राज्याला नाही, तरी निदान त्यातील काही भागाला लागू करण्याचा विचार माझ्या मनात घोळत होता. या दृष्टीने माझ्या अधिकाऱ्यांच्या व

माझ्या पुष्कळ मुलाखती होऊन त्यासंबंधाची अवश्य ती माहिती मला मिळाली आहे. ती माहिती बरोबर आहे व तिच्यावरून केलेल्या खर्चाचा अंदाज कमी नसून थोडा अधिकच आहे असे गृहीत धरून, मी त्यासंबंधीचा हुकूम देत आहे. त्याची बजावणी सुज्ञतेने करून त्या प्रयोगाकडे सर्व दृष्टींनी अवलोकन केले पाहिजे. त्या योजनेत दोष आढळल्यास ते सुधारले पाहिजेत व त्यासंबंधीच्या अंदाजपत्रकात उणीव असल्यास ती दुरुस्त केली पाहिजे. या कामी उत्साहाने भरी भरले जाण्याची अथवा आग्रही होण्याची आमची मुळीच इच्छा नाही. उलट आमच्या चुका झाल्याचे आढळल्यास त्या सुधारण्याची आमची इच्छा आहे. या प्रयोगाला लागणारा सर्व खर्च करणे सरकारला परवडेल किंवा नाही हा एक मोठा प्रश्न आहे. हल्लीच उत्पन्नाइतका खर्च आम्ही करीत आहोत. ही स्थिती समाधानकारक नाही. तथापि, आणखी काही थोडे हजार रुपये खर्च करण्याची जबाबदारी स्वीकारून मी असा हुकूम देतो की, अमरेली महालातील सर्व गावात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापण्यात याव्यात. त्यांचा खर्च अंदाजे ३१७९०-८-० येईल... सक्तीच्या शिक्षणाची सुरुवात करण्यापूर्वी सर्व ठिकाणी असे शिक्षण देण्याची साधने तयार करून दिली पाहिजेत व ती दिल्यावरही जर लोक आपली मुले शाळात पाठविणार नाहीत, तर मग त्यांना शिक्षा करण्याबद्दलचा विचार पुढे करता येईल.'

त्याच पत्रात महाराजांनी या शिक्षणाची अत्यंत निकड कशा प्रकारे आहे हे सागितले. महाराज पुढे लिहितात, 'या योजनेप्रमाणे सर्व जातींच्या व वर्गांच्या मुला-मुलींसाठी शिक्षणाची सोय करावयाची आहे. ... या योजनेचा विस्तार करणे, हे संस्थानाच्या द्रव्यसामर्थ्यावर अवलंबून राहील. सर्व राज्याला सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यास प्रतिवर्षी १२ ते १५ लाखपर्यंत खर्च येईल. म्हणून यासंबंधाने मी स्वत:ला कोणत्याही प्रकारे बांधून घेत नाही. इतक्या खर्चाळ योजनेचा बोजा संस्थानाला झेपेल किंवा नाही हे अनुभवाने नक्की झाल्यावाचून यासंबंधाचे धोरण मी निश्चित करू शकत नाही. आपल्या हातून जे पार पडू शकणार नाही ते करण्याचे वचन देणे यासारखी वाईट गोष्ट नाही. तथापि, इतके मात्र मी निर्विवाद रीतीने म्हणू शकतो की, आपल्या राज्यातील सर्व प्रजा सुशिक्षित करण्याहून अधिक श्रेष्ठ कार्य दुसरे कोणतेही नाही. माझे धोरण यशस्वी होण्यासाठी व माझ्या आकांक्षा व इच्छा पूर्ण होण्यासाठी माझ्या प्रजेला शिक्षण मिळणे हे अत्यंत अवश्य आहे.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ६३४-६३५)*. महाराजांनी अशा प्रकारे संस्थानातील एका भागात सक्तीचे आणि मोफत शिक्षण चालू करण्यासंदर्भात उपाययोजना केल्या होत्या. प्रत्येक योजनेचा पाया भक्कम केल्याशिवाय महाराज कोणतेही पाऊल उचलत नसत. या योजनेची यशस्वीता म्हणजे या भागातील शेकडा ९२.२ टक्के मुले १८९४-९५ मध्ये शाळेत जाऊ लागली.

अमरेली प्रांतातील सक्तीच्या आणि मोफत यशस्वी कायद्यानंतर त्यांनी इ.स. १९०६ मध्ये संपूर्ण बडोदा संस्थानात या कायद्याची अंमलबजावणी सुरू केली. त्याचा कायदा इ.स. १९०७ मध्ये करण्यात आला. हे कायदे केल्यानंतर बडोदा संस्थानाची प्राथमिक शिक्षणाबद्दल उत्तरोत्तर प्रगती होत गेली. त्याबाबतची अधिक माहिती आपटे यांनी दिली आहे. 'सन १९१०-११

अखेर राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या एकंदर शाळांची संख्या २,९३८ इतकी होऊन त्यातील विद्यार्थ्यांची संख्या १,७३,८८३ इतकी झाली. यापैकी मुलांच्या शाळा २,५९५ असून त्यात १,१९,८४५ मुलगे शिकत होते. कन्याशाळांची संख्या ३४३ होती व त्यातील विद्यार्थ्यांनींची संख्या ५४,०३८ इतकी होती. या आकड्यांशी सन १८८७ च्या अखेरच्या आकड्यांची तुलना केली असता या मध्यकाळात प्राथमिक शिक्षणात प्रगती केवढी झाली, हे दिसून येईल. सन १८८७ अखेर सर्व राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या एकंदर शाळा ३४६ असून त्यातील विद्यार्थ्यांची संख्या ३४,२६२ होती. यापैकी मुलींच्या शाळांची संख्या २७ असून, त्यात २,४५८ मुली शिकत होत्या. या आकड्यांची तुलना करताना असे दिसून येईल की, या मध्यकालात प्राथमिक शाळांची संख्या आठपटीने अधिक वाढली असून, विद्यार्थी वर्गाच्या संख्येत पाचपटीने वाढ झाली होती. साधारणत: प्राथमिक शाळांतून जाण्यायोग्य वयाच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण एकंदर लोकसंख्येशी शेकडा १५ असे पडते, असा नियम आहे. त्याप्रमाणे पाहिल्यास प्राथमिक शाळात जाण्यायोग्य वयाच्या एकंदर विद्यार्थी वर्गापैकी शेकडा ५८ मुले त्या काळी शाळेत जाऊ लागली होती. ही प्रगती नि:संशय आशाजनक होती.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ६३६)*. प्राथमिक शिक्षणात महाराजांनी स्वत: लक्ष घातल्याने राज्यकारभाराच्या प्रारंभीच चांगली प्रगती झाली. यामध्ये महाराजांच्या दातृत्वाचे खूप मोठे योगदान होते.

महाराजांची प्राथमिक शिक्षणातील घोडदौड कायमस्वरूपी सुरूच होती. कोणताही निर्णय घेतल्यावर महाराज त्याबाबत हुजूरहुकूम काढत. त्यांच्या पुढील हुकूमात शिक्षणाबाबतचे धोरण स्पष्टपणे दिसते. 'शिक्षणदान हे मोठे परोपकाराचे कार्य आहे व त्या कार्यांत जो यशस्वी होईल, तोच देशाचा खरा उद्धारक समजला जाईल. प्रजेच्या शारीरिक सुखाप्रमाणेच नैतिक व बौद्धिक सुधारणेकडे धर्मपिता या न्यायाने राजाने अवश्य लक्ष दिले पाहिजे. शिक्षण निरनिराळ्या विषयांचे दिले पाहिजे, हे उघड आहे; परंतु त्या सर्वांत प्राथमिक शिक्षणासच सध्या प्राधान्य दिले पाहिजे. हे शिक्षण झाल्यावर शेती, व्यापार व उद्योगधंदे वगैरे निरनिराळ्या प्रकारचे शिक्षण पुष्कळ देता येईल. हल्ली ज्या पद्धतीने शिक्षण देण्यात येते, ती केवळ पढिक व औपचारिक आहे. तीत तात्त्विक शिक्षणाचा किंवा व्यापाराचा समावेश झालेला नाही. त्या बाबतीकडे जास्त लक्ष दिले पाहिजे.' *(आपटे, खंड-१, १९३६, पृ.३६४)*. महाराजांच्या अशा काटेकोर नियोजनामुळे बडोदा संस्थानाने प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत इंग्रजांपेक्षा अधिक प्रगती झाली.

## माध्यमिक शिक्षण

प्राथमिक शिक्षणाबरोबर महाराजांनी माध्यमिक शिक्षणाकडेही राज्यकारभाराच्या सुरुवातीपासून लक्ष दिले. इ.स.१९३३ मध्ये महाराजांच्या ७१व्या वाढदिवसानिमित्त काढलेल्या 'श्रीसयाजीगौरवग्रंथा'त याबद्दलची माहिती य.रा. दाते यांनी दिली आहे. 'संस्थानात एकंदर १५ सरकारी हायस्कूल असून सरकारी मदत असणारी ८ आहेत. त्यापैकी बडोद्यात ३ आहेत व बाकीची नवसारी, गणदेवी वगैरे ठिकाणी आहेत. त्याचप्रमाणे दुय्यम शिक्षण संस्था एकंदर ३५

आहेत.' *(दाते, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-१, १९३३, पृ.५९)*. महाराजांनी माध्यमिक शिक्षणासाठी चांगली आर्थिक तरतूद केली.

महाराजांनी प्राथमिक आणि उच्च शिक्षणाला जोडणाऱ्या माध्यमिक शिक्षणासाठी आवश्यक असणारी साधने उपलब्ध करून दिली. त्याबद्दल आपटे म्हणतात, 'दुय्यम शिक्षणाचा विचार करता या अवधीत सहा मुख्य तालुक्यांच्या ठिकाणी इंग्रजी व देशी भाषा शिकविणाऱ्या शाळा स्थापन करण्यात आल्या. तथापि, शिक्षणाचा मुख्य दृष्टिबिंदू प्राथमिक शिक्षण हा होता, म्हणून प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांच्या संख्येत या काळात पुष्कळ वाढ करण्यात आली. शाळांतून दिलेल्या शिक्षणाची किंमत शिक्षकांच्या लायकीवर अवलंबून असणार. यामुळे शिक्षकांना आपले कर्तव्य करण्याचे सप्रयोग शिक्षण देण्यावर अर्वाचीन काळात फार भिस्त ठेविण्यात येते. या कामी महाराजांच्या अज्ञानावस्थेत काहीही योजना करण्यात आली नव्हती. म्हणून या महत्त्वाच्या बाबतीकडे लक्ष देऊन पुरुषांचे व स्त्रियांचे असे निरनिराळे शिक्षणाचे वर्ग स्थापन करण्यात आले. येथून पुढे या वर्गातून पास झालेल्या शिक्षकांना नियमित बढती देण्याचे धोरण सुरू करण्यात आले व अशा रीतीने शिक्षणाची योग्यता वाढविण्याचा उपक्रम करण्यात आला.' *(आपटे, खंड-१, १९३६, पृ. ३५४)*. त्यावेळी प्राथमिक शिक्षण पूर्ण करून जास्तीत जास्त विद्यार्थी माध्यमिक शिक्षण कसे घेतील याकडे महाराजांचे लक्ष होते.

महाराजांच्या मृत्यूसमयीच्या वेळी प्रशासकीय अहवालातील माध्यमिक शाळासंबंधीचा मजकूर पाहिला म्हणजे या भागातील शिक्षणाची श्रीमंती समजते. 'The number of institutions imparting secondary education has risen from 121 to 138 during the year. (1939-1940) an encouraging feature of this development is the increasing contribution from the public towards this expansion of the 33 high schools sixteen are private schools and of the 15 a.V. schools, 71 are private.' *(B.A.R.,1939-40, p.186-187)*. महाराजांनी माध्यमिक शिक्षणात सातत्याने वाढ केली. त्यामध्ये भौतिक सुविधांबरोबर शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कशा प्रकारे वाढत राहील याकडे त्यांचे जाणीवपूर्वक लक्ष होते. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे काढली. महाराजांना शिक्षणाप्रती असणारी आवड आणि प्रजेला ज्ञानी बनवण्याचे त्यांचे ध्येय यामुळे त्यांनी त्यासाठी अमाप पैसा खर्च केला. यामागे त्यांचे दातृत्व होते.

### उच्च शिक्षण

महाराजांनी राज्यकारभाराच्या प्रारंभीच उच्च शिक्षणालाही महत्त्व दिले. त्यामुळेच त्यांनी बडोदा कॉलेजच्या स्थापनेला परवानगी दिली. त्याबद्दल महाराजांचे चरित्रकार आपटे म्हणतात, 'सन १८८१ च्या आरंभी बडोदे कॉलेजची सुरुवात करण्यात आली. प्रथमत: या नवीन कॉलेजमध्ये फक्त आर्टस् कोर्स शिकविण्याची व्यवस्था होती; परंतु पुढे सन १८८७ साली सायन्स शाखाही उघडली गेली. त्यावेळी शेतकीच्या शिक्षणाची पूर्ण सोय या कॉलेजात केलेली

होती; परंतु त्याला विद्यार्थ्यांकडून हवे तसे उत्तेजन न मिळाल्याने ही पुढे बंद करावी लागली. यापूर्वी बडोद्यास मराठीतून व गुजराथीतून शिक्षण देणारे एक देशी शास्त्रीय कॉलेज सन १८७६ साली अस्तित्वात आले होते; परंतु त्याकाळी शास्त्रीय शिक्षण देणारी पुस्तके देशी भाषांतून तयार करण्यात आली नव्हती. त्यामुळे त्या शिक्षणात बरीच अडचण भासे. पुढे नवीन पद्धतीचे मुंबई विद्यापीठास जोडलेले हे कॉलेज स्थापन करण्यात आल्यावर अर्थातच जुने देशी कॉलेज त्या पुढील वर्षी लयास गेले. बडोदे कॉलेजची इमारत फार भव्य असून, तिला सहा लक्ष रुपये खर्च झालेला आहे. या इमारतीस असलेला घुमट अतिशय मोठा असून, तितक्या आकाराचे घुमट हिंदुस्थानात इतरत्र एक-दोन ठिकाणीच आहेत. याच इमारतीत बडोदे हायस्कूलचे वर्ग भरत असत, ते अगदी अलीकडे हायस्कूलसाठी निराळी इमारत तयार होईपर्यंत तेथेच असत. यानंतर बडोदे कॉलेजचा उत्तरोत्तर फार उत्कर्ष होत गेला आहे.' *(आपटे, खंड-१, १९३६, पृ. ३५३ ते ३५४)*. या बडोदा कॉलेजला त्या काळात महत्त्वाचे स्थान होते. यामधून अनेक नामांकित विद्यार्थी घडले. तसेच अनेक मान्यवर प्राध्यापक मंडळींनी कॉलेजमध्ये अध्यापन केले.

बडोदा कॉलेज स्थापन झाल्यावर अल्पावधीतच महाराजांनी या कॉलेजमध्ये अध्यापन करण्यासाठी अनेक नामवंत प्राचार्य आणि प्राध्यापकांची निवड केली. त्यामुळे कॉलेजची जगभर ख्याती पसरली. त्याबाबत य.रा. दाते म्हणतात, 'टेट, लिटलडेल, क्लार्क, मसाणी यांसारखे विद्वान व नाणावलेले गृहस्थ या कॉलेजचे प्राचार्य होऊन गेले. त्याचप्रमाणे सर मनुभाई मेहता, टी.के. गज्जर, अरविंद घोष, मिडलटन, आर्ते, विजेरी यांसारखे हिंदुस्थानातच काय पण जागतिक प्रसिद्धी मिळविलेले गृहस्थ या कॉलेजमध्ये प्रोफेसर होते.' *(दाते, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-१, १९३३, पृ. ५९)*. महाराजांनी नेहमीच उत्कृष्टतेचा आग्रह धरल्यामुळेच बडोदा कॉलेजमध्येही त्यांनी परिपूर्ण आणि व्यावसायिक पात्रता असणाऱ्या प्राध्यापकांची गुणवत्तेवर निवड केली. महाराज हे गुणग्राहक राजा असल्यानेच कॉलेजची प्रगती होण्यासाठी अशा लोकांची निवड केली.

सयाजीराव महाराज बडोद्यात फक्त उच्चशिक्षणाची सोय करून थांबले नाहीत. त्यांनी हिंदुस्थानाच्या इतर भागात ज्या-ज्या ठिकाणी उच्च शिक्षणाची सोय आहे अशा ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी हजारो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन शिक्षणासाठी पाठवले.

महाराजांनी संस्थानात केलेल्या शिक्षणाच्या सोयी फक्त बडोद्यापुरत्या मर्यादित नव्हत्या, तर इतर भागांतील लोकांचे शिक्षण व्हावे यासाठीही त्यांनी खूप मोठी मदत केली. महाराजांच्या दातृत्वामुळे बडोद्यात आणि इतर भागात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार झाला.

## औद्योगिक शिक्षण/ व्यावसायिक शिक्षण

सयाजीराव महाराजांनी बडोद्यात फक्त सर्वसाधारण शिक्षणाची सोय केली नाही, तर त्यांनी उद्योगधंद्यांचे शिक्षण आणि व्यवसायाभिमुख शिक्षणही सुरू केले होते. त्या काळातील प्रामुख्याने हा हिंदुस्थानातील पहिलाच प्रयोग होता. या शिक्षणासाठी महाराजांनी 'कलाभवन' नावाची संस्था स्थापन केली.

महाराजांनी स्थापन केलेल्या या नावीन्यपूर्ण संस्थेत अनेक विषयांचे शिक्षण सुरू केले होते. त्याबद्दल आपटे म्हणतात, 'या काळातील शिक्षण खात्यातील दुसरी प्रमुख सुधारणा म्हणजे कलाभवनाची स्थापना ही होय. महाराजांना अधिकार मिळाल्यानंतर बडोदे हायस्कूलमधील विद्यार्थ्यांच्या एका बक्षीस समारंभाच्या प्रसंगी धंदेशिक्षणाची शाळा स्थापन करण्याचा आपला उद्देश असल्याचे त्यांनी बोलून दाखविले होते. त्याचेच दृश्यफळ कलाभवन हे होय. सन १८९० साली रा. त्रिभुवनदास कल्याणदास गज्जर या नावाचे रसायनशास्त्रज्ञ गृहस्थ बडोदे कॉलेजात त्या शास्त्राचे प्रोफेसर म्हणून काम करीत होते. हे गृहस्थ मूळचे सुरतचे रहिवासी असून, आपल्या विषयात फार प्रवीण होते व विशेषत: त्या विषयाची त्यांना फार हौस होती. त्यांच्या मदतीने कलाभवनाची योजना ठरवून त्या साली त्याची स्थापना करण्यात आली. प्रो. गज्जर यांना या संस्थेचे पहिले प्रिन्सिपॉल म्हणून नेमण्यात येऊन त्यांच्याशिवाय डॉ. श्मूखर व डॉ. एरहार्ट हे दोन जर्मन तज्ज्ञ शिक्षणासाठी ठेवण्यात आले होते. या संस्थेत प्रथम रंगशाळा सुरू करण्यात आली व नंतर क्रमाक्रमाने चित्रशाळा, शिल्पशाळा, यंत्रविभाग व विणकामाचा वर्ग उघडण्यात आले. त्यावेळी या शाळेत येणारे विद्यार्थी इंग्रजीचे ज्ञान असलेले नसत, त्यामुळे त्यांना शिकण्यासाठी देशी भाषेतील शास्त्रीय पाठ्यपुस्तकांची जरूर पडली, म्हणून प्रो. गज्जर यांच्या देखरेखीखाली सयाजी ज्ञानमंजूषा व लघुज्ञानमंजूषा या नावाच्या देशी भाषेतील शास्त्रीय विषयांच्या दोन पुस्तकमाला तयार करवण्यात आल्या.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ.६३७)*. या भवनाला अनेक अभ्यासक्रम जोडण्यात आले होते. त्यामुळे त्या काळात या संस्थेचे नाव जागतिक पातळीवर गेले.

या संस्थेत काही दिवसांनी अनेक प्रकारचे छोटे-छोटे उद्योगांचे शिक्षण देणारे अभ्यासक्रमही सुरू करण्यात आले. 'कलाभवनाची एकंदर व्यवस्था बरोबर चालली आहे किंवा नाही, हे पाहण्यासाठी महाराजांनी सन १९०८ मध्ये बडोदा कॉलेजचे प्रिन्सिपॉल व पदार्थविज्ञानशास्त्र विषयाचे प्रोफेसर मि. जॅक्सन यांच्याकडून या संस्थेची तपासणी करविली व त्यांच्या अभिप्रायाप्रमाणे योग्य त्या सुधारणा त्यात करविल्या. त्याचप्रमाणे या काळात इंजिनिअरिंग , लाकडी सामानाची बनावट, चित्रकाम, घड्याळे बनविण्याचे काम वगैरे विशिष्ट कलांचे शिक्षण घेण्यासाठी काही हुशार विद्यार्थी परदेशी पाठविण्यात आले व ते शिकून परत आल्यावर त्यांच्या ज्ञानाचा लाभ कलाभवनाच्या विद्यार्थ्यांना मिळण्याची व्यवस्था करण्यात आली. सन १९०२ पासून सन १९०८ पर्यंत घड्याळे बनविण्याच्या शिक्षणाचा एक वर्ग चालविण्यात आला होता. त्याचप्रमाणे  सन १९०० सालात बटने, स्टील पेन, एनॅमल, ब्रश वगैरे वस्तू तयार करण्याच्या शिक्षणाचा वर्गही उघडण्यात आला. अशा विषयांचे शिक्षण सप्रयोग द्यावे लागत असल्यामुळे आरंभापासूनच कलाभवनाला जोडून एक प्रयोगशाळाही काढण्यात आली होती. अशा प्रकारची संस्था त्याकाळी सर्व हिंदुस्थानात ही एकच असल्यामुळे तिला आरंभापासून विद्यार्थ्यांची वाण केव्हाच पडली नाही. सुरुवातीस प्रवेश परीक्षेसाठी ८४१ उमेदवार आले होते. त्यापैकी २४२ पसंत करण्यात आले. ही संख्या एकाच वर्गात ३५० पर्यंत गेली व त्यापुढील दोन वर्षांत तिची

प्रगती ४६५ पर्यंत झाली. अशाच धर्तीवर पण लहान स्वरूपाच्या शाळा राज्यात आणखी चार ठिकाणी काढण्यात आल्या व स्थलपरत्वे अनुकूल ते विषय त्यातून शिकविण्यात येत. कलाभवनात विद्यार्थ्यांची सोय मर्यादित असल्याने त्यात आरंभापासून जी भरपूर संख्या येत होती, तीच पुढेही साधारणत: कायम राहिली आहे. अशा प्रकारची संस्था स्थापून महाराजांनी कला व धंदे शिकविण्याचा प्रश्न सोडविण्याचा अपूर्व प्रयत्न यशस्वी रीतीने या काळात करून दाखविला.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ.६३८)*. महाराजांनी सढळ दातृत्वाने बडोदा राज्यात धंदे शिक्षणाला उत्तेजन दिले. यातून त्यांना राज्याबरोबर सामान्य प्रजेचीही स्थिती बदलायची होती.

## शिक्षणासाठी प्रचंड दातृत्व

सयाजीराव महाराजांनी शिक्षणातच प्रजेचा मोक्ष पाहिला होता. त्यामुळे त्यांनी राज्यकारभार हाती घेतल्यापासून ते मृत्यूपर्यंत प्रजेला शिक्षित करण्यासाठी दिवसरात्र मेहनत घेतली. सुरुवातीला प्राथमिक आणि देशी भाषांतील शिक्षणावर भर दिल्यावर त्यांनी माध्यमिक, उच्च आणि तंत्रशिक्षणावर भर दिला. लाखो रुपये खर्च केले. त्यासाठी स्वतःच्या खासगीतून दान दिले. तसेच सयाजीराव महाराजांनी राज्याच्या तिजोरीतील अधिकांश भाग शिक्षणावर खर्च केला. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

१) राज्यातील सर्व प्रकारच्या प्राथमिक शाळा उघडणे, शाळांसाठी इमारती बांधणे, त्यांची व्यवस्था ठेवणे, त्या व्यवस्थित चालवणे आणि शिक्षकांना पगार देणे, त्यांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी प्रशिक्षणाला पाठवणे.

२) राज्यातील सर्व प्रकारच्या माध्यमिक (माध्यमिक) शाळा उघडणे, शाळांसाठी इमारती बांधणे, त्याची व्यवस्था ठेवणे, त्या व्यवस्थित चालवणे आणि शिक्षकांना पगार देणे, त्यांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी प्रशिक्षणाला पाठवणे.

३) बडोदा महाविद्यालय हे महाराजांनी पाहिलेले एक स्वप्न होते. महाविद्यालयाची उभारणी करणे, विविध ज्ञानशाखा सुरू करणे, त्यासाठी गुणवंत प्राध्यापकांची निवड करणे, जगभरातील ज्वलंत विषयांवर चर्चासत्रे घडवून आणणे.

४) संगीत शाळा, संस्कृत शाळा, महिलांच्या शाळा, अपंगांच्या शाळा, मूकबधिर मुलांच्या शाळा उघडणे, त्यामध्ये तज्ज्ञ शिक्षक नेमणे, त्या व्यवस्थित चालण्यासाठी अनुदान देणे. या शाळांसाठी सुरक्षित आणि सुंदर इमारती बांधणे.

५) बडोदा शहरात आणि संपूर्ण संस्थानात जागोजागी वसतिगृहे उभारणे, त्यामधील विद्यार्थ्यांची निवास आणि भोजनाची व्यवस्था करणे. गरज पडल्यास त्याच ठिकाणी नवीन इमारती बांधणे.

६) कलाभवनसारखी शाळा उभारणे, तंत्रशिक्षणातील वेगवेगळया ज्ञानशाखा सुरू करणे, त्यामध्ये आधुनिकतेचा ध्यास असलेला शिक्षक वर्ग नेमणे.

७) प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत, तसेच तंत्रशिक्षणासाठी अद्ययावत तज्ज्ञांकडून अभ्यासक्रम तयार करून घेणे, त्यात आवश्यकतेनुसार बदल करून घेणे. त्याची गरजेनुसार पुस्तके छापणे, ती सर्वांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करणे.

८) आवश्यकतेनुसार विविध धर्मांसाठी शाळा काढणे, त्यांच्या इमारती उभारणे, शिक्षकांच्या नियुक्त्या करणे.

९) सर्वच प्रकारच्या शाळा आणि महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांना विविध प्रकारची आणि विविध स्वरूपात बक्षिसे देणे.

अशा अनेक बाबींवर महाराजांनी करोडो रुपये खर्च केले. महाराजांनी शिष्यवृत्तीसाठी ज्या रकमा उपलब्ध करून दिल्या त्याचा उल्लेख पुढे आला आहेच.

## शिक्षणासाठी दिलेल्या शिष्यवृत्त्या

सयाजीराव महाराज ज्याप्रमाणे बडोदा संस्थानातील शिक्षणासाठी कष्ट घेत होते, त्याप्रमाणे संस्थानातील तसेच संस्थानाबाहेरील जिज्ञासू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन हिंदुस्थानच्या इतर भागात तसेच पदेशातही पाठवत होते. महाराजांचा शिष्यवृत्ती देण्यामागचा हेतू फक्त देश हिताचा आणि राष्ट्रप्रेमाचा होता. महाराज शिष्यवृत्ती देताना जो करारनामा लिहून घेत त्यात वरील हेतूंचे रहस्य दडले आहे. शिष्यवृत्तीची परतफेड करण्यासाठी महाराजांच्या अटी पुढीलप्रमाणे असत. ‘उच्चशिक्षण घेऊन आल्यावर संस्थानात नोकरी करणे, शिष्यवृत्तीची रक्कम परत करणे, या दोन्ही बाबी शक्य नसल्यास आपल्या समाजासाठी काम करणे, समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण संस्था काढणे.’ महाराजांच्या या अटी म्हणजे त्यांनी पाहिलेले उन्नत आणि प्रगत देशाचे मोठे स्वप्न होते. महाराज अशा उच्चशिक्षित विद्यार्थ्यांकडून ही अपेक्षा ठेवत.

सयाजीराव महाराजांनी लाखो रुपयांच्या शिष्यवृत्त्या दिल्या. त्याबद्दल महाराजांचे समकालीन चरित्रकार य.रा. दाते म्हणतात, ‘१९३०-३१ च्या सरकारी रिपोर्टमध्ये २ शिष्यवृत्त्या सिडनेहॅम कॉलेजमध्ये शिक्षण घेण्यासाठी, ‘सेवाकर’ शिष्यवृत्ती सरकारी नोकरांच्या मुलांकरता, माध्यमिक एज्युकेशन कोडमध्ये दिलेल्या शिष्यवृत्त्या, मराठा मुलींसाठी काही शिष्यवृत्त्या मिळून २३,६०७ रुपये खर्च करण्यात आले असे नमूद करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मराठा जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ४० ‘सयाजीराव शिष्यवृत्त्या’ म्हणून आणि मराठा एज्युकेशन फंडाच्या व्याजातून काही शिष्यवृत्त्या देण्यात येतात, तसेच नेमणूकदार वर्गांच्या मुलांकरताही काही शिष्यवृत्त्या राखून ठेवण्यात आल्या आहेत. याशिवाय दरवर्षी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंड, अमेरिका, जपान इत्यादी देशांत निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी पाठविण्यात येते.’ *(दाते, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-१, १९३३, पृ.५९)*. महाराजांना नेहमीच असे वाटत होते की, इथल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उच्चशिक्षण घेऊन विद्याविभूषित व्हावे, स्वतःबरोबर समाजाची उन्नती करावी. देशसेवा करावी.

सयाजीराव महाराजांनी शिष्यवृत्ती देताना विद्यार्थ्यांमध्ये आणि विषयांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला नाही. य.रा. दाते यांच्या पुढील निवेदनावरून याची कल्पना येते. ‘महाराजांनी आजपर्यंत (इ.स.१९३३) शेतकी, बागाईत, सूपशास्त्र, गायनशास्त्र, घड्याळकाम, विद्युतशास्त्र, यंत्रशास्त्र, मुद्रणकला, शिक्षण, कायदा, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, वेदांत, पुस्तकालये, शिल्प इ. शास्त्रांच्या अध्ययनासाठी व त्या त्या विषयांत प्रावीण्य मिळवण्यासाठी अनेक विद्यार्थी परदेशी पाठवले आहेत व असे लोक तेथून शिकून आल्यानंतर आपल्या ज्ञानाचा फायदा हिंदुस्थानास देत आहेत.’ *(दाते, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-१, १९३३, पृ. ६०)*. महाराजांनी शिष्यवृत्त्या देताना नेहमीच त्या व्यक्तींच्या विकासाचा विचार केला.

महाराज शिष्यवृत्त्या देताना मानवी जीवनाचे कल्याण कशात आहे याचा प्रामुख्याने विचार करत. संस्कृत विषयातील ज्ञान सर्वांना व्हावे यासाठी या विषयांच्या शाळा आणि महाविद्यालये संस्थानात काढली. त्या शाळा आणि महाविद्यालयांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराजांनी शिष्यवृत्त्या दिल्या. त्यासंबंधी त्यांनी काढलेला एक हुजूरहुकूम महत्त्वाचा आहे. ‘संस्कृत पाठशाळा अमूक एका वर्गासाठी नसून हिंदूंतील सर्व जातींसाठी आहे. बडोद्यात संस्कृत पाठशाला या नावाची संस्था काढण्यात आली आहे आणि तत्प्रीत्यर्थ पुष्कळ खर्च करण्यात येत आहे. या संस्थेवर चांगली देखरेख ठेवून विद्यार्थ्यांना तीत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा लाभ चांगल्या प्रकारे मिळू शकेल अशी काळजी ठेविली पाहिजे. या संस्थेचा लाभ अमूक एका जातीलाच न मिळता हिंदूंतील सर्व जातींना मिळाला पाहिजे आणि या उद्देशाने हल्ली दिल्या जात नसलेल्या जातींना पाच पाच रुपयांच्या दहा शिष्यवृत्त्या ठेवून त्या अशा इतर जातींच्या विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. या योजनेचा उद्देश ब्राह्मण वर्गाला हानिकारक नसून त्याला लाभकारकच आहे.’ *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. १२५८)*. शिक्षणाच्या प्रत्येक ज्ञानशाखेत सर्वांना संधी मिळावी यासाठी महाराज नेहमीच प्रयत्नशील असल्याचे दिसते. त्यांनी सर्व जातींना सर्व क्षेत्रातील शिक्षणासाठी संधी दिली. महाराजांचे हे वेगळेपण प्रामुख्याने नजरेत भरते.

सयाजीराव महाराज गादीवर आल्यापासून अनेकांना शिष्यवृत्ती देण्यास प्रारंभ केला. त्यांनी प्रत्येक वर्षी दिलेल्या शिष्यवृत्त्या पुढीलप्रमाणे

### इ.स. १८८०-८१

पूर्वीपासून शिक्षण घेत असलेल्या आणि मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या सहा विद्यार्थ्यांपैकी एका विद्यार्थ्याला दरमहा २० रुपये अशी राज्य शिष्यवृत्ती देण्यात आली. इ.स. १८८०-८१ पूर्वी शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांपैकी एकाने मागील डिसेंबर महिन्यात बी.ए. ची परीक्षा गणित विषयात प्रथम श्रेणी मिळवून उत्तीर्ण केली. एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या फेलोशिपसाठी त्याची निवड झाली होती.

मुंबई विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयामध्ये बडोदा सरकारची शिष्यवृत्ती प्राप्त झालेले सहा विद्यार्थी शिक्षण घेत होते.

## इ.स. १८८१-८२

इ.स. १८८१-८२ साली मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षेत बडोद्यातील दहा विद्यार्थी पात्र झाले. या सर्व दहा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांत प्रवेश घेतला. या दहापैकी पात्र असलेल्या पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी दरमहा पाच रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली.

या वर्षी बडोदा सरकारची शिष्यवृत्ती मिळवणारे चार विद्यार्थी होते. ही शिष्यवृत्ती वीस रुपये प्रति महिना होती आणि हे सगळे विद्यार्थी मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालांमध्ये शिक्षण घेत होते.

## इ.स. १८८२-८३

मुंबई विद्यापीठाने नोव्हेंबर १८८२ मध्ये घेतलेल्या मॅट्रिकच्या परीक्षेत बडोदा हायस्कूलचे दहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या दहापैकी सात विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यातील पात्र पाच विद्यार्थ्यांना प्रति महिना पाच रुपयाप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात आली.

मुंबई विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये बडोद्यातील सहा विद्यार्थ्यांना प्रति महिना वीस रुपये प्रमाणे शिष्यवृत्ती दिली जात होती.

## इ.स.१८८३-८४

मुंबई विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या विविध महाविद्यालयांत बडोद्यातील पाच विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यांना वीस रुपये प्रति महिना सरकारी शिष्यवृत्ती दिली जात होती.

## इ.स. १८८४-८५

मुंबई विद्यापीठात विविध महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या पाच विद्यार्थ्यांना २० रुपये प्रति महिना सरकारी शिष्यवृत्ती दिली जात होती.

दोन वर्षांसाठी दिली जाणारी मेलविल (Melvill) स्मृती शिष्यवृत्ती १८८३ मध्ये ज्या विद्यार्थ्यांना मिळाली होती त्याच विद्यार्थ्यांना पुन्हा देण्यात आली.

## इ.स. १८८५-८६

बडोदा महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या पंधरा विद्यार्थ्यांपैकी पाच विद्यार्थ्यांना पाच रुपये प्रति महिना अशी शिष्यवृत्ती देण्यात आली.

मुंबई विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या इतर महाविद्यालयांत शिक्षण घेत असलेल्या तीन विद्यार्थ्यांना वीस रुपये प्रति महिना अशी सरकारी शिष्यवृत्ती देण्यात आली.

## इ.स. १८८६-८७

बडोदा कॉलेजमध्ये बी.एस्सी. च्या पहिल्या वर्गात शिकणाऱ्या ३ विद्यार्थांना २० रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. प्रिव्हियसच्या वर्गात शिकणाऱ्या ५ विद्यार्थांना ५ रुपयांप्रमाणे २५ रुपये शिष्यवृत्ती देण्यात आली.

माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना ११० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येत होती. त्यामध्ये ५ गुणवंत विद्यार्थ्यांना ५ रुपयांप्रमाणे २५ रुपये शिष्यवृत्ती देण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यातील २५ विद्यार्थ्यांना ३ रुपयांप्रमाणे ७५ रुपयांची शिष्यवृत्तीही देण्यात आली.

व्यायामशाळांमधील विद्यार्थ्यांना १० रुपये प्रमाणे १५५ रुपये शिष्यवृत्ती देण्यात आली. यावर्षी फक्त शिष्यवृत्तीवर १८६० रुपये खर्च करण्यात आले.

## इ.स. १८८७-८८

मॅट्रिक पास झालेल्या २१ विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि ५ विद्यार्थ्यांना ५ रुपये प्रति महिनाप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात आली.

२० रुपये प्रति महिना असणारी सरकारी शिष्यवृत्ती यावर्षी ५ विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यापैकी ४ विद्यार्थी मुंबई विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत होते, तर १ विद्यार्थी सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिक्षण घेत होता.

नेहमीप्रमाणे बडोदा कॉलेजमधून सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याला १८८७ मध्येही मेलविल स्मृती शिष्यवृत्ती देण्यात आली. गणपतराव गायकवाड यांनी सुरू केलेली प्रति महिना २० रुपये असलेली प्रिन्स फत्तेसिंगराव शिष्यवृत्ती मॅट्रिकच्या वर्गात शिकणाऱ्या (मोरारराव गोविंदराव पवार) या मराठा विद्यार्थ्याला देण्यात आली. संपतराव गायकवाड यांनी सुरू केलेली प्रति महिना ८ रुपये असलेली (छगनलाल राधाकृष्ण त्रिवेदी) या गुजराती विद्यार्थ्याला देण्यात आली. दिवाण बहादूर मणीभाई जसभाई यांनी सुरू केलेली प्रति महिना ४ रुपये असलेली 'जसभाई स्मृती शिष्यवृत्ती' देण्यासाठी ए.व्ही. स्कूल पेटलाद येथील एका दात्याने सांगितलेल्या मुलाला देण्यात आली.

कॉलेज आणि हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या आणि बक्षिसांच्या रकमेत यावर्षी कोणताही बदल करण्यात आला नाही. महाराज युरोप दौऱ्यावर असल्यामुळे यावर्षी बक्षीस वितरणाचा कोणताही सार्वजनिक कार्यक्रम घेण्यात आला नाही; परंतु यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे मात्र देण्यात आली.

## इ.स. १८८९-९०

यावर्षी शिष्यवृत्तीसाठी ६८७३ रुपये मंजूर करण्यात आले; परंतु प्रत्यक्षात मात्र ८०६५ रुपये खर्च करण्यात आले. (सविस्तर तपशील उपलब्ध नाही.)

## इ.स. १८९०-९१

यावर्षी २० रुपये प्रति महिना असलेली सरकारी शिष्यवृत्ती मिळवणारे ५ विद्यार्थी होते. त्यापैकी ३ व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट मुंबई, १ ग्रँट मेडिकल कॉलेज तर एक सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिक्षण घेत होता. बी.ए. च्या प्रथम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला मेलविल स्मृती शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. १२ रुपये प्रति महिना असलेली 'देसाई

भाऊसाहेब' शिष्यवृत्ती आणि मुंबई विद्यापीठाच्या वतीने दिली जाणारी १८ रुपये प्रति महिन्याची 'ला टच' (La Touche) शिष्यवृत्ती प्रिव्हियस वर्गातील २ विद्यार्थ्यांना देण्यात आली.

बडोद्याचे माजी दिवाण बहादूर काझी शहाबुद्दीन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येकी ६ रुपयांच्या दोन शिष्यवृत्त्या यावर्षी सुरू करण्यात आल्या. यापैकी एक शिष्यवृत्ती बी.एस्सी. प्रथम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला तर दुसरी शिष्यवृत्ती कृषिविद्या वर्गातील विद्यार्थ्याला देण्यात आली.

डिसेंबर १८९० च्या शेवटापर्यंत ३० रुपये प्रति महिना असलेली प्रिन्स फत्तेसिंगराव शिष्यवृत्ती बी.ए. प्रथम वर्षात शिकणाऱ्या (मोराररराव गोविंदराव पवार) या मराठा विद्यार्थ्याला देण्यात आली.

पुणे डेक्कन असोसिएशनने ३ मराठा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली. त्यापैकी दोघे कॉलेजमध्ये तर एक हायस्कूलमध्ये शिक्षण घेत होता.

नांदोद हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या काही विद्यार्थ्यांना राजपिंपळा संस्थानाची ६ रुपये प्रति महिना असलेली शिष्यवृत्ती देण्यात आली.

८ रुपये प्रति महिना असलेली 'आनंदराव' शिष्यवृत्ती सहाव्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याने पटकावली आणि ४ रुपये प्रति महिना असलेली 'जसभाई स्मृती शिष्यवृत्ती' पनुभाई जसवंतराव या विद्यार्थ्याला मिळाली.

### इ.स. १८९१-९२

२० रुपये प्रति महिना असलेली 'सरकारी' शिष्यवृत्ती सहा विद्यार्थ्यांना मिळाली. त्यापैकी पाच विद्यार्थी मुंबई येथील व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट येथे शिक्षण घेत होते, तर एक ग्रँट मेडिकल कॉलेज येथे शिक्षण घेत होता.

२० रुपये प्रति महिना असलेली 'मेलविल स्मृती शिष्यवृत्ती' प्रिव्हियस वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला देण्यात आली; तर 'भाऊसाहेब देसाई' ही १२ रुपये प्रति महिना असलेली शिष्यवृत्ती आणि मुंबई विद्यापीठाच्या वतीने दिली जाणारी १२ रुपये प्रति महिना असलेली 'The Hebbat and La Touche' शिष्यवृत्ती प्रिव्हियस वर्गात शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना देण्यात आली.

६ रुपये (ब्रिटिश) प्रति महिना असलेली 'काझी शहाबुद्दीन शिष्यवृत्ती ' दोन विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यातील एक विद्यार्थी बी.एस्सी. प्रथम वर्षात तर दुसरा विद्यार्थी कृषिविषयक अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षात शिकत होता. १ जानेवारी १८९२ पासून 'खान बहादूर काझी शहाबुद्दीन ' यांनी प्रति महिना १० रुपये अशी शिष्यवृत्ती सुद्धा प्रिव्हियस वर्गात शिकणाऱ्या गरीब मुसलमान समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुरू केली.

दिवाण बहादूर मणीभाई जसभाई यांनी १० रुपये प्रति महिन्याची शिष्यवृत्ती तीन विद्यार्थ्यांना दिली. यापैकी दोन विद्यार्थी प्रिव्हियसच्या वर्गात तर एक विद्यार्थी कृषिविषयक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्गात शिक्षण घेत होता.

पुणे डेक्कन मराठा असोसिएशनची १२ रुपये प्रति महिन्याची शिष्यवृत्ती प्रिव्हियस वर्गात शिकणाऱ्या एका मराठा विद्यार्थ्याला दिली. प्रति महिना ४ रुपये (बाबाशाई) असलेली 'जसभाई स्मृती शिष्यवृत्ती' सहाव्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याने पटकावली.

इ.स. १८९२-९३

२० रुपये प्रति महिना असलेली सरकारी शिष्यवृत्ती तीन विद्यार्थ्यांना मिळाली. त्यापैकी दोन विद्यार्थी व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट, मुंबई येथे तर एक विद्यार्थी पुणे कॉलेज ऑफ सायन्समध्ये शिकत होता.

इंटरमिजिएट वर्गात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने २० रुपये प्रति महिना असलेली मेलविल स्मृती शिष्यवृत्ती मिळवली. १२ रुपये प्रति महिना असलेली 'देसाई भाऊसाहेब शिष्यवृत्ती' प्रिव्हियस वर्गातील दोन विद्यार्थ्यांना देण्यात आली. ते मुंबई विद्यापीठातील विविध महाविद्यालयांत शिक्षण घेत होते.

कृषिविषयक अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला काझी शहाबुद्दीन शिष्यवृत्ती देण्यात आली. बी.एस्सी. प्रथम वर्षात कोणीही विद्यार्थी पात्र नसल्यामुळे दुसरी शिष्यवृत्ती देण्यात आली नाही.

इंटरमिजिएट वर्गात शिकणाऱ्या एका मराठा विद्यार्थ्याने प्रति महिना १२ रुपये असलेली, पुणे डेक्कन मराठा असोसिएशनच्या वतीने दिली जाणारी शिष्यवृत्ती मिळवली.

बडोदा कॉलेजच्या वतीने दिल्या जाणाऱ्या अनेक शिष्यवृत्त्या खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आल्या.

| वर्ग | शिष्यवृत्त्यांची संख्या | रक्कम |
|---|---|---|
| बी.ए. द्वितीय वर्ष | १० रुपयांच्या तीन | ३० रुपये |
| बी. एस्सी. द्वितीय वर्ष | १० रुपयांच्या दोन | २० रुपये |
| इंटरमिजिएट बी.ए. प्रथम वर्ष | ७ आणि ८ रुपयांच्या दोन | १५ रुपये |
| बी.एस्सी. प्रथम वर्ष | ७ आणि ८ रुपयांच्या दोन | १५ रुपये |
| प्रिव्हियस वर्ग | ५ रुपयांच्या पाच | २५ रुपये |
| कृषिविषयक अभ्यासक्रम | | ६० रुपये |
| एकूण | | १६५ रुपये (प्रति महिना) |

इ.स.१८९३ -९४

२० रुपये प्रति महिना असलेली सरकारी शिष्यवृत्ती चार विद्यार्थ्यांना मिळाली. त्यापैकी तीन विद्यार्थी व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट मुंबई येथे, तर एक विद्यार्थी पुणे कॉलेज ऑफ सायन्स येथे शिकत होता.

२० रुपये प्रति महिना असलेली ‘मेलविल स्मृती शिष्यवृत्ती’ इंटरमिजिएट वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला देण्यात आली, तर १५ रुपये प्रति महिना असलेली ‘सर फँक साउटर’ ही मुंबई विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारी शिष्यवृत्ती त्याच वर्गात शिकणाऱ्या एका मुसलमान विद्यार्थ्याला मिळाली.

गरीब मुसलमान विद्यार्थ्यासाठी १० रुपये प्रति महिना असलेल्या दोन ‘काझी शहाबुद्दीन शिष्यवृत्त्या’ विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. यापैकी एक विद्यार्थी इंटरमिजिएट वर्गात तर दुसरा प्रिव्हियस वर्गात शिकत होता. या शिष्यवृत्त्या डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनतर्फे देण्यात येत असत.

६ रुपये प्रति महिना असलेली ‘काझी शहाबुद्दीन शिष्यवृत्ती’ कृषिविषयक अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला देण्यात आली. बी.एस्सी. प्रथम वर्षात कोणताही विद्यार्थी शिकत नसल्यामुळे दुसरी शिष्यवृत्ती देण्यात आली नाही.

४ रुपये प्रति महिना अशी शिष्यवृत्ती दिवाण मणीभाई जसभाई यांनी प्रिव्हियस वर्गात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याला दिली.

पुणे डेक्कन मराठा असोसिएशनने १२ रुपये प्रति महिना असलेली शिष्यवृत्ती ज्युनिअर बी.ए. वर्गात शिकणाऱ्या एका मराठा विद्यार्थ्याला दिली.

बडोदा कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

| वर्ग | शिष्यवृत्त्यांची संख्या | वर्ग संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| बी.ए | एकूण ३० रुपयांच्या | ३ वर्गासाठी | ३० रुपये |
| इंटरमिजिएट | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | १५ रुपये |
| प्रिव्हियस | ३० रुपयांच्या | ५ वर्गासाठी | २५ रुपये |
| बी.एस्सी. (द्वितीय वर्ष) | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | २० रुपये |
| बी.एस्सी. (प्रथम वर्ष) | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | १५ रुपये |
| कृषिविषयक अभ्यासक्रमासाठी एकूण | | | ६० रुपये |
| एकूण शिष्यवृत्ती | | | १६५ रुपये (प्रति महिना) |

इ.स. १८९४-९५

२० रुपये प्रति महिना असलेली ‘बडोदा राज्य शिष्यवृत्ती’ तीन विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यापैकी एक विद्यार्थी पुणे कॉलेज ऑफ सायन्स येथे तर दोन विद्यार्थी व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट, मुंबई येथे शिकत होते.

महाविद्यालयांसाठी एकूण १६५ रुपये प्रति महिना अशा विविध शिष्यवृत्त्या राज्याच्या वतीने देण्यात आल्या.

बडोदा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

| वर्ग | शिष्यवृत्ती रक्कम | वर्ग संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| बी.ए | एकूण ३० रुपयांच्या | ३ वर्गासाठी | ३० रुपये |
| इंटरमिजिएट | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | १५ रुपये |
| प्रिव्हियस | ३० रुपयांच्या | ५ वर्गासाठी | २५ रुपये |
| बी.एस्सी. (द्वितीय वर्ष) | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | २० रुपये |
| बी.एस्सी. (प्रथम वर्ष) | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | १५ रुपये |
| कृषिविषयक अभ्यासक्रमासाठी | | | ६० रुपये |
| एकूण शिष्यवृत्ती | | | १६५ रुपये (प्रति महिना) |

इतर शिष्यवृत्त्या

काझी शहाबुद्दीन शिष्यवृत्ती आणि पुणे डेक्कन मराठा असोसिएशनच्या वतीने देण्यात येणारी शिष्यवृत्ती देखील बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात आली.

इ.स. १८९५-९६

२० रुपये प्रति महिना असलेली 'मेलविल स्मृती शिष्यवृत्ती', ६० रुपये प्रति सत्र असलेली भाऊसाहेब देसाई आणि ७२ रुपये प्रति सत्र असलेली 'मजुमदार मणीशंकर किकाणी संस्कृत शिष्यवृत्ती' जी मुंबई विद्यापीठाच्या वतीने दिली जात असे ती शिष्यवृत्ती बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात आली.

व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट मुंबई आणि ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना २० रुपये प्रति महिना असलेली प्रत्येकी एक अशी राज्य शिष्यवृत्ती देण्यात आली; तर २५ रुपये प्रति महिना असलेली तिसरी शिष्यवृत्ती एलएल.बी.च्या दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला देण्यात आली.

काझी शहाबुद्दीन यांच्या नावे असलेल्या दोन शिष्यवृत्त्या (रुपये ३० त्रैमासिक), गरीब मुसलमान विद्यार्थ्यांसाठी, डायरेक्टर पब्लिक इन्स्ट्रक्शन मुंबई यांच्यावतीने दिल्या जाणाऱ्या आणि गरीब मराठा विद्यार्थ्यांसाठी पुणे डेक्कन मराठा असोसिएशनच्या वतीने दिली जाणारी शिष्यवृत्ती या सर्व शिष्यवृत्त्या बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी पटकावल्या. या सोबतच १०५ रुपयांच्या एकत्रित १४ शिष्यवृत्त्या आणि ६० रुपयांच्या कृषिविषयक शिष्यवृत्त्यादेखील बडोदा संस्थानतर्फे कॉलेजमध्ये शिकणाऱ्या योग्य विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

इ.स. १८९६-९७

या वर्षी राज्य शिष्यवृत्ती मिळविणारे तीन विद्यार्थी होते. त्यापैकी २० रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती असलेला विद्यार्थी ग्रँट मेडिकल कॉलेज मुंबई, त्याच रकमेची शिष्यवृत्ती असलेला दुसरा विद्यार्थी मुंबई व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट येथे, तर २५ रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती असलेला तिसरा विद्यार्थी एलएल.बी. च्या द्वितीय वर्षात शिकत होता.

कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुढील शिष्यवृत्त्या मिळवल्या. त्यामध्ये 'मेलविल स्मृती शिष्यवृत्ती' १७ रुपये प्रति महिना, 'भाऊसाहेब देसाई दोन शिष्यवृत्त्या' प्रति सत्र ६० रुपये, मजुमदार एम. किकाणी शिष्यवृत्ती ४८ रुपये प्रति सत्र, 'जाम श्री. विभाजी शिष्यवृत्ती' १५ रुपये प्रति महिना, 'राव श्री. प्रगमुलजी शिष्यवृत्ती' २ रुपये प्रति महिना आणि दिवाण मणीभाई 'कच्छ स्मृती शिष्यवृत्ती' ६० रुपये प्रति सत्र या शिष्यवृत्त्या विविध विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मुंबई' यांच्या वतीने दिली जाणारी ३० रुपये त्रैमासिक शिष्यवृत्ती, बडोदा कॉलेजच्या वतीने दिल्या जाणाऱ्या ३६ रुपये प्रति सत्र दोन 'काझी शहाबुद्दीन शिष्यवृत्त्या', 'गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटी, अहमदाबाद'च्या वतीने दिल्या जाणाऱ्या दोन 'काहानदास कालिदास शिष्यवृत्त्या' (३० रुपये आणि १८ रुपये त्रैमासिक) कॅम्बे स्टेटतर्फे दिली जाणारी 'कॅम्बे स्टेट शिष्यवृत्ती' (१० रुपये प्रति महिना) या सर्व शिष्यवृत्त्या बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी पटकावल्या.

बडोदा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्त्या देण्यात आल्या

| वर्ग | शिष्यवृत्ती रक्कम | वर्ग संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| बी.ए | एकूण ३० रुपयांच्या | ३ वर्गासाठी | ३० रुपये |
| इंटरमिजिएट | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | १५ रुपये |
| प्रिव्हियस | ३० रुपयांच्या | ५ वर्गासाठी | २५ रुपये |
| बी.एस्सी. (द्वितीय वर्ष) | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | २० रुपये |
| बी.एस्सी. (प्रथम वर्ष) | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | १५ रुपये |
| कृषिविषयक अभ्यासक्रमासाठी | | | ६० रुपये |
| एकूण शिष्यवृत्ती | | | १६५ रुपये (प्रति महिना) |

इ.स. १८९७-९८

२० रुपये प्रति महिना असलेली 'सरकारी शिष्यवृत्ती' कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना मिळाली. त्यापैकी एक ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये, तर दुसरा व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षण घेत होता. २५ रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती मिळविणारे पाच विद्यार्थी होते. ते सर्व लॉ कॉलेज, मुंबई येथे कायद्याचे शिक्षण घेत होते.

१७ रुपये प्रति महिना असलेली 'मेलविल स्मृती शिष्यवृत्ती,' ६० रुपये प्रति सत्र असलेली 'भाऊसाहेब देसाई शिष्यवृत्ती,' १५ रुपये प्रति महिना असलेली 'जाम श्री विभाजी शिष्यवृत्ती,' ही शिष्यवृत्ती मुंबई विद्यापीठाच्या वतीने दिली जात असे. गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटी अहमदाबादच्या वतीने दिली जाणारी 'काहनदास कालिदास शिष्यवृत्ती,' काझी शहाबुद्दीन तीन शिष्यवृत्त्या, पैकी ३० रुपये प्रति सत्र असलेली, 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मुंबई ' यांच्या वतीने दिली जाणारी ३६ रुपये प्रति सत्र असलेल्या बडोदा कॉलेजच्या वतीने दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळाल्या.

बडोदा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

| वर्ग | शिष्यवृत्ती रक्कम | वर्ग संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| बी.ए | एकूण ३० रुपयांच्या | ३ वर्गासाठी | ३० रुपये |
| इंटरमिजिएट | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | १५ रुपये |
| प्रिव्हियस | ३० रुपयांच्या | ५ वर्गासाठी | २५ रुपये |
| बी.एस्सी.(द्वितीय वर्ष) | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | २० रुपये |
| बी.एस्सी. (प्रथम वर्ष) | ३० रुपयांच्या | २ वर्गासाठी | १५ रुपये |
| कृषिविषयक अभ्यासक्रमासाठी | | | ६० रुपये |
| एकूण शिष्यवृत्ती | | | १६५ रुपये (प्रति महिना) |

अहवालात नमूद केल्याप्रमाणे कृषिविषयक अभ्यासक्रमासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या वर्ग बंद होताच बंद करण्यात आल्या; परंतु बडोदा कॉलेजमधून प्रिव्हियस वर्षाची परीक्षा उत्तीर्ण करून एखाद्या नामांकित कृषिविषयक अभ्यासक्रम शिकवणाऱ्या कॉलेजमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी २० रुपये प्रति महिना अशा दोन शिष्यवृत्त्यांची तरतूद करून ठेवली होती.

## इ.स. १८९८-९९

राज्य शिष्यवृत्ती मिळवणारे पाच विद्यार्थी बडोदा संस्थानाच्या बाहेर असणाऱ्या विविध शिक्षण संस्थांमध्ये शिकत होते. २५ रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती असलेले तीन विद्यार्थी मुंबई लॉ स्कूल येथे कायद्याचे शिक्षण घेत होते; आणि २० रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या इतर दोघांपैकी एक कॉलेज ऑफ सायन्स पुणे, तर दुसरा मुंबई येथील व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट येथे शिकत होता.

१७ रुपये प्रति महिना असलेली 'मेलविल स्मृती शिष्यवृत्ती' आणि नंतर ६० रुपये प्रति सत्र असलेली शिष्यवृत्ती मुंबई विद्यापीठातील विविध महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आली.

भाऊसाहेब देसाई शिष्यवृत्ती, डायरेक्टर पब्लिक इन्स्ट्रक्शन मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारी आणि काझी शहाबुद्दीन दोन शिष्यवृत्त्या (एक ३० रुपये त्रेमासिक आणि दुसरी ४५ रुपये त्रैमासिक), गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटी, अहमदाबादच्या वतीने दिली जाणारी १५ रुपये त्रैमासिक 'कानदास कालिदास शिष्यवृत्ती' या सर्व शिष्यवृत्त्या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना  मिळाल्या. शिवाय बडोदा कॉलेजतर्फे दिली जाणारी ३६ रुपये प्रति सत्र असलेली 'काझी शहाबुद्दीन शिष्यवृत्ती' दोन विद्यार्थ्यांना मिळाली.

१०५ रुपये एकत्रित असलेली राज्य शिष्यवृत्ती कॉलेजमध्ये वेगवेगळया वर्गात शिकणाऱ्या १४ विद्यार्थ्यांना मिळाली.

## इ.स. १८९९-१९००

१७ रुपये प्रति महिना असलेली 'मेलविल स्मृती शिष्यवृत्ती', १५ रुपये प्रति महिना असलेल्या तीन 'काझी शहाबुद्दीन शिष्यवृत्त्या', डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मुंबई यांच्यातर्फे दिली जाणारी आणि बडोदा कॉलेजतर्फे दिल्या जाणाऱ्या ६ रुपये प्रति महिना असलेल्या दोन शिष्यवृत्त्या, अहमदाबाद येथील 'गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटी'च्या वतीने दिली जाणारी ६ रुपये प्रति महिना असलेली 'काहनदास कालिदास शिष्यवृत्ती' आणि 'डेक्कन मराठा असोसिएशन पुणे'तर्फे दिली जाणारी १२ रुपये प्रति महिना असलेली मराठा शिष्यवृत्ती या सर्व शिष्यवृत्त्या बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी पटकावल्या.

१०५ रुपये एकत्रित असलेली राज्य शिष्यवृत्ती कॉलेजमध्ये वेगवेगळया वर्गात शिकणाऱ्या १४ विद्यार्थ्यांना मिळाली.

## इ.स. १९००-०१

राज्य शिष्यवृत्ती मिळवणारे आठ विद्यार्थी कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. २० रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती असलेले तीन विद्यार्थी कॉलेज ऑफ सायन्स पुणे येथे, २० रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती असलेला एक विद्यार्थी व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट मुंबई येथे, २५ रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती असलेले २ विद्यार्थी नाईट स्कूल ऑफ कॉमर्स मुंबई येथे शिक्षण घेत होते, तर २५ रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती असलेले दोन विद्यार्थी लॉ स्कूल मुंबई येथे शिकत होते.

१७ रुपये प्रति महिना असलेली 'मेलविल स्मृती शिष्यवृत्ती', १५ रुपये प्रति महिना असलेली डी.बी. मणीभाई जसभाई 'कच्छ स्मृती शिष्यवृत्ती ', १४-४-० प्रति महिना असलेली 'सयानी खोजा शिष्यवृत्ती', ६-४-० प्रति महिना असलेली मुंबई विद्यापीठाच्या वतीने दिली जाणारी 'उत्तमराव स्मृती शिष्यवृत्ती', दोन काझी शहाबुद्दीन शिष्यवृत्त्या, डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन, मुंबई यांच्यातर्फे दिली जाणारी १५ रुपये प्रति महिन्याची शिष्यवृत्ती आणि बडोदा कॉलेजच्या वतीने दिली जाणारी ६ रुपये प्रति महिन्याची शिष्यवृत्ती, बडोदा संस्थानातर्फे दिली जाणारी सयाजी शिष्यवृत्ती (२० रुपये प्रति महिना), ४ रुपये प्रति महिना असलेल्या श्री. हिमतलाल शिवलाल यांच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या दोन शिष्यवृत्त्या. या सर्व शिष्यवृत्त्या बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळाल्या.

१०५ रुपये एकत्रित असलेली राज्य शिष्यवृत्ती कॉलेजमध्ये वेगवेगळया वर्गात शिकणाऱ्या १४ विद्यार्थ्यांना मिळाली.

## इ.स. १९०२-०३ आणि इ.स. १९०३-०४

गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेता यावे या हेतूने संस्थानातर्फे मुबलक प्रमाणात शिष्यवृत्त्या देण्यात येत असत. हायस्कूलमध्ये शिक्षण सुरू ठेवण्यासाठी २-८-० या प्रमाणे एक वर्षासाठी असलेल्या ४२ शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. बडोदा हायस्कूलमधील पाच गुणवंत विद्यार्थ्यांना ४ रुपये प्रति महिना आणि ८ प्रति महिन्याच्या वीस जिम्नॅस्टिक शिष्यवृत्त्यासुद्धा देण्यात आल्या.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ४ रुपये आणि ८ रुपये प्रत्येकी असलेल्या ८ शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. विविध परीक्षांमध्ये सर्वोच्च गुण मिळवणाऱ्या बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ११ रुपये आणि २२ रुपये प्रत्येकी असलेल्या १४ शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. पुणे आणि मुंबई येथे विज्ञान आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी प्रत्येकी २० रुपये अशा शिष्यवृत्त्या दिल्या.

मुसलमान समाजाला शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने प्रत्येकी २० रुपये असलेल्या तीन शिष्यवृत्त्या मुसलमान विद्यार्थ्यांसाठी देण्यात आल्या. अतिमागास (अंत्यज) जातीतील लोकांना शिक्षण घेण्यासाठी उत्तेजन देण्याच्या हेतूने तीन शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. आणि महाराजांच्या खानगी निधीतून दरवर्षी ६२ विद्यार्थ्यांना ९,२२८ रुपयांच्या शिष्यवृत्त्या मिळत असत. याशिवाय विविध निधींद्वारे सुद्धा स्मृती शिष्यवृत्ती, काझी शहाबुद्दीन स्मृती शिष्यवृत्ती, इलियट स्मृती शिष्यवृत्ती, जसभाई स्मृती नागर शिष्यवृत्ती आणि श्रीमंत सयाजीराव शिष्यवृत्ती इ.चा समावेश होता. या विविध विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

## परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

संस्थानाच्या खर्चाने युरोपमध्ये शिक्षण घेण्यासाठी पाठवलेल्या मान्यवरांमध्ये रावजीभाई भाईलाल पटेल (कृषी खात्याचे संचालक), रावजीभाई मोतीभाई पटेल (टेक्निकल इन्स्टिट्यूटचे प्राचार्य), मोतीभाई बी. पटेल (एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, कडी), मेदवीला गुस्तादजी (फॉरेस्ट कन्झर्व्हेटर) आणि अमीन काशीभाई चतुरभाई (उप फॉरेस्ट कन्झर्व्हेटर) यांचा समावेश होता. महाराजांनी त्यांच्या खानगी निधीतून खर्च करून युरोपला शिक्षण घेण्यासाठी पाठवलेल्या मान्यवरांचा वरील यादीत समावेश नाही. त्यामध्ये बडोदा, नवसारी आणि अमरेली येथे सध्या कार्यरत असलेल्या जिल्हा अधिकाऱ्यांचा समावेश होता.

## इ.स. १९०४-०५

बडोदा कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी २२ शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. त्यापैकी १७ संस्थानांतर्फे तर बाकी पाच विविध प्रकारच्या निधींद्वारे देण्यात आल्या. मुसलमान समाजात शिक्षणाचा

प्रसार आणि प्रचार होण्यासाठी २० रुपयांच्या तीन शिष्यवृत्त्या (प्रत्येकी २०) महाराजांच्या नावाने मुसलमान विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवल्या होत्या.

संस्थानामध्ये आणि संस्थानाबाहेर असलेल्या विविध शैक्षणिक संस्थांना महाराजांनी त्यांच्या खानगी निधीतून ६९६ प्रति महिना अशा एकत्रित अनेक शिष्यवृत्त्या दिल्या. या शिष्यवृत्त्यांच्या आधारे यावर्षी चार विद्यार्थी बी.ए. पास झाले तर एक विद्यार्थी एल.एम.अँड एस. परीक्षा पास झाला. या शिष्यवृत्त्यांशिवाय मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी डेक्कन मराठा असोसिएशन पुणे या संस्थेला २४०० रुपये देण्यात आले. अहवालात नमूद केल्याप्रमाणे या वर्षी ११,३९७ रुपये इतकी रक्कम खानगी शिष्यवृत्त्यांसाठी खर्च करण्यात आली.

## परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

यावर्षी विविध उपयुक्त विषय शिकण्यासाठी पाच विद्यार्थ्यांना भारताबाहेर पाठवण्यात आले होते. त्यामध्ये नंदनाथ के. दीक्षित (इंग्लंड) आणि एम. पिनाकीप्रसाद एम. देसाई (अध्यापनशास्त्र, अमेरिका) एम.आर. घडियाळी (प्लंबिग आणि सॅनिटेरी इंजिनिअरिंग , मँचेस्टर)  जयराम जे. सावंत आणि वासुदेव जी. गोखले (इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग  आणि मार्इिंनग आणि मेटालर्जी, जपान) शिकण्यासाठी पाठवण्यात आले होते. अमेरिका आणि इंग्लंडच्या शिक्षणासाठी पाठवलेल्या मान्यवरांना £ १५० इतका प्रति महिना शैक्षणिक खर्च देण्यात आला. जपानला शिक्षणासाठी पाठवलेल्या मान्यवरांना ७५ रुपये प्रति महिना देण्यात आला. पुण्याचे एस.बी. जठार (आम्ल, क्षार आणि लवण तयार करण्याची प्रक्रिया शिकण्यासाठी)  इंग्लंडला गेले. त्यांना £ ८ प्रति महिना शिष्यवृत्ती देण्यात आली.

## इ.स. १९०६-०७

संस्थानामध्ये आणि संस्थानाबाहेर असलेल्या विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराजांच्या खानगीतून दरमहा ८२४ रुपयांच्या एकत्रितपणे विविध शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. मागील वर्षी ५१ विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्त्यांचा लाभ घेतला. यापैकी ४४ मुले तर ७ मुली होत्या. याशिवाय मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी पुणे येथील डेक्कन मराठा असोशिएशनला २,४०० रुपये देण्यात आले. अहवालात म्हटल्याप्रमाणे यावर्षी या स्त्रोताद्वारे शिष्यवृत्त्यांसाठी १०,१७४ रुपये खर्च करण्यात आले.

## परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

यावर्षी कोणत्याही नवीन विद्यार्थ्याला परदेशी शिक्षणासाठी पाठवण्यात आले नव्हते. जुन्या सहा विद्यार्थ्यांची प्रगती समाधानकारक होती. यावर्षी त्यांच्या शिक्षणासाठी १५,६२८ रुपये खर्च करण्यात आले.

टेक्निकल (तांत्रिक) आणि आर्टस् (कला) संस्थांमध्ये उच्चशिक्षण घेण्यासाठी सरकारने सोनार, लोहार आणि सुतार समाजातील प्रत्येकी दोन विद्यार्थी पाठवण्याचे आदेश दिले.

काचलेपनाचे काम शिकण्यासाठी एकाला जयपुरला पाठवण्यात आले. इतर समाजातील विद्यार्थ्यांची सुद्धा निवड करण्यात आली.

## इ.स. १९०७-०८

कॉलेज आणि हायस्कूलमधील विविध संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी त्यांच्या खानगीतून ६३५ रुपये शिष्यवृत्या दिल्या. देशी भाषांच्या शाळांमध्ये नियमितपणे अशा ४२ शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. यापैकी सात शिष्यवृत्त्या मुलींनी तर उर्वरीत सर्व मुलांनी पटकावल्या. याशिवाय मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी पुणे येथील डेक्कन मराठा असोशिएशनला १९४० रुपये देण्यात आले. यावर्षी विविध स्रोताद्वारे शिष्यवृत्त्यांसाठी एकूण १०,७८१ रुपये खर्च करण्यात आले.

## परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

इंग्लंडमध्ये प्लंबिग आणि सॅनिटरी इंजिनिअरिंग शिकणारा एक विद्यार्थी, दोन जपानमध्ये, एक इलेक्ट्रिक इंजिनिअरिंग शिकणारा तर, दूसरा मायिंनग आणि मेटालर्जी शिकणारा, इंग्लंडमध्ये आणखी एक विद्यार्थी वास्तुशास्त्र शिकत होता. तर दोन बंगाली विद्यार्थी तिथेच अध्ययन करत होते. त्यांना कलकत्ता येथील डॉ. बोस यांचे मार्गदर्शन लाभले होते. काही उपयुक्त तांत्रिक कला शिकण्यासाठी सहा विद्यार्थ्यांना भारतातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये पाठवण्यात आले होते. यासाठी एकूण १६,४१२-४-१ इतकी शिष्यवृत्ती देण्यात आली.

हायस्कूल मधील दोन शिक्षकांना मुंबई येथील 'माध्यमिक टीचर्स कॉलेज'मध्ये शिक्षणासाठी पाठवण्यात आले होते, दोन शिक्षकांना मुंबईत 'सिनिअर टिचर्स सर्टिफिकेट डिप्लोमा' करण्यासाठी तर दोन शिक्षकांना मद्रासला पदवी घेण्यासाठी पाठवण्यात आले होते.

## इ.स. १९०८ -०९

महाराजांनी त्यांच्या खानगीतून ६४५ रुपयांच्या एकत्रित शिष्यवृत्त्या विविध संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिल्या. कॉलेज, हायस्कूल आणि अँग्लो व्हर्नाक्युलर शाळांमध्ये ४१ मासिक (६४५ रुपयांमधून) शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. यापैकी सात शिष्यवृत्त्या मुलींनी तर उरलेल्या मुलांनी पटकावल्या.

डेक्कन मराठा असोशिएशन पुणे या संस्थेला मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी २,४०० रुपये देण्यात आले. पुणे येथील सायन्स कॉलेजमध्ये शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना तर तेथेच शेतकी महाविद्यालयात शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना आणि मुंबई येथील मेडिकल कॉलेज (वैद्यकीय महाविद्यालय) मध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती देण्यात आली.

## परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

यावर्षाखेर इंग्लंडमध्ये वास्तुशास्त्र शिकणारा एक विद्यार्थी, जपानमध्ये इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग , मायिंनग आणि मेटालर्जी शिकणारे दोन विद्यार्थी, इंग्लंडमध्ये संशोधनाचे कार्य करणारे दोन बंगाली विद्यार्थी तर अमेरिकेमध्ये अध्यापनशास्त्र, वाणिज्य आणि भाषारचनाशास्त्र शिकणारे तीन विद्यार्थी होते. वैद्यकीय शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी मुंबई विद्यापीठातील एकाला एप्रिल १९०८ मध्ये इंग्लंडला पाठवण्यात आले होते.

भारतातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेण्यासाठी पाठवण्यात आलेल्या सहा विद्यार्थ्यांनी त्यांचे शिक्षण सुरू ठेवले. हे विद्यार्थी तांत्रिक कलाचे शिक्षण घेण्यासाठी गेले होते. या सर्वांसाठी २९,२०६ इतका खर्च आला. L.T. (एल.टी.)ची पदवी मिळवण्यासाठी बडोदा हायस्कूलच्या दोन पदवीधर शिक्षकांना मद्रास ट्रेनिंग कॉलेज (सैदापेट) येथे पाठवण्यात आले होते. इतर दोन पदवीधर शिक्षकांना मुंबई ट्रेनिंग कॉलेज येथे सिनिपर टिचर्स सर्टिफिकेट डिप्लोमा करण्यासाठी पाठवण्यात आले. या सर्वांचा खर्च संस्थानतर्फे करण्यात आला.

## इ.स. १९०९-१०

विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी त्यांच्या खानगीतून एकत्रित ६६३ रकमेच्या शिष्यवृत्त्या प्रदान केल्या. कॉलेज, हायस्कूल आणि अँग्लो व्हर्नाक्युलर शाळांममधील विद्यार्थ्यांसाठी ३८ मासिक शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. (६६३ रुपयांमधून) यापैकी आठ शिष्यवृत्त्या मुलींनी तर बाकीच्या मुलांनी मिळवल्या. पुणे येथील डेक्कन मराठा असोशिएशनला मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी २,४०० रुपये देण्यात आले. कॉलेज ऑफ सायन्स पुणे येथे शिकणाऱ्या बडोद्यातील विद्यार्थ्यांना चार शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. पुणे येथील शेतकी महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना तर मुंबई येथील वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती देण्यात आली.

## परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

वर्षाच्या शेवटी इंग्लंडमध्ये वास्तुशास्त्राचा अभ्यास करणारा एक विद्यार्थी होता, जपानमध्ये दोन विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यातील एक इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास करत होता तर दूसरा मायिंनग आणि मेटालर्जीचा करत होता. अमेरिकेत दोन विद्यार्थी होते. एक अध्यापनशास्त्र तर दुसरा व्यावसायिक विज्ञान शिकत होता. एल.एम. ॲण्ड एस. लंडनमध्ये एम.डी. परीक्षेची तयारी करत होता. भारतात तांत्रिक संस्थांमध्ये शिक्षण घेण्यासाठी सहा विद्यार्थी पाठवले होते. या सगळयांसाठी या वर्षी ३३,७२६ रुपये खर्च आला, तोच खर्च मागील वर्षी २९,२०६ रुपये इतका आला होता.

नेहमीप्रमाणे दोन पदवीधर शिक्षकांना एल.टी. ची पदवी प्राप्त करण्यासाठी मद्रास ट्रेनिंग कॉलेज (सैदापेट) येथे, तर इतर दोघांना माध्यमिक टिचर्स ट्रेनिंग कॉलेज, मुंबई येथे सिनिअर टिचर्स सर्टिफिकेट डिप्लोमा करण्यासाठी पाठवण्यात आले होते.

## इ.स. १९१०-११

एकत्रित ५८६० रुपयांच्या शिष्यवृत्त्या कॉलेज, हायस्कूल आणि अँग्लो व्हर्नाक्युलर शाळांमध्ये देण्यात आल्या. ही रक्कम वार्षिक आहे. ५६४ रुपयांच्या ३२ शिष्यवृत्त्या महाराजांनी आपल्या खानगी निधीतून विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिकणाऱ्या गरीब मुलांसाठी दिल्या. त्यापैकी सात मुलींना तर उर्वरित मुलांना मिळाल्या. याशिवाय नेहमीप्रमाणे मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी डेक्कन मराठा असोसिएशन पुणे या संस्थेला २,४०० रुपये देण्यात आले. यावर्षी खानगी शिष्यवृत्त्यांच्या रूपाने दिलेली एकूण रक्कम १०,२८८ रुपये होती.

## परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

वर्षअखेरीस, इंग्लंडमध्ये वास्तुशास्त्राचा अभ्यास करणारा एक L.C.E. पदवीधर. एक L.M.S लंडनमध्ये M.B. परीक्षेची तयारी करणारा आणि अध्यापनशास्त्राचा अभ्यास करणारा एक विद्यार्थी अमेरिकेत होता. डॉ. बम्पस यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेण्यासाठी एस.एम. पगार यांना कोलंबिया विद्यापीठात पाठवण्यात आले होते. जपानला विशेष अभ्यासासाठी पाठवण्यात आलेले मेसर्स सावंत आणि गोखले त्यांचा अभ्यास यशस्वीपणे पूर्ण करून बडोद्यात परतले. सावंत यांचे बडोदा येथील एक्झिक्युटिव्ह इंजिनिअरिंगचे मूळ पद कायम राखण्यात आले. भारतातील विविध तांत्रिक संस्थांमध्ये शिक्षण घेण्यासाठी पाठवण्यात आलेल्या ६ कलाकारांपैकी ५ जण अभ्यासक्रम पूर्ण करून परतले तर एका कलाकारास मुदतवाढ देण्यात आली होती. नेहमीप्रमाणे दोन पदवीधर शिक्षकांना (सैदापेट) येथे पदवी घेण्यासाठी आणि दोन जणांना सिनिअर टिचर्स सर्टिफिकेट घेण्यासाठी मुंबई येथील माध्यमिक टिचर्स ट्रेनिंग कॉलेज येथे पाठवण्यात आले.

## इ.स १९११-१२

कॉलेज, हायस्कूल आणि अँग्लो व्हर्नाक्युलर शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्यांची एकत्रित वार्षिक रक्कम ५६२० रुपये इतकी होती. महाराजांच्या खानगी निधीतून विविध संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांसाठी मासिक ४४ रु. रकमेच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. मुंबई प्रेसिडेन्सी विभागातील गरीब विद्यार्थ्यांसाठी या शिष्यवृत्त्यांची तरतूद करण्यात आली. यापैकी तीन शिष्यवृत्त्या मुलींनी मिळवल्या तर उर्वरित मुलांनी मिळवल्या होत्या. याशिवाय नेहमीप्रमाणे मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होण्याच्या हेतूने पुणे येथील डेक्कन मराठा असोसिएशनला २,४०० रुपये देण्यात आले. महाराजांनी त्यावर्षी दिलेल्या खानगी शिष्यवृत्त्यांची रक्कम ९२३० रुपये इतकी होती. महाराणींनीसुद्धा स्वखुशीने गरीब मराठा शिलेदार विद्यार्थ्यांसाठी ७ रुपयांच्या १२ शिष्यवृत्त्यांची तरतूद केली. त्यामुळे एकूण ८४० रुपये खर्च करण्यात आले.

## परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

असोसिएशन ऑफ रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ ब्रिटिश आर्किटेक्ट, इंग्लंड येथे पाठवण्यात आलेले अभियांत्रिकी पदवीधर शिक्षण पूर्ण करून भारतात परत आले. मुंबईत पदवी परीक्षा उत्तीर्ण करणारा वैद्यकीय शाखेचा विद्यार्थी लंडनमधील M.B. परीक्षेची तयारी करू शकला. तसेच विस्कॉंसिन विद्यापीठात डॉ. बम्पस यांच्या मार्गदर्शनाखाली एक विद्यार्थी कला शाखेच्या वर्गात शिकू शकला. कृषिविषयक अभ्यासक्रम शिकण्यासाठी एक विद्यार्थी इंग्लंडला जाऊ शकला. हा विद्यार्थी इंग्लंडला स्वखर्चाने शिक्षणासाठी गेला असून विभाग केवळ त्याच्या अभ्यासाचे निरीक्षण करणार होते.

भारतातील विविध तांत्रिक संस्थांमध्ये शिक्षण घेण्यासाठी पाठवलेल्या सहा कलावंत विद्यार्थ्यांपैकी एक विद्यार्थी मुंबई स्कूल ऑफ आर्टमध्ये पुढील शिक्षण घेत होता, तर पाच विद्यार्थी परत आले होते. नेहमीप्रमाणे इंग्रजी शिक्षण विभागातील दोन पदवीधर शिक्षकांना मद्रास ट्रेनिंग कॉलेज (सैदापेट) येथे प्रशिक्षणासाठी, तर आणखी दोन जणांना माध्यमिक टिचर्स सर्टिफिकेट परीक्षा देण्यासाठी पाठवण्यात आले.

## इ.स. १९१२-१३

कॉलेज आणि माध्यमिक शाळा (संस्थानातील) यांमध्ये एकूण ५,६२० रुपयांच्या वार्षिक शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. त्यासोबतच महाराजांच्या खानगीतून सर्वच जाती-धर्मातील गरीब २४ विद्यार्थ्यांना मासिक ५०८ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. नियम म्हणून महाराजांद्वारे गुणवंतांची निवड केली गेली. यापैकी तीन शिष्यवृत्त्या मुलींनी तर उर्वरित सर्व मुलांनी पटकावल्या. बडोद्यातील गरीब मराठा शिलेदारांच्या मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी महाराणीसाहेब ७ रुपयांच्या एकूण १२ शिष्यवृत्त्या दर वर्षाला देत असत. याशिवाय महाराजांनी स्वखुशीने १,००,००० रुपयांच्या कायम निधीची तरतूद, मराठा एज्युकेशन फंड या नावाने केली. याद्वारे मिळणाऱ्या व्याजातून अ) बडोद्यामध्ये राहणाऱ्या मराठा मुलामुलींना शिष्यवृत्ती देण्यात येते. ब) बडोदा संस्थानाबाहेर राहणाऱ्या मराठा मुलांच्या शिक्षणासाठी पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीला २,४०० रुपये देण्यात येत. आणि ड) मराठा शिक्षण परिषदेच्या सचिवांना ४५० रुपये देण्यात येत. या वर्षभरात मराठा मुलांच्या शिक्षणासाठी (शिष्यवृत्ती) १,१६० रुपये, डेक्कन मराठा असोसिएशनला २,४०० रुपये आणि मराठा शिक्षण परिषदेला ४७५ रुपये देण्यात आले.

हिंदू स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी महाराणींनी १,००,००० रुपयांच्या निधीची तरतूद केली होती. 'हिंदू स्त्री उन्नती फंड' असे या निधीला नाव देण्यात आले होते; आणि संस्थानातील हिंदू मुलींच्या इंग्रजी आणि उच्च शिक्षणासाठी या फंडातून शिष्यवृत्त्या देण्यात येत असत. या फंडातील पैशाचा उपयोग योग्य पद्धतीने होण्यासाठी महाराणींनी ट्रस्टी आणि मान्यवरांची एक समिती स्थापन केली होती आणि शिष्यवृत्त्या देण्यासाठी नवीन नियम आणि कायदेही बनवण्यात आले होते.

### परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

वास्तुशास्त्र शिकण्यासाठी इंग्लंडला पाठवण्यात आलेले अभियांत्रिकीचे विद्यार्थी पाच वर्षांनंतर भारतात परतले. रॉयल इन्स्टिटयूट ऑफ ब्रिटिश आर्किटेक्ट या संस्थेमधून यशस्वीपणे अभ्यासक्रम पूर्ण करून आता त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागात आपले योगदान दिले होते. वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी पाठवण्यात आलेला एक विद्यार्थी लंडनला एम.डी. परीक्षाही पास झाला. डॉ. बम्पस यांच्या मार्गदर्शनाखाली एका मराठा विद्यार्थ्याने अमेरिकेतील विस्कॉंसिन विद्यापीठात कला विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. तसेच शेतीविषयक अभ्यासक्रम शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने व्यावहारिक बागकामाचा अभ्यासक्रम, इंग्लंडमधील नर्सरी, म्हणजेच रोपवाटिका आणि सार्वजनिक उद्यानांमध्ये काम करून पूर्ण केला.

या दरम्यान या वर्षात महार समाजातील एका विद्यार्थ्याला 'finance and accounts' हा विषय शिकण्यासाठी अमेरिकेला पाठवण्यात आले. त्या विद्यार्थ्याने कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला होता. संस्थानच्या ग्रंथालय संचालकांच्या सहाय्यकांनाही ग्रंथालय व्यवस्थापन, प्रशासन आणि वर्गीकरण शिकण्यासाठी युरोप आणि अमेरिकेला पाठवण्यात आले होते.

## इ.स. १९१३-१४

### स्त्रियांच्या प्रगतीसाठी निधी (फंड)

अत्यंत दानशूर असलेल्या महाराणींनी हा फंड सुरू केला होता. १,००,००० रुपये असलेला 'स्त्री उन्नती फंड' एका ट्रस्टद्वारे तयार करण्यात आला. दात्यांनी त्या संदर्भातील कागदपत्रांवर सह्या केल्या. दात्यांनी सुचवल्याप्रमाणे ट्रस्टी नेमण्यात आले. अहवालाचे वर्ष पूर्ण होण्यापूर्वी ती कागदपत्रे प्रथम ट्रस्टी (विश्वस्त) कुमार जयसिंगराव यांना देण्यात आले होते.

### परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

या वर्षात एका दख्खनी विद्यार्थ्याला पदवीसाठी इंग्लंडला अध्यापनशास्त्र शिकण्यासाठी पाठवण्यात आले. तीन मराठा विद्यार्थ्यांना सामान्य शिक्षण घेण्यासाठी, एका शेतीविषयक पदवीधराला (कृषी पदवीधराला) विस्कॉंसिनला, तर एका मराठा महिलेला अध्यापनशास्त्र शिकण्यासाठी अमेरिकेला, तर एका मराठा पदवीधराला अमेरिका आणि युरोपला सामान्य अर्थशास्त्र आणि वित्तशास्त्र शिकण्यासाठी पाठवण्यात आले. या मान्यवरांना सरकारी खर्चाने शिक्षणासाठी पाठवण्यात आले. सरकारी खर्चाने परदेशी शिक्षण घेणाऱ्या मान्यवरांची संख्या या वर्षाअखेरीस १४ होती. विविध शाखांमध्ये परदेशी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी '' 'कर्ज शिष्यवृत्त्या' देण्याचे काही नियम या वर्षात तयार करण्यात आले.

## इ.स. १९१४-१५

विद्यापीठाच्या टिचर्स कॉलेजमध्ये अध्यापनशास्त्र शिकण्यासाठी पाठवण्यात आलेल्या कु. राधाबाई पवार या होतकरू विद्यार्थीनीने दोन वर्षांसाठी असलेली रु. १५० प्रति वर्ष असलेली 'कॉलेज स्टुडन्टशिप' मिळवली.

## परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

नागरी सेवा आणि इतर उच्च दर्जाच्या परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी युरोपला जाण्यासाठी कर्ज शिष्यवृत्त्यांचे वितरण करण्याच्या हेतूने अर्ज मागवण्यात आले होते. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या कोणत्याही पदवीधराने अर्ज केला नसल्यामुळे ही कर्ज शिष्यवृत्ती देण्यात आली नाही; परंतु गुप्ता यांना स्पेशल केस म्हणून शिष्यवृत्ती शिवाय ६५०० रुपये कर्ज देण्यात आले. शिष्यवृत्तीचे सर्व नियम लागू करून; परंतु साडेतीन टक्क्यांचे व्याज लावून ही रक्कम देण्यात आली.

## इतर शिष्यवृत्त्या

बडोदा कॉलेज आणि माध्यमिक स्कूलमध्ये दिल्या जाणाऱ्या वार्षिक शिष्यवृत्त्यांची रक्कम ३,३८९ रुपये होती. पुणे कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर (शेती कॉलेज), पूना फर्ग्युसन कॉलेज, ग्रँट मेडिकल कॉलेज आणि सिडनेहॅम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ४,६६० रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. ७००० रुपयांच्या वार्षिक निधीतून महाराजांनी सुरू केलेल्या खानगी शिष्यवृत्तीद्वारे ३,६२५ रुपये देण्यात आले. या शिष्यवृत्त्यांसाठी १४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यापैकी एक मुलगी होती.

महाराजांनी स्थापन केलेल्या १,००,००० रुपयांच्या मराठा फंडातील व्याजाद्वारे बडोदा आणि बडोद्याबाहेरील मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जात होत्या. शिलेदारांच्या गुणवान मुलांना महाराणी साहेबांनी १,०४४ रुपये वार्षिक रक्कम असलेल्या १२ शिष्यवृत्त्या दिल्या. यावर्षी शिक्षण घेणाऱ्या मुलांना शिष्यवृत्त्या दिल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

## सन १९१०-११ ते १९१४ -१५ सालांत विद्योत्तेजनाबद्दल दिलेल्या रकमा

'१,५०,००० किमतीचे मुंबई पोर्टस स्टर्लिंग लोनपैकी रु. १,२५,००० मराठी विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती व रुपये २५,००० मराठा शिक्षण परिषदेमार्फत मागासलेल्या मराठे लोकांत विद्येचा प्रसार करण्याकरिता शिष्यवृत्ती देण्याचे फर्माविण्यात आले. रुपये २,००,००० एतद्देशीय साहित्य (Vernacular Literature) फंडाकडेस तीन टक्के दराच्या प्रॉमिटरी नोटा.' आणि '१,००,००० हिंदू स्त्रियांच्या उन्नती फंडाकडेस अमृतसर पार्टी रेल्वेचे शेअर्स २०,००० विद्यानिवेदिक दीनसंरक्षण संघ, मच्छलीपट्टण या संस्थेस बडोदा बँकेतील फिक्स्ड डिपॉझिट; याप्रमाणे एकंदर रुपये ६,२०,००० देणगी दिली.' *(सरदेसाई, १९२५, पृ.२७३-२७४)*.

## इ.स. १९१५-१६

### कर्जरूपी शिष्यवृत्त्या

या शिष्यवृत्त्या देण्यासाठी कोणताही प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेला पदवीधर पात्र ठरला नसला तरीही अमेरिकेत शिक्षण घेणाऱ्या नानक, मेहता यांची या शिष्यवृत्तीसाठी सरकारकडे शिफारस करण्यात आली.

बडोदा कॉलेज आणि माध्यमिक स्कूल (बडोदा संस्थानातील) यांना देण्यात आलेल्या शिष्यवृत्त्यांची वार्षिक रक्कम ५,०५४ रुपये होती. यामध्ये फर्ग्युसन कॉलेज पुणे, सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स, मुंबई ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ११० रुपये प्रति महिना, तर महाराजांनी सुरू केलेल्या खानगी शिष्यवृत्त्यांसाठी ४५१ रुपये देण्यात आले. ही सर्व रक्कम ७,००० रुपयांच्या वार्षिक निधीतून खर्च करण्यात आली. महाराजांनी २६ गुणवंतांची निवड केली. त्यापैकी दहा मुली होत्या. बडोदा संस्थानात आणि बाहेर शिकणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी स्थापन केलेल्या १,००,००० रुपयांच्या फंडावर मिळणाऱ्या व्याजातून शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. शिलेदारांच्या हुशार मुलांसाठी महाराणी साहेबांनी वार्षिक १,०४४ रुपयांच्या १२ शिष्यवृत्त्यांची तरतूद केली. शेवटच्या शिष्यवृत्तीचे व्यवस्थापन १ सप्टेंबर १९१५ पासून खानगी विभागाकडे देण्यात आले.

### इ.स.१९१६-१७

बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळा (बडोदा संस्थानातील) यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्यांची वार्षिक रक्कम ६,९८४ रुपये होती. यामध्ये ९० रुपयांच्या मासिक शिष्यवृत्त्या फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे आणि सिडनेहॅम कॉमर्स कॉलेज, मुंबई येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. यासोबतच महाराजांनी सुरू केलेल्या खानगी शिष्यवृत्त्यांद्वारे ६,६२० रुपयांच्या शिष्यवृत्त्या ७००० रुपयांच्या वार्षिक फंडातून देण्यात आल्या. महाराजांनी २५ खानगी गुणवंतांची निवड केली. त्यापैकी ६ मुली होत्या. बडोदा संस्थानात आणि संस्थानाबाहेर शिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी स्थापन केलेल्या १,००,००० रुपयांच्या फंडाच्या व्याजातून शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

### शिष्यवृत्त्यांच्या संख्येत कपात

ट्रेनिंग कॉलेजात शिकणाऱ्या सर्व शिक्षकांना शिष्यवृत्त्या मिळत होत्या; परंतु या शिष्यवृत्त्या बंद करण्यात आल्या आणि पहिल्या वर्षी ८०, दुसऱ्या वर्षी ८० आणि तिसऱ्या वर्षासाठी २० इतक्याच शिष्यवृत्त्या ठेवण्यात आल्या. अतिशय हुशार उमेदवारांनाच या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या; परंतु बाकीच्या उमेदवारांनाही इच्छा असेल तर त्यांनाही प्रवेश घेण्याची मुभा देण्यात आली. बडोद्यामध्ये या वर्गांची उपस्थिती प्रथम वर्षासाठी १६३, द्वितीय वर्षासाठी १२१ आणि तृतीय वर्षासाठी ४१ निश्चित करण्यात आली.

### तांत्रिक शिष्यवृत्त्या

स्पर्धा परीक्षांसाठी शंभर रुपयांची मासिक शिष्यवृत्ती कायम ठेवण्यात आली. यासोबत चार जिल्ह्यांच्या बोर्डांनी त्या त्या जिल्ह्यातून येणाऱ्या कलाकारांसाठी ७ रुपये प्रत्येकी अशी शिष्यवृत्ती निर्धारित केली. १० रुपये मासिक असलेली ‘पिलाजीराव गायकवाड’ शिष्यवृत्ती नुकतीच महाराजांनी एका प्रांतातील एक विद्यार्थी या संकल्पनेअंतर्गत कलाभवनात शिकणाऱ्या

विद्यार्थ्यांना देण्यात आली. स्वास्थ्याची काळजी घेण्यासाठी एका वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूकही करण्यात आली होती.

## इ.स. १९१७-१८

बडोदा संस्थानातील बडोदा कॉलेज आणि हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्यांची रक्कम ७,८४४ रुपये होती. मागील वर्षी हीच रक्कम ६,९८४ रुपये होती. यामध्ये फर्ग्युसन कॉलेज, पुणे आणि सिडनेहॅम कॉमर्स कॉलेज, मुंबई येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ९० रुपये प्रति महिना याप्रमाणे शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. खानगी शिष्यवृत्त्यांसाठी वार्षिक ७००० रुपयांच्या निधीतून ६३७२ रुपये, १९ मुलांना आणि ०६ मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी खर्च करण्यात आले. यासोबतच १,००,००० रुपयांच्या मराठा फंडातून बडोदा संस्थानात आणि संस्थानाबाहेर शिकणाऱ्या मराठा मुलांना शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

## इ.स. १९१८-१९

बडोदा संस्थानातील बडोदा कॉलेज आणि माध्यमिक स्कूल्सना मागील वर्षीप्रमाणेच यावर्षी सुद्धा शिष्यवृत्त्यांसाठी ७,८४४ रुपये देण्यात आले. यामध्ये फर्ग्युसन कॉलेज, पुणे आणि सिडनेहॅम कॉमर्स कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ९० रुपये प्रति महिन्याप्रमाणे शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. खानगी शिष्यवृत्त्यांसाठी ठेवण्यात आलेल्या ७,००० रुपयांच्या वार्षिक फंडातून २० मुले आणि ९ मुलींना शिष्यवृत्त्या देण्यासाठी ६३७२ रुपये खर्च करण्यात आले होते. यासोबतच १,००,००० रुपयांच्या मराठा फंडातून बडोदा संस्थानातील आणि संस्थानाबाहेरील मराठा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. महाराजांनी मराठा समाजातील मुलींच्या शिक्षणासाठी वार्षिक १८०० रुपये मंजूर केले होते आणि ते शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपात वाटप करण्यासाठी डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडे सुपूर्द करण्यात आले. गरीब मराठा मुलींना मदत मिळावी म्हणून पुण्यातील डेक्कन असोसिएशनला ३०० रुपये पाठवण्यात आले होते.

## तांत्रिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

कलाभवनात मासिक १०० रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. प्रत्येक प्रांतासाठी मासिक प्रत्येकी १० रुपयांप्रमाणे 'पिलाजीराव गायकवाड' शिष्यवृत्तीसुद्धा देण्यात आली. महाराजांनी या शिष्यवृत्तीची विशेष तरतूद केली आहे. चार जिल्ह्यांच्या बोर्डांनी निर्धारित केलेल्या प्रत्येकी ८ रुपयांच्या आठ शिष्यवृत्त्या आणि त्यातील प्रत्येक प्रांताला दोन दोन शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

## इ.स. १९१९-२०

इ.स. १९१९-२० मध्ये ९,४०४ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. त्या आधीच्या वर्षी ही रक्कम ७,८४४ रुपये होती. संस्थानाच्या वतीने बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांमध्ये

या शिष्यवृत्त्यांचे वाटप करण्यात आले. फर्ग्युसन कॉलेज पुणे आणि सिडनेहॅम कॉमर्स कॉलेज, मुंबई येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या मासिक ६५ रुपयांच्या शिष्यवृत्त्यांचाही यात समावेश होता. खानगी शिष्यवृत्त्यांसाठी ठेवण्यात आलेल्या ८,००० रुपयांच्या फंडातील ७,९७० रुपये खर्च करण्यात आले. २४ मुले आणि ९ मुलींना खानगी शिष्यवृत्ती देण्यात आली. शिवाय १,००,००० रुपयांच्या मराठा शिक्षण फंडातूनही संस्थानात आणि बाहेर शिकणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. मराठा समाजातील मुलींच्या शिक्षणासाठी महाराजांनी वार्षिक १,८०० रुपयांची तरतूद केली होती. शिष्यवृत्तींच्या स्वरूपात वाटप करण्यासाठी ही रक्कम डेक्कन मराठा असोसिएशनकडे पाठवण्यात आली. याशिवाय सरकारी नोकरांच्या मुलांच्या देखभालीसाठी ५,७८ रुपये खर्च करण्यात आले होते.

कलाभवनामध्ये शिष्यवृत्ती देण्यासाठी सरकारने मासिक १०० रुपयांच्या रकमेची तरतूद केली आहे. ३३ विद्यार्थ्यांना ही रक्कम वाटून दिली जात असे. याशिवाय इतर सहा शिष्यवृत्त्या (श्रीमंत पिलाजीराव तांत्रिक शिष्यवृत्त्या आणि प्रांत पंचायत शिष्यवृत्त्या) स्थानिक प्रशासनाकडून साधारण ७ रुपये प्रति महिना याप्रमाणे दिल्या जात असत. शेजारील 'भारतीय प्रांत जातीय संघटना आणि शैक्षणिक फंड' यांच्याद्वारे संस्थेतील २४ विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी मासिक १४ रुपयेप्रमाणे शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

## इ.स. १९२०-२१

संस्थानाद्वारे यावर्षी बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांमध्ये ९,७६४ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. फर्ग्युसन कॉलेज, पुणे आणि सिडनेहॅम कॉमर्स कॉलेज, मुंबई येथील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मासिक ६५ रुपयांच्या शिष्यवृत्त्यांचा यात समावेश आहे. महाराजांनी स्थापन केलेल्या खानगी शिष्यवृत्त्यांसाठी असलेल्या ८,००० रुपयांच्या फंडातून १८ मुले आणि ९ मुलींना ७,५२६ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. या सोबतच १,५०,००० रुपयांच्या मराठा फंडातून संस्थानात आणि संस्थानाबाहेर शिकणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. मराठा समाजातील मुलींच्या शिक्षणासाठी महाराजांनी वार्षिक १८०० रुपये मंजूर केले आणि शिष्यवृत्त्या म्हणून वाटप करण्यासाठी ती रक्कम डेक्कन मराठा असोसिएशनकडे पाठवण्यात आली.

याशिवाय सरकारी नोकरांच्या मुलांच्या देखभालीसाठी ६३० रुपये खर्च करण्यात आले.

## तांत्रिक शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती

कलाभवन संस्थेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी सरकारने १०० रुपयांच्या निधीची तरतूद केली. ३३ विद्यार्थ्यांमध्ये हा निधी विभागून देण्यात येत असे. स्थानिक प्रशासनाकडून इतर शिष्यवृत्त्याही देण्यात येत असत. त्यांची मासिक रक्कम ७६ रुपये होती. शेजारील भारतीय राज्य, जातीय संघटना आणि निधी मिळून संस्थेमधील १८ विद्यार्थ्यांना प्रत्येकी मासिक १५ रुपये शिष्यवृत्ती दिली गेली.

इ.स. १९२१-२२

बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या वाघेर विद्यार्थ्यांसाठी पुढील तीन वर्षांसाठी २५ रुपये प्रतिवर्ष शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली.

चार वर्षांसाठी असलेली मासिक २५ रुपयांची शिष्यवृत्ती बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या वाघेर समाजातील विद्यार्थ्याला देण्यात आली होती.

## उच्च आणि माध्यमिक शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या

बडोदा कॉलेज आणि संस्थानातील माध्यमिक शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्यांची वार्षिक रक्कम ९,७०४ रुपये होती. मागील वर्षी हीच रक्कम ९,७६४ रुपये होती. याशिवाय मासिक २५ रुपयांच्या पाली भाषेसाठीच्या शिष्यवृत्त्या आणि मासिक ४० रुपयांच्या व्यावसायिक शिष्यवृत्त्या फर्ग्युसन कॉलेज, पुणे आणि सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स, मुंबई येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. शिवाय मासिक २० रुपयांची एक शिष्यवृत्ती पुण्यातील शेतकी महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला देण्यात आली.

याशिवाय आयुर्वेदिक आणि युनानी औषधशास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी दिल्ली येथील तिब्बी कॉलेजमध्ये तीन मान्यवरांना पाठवण्यात आले. त्यांना मासिक ४० रुपयेही देण्यात येत आहेत. खानगी शिष्यवृत्त्यांसाठी असलेल्या ८,००० रुपयांच्या वार्षिक निधीतून ७,७६० रुपये खर्च करण्यात आले. २८ मुले आणि ९ मुलींना खानगी शिष्यवृत्ती देण्यात आली. संस्थानात आणि संस्थानाबाहेरील शाळांमध्ये शिकणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांसाठी १,५०,००० रुपयांच्या मराठा एज्युकेशन फंडमधून मराठा शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. या फंडावरील व्याजाची सहाव्या भागाची रक्कम मराठा परिषदेला, तर २,४०० रुपये दरवर्षी पुण्यातील डेक्कन मराठा असोसिएशनला पाठवण्यात येत असे. याशिवाय मराठा समाजातील मुलींच्या शिक्षणासाठी हुजुरांद्वारे वार्षिक १,८०० रुपये मंजूर करण्यात आले असून शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपात या रकमेचे वाटप करण्यासाठी ही रक्कम पुण्यातील डेक्कन मराठा असोसिएशनला पाठवण्यात आली. सरकारी नोकरांच्या मुलांच्या देखभालीसाठी १,४६४ रुपये खर्च करण्यात आले होते.

## तांत्रिक शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती

संस्थेसाठी १०० रुपये मासिक याप्रमाणे शिष्यवृत्त्यांचा निधी असून ३४ विद्यार्थ्यांमध्ये तो विभागून दिला जात होता. ३ ते ५ रुपये प्रति महिन्याच्या या शिष्यवृत्त्या होत्या. सरकारी शिष्यवृत्त्यांशिवाय, ३ श्रीमंत पिलाजीराव गायकवाड तांत्रिक शिष्यवृत्त्या, ६ प्रांत पंचायत शिष्यवृत्त्या (बडोदा, नवसारी आणि कडी प्रांतांकडून) एकूण ७६ रुपये मासिक याप्रमाणे देण्यात आल्या. याशिवाय १८ विद्वानांना शेजारील राज्यांकडून, शैक्षणिक संस्थांकडून आणि जाती संस्थांकडून प्रति विद्यार्थी १५ रुपये प्रमाणे शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. वर उल्लेख केलेले शेजारील प्रांत म्हणजे जामनगर, भावनगर, जुनागड आणि जोधपूर. या शिष्यवृत्त्यांशिवाय बक्षिसे, पदके आणि मोफत शिक्षण हे सरकारद्वारे नेहमीप्रमाणे देण्यात आले.

इ.स. १९२३-२४

मागासवर्गीय मुलांसाठी एका वर्षाकरिता शिष्यवृत्त्या देण्यासाठी ६,३१८ रुपये मंजूर करण्यात आले.

सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांना आर्किषत करण्यासाठी शिष्यवृत्त्यांच्या संख्येत आणि रकमेत वाढ करण्यात आली होती, तसेच बक्षिसेही मंजूर करण्यात आली.

## उच्च आणि माध्यमिक शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या

बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांमध्ये संस्थानाकडून ८,६८४ रुपयांच्या एकूण वार्षिक शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. मागील वर्षी हीच रक्कम ९,७०४ रुपये इतकी होती. याशिवाय ४० रुपये प्रति महिन्याच्या व्यावसायिक शिष्यवृत्त्या आणि २० रुपये प्रति महिन्याच्या व्यावसायिक शिष्यवृत्त्या बडोदा संस्थानातील सिडनेहॅम कॉमर्स वाणिज्य कॉलेज, मुंबई आणि पुण्यातील शेतकी महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

याशिवाय दोन विद्यार्थ्यांना आयुर्वेदिक आणि युनानी औषधशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी ५० रुपये आणि ४० रुपये प्रति महिना देऊन दिल्लीला पाठवण्यात आले. नॅशनल मेडिकल कॉलेज, कलकत्ता येथे पाठवण्यात आलेल्या विद्यार्थ्याला मासिक ४० रुपये देण्यात आले होते.

महाराजांनी सुरू केलेल्या खानगी शिष्यवृत्त्यांच्या वार्षिक १०० रुपयांच्या निधीतून २५ मुले आणि ७ मुलींना शिष्यवृत्त्या देण्यासाठी ६,३३३ रुपये खर्च करण्यात आले. दोन मुले आणि दोन मुलींच्या देखभालीकरिता १,१७० रुपये खर्च करण्यात आले. महाराजांनी स्थापन केलेल्या १,५०,००० रुपयांच्या मराठा फंडावरील व्याजातून एकूण ३,२५० रुपयांच्या मराठा शिष्यवृत्त्या बडोदा संस्थानात आणि संस्थानाबाहेर असलेल्या शाळांमध्ये शिकणाऱ्या ५५ मुलांना आणि ५ मुलींना देण्यात आल्या होत्या. याच व्याजातील २,४०० रुपये नेहमीप्रमाणे पुण्यातील डेक्कन मराठा असोसिएशनला आणि सहावा भाग मराठा शिक्षण परिषदेला देण्यात आला. या शिवाय १,००,००० रुपयांवरील व्याजातून श्रीसयाजी शिष्यवृत्त्या देण्यासाठी १,९४८ रुपये खर्च करण्यात आले. १,००,००० रुपयांची ही रक्कम महाराजांनी मराठा समाजातील मुलांच्या उच्च शिक्षणासाठी अगदी मोठ्या मनाने दिली होती.

## तांत्रिक शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या

संस्थेत शिष्यवृत्त्या देण्यासाठी सरकारने मासिक १०० रुपये मंजूर केले असून दोन मुलांना मासिक भत्ता देण्यात येत असे. याशिवाय २ श्रीमंत पिलाजीराव तांत्रिक शिष्यवृत्त्या, १२ रुपयांची एक बडोदा प्रांतासाठी आणि ६ प्रांत पंचायत शिष्यवृत्त्या, बडोदा, नवसारी आणि कडी विभागासाठी प्रत्येकी ७ रुपयांच्या शिष्यवृत्त्या योग्य त्या अटी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येत असत. पेटलाद येथील शेठ नारणभाई यांनी सुरू केलेली २५ रुपये महिन्याची प्रोफेसर टी.के. गज्जर स्मृती शिष्यवृत्ती केमिकल टेक्नॉलॉजी विषयातील सर्वोत्तम विद्यार्थ्याला दिली

जात असे. ४ रुपये प्रत्येकी असलेल्या २ दिवाण बहादूर धामणसकर स्मृती शिष्यवृत्ती मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि केमिकल टेक्नॉलॉजी विषयातील विद्यार्थ्यांना दिल्या जात असत.

प्रत्येकी १० रुपयांच्या ४ शिष्यवृत्त्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग सिव्हिल द्वितीय वर्षात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना दिल्या जात असत. या शिष्यवृत्त्या प्रोफेसर नानावटी मेमोरियल फंडातून दिल्या जात असत. शिवाय याच फंडातून मेकॅनिकल इंजिनिअरिंग अभ्यासक्रमातील सर्वोत्तम विद्यार्थ्याला रजत पदक दिले जात असे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी मराठा शिष्यवृत्ती फंडातून प्रत्येकी ८ रुपयांच्या ६ शिष्यवृत्त्या आणि महाराणी साहेबांच्या फंडातून प्रत्येकी १० रुपयांच्या ८ शिष्यवृत्त्या दिल्या जात. केमिकल टेक्नॉलॉजीच्या अंतिम परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला रजक पदक दिले जात असे. सरकारद्वारे संस्थेतील सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी २०० रुपयांची बक्षिसे दिली जात.

खाली नमूद केलेल्या प्रांतांकडून त्या त्या प्रांतांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

३० रुपयांची एक - सावंतवाडी प्रांत
२५ रुपयांची एक - Dharangadra प्रांत
१० रुपयांची एक - Dharangadra प्रांत
२० रुपयांची एक - देवास प्रांत
१५ रुपयांची एक - भावनगर प्रांत
१३ रुपयांच्या दोन - जामनगर प्रांत
१० रुपयांची एक - पलिटाना प्रांत आणि
१० रुपयांची एक - नांदोद प्रांत

याशिवाय महाराजांनी खानगी देणगीमधूनही काही शिष्यवृत्त्या दिल्या.

## इ.स. १९२४-२५

बडोदा संस्थानच्या वतीने बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांमध्ये (बडोदा संस्थानातील) देण्यात आलेल्या वार्षिक शिष्यवृत्त्यांची एकूण रक्कम ८,६८४ रुपये होती. या आधीच्या वर्षी इतकीच रक्कम खर्च करण्यात आली होती. याशिवाय २० रुपयांच्या दोन व्यावसायिक शिष्यवृत्त्या सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स, मुंबई येथे शिकणाऱ्या बडोदा संस्थानातील विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

आयुर्वेदिक आणि युनानी औषधशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी दिल्लीला पाठवण्यात आलेल्या दोन विद्वानांना मासिक ५० रुपयांची शिष्यवृत्ती पुढे सुरू ठेवण्यात आली. युनानी औषधशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी पाठवण्यात आलेले हकीम सज्जाद अली अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाले. वडी येथील इस्पितळात युनानी शाखा सुरू करून अली परतल्यानंतर त्यांना तिथे नेमण्यात आले. नॅशनल मेडिकल कॉलेज, कलकत्ता येथे पाठवण्यात आलेल्या विद्यार्थ्याला मासिक ५० रुपये देण्यात येत होते.

महाराजांनी सुरू केलेल्या खानगी शिष्यवृत्त्यांसाठी असलेल्या वार्षिक ८,००० रुपयांच्या फंडातून २४ मुले आणि ३ मुलींना शिष्यवृत्त्या देण्यासाठी ५,९४० रुपये देण्यात आले होते. तीन मुले, तीन मुली आणि एका महिलेच्या देखभालीसाठी १,२३४ रुपये खर्च करण्यात आले होते. महाराज साहेबांनी स्थापन केलेल्या १,५०,००० रुपयांच्या मराठा फंडावरील व्याजातून बडोदा संस्थानात आणि संस्थानाबाहेर असणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मराठा समाजातील ४० मुले आणि ०८ मुलींना शिष्यवृत्त्या देण्यात आल्या होत्या. याच व्याजातील २,४०० रुपये पुणे डेक्कन मराठा असोसिएशनला, तर सहावा भाग नेहमीप्रमाणे मराठा शिक्षण परिषदेला देण्यात आला. याशिवाय मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ठेवण्यात आलेल्या १,००,००० रुपयांच्या फंडावरील व्याजातून श्री. सयाजीराव शिष्यवृत्त्या देण्यासाठी ४,३४० रुपये खर्च करण्यात आले.

या रकमेव्यतिरिक्त महाराजांनी मराठा मुलींच्या शिक्षणासाठी मंजूर केलेले वार्षिक १८०० रुपये शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपात वाटप करण्यासाठी पुण्यातील डेक्कन मराठा असोसिएशनला दिले.

### तांत्रिक शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या

कलाभवनातील शिष्यवृत्त्यांसाठी सरकारने १०० रुपये मंजूर केले होते आणि प्रत्येक वर्गातील दोन मुलांना (प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या) भत्ता दिला जात असे. या शिवाय दोन श्रीमंत पिलाजीराव तांत्रिक शिष्यवृत्त्या, प्रत्येकी १२ रुपयांच्या बडोदा प्रांतासाठी आणि कडी प्रांतासाठी सहा प्रांत शिष्यवृत्त्या, ७ रुपयांच्या दोन शिष्यवृत्त्या बडोदा, नवसारी आणि कडी प्रांतातील पात्र विद्यार्थ्यांना देण्यात आल्या होत्या. पेटलाद येथील राजरत्न शेठ नारणभाई यांनी सुरू केलेली प्रोफेसर टी.के. गज्जर स्मृती २१ रुपये मासिक शिष्यवृत्ती केमिकल टेक्नॉलॉजी विषयातील सर्वोत्तम विद्यार्थ्याला देण्यात आली होती. प्रत्येकी ४ रुपयांच्या दिवाण बहादूर धामणसकर स्मृती शिष्यवृत्त्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि केमिकल टेक्नॉलॉजी विषयातील विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. एक फिरते रजतपदक १० रुपये किमतीचे, कला शाखा, सिव्हिल इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, केमिकल टेक्नॉलॉजी आणि विव्हिंग टेक्नॉलॉजी या विषयांत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला दिले जात असे.

याशिवाय एकूण १४७ रुपयांच्या ६ ते ११ रुपये किमतीच्या १८ शिष्यवृत्त्या या संस्थेत शिकणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. श्री. सयाजीराव मराठा शिष्यवृत्ती फंडातून या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या होत्या. सरकारतर्फे २०० रुपयांची बक्षिसे सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांना देण्यात आली आणि स्वत:च्या प्रांतातील विद्यार्थ्यांनाही देण्यात आली होती. स्वत:च्या प्रांतातील विद्यार्थ्यांसाठी काही प्रांतांनी खालीलप्रमाणे शिष्यवृत्त्याही दिल्या होत्या.

३० रुपयांची एक - सावंतवाडी

१५ रुपयांची एक - Dharangadra

१० रुपयांची एक - Dharangadra

२० रुपयांची एक - देवास

१३ रुपयांची एक - भावनगर

१३ रुपयांच्या दोन - जामनगर

१० रुपयांची एक - पेटलाद

१० रुपयांची एक - नांदोद

याशिवाय खाजगी देणग्यांद्वारेही आणखी काही शिष्यवृत्त्या देण्यात आल्या होत्या.

## इ.स. १९२५-२६

उच्च आणि माध्यमिक शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या

बडोदा संस्थानाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांसाठी असणाऱ्या शिष्यवृत्त्यांची रक्कम १३,३१६ रुपये होती. हीच रक्कम मागील वर्षी ८६३४ रुपये होती. याशिवाय दोन व्यावसायिक शिष्यवृत्त्या, प्रत्येकी २० रुपये किमतीच्या मुंबई येथील सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स येथे शिकणाऱ्या बडोद्यातील विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. महाराजांनी सुरू केलेल्या खानगी शिष्यवृत्त्यांच्या वार्षिक ८,००० रुपये फंडातून २२ मुले आणि ४ मुलींना शिष्यवृत्त्या देण्यासाठी ५,८५१ रुपये खर्च करण्यात आले.

२० शिष्यवृत्त्या (१६ माध्यमिक आणि ०४ उच्चशिक्षणासाठी) होतकरू, गरीब मध्यमवर्गीय मुलांसाठी मंजूर करण्यात आल्या होत्या.

कलाभवनात शिकणाऱ्या अंत्यज मुलांसाठी, तीन वर्षांसाठी प्रत्येकी १० रुपयांच्या सहा शिष्यवृत्त्या मंजूर करण्यात आल्या होत्या.

महाराजांनी स्थापन केलेल्या १,५०,००० रुपयांच्या मराठा शिक्षण फंडातील व्याजातून १३ मराठा मुलांना एकूण १,६७२ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. ही मराठा समाजातील मुले बडोदा संस्थानात आणि संस्थानाबाहेर असणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण घेत होती. याच व्याजामधून २,४०० रुपये डेक्कन मराठा असोसिएशनला आणि ८९३-११-५ रुपये नेहमीप्रमाणे मराठा शिक्षण परिषदेला देण्यात आली.

याशिवाय मराठा समाजात उच्च शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी महाराजांनी स्थापन केलेल्या १,००,००० रुपयांच्या फंडावरील व्याजातून ७,७१३ रुपयांच्या श्री. सयाजीराव शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. मराठा समाजातील मुलींच्या शिक्षणासाठी वार्षिक १८०० रुपये मंजूर करण्यात आले असून शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपात या रकमेचे वाटप करण्यासाठी पुण्यातील डेक्कन मराठा असोसिएशनकडे ही रक्कम पाठवण्यात आली.

## इ.स.१९२६-२७

बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांसाठी शिष्यवृत्त्या वाटप करण्यासाठी सरकारने वार्षिक १६,०७० रुपये दिले. १९२५-२६ या वर्षी हीच रक्कम १३,३१६ रुपये होती. सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड इकॉनॉमिक्स, मुंबई येथे शिकणाऱ्या बडोद्यातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी २०

रुपयांच्या दोन शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. खानगी शिष्यवृत्त्यांसाठी मिळणाऱ्या वार्षिक ८,००० रुपये फंडातून २३ मुले आणि ७ मुलींना शिष्यवृत्त्या देण्यासाठी ७०२ रुपये खर्च करण्यात आले.

महाराजांनी स्थापन केलेल्या १,५०,००० रुपयांच्या मराठा शिक्षण फंडातून येणाऱ्या व्याजातून बडोदा संस्थानात आणि संस्थानाबाहेरील शाळांमध्ये शिकणाऱ्या २७ मुलांना आणि एका मुलीला एकूण २,१५४ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. याच व्याजातून पुणे डेक्कन मराठा असोसिएशनला २,४०० रुपये, तर ९०१ रुपये मराठा शिक्षण परिषदेला नेहमीप्रमाणे देण्यात आले. मराठा समाजात उच्च शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी महाराजांनी स्थापन केलेल्या १,००,००० रुपये फंडाच्या व्याजातून ५,९८२ रुपयांच्या श्री. सयाजीराव शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

यासोबतच मराठा मुलींच्या शिक्षणासाठी महाराजांनी वार्षिक १,८०० रुपये मंजूर केले होते. ही रक्कम शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपात वाटप करण्यासाठी पुण्यातील डेक्कन मराठा असोसिएशनला देण्यात आली.

## इ.स. १९२७-२८

बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांसाठी वार्षिक १५,२७४ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. मागील वर्षी हीच रक्कम १६,०७० होती. मुंबईतील सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड इकॉनॉमिक्स येथे शिकणाऱ्या बडोद्यातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी २० रुपये प्रति महिना असलेल्या दोन शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. महाराजांनी सुरू केलेल्या खानगी शिष्यवृत्त्यांसाठी असलेल्या वार्षिक ८,००० रुपयांच्या फंडातून ७,५४६ रुपये शिष्यवृत्त्यांसाठी खर्च करण्यात आले.

मराठा शिक्षण फंड या महाराजांनी स्थापन केलेल्या १,५०,००० रुपयांच्या फंडावरील आलेल्या व्याजातून बडोदा संस्थानात आणि बाहेर असणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या ३७ मराठा मुलांना १,८३२ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. याच व्याजातील २,४०० रुपये डेक्कन मराठा असोसिएशनला आणि मराठा शिक्षण परिषदेला ९०१ रुपये नेहमीप्रमाणे देण्यात आले.

याशिवाय मराठा समाजात उच्चशिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी महाराजांनी तयार केलेल्या १,००,००० रुपयांच्या फंडावरील व्याजातील ३,१५० रुपये श्री. सयाजीराव शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपात ३५ गुणवंतांना देण्यात आले होते. १,८०० रुपये पुण्यातील डेक्कन मराठा असोसिएशनला शिष्यवृत्तीच्या स्वरूपात वाटप करण्यासाठी देण्यात आले होते.

## इ.स.१९२८-२९

बडोदा कॉलेज आणि संस्थानातील माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २५,४३३ रुपयांच्या एकत्रित वार्षिक शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. या रकमेत

१) मुंबई येथील सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स येथील दोन शिष्यवृत्त्या.
२) बडोद्यातील विद्यार्थ्यांना मुंबई येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्या.
३) सरकारी नोकरांच्या मुलांना महाराजांनी दिलेल्या शिष्यवृत्त्या.
४) मराठा समाजातील मुलींच्या शिष्यवृत्त्यांसाठी डेक्कन मराठा असोसिएशनला देण्यात येणारे वार्षिक १८०० रुपये.
५) माध्यमिक एज्युकेशन कोडप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या इतर शिष्यवृत्त्या इ. चा समावेश आहे.

महाराजांनी स्थापन केलेल्या १,५०,००० रुपयांच्या मराठा शिक्षण फंडातील व्याजातून बडोदा संस्थानात आणि संस्थानाबाहेर शिक्षण घेणाऱ्या मराठा समाजातील ५१ विद्यार्थ्यांना मराठा शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. २,४०० रुपये डेक्कन मराठा असोसिएशनला आणि १२-१३-६ नेहमीप्रमाणे मराठा शिक्षण परिषदेला देण्यात आले.

मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी महाराजांनी तयार केलेल्या १,५०,००० रुपयांच्या फंडातील व्याजातून ५,१७५ रुपयांच्या श्रीमंत सयाजीराव शिष्यवृत्त्या २९ विद्वानांना देण्यात आल्या. सैन्यातील नेमणूकदारांच्या मुलांना मिळणाऱ्या मोबदला नेमणूक बक्षिसांच्या कामाचे नियोजन शिक्षण खात्याकडे देण्यात आले होते. हुजरत पागा शिलेदार फंडातून १९ विद्यार्थ्यांना यावर्षी एकूण १,४३२ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या होत्या.

## इ.स.१९२९-३०

संस्थानातील बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्यांची रक्कम १७,९२०-१०-११ होती. यामध्ये

१) मुंबई येथील सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्ससाठी दोन शिष्यवृत्त्या.
२) मुंबईतील पशुवैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या बडोद्यातील विद्यार्थ्याला देण्यात येणारी शिष्यवृत्ती.
३) महाराजांकडून सरकारी नोकरांच्या मुलांना दिली जाणारी शिष्यवृत्ती.
४) मराठा मुलींच्या शिष्यवृत्त्या १८०० रुपये.
५) माध्यमिक एज्युकेशन कोडप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या इतर शिष्यवृत्त्या इ. चा समावेश आहे.

महाराजांनी स्थापन केलेल्या १,५०,००० रुपयांच्या मराठा शिक्षण फंडावरील व्याजातून बडोदा संस्थानात आणि बाहेर शिक्षण घेणाऱ्या मराठा समाजातील ४२ विद्यार्थ्यांना २,७४४-३-९ एकूण रकमेच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. नेहमीप्रमाणे २,४०० रुपये डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन, पुणे या संस्थेला देण्यात आले.

महाराजांनी तयार केलेल्या मराठा समाजातील लोकांसाठी उच्चशिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी १,००,००० रुपयांच्या फंडावरील व्याजातून ४३ गुणवंतांना सयाजीराव शिष्यवृत्त्या देण्यासाठी ६,७१२-८-० रुपये खर्च करण्यात आले होते. सैन्यातील नेमणूकदारांच्या मुलांना मोबदला नेमणूक बक्षिसे देण्याचे व्यवस्थापन शिक्षण खात्याकडे देण्यात आले आणि त्याद्वारे ६,१८९ रुपयांच्या शिष्यवृत्त्यांचे वाटप करण्यात आले.

## इ.स. १९३०-३१

संस्थानाच्या वतीने बडोदा कॉलेज आणि संस्थानातील माध्यमिक शाळांमध्ये देण्यात येणाऱ्याशिष्यवृत्त्यांची रक्कम २६,६०७-६-३ होती. यामध्ये

१) सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स, मुंबई येथील दोन शिष्यवृत्त्या.
२) सरकारी नोकरांच्या मुलांना देण्यात येणाऱ्या‘सेवा कदर’ शिष्यवृत्त्या.
३) मराठा समाजातील मुलींना शिष्यवृत्त्या देण्यासाठी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनला देण्यात येणारे वार्षिक १,८०० रुपये.
४) माध्यमिक एज्युकेशन कोड अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या इतर शिष्यवृत्त्या. इ. चा समावेश होता.

मराठा समाजात उच्च शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी महाराजांनी तयार केलेल्या १,००,००० रुपयांच्या फंडावरील व्याजातून ४० गुणवंतांना ६,६७४ रुपयांच्या श्रीमंत सयाजीराव मराठा शिष्यवृत्त्या देण्यात आल्या होत्या. महाराजांनी स्थापन केलेल्या मराठा शिक्षण फंडावरील व्याजातून यावर्षी मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणे शक्य झाले नसल्यामुळे तो सगळा निधी शिलेदारांना शिष्यवृत्त्या देण्यात खर्च करण्यात आला.

इ.स. १९२९-३० प्रमाणेच १९३०-३१ या वर्षी शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपातील नेमणुका, नेमणूकदारांच्या मुलांना ६९९३-८-० प्रमाणे देण्यात आल्या. ३,२०५ रुपये मराठा शिष्यवृत्त्या फंड आणि ३,७८८-८-१० रुपये शिलेदारी फंडातून १८ विद्यार्थ्यांना (नेमणूकदारांना) देण्यात आले.

## इ.स. १९३१-३२

संस्थानाच्या वतीने बडोदा कॉलेज आणि संस्थानातील माध्यमिक शाळांमध्ये एकूण २०,८७५-१२-० शिष्यवृत्त्यांची रक्कम होती. यामध्ये

१) सिडनेहॅम कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स कॉलेज, मुंबई येथे व्यावसायिक अभ्यासासाठी मंजूर करण्यात आलेल्या दोन शिष्यवृत्त्या.
२) सरकारी नोकरांना देण्यात येणाऱ्या सेवा कदर शिष्यवृत्त्या.
३) मराठा समाजातील मुलींना शिष्यवृत्त्या देण्यासाठी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनला देण्यात येणारे वार्षिक १,८०० रुपये.

४) माध्यमिक एज्युकेशन कोड अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या इतर शिष्यवृत्त्या इ. चा समावेश होता.

याशिवाय मराठा समाजात उच्च शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी महाराजांनी तयार केलेल्या १,००,००० रुपयांच्या फंडावरील व्याजातून २७ गुणवंतांना श्रीमंत सयाजीराव मराठा शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. या शिष्यवृत्त्यांची एकूण रक्कम ४,३६६ रुपये होती.

विभागाने मराठा शिष्यवृत्ती फंडातून १,३७२-२-७ रुपये आणि शिलेदारी फंडातून ५,१४६-१४-३ रुपये शिलेदारांच्या १४ विद्यार्थ्यांना या वर्षी शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपात दिले होते.

## इ.स. १९३२-३३

मागासवर्गीय आणि रंजल्या गांजल्या समाजाला उत्तेजन देण्यासाठी महाराजांनी अतिशय आनंदाने पुढीलप्रमाणे शिष्यवृत्त्या मंजूर केल्या होत्या.

१) सहाव्या आणि सातव्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या ठाकरदास समाजातील मुलांसाठी मासिक ४ आणि ३ रुपयांच्या १४ शिष्यवृत्त्या दिल्या.
२) याच समाजातील बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मासिक २० आणि १५ रुपयांच्या दोन शिष्यवृत्त्या दिल्या होत्या.
३) बडोदा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलांसाठी प्रत्येकी १५ रुपयांच्या ८ शिष्यवृत्त्या दिल्या होत्या.

बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांना देण्यात येणाऱ्याशिष्यवृत्तीची रक्कम २४,०७३ रुपये होती. यामध्ये,

१) सिडनेहॅम कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स कॉलेज, मुंबई येथील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी दोन शिष्यवृत्त्या.
२) सरकारी नोकरांच्या मुलांसाठी देण्यात येणारी ‘सेवा कदर' शिष्यवृत्ती.
३) मराठा समाजातील मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनला देण्यात येणारे १८०० रुपये.
४) माध्यमिक एज्युकेशन कोडमध्ये मंजूर करण्यात आलेल्या इतर शिष्यवृत्ती इत्यादी शिष्यवृत्त्या दिल्या गेल्या.

याशिवाय ५,०२५-०-० रुपये ३० गुणवंतांना श्रीमंत सयाजीराव मराठा शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपात देण्यात आले. २,०९१ रुपये धामणसकर स्मृती शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपात तर ३,११६-०-० रुपये श्रीमंत संपतराव शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपात देण्यात आले होते. या सोबत १४ शिलेदार विद्यार्थ्यांना ६,७६३ रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली होती.

## इ.स.१९३३-३४

बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची रक्कम १७००१-८-१० होती. यामध्ये,

१) सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स कॉलेज, मुंबई येथे अभ्यास करण्यासाठी दोन शिष्यवृत्त्या.

२) सेवा कदर शिष्यवृत्ती.

३) मराठा समाजातील मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनला देण्यात येणारे १८०० रुपये.

४) माध्यमिक एज्युकेशन कोडमध्ये मंजूर करण्यात आलेल्या इतर शिष्यवृत्त्या यांचा समावेश करण्यात आला होता.

यासोबतच श्रीमंत मराठा शिष्यवृत्त्यांसाठी ९,७४३-६-४ रुपये, धामणसकर स्मृती शिष्यवृत्त्यांसाठी १८९० रुपये, श्री. जळेश्वर महादेव शिष्यवृत्त्यांसाठी २,५४८-४-३ रुपये आणि ५,३८५-६-० रुपयांच्या शिष्यवृत्त्या १३ शिलेदार विद्यार्थ्यांना या वर्षात देण्यात आल्या.

## इ.स. १९३४-३५

यावर्षी बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांमध्ये शिष्यवृत्त्यांसाठी मंजूर करण्यात आलेली रक्कम २२,०९० रुपये होती. यामध्ये,

१) सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स कॉलेज, मुंबई येथे अभ्यास करण्यासाठी दोन शिष्यवृत्त्या.

२) सेवा कदर (गुणवंतांचा सत्कार) शिष्यवृत्ती.

३) मराठा समाजातील मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनला देण्यात येणारे वार्षिक १,८०० रुपये आणि,

४) माध्यमिक एज्युकेशन कोडमध्ये मंजूर करण्यात आलेल्या इतर शिष्यवृत्त्या इ. चा समावेश होता.

## श्री. सयाजीराव मराठा धामणसकर व इतर शिष्यवृत्त्या.

याशिवाय श्रीमंत सयाजीराव मराठा शिष्यवृत्त्यांसाठी १०,१६६ रुपये, धामणसकर शिष्यवृत्त्यांसाठी २,१९९ रुपये आणि २,९६९ रुपये ‘श्री जळेश्वर महादेव शिष्यवृत्ती’साठी खर्च करण्यात आले होते. त्यावर्षी ११ शिलेदार विद्यार्थ्यांना एकूण ४,३९८ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या होत्या.

## इ.स. १९३५-३६

बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांमध्ये या वर्षी २२,८३०-१४-१५ इतकी रक्कम शिष्यवृत्त्यांसाठी देण्यात आली होती. यामध्ये

१) सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स कॉलेज, मुंबई येथे अभ्यास करण्यासाठी दोन शिष्यवृत्त्या.

२) ‘सेवा कदर’ (गुणवंतांचा सत्कार) शिष्यवृत्ती.

३) मराठा समाजातील मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी डेक्कन मराठा असोसिएशनला देण्यात येणारे वार्षिक १,८०० रुपये आणि,

४) माध्यमिक कोडमध्ये मंजूर करण्यात आलेल्या माध्यमिक शाळा आणि बडोदा कॉलेजमधील इतर शिष्यवृत्त्यांचा समावेश होता.

यासोबतच १०,४८७-१०-४ रुपये श्रीमंत सयाजीराव मराठा शिष्यवृत्तींसाठी २,१९६ रुपये धामणसकर शिष्यवृत्तीसाठी, तर २,८५३-३-७ रुपये 'श्री.जळेश्वर महादेव शिष्यवृत्ती'साठी खर्च करण्यात आले. या वर्षात १० शिलेदार विद्यार्थ्यांना ६,३३९-०-९ रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

## इ.स. १९३६-३७

यावर्षी बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांसाठी मंजूर झालेली शिष्यवृत्त्यांची रक्कम २६,१९६-१३-३ होती. यामध्ये

१) सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स कॉलेज, मुंबई येथे अभ्यासासाठी दोन शिष्यवृत्त्या.

२) सेवा कदर शिष्यवृत्त्या.

३) मराठा मुलींच्या शिष्यवृत्त्यांसाठी डेक्कन मराठा असोसिएशनला दरवर्षी देण्यात येणारे १,८०० रुपये.

४) माध्यमिक एज्युकेशन कोडमध्ये मंजूर करण्यात आलेल्या बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांमधली इतर शिष्यवृत्त्यांचा समावेश होता.

याशिवाय श्रीमंत सयाजीराव मराठा शिष्यवृत्त्यांसाठी ९,२३५-४-४ रुपये, धामणसकर शिष्यवृत्त्यांसाठी २,३३६-०-० रुपये आणि 'श्री. जळेश्वर महादेव शिष्यवृत्त्यां'साठी २,५५३-१५-२ रुपये खर्च करण्यात आले होते. या सोबतच ३,४५८-११-४ रुपये सात शिलेदार विद्यार्थ्यांना या वर्षात देण्यात आले.

## इ.स. १९३७-३८

यावर्षी बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांसाठी १९,९७१ रुपये शिष्यवृत्त्यांसाठी मंजूर झाले होते. यामध्ये

१) सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स कॉलेज, मुंबई येथे अभ्यास करण्यासाठी दोन शिष्यवृत्त्या.

२) मराठा मुलींच्या शिष्यवृत्त्यांसाठी पुण्यातील डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीला देण्यात येणारे वार्षिक १,८०० रुपये.

३) सेवा कदर शिष्यवृत्त्या आणि,

४) माध्यमिक एज्युकेशन कोडमध्ये मंजूर करण्यात आलेल्या बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांमधील इतर शिष्यवृत्त्या यांचा समावेश होता.

याशिवाय ४,२०३ रुपये श्रीमंत सयाजीराव गायकवाड मराठा शिष्यवृत्त्यांसाठी, २,३६० रुपये डी.वी.धामणसकर शिष्यवृत्त्यांसाठी आणि २,८१४ रुपये 'श्री. जळेश्वर महादेव शिष्यवृत्त्यां'साठी खर्च करण्यात आले होते. यासोबतच, यावर्षात ५ शिलेदार विद्यार्थ्यांना १,४०० रुपये देण्यात आले, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

## इ.स. १९३८-३९

१० रुपये आणि २ रुपये प्रति महिना अशा सहा शिष्यवृत्त्या अंत्यज आणि वाघेर समाजातील विद्यार्थ्यांसाठी आणि मासिक १० रुपयांच्या दोन शिष्यवृत्त्या कलाभवनात शिक्षण घेणाऱ्या मुसलमान समाजातील विद्यार्थ्यांसाठी मंजूर करण्यात आल्या.

यावर्षी बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांसाठी मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्तीची रक्कम ४३,२३२ रुपये होती. यामध्ये

१) सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स कॉलेज, मुंबई येथे अभ्यासासाठी मंजूर करण्यात आलेल्या दोन शिष्यवृत्त्या.

२) मराठा मुलींच्या शिष्यवृत्त्यांसाठी डेक्कन मराठा असोसिएशनला देण्यात येणारे वार्षिक १,८०० रुपये.

३) सेवा कदर शिष्यवृत्त्या आणि,

४) माध्यमिक एज्युकेशन कोडमध्ये मंजूर करण्यात आलेल्या बडोदा कॉलेज आणि माध्यमिक शाळांमधील इतर शिष्यवृत्त्या यांचा समावेश होता.

याशिवाय सयाजीराव गायकवाड मराठा शिष्यवृत्त्यांसाठी १,१७१ रुपये दिवाण बहादूर धामणसकर शिष्यवृत्त्यांसाठी २,४८४ रुपये आणि 'श्री. जळेश्वर महादेव शिष्यवृत्त्यां'साठी ३,३१३-२-१ रुपये खर्च करण्यात आले. अहवालात नमूद केल्याप्रमाणे या वर्षात ४ शिलेदार विद्यार्थ्यांना ९१० रुपये देण्यात आले होते.

## इ.स. १९३९-४०

बडोद्यात सर्वसमावेशक अशी शिष्यवृत्त्यांची योजना राबविण्यात आली होती. कॉलेजमध्ये गुणवत्तेशिवाय इतर विशेष शिष्यवृत्त्या आणि २८ शिष्यवृत्त्या मागासवर्गीय मुलांसाठी देण्यात आल्या होत्या. याशिवाय, १० टक्के विद्यार्थ्यांना १०० टक्के मोफत शिक्षण दिले जाई. यामधील २० जागा मुसलमान आणि रंजल्या गांजल्या वर्गातील मुलांसाठी राखीव होत्या. कलाभवनात ६४ सरकारी शिष्यवृत्त्या दिल्या. त्यांची वार्षिक रक्कम ८,१८५ रुपये इतकी होती. त्याशिवाय ५ वैद्यकीय शिष्यवृत्त्या, २ कृषिविषयक अभ्यासासाठी, २ पशुवैद्यकीय अभ्यासासाठी आणि एक मुंबई येथील सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स कॉलेज, मुंबई येथे

अभ्यासासाठी अशा शिष्यवृत्त्या होत्या. यासोबतच सर्व माध्यमिक शाळांमधील २० टक्के जागांवर मोफत प्रवेश दिला जात असे. मुसलमान आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त सवलती आणि मोफत सुविधाही होत्या.

सयाजीराव महाराजांनी अशा प्रकारे हजारो विद्यार्थ्यांना बडोद्यातून शिष्यवृत्ती दिली होती. यातून अनेकांनी उत्तम प्रकारचे शिक्षण घेतले होते. त्यातील काही उच्चशिक्षितांनी बडोद्याच्या राज्यकारभारात मोठमोठ्या पदावर काम केले. सरकारच्या वतीने सुरू केलेल्या सुधारणा सर्वांपर्यंत पोहोचवल्या. काही व्यक्तींनी बडोदा सरकारच्या शिष्यवृत्तीवर शिक्षण घेतल्यावर अस्पृश्य आणि गरीब लोकांच्या उन्नतीसाठी काम केले. समाजात सुधारणा करण्यासाठी आयुष्यभर कष्ट घेतले. त्यात प्रामुख्याने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश होतो.

## खानगी सेवकांच्या मुलांना शिष्यवृत्त्या

सयाजीराव महाराजांच्या खानगी सेवेत अनेक व्यक्ती पिढीजात काम करत असत. त्यांना पगाराबरोबर इतर लाभ मिळावेत यासाठी काही उपाययोजना केल्या होत्या. त्यातील एक योजना म्हणजे खानगी सेवेत असणाऱ्या व्यक्तींच्या मुलांना शिष्यवृत्त्या देणे. महाराजांनी ह्या शिष्यवृत्त्या दिल्यामुळे अनेकांना शिक्षण घेता आले. या शिष्यवृत्त्या कोणत्या निधीतून दिल्या जात होत्या; याविषयी माहिती पाहणे सोयीस्कर होईल.

पूर्वीच्या काळी महाराजांवरील संकटे टळावीत म्हणून अनेक लोक द्रव्यरूपाने ओवाळण्या टाकत किंवा त्यांच्या अंगावरून काही वस्तू समर्पित करत. हे सर्व वस्तू किंवा रोख रकमांच्या रूपात जमा होई. या सर्व निधीला सत्कानिधी असे म्हणत. (सतका किंवा सदका हा अरबी भाषेतील शब्द असून त्याचा मूळ अर्थ समर्पण केलेली वस्तू असा आहे; परंतु ओवाळण्याची वस्तू सामान्यत: द्रव्य असल्यामुळे अशा ओवाळणी केलेल्या वस्तूस सत्का असे म्हणण्याची पद्धत रूढ झाली.) अशा समर्पण केलेले किंवा ओवाळणी केलेले द्रव्य खानगीतील सेवक आपापसांत वाटून घेत; परंतु पुढे ही रक्कम एका मुख्य खानगीतील सेवकाकडे जमा करण्याची पद्धत सुरू झाली. जास्त रक्कम जमा झाल्यावर ती वाटून घेण्याची पद्धत रूढ झाली; परंतु काही वेळा रकमा जमा करणारे आणि ज्यांच्याकडे जमा केल्या जात ते परस्पर हडप करत. यामुळे वाद होऊ लागले. हे वाद कधी-कधी महाराजांपर्यंत जात. यामुळे महाराजांचा वेळ आणि शक्ती खर्च पडत असे. सबब महाराजांनी यासाठी नियम तयार केले. त्यास 'सत्काद्रव्यसंचयनासंबंधी नियम' असे म्हणतात.

सयाजीराव महाराजांनी या पैशाचा आणि द्रव्याचा अपव्यय होऊ नये यासाठी काही नियम केले. या नियमानुसार महाराजांनी हे पैसे एका ठिकाणी जमा करून त्यातील व्याजातून सेवकांच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याचे ठरवले. त्यासंबंधाने 'सेवाशिष्यवृत्त्यासंबंधी' या शीर्षकाखाली नियम करण्यात आले.

## सेवाशिष्यवृत्त्यांची संख्या

१) सत्काद्रव्यसंचयांतून खाली दर्शविल्याप्रमाणे सात सेवाशिष्यवृत्त्या विद्याधिकाऱ्यामार्फत देण्यात याव्यात.

अ) मासिक रु. १० ची १ शिष्यवृत्ती सहाव्या इयतेत असलेल्या विद्यार्थ्यास,

ब) मासिक रु. ८ च्या २ शिष्यवृत्त्या पाचव्या इयत्तेत असलेल्या विद्यार्थ्यास १ व चौथ्या इयत्तेत असलेल्या विद्यार्थ्यास १ या प्रमाणे शिष्यवृत्त्या,

क) मासिक रु. ६ च्या ४ तिसऱ्याइयत्तेत असलेल्या चार विद्यार्थ्यांस

२) सेवाशिष्यवृत्तीस इतर शिष्यवृत्त्यांस लागू असणारे सामान्य नियम लागू आहेत.

३) सेवाशिष्यवृत्त्याशिवाय इतर खालील नियम लागू आहेत.

क) ज्या खिदमतगार लोकांनी श्रीमंत महाराज साहेब यांची वीस वर्षे उपरांत नमकहलालीने व प्रामाणिकपणे नोकरी केलेली असेल त्या खिदमतगारांच्या मुलांस आणि ज्यांच्यासाठी खास हुजूर हुकूम होईल त्यास सेवाशिष्यवृत्त्या देण्यात याव्यात (हा नियम पुढे बदलून १५ वर्षे सेवा झालेल्या सेवकांच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याची पद्धत सुरू झाली).

ख) अशा शिष्यवृत्त्या मिळविणारांनी देशी सहाव्या इयत्तेपावेतो अभ्यास केला पाहिजे.

ग) सेवाशिष्यवृत्ती मिळवणाराने उत्तीर्ण झाल्यावर श्रीमंत महाराज यांच्या सान्निध्यात नोकरी करण्यास तयार झाले पाहिजे आणि तशा नोकरीत दाखल होईन अशा कराराचा रीतसर दस्तावेज सेवाशिष्यवृत्ती मिळवण्यापूर्वी लिहून दिला पाहिजे.

घ) जेव्हा सेवाशिष्यवृत्ती मिळवून उत्तीर्ण झालेल्या इसमाच्या नोकरीची सरकारात जरूर नसेल आणि त्यास दुसरी नोकरी देण्यात न येईल तेव्हा पोटकलमातील

ग) करारांतून त्यास मुक्त करण्यात येईल.

ड) सेवाशिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांनी दरमहा आपल्या शाळेच्या मुख्य अध्यापकाकडून अभ्यास आणि वर्तणूक या बद्दलचा दाखला पाठवला पाहिजे. अशा दाखल्याच्या अभावी सेवाशिष्यवृत्ती देता येणार नाही.

च) एखाद्या इयत्तेतील एकाहून अधिक विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीची मागणी केल्यास परीक्षेस मिळालेल्या गुणाप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येईल.

सयाजीराव महाराजांनी शिष्यवृत्ती देताना त्या विद्यार्थ्याने व्यवस्थित शिक्षण घेतले पाहिजे अशा प्रकारचे नियम केले होते. या सेवाशिष्यवृत्तीमुळे महाराजांनी खानगी सेवेतील नोकरांमध्ये या निधीवरून असणारा गोंधळ संपविला आणि आपल्या दातृत्वाचा उपयोग कशा प्रकारे सत्कार्यासाठी करता येतो याचे नमुनेदार उदाहरण घालून दिले.

## सयाजीराव महाराजांच्या शिष्यवृत्तीवर परदेशात शिक्षण घेतलेल्या व्यक्ती

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (पदवी शिक्षण, एम.ए., पीएच.डी., बॅरिस्टर, एम.एस्सी., इंग्लंड, अमेरिका)

२) ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर (पीएच.डी. विषय-दि हिस्टरी ऑफ कास्ट इन इंडिया, युरोप)
३) खासेराव जाधव (कृषी अभ्यास, इंग्लंड)
४) कॅप्टन माधवराव जाधव (लष्करी शिक्षणासाठी, स्वीत्झर्लंड)
५) विठ्ठल रामजी शिंदे (धर्मशिक्षणासाठी, अमेरिका)
६) नामदेवराव रामचंद्रराव कदम (सूपशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी, युरोप)
७) अल्लाउद्दीन (संगीत, युरोप)
८) श्रीमंत संपतराव गायकवाड (बॅरिस्टर, इंग्लंड)
९) लालिंसगराव गायकवाड, आनंदरावांचे सुपुत्र (बी.ए., युरोप)
१०) शंकरराव गायकवाड (आनंदरावांचे कनिष्ठ सुपुत्र) (उच्च शिक्षण, इंग्लंड)
११) आबासाहेब गायकवाड (संपतरावांचे पुत्र) (उच्च शिक्षण, इंग्लंड)
१२) भास्कर काशीनाथ भाटे (एम.ए., केंब्रिज विद्यापीठ)
१३) जनार्दन सखाराम कुडाळकर (ग्रंथालय, अमेरिका)
१४) ना. गो. कालेलकर (भाषाशास्त्र, युरोप)
१५) भानुप्रसाद दवे (स्काऊट आणि गाईड प्रशिक्षण, लंडन)
१६) वाकनीस (ग्रंथालय, युरोप)
१७) शंकरराव पगार (बॅरिस्टर, इंग्लंड)
१८) यशवंतराव पांढरे (कृषी पदविका, इंग्लंड)
१९) विश्वासराव घाटगे (राणीसाहेबांचे दत्तक बंधू) (उच्च शिक्षण, युरोप)
२०) रावजीभाई पटेल (रेशीम अभ्यास, काश्मीर)
२१) नानावटी (अर्थशास्त्र आणि पेढीशास्त्र म्हणजे बँकिंग, युरोप)
२२) मालती बेडेकर (एस.एन.डी.टी. युनिव्हर्सिटी, पुणे)
२३) लीलावती भागवत (एस.एन.डी.टी. युनिव्हर्सिटी, पुणे)
२४) कृष्णाबाई केळवकर (फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे )
२५) अमृतराज नारायण शास्त्री (ज्योतिषशास्त्र अभ्यास, काशी)
२६) राधाबाई पोवार (अध्यापन शास्त्र, अमेरिका)
२७) स्नेहलता पगार (बालसंगोपनशास्त्र, अमेरिका)
२८) पी.आर. नंदुरबारकर (मूकबधिर मुलांच्या शिक्षणासाठी, कलकत्ता)
२९) त्रिवेदी (मूकबधिर मुलांच्या शिक्षणासाठी, कलकत्ता)
३०) गजाननराव गणपतराव फुले (उच्च शिक्षण, युरोप)
३१) एम. एस. शितोळे (कृषी अध्ययन, युरोप)
३२) व्यंकटराव धुलप (सूपशास्त्र, युरोप)
३३) नानासाहेब शिंदे (लष्कर, युरोप)

३४) दादासाहेब शिर्के (उच्च शिक्षण, युरोप)
३५) दामाजीराव विठ्ठलराव गायकवाड (उच्च शिक्षण, युरोप)
३६) विजयसिंह अवचितराव गायकवाड (उच्च शिक्षण, युरोप)
३७) आंबेगावकर, (उच्च शिक्षण, युरोप)
३८) कु. हंसाबेन (उच्च शिक्षण, युरोप)
३९) कु. कांतीलाल मनुभाई मेहता (उच्च शिक्षण, युरोप)
४०) वासुदेव रामचंद्र तळवळकर (इंजिनिअरिंग, इंग्लंड)
४१) वाय.टी. देसाई (इंजिनिअरिंग, इंग्लंड)
४२) बी.बी. मोरे (उच्च शिक्षण, इंग्लंड)
४३) डी.आर. घाडगे (उच्च शिक्षण, इंग्लंड)
४४) एच.आर. राणे (उच्च शिक्षण, इंग्लंड)
४५) मि. हकीम (बार-ॲट-लॉ, इंग्लंड)
४६) बी.सी. लेले (संस्कृत, जर्मनी)
४७) डॉ. राधा मुकुंद मुखर्जी (शिक्षण आणि समाजशास्त्रस्थिती, युरोप)
४८) हकीम सजादल्ली (वैद्यकशास्त्र, इंग्लंड)
४९) नानक बी. मेहता (उच्च शिक्षण, अमेरिका)
५०) मि. गुप्ता (उच्च शिक्षण, इंग्लंड)
५१) मिसेस सावंत (उच्च शिक्षण, जपान)
५२) मिसेस गोखले (उच्च शिक्षण, जपान)
५३) पिनाकीप्रसाद एम. देसाई (अध्यापनशास्त्र, अमेरिका)
५४) एम.आर. घडियाली (इंजिनिअरिंग , अमेरिका)
५५) जयराम जे. सावंत (उच्च शिक्षण, जपान)
५६) वासुदेव जी. गोखले (इले. इंजिनिअरिंग , जपान)
५७) एस.टी. जठार (ॲसिड निर्मिती शिक्षण, इंग्लंड)
५८) रावजीभाई मोतीभाई पटेल (उच्च शिक्षण, इंग्लंड)
५९) मोतीभाई बी. पटेल (इंजिनिअरिंग , युरोप)
६०) मेदिवाला गुप्ता (जंगलविषयक शिक्षण, युरोप)
६१) अमीन काशीबाई चतुरभाई (जंगलविषयक शिक्षण, युरोप)
६२) डॉ.के.जी. नाईक (तंत्रशिक्षण संस्था, अभ्यास, युरोप)
६३) डॉ. नीळकंठराव राणे (वैद्यकीय शिक्षण, युरोप)
६४) रामचंद्रराव नारायण जाधव (वैद्यकीय शिक्षण, युरोप)
६५) रामचंद्रराव रावजी पवार (एम.ए.ए.एस., युरोप)
६६) मल्हारराव गोपाळराव साळुंखे (वहिवाटदार अनुभव, युरोप)

६७) जिजाबा बजाराम मोहिते (बॅरिस्टर, युरोप)
६८) रामचंद्रराव माने पाटील (अर्थशास्त्र, राज्यकारभार, युरोप)
६९) आबासाहेब बाळासाहेब मोहिते (निरनिराळ्या खात्यांची माहिती घेणे, युरोप)
७०) अप्पासाहेब गणपतराव पवार, (पीएच.डी. आणि बार-ॲट-लॉ, युरोप)
७१) जी.के. पाटील (सार्वजनिक बांधकाम, लंडन)
७२) सीताराम रा. तावडे (बॅरिस्टर, लंडन)
७३) डॉ.एच.जी. निंबाळकर (उच्चशिक्षण, युरोप)
७४) छोटालाल केशवलाल कंसारा (उच्चशिक्षण, युरोप)
७५) ना.ब. पडते (उच्चशिक्षण, युरोप)
७६) एस.ए. दिघे (हॉटेल व्यवस्थापन पाककला, युरोप)
७७) डॉ. दिवाणजी (इलेक्ट्रिकसिटी व रेडीओग्राफ शिक्षण, युरोप)
७८) शरदचंद्र दिघे (भाषाशास्त्र अभ्यास, युरोप)
७९) गजानन बाळकृष्ण प्रधान (भाषाशास्त्र अभ्यास, युरोप)
८०) परमार (भाषाशास्त्र अभ्यास, युरोप)
८१) प्रो. सोयरेस (उच्चशिक्षण, युरोप)
८२) आप्पासाहेब रामचंद्रराव चव्हाण (बॉटनी, पीएच.डी., अमेरिका)
८३) आर.आर. घारेखान (सुक्ष्मजंतुशास्त्र पदविका, युरोप)
८४) कल्याणभाई एन. जोशी (अध्यापनशास्त्र, युरोप)
८५) व्ही.वाय. कशाळकर (उच्चशिक्षण, युरोप)
८६) एस. आर. शिंदे (उच्चशिक्षण, युरोप)
८७) रमणलाल देसाई (बँकिंग आणि व्यवस्थापन, युरोप)
८८) पी. व्ही. सावंत (बँकिंग आणि व्यवस्थापन, युरोप)

*(टीप - वरील यादीत संशोधनांती वाढ होऊ शकते.)*

शिष्यवृत्ती देण्यामागे समाजाची उन्नती व्हावी हेच महत्त्वाचे कारण होते. ही समाजाची उन्नती फक्त बडोदा संस्थानात व्हावी असे नाही; तर बडोदा सोडून बाहेरसुद्धा सयाजीराव महाराजांनी खूप मोठ्या शिष्यवृत्त्या दिल्या. त्यामध्ये पुण्यातील गंगारामभाऊ मस्के यांची डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन ही संस्था असो किंवा उत्तर भारतातील बनारस विद्यापीठ असो, महाराजांनी कधीही प्रांत किंवा जातपात अशा क्षुल्लक बाबींचा विचार केला नाही. या एवढ्या मोठ्या रकमेच्या शिष्यवृत्त्या देण्यामागे शिक्षणाप्रती असणारी आस्था आणि प्रचंड दातृत्व आहे.

म्हणून त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणता येईल.

ooo

# प्रकरण ३ रे

# साहित्यनिर्मितीतील दातृत्व

सयाजीराव महाराजांचा वयाच्या बाराव्या वर्षी राज्याभिषेक झाला. राज्याभिषेकानंतर त्यांना हिंदुस्थानातील आणि परदेशातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली राज्यकारभारासाठी तयार करण्यात आले. राज्यकारभारासाठी तयार करत असताना विविध भाषांतील आणि देशांतील साहित्य त्यांच्या वाचनात जाणीवपूर्वक दिले गेले. या साहित्य वाचनाने आणि स्वतःच्या उपजत साहित्यविषयक आवडीमुळे त्यांना वाङ्मयाविषयी, साहित्याविषयी गोडी वाटू लागली. त्यामुळे जगातील उन्नत भाषांतील पुढारलेले साहित्य त्यांच्या वाचनात आले. या वाचनाने त्यांना साहित्याचे महत्त्व समजले. अनेक प्रकारच्या साहित्य वाचनामुळे त्यांना मानवजातीच्या कल्याणासाठी साहित्य हा शाश्वत मार्ग आहे असे वाटत होते. एवढेच नव्हे तर ते या निष्कर्षाप्रत पोहोचले होते की, साहित्यामुळेच मानवाचे जीवन समृद्ध होते. साहित्य हे फक्त मनोरंजनासाठी नसून प्रत्येक व्यक्तीच्या आणि समाजाच्या उन्नतीसाठी आहे. साहित्याची उपयुक्तता त्यांनी वेळोवेळी केलेल्या भाषणांतून व्यक्त केली.

महाराजांनी साहित्याचे महत्त्व अल्पावधीतच जाणले. परदेशातील साहित्याच्या तुलनेत त्यांना देशी भाषांतील साहित्याचे उणेपण लक्षात आले. हिंदुस्थानातील लोकांनाही असेच श्रीमंत साहित्य वाचता यावे यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. परदेशातील जे साहित्य आपल्या लोकांच्या उपयोगाचे आहे, अशा प्रकारचे साहित्य देशी भाषांत यावे यासाठी त्यांनी मदत केली. महाराजांच्या या मदतीमुळे देशी भाषेत अनेक महत्त्वाचे ग्रंथ भाषांतरित झाले. महाराजांनी साहित्यनिर्मितीची मदार फक्त भाषांतरावर न ठेवता देशी भाषेत नवनवीन साहित्य निर्माण व्हावे यासाठीही प्रयत्न केले. एकंदर साहित्यनिर्मितीसाठी महाराजांनी तन, मन आणि धनाने मदत केली.

महाराजांना साहित्याविषयी ज्याप्रमाणे आपुलकी वाटत होती, प्रेम वाटत होते तशीच आपुलकी त्यांना साहित्यनिर्मिती करणारांविषयी वाटत होती. अनेक मान्यवर साहित्यिकांनी महाराजांच्या मदतीमुळे अजरामर साहित्यकृती निर्माण केल्या. या साहित्यकृती म्हणजे त्यांच्या प्रेरणेचे, त्यांच्या दातृत्वाचे फलित होते.

## सयाजीराव महाराजांचे साहित्यप्रेम

सयाजीराव महाराजांचे शिक्षण पूर्ण होताच त्यांच्याकडे २८ डिसेंबर १८८१ रोजी राज्याचा कारभार देण्यात आला. शिक्षण काळापासूनच त्यांना वाचनाची, साहित्याची गोडी निर्माण झाली होती. त्यांना शिक्षण देणाऱ्या शिक्षकांनी यासाठी प्रोत्साहन दिले. जगातील नामांकित साहित्याची ओळख करून दिली. महाराज दिवसातील काही वेळ साहित्य वाचनासाठी राखून ठेवत. यासंबंधीच्या अनेक आठवणी महाराजांच्या समकालीन लोकांनी लिहून ठेवल्या आहेत.

### १) महाराजांचे वाचन

महाराजांना शिक्षण काळापासून निर्माण झालेली साहित्याविषयी आवड औपचारिक शिक्षण संपल्यावर अधिकच वाढली. त्यांनी साहित्याच्या वाचनात खंड पडू दिला नाही. राज्यकारभाराचे प्रचंड काम असतानाही त्यांनी वाचनासाठी कायम वेळ काढला. राज्यकारभाराचे काम पुढे-पुढे जास्तच वाढल्यावर त्यांनी वाचन करून दाखवण्यासाठी १२ जानेवारी १८८९ रोजी 'रीडर'ची नेमणूक केली. हे रीडर म्हणजे गोविंद सखाराम सरदेसाई होत. सरदेसाई पुढे इतिहासकार, रियासतकार म्हणून प्रसिद्धीस आले. महाराजांच्या जबर वाचन व्यासंगाबद्दल आणि साहित्यप्रेमाबद्दल सरदेसाई यांनी अनेक आठवणी 'श्री सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत' या महाराजांच्या चरित्रात आणि 'माझी संसारयात्रा' या आत्मचरित्रात दिल्या आहेत. माहीत नसलेल्या बाबी ज्ञात करून घेण्याची महाराजांना नेहमीच उत्सुकता असे. नवनवीन साहित्य वाचन करायला मिळावे यासाठी ते प्रयत्नशील असत.

महाराजांच्या वाचन व्यासंगाविषयी सरदेसाई म्हणतात, 'सकाळचा अभ्यास दोन तास चाले. त्यात कोणीतरी तज्ज्ञ बोलावून त्यांजपाशी निरनिराळे विषय ते शिकत. चार-पाच वर्षेपर्यंत या वेळात मी त्यांस संस्कृत शिकविले. त्यात त्यांना गोडी वाटू लागली. लहानपणचे शिक्षण शाळेच्या पद्धतीप्रमाणे सर्वांगीण झाले नसल्यामुळे व्यवहारात त्यांना पुष्कळ अडचण होई. व्यवहारी अपूर्णांक, वजनमापे, हिशेब, व्याकरण हे विषय आरंभी शिकलेले नसल्यामुळे लेखनात किंवा भाषणात कर्ता आहे तर क्रियापद नाही, क्रियापद आहे तर कर्ता नाही, अशा ढोबळ चुका त्यांच्या होत. हे विषय ते मोठेपणी मुद्दाम शिकले. काश्मिरात गुलमर्ग येथे मी त्यांना इंग्रजी व्याकरण शिकविले. युरोपात सेंट मॉरिटझ् येथे कैक दिवस मी त्यांस व्यवहारी अपूर्णांक शिकविले.' *(सरदेसाई, श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, १९५६, पृ. १८)*. एखादा विषय समजला नाही तर तो विषय महाराज जाणीवपूर्वक अवगत करून घेत. त्या विषयात आपणाला प्रावीण्य कसे मिळवता येईल याकडे ते जास्तीत जास्त लक्ष देत. सरदेसाई इंग्रजी व्याकरणाबाबतची दुसरी एक आठवण देतात. 'व्याकरणातील पुस्तकांतले धडे वाचून झाल्यावर ते त्यातील प्रश्नांची उत्तरे लिहून काढत. ती मी दुसरे दिवशी तपासून देई. सामान्यनामास 'a' किंवा 'The' हे आर्टिकल पाहिजे; विशेषनामास नको असा नियम आहे. त्यात त्यांची काहीतरी गैरसमजूत झाली. रात्री बारा वाजता प्रश्नोत्तरे लिहीत असता त्यात काही अडचण आली. मी

पलीकडे दुसऱ्या मकानात दारास आतून कडी लावून निजलो होतो. त्यांनी मजकडे नोकर पाठविला आणि कळविले, ‘निजले नसले तर त्यांना बोलवा.’ नोकराने दरवाजा वाजविला. तेव्हा मी उठून कडी काढताच नोकर म्हणाला, ‘तुम्ही निजला नसाल तर महाराज बोलावतात.’ त्या नोकरापुढे मी उभा असता निजलो आहे म्हणून कसे सांगू?’ कपडे घालून तसाच त्यांच्याकडे गेलो. सामान्यनाम आणि विशेषनाम या विषयावर दोन तास चर्चा होऊन माझे डोके भणानून गेले. असा प्रकार लागोपाठ तीन दिवस व्याकरणावरच झाला. त्यांची समजूत पटेना आणि मी अगदी कुंठित होऊन गेलो. तीन रात्री माझ्या अशा गेल्यावर वर्ष-दोन वर्षेपावेतो त्यांचा निद्रानाश मलाही जडला *(सरदेसाई, श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, १९५६, पृ.१९)*. महाराजांचे औपचारिक शिक्षण इ.स. १८८१ साली संपले. सरदेसाई १२ जानेवारी १८८९ साली महाराजांकडे नोकरीस रुजू झाले. महाराजांचे शिक्षण संपल्यावर नऊ वर्षांनी सरदेसाई बडोद्यात आले. शिक्षण संपल्यावर नऊ वर्षांनंतर महाराजांनी वरील विषयातील ज्ञान अद्ययावत केले. यामध्ये त्यांचा ज्ञान मिळवण्याचा ध्यास प्रकर्षाने दिसतो. कोणत्याही विषयाचा अभ्यास करताना तो विषय मुळातून जाणून घेण्याची त्यांची इच्छा असे. पुढील आयुष्यात त्यांनी अशाच प्रकारे अनेक विषयांतील बाबी विद्यार्थ्याप्रमाणे जाणून घेतल्या. साहित्याबाबत अशाच प्रकारच्या आठवणी सरदेसाई यांनी लिहून ठेवल्या आहेत. एका संस्थानाचे अधिपती असताना लहान-लहान बाबी ते अत्यंत तन्मयतेने शिकले. ज्या बाबतीत आपण अज्ञानी आहोत, त्या बाबी त्यांनी ज्ञात करून घेतल्या.

पुढील काळातही त्यांनी आपले वाचन आणि साहित्य आवड सुरू ठेवली. त्याबाबतच्याही आठवणी सरदेसाई यांनी दिल्या आहेत. रियासतकार सरदेसाई ‘श्रीसयाजीगौरवग्रंथा’तील आठवणी या भागामध्ये लिहितात, ‘प्रवासात असता पुस्तक संग्रह करण्याचा श्रीमंतांस मोठा शौक आहे. हल्लीच्या बडोद्याच्या मुख्य सार्वजनिक संग्रहातील पुस्तकांची निवड बरीचशी खुद्द त्यांनी किंवा त्यांच्या सूचनेने केलेली आहे. कोणी विद्वान किंवा बहुश्रुत गृहस्थ भेटला की, त्याच्याजवळून चांगल्या पुस्तकांची नावानिशी माहिती घेण्याचा त्यांचा प्रघात होता. भेटी व बोलणे होत असता अशा एखाद्या पुस्तकाचा उल्लेख निघाला तर लगेच माझ्यासारख्यास पुस्तकाचे नाव व मिळण्याचे ठिकाण लिहून ठेवण्यास सांगत.’ *(सरदेसाई, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-६, १९३३, पृ.६)* महाराजांच्या सोबत बडोद्यात आणि प्रवासात सरदेसाई नेहमी राहिल्याने त्यांना महाराजांच्या उदात्त साहित्यप्रेमाची चांगलीच कल्पना आली. म्हणून ग्रंथाबाबत त्यांची जागरूकता सरदेसाई यांनी नोंदवली आहे. महाराज अनेक पत्रांतूनही त्या-त्या विषयांतील जाणकार व्यक्तींना ग्रंथाविषयी विचारणा करत.

महाराजांनी अनेक मान्यवरांना जी हजारो पत्रे लिहिली त्या पत्रांमधूनही स्वतःच्या वाचनाबद्दल आणि ग्रंथाबद्दलचे उल्लेख अनेक वेळा केले आहेत. त्यांनी त्यांचे शिक्षक इलियट यांना अनेक पत्रे पाठवली. त्या पत्रांतून त्यांनी नवीन ज्ञानाबद्दल वारंवार विचारणा केली आहे. इ.स. १९०१ मध्ये पाठविलेल्या पत्रात ते लिहितात, ‘जर आपणास काही चांगली पुस्तके

सापडली तर ती आमच्या ग्रंथालयासाठी घ्यावीत, पण त्यांची किंमत साधारण १०० पाऊन्डस् इतकी असावी. आपण मला 'राष्ट्राचा उदय व विकास' या विषयावरील पुस्तके पाठवाल का? राष्ट्र या संकल्पनेचा भारतीय संदर्भात मला अभ्यास करायचा आहे.' *(पत्र क्र.५६७)*. महाराज नवीन माहिती असणारी पुस्तके मागवून घेत. त्यांचा सर्वंकष अभ्यास करत. त्या पुस्तकावर आपला अभिप्राय देत.

स्वतःला जागतिक घडामोडी समजाव्यात, यासाठी जागतिक पातळीवरील नवीन माहिती मिळवत असत. त्यासाठी जगातिक पातळीवरील अनेक मासिकांचे वाचन करत. त्या मासिकांचे महाराज वर्गणीदार होते. त्यांनी लिहिलेल्या एका पत्रात 'इंडिया' मासिकाला वर्गणी पाठवल्याबद्दलचा उल्लेख आहे.

महाराजांचा वेगवेगळ्या विषयांबद्दलचा अभ्यास नेहमी चालू असे. ज्यांना पत्र लिहावयाचे ती व्यक्ती जर त्याविषयाची जाणकार असेल तर त्याबद्दलचा उल्लेख आत्मीयतेने करत. इ.स. १८९६ मध्ये मि. इलियट यांना पाठवलेल्या पत्रात लिहितात, 'मी सध्या रोमन इतिहासाच्या वाचनात गढलो आहे. त्यानंतर ग्रीसच्या इतिहासाचे वाचन मला करावयाचे आहे. यापेक्षा अधिक रंजक किंवा आवश्यक अभ्यास दुसरा काही नसेल याची मी कल्पना करू शकतो. मी असे मानतो की, कोणतेही शिक्षण घेतलेल्या माणसाला या इतिहासाचे ज्ञान असायला हवे आणि या उद्देशाने मी या पुस्तकांचे देशी भाषेत भाषांतर करून घेत आहे. ब्राह्मण्याला न शोभणारा हा माझा अनेक छंदांपैकी एक छंद आहे.' *(पत्र क्र.२५१)*. महाराजांचा अभ्यास अशा प्रकारे नित्यनेमाने चालू असे. अभ्यासाने तत्त्वज्ञानासारखे विषय हाताळावेत एवढी योग्यता त्यांनी वाढवली होती. निरनिराळ्या विषयांतील माहिती मिळवण्यासाठी महाराज नेहमी प्रयत्नशील असत.

इ.स. १९३० मध्ये महाराजांचे वय ६७ वर्षे होते. या वयातही त्यांची ज्ञानसाधना चालूच होती. दिवाण रावबहादूर व्ही.टी. कृष्णम्माचारी यांना पॅरिसवरून पाठविलेल्या पत्रात महाराज लिहितात, 'मी श्री.बी.टी. काळे यांचे 'राज्यनीतिशास्त्रांची मूलतत्त्वे' हे पुस्तक वाचले आणि हा किचकट आणि विस्तृत स्वरूपाचा विषय त्यांनी योग्य रीतीने हाताळल्याबद्दल त्यांचे अभिनंदनही केले. हे खूप उपयोगी पुस्तक आहे आणि वाचण्यासही सोपे आहे. तथापि, पुस्तकाची किंमत काहीशी जास्त वाटते.' *(पत्र क्र.२१०९)*. अगदी उतारवयातही त्यांनी आपला ज्ञानसंग्रह वाढवण्याची आवड जोपासली होती. महाराज आयुष्याच्या शेवटपर्यंत आपण विद्यार्थी आहोत हे विसरले नाहीत.

साहित्याच्या आवडीमुळे महाराज कायम ग्रंथ सोबत ठेवून वाचन करत. सरदेसाई 'माझी संसारयात्रा' या आत्मचरित्रात महाराजांच्या वाचन व्यासंगाबाद्दल लिहितात, 'महाराजांच्या बहुतेक नोकरांत मीच बहुधा दीर्घकाळ पावेतो अत्यंत निकटवर्ती होतो. एक क्षणही फुकट जाऊ न देण्याची महाराजांची वृत्ती असल्यामुळे श्मश्रू करताना देखील ते मला वाचण्याचे किंवा पत्रलेखनाचे काम जवळ बसवून करवीत. पुष्कळदा महाराज - महाराणी दोघांच्याही सन्निध बसून मला कामे करावी लागत. नोकरीच्या पहिल्या दोन-तीन वर्षांत तर रात्री महाराजांच्या

पलंगाजवळ बसून तासन् तास वाचावे लागे. रात्री दहा-अकरा वाजता सुरुवात करून पहाटे तीन-चार वाजेपर्यंत वाचण्याचे काम मी कैक दिवस केले आहे.' *(सरदेसाई, माझी संसारयात्रा, १९५६, पृ. १०२)*. महाराजांचे वाचक म्हणून सरदेसाई यांचा अनुभव महत्त्वाचा आहे. त्यांचे हिंदुस्थानच्या बाहेर जसजसे प्रवास घडत होते, जगातील नानाविध प्रकारचे साहित्य त्यांच्या वाचनात येत होते तसतसे त्यांना साहित्याविषयी जास्तच आपुलकी वाटत होती. त्यांचा वाचन व्यासंग आणि साहित्याविषयीची आवड दिवसेंदिवस वाढतच होती.

## २) महाराजांची झिंगारा बोट

साहित्यप्रेमापोटी आणि साहित्य सर्वांपर्यंत पोहोचावे यासाठी महाराजांनी काही उपाययोजना केल्या. त्यात स्वतःच्या वाचनासाठी काही सोयी करून ठेवल्या होत्या. त्यातील एक म्हणजे महाराजांनी विकत घेतलेली झिंगारा बोट. पहिल्या पत्नीच्या मृत्यूने आणि अतिश्रमामुळे महाराजांना निद्रानाश जडला. त्यावर उपाय म्हणून त्यांना अनेकांकडून थंडगार पाण्याने स्नान, व्यायाम, जलपर्यटन असे उपाय सुचवले गेले. त्यातील युरोप प्रवास हा त्यांच्या आजारावरील उत्कृष्ट उपाय ठरला. युरोपातील थंड हवेच्या ठिकाणी त्यांना शांत झोप येत असे. त्यामुळे त्यांना वारंवार युरोपात जावे लागे. महाराज प्रवासात असले तरी त्यांनी वाचनाची आणि ग्रंथांची सोबत सोडली नाही. महाराज देशात किंवा परदेशात असताना पुस्तके कायम जवळ ठेवत. मुक्कामाच्या ठिकाणी ते वाचन करत. तसेच 'परदेशातील प्रवासात बोटीच्या डेकवर वाचन करणे' हा सर्वांत सुखावह अनुभव असतो, असे मत त्यांनी अनेक वेळा व्यक्त केले. एक-दोन प्रवासानंतर महाराजांच्या लक्षात आले की, जलपर्यटन करताना चांगली झोप येत आहे. सारखे-सारखे युरोपात जावे लागू नये; तसेच देशात समुद्र किनाऱ्याने प्रवास करता यावा यासाठी त्यांनी दुसऱ्या जगप्रवासाच्या वेळी सन १८८८ मध्ये युरोपात स्वतःसाठी 'झिंगारा' नावाची आगबोट विकत घेतली होती. त्यामध्ये बसून हिंदुस्थानच्या समुद्रकिनारी वाचत-वाचत फिरता यावे हा मुख्य उद्देश होता. तिची लांबी ११० फूट लांब होती, तर मध्यभागी रुंदी ३० फूट होती. ही बोट सर्वांगसुंदर सजवलेली होती.

रियासतकार सरदेसाई यांनी आगबोटीचे सुंदर वर्णन केले आहे. या बोटीमध्ये महाराजांच्या आवडीनुसार ग्रंथालयाची सोय करण्यात आली होती. महाराजांनी ज्यावेळी प्रथम ती बोट पाहिली त्यावेळी ती त्यांना खूप आवडली. त्याविषयी सरदेसाई लिहितात, 'ती उत्तम शृंगारलेली नवीन बोट पाहून महाराजांस व बरोबरच्या मंडळीस फार फार समाधान वाटले. बाणकोटच्या बंदरात चार-पाच तास पावेतो सर्वांनी बोटीतील एकूण एक जागा व सोयी तपासून पाहिल्या. त्यात खुद्द महाराजांचा मुख्य काळ बोटीवरच्या पुस्तकालयात गेला. इतर सामानाबरोबर एक टुमदार दालन पुस्तकालय म्हणून शृंगारलेले असून त्यात चार-दोन हजार तरी इंग्रजी ग्रंथ सुंदर नक्षीच्या कपाटात ठेवलेले होते. मध्ये टेबलावर लिहिण्या-वाचण्याची परिपूर्ण तयारी होती.' *(सरदेसाई, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-६, १९३३, पृ.६)*. महाराजांनी ही बोट जलप्रवासासाठी

तयार करून घेतली असली तरी, तिचा मुख्य उद्देश वाचन करणे हा होता. त्यामुळे बोट तयार करताना मुद्दामहून त्यामध्ये सुंदर ग्रंथालय तयार केले होते. वाचण्याच्या सवयीने त्यांना निर्भेळ आनंद मिळत असे. त्याच आठवणीत सरदेसाई पुढे लिहितात, 'त्या दिवशी श्रीमंतांची वृत्ती तर अत्यंत तल्लीन झाली होती. बराच वेळ त्यांनी पुस्तकालयात काढला आणि प्रत्येक पुस्तकावर आपले नाव शाईने लिहून काढण्याचे कामास त्यांनी मला जोडले.' *(सरदेसाई, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-६, १९३३, पृ. ६)*. महाराजांना ग्रंथांची, साहित्याची आवड होती. त्यामुळेच या बोटीवरील अनेक ग्रंथांची निवड स्वत: केली. बोटीवर टुमदार ग्रंथालय उभारले. ग्रंथांची, वाचनाची आवड असल्याशिवाय हे घडणे शक्य नाही.

पुढे काही दिवसांनी महाराजांच्या दिवाणांनी आपल्या अलिबाग येथील घरी जाण्यासाठी महाराजांच्या पूर्व परवानगीने ही बोट वापरली. त्यावेळी महाराजांचे बंधू आनंदराव हेही सोबत होते. बोटीच्या कॅप्टनला अलिबाग बंदरातील माहिती नव्हती. त्या बाजूने कॅप्टनने प्रवास केला नव्हता; परंतु दिवाणांनी आग्रह केला. अलिबाग बंदरातील माहिती असल्याचे दिवाणांनी सांगितले, त्यामुळे कॅप्टन तयार झाला. पुढे बोटीची एका खडकास धडक बसून ती बुडाली. महाराजांचे ग्रंथही त्यासोबत बुडाले. त्याबद्दल सरदेसाई म्हणतात, 'महाराजांना याबद्दल अत्यंत दुःख झाले; परंतु त्यांनी दिवाणांवर कोणतीही कारवाई केली नाही.' आवडती बोट बुडाल्यावर महाराज बडोद्याच्या रेसिडेंट यांना पत्रात लिहितात, 'झिंगारा बाबत जे काही घडले ते ऐकून मला फार वाईट वाटले. जर बोट तेथे गेलीच नसती तर फारच बरे झाले असते.' *(पत्र क्र.१८८५)*. अशा प्रकारे चांगले ग्रंथालय अचानक नष्ट होणे कोणत्याही साहित्यप्रेमी व्यक्तीला त्रासदायक आणि दुःख देणारे ठरते; अगदी तशीच स्थिती महाराजांची झाली. त्यांच्या आवडीचे हे ग्रंथालय अल्पावधीत नष्ट झाले.

### ३) महाराजांचा ग्रंथसंग्रह

महाराजांना साहित्य वाचनाबरोबर इतरही वाचनाची आवड होती. ते नेहमी नवनवीन विषयांचे वाचन करत. त्यामुळे त्यांना नवीन विषयांच्या पुस्तकांची निकड उत्पन्न होत असे. वेगवेगळ्या देशात गेले असता अनेक माहितगार माणसांकडून ग्रंथांची माहिती करून घेत. ते ग्रंथ खरेदी करत. त्यामुळे त्यांच्याकडे ग्रंथांचा पुष्कळ संग्रह होता. बडोदा संस्थानातही दुर्मिळ आणि पुष्कळ ग्रंथसंग्रह असावा अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या ग्रंथसंग्रहाबद्दल आपटे म्हणतात, 'अमेरिकेतील सुप्रसिद्ध ड्यूई विद्यालयात वाचनालयाचे शिक्षण घेतलेल्या मि. बोर्डेन नावाच्या तज्ज्ञ गृहस्थांना महाराजांनी बडोद्यातील मध्यवर्ती वाचनालयाची स्थापना करण्यासाठी पसंत केले व त्यांच्या प्रमुखत्वाखाली बडोद्यात सन १९१० मध्ये सेन्ट्रल लायब्ररीची स्थापना करण्यात आली. आरंभापासून शहर विभाग व इतर विभाग असे संस्थेचे दोन विभाग करण्यात आले.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ.६४१)*. या ग्रंथालयात अधिकारी आणि नोकरांच्या मदतीने कमी कालावधीत जगभरातील लाखभर ग्रंथांचा संग्रह केला. महाराज या संग्रहालयाला संस्थानचे वैभव समजत होते. धनापेक्षा त्यांनी या ग्रंथांची जपणूक केली.

महाराजांचे स्वतःचेही खासगी ग्रंथालय होते. त्यामध्ये त्यांनी त्यांना ज्या विषयांत आवड आहे, जे विषय जनतेचे कल्याण करणारे आहेत, ज्या ग्रंथांच्या वाचनामुळे मानवी जीवनात आमुलाग्र बदल होतात अशा विषयांचे ग्रंथ त्यांनी खासगी ग्रंथालयात ठेवले होते. त्यांच्या वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षी खासगी ग्रंथालयात वीस हजारपेक्षा जास्त ग्रंथांचा संग्रह होता. आजही त्यांचे वैयक्तिक ग्रंथालय लक्ष्मीविलास राजवाड्यात दिमाखात उभे आहे. एका राजाच्या, संस्थानिकाच्या खासगी ग्रंथालयात एवढा मोठा संग्रह असणे तशी दुर्मिळ गोष्ट आहे; परंतु महाराजांनी ही गोष्ट प्रत्यक्ष साध्य करून दाखवली होती. त्यांनी नानाविध विषयांवरील ग्रंथसंग्रह जमा केला; यावरून त्यांची साहित्याविषयीची आवड दिसते. त्यांचे साहित्यप्रेम लक्षात येते.

महाराजांना वाचनाची आवड असल्याने वेळोवेळी वेगवेगळया विषयांची माहिती देणे, नवीन प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची खबरबात ठेवणे, हिंदुस्थानातील नव्हे; तर जगातील महत्त्वाचे ग्रंथ कोठे मिळतात याची माहिती घेणे अशी कामे सरदेसाई यांच्याकडे असत. त्यांनी महाराजांच्या ग्रंथप्रेमाची अनेक उदाहरणे आठवणीत दिली आहेत. त्यांनी अनेक विषय महाराजांना समजावून सांगितले. सरदेसाई आत्मचरित्रात लिहितात, 'महाराज एकटेच काही दिवस मकरपुऱ्यात राहत होते. रात्री दोन वाजता शहरात माझ्या घरी सरकारी मोटार आली की महाराज बोलावतात. मी तसाच कपडे घालून चार मैल गेलो. वाड्यात खाली ए.डी.सी. होते. त्यांस विचारले, 'का बोलावले? मला महाराजांकडे घेऊन चला.' ए.डी.सी. म्हणाले, 'मला तुमच्यासोबत येण्याचा हुकूम नाही, ते वर आहेत, कोठे काय करताहेत मला माहीत नाही. तुम्ही त्यांस शोधून भेटा.' मी जिन्यावरून वर गेलो. अंधुक प्रकाशात एका टेबलाजवळ स्वारी पुस्तक वाचत बसलेली दिसली. मी जवळ जाऊन वंदन केले. मला बोलले, 'झोप येईना म्हणून काहीतरी गप्पा कराव्यात म्हणून तुम्हांस बोलावले.' मग मी पुराणातल्या गप्पा चालू केल्या. कालिदास, रघुवंश, तुकाराम, रामदास सर्वांची त्यांजपुढे झडती घेतली.' *(सरदेसाई, माझी संसारयात्रा, १९५६, पृ.१०६)*. महाराज वेगवेगळया विषयांचे वाचन करत. विविध लेखकांनी लिहिलेल्या पुराणातील साहित्याचे वाचन करत. त्यांना नवीन विषयाबद्दल नेहमीच कुतूहल असे. त्यामुळे त्यांच्याकडे विविध विषयांतील नावीन्यपूर्ण ग्रंथसंग्रह होता. त्याचा ते नेहमीच वापर करत असत.

रियासतकार सरदेसाई महाराजांविषयीच्या आठवणीत पुन्हा लिहितात, 'आपल्या मनाशीच एखादा विषय सारखा घोळत बसण्याची ज्यांस सवय असते, अशा अंतर्मुख वृत्तीचे श्रीमंत महाराज साहेब असल्यामुळे, कैक दिवसपावेतो त्यांची मुद्रा उदास व सिंचत दिसत असे. ही वृत्ती उत्तरोत्तर कशी वृद्धींगत होत गेली, हे मी कौतुकाने पाहत आहे. पहिल्याच वर्षी मला रात्री त्यांचे पलंगाजवळ बसून रात्रभर पुस्तक वाचत बसण्याचे बरेच प्रसंग आले. इंग्रजी गोष्टींचे पुस्तक किंवा तुकारामांचे अभंग वगैरे काहीतरी मला वाचण्यास सांगत. खोलीत अंधार ठेवून पलंगाच्या खुराजवळ बारीक दिवा घेऊन मी रात्री १० वाजता वाचण्यास सुरुवात करी, ते सकाळी चार-पाच वाजेपर्यंत श्रीमंत बहुतेक जागेच असत, आणि त्यातून डोळा लागलाच तर वाचणाराचे तोंड खळले की, जागे होत. मधूनमधून किती वाजले म्हणून विचारीत. रात्रभर मुळीच झोप न

आली तर पाचचे सुमारास मला घरी जाण्यास निरोप देत; आणि अत्यंत प्रेमाने सांगत. आता दिवसभर निजून रहा, पुन: रात्रीपर्यंत बाहेर येऊ नका.' *(सरदेसाई, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-६, १९३३, पृ.४)*. संस्थानच्या राज्यकारभाराचा ताण, इंग्रजांचा ससेमिरा आणि कौटुंबिक कलह यातून मोकळीक मिळावी म्हणून महाराज कायम ग्रंथांच्या सान्निध्यात राहण्याचा प्रयत्न करत. नवनवीन ग्रंथांचे वाचन करत. फक्त मोकळीक मिळावी म्हणून महाराज वाचन करत नव्हते तर त्यांना साहित्याची उपजत आवड होती.

महाराज वाचलेल्या पुस्तकांवर खुणा करत. पुस्तक वाचून झाल्यावर त्यावर सही करत. ग्रंथ वाचल्यावर ग्रंथांच्या उपयुक्ततेनुसार, आशयानुसार आणि प्रकारानुसार अनुकूल किंवा प्रतिकूल मत नोंदवत. जर ग्रंथकार परिचयाचा असेल, तर त्यास ग्रंथ वाचल्याची पोच देत. त्यांनी ही सवय कायम जोपासली. यातूनच त्यांच्या अनेक साहित्यिकांशी ओळखी झाल्या.

बडोद्यात मध्यवर्ती ग्रंथालय स्थापन केल्यावर महाराजांनी सर्वप्रथम स्वत: जवळील वीस हजारांचा ग्रंथसंग्रह भेट दिला. त्यामुळे या ग्रंथालयाची ग्रंथसंख्या वाढली.

### ४) साहित्यिकांच्या भेटी आणि त्यांचे केलेले मान-सन्मान

महाराज साहित्यप्रेमी राजा होते. साहित्यिकांच्या संपर्कात राहणे, विविध समारंभानिमित्त साहित्यिकांना बडोद्यात बोलावून घेणे हा त्यांचा नित्यक्रम ठरलेला असे. त्यांना देशातील तसेच परदेशातील साहित्यिकांविषयी आदर होता. ते नेहमी साहित्यिकांच्या संपर्कात राहत. त्यांच्या आवर्जून भेटी घेत. हिंदुस्थानातील साहित्यिकांना ते भेटीसाठी बोलावून घेत. साहित्यिकांच्या भेटी घेणे, त्यांच्याबरोबर चर्चा करणे हा त्यांचा आवडता विषय होता. त्यातील काही साहित्यिकांच्या आठवणी पुढे दिल्या आहेत.

मामा परमानंद 'नेटिव्ह ओपिनियन' पत्राचे संपादक होते. त्या पत्रातून आदर्श राजाला उद्देशून काही लेख लिहीत. ते लेख महाराज आदराने आणि तन्मयतेने वाचत. मामा परमानंद सयाजीराव महाराजांकडे 'आदर्श राजा' म्हणून पाहत होते. त्यांचा राज्यकारभार उत्तम चालावा, त्यांनी प्रजेच्या जीवनात आमूलाग्र बदल करावा असे मामांना मनापासून वाटत होते. महाराष्ट्रातील काही मंडळी बडोद्यात महत्त्वाच्या हुद्यावर असावी असेही मामांना नेहमी वाटे. त्यामुळे त्यांनी रामचंद्र धामणसकरांची शिफारस दिवाणांकडे केली. काही कालावधीनंतर धामणसकरांची नायब सरसुभे पदावर नेमणूक झाली. पुढे काही दिवसांनी धामणसकरांनी महाराजांना सांगून महाराष्ट्रातील थोर समाजसेवक, साहित्यिक महात्मा जोतीराव फुले यांना बडोद्यात बोलावून घेतले.

महात्मा फुले बडोद्यास गेल्यावर त्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाचे हस्तलिखित महाराजांना वाचून दाखवले. महाराजांनीही वेळात वेळ काढून हा ग्रंथ शांतपणे ऐकला. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी मदत केली. महात्मा फुले यांनी या ग्रंथाच्या प्रास्ताविकात महाराजांबद्दल आदर आणि ऋण व्यक्त केले आहे. महात्मा फुले लिहितात, 'श्रीमंत सरकार गायकवाड सेना

खासखेल समशेर बहादूर सयाजीराव गायकवाड यांनी मी बडोद्यास गेलो होतो त्यावेळी आपल्या सर्व राजकीय कामातील अमोल वेळात काटकसर करून अप्रतिम उत्साहाने व सप्रेम भावाने मजकडून हा ग्रंथ वाचवून साग्र लक्षपूर्वक ऐकिला व श्रीमन्महाराजांनी आपल्या औदार्याप्रमाणे मला द्रव्याद्वारे मदत करून माझा यथासांग अत्युत्तम आदरसत्कार केला, त्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे.' महात्मा फुले महाराष्ट्रात समाजसुधारणेचे कार्य करत होते. तसेच कार्य बडोद्यात घडावे यासाठी फुले यांच्याप्रमाणे सयाजीराव महाराजही आग्रही होते. त्यांनी त्यादृष्टीने कार्यही चालू केले होते. किंबहुना  दोन्हीकडे समाजसुधारणेचे कार्य समांतर सुरू होते. महाराज आणि महात्मा फुले यांचा पत्रव्यवहार पुढेही चालू राहिला.

दामोदर सावळाराम यंदे यांनी 'महात्मा फुले यांच्या अप्रकाशित आठवणी' या ग्रंथात 'महाराज आणि महात्मा फुले' यांच्यातील स्नेहासंबंधीची महत्त्वाची आठवण नमूद केली आहे. यंदे लिहितात, 'श्रीमंत सयाजीराव यांच्या सहवासात माझा जो काही काळ गेला, त्या काळात कितीतरी वेळा महाराजांनी महात्मा जोतीराव फुले ह्यांच्या बद्दलची आठवण काढून त्यांची थोरवी भरल्या मुखाने गायिलेली मी माझ्या कानाने ऐकली आहे. त्यांच्याबद्दल महाराजांना मोठा अभिमान वाटे व महाराजांच्या मनात ज्योतीरावांबद्दल उच्च दर्जाचा आदर वसत असे. ज्योतीरावांच्या सत्यनिष्ठेची, त्यांनी केलेल्या कार्याची व त्यांच्या बहुमोल त्यागाची थोरवी आपल्या मंडळींना उपदेश करते वेळी महाराज हटकून सांगत असत, ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे.' *(रघुवंशी, प्रकाशक, १९९०, पृ.३)*. महाराजांनी लेखक आणि समाजसुधारक महात्मा फुलेंना कायम मदत केली. त्यांचा आदर केला. महाराजही पुण्यास आले असता महात्मा फुलेंना भेटीसाठी बोलावून घेत. त्यांच्याबरोबर समाजसुधारणेबरोबर साहित्याविषयीही चर्चा करत.

गोविंद गणपत काळे यांनी वरील ग्रंथात यासंबंधीची आणखी एक महत्त्वाची आठवण नमूद केली आहे. काळे लिहितात, 'बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांशी तात्यांचे (महात्मा फुले) मोठे प्रेम असे. ते वर्षांतून एकदा तरी बडोद्यात जात असत व तेथे १०-१५ दिवस राहत असत. एका वर्षी त्यांचा महाराजांकडे जवळजवळ तीन महिने मुक्काम झाला होता. महाराज पुण्यास आले म्हणजे ज्योतीरावांकडे आपली घोडागाडी पाठवून त्यांना भेटीस बोलवीत असत.' *(रघुवंशी, प्रकाशक, १९९०, पृ.१५)*. महाराजांनी साहित्यिक आणि समाजसुधारक महात्मा फुलेंशी कायम स्नेहसंबंध ठेवला. दोघांना परस्परांविषयी खूप आदर वाटत होता.

महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल पोवाडा रचला होता. तशाच प्रकारचा पोवाडा महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या जीवनावर रचला. तो पोवाडा रामचंद्र धामणसकर यांच्यामार्फत महाराजांकडे पाठवून दिला. 'महाराजांनी त्यानंतर पुन्हा फुले यांना बडोद्यास बोलावून घेतले. समाजसुधारणेवर त्यांची दोन-तीन व्याख्याने करवली. सयाजीराव व फुले यांचे खासगीत बोलणेही झाले. सयाजीरावांनी समाजसुधारणेचे काम हाती घ्यावे, अशी जोतीरावांनी विनंती केली व महाराजांनी ती मान्य केली.' *(भांड, लोकपाळ राजा सयाजीराव,*

*२०१३, पृ. ५७)*. महाराज साहित्यिक, विद्वान यांच्या भेटी घेत. त्यांना बडोद्यास बोलावून घेत. उपयुक्त विषयांवर चर्चा करत. त्यातून योग्य असणाऱ्या विषयात सुधारणा करत.

साहित्यिक, विचारवंत आणि प्रकाशक दामोदर सावळाराम यंदे आणि त्यांचे मित्र रामजी संतुजी आवटे यांच्याबरोबर 'शेतकऱ्यांचा कैवारी' हे वृत्तपत्र मुंबई येथे सुरू केले. या वर्तमानपत्राविषयी सयाजीराव महाराजांना समजले. त्यांनी या दोघांना बडोद्यात बोलावून घेतले. बडोद्यात आल्यावर दोघांनी 'बडोदा वत्सल' हे वृत्तपत्र सुरू केले. नंतर 'श्रीसयाजी विजय' हे साप्ताहिक चालवले. यंदे यांची साहित्याविषयीची धडपड पाहून महाराज प्रभावित झाले. काही कालावधीतच यंदे महाराजांचे चांगले साहित्यिक मित्र झाले. त्यांच्या भेटी नेहमी होत होत्या. भेटीत साहित्य विषयावर चर्चा होत होती. यंदे स्वतःच्या कर्तृत्वाने बडोद्यातील नामांकित आणि महत्त्वाचे साहित्यिक आणि प्रकाशक झाले. पुढे यंदे यांनी बडोद्यात 'ग्रंथ संपादक आणि प्रसारक मंडळी' नावाची संस्था स्थापन केली. या मंडळाचा वार्षिक समारंभ झाल्यावर महाराजांनी यंदे यांना भेटीसाठी बोलावले. ती भेट यंदे यांच्यासाठी संस्मरणीय होती. त्याबाबत यंदे म्हणतात, 'ठरल्यावेळी मी राजमहालात हजर झालो. वेळ होताच बोलावणे आले. हुजऱ्याच्या मागोमाग वरच्या मजल्यावर महाराजांच्या वाचनालयात दाखल झालो. आत जाताच महाराजांस मुजरा करून दूर उभा राहिलो. वाचनालयात विलायतेहून नुकतीच बरोबर आणलेली अनेक पुस्तके क्रमवार ठेवलेली होती आणि ती महाराज चाळून पहात होते. मला पाहताच महाराज म्हणाले, 'या मि. यंदे, येथे माझ्याजवळ कोचावर बसा.' श्री. महाराजांशेजारी त्यांच्या कोचावर बसणे मला प्रशस्त वाटेना. मी म्हणालो, 'महाराज, आपल्या शेजारी बसणे योग्य नाही. आपली काय आज्ञा आहे ती कळवावी.' त्यावर महाराज म्हणाले, 'मी राजा आहे असे मानू नका. मी एक मित्र आहे असे समजा व येथे बसा. आपल्याबरोबर मला पुष्कळ बोलायचे आहे.' महाराजांचा आग्रह दिसल्यामुळे निरुपाय होऊन मी कोचावर बाजूस बसलो. महाराज म्हणाले, 'तुम्ही चालविलेले ग्रंथप्रकाशनाचे काम फार चांगले आहे. सोप्या भाषेत लिहिलेल्या शास्त्रीय व इतिहास विषयावर मराठी भाषेत ग्रंथांची फार जरूरी आहे.' समोर ठेवलेल्या अनेक पुस्तकांच्या संग्रहाकडे बोट करून महाराज पुढे म्हणाले, 'ही पहा, कशी महत्त्वाची पुस्तके इंग्रजीत रोज नवी नवी प्रसिद्ध होत आहेत. अशी पुस्तके मराठीत सोप्या भाषेत प्रसिद्ध झाली पाहिजेत, की जेणेकरून बहुजन समाजास सुलभतेने शास्त्रीय विषयाचे ज्ञान होईल.' *(यंदे, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-६, पृ. ८१)*. महाराज साहित्यिकांच्या भेटी घेऊन त्यांच्याबरोबर साहित्याविषयी सविस्तर चर्चा करत. त्यांना देशी भाषेत सोपे सुलभ आणि सर्वांना समजणारे वेगवेगळ्या विषयांवरील साहित्य निर्माण व्हावे असे वाटत होते. त्यासाठी त्यांनी साहित्यिकांना साहित्यनिर्मितीसाठी मदत केली. काही कालावधीनंतर ही संस्था मुंबई येथे गेली. मुंबई येथे ही संस्था स्थलांतरित झाली तरी महाराज आणि यंदे यांचा स्नेह कायम होता.

महाराज महात्मा फुले, दामोदर सावळाराम यंदे याचबरोबर महाराष्ट्रातील तसेच देशातील इतर साहित्यिकांच्या भेटी घेत. त्यांच्याबरोबर उपयुक्त विषयांवर चर्चा करत. त्यांची वृत्ती मुळातच

ज्ञानलुब्ध, ज्ञानसंग्रह करणारी होती. त्यांनी हिंदुस्थानातील रवींद्रनाथ टागोर, जगदीशचंद्र बोस, सर राधाकृष्णन, कांटावाला, चिंतामणराव वैद्य, विठ्ठल रामजी शिंदे, गंगानाथ झा, जयस्वाल, राधाकमल मुखर्जींसारख्या विद्वानांना बडोद्यात बोलावून घेतले. त्यांच्याशी साहित्याबाबत विचारविनिमय केला.

महाराजांनी विदेशातील पहिली सफर इ.स. १८८७ साली केली. ते पर्यटनासाठी आणि आरोग्य स्वास्थ्य लाभण्यासाठी विदेशात गेले. या प्रवासात त्यांनी विदेशातील साहित्यिकांच्याही भेटी घेतल्या. परदेशातील साहित्यिक हयात नसतील तर त्यांच्या निवासस्थानी किंवा स्मारकांना भेटी दिल्या. महाराज जिनिव्हा येथे गेले असताना प्रसिद्ध फ्रेंच स्त्रीलेखिका मादाम-द-स्ताएल हिचे राहण्याचे स्थान, सुप्रसिद्ध ग्रंथकार व्हॉल्टेअरचे घर, इंग्रज कवी बायरन याने आपल्या 'चाइल्ड हॅराल्ड' या सुप्रसिद्ध काव्याचा तिसरा सर्ग जेथे लिहिला ते स्थान, रूसो या प्रसिद्ध लेखकाचा पुतळा असलेले बेट अशी अनेक ठिकाणे पाहिली. महाराजांचा हा पहिलाच परदेश दौरा असूनसुद्धा त्यांनी साहित्यिक आणि विद्वान लोकांच्या घरांना भेटी दिल्या.

या पहिल्या प्रवासात महाराजांनी फ्रान्स देशालाही भेट दिली होती. त्या भेटीत त्यांनी लेखकांच्या स्मारकांना भेटी दिल्या. 'फ्रान्समधील प्रसिद्ध लेखक, मुत्सद्दी वगैरे पुरुषांच्या समाध्या असलेली 'पेअर ला शेज' ही इमारतही त्यांनी पाहिली. येथे फॉन्टेन, मोलिअर, अबेलार्द वगैरे पुरुषांच्या अस्थी संग्रहित केल्या आहेत.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ४०१)*. महाराज साहित्यिक आणि साहित्यिकांच्या स्मारकांना भेटी देत. त्या भेटीपासून स्फूर्ती मिळावी, प्रेरणा मिळावी हा त्यांचा हेतू होता.

महाराजांनी इ.स. १९१० च्या मार्च महिन्यात परदेशातील नववी सफर केली. या प्रवासात त्यांनी चीन, जपान, सॅन फ्रान्सिस्को, कॅनडा, लंडन या देशांना भेटी दिल्या. याच प्रवासात त्यांनी अमेरिकेलाही भेट दिली. त्याबाबत आपटे म्हणतात, 'ते जपानहून अमेरिकेत आले व तेथील अनेक प्रमुख शहरी गेले. नायगारा येथील प्रसिद्ध धबधबा पाहून ते न्यूयॉर्कला आले. तेथे हार्वर्ड युनिव्हर्सिटीतील प्रसिद्ध पंडित लॅनमन, बंपस वगैरे गृहस्थांच्या भेटी घेऊन ता. १२ जून रोजी खान्याचे आमंत्रण आल्यावरून ते अमेरिकेचे प्रेसिडेंट रुझवेल्ट यांच्याकडे गेले.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ७६७)*. देश कोणताही असू देत महाराज त्या देशातील विद्वान, पंडित, लेखक यांच्या भेटी घेत. त्यांच्याशी विचारविनिमय करत. आपल्या सभोवती नेहमी साहित्यिक वातावरण ठेवण्याचा प्रयत्न करत.

सयाजीराव महाराजांनी पुढील एका भेटीत इंग्लंडमधील प्रसिद्ध सरोवरांच्या प्रदेशाला भेट दिली. हा प्रदेश सौंदर्याने नटलेला होता. तेथील सर्व सरोवरे पाहत असताना त्यांनी कवी वर्डस्वर्थचे आवडते ठिकाणही पाहिले. त्याबाबत आपटे म्हणतात, 'रायडल वॉटर या नावाचे लहानसे सरोवर असून त्याच्याजवळच वर्डस्वर्थ या सुप्रसिद्ध कवीचे एका खडकावर बसण्याचे स्थान आहे. तेथून पुढे ग्रासमियर हे वर्डस्वर्थचे आवडते सरोवर असून, त्यात एक लहान पण सुंदर असे बेट आहे.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ८११)*. महाराजांना परदेशातील नामांकित

आणि विद्वान लेखकांबद्दल माहिती होती, त्या लेखकांची घरे त्यांनी पाहिली. त्या लेखकांना आवडणारी स्थळेही त्यांनी पाहिली.

महाराज परदेशात गेले असता राहण्यासाठी प्रत्येक वेळी चांगली जागा मिळत नसे म्हणून त्यांनी तेथे घर घेतले. 'तेथे आपली एखादी कायमची जागा असावी अशा हेतूने त्यांनी वॅटफर्ड नजीकची 'रसेल्स इस्टेट' नावाची जागा व घर खरेदी केले. त्याचप्रमाणे तिकडील सरे परगण्यातील लॉर्ड टेनिसन या राजकवीचे 'ऑल्डवर्थ' नावाचे घरही त्या भोवतालच्या बगीच्यासह खरेदी केले.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ९७८)*. महाराजांना साहित्यिकांविषयी आदर होता. त्यांनी परदेशात पहिले घर घेतले असतानाही दुसरे घर केवळ लॉर्ड टेनिसन या प्रतिभावंतांचे आहे म्हणून घेतले. टेनिसन यांचे घर अडगळीला पडू नये. त्याची देखभाल दुरुस्ती व्हावी यासाठी हे घर खरेदी केले. टेनिसन जेथे लिखाणासाठी बसत त्या मेजावर बसून महाराजांनी एक छायाचित्रही काढले.

महाराज देशात किंवा परदेशात असताना जास्तीत जास्त वेळ साहित्याच्या अभ्यासात घालवत. अनेक साहित्यिकांना चर्चा करण्यासाठी बोलावून अनेक गहन विषयांवर चर्चा करत. परदेशातही साहित्यिकांची व्याख्याने आवर्जून ऐकत. प्रजेला त्यांच्या ज्ञानाचा उपयोग कसा होईल याचा विचार नेहमी करत.

महाराज स्वत: विद्वान साहित्यिक आणि प्रज्ञावंत होते. अनेक विषयांचे ज्ञान त्यांनी ग्रहण केले होते. ते साहित्यिक आणि विद्वान यांचा नेहमीच आदर करत, साहित्यनिर्मितीसाठी वेगवेगळ्या मार्गांनी मदत करत. त्यांनी अनेक साहित्यिकांना बडोद्यास बोलावून घेतले. त्यांचा सन्मान केला. त्याचबरोबर हिंदुस्थानातील व्यक्तीने परदेशात आपल्या ज्ञानाची चुणूक दाखवली तर त्यांचाही खास आदर-सत्कार केला.

## ५) साहित्यिकांना राजाश्रय

महाराजांनी बडोदा संस्थानातील तसेच हिंदुस्थानातील अनेकांना शिष्यवृत्ती देऊन परदेशात शिक्षणासाठी पाठवले. त्यामधील अनेकांनी आपल्या हुशारीने नाव कमावले. त्यामधील दोन महत्त्वाची उदाहरणे सांगता येतील. 'ता. ८ जुलै १९११ सर कृष्ण गोविंद गुप्त या विद्वान बंगाली गृहस्थांना प्रथमच भारतमंत्र्यांच्या कौन्सिलच्या सभासदत्वाचा मान मिळाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनासाठी महाराजांच्या अध्यक्षतेखाली एक मोठा समारंभ करण्यात आला.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ७७०)*. महाराज अशा विद्वानांच्या सन्मानासाठी नेहमीच तत्पर असत. त्याच कार्यक्रमात भाषण करताना महाराज म्हणाले, 'जर हिंदी संस्थानातून युरोपियन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याने त्या संस्थानांचा फायदाच झाल्याचा अनुभव आजपर्यंत आला आहे, तर ज्यांची बुद्धिमत्ता व कर्तृत्वशक्ती कसोटीला लागलेली आहे, अशा लायक हिंदी गृहस्थांची ब्रिटिश हिंदुस्थानातील राज्यकारभाराच्या महत्त्वाच्या जागांवर नेमणूक करण्यास हिंदुस्थान सरकारने भिण्याचे काही कारण नाही.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ७७१)*. हिंदुस्थानातील

विद्वान व्यक्तीने आपल्या हुशारीने जर ब्रिटिश राज्यकारभारात किंवा इतर ठिकाणी नाव कमावले तर महाराज त्यास शाबासकी देत. यातून महाराजांची गुणग्राहकता आपल्याला दिसून येते.

सयाजीराव महाराजांनी दिलेल्या शिष्यवृत्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी परदेशात शिक्षण घेतले. त्यांनी पुढे जाऊन समाजासाठी चांगले काम केले. तसेच गोलमेज परिषदांमध्ये अभ्यासपूर्ण भाषणे केली. इ.स. १९३१ सालच्या गोलमेज परिषदेतही आंबेडकरांनी उत्कृष्ट भाषण केले. त्याबद्दल आंबेडकरांचे चरित्रकार खैरमोडे म्हणतात, '१९३१ साली लंडन येथे गोलमेज परिषदेचे अधिवेशन होते. सयाजीराव महाराजही यास उपस्थित होते. पंतप्रधानांच्या भाषणानंतर हिंदुस्थानातील संस्थानिकांचे प्रतिनिधी म्हणून पहिले भाषण सयाजीरावांचे झाले. या परिषदेतील बाबासाहेबांचे दलित आणि त्यांच्या हक्कासंबंधीचे विचार बघून त्यांना समाधान वाटले. सयाजीरावांनी बाबासाहेब आंबेडकरांना 'हॅन्स क्रिसेंट' हॉटेलवर जंगी पार्टी दिली. या पार्टीत बरेच संस्थानिकही हजर होते. महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. त्यामुळे पार्टीतल्या आमंत्रित हिंदुस्थानी व ब्रिटिश सभासदांचा बाबासाहेबांबद्दल आदर वाढला' *(खैरमोडे, खंड-४, १९६८, पृ. ११४)*. महाराज आणि बाबासाहेब यांच्यात या कार्यक्रमाच्या अगोदर बरेच दिवस भेट किंवा पत्रव्यवहार नव्हता. तरीही या भाषणानंतर सर्वांसमोर त्यांच्या विद्वत्तेचा सन्मान केला. त्याच कार्यक्रमात डॉ. आंबेडकर महाराजांस म्हणाले, 'आपण अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न करत आहोत यासाठी मदत करावी.' मदतीसाठी तत्पर असणाऱ्या दानशूर महाराजांनी कोणतीही विचारपूस न करता त्यांना १५० पौंडांचा चेक दिला. पुढे बाबासाहेबांनी समाजसुधारणेत आणि साहित्यात महत्त्वपूर्ण काम केले हे सर्वश्रुत आहे.

महाराजांनी साहित्यिकांना 'सयाजीपदक' आणि 'वर्षासन' सुरू केले. त्याचा फायदा जे साहित्यिक आर्थिक अडचणीत होते त्यांना झाला. त्याबद्दल महाराजांचे समकालीन चरित्रकार य. रा. दाते म्हणतात, 'त्यांनी सयाजीपदक व वर्षासन देऊन कांटावाला, चिंतामणराव वैद्य, विठ्ठल रामजी शिंदे वगैरेंचा गौरव केला आहे व कवी चंद्रशेखर यांची राजकवी म्हणून नेमणूक करून त्यास मासिक बिदागी दिली आहे.' *(दाते, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-१, १९३३, पृ. ६५)*. महाराज होतकरू आणि नावीन्यपूर्ण साहित्य निर्माण करू पाहणाऱ्या साहित्यिकांना कायमस्वरूपी मदत करत होते, तर महाराजांनी साहित्यिकांचा सन्मान केल्याचे दाते सांगतात, 'विद्वान, साहित्यभक्त यांचा यथोचित सत्कार करून उच्च साहित्योपार्जन करणे हे नेहमीच डोळ्यापुढे ध्येय असे. या ध्येयास अनुसरून त्यांनी सर रवींद्रनाथ टागोर, जगदीशचंद्र बोस, सर राधाकृष्णन, कांटावाला, चिंतामणराव वैद्य, गंगनाथ झा, जयस्वाल, राधाकमल मुखर्जींसारख्या थोर विद्वानांचा सत्कार केला व त्यांची व्याख्याने करवून आपल्या प्रजाजनास त्यांच्या ज्ञानाचा लाभ करून दिला. हजारो पुस्तक कर्त्यांनाही आजपर्यंत उत्तेजन दिले.' *(दाते, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-१, १९३३, पृ. ८७)*. महाराजांनी हिंदुस्थानातील समकालीन थोर विद्वान आणि साहित्यिकांना बडोद्यात आणले. त्यांचा सन्मान केला. बाबा भांड यांनी वरील साहित्यिकांव्यतिरिक्त इतर साहित्यिक आणि विद्वानांना मदत केल्याचे म्हटले आहे. 'हिंदुस्थानातील अनेक विद्वानांना, पंडितांना आणि

शास्त्रज्ञांना महाराजांनी बडोद्यात बोलावले. श्री. सयाजी व्याख्यानमालेत या ज्ञानी माणसांची व्याख्याने आयोजित केली. त्यांचा सत्कार केला. पं. मदन मोहन मालवीय, सी.व्ही. रमन, सरोजनी नायडू, वि.दा. सावरकर, मार्क ट्वेन, रुडयार्ड किप्लिग, हंस स्वरूप स्वामी, डॉ. रामचंद्र भांडारकर, डॉ. कीर्तीकर, जदुनाथ सरकार, न.चिं. केळकर, जोतीबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, अण्णासाहेब कर्वे, अहिताग्नी राजवाडे, प्रा. पांगारकर, ई.एम. फॉस्टर ही मान्यवर मंडळी बडोद्यास येऊन गेली.' *(भांड, लोकपाळ राजा सयाजीराव, २०१३, पृ. १८२)*. सयाजीराव महाराजांनी या सर्वांना साहित्यनिर्मितीसाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्याकडून चांगल्या प्रकारची साहित्यनिर्मिती होण्यास मदतच झाली.

हिंदुस्थानातील खरे ज्ञान हे संस्कृत ग्रंथात होते. त्याचा उपयोग सर्वसामान्यांना होत नव्हता; परंतु बडोदा संस्थानातील अनेक विद्वानांनी ते ग्रंथ सोप्या स्वरूपात मांडले. त्यामुळे ते ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचू लागले. याकामी प्रो. रानडे, दासगुप्त, राधाकृष्णन या विद्वानांची मदत होऊ लागली. त्यांचा महाराजांनी सन्मान केला. त्याबाबत आपटे म्हणतात, 'महाराजांनी अशा लोकांचा सन्मान करण्याची एक योजना काही वर्षांपूर्वी केली आहे; व तद्नुसार प्रो. राधामुकुंद मुकर्जी, श्रीयुत चिंतामणराव वैद्य अशांसारख्या विद्वान लेखकांचा महाराजांनी सन्मान करून त्यांना पदव्या व पदके अर्पण केली आहेत.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ९००)*. पंडित बद्रीनाथ त्र्यंबकेश्वर शास्त्री हे संस्कृत साहित्याचे गाढे अभ्यासक होते. त्यांना महाराजांनी 'तर्क वाचस्पती' ही बहुमानाची पदवी बहाल केली होती. संस्कृत विद्वानांबरोबर इतरही साहित्यिकांचा सन्मान केला.

महाराजांनी १६ फेब्रुवारी १९३० रोजी चिंतामणराव वैद्य व दामोदर सावळाराम यंदे यांचा सन्मान करण्यासाठी खास दरबार भरवला होता. त्या दरबारात त्यांना सन्मानचिन्हे दिली, त्यावेळी महाराजांनी त्यांच्याविषयी आदर व्यक्त करणारे भाषण केले. त्या भाषणात ते म्हणाले, 'सन १९२५ साली वाङ्मय, शास्त्रे व ललितकला याविषयी विशेष कर्तबगारी करणाऱ्या गृहस्थांचे चीज त्यांना पदके व रोख रकमा देऊन करण्याची योजना मी केली आहे. आज या ठिकाणी एक ग्रंथकार व एक प्रकाशक यांचा सन्मान करण्यात येत आहे. वाङ्मयकलेच्या या अंगामुळे जगाच्या आनंदात कितीतरी अमूल्य भर पडली आहे. हा विषय निरंतर माझ्या जिव्हाळ्याचा असल्यामुळे मला हे कार्य करताना फार आनंद होत आहे.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ९०१)*. या दरबारप्रसंगी रवींद्रनाथ टागोर उपस्थित होते. महाराजांनी वैद्य आणि यंदे यांचा भाषणातून गौरव केला. नामांकित लेखक आणि प्रकाशक यांचा त्यांनी आदर सत्कार केला. केवळ यांचा आदरसत्कार करण्यासाठी दरबार भरवला. हा त्या व्यक्तींचा सन्मान तर होताच, त्याचबरोबर साहित्याचाही सन्मान होता. याप्रसंगी महाराजांनी केलेले भाषण हे साहित्यिकांचा आदर करणारे होते, साहित्याचा सन्मान करणारे होते. साहित्याविषयी आपुलकी दाखवणारे होते.

महाराज मराठी भाषेतील साहित्यिकांबरोबर इतर भाषांतील साहित्यिकांचाही सन्मान करत होते. दरवर्षी मार्च महिन्यात महाराजांच्या वाढदिवसानिमित्त गुजराती आणि मराठी

भाषेतील पाच-पाच प्रसिद्ध साहित्यिकांना बडोद्यास बोलावून घेत. त्यापैकी प्रत्येकाने आपल्या आवडीच्या विषयांवर व्याख्यान करावे आणि त्यानंतर त्यांचा सत्कार, मानसन्मान करण्यात यावा अशी योजना ठरविण्यात आली. साहित्यिकांची भाषणे पूर्वनियोजित असल्याने त्यामध्ये त्यांच्या विद्वत्तेचे प्रतिबिंब पडलेले असे. अशी व्याख्याने नष्ट होऊ नयेत यासाठी ती बडोदा सरकारमार्फत प्रसिद्ध करण्यात येत असत. साहित्यिकांच्या व्याख्यानांचा फायदा प्रजेला होत असे आणि विद्वानांच्या परिश्रमाचे चीज केले जात असे. अशा दुहेरी स्वरूपाची ही योजना होती.

महाराज विद्वानांचा सन्मान करत. त्याबद्दल आपटे म्हणतात, 'महाराजांना लेखनाची व वक्तृत्वाची आवड असल्यामुळेच त्यांना उत्तम लेखकांची व वक्त्यांची कदर करता येते. 'गुणी गुण: वेत्ति न वेत्ति निर्गुण:।' गुणवान मनुष्यच गुणांची पारख करू शकतो. ती निर्गुण मनुष्याला होऊ शकत नाही, या कारणाने महाराज बडोद्यात असताना हिंदुस्थानातील बहुतेक प्रमुख विद्वानांना व वक्त्यांना आमंत्रण देऊन त्यांची व्याख्याने करविली जातात व त्यांचा लाभ सर्वांना मुक्तहस्ताने दिला जातो. ...महाराजांनी आमंत्रण दिलेल्या लोकांखेरीज इतर विद्वान लोक बडोद्यास काही कारणांनी आल्यास त्यांची वर्दी महाराजांकडे दिल्याबरोबर त्या पाहुण्यास भेटीस बोलावण्यात येऊन त्यांच्या सवडीप्रमाणे त्यांच्या ज्ञानाचा व वक्तृत्वाचा फायदाही घेण्यात येतो. ज्याच्या त्याच्या व्यासंगाच्या विषयाबद्दल संभाषण व चर्चारूपाने त्यांच्याशी महाराज विचारविनिमय करतात.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ११८१)*. महाराज विद्वान, साहित्यिक यांची कदर करत. त्यांच्या ज्ञानाचा सन्मान करत. त्यांनी स्थापन केलेल्या बडोदा महाविद्यालयात बरेच प्राध्यापक परदेशातील होते. त्यांच्याबरोबर विविध कारणाने मुद्दामहून चर्चा करत. महाराजांनी त्यांना वेगवेगळया विषयांवर लिहिते केले. त्यांच्यातील अनेकांना सन्मानित केले.

महात्मा फुलेंनी महाराजांची बडोद्यात भेट घेतल्याचे याआधी पाहिले आहे. त्यानंतर त्यांचा योग्य प्रकारे मान-सन्मान केला. फुलेंच्या अखेरच्या काळातही महाराजांनी त्यांना मदत केली. 'पक्षाघाताने जोतिबांवर पहिला हल्ला केला. फुले असहाय स्थितीत बिछान्यावर पडून होते. मामा परमानंदांनी फुल्यांच्या मदतीसाठी आवाहन केले. सयाजीरावांनी धामणसकरांतर्फे फुल्यांना साहाय्य केले. फुले या आजारातून बरे झाले; पण पक्षाघाताने उजवा हात निकामी झाला. फुल्यांनी डाव्या हाताने 'सार्वजनिक सत्यधर्म' पूर्ण केले. दीड वर्षांनी पुन्हा फुले आजारी पडले. मामाही या काळात आजारी होते. तरीही त्यांना फुल्यांची काळजी होती. मामांनी धामणसकरांतर्फे सयाजीरावांना विनंतीपत्र पाठवले. 'जोतिबांनी अनेक वर्षे नि:स्वार्थपणे जनसेवा केली. सध्या ते असहाय स्थितीत काळ कंठित आहेत. फुल्यांना मदत करावी,' असा मजकूर होता. फुले आजारी असल्याची हकिगत सयाजीरावांना समजली. त्यांनी फुल्यांसाठी बराच पैसा पाठवला.' *(भांड, लोकपाळ राजा सयाजीराव, २०१३, पृ. ५९)*. महाराजांनी महात्मा फुले यांना अखेरपर्यंत मदत केली. महात्मा फुले यांच्यानंतर सावित्रीबाई फुले आणि यशवंत यांनाही मदत केली. त्यांनी फुले दाम्पत्याचा अखेरपर्यंत सन्मान केला. त्यांची काळजी घेतली.

मराठी साहित्यिकांना महाराजांचा फार मोठा आधार होता. मराठी साहित्यिक त्यांच्या आश्रयामुळे चांगले साहित्य निर्माण करू शकले. त्याबद्दल महाराजांचे चरित्रकार निंबाजीराव पवार म्हणतात, ‘कवी यशवंत, चिं.वि. जोशी, माधव ज्युलियन, रियासतकार सरदेसाई, वि.पां. दांडेकर, कवी चंद्रशेखर गोऱ्हे, कवी दत्त, दा.ना. आपटे, दामोदर सावळाराम यंदे आणि इतर कवी, लेखक यांना महाराजांचा आश्रय मिळाला होता. बालकवींनाही त्यांनी मदत देऊ केली होती.’ *(पवार, २०११, पृ. १६३)*. वरील साहित्यिकांव्यतिरिक्त इतरही मराठी साहित्यिकांना महाराजांनी मदत केली होती. महाराजांनी अनेक देशांतील आणि भाषांतील साहित्य वाचले होते. त्या तोडीचे साहित्य मराठीत निर्माण व्हावे अशी महाराजांची इच्छा होती (बडोद्यात वास्तव्यास असणाऱ्या, महाराजांचा राजाश्रय लाभलेल्या साहित्यिकांची यादी माहितीस्तव पुढे दिली आहे).

महाराज विविध ठिकाणी केलेल्या भाषणांत साहित्यिकांचा आदरपूर्वक उल्लेख करीत. त्यांनी अनेक परिषदांचे आणि संमेलनांचे उद्घाटन केले. अनेक परिषदांचे ते अध्यक्षही होते. त्या-त्या संमेलनात ते त्या विषयाच्या तज्ज्ञांच्या कार्याचा गौरव करत. त्यांच्या या उल्लेखामुळे विद्वान, साहित्यिकांना प्रोत्साहन मिळत असे. विद्वान, साहित्यिक अशा विशिष्ट लोकांशी आपला संबंध राहावा, त्यांच्याशी मैत्री वाढावी म्हणून महाराज त्यांना अनेक वेळा स्नेहभोजन, उपहार देत. तसेच सामूहिक खेळ, विविध प्रकराची प्रदर्शने, मान्यवरांची आणि विद्वानांची संमेलने भरवत. समारंभांचे आयोजन करत. या त्यांच्या प्रेमळ आणि आस्थेवाईक स्वभावामुळे अनेक साहित्यिकांनी बडोद्यास भेट दिली.

महाराज आदर्श राज्यकर्ता होते, तसेच साहित्याचे चाहते, साहित्यिकांचे आश्रयदाते आणि पोशिंदेही होते. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात अनेक नामांकित साहित्यिकांनी बडोद्यात वास्तव्य करणे पसंत केले. त्यांच्या कार्यकाळात बडोद्यात अनेक साहित्यिकांचा मेळा जमला होता, तर काही साहित्यिकांनी पूर्ण आयुष्यभर बडोद्यात वास्तव्य केले.

## छापखाने उभारणीत महाराजांचे साह्य

ग्रंथ सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी छापखान्यांच्या संशोधनाने फार मोठी मदत केली. त्यामुळे ग्रंथ छापण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञान आवश्यक असणे गरजेचे आहे हे महाराजांनी तात्काळ ओळखले. इंग्रजांच्या आगमनाने हिंदुस्थानात छपाईला सुरुवात झाली; परंतु सुरुवातीच्या काळात इंग्रजांनी महत्त्वाच्या ठिकाणी आणि आवश्यक तेथेच आणि त्यांना उपयोगी ठरतील असे छापखाने उघडले. हिंदुस्थानात इतर ठिकाणी छापखाने सुरू झाल्यानंतर बडोद्यासही त्याची सुरुवात झाली. याबाबत चरित्रकार आणि महाराजांच्या दत्तक विधानाची हकिगत लिहून ठेवणाऱ्या लेखकांच्या मते, महाराजांच्या दत्तक विधानावेळी बडोद्यात छापखाना होता. त्यावेळी छापलेल्या काही पुस्तकांतील नोंदीच्या आधारे याची त्यांनी पुष्टी केली. तो छापखाना अच्युत अनंत शास्त्री यांनी वैयक्तिकरीत्या काढला होता. त्याचा बराचसा बोलबाला झाल्यावर महाराज

खंडेराव गायकवाड यांनी या छापखान्यास भेट दिली. तो छापखाना पाहून खंडेराव महाराजांना आश्चर्य वाटले. हा छापखाना त्यांनी लागलीच सरकारी करून टाकला. त्याचे प्रमुख म्हणून अच्युत अनंत शास्त्री यांनाच नेमले. खंडेराव महाराज आणि सयाजीराव महाराज या दोघांच्या कार्यकाळात २७ वर्षे हा छापखाना सुरू होता. सयाजीराव महाराजांनी त्यापुढच्या काळात या छापखान्यास अधिक मदत केली. त्यामुळे छापखान्याची अधिक भरभराट झाली.

मराठी प्रकाशकांच्या प्रभातकाळात रावजी श्रीधर गोंधळेकरांनी पुण्यात १८८२ च्या सुमारास मुद्रण आणि प्रकाशनाचे काम सुरू केले होते. त्यांचे चिरंजीव केशवरावांनी छपाई धंद्यात चांगले नाव कमावले. महाराजांच्या कानी त्यांच्या या कामाचा बोलबाला गेला. महाराजांना आधुनिक आणि नावीन्यपूर्ण बाबींविषयी नेहमीच आकर्षण राहिले होते. त्यामुळे त्यांनी पुणे येथील गोंधळेकरांच्या छापखान्यास भेट दिली. त्याबाबत लिमये म्हणतात, '१८९० मध्ये त्यांच्या छापखान्यास बडोद्याचे महाराज सर सयाजीराव गायकवाड यांनी भेट दिली होती; आणि केशवरावांनी त्यांना थाटाची पानसुपारी केली होती. १८९२ मध्ये गायकवाडांसाठी केशवरावांनी सूपशास्त्र या ग्रंथांचे बरेचसे खंड छापून दिले. त्यामुळे श्रीमंत सयाजीराव त्यांच्यावर अधिकच खुश झाले; आणि १८९६ साली तीन वर्षांसाठी त्यांनी बडोद्याचा आपला सरकारी छापखाना केशवरावांना चालवण्यास दिला. या छापखान्यात त्या काळी १५० नोकर असत, आणि दरमहा पगारास तीन हजार रुपये लागत.' *(लिमये, १९७२, पृ. ५४)*. महाराजांनी चांगले ते स्वीकारत केशवरावांना छापखान्याचे प्रमुख नेमले. छापखान्यात नवनवीन आणि आधुनिक साहित्य आणण्यास मदत केली. त्यामुळे छापखान्याची आणखी प्रगती झाली.

महाराजांच्या राज्यकारभाराच्या सुरुवातीलाच या छापखान्याचा विकास चांगल्या पद्धतीने झालेला दिसतो. त्यांचा प्रथम विवाह ६ जानेवारी १८८० साली झाला. त्या विवाहाची छापील तीन पृष्ठांतील पत्रिका दाजी नागेश आपटे यांनी महाराजांच्या चरित्रात दिली आहे. ही अत्यंत सुबकपणे छापली आहे. यावरून महाराजांच्या राज्यकारभाराच्या प्रारंभीच्या काळात छापखान्यांची चांगली सोय बडोद्यात असल्याचे दिसते.

ग्रंथाची छपाई झाल्यानंतर त्याची ग्रंथबांधणी चांगल्या प्रतीची करणे गरजेचे असते. महाराजांनी याचीही उत्तम प्रकारे व्यवस्था केली. त्याबाबत दंडवते म्हणतात, 'बडोद्यातील सर्व छापखान्यांत ग्रंथबंधनाचे काम मुबलक व चांगले होत असून, याशिवाय येथील 'चिमणाबाई स्त्रीउद्योगालय' व 'सरस्वती बुक बाइंडिंग' या खाजगी; परंतु बडोद्यातील संस्थेत ग्रंथबंधनाचे काम चांगले होते. येथील सेन्ट्रल लायब्ररीत आपली पुस्तके बांधण्याकरिता खात्याच्या अंगभूत एक प्रवीण बाइंडर व तीन मदतनीसांची एक 'बाइंडरी' ठेवावी लागते. लायब्ररीतील बुक बाइंडिंगचे काम फार सुबक व टिकाऊ आहे.' *(दंडवते, १९२५, पृ. ३१)*. महाराजांनी छपाईसाठी सर्वोत्कृष्ट व्यक्तींची निवड केली. अगदी त्याचप्रमाणे छापलेले कागद ग्रंथ स्वरूपात येण्यासाठी, ग्रथांच्या बांधणीसाठीही उत्कृष्ट यंत्रणा कामाला लावली होती.

छापखाने आणि पुस्तकांची बांधणी या बाबी साहित्यनिर्मितीशी संबंधित नसल्या तरी साहित्याची निर्मिती झाल्यानंतर त्याची जुळवणी करणे, ते साहित्य लोकांपर्यंत पोहोचवणे यासाठी वरील दोन्ही प्रक्रिया महत्त्वाच्या आहेत. त्याशिवाय साहित्य ज्यासाठी निर्माण केले आहे, तो हेतू साध्य होणार नाही. या बाबतीत बडोद्यातील प्रगती लक्षणीय आणि वैशिष्ट्यपूर्ण होती.

## भाषा संवर्धनासाठी भाषांतर विभाग

महाराजांच्या हाती राज्यकारभार आल्यावर कमी कालावधीत त्यांच्या लक्षात आले, की देशी भाषेमध्ये साहित्याची निर्मिती कमी प्रमाणात होत आहे. त्यामध्ये वाढ केली पाहिजे. ती वाढ करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यांनी त्यावेळी जाणले, की देशी भाषेत ग्रंथनिर्मिती होण्यासाठी अगोदर त्या भाषांना बळ दिले पाहिजे. देशी भाषा सुदृढ केल्या पाहिजेत. त्या भाषांच्या संवर्धनासाठी, वाढीसाठी पोषक वातावरण तयार झाले पाहिजे. त्यानंतरच त्या भाषांमध्ये सशक्त, प्रगल्भ साहित्य निर्मिती होऊ शकते. त्याअगोदर इथल्या साहित्यिकांना परदेशी साहित्याची ओळख झाली पाहिजे; यासाठी परदेशातील साहित्य देशी भाषेत आणणे जरूरीचे आहे. म्हणून महाराजांनी भाषांतराला मदत केली.

काही इंग्रज अधिकाऱ्यांनी आणि मराठी भाषेचा अभिमान असणाऱ्या लोकांनी ‘डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी’ मुंबईस स्थापन केली होती. ही संस्था मुंबई इलाख्याचे त्यावेळचे गव्हर्नर कौन्सलर ना. विलोबी यांनी स्थापन केली होती; परंतु विलोबी निवृत्त झाल्यावर हे काम थंड पडले. काही कालावधीनंतर न्यायमूर्ती रानडे यांनी पुन्हा नव्याने प्रयत्न सुरू केले. त्यासाठी सयाजीराव महाराजांनी मदत केली. त्याबाबत ग्रंथप्रकाशनांचे अभ्यासक लिमये म्हणतात, ‘इ.स. १८९४ साली न्या. रानडे यांनी मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्ध्यर्थ पुन्हा प्रयत्न करण्यास सुरुवात केली व २० फेब्रुवारी १८९५ रोजी मुंबई येथील मूळ सोसायटी या नवीन प्रयत्नात समाविष्ट केली. सयाजीराव गायकवाड व इंदूरचे होळकर यांनी मराठ्यांच्या नऊ भागांतील इतिहास प्रसिद्ध करण्यास साहाय्य दिले होते. त्यांच्या व इतरांच्या सहकार्याने प्रारंभीच्या काळात या संस्थेच्या कार्याला भरघोसपणा आला होता.’ *(लिमये, १९७२, पृ. ८३)*. महाराजांनी मराठी भाषेत चांगले ग्रंथ निर्माण व्हावेत यासाठी न्यायमूर्ती रानडे यांच्या प्रयत्नांना बळ दिले.

त्यानंतर त्यांनी संस्थानातही इंग्रजी ग्रंथांचे भाषांतर होण्यासाठी मदत करण्यास सुरुवात केली. त्यांनी इ.स. १९०८ साली ‘भाषांतर शाखा’ काढली.

### १) भाषांतर शाखा

महाराजांनी त्यांच्यासाठी नेमलेल्या शिक्षकांच्या मदतीने विद्याग्रहण केली. त्यानंतर चिकाटीने आणि कष्टाने अधिक अभ्यास केला. विशेषत: इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवले. कालांतराने परदेशातील साहित्य त्यांच्या वाचनात आले. त्यामुळे महाराज परदेशातील साहित्याशी देशी

साहित्याची तुलना करू लागले. परदेशातील साहित्याच्या तुलनेत त्यांना देशी साहित्यातील उणेपणा दिसू लागला. तो उणेपणा दूर करण्याचे त्यांनी ठरवले. देशी भाषांत अधिकाधिक सदृढ साहित्य निर्माण व्हावे यासाठी पाठबळ देण्याचा निश्चय केला. आर्थिक मदत केली. परदेशातील साहित्य वाचल्याने इथले साहित्यिक आणि प्रजा अधिक सजग बनेल असा त्यांना विश्वास वाटत होता. यासाठी परदेशातील साहित्याच्या भाषांतरासाठी प्रोत्साहन दिले. परदेशातील उत्कृष्ट साहित्याचे भाषांतर व्हावे असे त्यांना वाटत होते.

महाराजांनी पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर निद्रानाश घालवण्यासाठी आरोग्याच्या कारणाने परदेश प्रवासाला सुरुवात केली. महाराज ज्या-ज्या देशात जात त्या देशांतून विविध विषयांवरील ग्रंथ आपल्या बरोबर घेऊन येत. त्यातील आवश्यक वाटणाऱ्या आणि उपयुक्त ग्रंथांचे देशी भाषांतून भाषांतर करून घेत. अशा भाषांतरासाठी हुजूरहुकूम काढला. तो पुढीलप्रमाणे - 'देशी भाषांतील ग्रंथ सामग्री वाढावी, या उद्देशाने परभाषेतील ग्रंथांचे भाषांतर करविण्याची व नवीन पुस्तके लिहिण्यास आश्रय व उत्तेजन देण्याची योजना विद्याखात्याने करवावी. खर्चाच्या प्रमाणाने सरकारचा हेतू पार पडण्यासारखे काम झाले आहे की नाही, याबद्दल खात्री करून घ्यावी व सरकारचा खर्च गैररीतीने न होण्याबद्दल सर्वांनी सावधगिरी ठेवावी. पुस्तके करण्याबद्दलच्या व त्यासाठी उत्तेजन किंवा पारितोषिक मिळण्याबद्दलच्या मागण्या निरनिराळ्या खात्यांकडे न येता, एकाच खात्यात याव्या. एखादा नवीन ग्रंथ करविण्याचे किंवा भाषांतर करविण्याचे काम हुकूम घ्यावयासाठी रुजू करण्यात आले, तर त्याच्या खर्चाबरोबरच ते छापविण्याचा खर्च किती येईल, त्याचाही अजमास दाखवीत जावा आणि नवीन अगर तर्जुमे केलेली पुस्तके सरकारी खर्चाने तयार करवून त्यावर सर्व प्रकारे सरकारचा हक्क ठेवावा.' *(आपटे, खंड-२,१९३६, पृ. ६६३)*. परदेशातील ग्रंथ भाषांतरित झाल्यास त्याचा सर्वांनाच फायदा होईल, याबाबत त्यांना मनोमन खात्री वाटत होती. नवीन ग्रंथांना सरकारी मदत मिळाली पाहिजे यासाठी महाराज आग्रही होते. महाराजांनी भाषांतरित ग्रंथ तयार करताना आणि देशी भाषांत ग्रंथ तयार करताना त्याबाबत काळजी घेतली. त्यानुसार त्यांनी वरील हुकूम काढला. देशी भाषांत उत्तमोत्तम साहित्य निर्माण व्हावे यासाठी महाराज कायम प्रयत्नशील असल्याचे त्यांच्या हुकमांवरून दिसते.

महाराजांच्या हुकमांमुळे आणि आर्थिक मदतीमुळे भाषांतराचा विस्तार वाढला. विविध प्रकारच्या साहित्याची भाषांतरे सरकारी आश्रयाने होऊ लागली. त्यांनी भाषांतराच्या विस्तारवाढीनंतर इ.स. १९०८ साली 'भाषांतरशाखा' निर्माण केली. या शाखेमुळे भाषांतराला अधिक पाठबळ मिळाले. भाषांतर शाखेमधून नानाविध विषयांवरील ग्रंथ प्रकाशित होऊ लागले.

## २) भाषांतरासाठी केलेली आर्थिक मदत

महाराजांना ग्रंथ, साहित्य आणि साहित्यिक यांच्याविषयी अपार प्रेम असल्यामुळे त्यांनी भाषांतरासाठी हिंदुस्थानातील कानाकोपऱ्यातील व्यक्तींना, संस्थांना मदत केली. राज्यकारभाराच्या कालखंडात त्यांनी भाषांतराला प्रोत्साहन दिले. फार मोठी आर्थिक मदतही

केली. या कामाची सुरुवात त्यांनी राज्यकारभार हाती आल्यानंतर अल्पावधीतच केली. 'महाराजांनी सन १८८८ साली शास्त्रीय शिक्षणाची पुस्तके गुजराथीत तयार करण्यासाठी ५०,००० रुपयांची रक्कम मंजूर करून त्याबद्दलची सर्व व्यवस्था प्रो. गज्जर यांचेकडे सोपवली.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ.६६५)*. देशी भाषेत साहित्य यावे यासाठी महाराज मदत करत होते. संस्कृत भाषेतील ग्रंथांबद्दल महाराजांना कुतूहल होते. त्यासाठीही त्यांनी मदत केली होती. 'इंग्रजीतील ग्रंथांप्रमाणे संस्कृतातील उत्तम ग्रंथांची भाषांतरे करण्याची व्यवस्थाही महाराजांनी आपल्या अधिकारप्राप्तीनंतर लवकरच केली. येथील श्रावणमास दक्षिणेचे ५,५०० रुपये दरसाल नवीन पुस्तके तयार करण्यासाठी त्यांनी लावून दिले व नंतर त्याच निधीतून धर्मशास्त्रावरील उत्तम पुस्तके मराठीत प्रसिद्ध करण्यासाठी दरसाल १०,००० रुपये खर्च करण्याचा हुकूम दिला.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ६६७)*. महाराजांनी वरील रकमा फक्त भाषांतरासाठी खर्च केल्या. त्यातून कायमस्वरूपी ग्रंथनिर्मिती व्हावी याची तजवीज करून ठेवली. ज्या काळात संस्थानिक जनतेचा पैसा चैनबाजी आणि उधळपट्टी यात खर्च करत होते, त्या काळात अशा कामासाठी पैसे देणारा राजा विरळाच म्हणावा लागेल. महाराजांनी अशा सत्कृत्यांसाठी संस्थानच्या खजिन्यातून खर्च केला. यावरून महाराजांचे दातृत्व हे किती सत्पात्री होते हे समजते.

त्यांना परदेशात तयार झालेल्या ग्रंथांचे भाषांतर करणे अत्यंत महत्त्वाचे वाटत होते. त्यासाठी मदत म्हणून त्यांनी अशा रकमा अनेक वेळा मंजूर केल्या. त्याबाबत अधिक माहिती देताना आपटे म्हणतात, 'या भाषांतरशाखेची स्थापना इ.स. १९०८ साली केली. तेव्हापासून सन १९३२ अखेरपर्यंत महाराजांनी तिच्यावर दीड लाख रुपयांहून अधिक खर्च केला आहे व त्यातील मराठीच्या वाट्यास साठ हजारांवर रुपये आले असून, साहित्यमाला निघण्यापूर्वीचा असा एकंदर खर्च जवळ जवळ तीन लाखापर्यंत जातो. म्हणजे आपल्या साठ वर्षांच्या कारकिर्दीत सुमारे पाच-सहा लाख रुपये ग्रंथनिर्मितीसाठी महाराजांनी खर्चिले आहेत, त्यावरून या कामी महाराजांनी केलेल्या कार्याचे महत्त्व दिसून येईल.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ८८८)*. नानाविध विषयांवर साहित्य निर्माण व्हावे यासाठी महाराज तजवीज करून ठेवत होते. विविध विषयांवर चांगले साहित्य निर्माण व्हावे यासाठी त्यांनी अधिकाधिक लेखकांना पैसे दिले. त्यांना मदत केली. महाराजांना परदेशातील साहित्य प्रगल्भ वाटत होते. ते जर देशी भाषेत आले तर ते पाहून आपलेही साहित्यिक अधिक चांगले साहित्य निर्माण करतील अशी अपेक्षा त्यांना होती. म्हणून भाषांतरासाठी त्यांनी लाखो रुपये खर्च केले.

भाषांतराबाबतचे एक अतिशय बोलके उदाहरण देता येईल. सयाजीराव महाराजांनी दुसरा परदेश प्रवास २६ जून १८८८ ते ९ ऑक्टोबर १८८८ या कालावधीत केला. या प्रवासात त्यांनी इटलीची राजधानी रोम पाहिले. रोममधील अनेक वास्तूंनी त्यांचे मन आर्किषत करून घेतले. त्यामध्ये मार्कस ऑरेलियस या बादशहाचा पुतळाही होता. तो त्यांना फार आवडला. हा रोमचा विद्वान, तत्त्वज्ञानी बादशहा इ.स. १२१ ते इ.स. १८० कालखंडात होऊन गेला होता. या बादशहाने स्वतःच्या उपजत बुद्धीच्या जोरावर तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र यात प्रावीण्य मिळवले

होते. मेडिटेशन्स या विषयावर महत्त्वाचे ग्रंथ लिहिले होते. त्यांनी आदर्श जीवन कसे जगावे यासाठी बोधवचने लिहिली होती.

ही सर्व बोधवचने 'मेडिटेशन्स ऑफ मार्कस् ऑरेलियस' या ग्रंथात संग्रहित केली होती. महाराजांनी या ग्रंथाचे मुळातून वाचन केले. ती बोधवचने त्यांना खूप आवडली; परंतु ही बोधवचने परकीय भाषेत असल्याने मराठी भाषा अवगत असणारांना ती दुर्बोध होती, म्हणून त्यांनी बोधवचनांचे मराठीत भाषांतर करून घेतले. या ग्रंथांचे भाषांतरकार सिमियन बेंजमिन ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात, 'मार्कस ऑरेलियस' ह्या अलौकिक महापुरुषाची थोडीशी तरी माहिती व्हावी आणि त्याने एखादा बोधपर ग्रंथ केला असल्यास त्याचे एकवार तरी वाचन घडावे अशी उत्कंठा कोणाच्या चित्तात उद्भवणार नाही बरे? तेव्हा अशा ह्या महाकीर्तीमान पाश्चात्त्य राजर्षीचे थोडेसे वृत्त व त्याच्या एका सर्वप्रसिद्ध ग्रंथाचे भाषांतर महाराष्ट्र जनास वाचावयास मिळावे ह्या अत्यंत स्तुत्य हेतूने श्री. सयाजीराव महाराज गायकवाड सरकार यांनी मला इ.स. १८९१ च्या डिसेंबर महिन्यात एतद्विषयक एक ग्रंथ देऊन त्याचे मराठीत भाषांतर करण्याची आज्ञा दिली.' *(बेंजमिन, १८९३, पृ. ४)*. महाराजांना ही बोधवचने परिणामकारक वाटल्याने त्यांनी हा आदेश दिला. बेंजमिन यांनी या ग्रंथाचे सुबोध मराठीत भाषांतर केले. हा ग्रंथ महाराजांनी 'महाराष्ट्र ग्रंथमाले'अंतर्गत प्रसिद्ध केला होता. इ.स. १८९३ साली प्रसिद्ध झालेला हा ग्रंथ आज दुर्मिळ आहे. आदर्श जीवन आणि समाज घडण्यासाठी अशा ग्रंथाची नितांत आवश्यकता आहे. या ग्रंथाचे वाचन होणे गरजेचे आहे. त्यासाठी या ग्रंथाचे पुनर्प्रकाशन व्हायला हवे. महाराजांनी अशा मानवी जीवनासाठी उपयोगी ठरणाऱ्या ग्रंथांच्या भाषांतरासाठी प्रथम प्राधान्य दिले.

महाराज संस्थानात भाषांतर होत असलेल्या ग्रंथांना मदत करत होते. त्याचबरोबर संस्थान बाहेर जे लोक ग्रंथांचे भाषांतर करत त्यांनाही महाराजांनी मदत केली. त्याबाबत अनंत लिमये म्हणतात, 'इ.स. १८९३ मध्ये एकूण ८८ पुस्तके प्रसिद्ध झाली. प्रकाशक दाभोळकरांचे 'संसारसुख' (कृष्णशास्त्री गाडगीळ) हे पुस्तक याच सालातले व महत्त्वाचे होय. श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या सूचनेनुसार दाभोळकरांनी ते प्रसिद्ध केले. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत दाभोळकर म्हणतात, 'संसारसुख' हा ग्रंथ (Pleasures of Life - John Laboch) मराठीत छापल्यास आम्ही काही प्रती घेऊ व बक्षीस देऊ.' *(लिमये, १९७२, पृ. १६१)*. महाराजांनी अशा अनेक ग्रंथांना आश्रय देऊन महत्त्वपूर्ण साहित्यनिर्मिती करून घेतली आणि स्वतःहून करणारांना मोठी मदत केली. प्रचलित विषय आणि इतर अनेक अप्रचलित विषयांवर पुस्तके प्रकाशित करण्याचे श्रेय सयाजीराव महाराजांना जाते. त्यांनी अशा नवीन विषयांतील ग्रंथांना नेहमीच मदत केली.

महाराजांना वेगळ्या आणि नवीन विषयांचे आकर्षण असल्याने त्यांनी अशा ग्रंथ निर्मितीत मदत केली. याबाबत आणखी एक उदाहरण म्हणजे 'विद्युत आणि चुंबन' हे बालाजी प्रभाकर मोडक यांचे पुस्तक होय. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत मोडक म्हणतात, 'सयाजीराव गायकवाडांच्या शास्त्रीय ग्रंथमालेत पहिला भाग प्रसिद्ध झाला होता. १८९८ मध्ये ती माला बंद

पडली. परंतु ग्रंथकार आपल्या खर्चाने व जबाबदारीवर ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्यास पत्करीत असल्यास त्यास मालेकरिता लिहविलेले ग्रंथ छापण्यास परवानगी देण्याचे श्री. गायकवाड सरकार यांनी ठरविले. त्याप्रमाणे लिहिलेला सर्व भाग प्रसिद्ध करण्याच्या धर्तीवर मी केलेल्या भाषांतराची प्रत मिळाली. नंतर पुस्तक प्रसिद्ध केले.' *(लिमये, १९७२, पृ. १७०)*. बाहेर तयार होणाऱ्या पुस्तकास महाराज नेहमीच उदारहस्ते मदत करत होते.

स्वभाषेत दर्जेदार साहित्य निर्माण व्हायचे असेल, तर त्यासाठी सर्वप्रथम स्वभाषेतील साहित्यिकांसमोर आदर्श निर्माण केला पाहिजे याची महाराजांना कल्पना होती. तो आदर्श भाषांतर केलेल्या साहित्यातून निर्माण होऊ शकतो यावर त्यांचा विश्वास होता. तो आदर्श निर्माण करण्यासाठी त्यांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केले. त्यांनी भाषांतर करून घेतलेल्या ग्रंथांचे महत्त्व आजच्या काळातही अबाधित आहे. हे ग्रंथ आजही मार्गदर्शक आहेत.

महाराजांना परदेशी साहित्य प्रगल्भ वाटत असले तरी, देशी साहित्याबद्दल त्यांनी नेहमी आस्था बाळगली होती. परदेशी साहित्याच्या भाषांतराला त्यांनी राज्यकारभाराच्या प्रारंभी महत्त्व दिले. महाराजांच्या मते, आपले साहित्यिक स्वत:हून नावीन्यपूर्ण साहित्यनिर्मिती करत नाहीत तोपर्यंत भाषांतराशिवाय आपणापुढे पर्याय नाही. भाषांतर ही प्रक्रिया आपल्यासाठी आवश्यक आहे असे मतही महाराज नेहमी व्यक्त करत.

### ३) महाराजांच्या आर्थिक मदतीमुळे निर्माण झालेले महत्त्वाचे ग्रंथ

महाराजांनी या उपक्रमांतर्गत निरनिराळया साहित्यिकांमार्फत वेगवेगळया देशांतील ग्रंथ भाषांतरित करण्यास सुरुवात केली. त्याकामी त्यांनी अनेक कष्टाळू, जिज्ञासू, होतकरू विद्वानांची मदत घेतली. विषय वेगवेगळे असल्यामुळे त्यांनी त्या-त्या विषयानुसार माला तयार केल्या. परदेशातील निरनिराळे खेळ आणि त्यासंबंधी पुस्तके 'क्रीडामाला' या मालेअंतर्गत प्रकाशित केली. पाकशास्त्राच्या, सूपशास्त्राच्या अभ्यासासाठी नामदेवराव रामचंद्रराव कदम यांना परदेशात पाठविले. त्यांनी परदेशातील या विषयावरील अनेक पुस्तके परत येताना सोबत आणली. त्यांचे भाषांतर केले. त्या पुस्तकांसाठी 'पाकशास्त्रमाला' निर्माण केली. इतिहास हा महाराजांचा आवडीचा प्रांत होता. वेगवेगळया देशांच्या इतिहासाविषयी त्यांना कुतूहल होते. पाश्चिमात्य देशातील इतिहासाच्या पुस्तकांचे भाषांतर करून त्यासाठी 'राष्ट्रकथामाला' निर्माण केली. वेगवेगळया शास्त्रातील नावीन्यपूर्ण माहिती सर्वांना व्हावी यासाठी शास्त्रीय ज्ञानविषयक 'सयाजी ज्ञानमंजूषा' आणि 'लघुज्ञानमंजूषा' अशा दोन माला निर्माण केल्या. त्याचप्रमाणे त्याच कालखंडात 'महाराष्ट्र-ग्रंथमाला' आणि 'धर्मशास्त्र-ग्रंथमाला' निर्माण केल्या गेल्या. या मालांमधून महत्त्वाच्या विषयांवर ग्रंथनिर्मिती होऊ लागली, तर काही ग्रंथ भाषांतरित होऊ लागले. या मालांच्या माध्यमातून प्रारंभीच्या काळात मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती झाली. त्याबाबत आपटे म्हणतात, 'या मालांच्या माध्यमातून त्याविषयीचे ५२ ग्रंथ मिळून सुमारे १०५ ग्रंथ महाराजांनी आपल्या पहिल्या आमदानीत तयार केले.' *(आपटे, खंड-२, १९३६,*

*पृ. ६६४)*. परदेशातील साहित्याने देशी साहित्यिकांना स्वभाषेतील साहित्य निर्मितीसाठी प्रेरणा मिळावी यासाठी महाराज प्रयत्नशील होते. या विविध माला म्हणजे महाराजांच्या काळातील साहित्यातील परमोच्च बिंदू होता. बडोदा संस्थानात प्रारंभीच्या काळात भाषांतराला महत्त्वाचे स्थान होते.

महाराजांनी ग्रंथ भाषांतरित करण्यासाठी आवड असणाऱ्या गुणवान व्यक्तींची निवड केली. त्यामध्ये काही लेखकांनी चमकदार कामगिरी केली. प्रारंभीच्या काळात महाराजांनी भाषांतराची पूर्ण जबाबदारी शंकर मोरो रानडे यांच्यावर सोपवली होती. त्यांनी या मालांत महत्त्वाचे कार्य केले. त्याचबरोबर नाटकांसाठी 'नाट्यकथार्णव' नावाची स्वतंत्र माला तयार केली. त्यांनी इतरही अनेक ग्रंथ लिहिले. त्याबाबत आपटे म्हणतात, 'रानडे हे अष्टपैलू विद्वान असून, हव्या त्या विषयावर वाटेल त्या वेळी लेख लिहू शकत, अशी त्यांची ख्याती असे. ऐनेराजमेहेल अथवा राजवाडादर्पण हा मोठा ग्रंथ त्यांनी शास्त्री मंडळीच्या साहाय्याने महाराजांच्या आज्ञेने सन १८८८ साली लिहिला. ... तसेच 'वधूपरीक्षा' हे अत्यंत व्यवहारोपयोगी पुस्तक लिहिले.' *(आपटे, खंड-२,१९३६, पृ. ६६४)*. 'राजवाडादर्पण' या ग्रंथात राजवाड्यातील वर्षभरात होत असलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती देण्यात आली आहे. तसेच विविध खात्यांकडून करण्यात येणाऱ्या उपक्रमांचीही माहिती देण्यात आली आहे. हिंदू समाजातील चालीरीतींची आणि धार्मिक विधींची माहिती सर्वांना व्हावी हाही उद्देश या ग्रंथ निर्मितीमागे होता. वरील सर्वच ग्रंथ त्या काळातील महत्त्वाचे ग्रंथ होते. भाषांतर शाखेची जबाबदारी शंकर मोरो रानडे यांनी समर्थपणे पेलली. रानडे यांनी सर्वच साहित्यविषयक माला नावारूपास आणल्या.

महाराजांचे भाषांतर शाखेकडे अधिक लक्ष होते. प्रारंभीच्या काळात या शाखेला ज्या व्यक्तींचे योगदान लाभले त्यामध्ये कलाभवनाचे प्राचार्य त्रिभुवनदास गज्जर यांचाही वाटा महत्त्वाचा होता. शास्त्रीय शिक्षणावरील पुस्तके भाषांतर करण्याची जबाबदारी गज्जरांकडे होती. गज्जरांना काही रक्कम देऊन त्याची सर्व जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली. गज्जरांनी शास्त्रीय विषयांवरील अभ्यास करत परदेशातील ग्रंथांची भाषांतरासाठी निवड केली. त्यांनी या ग्रंथांच्या भाषांतराबाबत नेहमीच सकारात्मक भूमिका ठेवली आणि विविध विषयांवरील ग्रंथ भाषांतरित केले.

भाषांतर शाखेतून प्रकाशित होणाऱ्याग्रंथांची 'Literature of Knowledge' आणि 'Literature of Power' या दोन विभागात विभागणी करण्यात येत असे. त्यालाच मराठीत 'ज्ञानवर्धक वाङ्मय' व 'तेजोवर्धक वाङ्मय' अशी नावे देण्यात आली होती. यामधून देशी भाषांच्या साहित्यासाठी उपयोगी असणारे अनेक ग्रंथ निर्माण केले. मराठी साहित्यातही यामुळे कमालीची भर पडली.

महाराजांनी देशी भाषेत ग्रंथ तयार करण्यासाठी आणि अन्य भाषांतील ग्रंथांचे भाषांतर करण्यासाठी विद्वान लेखकांना नोकरीत नेमले होते. 'अशा गृहस्थांपैकी मणिलाल द्विवेदी हे एक होते. त्यांनी पाटण येथील जैन भांडारातून एकवीस ग्रंथांचे संशोधनात्मक भाषांतर केले.'

*(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ६६५)*. महाराजांनी त्यांच्याकडून विविध विषयांवरील ग्रंथांचे भाषांतर करून घेतले तसेच द्विवेदी यांनी स्वतःही नवीन ग्रंथांची निर्मिती केली.

महाराजांना त्यांच्या शिक्षकांनी संस्कृत भाषेचे महत्त्व पटवून दिले होते. अभ्यासांती याबाबत त्यांची स्वतःचीही खात्री झाली होती. संस्कृत भाषा ज्ञान, माहिती, शास्त्र याबाबत कोठेही मागे नाही याचीही त्यांना खात्री झाली; परंतु सर्वसामान्य लोकांना संस्कृत भाषा दुर्बोध होती. त्यामुळे त्या भाषेत असणाऱ्या ग्रंथांचे भाषांतर होणे गरजेचे आहे; असे महाराजांना वाटत होते. त्यांनी त्याचीही कार्यवाही तात्काळ सुरू केली. हिंदुस्थानातील लोकांना त्यांच्या धर्माचे ज्ञान त्यांना अवगत असणाऱ्या भाषेत मिळावे यासाठी उपाययोजना केल्या. धर्मातील चालीरीती, धर्मातील तत्त्वज्ञान हे सर्वसामान्यांना स्पष्टपणे समजले पाहिजे, असा महाराजांचा अट्टहास होता. त्यांना वाटत होते की, धर्म व्यवस्थित न समजल्यामुळे धर्मातील कर्मकांड वाढते आणि अशिक्षित लोक अंधश्रद्धाळू बनतात. यासाठी धर्मग्रंथांचे लोकांना समजेल अशा भाषेत भाषांतर करावे यासाठी ते कायम आग्रही होते.

महाराजांनी संस्कृत ग्रंथांचे मर्म ओळखले होते. संस्कृतमधील ग्रंथांच्या भाषांतरासाठी ठराविक रक्कम वेगळी काढून ठेवली होती. त्यांच्या प्रेरणेमुळे, आर्थिक साहाय्यामुळे अनेक ग्रंथांचे मराठीत आणि इतर देशी भाषांत भाषांतर झाले. 'या रकमेतून दत्तकचंद्रिका, निर्णयसिंधू, विवादताण्डव, संस्कारकौस्तुभ, दानचंद्रिका, आचारमयूख व ब्रह्मसूत्रभाष्यसारखे कित्येक उत्कृष्ट ग्रंथ भाषांतरित होऊन बाहेर पडले आहेत. संस्कृत भाषेतील पुस्तकांचे इतिहास, शास्त्र, नाटके व धर्म असे चार भाग पाडून, त्यातील ग्रंथ मराठीत आणण्याची व्यवस्था त्यांनी केली.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ६६७)*. महाराजांच्या प्रयत्नातून वरील ग्रंथांचे मराठीत भाषांतर झाले. बडोद्यातील भाषांतरित ग्रंथांमुळे मराठी साहित्यविश्वात चांगल्या ग्रंथांची भर पडली.

महाराजांच्या कार्यकाळात शास्त्री आणि पंडितांनी संस्कृतमधून मराठी, गुजराती आणि हिंदीमध्ये ग्रंथांचे भाषांतर केले. 'छोटालाल भट्ट यांनी ५५ ग्रंथांचे गुजराती भाषेमध्ये भाषांतर केले. त्यांचे काही प्रसिद्ध ग्रंथ 'आत्मवृत्तांतम्', 'ब्रह्मसूत्रनाम संक्षिप्त वृत्ती', 'गुप्तांगमाहात्म्यम्', 'वैराग्य-रत्नाकर' हे आहेत.' *(नेने, २०१०, पृ. ५८)*. अशा वेगवेगळ्या पंडितांनी संस्कृतमधून ग्रंथांचे भाषांतर देशी भाषांत केले. या ग्रंथांच्या नावावरून आणि भाषांतर झालेल्या ग्रंथांच्या संख्येवरून भाषांतराचे महत्त्व लक्षात येते.

गोविंद सखाराम सरदेसाई यांना महाराजांनी दोन ग्रंथांचे भाषांतर करण्यास सांगितले. त्याबद्दल सरदेसाई म्हणतात, 'महाराजांच्या सेवेतच मला जीवनातील अनेक बहुमोल लाभ प्राप्त झाले. मी नोकरीत रुजू झालो तेव्हा मला त्यांनी 'Machiavellis Prince' व 'Seeley's Expansion of England' या दोन ग्रंथांचे मराठी भाषांतर करण्याची संधी दिली. म्हणूनच लेखन व्यवसायात माझा प्रवेश झाला. 'राजधर्म' व 'इंग्लंड देशाचा विस्तार' ही दोन माझी पहिली पुस्तके पुष्कळशी गचाळ बनली खरी; पण पाण्यात पडल्याशिवाय पोहता येत नाही या न्यायाने माझा धीर चेपून आता मी रियासतकार म्हणून मिरवतो त्याचे श्रेय मुख्यत: त्या महाराजांस आहे.' *(सरदेसाई,*

*श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, १९५६, पृ. ८).* महाराजांच्या विद्याव्यासंगाचा फायदा झाल्याचे सरदेसाई यांनी अनेक वेळा नमूद केले आहे. सरदेसाई यांच्या लेखनाचा प्रारंभ बडोद्यातील भाषांतर शाखेपासून झाला. साहित्यमालामधील 'राष्ट्रकथामाला' व 'महाराष्ट्र-ग्रंथमाला' या मालांची जबाबदारी रियासतकार सरदेसाई यांच्याकडे होती. काही कालखंडानंतर पुढे ती विद्याखात्याकडे सोपविण्यात आली होती. रियासतकार सरदेसाई यांनी पुढे लिहिलेल्या अनेक रियासतींपैकी काही रियासती बडोदे सरकारच्या आश्रयाने प्रसिद्ध करण्यात आल्या.

महाराजांनी वेगवेगळ्या लोकांना लिहिलेल्या अनेक पत्रांमधून भाषांतरासंबंधी विचारणा केली. त्यांचे बंधू संपतराव यांना महाराज लिहितात, 'क्रोक्रे खेळाच्या (लाकडी चेंडूने खेळावयाचा खेळ) उत्तम भाषांतरासाठी मी तुमचा अतिशय आभारी आहे. ते अतिशय उत्तमरीत्या वठले आहे. भाषांतराची बिदागी देण्याची व्यवस्था तुम्ही कराल यात शंका नाही. पुस्तक विकण्याजोगे असावे. कृपया माझ्यासाठी पुढील खेळांची गुजराती भाषेत बालबोध शब्दरचना असणारी भाषांतरे करण्याची व्यवस्था करावी. त्यापैकी काही मराठीत असावीत. उदा. गोल्फ, लेस ग्रेसेस, (Lec graces), ल क्रॉस, (La crosse), फुटबॉल, बॅडमिंटन, लॉन टेनिस आणि क्रिकेट. येथील हवामानाच्या दृष्टीने क्रोक्रे हा लोकांचा आवडता खेळ होईल असे मला वाटते. कृपया त्याचे भाषांतर गुजरातीमध्येही करावे.' *(पत्र क्र. ५३).* लोकांमध्ये देशी खेळांबरोबर परदेशातील खेळांचीही आवड निर्माण व्हावी यासाठी महाराज प्रयत्न करत होते. त्यासाठी परदेशातील खेळांच्या पुस्तकांचे देशी भाषेत भाषांतर करण्यासाठी प्रोत्साहन देत होते. भाषांतराबाबत त्यांचे अत्यंत बारकाईने लक्ष होते. एका-एका पुस्तकाबाबत ते पत्रांतून विचारणा करताना दिसतात.

महाराजांचा आवडीचा विषय म्हणजे इतिहास. त्यांना इंग्रजी विषय अवगत होताच जगातील इतिहासाच्या ग्रंथांचे वाचन सुरू केले. त्यांचा आवडता इतिहासकार गिबन होता. महाराजांनी त्याच्या ग्रंथावर नोटस् काढल्या. ते जगातील इतिहासाची तुलना हिंदुस्थानातील इतिहासाशी करत. शिक्षक इलियट यांच्याशी ते इतिहासासंदर्भात चर्चा करत. सन १८९६ मध्ये गुरू इलियट यांना पत्रात लिहितात, 'मी सध्या रोमन इतिहासाच्या वाचनात गढलो आहे. त्यानंतर ग्रीसच्या इतिहासाचे वाचन करावयाचे आहे. यापेक्षा अधिक रंजक किंवा आवश्यक अभ्यास दुसरा काही नसेल याची कल्पना मी करू शकतो. मी असे मानतो की, कोणतेही शिक्षण घेतलेल्या प्रत्येक माणसाला या इतिहासाचे ज्ञान असायला हवे आणि या उद्देशाने मी या पुस्तकांचा 'Story of Nations Series' या मालेत देशी भाषेत अनुवाद करून घेत आहे. ब्राह्मण्याला न शोभणारा हा माझा अनेक छंदापैकी एक छंद आहे. माझ्या मते प्रत्येकाने ज्ञान मिळवावे, गरीब व प्रतिकूल परिस्थितीतील लक्षावधी लोकांमध्ये त्याचा प्रसार करावा. हीच योग्य प्रवृत्ती आहे. प्रसार केल्याने ज्ञान अपवित्र होते, असे मानणारे काही लोक माझ्याकडे तुच्छतेने पाहतील, अशी भीती मला वाटते.' *(पत्र क्र. २५१).* महाराजांना इतिहास आवडत असल्याने त्यांनी जगातील महत्त्वाच्या देशाच्या इतिहासाचे भाषांतर करून घेतले होते. या पत्रातून त्यांनी 'Story of

Nations Series' या मालेतील ग्रंथांचे भाषांतर करून घेत असल्याचे म्हटले आहे. जगातील इतिहासाच्या वाचनाने आपली दृष्टी विशाल होते, यावर महाराजांचा विश्वास होता; परंतु त्यासाठी भाषांतर केलेले ग्रंथ लोकांना वाचण्यास उपलब्ध होणे गरजेचे आहे, असेही त्यांना वाटत होते.

महाराज ग्रंथांच्या भाषांतराबाबत वारंवार पाठपुरावा करत. ते परदेशात असले तरी भाषांतराला जबाबदार असणाऱ्या व्यक्तींना पत्रातून विचारणा करत. संस्थानातील एक अधिकारी आंबेगावकर यांना महाराज लिहितात, 'पुस्तकांच्या भाषांतराचा प्रश्न तुम्ही आणि पाडगावकरांनी काळजीपूर्वक अभ्यासावा, तसेच या संदर्भात भविष्यकालीन मार्गदर्शनासाठी नियम व तत्त्वे ठरवावीत. यासाठी खर्च करावयाची रक्कम ठरवावी. अधिकाधिक उपयुक्त पुस्तके व्यावसायिक तत्त्वावर जनतेच्या हितासाठी अनुदानित व्हावीत हा हेतू विशेषत्वाने समोर ठेवावा.' *(पत्र क्र. १३२३)*. कोणत्या पुस्तकाचे भाषांतर करावे यासंबंधी महाराजांची निश्चित अशी भूमिका होती. त्या पुस्तकाची उपयुक्तता महाराज पडताळून पाहत आणि त्यानुसार त्याचे भाषांतर करावयास सांगत. भाषांतरासाठी त्यांचा पाठपुरावा नेहमी चालू असे. उलट तपासणी सुरू असे. आंबेगावकर यांचे काम चालू आहे की नाही याबद्दलची विचारणा त्यांनी दिवाणांना लिहिलेल्या पत्रात केली. दिवाण मनुभाई यांना महाराज लिहितात, 'मला उपयुक्त आणि उत्तम अशा पुस्तकांचे परकीय व इतर भाषांतून अनुवादाचे कार्य फार महत्त्वाचे वाटते. मी आंबेगावकरांना या संदर्भात आधीचे सर्व आदेश व अनुभव लक्षात घेऊन भविष्यासाठीच्या धोरणाचे तपशील ठरवण्यास सांगितले आहे. आंबेगावकर या विषयाचा पाठपुरावा करत नसतील तर त्यांना हे पत्र दाखवावे व हे काम लवकर पूर्ण करण्यास सांगावे.' *(पत्र क्र. १३४०)*. महाराजांनी आंबेगावकर यांना गुलमर्ग, काश्मीर येथून १४ जुलै १९१६ रोजी पत्र लिहून भाषांतराचे काम करण्यास सांगितले. त्यानंतर गुलमर्ग, काश्मीर येथूनच त्यांनी त्या कामाचा पाठपुरावा केला. दिवाणांना २८ ऑगस्ट १९१६ रोजी लिहिलेल्या पत्रात त्याबद्दलची विचारणा केली. यावरून महाराज ग्रंथांच्या भाषांतराबाबत अत्यंत आग्रही आणि जागरूक होते असे समजते.

महाराज राज्यकारभाराच्या व्यस्त कामातूनही या विषयाकडे गंभीरपणे पाहत होते. त्याबाबत त्यांनी दिवाणांशी वारंवार पत्रव्यवहार केला. उटकमंड येथून दिवाणांना लिहितात, 'उपयुक्त पुस्तकांच्या भाषांतराचे काम मला वाटते त्या वेगाने चाललेले नाही. आपल्या लोकांच्या फायद्यासाठी काही उपयुक्त लोकप्रिय पुस्तकांच्या मालिकांचे अनुवाद व्हायला हवेत. माझी ही खूप दिवसांची इच्छा पूर्ण करण्यासाठी काहीतरी केले जाईल, असे पाहावे.' *(पत्र क्र. १४६३)*. त्यानंतर शिक्षण आयुक्त मि. क्लार्क यांनाही लिहिलेल्या पत्रात ही अपेक्षा व्यक्त करतात. 'देशी भाषांत उपयुक्त पुस्तकांच्या अनुवादाचे काम उत्साहाने व लवकर सुरू व्हावे असे मला वाटते. सोयीचे असेल तर जयसुखराय पुरुषोत्तमराय जोशीपुरा यांच्याकडे काही पुस्तके अनुवादासाठी द्यावीत. सामान्य जनतेसाठी 'नीतिशास्त्र' (Ethics) या विषयावरील एखादा प्रमाण ग्रंथ अनुवादित केला जावा. हस्तलिखित तयार झाल्यावर ते छपाईसाठी पाठवण्यापूर्वी मला नजरेखालून घालण्यासाठी विचारू शकता.' *(पत्र क्र. १४६५)*. दिवाण आणि शिक्षण आयुक्त

यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी वारंवार परभाषेतील ग्रंथांच्या भाषांतराबद्दल विचारणा केलेल्या दिसतात. दिवाण मनुभाई यांना दुसऱ्या एका पत्रात विचारतात, 'अनुवादाच्या कामासाठी कुठली पुस्तके हाती घेण्यात आली आहेत ते कळवावे, तसेच काम कुठवर आले आहे हेसुद्धा कळवावे.' *(पत्र क्र. १४७०)*. महाराजांचे या भाषांतर शाखेकडे जातीने लक्ष होते हे या पत्रांवरून स्पष्टपणे दिसते. शिक्षण आयुक्त मि. क्लार्क यांना पुन्हा एकदा पाठविलेल्या पत्रातून भाषांतराविषयी समाधान व्यक्त करतात. 'भाषांतराचे काम चांगले चालले आहे हे समजून आनंद वाटला. मिसेस स्ट्रॅाग यांची भाषणे स्थानिक भाषेत भाषांतरित होऊन प्रकाशित झाली पाहिजेत असे मला वाटते. धर्माबद्दलचा तुलनात्मक व आधुनिक दृष्टिकोन लोकांसमोर आला पाहिजे. मि. विडगरे (Widgery) यांनी ही योजना लवकर पूर्ण करण्यासाठी काहीतरी करायला हवे. लोकांना हे साहित्य पुरवून विचार करायला लावणे व हे ज्ञान रोजच्या समस्या सोडवण्यासाठी वापरायला लावणे ही मोठी गोष्ट आहे. धर्मशास्त्रावरील ही भाषणे काही लोकांना नक्कीच आवडतील.' *(पत्र क्र. १६९६)*. धार्मिक ग्रंथ प्रजेच्या आस्थेचा विषय असल्याने त्याविषयीचे ग्रंथ भाषांतरित करण्यासाठी महाराजांनी आपले लक्ष केंद्रित केले. यातून अनेक ग्रंथ भाषांतरित झाले. फक्त भाषांतराच्या संख्यात्मक वाढीकडे न पाहता ती वाढ गुणात्मक कशी होईल यावरही त्यांचे लक्ष होते. मानवाच्या जीवनात या भाषांतरित ग्रंथांचा उपयोग झाला पाहिजे, याकडे त्यांचे लक्ष होते. त्यासाठी महाराज वारंवार पाठपुरावा करत.

## संस्थानातील ग्रंथनिर्मितीसाठी केलेली मदत

### १) प्रारंभीच्या ग्रंथनिर्मितीसाठी केलेली मदत

महाराजांनी राज्यकारभार हाती येताच भाषांतर शाखेकडे अधिक लक्ष दिले असले तरी, त्यांनी देशी भाषेत साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यिकांकडे आणि साहित्याकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले. त्याही साहित्याच्या निर्मितीसाठी आर्थिक मदत केली. 'भाषांतर शाखा' इ.स.१९०८ साली निर्माण होईपर्यंत त्यांनी देशी भाषांतील साहित्यालाही मदत केली. त्यामुळे या काळातही महत्त्वाचे ग्रंथ निर्माण झाले.

### २) बडोदा संस्थानातील ग्रंथनिर्मिती

सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर प्रथम भाषांतरावर भर दिला असला तरी देशी भाषांत स्वतंत्र ग्रंथनिर्मिती व्हावी यासाठीही मदत करत होते. संस्थानात स्वतंत्र, चांगल्या ग्रंथांची निर्मिती व्हावी यासाठी महाराजांनी अनेक ग्रंथमाला काढल्या. या मालांमधून अनेक लेखकांनी ग्रंथांची निर्मिती केली.

महाराज या ग्रंथमालांतून पुस्तके तयार करण्यासाठी मदत करत होते. बडोदा संस्थानात नवीन ग्रंथांची निर्मिती झाल्यास त्यास ताबडतोब आर्थिक मदत केली जात होती. ती मदत कशा प्रकारची असेल याबद्दल एक प्रसिद्धीपत्रक छापण्यात येत असे. हे पत्रक या ग्रंथमालांतून

प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाच्या शेवटी छापण्यात येत असे. ते मुळातून वाचणे योग्य ठरेल. '१) पुस्तक चांगले असल्यास त्यास आश्रय देण्याचे नियम शाळा खात्याकडून ठरले असून त्याप्रमाणे तो देण्यात येत असतो. २) श्रीमंत महाराजांची स्वारी कडीप्रांती गेली असता पट्टण येथील संस्कृत ग्रंथसंग्रह त्यांचे पाहण्यात आला. तेव्हा त्यातील उपयुक्त पुस्तकांची निवड व्हावी; व जी चांगली ठरतील त्यांचे तर्जुमे झाल्याने ज्यास संस्कृत येत नाही अशा लोकांस त्यातील ज्ञानाचा लाभ सहज व्हावा या हेतूने तीन मुख्य विषयांवर चांगली पुस्तके घेऊन ती मराठीत लिहिण्याविषयी हुकूम देण्यात आला. त्यान्वये ती तयार झाली असून पुढे जास्त पुस्तकांचे तर्जुमे करण्याचे काम चालू आहे. श्रावणमास दक्षिणेसारख्या संस्थेतून नवीन पुस्तके व निबंध तयार होण्याची तजवीज वाचकांस महशूर असेलच. ३) संस्थानच्या निरनिराळ्या खात्यांचे उपयोगी पडणारी पुस्तके परभाषेतून तर्जुमे करून किंवा नवीन तयार करण्याविषयी हुकूम देण्यात आले आहेत, व पुढे आणखी अशीच तयार करण्याविषयी हुकूम देण्यात आले आहेत. ४) नियमरूपाने छापण्यात येत असलेली पुस्तके निरनिराळ्या खात्याकरिता केली आहेत, तथापि त्यांचाही मुख्य उद्देश असा आहे की, त्यांच्या योगाने लोकांस शिस्तीचे काम करण्याची सवय लागावी. अशा प्रकारे शिस्तीने काम करण्याची सवय आपणांत किती कमी आहे हे सांगावयास नकोच. सरकारवाड्यासंबंधी झालेल्या पुस्तकांचा उद्देश असाच आहे. ५) सेक्रेटरीच्या मार्फत जी पुस्तके आश्रयासाठी येतात, त्यापैकी कित्येकास सवडीनुसार खानगी (खासगी) खात्यातून आश्रय देण्यात येत असतो. ६) ह्याप्रमाणे निरनिराळ्या खात्यांच्या नियमान्वये तयार होत असलेल्या पुस्तकांशिवाय श्रीमंत महाराज वेळोवेळी विशेष हुकूम देऊन व नवीन सूचना करून स्वतःच्या देखरेखीखाली जवळ असलेल्या लोकांकडून पुस्तके लिहवून छापवीत असतात. अशा प्रकारे हल्ली भाषाविषय, इतिहास, शास्त्रीय विषय, पाकशास्त्र, गृहशास्त्र, कायदे, क्रीडाशास्त्र व अश्वकला वगैरे विषयांवर पुस्तके प्रसिद्ध करण्याचा क्रम चालू आहे. सामान्य विषयांवर उपयुक्त माहितीचे ग्रंथ महाराष्ट्र ग्रंथमाला नामक मालेत प्रसिद्ध होत असून आणखी राष्ट्रकथामाला नावाची दुसरी एक ऐतिहासिक ग्रंथांची माला प्रसिद्ध होत आहे. इंटरनॅशल सायंटिफिक सिरीज नामक मालेतून इंग्रजी पुस्तकांच्या धर्तीवर निरनिराळ्या शास्त्रीय विषयांवर सोपी पुस्तके त्या त्या विषयांत प्रवीण अशा गृहस्थांकडून लिहविण्याचे काम बडोद्यातील कलाभवन नामक शिल्प शाळेचे मुख्य गुरू यांजकडे सोपविले आहे. या निमित्त एक मोठी रक्कम खर्च करण्याचे सरकारांनी ठरवले आहे. त्याचप्रमाणे पाकशास्त्रावरही देशी भाषेत ग्रंथ लिहिण्याचा क्रम सुरू आहे. या विषयांवरील ग्रंथमालेत मराठी, हिंदुस्थानी, फारशी, मद्राशी व इंग्रजी वगैरे पाकक्रियांवरील ग्रंथांचा समावेश केला आहे. आपले राष्ट्रीय खेळ प्रचारांतून जाऊ नयेत म्हणून त्यांच्या माहितीचे एकीकरण करून उपयुक्त इंग्रजी खेळांच्या संग्रहासहित ते छापले आहे. उर्दू भाषेतीलही कित्येक ग्रंथ छापण्याचे काम चालू आहे. ही सर्व पुस्तके गुजराथी व मराठी ह्या दोन्ही भाषांत प्रसिद्ध करण्याविषयी सरकारचा हुकूम आहे. ह्यावरून महाराजांची समदृष्टी किती आहे व प्रत्येक उपयुक्त विषयांचे लोकांस शिक्षण देण्याकडे व भाषेची अभिवृद्धी

करण्याकडे त्यांचे किती लक्ष आहे हे व्यक्त होत आहे.' महाराजांनी पुस्तक निर्मितीचा ध्यास घेतला होता. संस्थानात निर्माण होणाऱ्या प्रत्येक पुस्तकास त्याची योग्यता पाहून मदत केली जात होती. वरील मजकूर प्रत्येक मालेच्या प्रत्येक ग्रंथांवर छापला जात होता. यामागचा उद्देश एकच होता, 'महाराज साहित्यनिर्मितीसाठी मदत करतात.' हा संदेश सर्व लेखन कर्त्यापर्यंत पोहोचावा. या माध्यमातून अधिकाधिक चांगल्या ग्रंथनिर्मात्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्याकडून उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती व्हावी.

महाराजांकडे राजवाड्यात आणि राज्यकारभाराची कामे पाहण्यासाठी अनेक सेवक आणि अधिकारी असत. त्या नोकरांना विविध प्रकारचे नियम केले. संस्थानातील विविध खात्यांची नियमावली ठरवण्यासाठी त्यांनी ग्रंथांची निर्मिती केली. या नियमावलीमुळे व इतर माहितीच्या पुस्तकांमुळे सेवकांना काम करणे सोपे जात असे. सबब सेवकांमध्ये एक प्रकारची शिस्त निर्माण झाली. या विविध खात्यांच्या नियमावलीच्या ग्रंथांमुळे साहित्यात भर पडली. त्यातील काही ग्रंथांची नावे पुढीलप्रमाणे- 'अहेर बहुमान पोशाखाचा नियम', 'खासगी खात्याच्या सामानासंबंधी नियम', 'अर्डली रूमसंबंधी नियम', 'स्वारीनियम खात्याच्या अंतर्व्यवस्थेसंबंधी नियम', 'सिंहाचे व वाघाचे शिकारीसंबंधी नियम', 'चित्त्यासंबंधी नियम', 'छायाचित्रासंबंधी नियम', 'मरळ माशांच्या पैदाशीसंबंधी नियम' अशा काही अत्यंत सूक्ष्म बाबींसंबंधी ग्रंथ निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. हे एक वेगळे साहित्य त्या काळात महाराजांच्या प्रेरणेने तयार झाले.

महाराजांचे पुस्तकांच्या निर्मितीकडे नेहमीच लक्ष असे. प्रत्येक मालेतून किती उपयुक्त पुस्तके निर्माण झाली याबद्दल वारंवार विचार व्यक्त करत. महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातील साहित्यप्रेमाची आणि आर्थिक मदतीची नोंद त्यांच्या चरित्रकारांनी घेतली. आपटे म्हणतात, 'महाराज पुस्तक-प्रकाशन शाखेला नेहमी टोचीतच असत. त्याच्या परिणामी सन १९३६ च्या जून अखेरपर्यंत श्रीसयाजी साहित्यमालेत जवळ-जवळ २५० पुस्तके प्रसिद्ध झाली व या मालेच्याच जोडीने निघणाऱ्या बालज्ञानमालेतून सुमारे १४२ पुस्तके प्रसिद्ध झाली.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ८८७)*. फक्त दोन मालांतून एवढ्या मोठ्या प्रमाणात पुस्तकांची निर्मिती झाली होती. कोणत्या मालेतून किती ग्रंथ प्रकाशित झाले याबाबतचे एक बोलके उदाहरण 'श्रीसयाजी साहित्यमाले'चे देता येईल. महाराजांच्या पश्चात या मालेतून इ.स. २००४ पर्यंत ३७६ ग्रंथ प्रकाशित करण्यात आले. ('श्री सयाजी साहित्यमाले'मधून प्रकाशित ग्रंथांची यादी परिशिष्टात दिली आहे). तसेच अन्य साहित्यविषयक मालांतूनही अशी शेकडो पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. यावरून या मालांमधील ग्रंथांची संख्या आणि विषयांची व्याप्ती लक्षात येते.

महाराजांना ग्रंथांच्या विविध विषयांबद्दल आकर्षण होते. त्यामध्ये वेगवेगळ्या थोर पुरुषांची चरित्रे निर्माण व्हावीत यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी राजघराण्यातील काही व्यक्तींची चरित्रे लिहून घेतली होती. 'सेनापती कचेरीमार्फत छापविलेल्या येथील सरकार घराण्यांच्या हकिकती व निरनिराळ्या खात्यांकरिता नियमरूपाने छापविलेल्या अनेक पुस्तकांखेरीज या प्रसिद्धी

पत्रकान्वये उपरिर्निदिष्ट मालांतून केवळ राजाज्ञेने तयार झालेल्या एकंदर मराठी पुस्तकांची संख्या शंभरहून कमी नाही. ही सर्व पुस्तके छापविण्याचा सर्व खर्च राज्याने करून त्याशिवाय ग्रंथकारास त्याच्या श्रमाबद्दल चांगली पारितोषिकेही देण्यात आली आहेत. उदाहरणार्थ, सखाराम गणेश मुजुमदार यांच्या कै. श्री. महाराणी जमनाबाईसाहेबांच्या चरित्रलेखकास पाचशे रुपयांचे बक्षीस दिले.' *(दंडवते, १९२५, पृ. ३७)*. त्यांनी देशातील तसेच परदेशातील अनेक महापुरुषांची चरित्रे लिहून घेतली. त्या महापुरुषांची यादी पाहिली असता त्या चरित्र नायकांचे आणि पर्यायाने चरित्रांचे श्रेष्ठत्व लक्षात येते. महाराजांचे चरित्रकार दाजी नागेश आपटे यांनी 'मीराबाई' आणि 'नरसिंह मेहता' यांची चरित्रे लिहिली. वामनशास्त्री इस्लामपूर यांनी 'आदिराजचरित्र', वासुदेव नरहर उपाध्ये यांनी 'हरीविक्रमचरित्र', नरसिंह चिंतामण केळकर यांनी 'ग्यारीबाल्डीचे चरित्र', गणपतराव व अप्पाजी यांनी 'संत चरित्र' ही चरित्रे लिहिली, तर सयाजीराव महाराजांचे पहिले चरित्र लिहिणारे काशीनाथ नारायण गोत्री यांनी महाराजांच्या चरित्रानंतर त्यांचे छोटे बंधू 'संपतराव गायकवाड' यांचेही चरित्र लिहिले. वि.वि. परांजपे यांनी 'बडोद्याचे राज्यकर्ते', रावजी विठ्ठल पुणेकर यांनी 'अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र', सीताराम वासुदेव पेंडसे आणि शिवराम गोविंद फाळके यांनी 'शिवाजी महाराजांची चरित्रे' लिहिली. सखाराम गणेश मुजुमदार यांच्यानंतर नागेश विनायक बापट यांनीही 'कै. श्री. महाराणी जमनाबाईसाहेब यांचे चरित्र' लिहिले. अ.ना. भागवतांनी 'थोरले सयाजीराव महाराज' यांचे चरित्र लिहिले. संस्थानातील प्रजेला अशा महनीय व्यक्तींपासून प्रेरणा मिळावी यासाठी ही चरित्रे तयार केली गेली.

महाराजांच्या कार्यकाळात बडोद्यात अनेक नामांकित साहित्यिक वास्तव्यास होते. साहित्यनिर्मितीस पोषक वातावरण तयार झाल्यामुळे त्यांनीही उच्च दर्जाचे साहित्य निर्माण केले. हे साहित्यिक आणि त्यांचे साहित्य याविषयी माहिती घेऊ. महाराजांच्या कार्यकाळात पुढील साहित्यिक बडोद्याच्या संपर्कात होते किंवा बडोद्यात त्यांनी साहित्यनिर्मिती केली. त्यामध्ये शंकर मोरो रानडे व राम गणेश गडकरी (नाट्यलेखन), विष्णू गोविंद चिपळूणकर (भाषाचिकित्सा), नागेश विनायक बापट (कादंबरी), माधव दिवाकर पंडित (आर्यवैद्यक), जनार्धन सखाराम कुडाळकर (ग्रंथालय शास्त्र), चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे (अर्वाचिन कविता), गोविंद सखाराम सरदेसाई तथा रियासतकार (इतिहास), विनायक सदाशिव वाकसकर (इतिहास), दाजी नागेश आपटे (ज्योतिष, समाजशास्त्र आणि चरित्र), गणेश सदाशिव भाटे (निबंधलेखन), प्रो. माणिकराव (व्यायाम आणि शारीरिक शिक्षण), याशिवाय राजकवी चंद्रशेखर, चिं. वि. जोशी (विनोद, जातककथा), कवी दत्त आणि माधव ज्युलियन (कविता), वि.पां. दांडेकर, ना.ग. जोशी, ना.गो. कालेलकर (भाषाशास्त्र), वि.ज. कीर्तने (नाटककार) या सर्वांनी उच्च दर्जाचे साहित्य निर्माण केले. परिणामस्वरूप बडोदा संस्थानाचे नाव दर्जेदार आणि विपुल साहित्यनिर्मितीसाठी अग्रेसर बनले. त्या काळातील इतरही साहित्यिक महाराजांच्या आर्थिक मदतीच्या साहाय्याने ग्रंथनिर्मिती करत होते. साहित्यिकांच्या वरील यादीत आणखी मान्यवर साहित्यिकांची नावे समाविष्ट करता येतील.

साहित्यिकांच्या वरील यादीत आणखी एक नाव समाविष्ट केले तर बडोद्यातील साहित्याची उंची समजते. ते नाव म्हणजे महायोगी अरविंद घोष हे होय. अरविंद घोष यांचे बडोद्यात तेरा वर्षे वास्तव्य होते. त्यांनी बडोद्यात महत्त्वाच्या पदांवर काम केले. त्या काळात त्यांच्या हातून महान साहित्य निर्माण झाले. त्यांच्या साहित्याविषयी गणेश अग्निहोत्री म्हणतात, 'श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या दरबारात दाखल झाल्यानंतर (इ.स. १८९३ फेब्रुवारी ८) श्री. अरविंदांनी लगेचच चार महिन्यात 'इंदुप्रकाश' मध्ये एका धारदार लेखमालेने साहित्यसृष्टीत संचार केला. दुसरे म्हणजे बंकिमचंद्रांच्या साहित्यावरील लेखमालाही सादर केली. बंगाली, मराठी व गुजराती भाषांचा अभ्यास केला. त्यांचे बडोद्यातील वास्तव्य सर्वदृष्टीने संपन्न होते.' *(अग्निहोत्री, संपादकीय, २००१, पृ.२८).* अरविंद घोष यांचे बडोद्यातील राहणे सर्वार्थाने महान होते. त्यांचे लेखन याच काळात बहरत गेले. अरविंदांनी बडोदा सोडल्यानंतर जे 'सावित्री' नावाचे महाकाव्य लिहिले त्याची पायाभरणी बडोद्यात झाली होती. 'अरविंद घोष बडोद्यात राहत होते त्याच कालखंडात 'सावित्री' या महाकाव्याच्या संकल्पाला स्वरूप येत होते. श्रीमन्महाभारतातील ही लोकप्रिय कथा, प्रतिवर्षी वटसावित्री पौर्णिमेच्या निमित्ताने उजळून निघणारी, हाच या महाकाव्याचा विषय. श्री. अरविंदांच्या बडोद्यातील वास्तव्याच्या सुरुवातीला या कथेने त्यांच्या मनाची पकड घेतली. ... बडोद्यास या महाकाव्य लेखनास प्रारंभ झाला, आणि वेद्पूरीस (पॉंदेचरीस) ते संपन्न जहाले.' *(अग्निहोत्री, संपादकीय, २००१, पृ. २८).* महाकवी अरविंद, रियासतकार सरदेसाई यांच्या लेखनास सुरुवात बडोद्यात झाली. पुढे त्यांनी साहित्यक्षेत्रात अजोड कार्य केले.

### ३) महाराजांनी ग्रंथनिर्मितीसाठी केलेली आर्थिक मदत

सयाजीराव महाराजांना त्यांच्या शिक्षण काळापासून साहित्याची आवड निर्माण झाली. ती आवड निर्माण करण्यामागे त्यांचे आयरिश गुरू इलियट यांचा सिंहाचा वाटा होता. महाराजांनी परदेश प्रवास केल्यानंतर त्यात आणखी भर पडली. त्यांनी विद्येचा ध्यास घेतला होता. शिक्षणामुळे व्यक्तीच्या जीवनाचा कायापालट होतो. मनुष्यप्राण्याच्या जीवनात भौतिक गरजेनंतर सर्वांत महत्त्वाची गरज कोणती असेल तर ती म्हणजे शिक्षण आणि ज्ञानप्राप्ती. ही ज्ञानप्राप्ती करून घ्यावयाची असेल तर त्यासाठी लागणारे साधन म्हणजे ग्रंथ. महाराजांनी आयुष्यभर ग्रंथांवर प्रेम केले. ते निर्माण व्हावेत यासाठी लागणारी सर्व प्रकारची मदत केली. सरकारी खजिन्यातून आर्थिक मदत केलीच, तसेच स्वतःच्या खासगी फंडातूनही मदत केली.

निरनिराळ्या विषयांचे ग्रंथ निर्माण व्हावेत यासाठी महाराज नेहमीच आर्थिक मदत करत. यामध्ये त्यांनी नानाविध विषयांच्या ग्रंथमाला निर्माण केल्याचे मागेच पाहिले आहे. त्या ग्रंथमालांमधून हजारो ग्रंथ प्रकाशित झाले. त्याबाबत अनंत हरी लिमये म्हणतात, 'सयाजीरावांनी आपल्या कारकिर्दीत क्रीडामाला, पाकशास्त्रमाला, राष्ट्रकथामाला, सयाजी ज्ञानमंजूषा, लघुज्ञानमंजूषा, महाराष्ट्र ग्रंथमाला वगैरे मालांना चालना दिली. धर्मशास्त्रविषयक ग्रंथांसाठी ते दरसाल १०,००० रुपये खर्च करीत. सयाजीरावांच्या आश्रयाने १०५ ग्रंथ प्रसिद्ध झाले.

योग्य ग्रंथांना पुरस्कार देण्यास ते सदैव सिद्ध असत. परकीय पुस्तकांचे देशी भाषांत भाषांतर करण्यासाठी आपल्या खासगी निधीतून त्यांनी २ लाख रुपयांची देणगी दिली. त्यातून श्रीसयाजी साहित्यमालेची १५० पुस्तके व बालज्ञानमालेची १४२ पुस्तके प्रसिद्ध झाली.' *(लिमये, १९७२, पृ. १५६)*. त्याअगोदर रावसाहेब काशीनाथ संभाजी मूरकर यांनी धार्मिक ग्रंथांचे संपादन करणारी 'मूरकर आणि मंडळी' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेने इ.स. १८८९ मध्ये 'जैमिनी अश्वमेध सार व हरिविजय कथासार' नावाने धार्मिक ग्रंथ संपादन केले. या ग्रंथासाठी सयाजीराव गायकवाड महाराजांनी २०० रुपये देणगी दिली व ५० पुस्तके विकत घेतली. महाराजांच्या या दातृत्वामुळे हे धर्मविषयक अभिजात ग्रंथ तयार झाले. त्यांना उत्कृष्ट साहित्य निर्माण करावे यासाठी पैसे तर दिलेच, त्याचबरोबर साहित्यविषयक वातावरण बडोद्यात निर्माण केले.

महाराजांनी महाराष्ट्रातील ज्या अनेक लोकांना आर्थिक मदत केली त्यामध्ये समाजसेवक महात्मा जोतीराव फुले यांचाही समावेश होतो. त्यांनी जोतीबा फुले यांना बडोद्यात बोलावून घेतले. त्यावेळी फुले यांनी महाराजांस 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ वाचून दाखविला. महाराजांनी फुले यांचा सन्मान करून तो ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी आर्थिक मदत केली. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत महात्मा फुले यांनी महाराजांचा आदरयुक्त उल्लेख करून मदत केल्याचे म्हटले आहे. त्यानंतर फुलेंनी महाराजांवरती पोवाडा रचला. हा पोवाडा पुढे दीनबंधू वृत्तपत्रातही प्रकाशित करण्यात आला (याविषयीची सविस्तर माहिती यापूर्वी आली आहे).

महाराजांनी संस्थानात शब्दकोश तयार करून घेतले. त्यांनी कलाभवनाचे प्रमुख प्रो. गज्जरांना बहुभाषिक कोश तयार करण्यासाठी सांगितला होता. त्याबाबत चिंतामण कर्वे म्हणतात, 'प्रो. गज्जर हे महाराजांच्या सांगण्यावरून बहुभाषिक कोश (Polyglot Dictioinary) तयार करीत होते. पण तो त्यांचा प्रयत्न बराच खर्च होऊनही अपुरा राहिला आहे.' *(कर्वे, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २२९)*. शब्दकोश निर्मिती करण्यासाठी महाराज सर्वप्रकारे प्रयत्न करत होते. हा प्रयत्न पूर्ण होत नाही म्हटल्यावर त्यांनी शब्दकोश निर्मितीसाठी कमिट्या नेमल्या आणि त्यांच्यामार्फत हे काम सुरू केले. 'राजव्यवहाराच्या कामी सुटसुटीत व सर्वभाषामान्य असे पारिभाषिक शब्द संस्कृत आणि हिंदी यांच्या साहाय्याने तयार करण्यासाठी त्यांनी विद्वानांच्या आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कमिट्या नेमल्या होत्या. या कमिट्यांनी निश्चित केलेली शब्दयोजना राज्यकारभारातून वापरली जात आहे. नुकताच 'श्रीसयाजीशासनशब्दकल्पतरू' नावाचा अष्टभाषी राजव्यवहारकोश तयार करून घेतला.' *(कर्वे, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २२९)*. महाराजांनी बडोदा संस्थानात हिंदुस्थानातील तसेच जगभरातील गुणी माणसे एकत्र केली होती. त्यांना भाषिक अडचण नको म्हणून हा कोश तयार करून घेतला होता. संस्थानच्या कारभारात एकसूत्रीपणा येण्यासाठी हा कोश महत्त्वाचा होता. हा कोश म्हणजे हिंदुस्थानची भाषा एक करण्याच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होते. यासाठी महाराजांनी खूप मोठी आर्थिक मदत केली.

महाराजांनी महाराष्ट्रातील अनेक लेखकांना आणि कर्त्या पुरुषांना मदत केली. त्यामध्ये आणखी एक नाव महत्त्वाचे आहे, ते म्हणजे शब्दकोशकार यशवंत रामकृष्ण दाते होय. दाते शब्दकोश तयार करत आहेत हे महाराजांना समजल्यावर महाराजांनी स्वतःहून त्यांना बडोद्यात बोलावून घेतले आणि मदत केली. या कोशाबद्दल ऐकून महाराजांना समाधान वाटले. 'फार दिवसांच्या इच्छेप्रमाणे मराठी कोश तयार होऊ घातला आहे हे पाहून त्यांना अत्यंत समाधान वाटले व प्राथमिक अडचणी नाहीशा होण्यासाठी त्यांनी आपण होऊन ५,००० रुपयांची मोठी देणगी दिली व कोशाच्या १०० प्रती आपल्या संस्थानासाठी घेण्याचा हुकूम दिला. त्यानंतर कोशाच्या प्रगतीकडे त्यांचे नेहमी लक्ष असे. कोशाचा पहिला भाग जेव्हा त्यांनी पाहिला तेव्हा त्यांना फार आनंद वाटला.' *(कर्वे, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २३०).* शब्दकोशासाठी एवढी मोठी मदत त्या काळात महाराजांनी केली. हे त्यांच्या दातृत्वाचे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल. हिंदुस्थानात कोठेही शब्दकोश तयार करण्याचे काम चालू आहे असे महाराजांना समजल्यावर ते त्यास ताबडतोब मदत करत. वरीलप्रमाणेच त्यांनी 'शब्दसागर' या हिंदी शब्दकोशासही मदत केली.

महाराजांनी दाते यांच्याप्रमाणेच श्रीधर व्यंकटेश केतकर यांनाही मदत केली. केतकर ज्ञानकोश तयार करत असल्याचे समजल्यानंतर त्यांनाही प्रकाशनपूर्व ५,००० रुपये विद्याखात्याकडून दिले. तसेच केतकर यांनी तयार केलेल्या महाराष्ट्रीय शब्दकोशाच्या २,००० रुपये किमतीच्या प्रती विकत घेतल्या होत्या. शब्दकोश हा महाराजांच्या आवडीचा प्रांत होता. यातून त्यांना याआधी म्हटल्याप्रमाणे हिंदुस्थानची एक भाषा करून देशाची एकात्मता, देशाची उन्नती साधावयाची होती.

महाराजांना शिक्षणकाळापासूनच व्यायामाची आवड होती. व्यायामाची ओळख सर्वांना व्हावी यासाठी त्यांनी व्यायामाची पुस्तके तयार करण्यासाठी मदत केली. बडोद्यातील दत्तात्रय चिंतामण मुजुमदार यांनी 'व्यायाम ज्ञानकोश' तयार केला. या मदतीबद्दल मुजुमदार व्यायाम कोशाच्या दुसऱ्या खंडात म्हणतात, 'व्यायाम कोशाचा मुख्य आश्रय म्हणजे आमचे पितृतुल्य व विद्याभिमानी श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज यांचा होय. श्रीमंत महाराजांस आमच्या कार्याबद्दलची खबर मिळताच आम्ही मागितल्याशिवायच, श्रीमंत महाराजांनी व्यायाम ज्ञानकोशाचे खंड जेव्हा जेव्हा प्रसिद्ध होतील तेव्हा तेव्हा प्रत्येक खंडाच्या १०० प्रती सरकारांत घ्याव्यात म्हणून हुकूम दिला व अशा रीतीने दहाही खंडास मिळून ७,००० रुपये मदत मिळण्याची सोय करून दिली.' हा कोश दहा खंडांचा आणि पाच हजार पृष्ठांचा आहे. हा अतुलनीय कोश तयार झाल्याचे पाहून महाराजांना खूप आनंद झाला. कोश प्रकाशित होण्यासाठी त्यांनी भरपूर मदत केली.

खेळाची इतर पुस्तके प्रकाशित होण्यासाठीही मदत केली. त्यामध्ये, मैदानी खेळांचे नियम, बालवीरांचे खेळ, खेळांचा अभ्यास, लहान मुलांचे खेळ, आट्या-पाट्या, सचित्र खेळाचे पुस्तक, खो-खो, हुतुतु, विटीदांडू नियम, अशा स्वदेशी खेळांच्या पुस्तकांसाठी भरीव आर्थिक

मदत केली, तर परदेशातील अनेक खेळांची अनेक पुस्तके देशी भाषेत भाषांतरित करून घेतली. त्यामध्ये चौरंग गोट्यांचा खेळ (बिलियर्डस्), गोल्फ, लेस ग्रेसेस, ल क्रॉस, फुटबॉल, बॅडमिंटन, क्रोक्रे, लॉन टेनिस आणि क्रिकेट या खेळांचीही पुस्तके भाषांतरित करून घेतली. त्यासाठीही त्यांनी आर्थिक मदत केली.

बडोद्यात 'महाराष्ट्र वाङ्मयमंडळ' नावाची साहित्यविषयक संस्था होती. त्या संस्थेमार्फत पदार्थविज्ञानशास्त्रातील 'विद्युत' या विषयावर मराठी भाषेमध्ये शब्दकोश तयार करण्यात आला होता. हा कोश मराठी भाषेच्या दृष्टीने भूषण होता. त्यासही महाराजांनी मदत केली.

महाराजांना दुसऱ्या भाषेतील साहित्याच्या भाषांतरासाठी शब्दकोश तयार व्हावेत असे वाटत होते. 'शब्दकोशासारखा निघणारा प्रत्येक ग्रंथ हा राष्ट्राला उपयोगी आहे. त्यामुळे भाषाभाषांमधील देवाणघेवाण वाढते.' असे मत त्यांनी व्यक्त केले.

रियासतकार गो.स. सरदेसाई यांच्या लेखनाचा श्रीगणेशा बडोद्यात झाला. सरदेसाई यांच्या रियासतींचे काही भाग बडोदा संस्थानकडून प्रकाशित करण्यात आले. त्यांच्या प्रारंभीच्या काही ग्रंथांविषयी माहिती या अगोदर आली आहे. सरदेसाई यांनी निवृत्तीनंतर इतिहास लेखनाचे काम सुरू केले. त्यामध्ये पेशवे दप्तराचाही समावेश होता. काही कालखंडानंतर मुंबई सरकारने त्यासाठीची मदत थांबवली. त्यानंतर त्यांनी सयाजीराव महाराजांना मदत मागितली. त्यांनी ती लगेचच मंजूर केली. त्याबाबत सरदेसाई लिहितात, 'मी महाराजांना इंग्रजी पत्र लिहून राष्ट्रीय इतिहासाच्या या पवित्र कार्यासाठी तीन हजाराची रक्कम मागितली. आपण तीन हजार दिले तर बाकीचे नऊ हजार मी इतर संस्थानांकडून मिळवतो. पण पहिली रक्कम आपली पाहिजे. तारेने जबाब मागितला. मला फारशी आशा नव्हतीच, पण पत्र वेळेवर त्यांस पोचून त्यांनी लगेच दिवाणांस तारेने बडोद्यास कळवले, 'सरदेसाई पुण्याचे कागद छापतात, त्यांस खरीच खर्चाची अडचण असल्यास तीन हजार त्यांचे हवाली करावे.' दिवाणांनी मला मुंबईस भेटीस बोलावले आणि त्यांची खात्री पटताच माझे हातात तीन हजार रुपयांचा चेक दिला. ... हे काम सिद्धीस जाण्याचे मुख्य श्रेय सयाजीरावांस आहे. ... त्यांची सदसद्विवेकबुद्धी सदैव जागृत असल्यामुळे माझ्या कामाची त्यांना पारख होती. म्हणूनच एक पत्र गेल्याबरोबर त्यांनी ताबडतोब तीन हजार रुपये मंजूर केले हा त्यांचा उपकार मी कधी विसरू शकणार नाही.' *(सरदेसाई, श्री. सयाजीराव गायकवाड सहवासांत, १९५६, पृ. ६८)*. सरदेसाई निवृत्त झाल्यानंतर आणखी काही दिवस त्यांना महाराजांनी नोकरीसाठी आग्रह धरला होता; परंतु महाराजांचे न ऐकता सरदेसाई राजीनामा देऊन कामशेतला परतले होते. त्यामुळे त्यांचा रोष आपल्यावर आहे असे सरदेसाई यांना वाटत होते. महाराजांनी अशा व्यक्तिगत पातळीवरील मतभेदांना कधीही थारा दिला नाही. राष्ट्रीय पातळीवरील कामात अभिमानाने मदत केली. त्यामुळेच सरदेसाई इतिहासातील अजोड कार्य करू शकले.

साहित्यिकांनी लिहिलेल्या साहित्याला महाराज सरकारी आर्थिक मदत करत होते, तसेच ग्रंथांना स्वतःच्या खासगी फंडातूनही मदत केली. खासगी फंडातून मदत केलेल्या रकमा

कितीतरी मोठ्या होत्या. त्यांच्या सर्व याद्या आज उपलब्ध होणार नाहीत; परंतु महाराजांचे चरित्रकार आणि इतर लेखांच्या आधारे काही अनुमाने काढता येतात. त्याबाबत चिंतामण कर्वे 'श्रीसयाजीगौरवग्रंथात' सन १९३३ साली लिहितात, 'गेल्या पंधरा वर्षांतच सुमारे सव्वालाख रुपये ग्रंथोत्तेजनासाठी खर्च केले; त्यातील मराठीच्या वाट्यास निदान ५०,००० रुपये तरी आले आहेत. साहित्यमाला निघण्यापूर्वीचा असा खर्च जवळ जवळ अडीच लाखापर्यंत जातो. म्हणजे आपल्या पन्नास वर्षांच्या कारकिर्दीत सुमारे चार-पाच लाख रुपये ग्रंथनिर्मितीसाठी सढळ हाताने खर्च करणारे श्रीमंत सयाजीरावांखेरीज दुसरे कोण सापडणार? सापडते तर देशी भाषांची उन्नती यापेक्षा केवढी मोठी होती.' *(कर्वे, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २३१)*. महाराजांनी साहित्यासाठी दान केलेल्या पन्नास वर्षांतील रकमांचे आकडे कर्वे यांनी दिले आहेत. महाराजांनी एकंदरीत ६४ वर्षे राज्य केले. पन्नास वर्षांचा खर्च पाहता त्यापेक्षाही अधिक मदत त्यांनी संपूर्ण कारकिर्दीत केली. महाराजांचे साहित्यातील योगदान लेखकांना, प्रकाशकांना साहाय्यकारी होते. महाराज साहित्यिक आणि प्रकाशकांचे पोशिंदे होते. हिंदुस्थानच्या साहित्य निर्मितीतील महत्त्वाचे साहित्यप्रेमी प्रज्ञावंत राजे होते.

महाराजांनी स्वतःच्या खासगी फंडातूनही अनेक रकमा साहित्यनिर्मितीसाठी दिल्या. त्या काळात कोणताही राजा आपल्या खासगीतील निधी सार्वजनिक कामासाठी देत नसत. त्या काळात त्यांनी पुढील मदत केली. 'दा.सा. यंदे यांच्या ग्रंथप्रसारक मंडळीस सन १९०१ साली १,२०० रुपये, साठे व भट यांच्या महाराष्ट्र वक्तृत्वोत्तेजक मंडळास ५०० रुपये, ना.के. अलोनी यांना 'लग्नविधी व सोहळे' हे पुस्तक छापण्याकरिता सन १९०४ साली १,००० रुपये तसेच पाटण व ब्यारा येथील लायब्ररीकरिता ६५० रुपये, पुण्याच्या भांडारकर संस्थेस महाभारताच्या प्रकाशनाकरिता सन १९२२ साली ५००० रुपये, त्याच साली बडोद्याचे रेसिडेंट यांना 'लेडी रीडिंग वुइमेन ऑफ इंडिया फंड'साठी २५,००० रुपये, बनारस येथील विद्यापीठात पुस्तकालयाची इमारत बांधण्याकरिता सन १९२६ साली २,००,००० रुपये.' *(जोशी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४४७ ते ४५३)*. या सर्व रकमा सन १९०१ सालापासून ते सन १९२७ पर्यंत महाराजांनी स्वतःच्या खासगी फंडातून दिल्या आहेत. याव्यतिरिक्त सरकारी खजिन्यातून कितीतरी प्रचंड मदत केली. यावरून महाराज साहित्यासाठी भरभरून दान देत होते हे स्पष्टपणे दिसते.

महाराजांनी साहित्यनिर्मितीसाठी वेगवेगळ्या योजना काढल्या होत्या. त्यांनी दिलेली मदत थेट साहित्य निर्मात्यापर्यंत कशी पोहोचेल याची दक्षता ते घेत होते. या योजनांची माहिती कर्वे यांनी दिली आहे. '१) पारितोषिक देऊन ग्रंथ तयार करावयाचा व मग सरकारी खर्चाने छापावयाचा. २) राज्यातील नोकरवर्गाकडून स्वतःचे काम म्हणून ग्रंथ तयार करावयाचा व मग तो सरकारी खर्चाने छापावयाचा. मागे नायब विद्याधिकारी खानगीतील अधिकारी (शं.मो. रानडे, सरदेसाई इ.) पोलीस इ. खात्यातील नोकर (गोविंदभाई देसाईंसारखे) यांनी याच पद्धतीने ग्रंथ तयार केले आहेत. ३) पगारी ग्रंथकार ठेवून खास देखरेखीखाली ग्रंथ तयार करावयाचा. उदा. श्रीसयाजीज्ञानमंजूषेतील

ग्रंथ, संस्कृत संशोधनखाते स्थापून काही ग्रंथांची भाषांतरे करविली. ४) ग्रंथकाराला पारितोषिक देऊन ग्रंथ तयार करवावयाचे व त्याच्याकडूनच तो छापून घेऊन त्याच्या काही (५०) प्रती सरकारने घ्यायच्या. ज्ञानमंजूषा बंद पडल्यावर पदार्थ विज्ञान, कृषिकर्म इ. ग्रंथ असे छापविले. ५) ग्रंथकाराकडून ग्रंथ तयार करवून छापावयाचा, व त्याच्या अर्ध्या प्रती पारितोषिक म्हणून त्या ग्रंथकारास द्यावयाच्या. उदा. अबलोन्नति लेखमाला, संसारमार्गोपदेशिका इ. ६) ग्रंथकाराकडून ग्रंथ तयार करवून त्यांच्याकडून तो छापावयाचा व छपाईचा जेवढा खर्च झाला असेल तितक्या किमतीच्या प्रती सरकारने विकत घ्यावयाच्या. स्त्रीभूषण, कन्याभूषण, उपनयनविधीसार इ. ग्रंथ असे तयार केले. ७) ग्रंथ तयार करून छापण्यासाठी उचलून रक्कम द्यावयाची व तीबद्दल काही ठराविक प्रती सरकारने घ्यावयाच्या. गुजराथी काव्यमालाग्रंथ (३५) अशा रीतीने तयार झाले; त्यासाठी १६,००० रुपये मंजूर झाले होते. ८) विशिष्ट विषयावरची पुस्तके सरकारी खर्चाने छापून, त्यांच्या काही प्रती ठेवून बाकीच्या ग्रंथकारास द्यावयाच्या. प्रो. मौलाबक्ष, मुर्तुजाखां, मनोहर यांची गायनावरील पुस्तके संगीत पारिजात व संगीत रत्नाकर यांची भाषांतरे या प्रकाराने निघाली. ९) ग्रंथांना उत्तेजनासाठी देणग्या द्यावयाच्या. महाराष्ट्र शब्दकोश, पेशवेदप्तर, वाडांच्या रोजनिशा इ. १०) महाराजांना नजर केलेल्या ग्रंथांना बक्षिसे द्यावयाची. हे व आणखी कित्येक प्रकार बारकाईने पाहू गेल्यास आढळून येतील.' *(कर्वे, श्रीसयाजीगौरवग्रंथ भाग-२, १९३३, पृ. २३० ते २३१).* महाराज अनेक प्रकारे ग्रंथकारांना मदत करून त्यांच्याकडून साहित्यनिर्मिती करून घेत होते. या पाठीमागे त्यांचे ग्रंथप्रेम होते. त्यांची साहित्य प्रोत्साहनामागील भूमिका शास्त्रशुद्ध होती. समाजाच्या हिताची होती. ही साहित्यनिर्मिती करण्यामागे त्यांचे सामाजिक अधिष्ठानही व्यापक होते. समाजोपयोगी कारणासाठी महाराज साहित्यिकांना सर्व प्रकारे मदत करून साहित्यनिर्मिती करून घेत होते.

४) विविध साहित्यप्रकारास प्रोत्साहन

महाराजांना इतिहास, तत्त्वज्ञान आणि चरित्र हे विषय आवडत होते; परंतु त्यांनी सर्वच साहित्यप्रकाराला मदत केली. संस्कृत भाषेतील काव्य, इतिहास, गणितीय, चरित्र, वैज्ञानिक आणि इतर प्रकारच्या ग्रंथांच्या भाषांतराला महत्त्व दिले. परदेशातील शास्त्रीय ग्रंथांना आणि ललित साहित्याच्या भाषांतरासाठी मदत केली. धार्मिक साहित्य हे माणसाच्या विकासाचे, उन्नतीचे साहित्य आहे असा महाराजांचा विश्वास होता. त्यामुळे सर्वच धर्मातील ग्रंथ लोकांना समजावेत यासाठी देशी भाषेत भाषांतर करून घेतले. अशा ग्रंथांसाठी आर्थिक पाठबळ दिले. यासाठी वारंवार पाठपुरावा केला.

महाराजांनी कथा, कादंबरी या साहित्यप्रकारासही प्रोत्साहन दिले. त्याविषयी दत्तात्रय पुंडे म्हणतात, 'सयाजीराव महाराजांनी चिं.ना. मुजुमदारांना कादंबऱ्या लिहिण्यास उद्युक्त केले. यात महाराजांची आपल्या प्रजेबद्दलची समत्वदृष्टी दिसते. बारगीर काय किंवा वाघेर काय; ही दैव फिरलेली आपलीच मंडळी आहेत आणि तीही मुळात गुणीच आहेत, हे सांगण्याची

समाजसुधारक दृष्टीही दिसते; पण सगळ्यात महत्त्वाचे वाङ्मयासंबंधीच्या महाराजांच्या ‘हित-तत्त्वा’च्या धारणेचे एक स्पष्टीकरणही मिळत जाते. मुजुमदारांच्या या कादंबऱ्या पांढरपेशा वर्गाला उद्देशून लिहिलेल्या आहेत; पण त्यांत चितारलेले जीवन पांढरपेशी नाही. जे वाङ्मय वाचतात त्यांची जीवनविषयक दृष्टी विशाल व्हावी, त्यांच्या अंतःकरणातील सहानुभाव व्यापक व्हावा. अशाच स्वरूपाचे वाङ्मय मराठीत निर्माण व्हावे, असे महाराजांना वाटत होते.’ *(पुंडे, प्रस्तावना, २००१, पृ. ३९)*. महाराजांची साहित्यनिर्मितीमागील भूमिका उदात्त होती. मनुष्यप्राण्याच्या जीवनात नानाविध अनुभव येत असतात. लेखकाने आपले अनुभव लेखनाच्या माध्यमातून इतरांपर्यंत पोहोचल्याने वाचणारांची जीवनविषयक दृष्टी विशाल बनते. सामाजिक अनुभव विशाल होतात. साहित्य वाचनाने आपले जीवन अधिकाधिक समृद्ध बनवता येते. यासाठी साहित्यनिर्मिती व्हावी, ही सर्वमान्य तत्त्वे डोळयांसमोर ठेवून महाराज साहित्य निर्मितीसाठी मदत करत होते.

महाराष्ट्रातील अनेक कर्त्या पुरुषांना महाराजांनी मदत केली. त्यामध्ये विल्सन हायस्कूल मुंबईचे अध्यापक कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांचा समावेश होतो. केळुसकरांच्या लेखनाची सुरुवात बडोदे सरकारच्या प्रोत्साहनाने झाली. त्यांनी बडोद्यातील ‘राष्ट्रकथामाले’करिता ‘फ्रान्सचा जुना इतिहास’ इ.स. १८९३ मध्ये लिहिला. त्यांच्या ‘गौतम बुद्धाचे चरित्र’ या ग्रंथास सयाजीराव महाराजांनी मदत केली. श्रीसयाजीग्रंथमालेत त्यांनी हा ग्रंथ प्रकाशित केला, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रास बडोदा संस्थानातून पारितोषिक मिळाले होते. केळुसकरांनी सयाजीराव महाराजांकडून दामोदर सावळाराम यंदे यांच्या मदतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मदत मिळवून दिली. केळुसकरांना महाराजांनी महत्त्वाच्या विषयांवर लिहिते केले. त्यामध्ये मूळ संस्कृतमध्ये असलेल्या एकूण ‘७ उपनिषदांचे मराठी भाषांतर’, ‘फ्रान्सच्या जुन्या इतिहासाचे भाषांतर’, ‘सेनेका आणि एपिक्टेस यांची बोधवचने’ यांचा समावेश होतो. महाराजांच्या साहित्यप्रेमामुळे दोघांमधील स्नेह उत्तरोत्तर वाढतच गेला.

महाराजांनी साहित्यनिर्मितीसाठी मदत देताना कोणत्याही एका देशी भाषेतील साहित्याला अधिक झुकते माप न देता सर्वच देशी भाषेतील साहित्याला समान न्याय दिला. त्याचप्रमाणे साहित्यप्रकाराबद्दलही त्यांची हीच भूमिका होती. त्यांनी कथा, कादंबरी, बालसाहित्य, काव्य, नाटक, इतिहास, अध्यात्म आणि तत्त्वज्ञान, चरित्र, हिंदू-धर्म, हिंदूएतर-धर्म, नीतिशास्त्र, शास्त्र आणि विज्ञान, समाजशास्त्र, नानाविध खेळ (देशी आणि पाश्चिमात्य), निबंध, भाषण, व्याख्याने, भूगोल, प्रवासवर्णन, ज्योतिषशास्त्र अशा अनेक विषयांतील साहित्यासाठी प्रोत्साहन दिले. महाराज साहित्यनिर्मितीला नवनिर्मिती समजत होते.

## साहित्यविषयक संमेलनांना केलेली मदत

महाराजांनी संस्थानात साहित्यविषयक प्रत्येक कृतीला सर्वार्थाने पाठबळ देत होते. त्यामध्ये साहित्यविषयक संमेलनांनाही मदत केली. ही मदत आर्थिक रूपाने तर होतीच त्याचबरोबर

अशा संमेलनांना स्वत: उपस्थित राहून पाठबळ देत होते. अशा संमेलनात अनेक वेळा स्वत: उद्घाटक म्हणून उपस्थित राहत. संमेलनाविषयी आणि त्यासंबंधित लोकांना मागर्दर्शन करत. त्यांचे उद्बोधन करत. त्या-त्या संमेलनातील, विषयांतील तज्ज्ञांना पाठबळ देत होते.

१) तत्त्वज्ञान परिषद

तत्त्वज्ञान हा विषय महाराजांचा अत्यंत आवडीचा होता. डिसेंबर १९२७ मध्ये मुंबईस तत्त्वज्ञान परिषदेचे अधिवेशन भरविण्यात आले होते. त्या अधिवेशनाचा प्रारंभ करण्याचा सन्मान महाराजांना देण्यात आला. त्याप्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणात संस्कृत विद्येच्या अभिवृद्धीची एक नवीन दिशा दर्शविली आहे. त्या भाषणात महाराज म्हणाले, 'सांप्रत काळी हिंदुस्थानात तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या दृष्टीने पाहता भारतीय व पाश्चात्त्य अशा दोन्ही पद्धतींचे ज्ञान करून घेऊन त्यातील उत्तम भागांचा संग्रह करणारी विचार प्रणालिका आपणास हवी आहे. या नवीन दृष्टीने आपल्या सामाजिक व नैतिक प्रश्नांचे परीक्षण करून तत्संबंधीचे सिद्धांत पुन्हा अधिकृत ग्रंथ रूपाने मांडणे उपयुक्त होईल. उदाहरणार्थ, अलीकडील काळांत भारतीय नीतिशास्त्राचे ऐतिहासिकदृष्ट्या विवेचन करणारी काही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत; परंतु त्या शास्त्रांतील सिद्धांतांचा पद्धतशीर व विवेचक अभ्यास करून तो आपल्या पुढे मांडणारे ग्रंथ अजून निर्माण व्हावयाचे आहेत. तीच गोष्ट तत्त्वज्ञानाची आहे. तथापि सांप्रत काळी या विषयात प्रो. रानडे, दासगुप्त, राधाकृष्णन यांसारख्या हिंदी गृहस्थांचे महत्त्वाचे ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.' *(भाषण क्र. १३४)*. महाराज तत्त्वज्ञान विषयाचे अभ्यासक असल्याने त्यांनी वेळोवेळी तत्त्वज्ञान विषयाच्या व्यासपीठावर उपस्थिती दर्शविली. मदत केली. तत्त्वज्ञान विषयाच्या अभ्यासकांना आर्थिक पाठबळ दिले. त्यांचा सन्मान केला.

२) संस्कृत संमेलन

महाराजांनी ५ मार्च १९१५ रोजी बडोद्यात पहिले संस्कृत संमेलन भरवले. संमेलनाचे उद्घाटन महाराजांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी संस्कृत साहित्याचे महत्त्व आणि त्याचा उपयोग भाषणातून स्पष्ट केला. 'ग्रीस, रोम, मिसर इत्यादी राष्ट्रांच्या वाङ्मयाशी संस्कृत वाङ्मयाची तुलना केल्यास असे दिसून येईल की, संस्कृत वाङ्मय त्या सर्वांच्या तोडीचेच किंबहुना त्याहूनही प्राचीन व अधिक महत्त्वाचे आहे व त्याचा थोडाबहुत परिणाम सर्व प्राचीन वाङ्मयावर झालेला आहे, या गोष्टी सर्वांस संमत आहेत. इतकेच नव्हे, तर ऐतिहासिकदृष्ट्या विशेषत: आपणास संस्कृत वाङ्मय फार महत्त्वाचे आहे, हेही निर्विवाद आहे. या कारणांमुळेच युरोपियन पंडितांनी गेल्या शे-सव्वाशे वर्षांत संस्कृत वाङ्मयाकडे विशेष लक्ष देऊन, भाषेच्या घटनेविषयी अनेक शोध लावले व तुलनात्मक भाषाशास्त्र निर्माण करून, कित्येक महत्त्वाचे सिद्धांत प्रतिपादले आहेत.' *(भाषण क्र. ९६)*. पाश्चिमात्य लोकांनी आपल्या संस्कृत भाषेतील ज्ञानाचा फायदा करून घेतला. त्यांनी संस्कृत भाषेचा अभ्यास कायमस्वरूपी सुरू ठेवला. आपल्या देशातील

संस्कृत साहित्य दुसऱ्या देशातील विद्वान अभ्यासतात, त्यातून नवीन तत्त्वे शोधून काढतात, नवीन शोध लावतात याचा महाराजांना अभिमान वाटत होता.

पाश्चिमात्य लोकांनी संस्कृत साहित्याच्या अभ्यासासाठी निरनिराळ्या संस्था स्थापन करून संस्कृत भाषेचे पुनरुज्जीवन केले; परंतु आपल्या देशातील संस्कृत साहित्याचे अभ्यासक प्रजेला उपयोगी पडेल अशा प्रकारे हे साहित्य सोप्या भाषेत आणत नाहीत याबद्दलची खंतही महाराज व्यक्त करतात. संस्कृत संमेलनाच्या पहिल्या दिवशीच्या भाषणात संस्कृत साहित्याच्या अभ्यासकांसमोर त्यांनी ही खंत बोलून दाखवली. 'संस्कृत वाङ्मयाचे मूलस्थान जो हिंदुस्थान देश त्या देशातील लोकांकडून म्हणजे आम्हा हिंदू लोकांकडून संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास वर दर्शविलेल्या दिशेने झाला किंवा होत आहे, असे मला वाटत नाही. आपल्या लोकांनी या वाङ्मयाकडे जरी दुर्लक्ष केले नसले, तरी त्या संबंधी योग्य ते श्रम आपण घेतले नाहीत, असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागते.' *(भाषण क्र. ९६)*. संस्कृत वाङ्मयाचा उपयोग सर्वसामान्यांना होत नाही, असे महाराजांना वाटत होते. या प्रसंगी त्यांनी संस्कृतबद्दल आपल्या देशात असणारी अनास्था बोलून दाखवली.

महाराजांना संस्कृत भाषेचे महत्त्व ज्ञात होते. त्यांनी संस्कृतचा अभ्यास केला होता. त्या भाषेत असणाऱ्या ज्ञानाची कल्पना होती. त्यामुळेच त्यांनी बडोद्यात वरील संस्कृत संमेलन भरवले. या संमेलनाच्या दोन्ही दिवशी संस्कृतची महती सांगणारी भाषणे स्वत: उपस्थित राहून केली. दुसऱ्या दिवशीच्या भाषणात महाराज म्हणाले, 'संस्कृत भाषा ही प्रौढ भाषा असून ती इतर अनेक भाषांची जननी आहे. तथापि, या भाषेचा व्यवहारात प्रचार नसल्यामुळे तिच्या पुनरुज्जीवनाच्या आवश्यकतेविषयी पुष्कळ लोक साशंक आहेत. संस्कृत विद्येच्या महासागरात अनेक मौल्यवान रत्नांचे गुप्त भांडार आहेत. श्रुती, स्मृती, उपनिषदे, महाकाव्ये, पुराणे ही सर्व त्या महासागरात आहेत. तसेच शासनशास्त्रावरील व व्याकरणशास्त्रावरील ग्रंथराजही संस्कृत भाषेच्या ग्रंथभांडारात आहेत. काव्यनाटकासारख्या ललित विषयांवरील ग्रंथ संस्कृतात आहेत आणि ज्योतिष, वैद्यक, गणित इत्यादी कला व शास्त्रे यांचीही उपेक्षा संस्कृत भाषेने केलेली नाही. मी ही जी विषयांची यादी दिली त्यातल्या एकेका विषयावर कितीतरी पुस्तके संस्कृत वाङ्मयात आहेत. त्या सर्व पुस्तकांचे जर सांगोपांग अध्ययन करू म्हटले तर कित्येक वर्षे-वर्षेच काय, पण कित्येक पिढ्यानपिढ्या त्या कामासाठी झटावे लागेल.' *(भाषण क्र. ९७)*. महाराजांनी संस्कृत भाषेतील वाङ्मयाचे महत्त्व जाणले होते. संस्कृतमधील ज्ञान हे अत्यंत उच्च दर्जाचे आहे हे त्यांना माहीत होते. त्यांच्या मते, हे वाङ्मय ग्रंथरूपात पडून न राहता त्यातील सर्व ज्ञान सर्वसामान्यांसाठी उपलब्ध झाले पाहिजे. या वाङ्मयाचा, ज्ञानाचा उपयोग जनतेच्या कल्याणासाठी झाला पाहिजे. असे त्यांचे प्रामाणिक मत होते.

महाराजांनी संस्थानात संस्कृत शाळा सुरू केल्या होत्या. त्याबद्दल चरित्रकार दाते म्हणतात, 'शास्त्री, पुराणिक, पुरोहित यांच्यासाठी एक संस्कृत पाठशाळा काढण्यात आली असून त्यात

क्षत्रियादी चातुर्वर्णीय हिंदू लोकांची संस्कृत शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. देशी भाषेच्या द्वारे शिक्षण देणारे एक व्हर्नाक्युलर कॉलेज होते.' *(दाते, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-१, १९३३, पृ. ६१)*. या शाळा आणि कॉलेज सरकारी अनुदानावर चालत होत्या. पण चांगले शिक्षक आणि सर्वसामान्य लोकांना त्याचा फायदा होत नाही हे पाहिल्यावर पुढे त्या शाळा बंद करण्यात आल्या; परंतु पहिल्या संस्कृत संमेलनात त्यांनी या शाळा सुरू करण्यासंदर्भात विचार व्यक्त केला. 'बडोद्यास पूर्वी संस्कृत शाळा होती; परंतु तिचा जनसमूहाला व्हावा तसा उपयोग होत नसल्यामुळे, ती बंद करावी लागली. आता विद्वान व प्रगल्भ विचाराचे शिक्षक मिळाल्यास, ती शाळा पुन्हा सुरू करण्याचा माझा विचार आहे.' *(भाषण क्र. ९६)*. महाराजांना संस्कृत भाषेबद्दल आपुलकी होती, ती भाषा वाढावी, त्यातून समाजाला उपयोगी असणारे शोध किंवा नवीन तत्त्वे समोर यावीत असे त्यांना नेहमी वाटे. महाराजांनी दाखवलेल्या आर्थिक मदतीमुळेच संस्कृत भाषेची उन्नती होऊ शकली.

महाराजांनी संस्थानात संस्कृत पाठशाळा आणि संस्कृत महाविद्यालये सुरू केली. या संस्कृत महाविद्यालयाबद्दल श्रीपाद कृष्ण बेलवलकर म्हणतात, 'या महाविद्यालयात हल्ली बारा शास्त्री-अध्यापक असून विद्यार्थ्यांना लायकीप्रमाणे शिष्यवृत्त्या, बक्षिसे, पदव्या वगैरे देण्यात येतात. एकंदर शिष्यवृत्त्यांची संख्या ५० असून त्या दरमहा रु. ८ ते रु. १२ च्या आहेत. यावरून सर्व विद्यार्थ्यांची संख्या सरासरी ७५ ते १०० असावी.' *(बेलवलकर, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २४२)*. या महाविद्यालयातून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना सर्वत्र मान-सन्मान मिळत असे. त्यांना बडोदा संस्थानात राजाश्रय मिळत असे. संस्थानाबाहेरही नोकरी करण्यास त्यांना परवानगी होती. त्यातील अनेकांनी विविध ठिकाणी आपले नाव कमावले. महाराजांनी संस्कृत भाषेच्या वाढीसाठी केलेल्या प्रयत्नामुळे संस्कृत भाषेचे अनेक विद्वान, जाणकार संस्थानात तयार झाले. यामुळे संस्कृत भाषेतील वाङ्मय निर्मितीसाठी पोषक वातावरण तयार झाले.

महाराजांनी बनारस विश्वविद्यालयाला मदत करताना संस्कृत भाषेचे ज्ञान इतर समाजातील लोकांना शिकण्याची परवानगी जर विद्यापीठ देणार असेल तरच आर्थिक मदत केली जाईल असे स्पष्टपणे सांगितले. अशी परवानगी मिळताच त्यांनी विश्वविद्यालयाला भरघोस मदत केली.

त्यांना संस्कृत भाषेबद्दल आकर्षण होते. त्या भाषेतील ज्ञानामुळे मानवजातीचा उद्धार होऊ शकतो, हेही त्यांना मान्य होते. संस्कृत भाषेचे श्रेष्ठत्व त्यांनी मान्य केले होते. फक्त ती भाषा सर्वसामान्य व्यक्तींना खुली झाली पाहिजे असे त्यांना वाटत होते.

संस्थानातील संस्कृत विद्वानांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन परप्रांतांत पाठवले. महाराजांच्या दातृत्वामुळे बडोद्यात संस्कृतविषयक अनेक कार्यक्रम झाले. नष्ट होणारे अनेक महत्त्वाचे ग्रंथ पुन्हा प्रकाशित केले गेले. विविध अमूल्य ज्ञान पुन्हा उजेडात आले. संस्कृत भाषेचा विकास होण्यासाठी या भाषेतील संमेलनांना आर्थिक मदत केली. महाराजांच्या मदतीमुळेच अशा स्वरूपाची संमेलने बडोद्यात निर्विघ्नपणे पार पडत होती.

३) मराठी साहित्य संमेलन

महाराजांनी गुजरात प्रांतात राज्य केले तरी स्वत:ला मातृभाषेचा विसर पडू दिला नाही. वेगवेगळ्या माध्यमांतून त्यांनी मराठी भाषा, मराठीतील साहित्य, साहित्यिक आणि वृत्तपत्रे यांना पाठबळ दिले. मराठीमध्ये जागतिक दर्जाचे साहित्य निर्माण व्हावे यासाठी साहित्यिकांना सुविधा उपलब्ध करून दिल्या. मराठी साहित्यविश्वातील सर्वांत मोठा मेळा म्हणून 'मराठी साहित्य संमेलना'कडे पाहिले जाते. मराठी साहित्य संमेलने महाराजांच्या काळात तीन वेळा बडोद्यात आयोजित केली गेली. परिणामस्वरूप महाराष्ट्राबाहेर मराठीचा विकास मोठ्या प्रमाणात फक्त बडोद्यात झाल्याचे दिसते. महाराजांनी या साहित्य संमेलनांना मुक्तहस्ताने मदत केल्याचे दिसते.

बडोदा येथे इ.स. १९०९, इ.स. १९२१ आणि इ.स. १९३४ मध्ये महाराष्ट्र साहित्य संमेलने भरली. त्यामधील दोन साहित्य संमेलनांना महाराज स्वत: उपस्थित होते, तर इ.स.१९३२ मध्ये कोल्हापूर येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. या चारही साहित्य संमेलनांना महाराजांनी मदत केली. इ.स. १९०९ साली बडोद्यात भरलेल्या संमेलनाचे अध्यक्ष ले.क. कान्होबा रणछोडदास कीर्तीकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाराजांच्या साहित्य सेवेबद्दल आणि मराठी साहित्याच्या निर्मितीबद्दल गौरवोद्गार काढले. 'श्रीमंत सेनाखासखेल समशेर बहाद्दर सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या राजधानीत आजचा हा अपूर्व समारंभ होत आहे. अपूर्व म्हणण्याचे कारण, ह्याच्यापूर्वी ह्या समारंभाला न झालेला असा एक लाभ झाला आहे. ज्यांच्या ठायी उदात्त विचार, सत्य आणि गंभीर उच्चार व राजर्षीला योग्य असे आचार, असा त्रिवेणी संगम झाला आहे; ज्यांच्या हातून जसे अन्न प्राणिमात्राला पाहिजे तशीच विद्या सर्व जातींच्या, सर्व स्थितीच्या स्त्री-पुरुषांना पाहिजे ह्या तत्त्वावर विद्यादान होत आहे; ज्यांनी केलेली समाजसुधारणेच्या महादुर्गाची रचना पाहून मन तल्लीन होते; ज्यांच्या पौरवजनांच्या आनंदवृत्तीकडे पाहून मनाला परम संतोष होतो; अशा राजनीतिकुशल, प्रजावत्सल, विद्वन्मान्य महापुरुषाच्या कृपाछत्राखाली हे साहित्य संमेलन भरत आहे. म्हणून ही बैठक निःसंशय अपूर्व होय. आपण ज्या रमणीय राजधानीत जमलो आहो, तिचे नाव बडोदे-वटोदर हे अगदी अन्वर्थक आहे. ' *(महाराष्ट्र साहित्य संमेलन संपूर्ण हकिगत, १९१०, पृ. ४)*. महाराजांचा सन्मान करून कीर्तिकरांनी महाराजांनी केलेल्या मदतीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. महाराजांच्या राज्यात भरलेल्या या संमेलनाची सर्व जबाबदारी संस्थानाने उचलली होती.

इ.स. १९०९ साली बडोद्यात आयोजित केलेल्या संमेलनात मागील संमेलनांपेक्षा जास्त आर्थिक मदत मिळाल्याचे इतिहासाचार्य वि.का. राजवाडे म्हणतात. 'महाराष्ट्रांतील ग्रंथकारांचे बडोदे येथे भरलेले संमेलन' या लेखात राजवाडे लिहितात, 'महाराष्ट्रातील ग्रंथकारांचे यंदाचे संमेलन बडोदे येथे मोठ्या दरबारी थाटाने साजरे झाले. त्यात विशेष गोष्ट ही की, जी फलनिष्पती गेल्या चार बैठकीत झाली नाही ती ह्या बैठकीत झाली. संमेनाला दोन-अडीच हजारांची रक्कम मिळाली. ही रक्कम म्हणजे फार जबरी झाली असे नाही; परंतु दरवर्षी पाऊणशे शंभर टिकल्या जमविता जमविता जेथे मारामार पडत असे, त्या मानाने यंदाचे साल चिटणीसांना बऱ्यातले गेले

यात संशय नाही.' *(राजवाडे, १९९१, पृ. ८५)*. महाराजांनी दिलेल्या देणगीचा यात समावेश असल्यामुळे ही रक्कम एकदम वाढली. महाराजांचे दातृत्व मोठे असल्यामुळेच साहित्यविषयक संमेलनांना राजश्रय लाभला. त्यात दिवसेंदिवस वाढ होत गेली.

इ.स. १९२१ बडोद्यात आयोजित केलेल्या मराठी साहित्य संमेलनाला सयाजीराव महाराजांनी २,००० रुपये मदत केली होती. *(B.A.R., 1921-22, p. 295).*

इ.स. १९३४ मध्ये बडोद्यात आयोजित केलेल्या मराठी साहित्य संमेलनाला सयाजीराव महाराजांनी ३००० रुपये मदत केली. *(B.A.R.,1934-35, p.224.)*

बडोद्यात आयोजित केलेल्या तीनही संमेलनांना महाराजांनी मदत केली. त्याबद्दलचा उल्लेख त्या-त्या संमेलनांच्या अध्यक्षांनी आपल्या भाषणांत केला. किंबहुना महाराजांच्या आर्थिक पाठबळावरच ही संमेलने यशस्वीपणे पार पडू शकली.

### ४) हिंदी साहित्य संमेलन

मुंबई येथे आयोजित केलेल्या हिंदी साहित्य संमेलनाला ता. १६ एप्रिल १९१९ रोजी हिंदी भाषेच्या उत्तेजनार्थ श्री. महाराज साहेबांनी पाच हजार रुपयांची देणगी दिली. (सयाजीराव महाराजांचा खासगी व कौटुंबिक वृत्तांत, पृ. २८५). या संमेलनाचे अध्यक्ष मदन मोहन मालवीय होते. तसेच २४ मार्च १९३४ रोजी दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाचे महाराज अध्यक्ष होते. अध्यक्ष या नात्याने या संमेलनासही महाराजांनी मदत केली.

## साहित्यातील सयाजीयुग (बडोदानगरी-सयाजीनगरी)

बडोद्यातील सर्व सुधारणा महाराजांच्या चिंतनाचे फलित होत्या. बडोद्यातील प्रत्येक गोष्टीला महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रज्ञावंत आणि प्रेरक प्रतिभेचा परिसस्पर्श झालेला होता. साहित्य क्षेत्रालाही तर तो नक्कीच झालेला होता. महाराजांच्या योगदानाने बडोद्यात अनेक साहित्यिक, विद्वान आणि प्रतिभावंत यांची मांदियाळी भरली होती. त्यांच्या रत्नपारखी नजरेतून हिंदुस्थानातील समकालीन एकही साहित्यिक हिरा सुटला नाही. या नामांकितांबरोबर एखाद्या क्षेत्राचा ध्यास घेतलेल्या गुणी लोकांची त्या क्षेत्रात अधिकाधिक प्रगती होण्यासाठी त्यांना राजाश्रय देण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले.

बडोद्यातील ग्रंथालयासंबंधी ल.ना. पडोळे यांच्या 'मराठी ग्रंथालयांचा इतिहास' या ग्रंथात महत्त्वाची तुलनात्मक माहिती आहे. या ग्रंथात डॉ.एस.आर. रंगनाथन (अध्यक्ष, अखिल भारतीय ग्रंथालय संघ आणि प्राध्यापक ग्रंथालय शास्त्र विश्वविद्यालय, दिल्ली) त्यांच्या 'Post War Reconstrucation of Libraries in india' पुस्तिकेतील ग्रंथालयांची माहिती आकडेवारीसहित दिली आहे. 'एकूण ग्रंथसंख्या १) इंग्लंड- २,८०,०००,०० २), अमेरिका- ८,६०,०००,००, ३) बडोदे- १९,०००,००, ४) मद्रास- १०,०००,००, ५) भारत सरकार (किती?) ग्रंथालयांचा फायदा मिळणाऱ्या जनतेची शेकडेवारी १) इंग्लंड- शेकडा ९९ टक्के, ६०० ग्रंथालयांद्वारे, २) अमेरिका- शेकडा ७३ टक्के, ७००० ग्रंथालयांद्वारे, ३) बडोदे- शेकडा

८३ टक्के, १३४७ ग्रंथालयांच्याद्वारे, ४) भारत सरकार (किती?) *(पडोळे, संपादक, १९५१, पृ. १५०)*. महाराजांचे बडोद्यातील साहित्यविषयक कार्य जगात दोन नंबरचे होते. सुधारलेल्या देशांशी बरोबरी करणारे होते. किंबहुना त्यांच्याही पुढे जाणारे होते. वरील आकडेवारी पाहता बडोद्याची साहित्यातील श्रीमंती कळते. त्यांच्या साहित्यविषयक भरीव योगदानाची कल्पना येते.

महाराजांच्या कार्यकाळातील बडोद्याच्या वास्तव्यास आणि संपर्कात असणाऱ्या मराठी व इतर साहित्यिकांची यादी पाहिली म्हणजे बडोदा 'साहित्यनगरी' झाल्याची खात्री पटते. त्यांची काही नावे - महात्मा जोतीराव फुले, रियासतकार सरदेसाई, दाजी नागेश आपटे, चिं.वि. जोशी, वि.स. वाकसकर, शंकर मोरो रानडे, वा.वि. जोशी, ना.गो. कालेलकर, ग.ल. ठोकळ, वि.पां. दांडेकर, य.रा. दाते, भ.ब. पाळेकर, वामन मल्हार जोशी, दामोदर सावळाराम यंदे, जनरल नानासाहेब शिंदे, प्रो.ग.य. माणिकराव, रा.शा. मानेपाटील, कृष्णाजी अर्जुन केळुसकर, राजरत्न कवी यशवंत, राजकवी चंद्रशेखर, माधव ज्युलियन, बालकवी ठोंबरे अशा आणि इतर अन्य मान्यवर लेखकांचा काही काळ तरी अधिवास बडोद्यात होता. इतरही भाषांतील लेखक आपापल्या प्रयत्नाने आणि महाराजांच्या मदतीने बडोद्यातील वातावरण साहित्यमय करण्याचा प्रयत्न करत होते. त्यामध्ये अरविंद घोष, मोतीभाई अमीन आणि इतर अनेकांचा समावेश होता. बडोद्यात राहणाऱ्या वेगवेगळ्या भाषांतील साहित्यिकांमध्ये समन्वय होता. या समन्वयासाठी 'भाषांतर शाखा' कार्यरत होती.

सयाजीराव महाराजांनी राज्यकारभाराच्या सुरुवातीस साहित्याकडे खूप लक्ष दिले. त्यांनी साहित्य निर्माण व्हावे यासाठी भरपूर पैसे खर्च केले. त्या काळातील ते एक उत्कृष्ट प्रकाशकही बनले. त्यांच्या या अनमोल कार्याचा गौरव 'अनंत हरी लिमये' यांनी केला. त्याबाबत लिमये म्हणतात, '१८९१ ते १९०० हे दशक मुख्यत्वेकरून श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या मराठी ग्रंथाविषयीच्या प्रेमाचे आहे. सयाजीरावांना मराठी प्रकाशकांचे पोशिंदे म्हणता येईल.' *(लिमये, १९७२, पृ. १५३)*. मराठी साहित्याच्या क्षेत्रात सयाजीराव महाराजांचे योगदान खूप मोठे होते. ते प्रकाशक म्हणूनही श्रेष्ठ होते.

सयाजीराव महाराजांची साहित्याकडे पाहण्याची निर्भेळ दृष्टी, आर्थिक मदत, पुरस्कार, अनुदान, राखीव निधी, नानाविध ग्रंथमाला यामुळे बडोद्यातील साहित्यविषयक वातावरण अनुकूल आणि उत्साही बनले होते. आजही मराठी, गुजराती, हिंदी आणि संस्कृत भाषेतील महत्त्वाचा ग्रंथ शोधायचा झाल्यास बडोद्याचा संदर्भ घ्यावा लागतो. महाराजांच्या कार्यकाळात बडोद्यात चाललेल्या साहित्यविषयक कार्यक्रमांचे मूळ त्यांच्या साहित्यविषयक धोरणात होते. त्यांनी केलेल्या मदतीत होते. त्यांच्या दातृत्वात होते. त्यांनी तयार केलेल्या राजमार्गामुळे त्यांच्या पश्चातही त्याची वाटचाल नीटपणे सुरू होती. त्यामुळे साहजिकच संस्थानात मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती झाली. त्यांनी तयार केलेल्या साहित्यिक वातावरणाचा अनुभव आजही बडोद्यात येतो. हे सर्व त्यांच्या साहित्यविषयक प्रयत्नांचे फळ आहे.

महाराजांची साहित्याविषयी असणारी उपजत गोडी, विद्याव्यासंग यामुळे ज्ञानवंताला आश्रय देण्याची भूमिका त्यांनी राज्यकारभाराच्या प्रारंभीपासूनच स्वीकारली होती. त्यामुळे हिंदुस्थानातील साहित्यिक कमी कालावधीत बडोद्यात जमा झाले. त्यांनी नानाविध विषयांत साहित्यनिर्मिती केली. निर्माण झालेले साहित्य वाचकांना सहजासहजी ग्रंथालयामार्फत मिळू लागले. बडोद्यात वारंवार होणारी व्याख्याने, साहित्यविषयक परिषदा आणि संमेलने यामुळे श्रोत्यांना साहित्यविषयक सामग्री सहजासहजी उपलब्ध होत असे. या साहित्यिक मांदियाळीमुळे बडोद्यातील वाचकांचे 'डोळे' आणि श्रोत्यांचे 'कान' उत्तम प्रकारे तयार झाले. या सर्व साहित्यविषयक घडामोडींना सयाजीराव महाराजांचा मोठा आर्थिक हातभार होता. महाराजांच्या या आर्थिक सहकार्यामुळे त्यांच्या कार्यकाळात बडोदानगरी-सयाजीनगरी-साहित्यनगरी झाली होती.

## साहित्यविषयक संस्थांना केलेली मदत

महाराजांच्या प्रयत्नांमुळे बडोद्यात अनेक साहित्यविषयक चळवळी पोसल्या गेल्या. यामुळे अद्वितीय साहित्य निर्माण झाले. त्यामध्ये साहित्यविषयक संस्थांनानी त्यांनी आर्थिक मदत केली. महाराजांनी फक्त बडोद्यातील संस्थांनाच आर्थिक मदत केली असे नाही तर, हिंदुस्थानात आणि परदेशातील साहित्यविषयक संस्थांनाही मदत केली. अशा संस्थांची यादी पुढीलप्रमाणे-

१) भांडारकर प्राच्यविद्या संस्था, पुणे
२) सहविचारणी सभा
३) ग्रंथसंपादक आणि प्रसारक मंडळी, मुंबई आणि बडोदा
४) रंजितरंजकनाटकमाला (शेक्सपिअर नाट्य कथामाला)
५) महाराष्ट्र वाङ्मय मंडळ
६) महाराष्ट्र वाङ्मय संवर्धन मंडळ
७) वार्ताप्रसारक संघ
८) मराठी वाङ्मय परिषद

## सयाजीराव महाराजांचे साहित्यातील दातृत्व

१) महाराजांनी सन १८८८ साली शास्त्रीय शिक्षणाची पुस्तके गुजरातीत तयार करण्यासाठी ५०,००० रुपयांची रक्कम मंजूर करून त्याबद्दलची सर्व व्यवस्था प्रो. गज्जर यांचेकडे सोपवली. *(आपटे, खंड - २, १९३६, पृ. ६६५).*

२) श्रावण मास दक्षिणेचे दरसाल ५,५०० रुपये नवीन पुस्तके तयार करण्यासाठी त्यांनी लावून दिले व नंतर त्याच निधीतून धर्मशास्त्रावरील उत्तम पुस्तके मराठीत प्रसिद्ध करण्यासाठी दरसाल १०,००० रुपये खर्च करण्याचा हुकूम दिला. *(आपटे, खंड-२,१९३६, पृ. ६६७).*

३) भाषांतरशाखेची स्थापना इ.स. १९०८ साली केली. तेव्हापासून सन १९३२ अखेरपर्यंत महाराजांनी तिच्यावर दीड लाख रुपयांहून अधिक खर्च केला आहे व त्यातील मराठीच्या वाट्यास साठ हजारांवर रुपये आले असून, साहित्यमाला निघण्यापूर्वीचा असा एकंदर खर्च जवळ जवळ तीन लाखापर्यंत जातो. म्हणजे आपल्या साठ वर्षांच्या कारकीर्दीत सुमारे पाच-सहा लाख रुपये ग्रंथनिर्मितीसाठी महाराजांनी खिर्चले आहेत. त्यावरून या कामी महाराजांनी केलेल्या कार्याचे महत्त्व दिसून येईल. *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ८८८).*

४) सखाराम गणेश मुजुमदार यांच्या कै.श्री. महाराणी जमनाबाईसाहेबांच्या चरित्रलेखकास पाचशे रुपयाचे बक्षीस दिले. *(दंडवते, १९२५, पृ. ३७).*

५) 'राष्ट्रकथामाला, सयाजीज्ञानमंजूषा, लघुज्ञानमंजूषा, महाराष्ट्रग्रंथमाला वगैरे मालांना चालना दिली. धर्मशास्त्रविषयक ग्रंथांसाठी ते दरसाल १०,००० रुपये खर्च करीत. सयाजीरावांच्या आश्रयाने १०५ ग्रंथ प्रसिद्ध झाले. योग्य ग्रंथांना पुरस्कार देण्यास ते सदैव सिद्ध असत. परकीय पुस्तकांचे देशी भाषांत भाषांतर करण्यासाठी आपल्या खासगी निधीतून त्यांनी २ लाख रुपयांची देणगी दिली. त्यातून श्री सयाजी साहित्यमालेची १५० पुस्तके व बालज्ञानमालेची १४२ पुस्तके प्रसिद्ध झाली. *(लिमये, १९७२, पृ. १५६).*

६) इ.स. १८८९ मध्ये 'जैमिनी अश्वमेध सार व हरिविजय कथासार' नावाने धार्मिक ग्रंथ संपादन केले. या ग्रंथासाठी सयाजीराव गायकवाड महाराजांनी २०० रुपये देणगी दिली. व ५० पुस्तके विकत घेतली. *(लिमये, १९७२, पृ. १४७).*

७) यशवंत रामकृष्ण दाते हे महाराजांच्या फार दिवसांच्या इच्छेप्रमाणे मराठी कोश तयार करत होते. प्राथमिक अडचणी नाहीशा होण्यासाठी त्यांनी आपण होऊन ५००० रुपयांची मोठी देणगी दिली व कोशाच्या १०० प्रती आपल्या संस्थानासाठी घेण्याचा हुकूम दिला. *(कर्वे, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २३०).*

८) महाराजांनी दाते यांच्याप्रमाणेच श्रीधर व्यंकटेश केतकर यांनाही मदत केली. केतकर गुजराती ज्ञानकोश तयार करत असल्याचे समजल्यानंतर त्यांनाही प्रकाशनपूर्व ५००० रुपये विद्याखात्याकडून दिले. तसेच केतकर यांनी तयार केलेल्या महाराष्ट्रीय शब्दकोशाच्या २००० रुपये किमतीच्या प्रती विकत घेतल्या.

९) गेल्या पंधरा वर्षातच सुमारे सव्वालाख रुपये ग्रंथोत्तेजनासाठी खर्च केले; त्यातील मराठीच्या वाट्यास निदान ५०,००० रुपये तरी आले आहेत. साहित्यमाला निघण्यापूर्वीचा असा खर्च जवळ जवळ अडीच लाखापर्यंत जातो. म्हणजे आपल्या पन्नास वर्षांच्या कारकिर्दीत सुमारे चार-पाच लाख रुपये ग्रंथनिर्मितीसाठी सढळ हाताने खर्च करणारे श्रीमंत सयाजीरावांखेरीज दुसरे कोण सापडणार! सापडते तर देशी भाषांची उन्नती यापेक्षा केवढी मोठी होती. *(कर्वे, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २३१).*

१०) दा.सा. यंदे यांच्या ग्रंथप्रसारक मंडळीस सन १९०१ साली १,२०० रुपये, साठे व भट यांच्या महाराष्ट्र वक्तृत्वोत्तेजक मंडळास ५०० रुपये, ना.के. अलोनी यांना 'लग्नविधी व सोहळे' हे पुस्तक छापण्याकरिता सन १९०४ साली १,००० रुपये, तसेच पाटण व ब्यारा येथील लायब्ररीकरिता ६५० रुपये, पुण्याच्या भांडारकर संस्थेस महाभारताच्या प्रकाशनाकरिता सन १९२२ साली ५००० रुपये, त्याच साली बडोद्याचे रेसिडेंट यांना 'लेडी रीडिग वुइमेन ऑफ इंडिया फंड'साठी २५,००० रुपये, बनारस येथील विद्यापीठात पुस्तकालयाची इमारत बांधण्याकरिता सन १९२६ साली २,००,००० रुपये. *(जोशी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४४७ ते ४५३).*

११) बडोदा येथे इ.स.१९०९, इ.स.१९२१ आणि इ.स. १९३४ साली महाराष्ट्र साहित्य संमेलने भरली. त्यामधील दोन साहित्य संमेलनांना महाराज स्वत: उपस्थित होते. तर इ.स.१९३२ साली कोल्हापूर येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. या चारही साहित्य संमेलनांना महाराजांनी आर्थिक मदत केली.

१२) इ.स. १९२१ बडोद्यात आयोजित केलेल्या मराठी साहित्य संमेलनाला सयाजीराव महाराजांनी २००० रुपये मदत केली.

१३) इ.स. १९३४ साली बडोद्यात आयोजित केलेल्या मराठी साहित्य संमेलनाला सयाजीराव महाराजांनी ३००० रुपये मदत केली.

१४) मुंबई येथे आयोजित केलेल्या साहित्य संमेलनाला ता. १६ एप्रिल १९१९ रोजी हिंदी भाषेच्या उत्तेजनार्थ श्री महाराज साहेबांनी पाच हजार रुपयांची देणगी दिली *(सरदेसाई, १९२५, पृ. २८५).*

१५) महाराष्ट्रांतील ग्रंथकारांचे यंदाचे संमेलन बडोदे येथे मोठ्या दरबारी थाटाने साजरे झाले. त्यात विशेष गोष्ट ही की, जी फलनिष्पत्ती गेल्या चार बैठकीत झाली नाही ती ह्या बैठकीत झाली. संमेलनाला दोन अडीच हजारांची रक्कम मिळाली. ही रक्कम म्हणजे फार जबरी झाली असे नाही; परंतु दरवर्षी पाऊणशे शंभर टिकल्या जमविता जमविता जेथे मारामार पडत असे. त्या मानाने यंदाचे साल चिटणीसांना बऱ्यातले गेले यात संशय नाही. *(राजवाडे, १९९१, पृ.८५).*

१६) पर्शियन आणि अरेबिक हस्तलिखिते संशोधनासाठी आणि संपादनासाठी १,००० रुपये मंजूर केले *(इ.स.१९२१-२२).*

१७) महाराष्ट्र ज्ञानकोशासाठी २२४० रुपये दिले.

१८) धर्मानंद कोसंबी यांच्या 'बुद्ध धर्म आणि संघ' या पुस्तकासाठी ५०० रुपयांची देणगी दिली *(सुखठणकर, संपादक, २०१५, पृ. १९३).*

१९) इ.स. १८९६ साली केशवराव गोंधळेकरांना बडोद्यातील सरकारी छापखाना चालवण्यास दिला. या छापखान्यात त्या काळी २५० नोकर होते. *(लिमये, १९७२, पृ. ५४)*

२०) डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीमार्फत मराठ्यांच्या नऊ भागातील इतिहास लेखनासाठी न्या. रानडे यांना सयाजीराव महाराजांनी मदत केली. *(लिमये, १९७२, पृ. ८२)*

२१) इ.स. १८८४ साली सयाजीराव महाराजांच्या मदतीने 'बडोदा वत्सल' हे वृत्तपत्र सुरू झाले. त्यानंतर दामोदर सावळाराम यंदे यांनाही 'सयाजीविजय' वृत्तपत्र काढण्यासाठी मदत केली.

२२) विनायक कोंडदेव ओक यांच्या 'स्वदेशाभिमान' या ग्रंथास महाराजांनी मोठा आश्रय दिला. *(लिमये, १९७२, पृ. १५१)*

२३) गणेश कृष्ण ऊर्फ बाबा गर्दे यांच्या 'सार्थ वाग्भट' या ग्रंथास सयाजीराव महाराजांनी मदत दिली. *(लिमये, १९७२, पृ. १५२)*

२४) इ.स. १८९३ मध्ये कृष्णशास्त्री गाडगीळ यांच्या 'संसारसुख' या ग्रंथास सयाजीराव महाराजांनी मदत केली. *(लिमये, १९७२, पृ. १६१)*

२५) 'विद्युत आणि चुंबक' या बाळाजी प्रभाकर मोडक यांच्या पुस्तकास सयाजीराव महाराजांनी आर्थिक मदत केली. *(लिमये, १९७२, पृ. १७०)*

२६) बडोद्याचे अधिपती कै. सर सयाजीराव गायकवाड यांनी मराठी ग्रंथनिर्मितीला भरघोस आश्रय दिला होता. *(लिमये, १९७२, पृ. २०९)*

❍❍❍

## प्रकरण ४ थे

# ग्रंथालय आणि प्राच्यविद्येला मदत

'His Highness the Maharaja Sayajirao Gaekwad is the Pioneer of the popular library movement in India, Baroda Raj having been the first to establish state-aided free public libraries in this country. That this movement has roused much interest is evidenced by the enquiries which the Library Department receives in constantly increasing numbers from educationists and social workers in all parts of India.'

- Newton Mohun Dutt.
(Fellow of the Library association,
Curator of the State Libraries Baroda,
Reader to H.H. Maharaja Sayajirao Gaekwad)

### ग्रंथालयांची पायाभरणी

महाराजांनी बडोदा संस्थानात सक्तीचे आणि मोफत शिक्षण सुरू केले होते. अल्पावधीत शिक्षण घेतलेली पिढी तयार झाली. त्यातील काही व्यक्तींनी भाषांतराच्या माध्यमातून तर काही स्वनिर्मित साहित्य निर्माण केले. संस्थानात तयार झालेले साहित्य आणि इतर साहित्य सर्वांपर्यंत पोहोचणे गरजेचे होते. तसेच प्रजेची बौद्धिक भूक भागवण्यासाठी ग्रंथालयांची गरज निर्माण झाली. त्यानंतर महाराजांनी संस्थानात मोफत ग्रंथालये निर्माण केली. अल्पावधीतच बडोदा संस्थान ग्रंथालयांचे आगार बनले. हिंदुस्थानातील मोफत आणि फिरत्या ग्रंथालयांचा पाया संस्थानात घातला गेला. यामागे महाराजांचा व्यासंग, विद्येबद्दलची अभिरुची होती. महाराजांनी राज्यकारभार हाती घेण्यापूर्वी संस्थानात एखादे दुसरे वाचनालय होते. त्याचा विस्तार मर्यादित होता. ठराविक लोकांनाच त्याचा लाभ घेता येत होता. महाराजांच्या राज्याभिषेकानंतर दोन वर्षांनी बडोद्यातील पहिले ग्रंथालय स्थापन झाले. '१ मार्च १८७७ रोजी बडोद्यातील पहिले ग्रंथालय (State Libraray). बडोदा कॉलेजातील सायन्स विभागातल्या दोन खोल्यांत हे ग्रंथालय सामावले गेले होते. महाराजांचे शिक्षक मि. इलियट आणि बडोदा हायस्कूलचे तेव्हाचे प्राचार्य जे.व्ही.एस. पोप यांनी ग्रंथालय व्यवस्थेचे नियोजन केले. ग्रंथालयाच्या पहिल्याच वर्षी

६१ सभासद मिळाले व त्याचे पहिले सदस्य महाराजा सयाजीराव स्वतःच होते.' *(हिंगुराव, २०१५, पृ. १३७)*. बडोद्यात स्थापन झालेले हे पहिले ग्रंथालय असले तरी त्यात सर्वसामान्य लोकांना ग्रंथांच्या देवाणघेवाणीची सूट नव्हती; परंतु महाराज या ग्रंथालयाचे सभासद होते आणि ते यामधून वाचनासाठी नियमित पुस्तके घेत.

महाराजांचे बंधू संपतराव गायकवाड यांनी इ.स. १८८८ साली 'श्रीसयाजी पुस्तकालया'ची स्थापना केली. संपतरावांनी हे ग्रंथालय जुन्या राजवाड्यातील भव्य आणि प्रशस्त दिवाणखान्यात स्थापन केले होते. हे ग्रंथालय सर्वांसाठी मोफत होते. या वाचनालयासंबंधी गोत्री म्हणतात, 'ह्या पुस्तकालयात इंग्रजी ९०९८, मराठी २१२८, गुजराथी २०६५, संस्कृत ५५३ व इतर २०६ मिळून एकंदर ग्रंथसंख्या १४०५० हल्ली विद्यमान असून, ह्या पुस्तकालयाबद्दल आतापर्यंत (इ.स. १९१२) खर्च रुपये १,५०,००० (एक लक्ष, पन्नास हजार) झालेला आहे.' *(गोत्री, १९१२, पृ. ९)*. बडोद्यात सयाजीराव महाराज आणि संपतराव या बंधूंनी ग्रंथालये स्थापन केली.

महाराजांनी इ.स. १९०५-०६ साली अमेरिकेचा प्रवास केला. त्या प्रवासात त्यांनी अमेरिकेतील मोफत वाचनालये पाहिली. त्या वाचनालयांतून होणारा ज्ञानप्रसार, शिक्षणप्रसार पाहिला. महाराज स्वत: विद्वान, साहित्यिक आणि साहित्याचे पोशिंदे असल्याने अमेरिकेतील मोफत ग्रंथालय योजना त्यांना खूपच आवडली. त्यांनी या योजनेचा परिपूर्ण अभ्यास केला. या ग्रंथालयांचे फायदे त्यांच्या लक्षात आले. याच धर्तीवर बडोद्यात ग्रंथालये सुरू करावीत हा विचार त्यांच्या मनात आला. बडोद्यात परत येताच त्याची अंमलबजावणी सुरू केली. काही कालावधीनंतर सरकारी पैशातून ग्रंथालयांचे जाळे निर्माण केले. इतर साहित्यप्रेमी लोकांनी वाचनालये सुरू केल्यास त्यांस सरकार मदत करेल असे आश्वासन दिले आणि मदतही केली.

महाराज अमेरिकेहून परत आल्यावर काही वाचनालये सुरू केली; परंतु या वाचनालयांना आधुनिक स्वरूप सन १९१०-११ पासून दिले. त्याबाबत महाराजांचे चरित्रकार दाते म्हणतात, 'महाराजांनी अमेरिकेहून डॉ. बॉर्डन नावाच्या लायब्ररीच्या कामात निष्णात अशा एक अमेरिकन विद्वानास येथे आणून त्याची 'डायरेक्टर ऑफ स्टेट लायब्ररीज' या नवीन जागी नेमणूक केली. वाचनालय खाते स्वतंत्र करण्यात येऊन त्यास नवीन सुधारलेले स्वरूप देण्यात आले. तसेच नियमातही फेरबदल करण्यात आला. एखाद्या गावी लोकांनी वाचनालयाकरिता जी रक्कम गोळा केली असेल त्याच्या दुप्पट रक्कम सरकारने देण्याचे ठरविले.' *(दाते, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग - १, १९३३, पृ. ६३)*. महाराजांनी डॉ. डब्ल्यू ए. बॉर्डन यांच्या सहकार्याने बडोदा संस्थानात त्या-त्या गावाच्या, शहराच्या गरजेनुसार नगर वाचनालये, प्रांत वाचनालये, ग्राम वाचनालये आणि फिरती वाचनालये (सयाजीवैभव) सुरू केली. त्याची संपूर्ण जबादारी बॉर्डन यांच्यावर सोपवली. त्यांनी गावोगावी वाचनालये स्थापन करून लोकांना ग्रंथांचे महत्त्व पटवून दिले. बॉर्डन यांनी बडोद्यात वाचनालयासाठी तीन वर्षे काम केले.

जगातील सर्वोत्तम ते आपल्या संस्थानात असावे असा महाराजांचा ध्यास होता. त्यामुळे त्यांनी ग्रंथालयात निष्णात असणाऱ्या डॉ. बॉर्डन यांना संस्थानात आणले. डॉ. बॉर्डन

यांच्याविषयी रघुनाथ शतानंद पारखी म्हणतात, 'डॉ. बॉर्डनसाहेब हे ग्रंथालयशास्त्रात अत्यंत निपुण असून अमेरिकेत ग्रंथालयांचे चळवळीत त्यांनी पुढाकार घेऊन बरेच कार्य केले होते. अमेरिकेतील ग्रंथालयांच्या चळवळीचे उत्पादक जगविख्यात डॉ. मेलविल ड्यूई यांनी प्रथम ग्रंथालयशास्त्राच्या शिक्षणाकरिता जे वर्ग काढले होते त्या वर्गात शिक्षक म्हणून बॉर्डनसाहेब बरीच वर्षे काम करीत होते.' *(पारखी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २१४)*. बॉर्डन यांनी महाराजांनी दिलेल्या प्रोत्साहनातून ग्रंथालयांचे भरीव कार्य संस्थानात केले. मि. बॉर्डन संस्थानात आहेत तोपर्यंत महाराजांनी ग्रंथालयांसाठी निष्णात, कुशल मनुष्यबळ निर्माण केले. ग्रंथालयशास्त्राच्या अभ्यासासाठी संस्थानातील अनेकांना शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवले.

### मध्यवर्ती ग्रंथालय (सेन्ट्रल लायब्ररी)

संस्थानात एक आदर्श ग्रंथालय असावे, अशी महाराजांची इच्छा होती. त्यानुसार बडोद्यात मध्यवर्ती ग्रंथालय इ.स. १९१० मध्ये सुरू केले. ही संस्था सुरू करण्यामागे महाराजांचा हेतू व्यापक होता. प्रजा सुशिक्षित व्हावी, जगातील सर्व ज्ञान त्यांना प्राप्त व्हावे अशी त्यांची इच्छा होती. संस्थानातील प्रत्येक व्यक्तीला या वाचनालयात जाता यावे, तेथील ग्रंथ हाताळता यावेत यासाठी सोपी सुटसुटीत योजना करण्यात आली. या वाचनालयात सुरुवातीलाच शहर विभाग आणि इतर विभाग असे या संस्थेचे दोन भाग करण्यात आले होते. तसेच प्रत्येक वयोगटातील स्त्री-पुरुषांसाठी वेगवेगळे विभाग करण्यात आले होते. त्याबद्दल आपटे म्हणतात, 'मोठ्या वयाच्या वाचकांबरोबर बालकांसाठी या संस्थेत खास सोय करण्यात आली व या लहानग्या वाचकांना झेपतील व समजतील असे मनोरंजनाचे प्रकारही तेथे ठेवण्यात आले. या योगाने अशा लहान विद्यार्थ्यांना हा विभाग आरंभापासून फार प्रिय झाला आहे. याखेरीज वाचकांच्या घरी अथवा परगावी पाठविण्यासाठी सुमारे २५-३० पुस्तके मावतील अशा पेट्या तयार करवून, त्यात दर १५ दिवसांनी नवी नवी पुस्तके घालून वाचकांची सोय करण्याचा नवीन उपक्रम या संस्थेत करण्यात आला.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ६४१)*. या ग्रंथालयात पुढीलप्रमाणे वेगवेगळ्या वाचकांसाठी वेगवेगळे भाग होते. १) वर्तमानपत्रांच्या वाचनासाठी वाचनकक्ष (हा वाचन कक्ष सकाळी ८ पासून संध्याकाळी ८ पर्यंत वर्षातील ३६५ दिवस चालू असे), २) पुस्तकांची देवाणघेवाण करण्याचा विभाग, ३) संस्कृत विभाग (यामध्ये संस्कृत भाषेतील छापील पुस्तके आणि हस्तलिखिते यांचा समावेश होता), ४) बालविभाग (यामध्ये बालकांना वाचण्यासाठी लागणारे साहित्य आणि त्यांच्या मनोरंजासाठी आवश्यक बाबींचा समावेश होता), ५) महिला विभाग (या विभागात महिलांना पुस्तकांची देवाणघेवाण करता येत होती. तसेच त्यांना स्वतंत्रपणे वाचनही करता येत होते), ६) संदर्भ विभाग (या विभागात दुर्मिळ ग्रंथांची साठवण केली होती. हे ग्रंथ संदर्भ म्हणून वाचकांना पाहण्यासाठी दिले जात; परंतु घरी नेण्यास परवानगी नव्हती). वाचक या ग्रंथालयाकडे कसे आर्किषत होतील याचाही विचार ग्रंथालय चालकांनी पर्यायाने महाराजांनी केला होता. त्यामुळे हे ग्रंथालय अल्पावधीत नावारूपाला

आले. 'मध्यवर्ती वाचनालय' ही संस्था बडोद्यातील साहित्य क्षेत्राशी निगडित महत्त्वाची संस्था ठरली.

मध्यवर्ती ग्रंथालयामार्फत बडोदा संस्थानातील इतर गावातील, शहरातील वाचनालये चालवली जात होती. त्यामुळे संस्थानातील सर्व ग्रंथालयांची मातृसंस्था म्हणून या मध्यवर्ती ग्रंथालयांकडे पाहिले जात होते. न्यूटन दत्त यांनी १९२८ साली लिहिलेल्या 'Baroda and Its Libraries' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत बडोद्याचे दिवाण सर व्ही.टी. कृष्णम्माचारी यांनी या ग्रंथालयाची भव्यता सांगितली आहे. 'The centre of these activities is the library of baroda with its adjuncts, the Oriental Institutes, the womens library, the juvenile library and visual instruction branch. Then some district and town libraries, 45 in number with-19,000 readers and 2,22,000 books. Lowers down in scale are 661 villages libraries with over 37,000 readers and more than 2,50,000 books.' *(Krishnamachari, Introducation, Dutta, 1928, p.22)*. दिवाणांनी लिहिलेल्या या प्रस्तावनेत बडोद्याच्या ग्रंथालयांची श्रीमंती स्पष्ट दिसते. यामागे महाराजांचे प्रचंड दातृत्व होते. त्यांनी दिलेल्या मदतीचा हात होता. महाराज आपल्या भाषणात अनेक वेळा म्हणायचे की, 'एखाद्या राज्याची प्रगमनशीलता पाहावयाची असेल तर त्या देशातील साहित्य आणि कला पाहावी.' त्यानुसार त्यांनी संस्थानातील साहित्य आणि कलांना प्रोत्साहन दिले. आर्थिक मदत केली. त्यांनी संस्थानातील इतर सुधारणांबरोबर या क्षेत्रांतील सुधारणांसाठीही भरपूर प्रयत्न केले. कला, साहित्य आणि शिक्षण या बाबतीतही त्यांनी पुढारलेल्या राष्ट्रांबरोबर प्रगती केली. किंबहुना त्याहूनही पुढे गेले. त्यांनी स्वतःचे बोल कृतीतून सत्यात उतरवले.

'मध्यवर्ती ग्रंथालय' प्रथम सरकारवाड्यामध्ये स्थापन करण्यात आले होते; परंतु नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होताच नवीन वास्तूत 'मध्यवर्ती ग्रंथालय' स्थलांतरित करण्यात आले. ही इमारत नैसर्गिक आपत्तीपासून मुक्त आहे. भूकंप, अग्नी यापासून इमारतीला धोका नाही. इमारतीचे बांधकाम दक्षिणोत्तर बांधण्यात आले आहे. तळमजल्यावर कोटा दगडांच्या टाईल्स आहेत. तिसऱ्या मजल्यापर्यंत काचेच्या प्रचंड टाइल्स आहेत. ग्रंथालयाला लाकडी छप्पर आहे. टाइल्समुळे आणि लाकडी छप्परामुळे पुस्तके उन्हाळ्यामध्ये गरम होत नाहीत आणि हिवाळ्यामध्ये थंड होत नाहीत. पुस्तके अगदी सामान्य तापमानावर आपोआपच ठेवली जातात. इमारतीमध्ये पुस्तकांना उपयोगी पडणारे वातावरण आहे. पुस्तके ठेवण्यासाठी विशिष्ट प्रकारची सोय केली आहे. शेल्फ - रॅक आहेत. त्यावर तीन लाख पुस्तके ठेवण्याची सोय करण्यात आली आहे. या बांधकामाच्या रचनेमुळे आणि काचेच्या स्लॅबमुळे सर्व वाचनालयात समान प्रकाश पडतो. अपेक्षित असणारा सूर्यप्रकाश आणि पुस्तकांची मांडणी व्यवस्थित असल्यामुळे पुस्तके सहज शोधता येतात. गुजरातला २००१ साली भूकंपाचा जबर धक्का बसला तेव्हा आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे या ग्रंथालयातील कोणत्याही रॅकमधून एकही पुस्तक खाली पडले

नाही किंवा इमारतीचे कोणतेही नुकसान झाले नाही. या इमारतीची संपूर्ण रचना 'जे. स्नेड अँड कंपनी यू.एस.ए.' यांनी केली होती. याच कंपनीने 'लायब्ररी ऑफ काँग्रेस वॉशिंग्टन' याही ग्रंथालयाच्या इमारतीची निर्मिती केली होती.

इ.स. १९३१ मध्ये या वाचनालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. त्यावेळी बांधकामासाठी चार लाख रुपये, फर्निचरसाठी एक लाख रुपये, पुस्तके आणि मासिके यासाठी एक लाख रुपये खर्च करण्यात आले होते. आजही पूर्वीच्याच दिमाखात ही इमारत सर्वांना स्फूर्ती देत उभी आहे. साहित्याला पूरक आणि पोषक ठरणारे एवढे प्रचंड काम त्या काळात जगभरात क्वचितच झाले असावे. महाराजांची साहित्याविषयीची आवड आणि प्रचंड दान करण्याची क्षमता असल्यामुळेच हे भरीव, शाश्वत आणि जनसामान्यांना उपयोगी ठरेल असे काम होऊ शकले.

महाराजांनी ग्रंथालयांना भरपूर आर्थिक मदत केली. राजाश्रय लाभल्यामुळे ह्या संस्था भरभराटीस आल्या. महाराजांच्या आयुष्याच्या शेवटी या संस्था तर प्रगतीच्या शिखरावर होत्या. आपटे यांनी इ.स. १९३६ साली महाराजांचे चरित्र लिहिले. त्यामध्ये ते ग्रंथालयाबाबत म्हणतात, 'ज्यांना अलीकडे सार्वजनिक विद्यापीठ म्हटले जाते त्या वाचनालयांची वाढ या विभागात कल्पनेच्या बाहेर झाली आहे....सन १९३३-३४ सालच्या आकड्यांवरून या वाढीचा एकंदर इतिहास डोळ्यांसमोर उभा राहण्यासारखा आहे. सन १९३३-३४ साली बडोद्याच्या मुख्य सेंट्रल लायब्ररीत १ लक्ष १२ हजारांवर ग्रंथसंख्या होती. राज्यात या मुख्य लायब्ररीखेरीज ४६ मोठ्या गावांतून वाचनालये असून, खेड्यांतील वाचनालयांची संख्या दीड हजारांपर्यंत गेली आहे. बडोदे राज्यातील मोठ्या गावातून शेकडा १०० टक्के लोकांची या वाचनालयांच्या द्वारे सोय करण्यात आलेली असून, खेडेगावांपैकी शेकडा ६६ टक्के इतक्या लोकवस्तीची वाचनाची गरज पुरविण्यात आलेली आहे.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ९७४)*. महाराजांनी लोकशिक्षणासाठी वाचनालयांचा उत्कर्ष केला. त्यांनी बडोदा संस्थानात उभारलेली सुसज्ज ग्रंथालये प्रजेला उच्चविद्याविभूषित करण्याकरिता होती. त्या ग्रंथालयांच्या माध्यमातून सर्व प्रजा शिक्षित आणि सुसंस्कारित व्हावी अशी महाराजांची इच्छा होती.

बडोद्यातील ग्रंथालयांत इतरही समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असत. लोकांना ग्रंथालयाकडे आर्किषत करण्यासाठी विविध योजना राबवल्या जात होत्या. त्यातील जास्तीत जास्त उपक्रम त्याविषयीची माहिती पारखी एका लेखात देतात. 'अशिक्षित लोकांना ज्ञान संपादनाची गोडी लागावी म्हणून त्यांनी उत्तम चित्रपट तयार करवून लॅन्टर्न स्लायडसच्या द्वारे ते चित्रपट गावोगावी दाखवण्याची व्यवस्था केली. लहान मुलांकरिता सेंट्रल लायब्ररीत एक ग्रंथालय स्थापून तेथे मुलांची खेळण्याची व मधून मधून सचित्र व मनोरंजक पुस्तके वाचण्याची व्यवस्था केली. मुलांना मनोरंजक गोष्टी सांगून त्यांच्यामध्ये पुस्तके वाचण्याची आवड निर्माण करावी व त्यांच्या चौकस बुद्धीला चांगले वळण लावावे म्हणून त्यांना आठवड्यातून दोन दिवस गोष्टी सांगण्याचा उपक्रम सुरू केला.' *(पारखी, श्रीसयाजीगौरवग्रंथ भाग - २, १९३३, पृ. २१४)*. या उपक्रमावरून मध्यवर्ती ग्रंथालयाची उपयोगिता लक्षात येते. समाजातील कोणताही घटक

ज्ञानप्राप्तीपासून दूर राहू नये यासाठी महाराजांनी योग्य ती खबरदारी घेतली. एका अर्थाने हे ग्रंथालय बडोद्यातील बौद्धिक भूक भागवण्याचे महत्त्वाचे ठिकाण होते. आजही बडोद्यातील 'मध्यवर्ती ग्रंथालय' त्या काळच्या संपन्नतेची, भरभराटीची साक्ष देते.

## स्वतःचा ग्रंथसंग्रह मध्यवर्ती ग्रंथालयाला भेट

मध्यवर्ती वाचनालय निर्मितीपाठीमागे अर्थातच महाराजांचे विचार, पाठबळ आणि आर्थिक मदतही होती. महाराजांनी या ग्रंथालयासाठी स्वत: जवळील वीस हजारांचा ग्रंथसंग्रह भेट दिला. तसेच महाराजांचे छोटे बंधू संपतराव यांनीही या ग्रंथालयासाठी वेगवेगळे ग्रंथ भेट दिले. महाराज आणि त्यांचे बंधू यांनी ग्रंथालयाची पायाभरणी केली. महाराजांचे दातृत्व केवळ आर्थिक मदतीत नव्हते, तर ग्रंथ दान करून त्यांनी वेगळा पायंडाही पाडला. त्यांनी शिक्षणातून, राज्यकारभारातून जो समानतेचा संदेश दिला त्याची अंमलबजावणी अशा संस्थातून सुरू केली. महाराजांनी सुरू केलेली ग्रंथालये ही जाती-पाती, धर्मापासून मुक्त होती. प्रत्येक व्यक्ती कोणत्याही वाचनालयाचा सभासद होऊ शकत होता. प्रत्येकाला या संस्थेत प्रवेश होता. कोणीही ग्रंथांचा लाभ घेऊ शकत होता.

## सयाजी वैभव (फिरती ग्रंथालये)

कमी लोकवस्ती असणाऱ्या आणि दूरच्या गावात सुसज्ज ग्रंथालय तत्कालीन परिस्थितीत उभारणे शक्य नव्हते. त्यासाठी महाराजांनी फिरती वाचनालये सुरू केली. त्याकाळी अशी फिरती वाचनालये सुरू करणारे बडोदा हे जगातील एकमेव संस्थान होते. त्यास 'सयाजी वैभव' असे सार्थ नाव देण्यात आले. नावाप्रमाणेच महाराज या वाचनालयांना आपल्या संस्थानाचे 'वैभव' समजत होते.

बडोद्याच्या मुख्य ग्रंथालयातून ही योजना राबविण्यात येत असे. न्यूटन दत्त यांनी लिहिलेल्या 'Baroda and Its Libraries' या ग्रंथात 'सयाजी वैभव' या फिरत्या वाचनालयांची संख्यात्मक माहिती दिली आहे. 'The Travelling Libraray section has 413 such boxes and stock of 18,633 books, of which 15,000 are Gujarati, 2,133 English, 1,322 Marathi and rest Urdu and Hindi. During last year 13,396 books were circulated in 418 boxes from 123 centres. The fact that 12,743 of these books were in the Gujarati language is not surprising seeing this language is the mother tongue of 88% of the population. During the past 14 years 1,38, 673 books have been circulated through Travelling Libraray.' *(Dutt, 1928, p. 44)*. महाराज इ.स. १९२८ मध्ये ग्रंथालयांच्या बाबतीत किती जागृत होते हे वरील फिरत्या वाचनालयांच्या आकडेवारीवरून लक्षात येते. त्यांच्या विचारातून ही अभिनव योजना सुरू झाली होती. खेडेगावातील, आदिवासी भागातील, दुर्गम भागातील प्रजा या योजनेचा लाभ मोफत घेऊ शकत होती. यासाठी महाराजांनी खानगीतून मोठी आर्थिक मदत केली होती. त्याशिवाय अशा अभिनव योजना चालणे शक्य नव्हते.

या ‘सयाजीवैभव’ ग्रंथालयांचा उपयोग अनेक प्रकारे होत असे. महाराजांनी बडोद्यात स्त्रियांचा क्लब स्थापन केला होता. त्या क्लबमधील सभासद स्त्रिया आठवड्यातून एक दिवस (शनिवारी) ठरलेल्या बागेत समाजोपयोगी कामासाठी जमत. त्या काळात त्यांच्यासाठी मध्यवर्ती ग्रंथालयातून ‘फिरत्या ग्रंथालया’मार्फत एका पेटीतून काही पुस्तके पाठवली जात. मध्यवर्ती ग्रंथालयाच्या महिला ग्रंथपाल एका पेटीतून पुस्तके घेऊन येत असत. स्त्रियांना ज्या विषयांतील आवड आहे त्या विषयांतील पुस्तके वाचण्यास दिली जात होती. हा उपक्रम अल्पावधीत लोकप्रिय झाला आणि भरपूर प्रतिसाद मिळू लागला. ‘इ.स. १९१२ साली ग्रंथपाल आपल्याबरोबर काही लोकप्रिय पुस्तके, खेळ, चित्रे घेऊन जात असे. हळूहळू मासिके, विशेषत: चित्रमय मासिकांची मागणी वाढू लागली. पहिल्या वर्षी क्लबच्या ८७ सभासदांनी पुस्तकांचा लाभ घेतला आणि दर आठवड्याला एक प्रमाणे ३४ आठवडे दिलेल्या भेटीत महिलांनी एकंदर ९५५ पुस्तकांची देवाणघेवाण केली. ...पुढे या योजनेचा विस्तार वाढतच गेला आणि इ.स. १९१६-१९१७ साली पुस्तक देवाणघेवाणीचा आकडा ६,७०३ पर्यंत पोहोचला.’ *(हिंगुराव, २०१५, १४५)*. महाराजांच्या दातृत्वामुळे अशाप्रकारे त्या काळातील स्त्रियासुद्धा ग्रंथालयांचा वापर अग्रक्रमाने करत होत्या. तसेच महाराजांनी सुरू केलेली ही योजना इंग्लंडच्या महाराणींना खूपच आवडली. त्यासाठी त्यांनी एक सुंदर पेटीही पाठवून दिली.

महाराजांची कोणतीही योजना ही भक्कम पायावर उभी असे. त्यामुळे ती योजना दीर्घकाळ चालत असे. अशा सर्वसमावेशक योजनांमुळे त्याचा फायदा सर्वांना होत असे. ‘सयाजी वैभव’ ही लोकशिक्षणाची योजना अशाच प्रकारे भक्कम पायावर उभी होती. महाराजही या योजनेला कोणत्याही प्रकारे मदत कमी पडू देत नव्हते. त्यांनी ही योजना साधारणपणे इ.स.१९०९-१० साली सुरू केली होती. महाराजांच्या मृत्यूसमयी फिरत्या वाचनालयांची संख्या, त्यातील पुस्तकांची संख्या पाहिली असता आश्चर्य वाटते. ‘There is the travelling libraries which has now 26,650 books. The section circulated 26,778 books among 10,384 readers by sending out 622 boxes to the 375 centres.’ *(Baroda administration Report, 1939-40, p. 206)*. त्यांच्या कार्यकाळात तर ही योजना यशाच्या शिखरावर होती; परंतु आजही ११० वर्षांनतर ही फिरत्या वाचनालयांची योजना त्याच जोमाने सुरू आहे. बडोद्याच्या मध्यवर्ती ग्रंथालयातून ८६ पेट्यांद्वारे ही योजना कार्यरत आहे. दर महिन्याला या पेट्यांतून पुस्तकांची अदलाबदल करण्याची सोय आहे.

अमेरिकेतून आलेल्या डॉ. बॉर्डेन यांनी बडोद्यातील सर्व ग्रंथालयांची घडी अगदी व्यवस्थित बसवलेली होती. डॉ. बॉर्डेन यांच्या काळात आणि त्यांच्या नंतरही इतर ग्रंथालये चालवण्यासाठी कुशल मनुष्यबळाची निकड होती. ती पूर्ण होण्यासाठी ग्रंथालयशास्त्रांचे वर्गही सुरू करण्यात आले. या वर्गांच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ महाराजांनी संस्थानात निर्माण केले, तर ठराविक लोकांना त्यांनी ग्रंथालय शिक्षणासाठी परदेशात पाठवले. त्यामध्ये जनार्धन सखाराम कुडाळकर यांचा समावेश होतो. महाराजांनी त्यांना ग्रंथालय शिक्षणासाठी इंग्लंड आणि

अमेरिकेला पाठवले. त्यांनी ग्रंथालय शास्त्रांचा काळजीपूर्वक अभ्यास केला. इ.स. १९१५ ते इ.स.१९२१ पर्यंत कुडाळकरांनी बडोद्यातील ग्रंथालयांसाठी काम केले. 'ग्रंथालये ही सुजाण मानव निर्मितीची विद्यापीठे आहेत.' तसेच 'समाजातील सर्व घटकांच्या विकासाचा केंद्रबिंदू ग्रंथालये ठरावीत.' अशा दृष्टिकोनातून महाराज ग्रंथालयांकडे पाहत होते. आजही ही फिरती ग्रंथालये सुरू आहेत. यावरून महाराजांनी सुरू केलेल्या या योजनेचे महत्त्व समजते.

## महाराजांचे ग्रंथालयविषयक विचार

संस्थानात सुसज्ज ग्रंथालये असावीत म्हणून महाराजांनी स्वत: लक्ष घातले. त्यात अनेक सुधारणा केल्या. फक्त संख्यात्मक वाढ न करता ती गुणात्मक झाली पाहिजे असा महाराजांचा विचार असे. त्यांनी ग्रंथालयासंबंधीचे विचार अनेक भाषणांतून व्यक्त केले. त्यांना ही ग्रंथालये ज्ञानाची सदावर्ते वाटत होती. या ग्रंथालयांचा फायदा लोकांनी करून घ्यावा असे त्यांना वाटत होते. 'मुंबई ग्रंथ-संपादक मंडळी व इंदुविजय कंपनी' यांच्याकडून मानपत्र देण्याच्या समारंभात महाराज ग्रंथालयाबाबत म्हणाले, 'माझ्या या नवीन योजनेत मला कितपत यश येईल, हे आजच मला सांगता येत नाही व त्यावर मी अवलंबूनही नाही. लोक या कार्यासंबंधाने जी आस्था कृतिरूपाने प्रकट करतील, त्यावरच अशा कार्यातील फलप्राप्ती अवलंबून असते. लोकांनीच अशा कामी आपली तत्परता व संघटन शक्ती प्रकट करणे या गोष्टींची आवश्यकता आहे. सरकार आपल्याकडून होईल तेवढ्या सवलती देऊ शकेल; पण कार्याची उभारणी करणे लोकांच्या हाती आहे. तृषिताला राजा पाणी देईल; पण ते त्याला प्यावयास लावण्याची शक्ती राजाच्या अंगी नाही. बडोद्यास लायब्ररी स्थापन झाली म्हणजे मुंबईतील व इतर ठिकाणच्या लोकांस तिचा फार उपयोग होईल अशी मला फार आशा आहे.' *(भाषण क्र. ६४)*. महाराजांची सर्वच बाबतीतील दृष्टी अखिल भारतीय होती. त्यामुळे साहजिकच याही बाबतीत हिंदुस्थानातील सर्वच लोकांनी याचा फायदा घ्यावा असे त्यांचे मत होते. त्यांनी महाराष्ट्रातील अनेक ग्रंथालयांना भेटी दिल्या. गरज असणाऱ्या ग्रंथालयांना मदत केली. सर्वांना ज्ञान सहजासहजी मिळावे, हा ग्रंथालये निर्मितीचा उद्देश होता.

ग्रंथालयांचा फायदा लोकांना होतो. फक्त त्याची उपयुक्तता, फायदा जनतेने ओळखला पाहिजे, असे महाराजांना वाटत होते. महाराज ग्रंथालयांना 'झाडा'ची उपमा देतात. १३ डिसेंबर १९१२ रोजी वसो येथील सार्वजनिक पुस्तकालयातर्फे मानपत्राला उत्तर देताना ते म्हणाले, 'झाडाचे उदाहरण घेऊन मी ही गोष्ट स्पष्ट करतो. लोकांच्या ठिकाणची ज्ञान मिळवण्याची इच्छा या झाडाच्या मुळ्या होत. या मुळ्यांवर जे निरनिराळे केस असतात त्या समाजातील हरएक व्यक्तीच्या इच्छा म्हणून धरता येतील व एकंदर मुळ्यांचा समूह म्हणजे एकंदर समाजाची ज्ञानलालसा. ही लालसा पुरी करण्यास सरकार जी मदत देते व जनहितार्थ अन्य कार्य करते तो या झाडाचा बुंधा समजावा. जेव्हा झाडाला फांद्या फुटून ते शोभिवंत दिसते, तेव्हाच ते जिवंत आहे असे समजले पाहिजे. याचप्रमाणे अशा पुस्तकालयासारख्या संस्था समाजाचा जिवंतपणा

दाखवितात. त्याशिवाय समाज मृतवत होऊन पडेल.' *(भाषण क्र. ८३)*. समाजाचा जिवंतपणा हा ग्रंथालयांवरून ओळखावा ही महाराजांची कल्पना, उपमा खरोखरच श्रेष्ठ आहे. ग्रंथालयांची हीच उपमा पुढे स्पष्ट करताना महाराज म्हणतात, 'जनसमूहाचे शारीरिक, मानसिक आणि नैतिक सुख म्हणजेच झाडांचे फळ - अंतिम पूर्णावस्था होय. लोकांची ज्ञानलालसा आणि तिच्या सिद्धीसाठी सरकारी मदत यापासून या पुस्तकालयासारख्या संस्था वाढून त्यांना जनसुखाची फळे येतात. एवढेच तात्पर्य झाडाच्या दृष्टांतापासून घ्यावयाचे. झाडाचे साफल्य जसे फळात, तसे राजा आणि प्रजा यांच्या कार्याचे साफल्य जनसुखात दृग्गोचर झाले पाहिजे.' *(भाषण क्र. ८३)*. महाराजांनी वाचनालयांची तुलना वृक्षांच्या मुळापासून ते फळापर्यंत केली. एक विशाल वृक्ष ज्याप्रमाणे मानवाच्या फायद्याचा ठरतो त्याचप्रमाणे संस्थानातील एक-एक ग्रंथालय जनतेच्या फायद्याकरिता आहे. ही कल्पना त्यांच्या व्यासंगाचे आणि ग्रंथालयांचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी पुरेशी आहे. महाराजांचे हे विचार ग्रंथालयांचे महत्त्व समजण्याकरिता उपयुक्त आहेत.

जीवनाचे ध्येय साध्य करण्याकरिता ग्रंथालयांचा उपयोग होतो. हे सांगताना महाराज मुंबई येथील मराठी ग्रंथसंग्रहालय संस्थेच्या उद्घाटन समारंभात म्हणतात, 'आपले ध्येय गाठण्यासाठी तरुणाला अनेक मंडळींशी मिळून मिसळून काम करावे लागेल. त्याच्या गावात लहानच पण महत्त्वाची कामे करणारी मंडळी, राजकारणात पडलेले पुढारी, साम्राज्याचे प्रश्न सोडवणारे धुरीण मुत्सद्दी आणि अखिल जगाच्या व्यवहाराला, व्यवसायाला चालना देणारे बुद्धिमान लोक ह्या सर्वांशी खांद्याला खांदा लावून, ध्येयनिष्ठ तरुणाला कार्यप्रवण व्हावे लागेल किंवा याऐवजी त्याला विचारप्रवण बनून आधुनिक तत्त्ववेत्त्यांचे अनुकरण करण्याचीही इच्छा होईल. अशा रीतीने कार्यप्रवण होवो अथवा विचारप्रवण होवो, त्याने प्रथम ज्याला 'जानपद विश्वविद्यालय' म्हणतात त्या ग्रंथालय नामक विश्वविद्यालयांत अभ्यासक म्हणून दाखल झालेच पाहिजे.' *(भाषण क्र. ८१)*. जीवनात यशस्वी व्हायचे असो अथवा राष्ट्रकार्य करायचे असो प्रत्येकाला ग्रंथालय अत्यंत आवश्यक आहे आणि त्याचा उपयोग केल्याशिवाय कोणतीही व्यक्ती जीवनात यशस्वी होऊ शकत नाही यावर महाराजांचा ठाम विश्वास होता. अशा प्रकारे ग्रंथालयांना 'जानपद विश्वविद्यालय' संबोधून त्यांचे महत्त्व स्पष्ट करतात.

महाराजांना हिंदुस्थानातील दारिद्र्य, अंधश्रद्धा आणि मागासलेपण केवळ अज्ञानामुळे आहे असे वाटत होते. त्याबद्दल बोलताना ते म्हणाले, 'ज्ञानाच्या प्रसाराने अज्ञानरूपी रोग नाहीसा होतो, असा माझा समज आहे. अज्ञानाने किती लोक मरतात, किती लोक आपली आयुष्ये दुःखात घालवतात याचा विचार करा व ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी झटा. नुकसानकारक रूढी सोडण्यास भिऊ नका, चांगले असेल ते ग्रहण करा. आपल्या देशात, आपल्या राष्ट्रात, जे नुकसानकारक असेल ते टाकून द्या. हिंदुस्थान अज्ञानरूपी अंधकारात असल्यामुळे चांगल्या गोष्टीचा त्यास फायदा करून घेता येत नाही. पुस्तकालयांनी हा अज्ञानरूपी रोग नाहीसा होईल.' *(भाषण क्र. ६३)*. ग्रंथालये उभारणीमागे महाराजांचे हे उदात्त ध्येय होते. केवळ संस्थानातील

सुधारणांचा विचार न करता अखिल हिंदुस्थानातील मागासलेपण या ग्रंथालयांनी जाईल असा विचार महाराज करत होते. अशाच प्रकारचा विचार त्यांनी श्री. जयसिंगराव लायब्ररीच्या हीरक महोत्सवानिमित्त बोलताना व्यक्त केला. 'विलक्षण अज्ञान आणि अस्वाभाविक वर्गभेद हेच माझ्या मताने आमच्या मागासलेपणाच्या मुळाशी आहेत. आपल्या ३५ कोटी लोकसंख्येमध्ये निरक्षरांची शेकडेवारी केवढी मोठी आणि धक्का बसणारी आहे? तिचा नुसता विचारच आपल्याला कापरे भरविणारा आणि लाजेने मान खाली घालावयास लावणारा आहे. म्हणून आपली पहिली आणि अगदी प्रमुख गरज म्हटली म्हणजे शिक्षण आणि ज्ञान-प्रसार हीच होय. याच उद्देशाने मी पुष्कळ शाळा आणि वाचनालये उघडलेली आहेत. त्यांचा भरपूर फायदा घ्या असेच माझे सर्वांना सांगणे आहे.' *(भाषण क्र. २२२)* इथल्या लोकांच्या अज्ञानामुळे हिंदुस्थान पारतंत्र्यात आहे. जर प्रत्येक व्यक्तीचा उत्कर्ष व्हायचा असेल तर शिक्षणाला पर्याय नाही, असा विचार महाराज नेहमी मांडत. त्यांचे हे विचार आजही महनीय आहेत.

महाराज वाचनालयांचा फायदा सांगताना नेहमी व्यक्ती, समाज आणि देश यांच्या उन्नतीचा विचार करत. आपली स्वतःची प्रगती ग्रंथांनी आणि पुस्तकांनी कशी झाली याविषयी वरील भाषणात म्हणतात, 'मजबद्दल म्हणाल तर जरी मला विद्यापीठातील शिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही तरी चांगली व उपयुक्त पुस्तके वाचून मिळणारे सर्व ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी मला उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा मी निष्ठेने आणि उत्साहाने उपयोग केला. पुस्तकांवरून अभ्यास करून माझ्या प्रजेच्या सेवेसाठी व त्यांच्या सुखासाठी मला मिळालेले ज्ञान मी उपयोगात आणले, माझे सर्वच उद्देश व आकांक्षा सिद्धीस गेल्या असे नाही; पण मी मजकडून करता येणे शक्य होते तेवढे सर्व केले आहे.' *(भाषण क्र. २२२)*. संस्थानातील सुधारणा या महाराजांच्या अभ्यासावर आणि त्यांच्या कल्पनेतील होत्या. त्यांच्या व्यासंगावर आधारित होत्या. त्यांच्या चिंतनाचे फलित होत्या. महाराजांनी पुस्तकांना जीवनात महत्त्वाचे स्थान दिले. प्रजेच्या सुधारणांसाठी त्यांनी शिक्षण घेतले पाहिजे असा विचार ते नेहमी बोलून दाखवत. शिक्षणासाठी ग्रंथालयांचा आधार घेतला पाहिजे असे त्यांना वाटत होते. यामुळेच त्यांनी संस्थानात ग्रंथालयांना महत्त्वाचे स्थान दिले.

महाराज कायम प्रजेच्या शिक्षणाचा विचार करत. त्यांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना लिहिलेल्या पत्रांतूनही ग्रंथालयासंबंधी विचार मांडले आहेत. मानवाच्या कल्याणाचा, उत्कर्षाचा मार्ग ग्रंथालयातून जातो असे महाराजांना वाटत होते. त्यामुळे ग्रंथालयांचा विकास करण्याकडे त्यांचे अधिकचे लक्ष होते.

बडोदा संस्थानापासून हिंदुस्थानातील मोफत आणि फिरत्या ग्रंथालय चळवळीस प्रारंभ झाला. ही चळवळ जोमात येण्यापाठीमागे महाराजांचे योगदान होते. त्यांची अभ्यासू वृत्ती होती. दानशूरपणा होता. त्यांनी अनेक ग्रंथ स्वत: अभ्यासले होते. ग्रंथांमुळे एखाद्या देशाची सर्वंकष प्रगती होऊ शकते, ग्रंथ हेच अंधारातून प्रकाशाकडे आणि अधोगतीकडून प्रगतीकडे जाण्याचा मार्ग दाखवतात यावर महाराजांचा विश्वास होता.

## महाराजांची ग्रंथालयांना आर्थिक मदत -
## (संस्थान, संस्थानाबाहेर आणि परदेशात)

बडोदा संस्थानात स्थापन झालेले पहिले ग्रंथालय (State Libraray) सरकारी अनुदानावरच उभारले गेले. 'या ग्रंथालयास राज्याकडून दरमहा रु. ५००० इतकी रक्कम पुस्तके खरेदी करण्यासाठी व रु. १२०० इतकी रक्कम ग्रंथालयातील मदतनीस वर्गाकरिता देण्यात येई. हे अर्थसाहाय्य ग्रंथालयाला पहिल्या ५ वर्षांपर्यंत मिळत असे.' *(हिंगुराव, २०१५, पृ. १३७).* या स्टेट लायब्ररीचे रूपांतर पुढे 'श्री. जयसिंगराव सार्वजनिक वाचनालय' या नावाने करण्यात आले. बडोद्यातील ग्रंथालये अधिकाधिक लोकाभिमुख कशी होतील याकडे महाराजांचे लक्ष होते.

महाराज हिंदुस्थानातील मोफत, फिरत्या आणि गाव तेथे वाचनालय या योजनांचे प्रेरक आणि संस्थापक होते. ग्रंथालये सुरू करण्याचे, वाढवण्याचे आणि त्यांना वैभव प्राप्त करून देण्याचे श्रेय महाराजांना जाते. त्यांनी संस्थानातील एकूण ४१ तालुक्यांपैकी २६ तालुक्यांत आपापल्या तालुक्यातील ग्रंथालयांची वाढ होण्याकरिता कमिट्या नेमल्या होत्या. या कमिट्या वर्गणी गोळा करून ग्रंथालये स्थापन करत. स्थापन केलेल्या ग्रंथालयांची पाहणी करत. ग्रंथालयाबाबत महाराज नेहमी अशा प्रकारची दूरदृष्टी ठेवत. त्यांनी संस्थानात ग्रंथालय उभारणीसाठी खूप मोठी मदत केली. ग्रंथालयांच्या भरभराटीसाठी खूप मदत केली. त्याबाबत रघुनाथ पारखी म्हणतात, 'गेल्या वीस वर्षांत सरकारकडून मदत घेणाऱ्यानगर व ग्राम-ग्रंथालयांच्या स्थापनेकरिता एकंदर २०,५२,४८५ रुपये खर्च झाले आहेत. त्यापैकी सरकारी मदत ७,०७,०६६ रुपयांनी झाली आहे, लोकल बोर्डाची केलेली मदत ६,५३,५५३ रुपये आहे; व लोकांनी जमवून खर्च केलेली रक्कम ६,९२,८६६ रुपये होय. वरील आकड्यात सेंट्रल लायब्ररीच्या खर्चाचा समावेश केलेला नाही. सेंट्रल लायब्ररीत प्रतिवर्षी ५०,००० रुपये खर्च होतात.' *(पारखी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग - २, १९३३, पृ. २१७).* ग्रंथालयांना मदत केलेल्या रकमांमुळे अनेक सुसज्ज ग्रंथालये संस्थानात निर्माण झाली. त्याचा वापर सर्वसामान्य लोक करू लागले. यावरून बडोदा संस्थानातील ग्रंथालयांचे महत्त्व स्पष्ट होते. वरील रकमा इ.स.१९३३ मधील आहेत. त्यानंतरही महाराजांनी ग्रंथालयांसाठी मोठी मदत केली.

## हिंदू बनारस विद्यापीठातील ग्रंथालयासाठी दोन लाख

सयाजीराव महाराजांचे साहित्यातील दातृत्व सर्वपरिचित आहे. महाराजांनी फक्त बडोदा संस्थानातील ग्रंथालयांना मदत केली नाही. त्यांनी हिंदुस्थानातील इतर भागांतील ग्रंथालयांनाही मदत केली. त्यामध्ये मुंबई, पुणे, अलाहाबाद, बनारस येथील ग्रंथालयांना मदत केली होती. बनारस विश्वविद्यालयातील ग्रंथालयास सयाजीराव महाराजांनी दोन लाख रुपये दिले (याची नोंद संस्थांना मदत या प्रकरणात सविस्तरपणे आहे). आजही या विश्वविद्यालयात महाराजांच्या नावाने ग्रंथालय आहे.

महाराजांनी प्रवासात जगाच्या कानाकोपऱ्यात असणारी तत्कालीन सुसज्ज, नामांकित ग्रंथालये पाहिली होती. त्यामधील समृद्ध ग्रंथसंपदा नजरेखालून घातली होती. त्यामुळे त्यांना ग्रंथालयांचे महत्त्व माहीत होते. म्हणून त्यांनी परदेशातील ग्रंथालयांनासुद्धा मदत केली.

## ग्रंथालय शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

महाराजांनी बडोदा संस्थानात ग्रंथालयांचे जाळे तयार केले. प्रत्येक गावातच नव्हे; तर प्रत्येक व्यक्तीला या सर्वांचा लाभ कसा होईल याचाही विचार महाराजांनी केला. त्यामुळे साहजिकच त्यांना ग्रंथालय संबंधाने देश आणि परदेशातील मान-सन्मान मिळाले.

महाराजांनी संस्थानात ग्रंथालये व्यवस्थित चालावीत यासाठी कुडाळकर आणि दत्त यांना परदेशात शिक्षणासाठी पाठविले होते. त्यांनी तो अभ्यासक्रमही पूर्ण केला. या दोघांची ग्रंथालयातील योग्यता आणि प्रावीण्य पाहून त्यांना अखिल हिंदुस्थानात मान-सन्मान मिळाले. त्यामध्ये रा. जनार्दन सखाराम कुडाळकर यांचा हिंदुस्थानात ग्रंथालयांच्या बाबतीत सखोल अभ्यास होता. त्यांच्या बाबत आपटे म्हणतात, 'रा. कुडाळकर यांचा या विषयावरील मोठा अधिकार जाणून, त्यांना मद्रास येथे भरलेल्या अखिल भारतीय वाचनालय परिषदेच्या अध्यक्षत्वाचा मानही मिळाला होता.' *(आपटे, खंड - २, १९३६, पृ. ६४१).* महाराजांनी भविष्यकाळातील ग्रंथालयांना येणारे महत्त्व ओळखले होते. ग्रंथालयांचे महत्त्व ओळखत त्याची पायाभरणी भक्कम केली होती. या कामासाठी त्यांना कुडाळकर, मोतीभाई अमीन आणि दत्त यांच्यासारखी निष्ठावान हिऱ्यासारखी माणसे मिळाली.

कुडाळकरांचा इ.स. १९२१ साली अकाली मृत्यू झाल्याने बडोद्यातील ग्रंथालय चळवळीचे काही काळ नुकसान झाले. कुडाळकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी लीलावती यांना पेन्शन सुरू केली. मुलींना (२) प्रत्येकी १० रुपये प्रति महिना शिष्यवृत्ती सुरू केली. तसेच कुडकाळकरांच्या मुलाला वयाच्या २० वर्षापर्यंत २० रुपये शिष्यवृत्ती सुरू केली. *(रा.स.खा.टु.झा.टु. नोंद, भाग-४, १९२०-२१, पृ. ३०)*

रा. कुडाळकर यांच्या मृत्यूनंतर श्रीयुत न्यूटन मोहन दत्त यांची नेमणूक करण्यात आली. कुडाळकर यांच्या हाताखाली दत्त यांनी स्टेट लायब्रेरियन म्हणून इ.स. १९१५ पासून काम केले होते. बडोदा संस्थानात वाचनालय सुधारणांसाठी त्यांनी खूप कष्ट घेतले होते. त्यांच्या या कीर्तीमुळे त्यांना अनेक सन्मान मिळाले. त्याबाबत पारखी म्हणतात, 'श्रीयुत दत्त हे हिंदुस्थानातील अत्यंत प्रवीण ग्रंथाध्यक्ष म्हणून नावाजलेले आहेत. इ.स. १९२० साली काशी येथे अखिल आशिया शिक्षण परिषद झाली, तेव्हा ग्रंथालयाचे भागावर श्रीयुत दत्त यांना अध्यक्ष नेमण्यात आले होते; व त्यावेळी त्यांनी आपल्या अत्यंत मौल्यवान ज्ञानाचा लाभ हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रातांतील तेथे जमलेल्या ग्रंथाध्यक्षांना करून देऊन त्यांचे मनात ग्रंथालय चळवळीविषयी आस्था निर्माण केली. इ.स. १९३१ मध्ये कलकत्त्यास बंगालमधील ग्रंथालयांचे संमेलन भरले होते. तेव्हा श्री. दत्तांना त्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात

आले होते.' *(पारखी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २१६)*. यानंतर श्रीयुत अमीन यांनीही संस्थानात ग्रंथालयांसाठी चांगले काम केले. महाराजांनी ग्रंथालयांच्या बाबतीत ज्या-ज्या लोकांवर विश्वास टाकला त्यांनी अत्यंत चांगले काम केले. महाराजांनी नेमलेल्या व्यक्तींनी बडोदा संस्थानाचे नाव ग्रंथालयाच्या बाबतीत जागतिक पातळीवर नेले.

महाराजांनी नेमलेल्या व्यक्तींना त्यांच्या कर्तृत्वामुळे आणि महाराजांनी उपलब्ध करून दिलेल्या संधीमुळे मान-सन्मान मिळाले. त्याचबरोबर महाराजांनाही ग्रंथालयांच्या विषयाने मान-सन्मान लाभले. मुंबई येथील 'मराठी ग्रंथसंग्रहालय' संस्थेच्या इमारतीची पायाभरणी महाराजांच्या हस्ते करण्यात आली, तर त्याच इमारतीचा उद्घाटन समारंभ महाराजांच्या हस्ते ७ नोव्हेंबर १९१२ रोजी झाला.

महाराजांचा विद्याव्यासंग सर्वपरिचित होता. परदेशात सुद्धा ग्रंथालयांच्या संबंधित परिषदांच्या अध्यक्षपदावर त्यांची निवड झाली होती. ग्रेट ब्रिटनचे ग्रंथालय संचालक आणि प्रतिनिधींनी ३० मे १९३५ रोजी महाराजांना 'क्लेरीज हाऊस लंडन' येथे शाही भोजन दिले. तसेच २५ ऑक्टोबर १९३५ रोजी ब्रिटिश लायब्ररी असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी महाराजांची निवड झाली. हे पद लंडनमध्ये मानाचे समजले जात असे. महाराजांच्या विद्वत्तेमुळे, ग्रंथालयांना केलेल्या आर्थिक मदतीमुळे आणि ग्रंथालयांच्या प्रेमामुळे त्यांची अशा पदावर निवड झाली.

सयाजीराव महाराजांच्या आश्रयाने बडोद्यात इ.स.१९२५ साली 'अखिल बडोदे संस्थान ग्रंथालय संघ' स्थापन झाला. त्याच्या शाखा गावोगावी सुरू झाल्या. या वर्षापासून ग्रंथालय चळवळीला वेग आला. या ग्रंथालय चळवळीचा फायदा संस्थानातील लोकांना झाला. या ग्रंथालय संघाबद्दल पारखी म्हणतात, 'या संघातर्फे प्रतिवर्षी प्रमुख गावी संमेलने भरतात; व त्या संमेलनात पुष्कळ विद्वान लोक, सरकारी अंमलदार व इतर प्रमुख मंडळी भाग घेतात. लोकांच्या मनात सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व पटविण्याकरिता पुस्तके, मनोवेचक व उद्बोधक चित्रे, नाना तऱ्हेच्या माहितीने युक्त असे नकाशे व अशाच प्रकारच्या इतर वस्तूंचे प्रदर्शन भरवले जाते. मॅक्मिलन, केम्ब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, सी. ब्लॅक, मुडीज लायब्ररी, जे. बुटस् लायब्ररी, दि टाइम बुक क्लब, दि डेमोक्राट प्रिंटिंग कंपनी, न्यूयॉर्क एच. डब्लू विल्सन कंपनी, गेलॉर्ड ब्रदर्स आणि इतर पुष्कळ प्रकाशक व दुकानदार यांचेकडून पुस्तके, मासिके व ग्रंथालयांना उपयुक्त पुष्कळ वस्तू प्रदर्शनात ठेवण्यासाठी पाठवण्यात येतात. या प्रदर्शनाचा परिणाम लोकांच्या मनावर उत्तम रीतीने होत आहे.' *(पारखी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २१६)*. फक्त ग्रंथालये उभारली आणि त्यामध्ये पुस्तके ठेवली तर वाचन चळवळ वाढेल एवढ्या मर्यादित विचारांपुरते महाराज कार्य करत नव्हते. ग्रंथालय चळवळीचा फायदा लोकांनी घ्यावा यासाठी ते कायमच प्रयत्नशील असल्याचे दिसते.

महाराजांचा ग्रंथालय चळवळीशी जवळून संबंध होता. हिंदुस्थानातील तसेच जगातील अनेक ग्रंथालयांसंबंधी संस्थांशी त्यांचा परिचय होता. समकालीन जगातील नावाजलेल्या ग्रंथालयांच्या प्रमुखांशी परिचय होता. त्यांनाही महाराजांचे कार्य परिचित होते. त्यामुळे न्यूयॉर्क

लायब्ररी असोसिएशनने 'देशी राज्यांमध्ये मोफत सार्वजनिक वाचनालय निर्मितीचे आद्यप्रणेता' या शब्दांत महाराजांचा गौरव केला.

महाराजांनी संपूर्ण हिंदुस्थानला नव्हे, तर जगाला ग्रंथालयांच्या बाबतीत आदर्श घालून दिला. जगातील राज्यकर्त्यांना प्रजेच्या लोकशिक्षणासाठीचा आदर्श राजमार्ग तयार करून दिला. त्यांनी संस्थानातील प्रत्येक घटकाला सुशिक्षित आणि संस्कारी बनवण्यासाठी या ग्रंथालयांची निर्मिती केली. त्याचा फायदा तेथील प्रजेने करून घेतला. काही कालखंडानंतर सर्व जगात बडोद्यातील सुशिक्षित, सुसंस्कारी जनतेचा बोलबाला झाला.

## ओरिएंटल इन्स्टिट्यूट (प्राच्यविद्या संस्था)

### स्थापना

सयाजीराव महाराजांना त्यांच्या शिक्षकांनी संस्कृत भाषेचे महत्त्व सांगितले होते. संस्कृतमधील महनीय ज्ञानाची कल्पना दिली होती. त्यामुळे महाराजांचे संस्कृत ग्रंथांकडे राज्यकारभाराच्या प्रारंभापासूनच लक्ष होते. पहिल्या परदेश प्रवासात महाराजांनी संस्कृत हस्तलिखिते खरेदी करण्यासाठी ३०,००० रुपये दिले. त्यांच्याकडे असणाऱ्यादूरदृष्टीमुळे त्यांनी इ.स. १८९३ सालीच 'ओरिएंटल इन्स्टिट्यूट' संस्थेची उभारणी केली. प्राच्य साहित्याच्या संवर्धनाचा विचार मनात येताच त्यांनी पाटण आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणी विद्वानांना पाठवून संस्कृत पोथ्यांचा संग्रह, अध्ययन आणि भाषांतराचे काम सुरू केले होते. त्या विद्वानांमध्ये मणिभाई द्विवेदी, अनंतकृष्ण शास्त्री, पंडित यज्ञेश्वर, चिमणलाल दलाल यांनी महत्त्वाचे कार्य बजावले. चिमणलाल दलाल यांनी पाटण येथील ग्रंथांची वर्णनात्मक सूची तयार करण्याचे खूप मोठे काम केले. त्यांच्या अचानक निधनानंतर मणिलाल नथूभाई द्विवेदी यांनी अशाच प्रकारचा प्रयत्न केला. या संस्थेत मूळ ग्रंथ जमा करण्याचे प्राथमिक; परंतु मोठे काम महाराजांनी नेमलेल्या लोकांनी निष्ठेने पूर्ण केले. हिंदुस्थानातील मोठा ग्रंथसंग्रह या संस्थेत जमा करण्यात आला. त्या ग्रंथांच्या बृहत्सूचीचा पहिला भागही इ.स. १९२५ साली प्रसिद्ध झाला. फक्त ग्रंथसंग्रह करून चालणार नाही तर ते सर्वांसाठी उपलब्ध व्हावेत अशी महाराजांची इच्छा होती. यासाठी त्या ग्रंथांचे संशोधन, संपादन आणि भाषांतर करण्याचेही काम त्याचवेळी सुरू केले होते. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी 'गायकवाड ओरिएंटल सिरीज' काढण्यात आली (या सिरीजला कलेल्या मदतीचा विचार पुढे स्वतंत्रपणे करणार आहोत). अशा प्रकारे या संस्थेचे काम मुख्य संस्था स्थापन होण्याअगोदर चौतीस वर्षे अव्याहतपणे सुरू होते. या संस्थेचे काम संकलन, संवर्धन आणि प्रकाशन या तिन्ही पातळीवर जोमाने सुरू होते. महाराजांनी इ.स. १९२७ साली 'ओरिएंटल इन्स्टिट्यूट' (प्राच्यविद्यामंदिर) या संस्थेची विधिवत स्थापना केली.

पुणे येथे स्थापन झालेल्या 'प्राच्य विद्या संशोधन मंदिर' अर्थात भांडारकर संस्थेचे श्रीपाद बेलवलकर आणि डॉ. गुणे महाराजांना भेटण्यासाठी बडोद्यास गेले असता त्यांना महाराजांच्या प्राच्यविद्येच्या आस्थेबद्दलचा आलेला अनमोल अनुभव त्यांनी 'श्रीसयाजीगौरवग्रंथा'त दिला आहे. त्यावेळी बडोद्यात अशा प्रकारच्या संस्थेची मोठी प्रगती झाली होती. त्या भेटीबाबत

बेलवलकर म्हणतात, 'श्री. सयाजीराव महाराजांची कीर्ती आम्ही पूर्वीच ऐकलेली असल्याने निदान आम्ही योजलेल्या संस्थेपेक्षा बडोद्यात होऊ घातलेल्या संस्थेत विशेष कोणकोणत्या योजना असतील त्यांची तरी माहिती करून घ्यावी या उद्देशाने माझे सहकारी मित्र परलोकवासी डॉ. गुणे व मी महाराज सरकारांच्या निमंत्रणाप्रमाणे बडोद्यास गेलो व तेथे सुमारे अर्धा तास सरकारी मुलाखत झाल्यानंतर त्यांच्याच सांगण्यावरून विद्याधिकारी व इतर तज्ज्ञ विद्वानांशी विचारविनियम केला. मुलाखतीवरून रिसर्च इन्स्टिट्यूट अथवा संशोधनसंस्था म्हणजे काय, तिने काय काय कार्य केले पाहिजे व त्यास कोणकोणती साधने लागतील त्याची महाराजांस बरीच परिपूर्ण कल्पना होती याबद्दल आमची खात्री झाली.' *(बेलवलकर, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग - २, १९३३, पृ.२३५)*. महाराजांनी ही संस्था सन १९२७ मध्ये स्थापन केली असली तरी त्याच्या कितीतरी अगोदर त्याबाबतची माहिती जमा केली होती. त्यासाठी लागणारी आर्थिक मदत दिली होती. महाराजांच्या दातृत्वामुळेच अशा संस्था उभारल्या गेल्या. त्यांची भरभराट झाली. संस्था स्थापन झाल्यावर संशोधित ग्रंथांचे प्रकाशन 'गायकवाड ओरिएंटल सिरीज'मधून केले जात होते. संस्कृतचे संवर्धन करण्याची योजना त्यांनी नियोजनपूर्वक आखली होती.

'ओरिएंटल इन्स्टिट्यूट' स्थापन झाल्यापासून म्हणजे इ.स. १८९३ सालापासून संस्थेत दुर्मिळ संस्कृत ग्रंथांचा संग्रह करणे सुरू होते. ते गरजेचेही होते. त्याशिवाय अशा संस्थांचे कार्य पुढे जाणार नव्हते याची महाराजांना खात्री होती. त्यासाठी महाराजांचे संस्कृतप्रेमी बंधू संपतराव गायकवाड यांच्याकडील संस्कृत ग्रंथांचा संग्रह, पंडित यज्ञेश्वर यांच्याकडील संग्रहही या संस्थेत जमा करण्यात आला. महाराजांच्या देवघरातील अनेक संस्कृत पोथ्या जमा करण्यात आल्या. त्यामध्ये, 'मुख्यत: श्रीमंत महाराणी सरकारांच्या देवघरात संग्रही असलेल्या सचित्र व सूक्ष्माक्षरांनी लिहिलेल्या महाभारत (लांबी २२८ फूट), भागवत (लांबी ८४ फूट), हरिवंश (४४ फूट) आणि गीता (लांबी १०॥) फूट या कलेच्या दृष्टीने बहुमोल बिडोळी-ग्रंथांचा लाभ झाला.' *(बेलवलकर, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २३६)*. याशिवाय बडोदा संस्थानात पाटण येथील जैन धर्माच्या सुप्रसिद्ध ठिकाणी असणारे अनेक ग्रंथ उपलब्ध करण्यात आले. ते ग्रंथ ताडपत्रावर लिहिण्यात आले होते. येथील ग्रंथसंपदा विपुल होती. जैन धर्माचे अभ्यासू विद्यार्थी सी.डी. दलाल यांची महाराजांनी संस्कृत ग्रंथालयाच्या प्रमुखपदी नेमणूक केली. एखाद्या विषयात आस्था असणाऱ्या व्यक्तीला त्या विषयाचे काम दिल्याने ते काम काळजीपूर्वक केले जाते, असा महाराजांचा अनुभव होता. त्यानुसार त्यांनी दलाल यांना संस्कृत ग्रंथालयाचे प्रमुख नेमले. त्यांनी पाटण आणि जेसलमीर येथील भांडाराची सूची तयार केली. संस्कृत साहित्य लोकांच्या समोर आणण्यासाठी, संस्कृतमधील ग्रंथांच्या भाषांतरासाठी अधिकाधिक ग्रंथसंग्रह करणे गरजेचे होते. महाराजांनी स्थापिलेली प्रत्येक संस्था लोकाभिमुख होत होती. कारण हरेक संस्था त्यांच्या विचारांच्या भक्कम पायावर उभी राहिली होती.

ओरिएंटल इन्स्टिट्यूट संस्थेचा उद्देश संग्रहात्मक आणि संशोधनात्मक असा दुहेरी होता. या संस्थेमधून संस्कृत ग्रंथांचे संवर्धन आणि संशोधन करून पुनर्प्रकाशन केले जाणार होते. संस्थेचा

पहिला उद्देश सफल करण्यासाठी महाराजांनी बरेच पैसे खर्च केले. संस्कृतमधील छापील ग्रंथ जमा करणे सोपे होते; परंतु हस्तलिखित जमा करणे खूप अवघड काम होते. प्रथम बडोद्यातील विठ्ठल मंदिरातील दोनशे हस्तलिखित पोथ्या या संस्थेच्या ताब्यात देण्यात आल्या. महाराजांचे नोकर ज्यावेळी संस्थानात किंवा इतर ठिकाणी अशा प्रकारचे दुर्मिळ ग्रंथ जमा करण्यास जात त्यावेळी ते ग्रंथ सहजासहजी मिळत नसत. त्या ग्रंथांचे जाणकार किंवा मालक ती उपलब्ध करून देत नसत. अशा प्रसंगी भरपूर पैसे देऊन ते ग्रंथ खरेदी करावे लागत. या संस्थेचे कार्य अधिक प्रभावशाली होण्यासाठी आणि संस्थेची भरभराट होण्यासाठी महाराजांनी 'अनंत कृष्ण शास्त्री' यांची नेमणूक केली होती.

अनंत शास्त्री यांनी देशभरात फिरून अत्यंत कष्टाने संस्कृत पोथ्या जमा केल्या. त्याबाबत आपटे म्हणतात, 'अनंत कृष्ण शास्त्री यांना कित्येक वर्षे सर्व हिंदुस्थानात ग्रंथसंपादनासाठी पाठविण्यात आले. त्याच्या परिणामी या संस्थेतील हस्तलिखित ग्रंथांची संख्या आज वीस हजारांवर गेली आहे! या संग्रहात भूर्जपत्रांवर, ताडपत्रांवर, कागदांवर, वस्त्रांवर वगैरे निरनिराळ्या साधनांवर लिहिलेले ग्रंथ असून, शिवाय अनेक प्राचीन ताम्रपटांचाही समावेश आहे.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ८९९)*. या संस्थेतील ग्रंथसंख्येवरून या संस्थेचे महत्त्व आणि उपयोगिता लक्षात येते. संस्थेचा दुसरा उद्देश सफल करण्यासाठी इतर साहित्यमालांप्रमाणेच पूर्वीच अस्तित्वात असलेल्या 'गायकवाड ओरिएंटल सिरीज' मालेतून हे ग्रंथ संशोधित करून प्रकाशित केले जाऊ लागले. कालांतराने या मालेचा विस्तार करण्यात आला. या विस्तारासाठी डॉ. भट्टाचार्य यांची नेमणूक केली. त्यासाठी महाराजांनी खास निधी राखून ठेवला होता. महाराजांनी दिलेल्या भरमसाट देणग्यांमुळेच अशा प्रकारच्या संस्था त्या काळात उभारल्या गेल्या. चांगले कार्य करू शकल्या.

## गायकवाड ओरिएंटल सिरीज

महाराजांनी जुने, दुर्मिळ ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी 'गायकवाड ओरिएंटल सिरीज' नावाची माला इ.स. १९१५ मध्ये काढली होती. या मालेमधून इ.स. १९१६ साली 'राजशेखराची काव्यमीमांसा' हा ग्रंथ प्रथम प्रकाशित करण्यात आला. महाराजांनी या मालेमधून अनेक ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले. ओरिएंटल इन्स्टिट्यूटच्या स्थापनेनंतर (इ.स. १९२७ नंतर) या मालेतून प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांची संख्या वाढली. याबाबत बेलवलकर म्हणतात, 'आजवर (इ.स. १९३३ सालापर्यंत) या श्रेणीतून ६३ ग्रंथ प्रसिद्ध झाले असून २७ ग्रंथ छापत आहेत. प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांपैकी काही - उदाहरणार्थ, काव्यमीमांसा (अनुक्रमांक १), समरांगण (अनु. २५ व ३२), मानसोल्लास (अनु. २८), तत्त्वसंग्रह (अनु. ३० व ३१), नाट्यवेद विवृति (अनु. ३६), न्यायप्रवेश (अनु. ३८ व ३९), भावप्रकाश (अनु. ४५). इत्यादी ग्रंथांनी संस्कृत साहित्यामध्ये फारच महत्त्वाची भर टाकली आहे. छापत असलेल्या ग्रंथांपैकी इष्टसिद्धी, सूक्तीमुक्तावली व शाबर भाष्याचे समग्र इंग्रजी भाषांतर यांच्या प्रसिद्धीकडे विद्वानांचे

नेत्र उत्सुकतेने लागून राहिले आहेत.' *(बेलवलकर, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २३९).* यानंतरही अत्यंत दुर्मिळ आणि महत्त्वाच्या ग्रंथांचे प्रकाशन या मालेमधून करण्यात आले. महाराजांच्या पश्चात 'गायकवाड ओरिएंटल सिरीज'चे संशोधन आणि प्रकाशन आजही सुरू आहे. या मालेतून २००९ पर्यंत १८७ ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले होते. तर 'महाराजा सयाजीराव गायकवाड युनिव्हर्सिटी ओरिएंटल सिरीज'मधून सन २०१२ पर्यंत २५ ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. या ग्रंथांची नावासहित माहिती ओरिएंटल इन्स्टिट्यूट बडोदाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मालेमधून प्रकाशित करण्यात येणाऱ्या ग्रंथांची किंमत कमी ठेवण्यात येत असे. जेणेकरून सर्वांनी तो ग्रंथ विकत घ्यावा. प्रकाशित झालेल्या ग्रंथांची यादी पाहिली असता ग्रंथांचे मोल आणि मूल्य याची साक्ष पटते. ('गायकवाड ओरिएंटल सिरीज'मधून प्रकाशित झालेल्या ग्रंथांची सूची परिशिष्टात दिली आहे.)

## ओरिएंटल लायब्ररी

इ.स. १९०७ सालीच ओरिएंटल लायब्ररीची महाराजांच्या इच्छेवरून स्थापना करण्यात आली. या ग्रंथालयात प्रथम बडोदे येथील विठ्ठल मंदिरातील संस्कृत ग्रंथांचा संग्रह करण्यात आला. या ग्रंथालयासाठी महाराजांचे बंधू संपतराव गायकवाड यांनी स्वतःच्या संग्रहातील ६३० ग्रंथ भेट दिले. पुढे महाराजांच्या मदतीने आणि त्यांनी देशभरात पाठविलेल्या लोकांच्या मदतीने या ग्रंथालयाची खूपच भरभराट झाली. अनेक दुर्मिळ आणि मौल्यवान ग्रंथ या ग्रंथालयात जमा झाले. हे ग्रंथालय उन्नत होण्यासाठी सी.डी. दलाल, जैन पंडित एल.बी. गांधी यांनी खूपच कष्ट घेतले. महाराजांनी त्यांना उदार आश्रय दिला.

पुढे इ.स. १९२७ मध्ये या लायब्ररीला सेंट्रल लायब्ररीपासून स्वतंत्र केले आणि विधिवत ओरिएंटल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. ही स्थापन करण्यामागे महाराजांचे साहित्यावरील प्रेम आणि दातृत्वच कारणीभूत होते (या लायब्ररीवर त्या काळात महाराज करत असलेला खर्च या प्रकरणाच्या शेवटी दिलेल्या तक्त्यावरून लक्षात येईल).

## प्राच्यविद्या अभ्यासकांचा सन्मान

महाराजांनी संस्थानात संस्कृतच्या वाढीसाठी पोषक, अनुकूल वातावरण निर्माण केले. आवश्यक असणारी साधनसामग्री जमा केली. आवश्यक असणाऱ्या भौतिक सुधारणा, सुविधा निर्माण केल्या. संस्थानातील संस्कृत अभ्यासकांना आर्थिक मदत केली. या मदतीविषयी आपटे म्हणतात, 'पंडित जुन्या संस्कृत विद्येचे संपूर्ण अध्ययन करून ती नवीन स्वरूपात लोकांपुढे मांडतात, त्या वेळी ते आपल्या प्रयत्नांची कदर राजेलोकांकडून व्हावी अशी अपेक्षा ठेवीत नसले, तथापि त्यांच्या मेहनतीचे चीज करणे हे विद्येची अभिरुची असलेल्या राजाचे कर्तव्य आहे असे समजून, महाराजांनी अशा विद्वानांचा सन्मान करण्याची एक योजना काही वर्षांपूर्वी केली आहे; व तद्नुसार प्रो. राधामुकुंद मुखर्जी, चिंतामणराव वैद्य अशांसारख्या लेखकांचा महाराजांनी सन्मान करून त्यांना पदव्या व पदके अर्पण केली आहेत.' *(आपटे, खंड-३, १९३६,*

*पृ. १००).* महाराजांनी प्राच्यविद्या संस्थेसाठी तर मदत केलीच होती. तसेच वैयक्तिकरीत्याही संस्कृत भाषेतील साहित्यात उत्कृष्ट काम करणाराला रोख स्वरूपात बक्षिसे दिली. मराठी आणि गुजराती साहित्यिकांप्रमाणे संस्कृत साहित्यिकांना आणि संशोधकांना वर्षासने सुरू केली. त्यांच्या या दातृत्वामुळे अनेकांना प्रोत्साहन मिळाले.

महाराजांनी आपल्या दरबारात संस्कृत विद्वानांचा सन्मान केला. त्यासाठी त्यांनी इ.स. १९३० साली खास दरबार भरवला. या खास दरबारामध्ये मराठी भाषेतील दामोदर सावळाराम यंदे आणि संस्कृत भाषेतील चिंतामणराव वैद्य यांचा सन्मान केला. त्यावेळी केलेल्या भाषणात महाराजांनी 'वाङ्मय कलेच्या या दोन अंगांमुळे जगाच्या आनंदात कितीतरी अमूल्य भर पडली आहे. हा विषय निरंतर माझ्या जिव्हाळ्याचा असल्यामुळे मला हे कार्य करताना आनंद होत आहे.' असा उल्लेख करत चिंतामणराव वैद्य यांच्या कार्याविषयी गौरवोद्गार काढले. संस्कृत विद्वानांचा सन्मान करण्याची ही योजना महाराजांनी कायमस्वरूपी सुरू ठेवली. त्यांनी संस्कृत साहित्य तसेच इतर साहित्यासाठी आयुष्यभर सर्व प्रकारची मदत केली.

महाराजांनी वे.शा.सं. यज्ञेश्वरशास्त्री, वे.शा.सं. आबाशास्त्री, कृष्णशास्त्री, वे.शा. सं. त्र्यंबकनाथ दयानाथ शास्त्री, वे.शा.सं बद्रीनाथ या सर्वांना आर्थिक मदत केली. त्यांचा सन्मान केला. या सन्मानाबद्दल बेलवलकर म्हणतात, 'पंडित बद्रीनाथ यांस श्री. महाराजसरकार यांनी 'तर्क वाचस्पती'ही बहुमानाची पदवी अर्पण केली होती. त्यांना ब्रिटिश सरकारकडून 'महामहोपाध्याय' हा किताबही प्राप्त झाला होता. याशिवाय इतरही विद्वान पंडित महाराजांच्या कारकिर्दीत होऊन गेले व सध्या विद्यमानही आहेत. उत्कृष्ट गुणांचे चीज महाराजांच्या हातून झाले नाही असे विरळाच घडे. स्वकीय विद्वानांहूनही अधिक पुरस्कार परप्रांतीय विद्वानांचा महाराजांकडून केला जातो असा प्रवाद आहे व तो दूषण नसून भूषण आहे.' *(बेलवलकर, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २४३).* महाराजांच्या कार्यकाळात संस्कृत विद्वानांना संस्थानात मोठ्या प्रमाणात राजाश्रय लाभला होता.

बडोदा संस्थानातील पंडित छोटालाल नर्भेराम भट्ट हे 'राजपंडित' होते. महाराजांनी त्यांना 'कलादीप' ही पदवी दिली. त्यांनी ५५ संस्कृत ग्रंथांचे भाषांतर केले. बद्रीनाथ शास्त्री हेही 'राजपंडित' होते. महाराजांनी 'तर्क वाचस्पती' ही पदवी दिल्यानंतर हिंदुस्थानातील अनेक संस्थानांकडून त्यांना विविध पदव्या मिळाल्या. अमृतराज शास्त्री यांना महाराजांनी धर्माच्या आणि संस्कृतच्या अभ्यासासाठी काशी येथे पाठवले. महाराजांनी ज्या शास्त्री, पंडितांना राजाश्रय दिला त्यामध्ये 'रामकृष्ण हर्षजी शास्त्री, राजाराम काशीनाथ टोपरे, रामनाथ भोलानाथ शास्त्री, मूळशंकर माणिकलाल याज्ञिक, लक्ष्मीनाथ बद्रीनाथ शास्त्री, बद्रीनाथ काशीनाथ शास्त्री, विद्याभास्कर मणिशंकर वसंतराम उपाध्याय, जगन्नाथ श्रीधर पदेशास्त्री यांचा समावेश होतो' *(नेने, २०१०, पृ. ५९ ते ६०).* या यादीत राजवाड्यातील पंडितांचा समावेश नाही. जे शास्त्री पंडित संस्कृत अभ्यास किंवा संस्कृतमधील ग्रंथनिर्मिती करत होते त्यांना महाराजांनी मदत केली.

## प्राच्यविद्या परिषदेची संमेलने (बडोदा, हिंदुस्थानातील आणि देशाबाहेरील)

महाराजांचे ग्रंथप्रेम सर्वश्रुत आहे. संस्कृत ग्रंथांचे मूल्य त्यांना माहीत होते. त्यामधील ज्ञानाची त्यांना ओळख होती. त्याचा त्यांनी अभ्यासही केला होता. त्यामुळे महाराजांनी प्राच्य विद्येसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. याकामी लागणारा पैसा महाराज सहजासहजी उपलब्ध करून देत. महाराजांनी बडोद्यात जागतिक प्राच्यविद्या परिषदेचे सातवे अधिवेशन २७ डिसेंबर १९३३ रोजी भरवले. या प्रसंगी केलेल्या भाषणात महाराजांनी आर्थिक मदतीचा उल्लेख केला. 'मी बऱ्याच संस्कृत ग्रंथांची मराठीत व गुजराथीत भाषांतरे करून घेतली आहेत. तसेच दोन लक्ष रुपये बाजूस काढून ठेवून त्याच्या व्याजातून संस्कृत व इतर परभाषा यातील अनेक ग्रंथांची भाषांतरे करविली आहेत. त्यांची संख्या तीनशेच्या घरात गेली आहे.' *(आपटे, खंड-३, १९३३, पृ. १०३९)*. महाराजांची ही मदत सर्वच प्रकारच्या भाषांतरासाठी होती. यामध्ये संस्कृत ग्रंथांचाही समावेश होता.

महाराजांना प्राच्यविद्येविषयी खास आस्था होती. गरज पाहून ते याकामी कायम आर्थिक मदत करत असत. पुण्यातील भांडारकर संस्थेच्या संस्थापक सदस्यांपैकी एक असलेले बेलवलकर महाराजांच्या दातृत्वाविषयी म्हणतात, 'पुणे येथे भांडारकर इन्स्टिट्यूटमार्फत सुरू असलेल्या महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीसाठी महाराजांनी प्रथम एक हजार रुपये देणगी दिली. परंतु नंतर दरवर्षी ५०० रुपयांची मदत केली जाते.' *(बेलवलकर, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २४३)*. ही सर्व मदत महाराजांनी आपल्या खासगी फंडातून केली.

हिंदुस्थानात स्थापन झालेल्या प्राच्यविद्या परिषदेच्या प्रत्येक अधिवेशनास आर्थिक मदत केली. तसेच जागतिक प्राच्य अभ्यासालाही मदत केली. त्यासंबंधीची आकडेवारी चिं. वि. जोशी यांनी दिली आहे. 'महाराजांनी सर्वप्रथम इ.स. १८८७ साली इंग्लंडमधील ओरिएंटल इन्स्टिट्यूटला ६००० रुपयांची मदत केली.' *(जोशी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-३, १९३३, पृ. ४४८)*. हिंदुस्थानात प्राच्यविद्या संस्था स्थापन झाल्यानंतर दर दोन वर्षांनी अधिवेशने भरत. त्यासाठीही त्यांनी आर्थिक मदत केली. 'महाराजांनी इ.स. १९२० पुणे येथे भरलेल्या पहिल्या परिषदेस, इ.स. १९२२ साली कलकत्ता येथील दुसऱ्या परिषदेस, इ.स. १९२४ साली मद्रास येथे भरलेल्या तिसऱ्या परिषदेस, इ.स. १९२६ साली बनारस येथे भरलेल्या चौथ्या परिषदेस प्रत्येकी १००० रुपयांची आर्थिक मदत केली.' *(जोशी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-३, १९३३, पृ. ४५२ ते ४५३)*. त्यांनी ही सर्व मदत स्वतःच्या खासगी फंडातून दिल्याचे चिं.वि. जोशी सांगतात. त्यानंतरही प्रत्येक अधिवेशनास महाराज मदत करत होते. या परिषदेचे सातवे अधिवेशन तर महाराजांनी बडोदा शहरात आयोजित केले.

पाश्चिमात्य देशांनी ज्याप्रकारे त्यांच्या देशातील पूर्वजांनी लिहिलेल्या ज्ञानाचा उपयोग केला, त्याचप्रमाणे आपणही आपल्याकडे असणाऱ्या ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे असा विचार महाराजांनी वारंवार मांडला. त्यांनी आपल्या संस्थानात संस्कृतमधील ग्रंथ सर्वसामान्य

जनतेसमोर यावेत यासाठी प्रयत्न केले. हिंदुस्थानातील संस्कृत साहित्य जगासमोर आणण्यासाठी आर्थिक मदत केली. तसेच जगातील प्राचीन साहित्य सर्वांसमोर येण्यासाठीही मदत केली. याबाबत कोणताही समकालीन संस्थानिक किंवा सार्वभौम राजा महाराजांची बरोबरी करू शकत नाही.

## ग्रंथालय आणि प्राच्यविद्येला केलेली आर्थिक मदत

१) सयाजीराव महाराजांनी ग्रंथालयांसाठी इ.स. १९२५-२६ साली १,००,०७८ रुपये खर्च केले, तर इ.स. १९२६-२७ साली १,२१,७२६ रुपये खर्च केले. *(Dutt, 1928, p. 70)* (अधिक माहितीसाठी पुढे खर्चाचा तक्ता दिला आहे.)

२) इ.स. १९०६ सालापासून ग्रंथालयांसाठी काही नियम केले. त्या नियमानुसार संस्थानातील कोणत्याही गावातील नागरिकांनी एखादे ग्रंथालय उघडण्याकरिता १००, ३००, अथवा ७०० रुपये जमा केले असल्यास त्यांना सरकारकडून तितकीच रक्कम व म्युनिसिपल बोर्डाकडून तितकीच रक्कम दिली जाते *(पारखी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २२०).*

३) एखाद्या छोट्यातल्या छोट्या गावात ग्रंथालय स्थापन करावयाचे झाल्यास तेथील लोकांना १०० रुपयांची पुस्तके २५ रुपयांना दिली जातात. बाकीचे ७५ रुपये सरकारकडून दिले जातात *(पारखी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २२०).*

४) संपतरावांनी ‘श्रीसयाजी पुस्तकालया'ची स्थापना केली. ह्या पुस्तकालयावर इ.स. १९१२ पर्यंत खर्च १,५०,००० रुपये (एक लक्ष पन्नास हजार) खर्च झालेला होता *(गोत्री, १९१२, पृ. ९).*

५) बडोदा संस्थानात स्थापन झालेले पहिले ग्रंथालय (State Libraray) सरकारी अनुदानावरच उभारले गेले. या ग्रंथालयास राज्याकडून दरमहा रु. ५००० इतकी रक्कम पुस्तके खरेदी करण्यासाठी व रु.१२०० इतकी रक्कम ग्रंथालयातील मदतनीस वर्गाकरिता देण्यात येई. हे अर्थसाहाय्य ग्रंथालयाला पहिल्या ५ वर्षांपर्यंत मिळत असे *(हिंगुराव, २०१५, पृ. १३७).*

६) गेल्या वीस वर्षांत सरकारकडून मदत घेणाऱ्यानगर व ग्राम-ग्रंथालयांच्या स्थापनेकरिता एकंदर २०,५२,४८५ रुपये खर्च झाले आहेत. त्यापैकी सरकारी मदत ७,०७,०६६ रुपयांनी झाली आहे, लोकल बोर्डाची केलेली मदत ६,५३,५५३ रुपये आहे व लोकांनी जमवून खर्च केलेली रक्कम ६,९२,८६६ रुपये होय. वरील आकड्यात सेंट्रल लायब्ररीच्या खर्चाचा समावेश केलेला नाही *(पारखी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २१७).*

७) सेंट्रल लायब्ररीत प्रतिवर्षी ५०,००० रुपये खर्च होतात *(पारखी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग - २, १९३३, पृ. २१७).*

८) बनारस विश्वविद्यालयातील ग्रंथालयास सयाजीराव महाराजांनी दोन लाख रुपये दिले. (याची नोंद 'The History Banaras Hindu University' या ग्रंथात सविस्तरपणे आहे).

९) महाराजांनी संस्थानात ग्रंथालये व्यवस्थित चालावीत यासाठी जनार्दन सखाराम कुडाळकर आणि न्यूटन मोहन दत्त यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पाठविले होते.त्यांनी तो अभ्यासक्रमही पूर्ण केला.

१०) प्रो. राधामुकुंद मुखर्जी, चिंतामणराव वैद्य अशांसारख्या प्राच्यविद्या लेखकांना आणि संशोधकांना महाराजांनी सन्मान करून त्यांना पदव्या व पदके अर्पण केली *(आपटे, खंड - ३, १९३६, पृ. ९००).*

११) पुणे येथे भांडारकर इन्स्टिट्यूटमार्फत सुरू असलेल्या महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीसाठी महाराजांनी प्रथम एक हजार रुपये देणगी दिली; परंतु नंतर दरवर्षी ५०० रुपयांची मदत केली जाते *(बेलवलकर, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग - २, १९३३, पृ. २४३).**

१२) नाशिक येथील लायब्ररीला महाराजांनी २०० रुपये दिले (१९१८).

१३) महाराजांनी सर्वप्रथम इ.स. १८८७ साली इंग्लंडमधील ओरिएंटल इन्स्टिट्यूटला ६००० रुपयांची मदत केली *(जोशी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग - ३, १९३३, पृ. ४४८).**

१४) पाटण व व्यारा येथील ग्रंथालयांना ६५० रुपये दिले *(जोशी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग - ३, १९३३, पृ. ४४९).**

१५) अलाहाबाद हिंदू बोर्डर असोसिएशन इमारत व लायब्ररी बांधकामाकरिता इ.स.१९०४ साली ४,००० रुपये दिले *(जोशी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग - ३, १९३३, पृ. ४५०).**

१६) महाराजांनी दर दोन वर्षांनी भरणाऱ्या प्राच्यविद्या परिषदेच्या अधिवेशनांना इ.स. १९२० मध्ये पुणे येथे भरलेल्या पहिल्या परिषदेस, इ.स. १९२२ साली कलकत्ता येथील दुसऱ्या परिषदेस, इ.स. १९२४ साली मद्रास येथे भरलेल्या तिसऱ्या परिषदेस, इ.स. १९२६ साली बनारस येथे भरलेल्या चौथ्या परिषदेस प्रत्येकी १००० रुपयांची आर्थिक मदत केली *(जोशी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-३, १९३३, पृ. ४५२ ते ४५३).**

१७) दरवर्षी १०० ग्रंथालये उघडण्याचा महाराजांनी आदेश दिला. त्यामुळे प्रत्येक गावासाठी आणि शाळेसाठी ग्रंथालय उभारेल असा महाराजांचा कयास होता.

१८) सयाजीराव महाराजांनी भद्राण, वाको आणि द्वारका येथील महिला ग्रंथालयासाठी ५००० रुपये दिले.

१९) इ.स. १९२६-२७ पासून सर्व ग्रंथालयांसाठी सुरू असलेले १,२०० रुपयांचे अनुदान (ग्रामीण ग्रंथालयासाठी) इ.स.१९३८-३९ वर्षांपासून ५५५ रुपयांनी वाढ केली

*(* या रकमा महाराजांनी स्वतःच्या खासगीफंडातून दिल्या आहेत.)*

ग्रंथालयांवरील खर्च -

| Items | Expenditure 1925-26 Rupees | Expenditure 1926-27 Rupees | Budget 1927-28 Rupees |
|---|---:|---:|---:|
| GENERAL ADMINISATRATION AND CENTRAL LIBRARY Establishmen | 18,003 | 17975 | 20,224 |
| Dead Stoc | 838 | 1492 | 250 |
| | | | 10,000 steel satcks |
| Contingency | 2,663 | 2,420 | 1,578 |
| Fitting fan | 428 | 000 | 000 |
| Removing telephone | 212 | 000 | 000 |
| Insuranc | 725 | 781 | 782 |
| Uniform for peons | 000 | 000 | 550 |
| Scholarships | 240 | 240 | 160 |
| Books | 7,209 | 15013 | 4,375 |
| Periodicals | 1,800 | 1,371 | 1,500 |
| Total | 32,118 | 39,292 | 39,419 |
| MAHILA LIBRARIES Establishment | 408 | 408 | 408 |
| Periodicals | 96 | 87 | 100 |
| Total | 504 | 495 | 508 |
| BINDERY Establishment | 744 | 804 | 744 |
| Materials | 597 | 479 | 400 |
| Books bound outside | 000 | 4000 | 000 |
| Total | 1, 341 | 5, 283 | 1,144 |
| TRAVELLING LIBRARIES | | | |
| Establishment | 1,440 | 1,440 | 1,440 |
| Books | 746 | 700 | 700 |
| Dead Stock | 397 | 420 | 400 |
| Transportation | 317 | 380 | 400 |
| Total | 2,900 | 2,940 | 2,940 |

| | | | |
|---|---|---|---|
| VISUL INSTRUCTION | | | |
| Establishment | 1,236 | 1,236 | 1,236 |
| Materials | 2645 | 3,924 | 2,000 |
| Contingency | 160 | 160 | 160 |
| Transportation | 101 | 508 | 700 |
| Travelling Expenses | 95 | 262 | 500 |
| Fire proof Godown | 000 | 000 | 4,300 |
| Total | 4,237 | 6090 | 8896 |
| DISTRICT SECTION | | | |
| Establishment | 4548 | 4708 | 4656 |
| Travelling Expenses | 601 | 689 | 1,000 |
| Exhibitions | 235 | 554 | 000 |
| Grant-in-aid to country libraries | 24,879 | 25,316 | 30,000 |
| Grant for Buildings | | | |
| Grant for purchasing | 5,000 | 15,000 | 0000 |
| books for new libraries | 1,500 | 0000 | 2,000 |
| Total | 36,663 | 46,267 | 37,656 |
| SANSKRIT SECTION* | | | |
| Establishment | 11,508 | 11,627 | 828 (For two monts) |
| Gaekwad's Oriental Series | 10707 | 9746 | |
| Total | 22,215 | 21,373 | 828 |
| GRAND TOTAL | 1,00,078 | 1,21,740 | 91, 391 |

N.B. -The Sankskrit Section from the 1st September 1927 was separated from the Library and now styled the 'Oriental Institute' *(Dutt, 1928, p.70)*

## मध्यवर्ती ग्रंथालयांवरील खर्च (इ.स.१९३८-३९)

| Sr. No. | Items | Rs.As. Ps |
|---|---|---|
| | Budgeted Items | |
| | Central Library | |
| 1. | Permanent Establishment | 23,414-5-3 |
| 2. | Temporary | 3,283-2-2 |
| 3. | Electric Contingency | 909-13-7 |

| | | |
|---|---|---|
| 4. | Contingency | 1,110-9-6 |
| 5. | Dead stock | 647-6-0 |
| | | 364-5-0 |
| 6. | Bhatha Bhada | 1,054-4-2 |
| 7. | Periodicals | 2,297-0-1 |
| 8. | Periodicals for mahila library | 99-15-9 |
| 9. | Book purchase | 12,865-14-4 |
| 10. | Printing forms | 598-12-8 |
| 11. | Bindery | 1,000-0-0 |
| | | 364-9-10 |
| 12. | Garden | 391-8-0 |
| 13. | Telephone maintenance | 170-0-0 |
| 14. | Dress for menials | 27-0-0 |
| | Total | 48,598-10-4 |
| | Travelling Libraries | |
| 15. | Books | 945-5-3 |
| 16. | Dead stock | 000 |
| 17. | Transport | 554-4-0 |
| | Total | 1,499-9-3 |
| | DISTRICT LIBRARIES | |
| 18. | Aid to State Libraries | 34,192-10-4 |
| 19. | Building | 9,999-10-8 |
| 20. | Opening New Libraries | 4,997-11-5 |
| 21. | Grant to state Library Association | 1,000-0-0 |
| | Total | 50,190-0-5 |
| | Grand total of budgeted items | 1,00,288-4-0 |
| | Non-Budgeted Item | |
| 22. | Bhatha Bhada | 12-1-0 |
| 23. | Cycle repair | 12-12-0 |
| | Total | 24-13-0 |
| | Grand total | 1,00,313-1-0 |

वरील दोन्ही तक्त्यांचे अवलोकन केले असता दरवर्षी बडोदा संस्थान १ ते १.२५ लाख रुपये फक्त ग्रंथालयांवर खर्च करत होते हे लक्षात येते. यामागे महाराजांचे प्रजाहित आणि त्यांचे दातृत्वच आहे.

❍❍❍

# प्रकरण ५ वे

# शेती आणि शेतकऱ्यांना मदत

सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार हाती येताच संस्थानच्या सर्व भागांचा दौरा केला. या प्रवासात त्यांनी लोकांच्या उदरनिर्वाहाचे आणि राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती आहे हे जाणले. शेतीला सुरक्षित पतपुरवठा करणे, जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देणे, जास्तीत जास्त उत्पादन काढणे, शेतीत आधुनिक साधने वापरणे अशा सुधारणा केल्या तरच शेतकऱ्यांची, पर्यायाने संस्थानची आर्थिक प्रगती होऊ शकते हे त्यांनी ओळखले. त्यामुळे शेती आणि शेतकरी यांच्यात आमूलाग्र बदल करण्याचे धोरण त्यांनी राज्यकारभाराच्या सुरुवातीपासूनच स्वीकारले.

सयाजीराव महाराजांची राजपदी निवड होण्याअगोदर ते एका शेतकऱ्याचा मुलगा होते. ते जन्मदात्या वडिलांबरोबर वयाच्या बारा वर्षांपर्यंत राहिले होते. त्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या व्यथा माहीत होत्या. त्या दूर करण्यासाठी त्यांनी कष्ट घेतले. राजकोषातील जास्तीत जास्त रक्कम त्यांनी शेतकऱ्यांना दिली. शेतकऱ्यांना मदत करताना त्यांनी स्वतःचा खासगी निधी शेतकऱ्यांना दिला. हे सर्व निधी देत असताना महाराजांनी शेतकरी, कष्टकरी वर्ग सुखी, समृद्ध आणि स्वावलंबी कसा होईल याकडे जास्तीत जास्त लक्ष दिले.

शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करावी यासाठी आधुनिक शेतीचे नमुने संस्थानात तयार करून घेतले. यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून दिला. शेतीच्या शिक्षणासाठी अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवले. त्यासाठीचा निधी मंजूर केला. महाराजांनी शेतीसाठी इतर राजांच्या तुलनेत अनेक प्रकारच्या सुधारणा केल्या. या सर्व सुधारणा महाराजांच्या दातृत्वामुळे झाल्या.

सयाजीराव महाराजांनी शेतकऱ्यांना दुष्काळात आणि अतिवृष्टीच्या समयी खूप मदत केली. या संकटातून त्यांना सावरले. पुढील हंगामात पिके उभारण्यासाठी निधी दिला. (महाराजांनी शेतकऱ्यांना आणि इतर लोकांना संकटकाळात जी आर्थिक मदत केली त्याबद्दलची माहिती 'संकटकाळातील मदत' या प्रकरणात दिली आहे.)

सयाजीराव महाराजांनी शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी शेतकऱ्यांच्या समस्या मुळातून नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याची सुरुवात शेतसारा घेण्याच्या पद्धतीत बदल घडवून केली. याबद्दल अधिक माहिती घेऊ.

## शेतसारा पद्धतीत मुळातून बदल

महाराजांनी राज्यकारभार हाती घेताच शेतसारा ठरवण्याची आणि वसुलीची पद्धत पूर्णपणे बदलली. महाराजांच्या पूर्वी शेतात किती बैलांचा नांगर चालतो किंवा पिकांची राखण करण्याकरिता किती माचवे उभे केले यावर आधारित शेतसारा वसूल केला जात असे. तसेच शेतसारा वसुलीचे अधिकार स्थानिक श्रीमंत लोकांना होते ते पूर्णपणे काढून घेण्यात आले. अशा अन्यायकारक आणि असमान शेतसारा पद्धती कायमच्या बंद केल्या. नवीन शेतसारा ठरवण्यासाठी व वसूल करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींना अभ्यासासाठी नेमले. त्यानुसार पुढीलप्रमाणे शेतसारा ठरविला. 'एका शेताची लागत ठरविताना आदल्याच वर्षी त्या शेतात किती उत्पन्न आले होते. ते प्रथम पाहावयाचे. नंतर गेल्या कित्येक वर्षात किती उत्पन्न आले ते पाहावयाचे. नंतर पुढे अंदाजे किती उत्पन्न येईल हे ठरवायचे. जमिनीच्या लागतीत, जमिनीच्या दरात वाढ झाल्याखेरीज वाढ करावयाची नाही, हे लक्षात ठेवून लागत ठरवायची. जमिनीच्या उत्पन्नातून शेतकऱ्याची मजुरी, औत वगैरे जिनसांबद्दल होणारा खर्च किंवा त्याप्रीत्यर्थ वाया जाणारे व्याज, वगैरे वजा करून नंतर जे उत्पन्न बाकी राहील त्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक रक्कम लागतीदाखल मुळीच घ्यायची नाही.' शेतसाऱ्यामध्ये असा बदल केला. यामुळे शेतकऱ्यांवर होणारा अन्याय आपोआपच बंद झाला.

अशा प्रकारे जरी शेतसारा वसूल केला जात असला तरी दुष्काळात किंवा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी शेतसारा वसूल थांबवला जात होता. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळत असे. अशा संकटप्रसंगी उलट शेतकऱ्यांना आगाऊ रकमा देऊन शेतीत उत्पादन काढण्यास प्रोत्साहन दिले जात असे.

बडोदा राज्यात धार्मिक स्थळांसाठी अगोदरच्या राजांनी मोफत जमिनी दिल्या होत्या. त्या जमिनींचे मोजमाप नव्हते. देवस्थानची व्यवस्था पाहणाऱ्या व्यक्तींच त्या जमिनी कसत. त्या बदल्यात सरकारी तिजोरीत कसल्याही प्रकारचा शेतसारा भरत नसत. महाराजांनी अशा बारखळी (खळयाबाहेरच्या) जमिनीची मोजणी करून घेतली. त्यांनाही शेतसारा लागू केला. हे करत असताना फुकट पोसत असणाऱ्या मंडळींनी खळखळ केली. अनेकांनी रेसिडेंटकडे लेखी तक्रारी केल्या. त्यातच महाराज परदेशात होते. त्यामुळे याबाबत तक्रारी खूप वाढल्या. महाराजांनी बडोद्यात परत येताच त्यावर मुत्सद्देगिरीने मार्ग काढला. या सर्व प्रकारच्या जमिनी करपात्र केल्याने राज्याचे उत्पन्न वाढले.

जमिनीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होत असताना वाढलेल्या व्यक्तींमुळे जमिनीचे लहान-लहान तुकडे होत होते. यासाठी महाराजांनी जमिनीचे तुकडे न पाडण्याचा कायदा केला. जमीन सलग होण्यासाठी जमीन एकत्रीकरणाचा कायदा केला. त्यामुळे शेतकऱ्यांचे तसेच सरकारचे उत्पन्न आपोआपच वाढले.

काही लोक शेतात जनावरे मोकाट सोडत. त्यांना शिक्षा करणारा कायदा केला. उपयोगी जनावरांची धार्मिक कारणास्तव होणारी हत्या कायद्याने बंद केली. अशा प्रकारे महाराजांनी

शेतीत मूलभूत बदल करत शेतकऱ्यांचे पर्यायाने राज्याचे उत्पन्न वाढविले. सर्व शेतकऱ्यांना समान करपद्धती लागू केली.

## पतपुरवठ्यासाठी पेढ्यांची स्थापना

सयाजीराव महाराजांना माहीत होते की, शेतकऱ्यांना पतपुरवठा केल्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही. तो पतपुरवठा सुरक्षितपणे केला पाहिजे यासाठी ते आग्रही होते. शेतकरी सावकारांच्या कचाट्यात सापडू नये यासाठी त्यांनी शेतीच्या उत्पन्नावर कर्ज देण्यासाठी 'सरकारी शेतकी पेढ्यां'ची स्थापना केली. त्यासाठी कायद्यात बदल केला. काही कालावधीत त्यांनी जमीन तारणावर कर्ज देण्यासाठी 'Land Mortgage Bank' स्थापन केली. नवसारी प्रांतातील सोनगड-ब्यारा येथे 'ॲग्रिकल्चर बँके'ची स्थापना इ.स. १९०५ च्या सुमारास करण्यात आली. त्यांची उपयुक्तता लक्षात आल्यावर शेतीच्या जमिनीच्या तारणावर हलक्या दराने शेतकऱ्यांना सरकारातून कर्ज देणारी बँक स्थापन करण्यात आली. या बँकेचे १ लक्ष १२ हजार रुपयांचे शेअर थोड्याच काळात विकले गेले, यावरून या योजनेची यशस्विता दिसून येते. अशा प्रकारे शेतकरी वर्गाला शक्य त्या रीतीने मदत देऊन त्यांना स्थैर्य प्राप्त करून देण्याची व त्यायोगे राज्याच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याची तजवीज या काळात करण्यात आली. या बँकेमार्फत शेतकरी लोकांस सवलतीने कर्ज देऊन सर्व प्रकारची मदत देण्यास सुरुवात केली. शेतकरी कर्जबाजारी होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली. राज्यकारभार हाती आल्यानंतर कमी कालावधीत 'स्वतंत्र शेतकी खाते' निर्माण केले. त्या माध्यमातून निरनिराळ्या पद्धतीने आणि नवनवीन योजनांच्या माध्यमांतून शेतकऱ्यांना मदत केली. शेतकऱ्यांना सोप्या पद्धतीने पतपुरवठा कसा करता येईल यासाठी महाराज नेहमीच प्रयत्नशील होते.

शेतकऱ्यांच्या वाढत्या कर्जाचा बोजा हा त्यांना निःसत्व करून टाकून सावकारांच्या कचाटीत नेऊन सोडीत होता. त्याबद्दलचा काहीतरी इलाज केल्याशिवाय शेतकऱ्यांची धडगत नाही ही गोष्ट महाराजांच्या नजरेत आल्यावाचून राहिली नाही. शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्जपुरवठा सुरू केला. फक्त सहकारी पतपेढ्यांमधून नव्हे; तर विविध बँकांमधूनही कर्जपुरवठा सुरू केला. त्याचा संस्थानातील शेतकऱ्यांना चांगला उपयोग झाला. त्यानंतर ही योजना संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली. या बँकेने अस्पृश्य व आदिवासी शेतकऱ्यांना अधिक सवलती दिल्या होत्या, कारण महाराजांचीच तशी सूचना होती. कर्ज पुरवठ्याबरोबरच महाराजांनी नवनवीन बी-बियाणे उपलब्ध करून दिले. शेतकऱ्यांची जागृती होण्यासाठी त्यांना मार्गदर्शनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. बी-बियाणे पुरविणे व शेतकीत कशा सुधारणा कराव्या हे प्रयोग, प्रदर्शने, भाषणे इत्यादी रूपाने समजावून देणे वगैरे उद्योग त्या खात्याने हाती घेतले.

## शेतीसाठी पाणीपुरवठा

महाराजांनी राज्यकारभार हाती घेतला त्यावेळी संस्थानात शेतीसाठी पाणीपुरवठ्याची साधने कमी होती. त्याबाबत महाराजांचे चरित्रकार आपटे म्हणतात, 'सन १८८१ साली

बडोदे राज्यात एक-दोन कालवे व पुष्कळशा विहिरी हीच काय तर शेतीच्या पाण्याची साधने असत.' महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यावर याकडे लक्ष दिले. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी विहिरी खोदणे, तलाव बांधणे, पाट तयार करणे अशा प्रकारची कामे सुरू केली. यासाठी विविध योजना सुरू केल्या. सरकारने निर्माण केलेल्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी इ.स. १९०९ साली 'स्वतंत्र शेतीखाते' निर्माण केले. त्यामार्फत विविध योजना आखल्या जाऊ लागल्या. राज्याचे तसेच शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी आर्थिक बाबींबरोबर पाणीपुरवठा महत्त्वाचा आहे हे महाराजांनी ओळखले. शेतीसाठी पाणी महत्त्वाचे आहे. यासाठी सरकारमार्फत मदत देऊन विहिरी खोदल्या. नदीचे पाणी अडवून शेतकऱ्यांना दिले. इ.स. १९०० मध्ये हाती घेण्यात आलेले एक मोठे दुष्काळनिवारक कार्य म्हणजे ओरसंग नदीवर जोजवाजवळ केलेले धरणाचे व कालव्याचे बांधकाम होय. या धरणाद्वारे १४,००० एकर जमिनीला पाणीपुरवठा होणार होता. विहिरी व धरणामधून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून दिले.'

शेती आणि पाणीपुरवठा याबाबत आपटे यांनी विस्तृत माहिती दिली आहे. 'शेतीसाठी पाणी पुरविण्याची योजना कडी व पट्टण विभागांतील कादरपूर गावी या काळात करण्यात आली. तेथे यासाठी बांधण्यात आलेल्या धरणाच्या बंधाऱ्याची लांबी १२००० फूट असून, उंची २७ फूट आहे. या योजनेला एकंदर सात लक्ष रुपये खर्च आला; परंतु हे धरण पुरे झाल्यानंतर ते जरूरीपेक्षा फार मोठ्या प्रमाणावर असल्याचे अनुभवास आले. नेहमीच्या पावसाचे पाणी एकत्र केले असता या तलावाचा फक्त एकसप्तमांश भाग व्यापला जाई. त्यामुळे तेवढा भाग पाण्याच्या साठ्यासाठी राखून ठेवला जाऊन बाकीचा भाग शेतीच्या लागवडीसाठी देण्याचे ठरविण्यात आले. अशीच दुसरी योजना कडी प्रांतांत अनावाडा धरणाने करण्यात आली; परंतु तीही जरूरीपेक्षा मोठी असल्याचाच अनुभव आला. या योजनेला दोन लक्ष रुपये खर्च आला. बडोदे प्रांतातील संखेडा तालुक्यात ओरसंग नदीच्या पाण्याचे कालवे काढून शेतीच्या कामासाठी पाणी पुरविण्याची प्रचंड योजना या काळात हाती घेण्यात आली. सदर योजनेचा पाया घालण्याचा समारंभ ता. ४/५/१९०० रोजी ऐन दुष्काळाच्या समयी करण्यात आला. या मोठ्या योजनेच्या एकंदर खर्चाचा अंदाज वीस लक्ष रुपये होता. अशीच दुसरी जंगी पाणीपुरवठ्याची योजना बडोदे प्रांतातील डभोई विभागात वढवाणा तलावाच्या रूपाने सन १९०६-०७ साली मंजूर करण्यात येऊन, तिच्या कामाचा आरंभ सन १९०७ च्या एप्रिल महिन्यात करण्यात आला. अशा अनेक प्रकारच्या पाणीपुरवठ्याच्या योजना यापुढे कराव्या लागणार असल्यामुळे सन १९०४ सालापासून त्यासाठी 'इरिगेशन खाते' अथवा पाणीपुरवठ्याचे खाते म्हणून एक स्वतंत्र शाखा निर्माण करण्यात आली व तिच्याकडे अशा प्रकारच्या योजना करण्यासाठी पाहणी करणे, चालू योजना पुऱ्याकरणे व पूर्वीच्या कामांची दुरुस्ती करणे ही कामे सोपविली गेली. अशा रीतीने मोठमोठ्या शहरांत व गावांत धरणे बांधून त्यातील पाणी लोकांना पुरविणे शक्य असले तरी बाकीच्या सर्व खेडेगावांसाठी विहिरींची योजना करणेच शक्य व सुलभ असल्याने ते कार्य

या काळात जोराने करण्यात आले. त्यासाठी लागणारी नवीन प्रकारची यंत्रसामग्री मागवून ती लोकांना पुरविण्याचे कामही करण्यात आले.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ६२४).*

शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक असणारी पाटबंधाऱ्याची कामे व्यवस्थित होण्यासाठी महाराजांनी हुजूर हुकूम काढला. तो पुढीलप्रमाणे होता. 'पाटबंधाऱ्याची कामे शेतीस फार उपयोगी आहेत. तशी कामे मोठ्या प्रमाणावर घेण्यात येतील, तर त्यात अडचणी आल्यास विद्वान तज्ज्ञांचे अभिप्राय व मदत घ्यावी लागेल. तसे विद्वान व निष्णात इंजिनिअर येथे नसल्यास तशा लोकांची मदत हिंदुस्थान सरकाराकडून जरूर प्रसंगी मिळत जावी, अशी तजवीज करून ठेवावी. कुव्यात पाणी किती खोलीवर मिळण्यासारखे आहे ते पाहून तसे नसल्यास योग्य रक्कम खर्च करून जथाबंध पाणी अटकाविता येण्यासारखे असेल तेथे तलाव करणे व जरूरीच्या ठिकाणी पाट काढणे वगैरे कामांची संपूर्ण यादी करून ठेविल्यास फार उपयोगी होईल. अशा कामांचे प्लॅन, एस्टिमेट करवून तालुकेवार नकाशे करावे. म्हणजे जरूरीप्रमाणे व सवडीप्रमाणे एकामागून एक अशी कामे हाती घेता येतील. पूर्वीची अशी कामे असतील, ती दुरुस्त ठेवण्याकडे विशेष कल असावा. कारण ती चांगली होण्यासारखी असूनही ती टाकून देऊन नवीन करीत राहिल्यास आपली आपणच फसवणूक केल्यासारखे होईल.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. १२६९).* यासारखे अनेक कायदे करून महाराजांनी त्या काळात शेतीला पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी पुरेपूर काळजी घेतल्याचे दिसते.

## शेतीतील आधुनिकता

बडोदा संस्थानात शेती पारंपरिक पद्धतीने केली जात होती. महाराजांना ती पद्धत पूर्णपणे बदलावयाची होती. आधुनिक शेतीविषयक महाराजांची दृष्टी स्पष्ट होती. परदेशातील शेतीचे ज्ञान आपल्या देशात यावे असे त्यांना वाटत होते. खासेराव जाधवांसारखी जवळची विश्वासू व्यक्तीच कृषिखात्याची पदवी घेणे गरजेचे होते. त्यामुळे खासेरावांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाअंतर्गत कृषी विषयाचे शिक्षण घेण्यासाठी पाठविले. त्यानुसार शिक्षण घेऊन खासेराव जाधव बडोदा संस्थानात परत आले. त्यांनी बडोदे संस्थानात आधुनिक शेतीचे प्रयोग केले. आधुनिक शेती कशी करावी हे दाखविले. विविध भागात कृषी प्रदर्षने भरविली. या प्रदर्शनांना महाराजांनी मुक्तपणे आर्थिक मदत केली. अशा प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी स्वत: उपस्थित राहत त्यांनी शेतीविषयक, शेतीपूरक उद्योगधंदे याविषयी अभ्यासपूर्ण विचार मांडले.

महाराजांना आपले संस्थान प्रत्येक क्षेत्रात अग्रभागी असावे असे वाटत होते. शेतीबाबतीतही महाराजांचा असाच आग्रह होता. इ.स. १९०५ मध्ये काश्मिरातील रेशीम पैदासीच्या पद्धतीचे शिक्षण घेण्यासाठी राजीवभाई पटेल यांना पाठविले होते. बंगालच्या शेतीखात्याचे असिस्टंट डायरेक्टर व सिल्क एक्स्पर्ट मि.एन.जी. मुखर्जी यांना बडोद्यात काही महिन्यांपुरते बोलावून नवसारी व बडोदे येथे रेशमाची खास उत्तम रीतीने पैदास कशी करता येईल याबद्दल विचारविनिमय केला. अशा प्रकारे महाराजांनी शेतीत आधुनिकता आणली. त्यांना शेतीची पारंपरिक पद्धत

मोडीत काढावयाची होती. शेतीत मशागतीची आधुनिक साधने वापरण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. लोखंडी नांगर व इतर आधुनिक साधने पुरविली. परदेशातील प्रवास करताना शेतात ट्रॅक्टरचा वापर केलेला त्यांनी पाहिला होता. तसाच वापर आपल्या इकडेही व्हावा असे महाराजांचे धोरण होते. त्यासाठी त्यांनी मदत केली. त्यामुळे शेतकरी 'ट्रॅक्टर' वापरू लागले. पुढील काळात विहिरी किंवा तलावातून पाणी उपसण्यासाठी ऑईल इंजिन पंप घेतले. त्यापुढचा टप्पा म्हणजे इलेक्ट्रॉनिक मोटारी आणि पंप यासाठी सुद्धा महाराजांनी अनुदान दिल्याची नोंद बडोद्याच्या प्रशासकीय अहवालात आहे. शेतकऱ्यांना संपन्न करणाऱ्या बाबींचा गरजेनुसार पुरवठा केला.

आधुनिक शेतीचा प्रसार होण्यासाठी महाराजांनी प्रत्येक शेतकऱ्याला कशा प्रकारे ज्ञान उपलब्ध होईल याकडे लक्ष दिले. याबाबत य.रा. दाते लिहितात, 'शेतकी खात्यासाठी फिरते तपासनीस नेमून सुधारणेसंबंधी प्रयोग, व्याख्यानाद्वारा प्रचारकार्य उत्तम तऱ्हेने करीत आहे. त्याचप्रमाणे बी-बियाणे, जनावरांची पैदास, डेअरी वगैरे संबंधीची माहिती व हस्तपुस्तके यांचा शेतकऱ्यांमध्ये प्रसार करण्यात येतो. शेतीच्या जनावरांसाठी निरनिराळ्या ठिकाणी एकंदर २१ पशुरोग चिकित्सालये स्थापिली असून डॉक्टर लोकही ठिकठिकाणी दौरा काढून मदत करतात. विहिरी खोदण्याचे कामासही सरकारकडून उत्तेजन देण्यात येते.' *(दाते, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-१, १९३३, पृ. ६७)*. शेती आणि शेतीला पूरक ठरणाऱ्या उद्योगधंद्याला महाराजांनी कायमच पाठबळ दिले. तसेच सर्वच उद्योगांत आणि शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी कायमच मदत करत राहिले.

महाराज तरुण असताना महात्मा जोतीराव फुले त्यांची भेट घेण्यासाठी बडोद्यात गेले होते. त्यावेळी फुलेंनी त्यांना 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ वाचून दाखविला होता. या ग्रंथात फुलेंनी शेती आणि शेतकऱ्यांच्या वाईट अवस्थेबद्दल निवेदन केले होते. तसेच शेतीच्या सुधारणेविषयी उपदेश केला होता. 'भारतासारख्या कृषिप्रधान देशातील शेतकरी शिक्षित झाल्याखेरीज शेतकऱ्यांची उन्नती होणार नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांना आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे व त्यासाठी देशी भाषेत पुस्तके छापावीत. त्यामुळे शेतीचे ज्ञान सहजपणे मिळू शकेल. शेतकऱ्यांच्या मुलांना तर शेतीचे शिक्षण सक्तीचेच करावे. शेतीच्या शिक्षणाबरोबर इतर जोडधंदे यांचे शिक्षण देणे आवश्यक आहे. अशा रीतीने तयार झालेली शेतकऱ्यांची मुलेच शिक्षक म्हणून नेमावीत. शेतकरी शहाणा व्हावा म्हणून शेतीचे उपयुक्त ज्ञान प्रयोगशाळेच्या चार भिंतीआड न ठेवता ते शेतकऱ्यांच्या दारात नेण्यासाठी पिकांची व जनावरांची प्रदर्शने भरवावीत.' हा मंत्र सयाजीरावांनी आयुष्यभर पाळला. कलाभुवन या अभिनव शाळेत त्यांनी शेतीला पूरक असे अभ्यासक्रम सुरू केले. त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्याचे काम शेतकी अभ्यासक्रमामार्फत केले. आधुनिक आणि आदर्श शेती कशी करावी यासाठी बडोदा सरकारने जगुदन, नवसारी व बडोदे या ठिकाणी नमुनेदार शेती तयार केली. त्यावर त्यांनी हजारो रुपये खर्च केला. एका तालुक्यात जे धान्य होत नाही

त्याचे दुसऱ्या तालुक्यात कशाप्रकारे उत्पादन करता येईल हे सप्रयोग दाखविण्याची व्यवस्था केली. शेतकरी स्वावलंबी व्हावा हेच महाराजांचे ध्येय होते. त्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी उपाययोजना करत होते.

## शेतीवर आधारित उद्योगधंदे

शेतकऱ्यांनी फक्त शेतीवर अवलंबून न राहता शेतीला जोडधंदा म्हणून छोटे मोठे उद्योगधंदे करावेत अशी महाराजांची धारणा होती. शेती करताना उपयोगी प्राणी पाळणे. उदा. गायी, म्हशी, शेळया यांचे पालन करावे, यालाही महाराजांनी प्राधान्य दिले होते. जनावरांसाठी महाराजांनी पशुवैद्यकीय दवाखाने काढले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना पशुधन पाळणे आणि त्यांच्या रोगावर उपाय करणे सोपे झाले.

शेतीवर अवलंबून असणाऱ्या उद्योगाला महाराजांनी प्रोत्साहन दिले. छोटे-छोटे उद्योग जे शेतकऱ्यांना घरबसल्या करता येतील किंवा महिलांना करता येतील तसेच त्यातून आर्थिक लाभही मिळेल असे उद्योग महाराजांनी सुरू करण्यास चालना दिली. त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान महाराजांनी परदेशातून आणले. शेतकरी स्वावलंबी व्हावा अशी महाराजांची इच्छा होती. शेतीपूरक उद्योगधंदे असल्याशिवाय शेतकऱ्यांच्या कच्च्या मालावर प्रक्रिया करता येणार नाही हे महाराज जाणून होते. म्हणून त्यांनी शेतीपूरक उद्योगाला प्राधान्य दिले. शेतकऱ्यांना उद्योग काढण्यासाठी आर्थिक मदत केली. राज्यात उद्योगधंदे असल्याशिवाय शेतकऱ्यांची प्रगती होणे कठीण आहे हे जाणून या उपक्रमाकडे दृष्टी वळविली. प्रथम सन १८८१ मध्ये बडोदे येथे सुताची एक गिरणी स्थापन करण्यात आली. तसेच सन १८८१ मध्ये तीन लक्ष रुपये भांडवलाचा साखरेचा सहकारी तत्त्वावरील कारखाना गणदेवी येथे काढला. सरकारी तिजोरीतून त्यासाठी पैसे वापरले.

राज्याची किती प्रगती झाली त्यामध्ये शेतकरी वर्गात किती सुधारणा झाल्या याचा मागोवा सयाजीराव महाराज वारंवार घेत. त्याबाबत आपटे म्हणतात, 'सन १९१८-१९ साली त्यांनी 'आर्थिक सुधारणा कमिटी' नेमून, तिच्याकडे राज्यातील शेतीच्या संबंधी उद्योगधंद्याचे निरीक्षण करण्याचे काम सोपविले. अशा प्रयत्नांमुळे सांप्रतच्या कालविभागात किती प्रगती झाली याबद्दलचे काही आकडे पाहिले असता त्यावरून त्याबद्दलची साधारण कल्पना येऊ शकेल. सन १९११ मध्ये बडोदे राज्यात निरनिराळया प्रकारचे ८६ कारखाने असून त्यातून एकंदर ९४२१ लोक काम करीत होते. त्यानंतरच्या २० वर्षांत म्हणजे सन १९३१ साली ही कारखान्यांची संख्या २७५ वर गेलेली असून तीत काम करणाऱ्या लोकांची संख्या साडेबावीस हजारापर्यंत गेली आहे. उद्योगधंद्यांची वाढ ही नवीन कारखान्यांच्या संख्येवरून मोजता येते, त्याचप्रमाणे त्यांच्या मोठेपणावरूनही अजमावता येते. या दृष्टीने पाहता या काळात जे नवीन कारखाने उभारले गेले, त्यात ओखा येथील मिठाचा कारखाना व द्वारकेचा सिमेंटचा कारखाना हे महत्त्वाचे होत. या दोन्ही कारखान्यांचे काम समाधानकारक रीतीने चालले आहे.' *(आपटे, भाग-३, १९३६,*

*पृ. १३६)*. सयाजीराव महाराजांनी शेतीपूरक उद्योगांना बळ दिल्याने शेतकऱ्यांच्या कच्च्या मालाला खूप चांगला भाव मिळू लागला. पिकांचे समाधानकारक उत्पादन मिळू लागले.

## शेतजमिनीचे एकत्रीकरण

सयाजीराव महाराजांनी शेतीच्या बाबतीत केलेली महत्त्वाची सुधारणा म्हणजे राज्यातील शेतीच्या जमिनीच्या अमर्याद वाटणीस आळा घालणे ही होय. हिंदुस्थानात पुढील पिढीला वडिलार्जित स्थावर जंगम मालमत्ता मिळण्याची पद्धत आहे. त्यानुसार जेवढी जास्त मुले त्या व्यक्तीला होतील तितके जास्त जमिनीचे तुकडे होत. त्यामुळे काही पिढ्यांनंतर शेतीच्या जमिनीचे असंख्य लहान लहान तुकडे पडत. या लहान-लहान तुकड्यांमुळे शेतीचे उत्पादन आपोआपच घटत असे. हे नुकसान थांबवणे अत्यंत गरजेचे होते. अशा तुकड्यांपासून शेतकऱ्यांना चांगले पीक मिळू शकत नाही. यामुळे त्यांचे तर नुकसान होतेच; परंतु त्याबरोबर सरकारी महसुलातही त्यामुळे घट येते. मोठमोठ्या जमिनीत यांत्रिक नांगर वापरणे, नवीन खते घालणे व अर्वाचीन पद्धतीची इतर साधने वापरणे फायदेशीर होते. तसे लहान तुकड्यात होत नाही. यासाठी राज्यातील शेतीच्या जमिनीचे लहान लहान तुकडे पाडण्याच्या पद्धतीला प्रतिबंध करणे, पूर्वी पडलेल्या तुकड्यांचे शक्य तेथे एकीकरण करणे अवश्य होते. यासाठी महाराजांनी दोन कायदे करून या बाबतीत सुधारणा करण्याचा उपक्रम केला. याबाबत आपटे म्हणतात, 'हे दोन कायदे म्हणजे, शेतीच्या जमिनीचे लहान तुकडे पाडण्यास अटकाव करणारा कायदा' व 'शेतीची जमीन एकत्र करण्याचा कायदा' हे होत. ज्या ज्या वेळी समाईक जमिनीची वाटणी करण्याचा प्रसंग येईल, त्या-त्या वेळी सर्व हक्कदारांना त्या जमिनीचे तुकडे पाडून त्यातील एकेक भाग न देता, ती सर्व जमीन एका हिस्सेदाराला देऊन, इतरांना त्यांच्या भागाच्या मोबदल्यात रोकड रक्कम देण्याची व्यवस्था पहिल्या कायद्याने केलेली आहे. दुसऱ्या कायद्याने ज्या गावच्या सर्व खातेदारांनी मिळून आपल्या गावातील जमीन एकत्र करण्याची इच्छा दर्शविली असेल, त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तशी मागणी केल्यास त्याने याबद्दलचे निवेदन सरकारात करून तसे करण्याची परवानगी मिळवावी व मग एक व्यवस्थापक मंडळ नेमून त्याच्याकरवी गावातील सर्व जमीन एकत्र करून तिची सारासार विचाराने पुन्हा वाटणी करण्याची व्यवस्था करावी, असे ठरविण्यात आले आहे. अशा प्रकारे जमिनीच्या विभक्तीकरणाची परंपरा मोडून, जमीन कसणे शेतकऱ्यालाही फायदेशीर व्हावे व सरकारी महसुलालाही सुरक्षितता यावी या दुहेरी उद्देशाने हे कायदे घडण्यात आले.' *(आपटे, खंड -३, १९३६, पृ. १३३ ते १३४)*. सयाजीराव महाराजांनी शेतकऱ्यांचा उत्पादनात फायदा व्हावा तसेच सरकारलाही जास्तीचा महसूल मिळावा यासाठी वरील कायदे करण्यात आले.

## महाराजांचे शेतीविषयक विचार

महाराजांनी वेळोवेळी केलेल्या भाषणांतून शेतीसुधारणेविषयी विचार मांडले. सन १९०२ साली अहमदाबाद येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात शेतकी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी

म्हणाले, 'आपला देश मागे राहण्याचे कारण म्हणजे शेती व इतर उद्योगधंद्यांत विद्येचा उपयोग करण्याकडे दुर्लक्ष हेच होय. याउलट युरोपात विद्येचा उपयोग जीवनाच्या सर्व क्षेत्रात जाणीवपूर्वक कौशल्याने केला जातो. आपल्या जमिनीतून चांगले व पुष्कळ पीक मिळवण्यासाठी शेतीसुधारणा करण्याची जरूरी आहे.' त्यांच्या मते, पारंपरिक पद्धतीने शेती केल्याने श्रम आणि पैसा वाया जातो. तो जाऊ नये यासाठी शेतीच्या शिक्षणातून आधुनिकतेचा ध्यास धरून जास्तीत जास्त उत्पादन घेतले पाहिजे. उत्पादन खर्च कमी केला पाहिजे. महाराज यासाठी प्रयत्नशील होते.

शेतीबाबत महाराज नेहमीच अत्यंत सूक्ष्म विचार करत. 'शेती करण्यासाठी हुशार आणि बुद्धिमान लोकांची जरूरी आहे.' हा विचार त्यांनी मांडला. शेतीतील उत्पादन दर्जेदार करण्यासाठी लोकांबरोबर सरकारनेही उपाययोजना केल्या पाहिजेत, यामुळे देशातील शेतीच्या उत्पादनाची परदेशात विक्री होईल, असा महाराजांना विश्वास वाटत होता. महाराज कृतिपरायण सुधारक असल्याने त्यांनी आधुनिक शेतीचे अनेक प्रयोग संस्थानात राबविले.

## शेती आणि शेतकऱ्यांना मदत

सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार हाती आल्यापासूनच शेतीत सुधारणा करण्यास प्रारंभ केला. त्या सुधारणा प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत कशा पोहोचतील यासाठी त्यांनी प्रशासनाला नियोजन करण्यास सांगितले. त्यामध्ये साधारणपणे पुढील मदतीच्या योजना सुरू केल्या. 'शेतकऱ्यांना हलक्या दराने कर्जाऊ रकमा देऊन सावकारांच्या तावडीतून सोडविणे, त्यांना बी-बियाणे पुरवणे व शेतीत कशा सुधारणा कराव्या हे प्रयोग, प्रदर्शने, भाषणे इत्यादी रूपाने शेतकऱ्यांना समाजावून देणे वगैरे उद्योग त्या खात्याने हाती घेतले. उत्तम नमुनेदार शेती करून एका तालुक्यात जे धान्य होत नाही त्याची दुसऱ्या तालुक्यात कशा प्रकारे निपज करता येईल, हे सप्रयोग दाखवण्याची व्यवस्था केली. १९३०-३१ साली अशा सरकारी शेतांवर ५,५८७ रुपये खर्च करण्यात आले.' *(दाते, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-१, १९३३, पृ. ६७)*. शेतीला उर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी आवश्यक असणारी सर्व साधनसामग्री महाराजांनी उपलब्ध करून देण्यासाठी मदत केली.

## प्रशासकीय अहवालात मदतीच्या नोंदी

बडोदा संस्थानातर्फे प्रकाशित प्रशासकीय अहवालामध्ये शेती आणि शेतकऱ्यांना मदत देण्यात येत होती.

१) शेती खात्यासाठी पूर्णवेळ कमिशनरची नियुक्ती केली होती. त्यांच्या मदतीला विभागवार सहायक कमिशनरांच्या नियुक्त्या केल्या.

२) भविष्यात शेतीच्या करावयाच्या कामाचे पूर्णपणे नियोजन करण्यात आले.

३) शेतीच्या आणि शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणाऱ्याशाळा पूर्ण अनुदान देऊन उघडण्यात आल्या.

४) ‘ट्रॅक्टरने शेतीची खोल नांगरणी करण्याची योजना’ नवसारी जिल्ह्यातील काही गावांसाठी मंजूर करण्यात आली.
५) तुपाची प्रतवारी ठरवण्यासाठी नवीन केंद्रे उघडण्यात आली.
६) देशभरात ज्या-ज्या ठिकाणी शेतीचे शिक्षण मिळते, त्या ठिकाणी पूर्णवेळ शेतीचे शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्त्या मंजूर करण्यात येत होत्या.
७) संपूर्ण संस्थानात विहिरी खोदण्यासाठी मोठी रक्कम मंजूर येत होती.
८) ऑईल इंजिन आणि पंप तसेच इतर शेतीपूरक उद्योगासाठी कर्ज मंजूर करण्यात आले.
९) भात (तांदूळ), गवत आणि गवताच्या लागवडीसंबंधी संशोधन करण्यासाठी योजना आखण्यात आली. त्यासाठी वेगळा निधी दिला.
१०) कापूस आणि इतर पिकांसंबंधी संशोधन करण्यासाठी योजना कार्यान्वित केल्या. त्यासाठी सरकारमधून निधी दिला गेला.
११) शेतीतील विशेष संशोधनासाठी अनुदान दिले - १) विशेष तपासणी अंतर्गत राज्यातील धरणे, तळी यांची तपासणी करणे, २) वेगळया पिकांच्या प्रयोगासाठी जमीन, पाणी आणि हवामानाचा अभ्यास करणे आणि पिकांची शिफारस करणे, ३) पिकांच्या लागवडीसाठी योग्य वातावरण, जमीन आणि पाणी यांचा अभ्यास करणे, ४) शेतीचे आदर्श नमुने तयार करण्यासाठी वेगवेगळया भागातील जमीन आणि पाणी यांची तपासणी करणे.
१२) शेतीतील संशोधनासाठी विद्यार्थ्यांना एम.एस्सी. आणि इतर पदवीसाठी मुंबई आणि इतर ठिकाणी पाठवणे.

## शेतीविषयक शिक्षण

शेती हा हिंदुस्थानातील महत्त्वाचा व्यवसाय असून त्यावर बहुतांश लोकांची उपजीविका अवलंबून आहे हे महाराजांना माहीत होते. शेती पारंपरिक पद्धतीने केल्याने तिची उन्नती होण्याऐवजी अधोगती होते हे महाराजांनी ओळखले. त्यामुळे शेती करण्यासाठी पुढारलेल्या देशांप्रमाणे आपल्या राज्यातील लोकांना शेतीचे शिक्षण दिले पाहिजे हे महाराजांनी ओळखले. त्यानुसार शेतीशिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या. त्यासाठीचा सर्व खर्च सरकारमधून करण्यात येत असे.

बडोदा राज्यातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी शेतीचे वर्ग काढण्यात आले. त्यामध्ये मुलांना मोफत शिक्षण दिले जात होते. याचाच दुसरा भाग म्हणून कमी कालावधीतील प्रशिक्षण वर्ग काढण्यात आले. त्यामध्येही खेडेगावांतून आदर्श शेती कशी करावी यासंबंधी प्रशिक्षण दिले जात असे. वरील दोन्ही वर्गात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना राज्याच्या शेतीविषयक वेगवेगळया खात्यांतून नोकरी दिली जात असे. त्यामुळे त्यांच्या माध्यमांतून आदर्श शेतीचा प्रसार केला जात होता.

तंबाखू आणि सिगारेट विषयीच्या संशोधनासाठी विद्यार्थ्यांना हिंदुस्थानातील वेगवेगळया भागात प्रशिक्षणासाठी पाठविले जात असे. त्यामध्ये इ.स. १९३८-३९ मध्ये नऊ विद्यार्थ्यांना

गंटूर येथे पाठविण्यात आले, तर बडोदा येथील नमुना शेतीत शेतीविषयक प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी तितकेच विद्यार्थी पाठविले. जगुदन येथे २३ आणि अमरेली येथील शेतीत १६ विद्यार्थी पाठवले. पोल्ट्रीच्या प्रशिक्षणासाठी बडोद्यात वर्ग उघडण्यात आले होते. त्याच वेळी वेगवेगळया नमुना शेतीतून शेतीपूरक उद्योगांचे प्रशिक्षणही दिले जात होते. त्यामध्ये लिंबाचा रस, फळांचे जाम बनवणे आणि फळांपासून बनविलेल्या वस्तूंचे जतन करण्याचे प्रशिक्षण दिले जात होते.

सयाजीराव महाराज हे प्रत्येक बाबतीत नियोजन आणि सूक्ष्म बाबींचा अभ्यास करत असल्याने त्यांनी शेतीच्या शिक्षणाच्या बाबतीतही मोठा निधी खर्च केल्याचे दिसते. बडोदा राज्यातील दक्षिण भागासाठी शेतीच्या शिक्षणावरील खर्च पुढीलप्रमाणे केला. 'इ.स. १९३७-३८ मध्ये १,३८,९९६ रुपये आणि इ.स. १९३८-३९ मध्ये १,३८,६२० रुपये खर्च केले. तर उत्तर भागासाठी इ.स. १९३७-३८ मध्ये ५९,९४७ रुपये आणि १९३८-३९ मध्ये ५६,७५७ रुपये खर्च केले.' *(B.A.R., 1938-39, P. 173 to 178).* एकंदर सयाजीराव महाराज शेतीच्या शिक्षणासाठी भरपूर खर्च करत असल्याचे निदर्शनास येते. महाराजांचा हा खर्च वर्षानुवर्षे सुरू होता.

महाराजांनी शेतीतील उच्च शिक्षणासाठी अनेक विद्यार्थ्यांना परदेशात आणि देशातील विविध भागांत पाठवले. त्यामध्ये खासेराव जाधव यांना शेतीच्या उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठविल्याचे सर्वश्रुत आहे. त्यानंतरही अनेकांना शिष्यवृत्ती देऊन मुंबई, पुणे, नागपूर आणि देशातील इतर भागात पाठविले. आदर्श शेती आणि शेतीपूरक उद्योगधंदे पाहण्यासाठी शेतकऱ्यांच्या सहली आयोजित केल्या. त्याबाबत प्रशासकीय अहवालातील नोंद पुढीलप्रमाणे 'Eleven farmers were taken on a visit to meerut to see the U.P. electric grid tube-wells area and the cultivation of crops under them. They also visited the imperial Agricultural Institute at Delhi.' *(B.A.R., 1938-39, P.178).* सहली आयोजित करणे ही त्या काळातील अत्यंत नावीन्यपूर्ण बाब महाराजांच्या आधुनिक विचारसरणीची द्योतक होती. यामुळे शेतकऱ्यांना बडोदा सोडून बाहेर काय चालले याची माहिती समजत होती.

## नमुना शेतीवरील खर्च

खासेराव जाधव शेतीचे उच्चशिक्षण घेऊन परदेशातून परत आल्यावर आदर्श शेतीचे नमुने बनविण्याची योजना महाराजांसमोर मांडली, ज्यामुळे बडोदा राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना कमी खर्चात अधिक उत्पादन घेणारी आधुनिक शेती कशी करावी यासाठीचा आदर्श निर्माण होईल असे खासेरावांना वाटत होते. सयाजीराव महाराजांनी अशा योजनांना तात्काळ मंजुरी दिली. महाराज आणि खासेराव जाधव यांच्या कल्पनेतून बडोदा, जगुदन, अमरेली, व्यारा, वेस्मा येथे शेतीच्या वेगवेगळया पिकांसाठी आदर्श शेतीचे नमुने तयार केले.

या आधुनिक शेतीच्या नमुन्यामुळे शेतकऱ्यांना आदर्श शेती पाहता येत होती. वेगवेगळ्या भागात असणाऱ्या शेतीमध्ये साधारणपणे पुढील कामे केली जात होती.

१) जमीन, पाणी आणि बियाणे यांच्यावर वेगवेगळे प्रयोग केले जात असत.

२) शेतीचे सरासरी एकरी उत्पादन वाढवण्यासाठी प्रयोग केले जात होते.

३) चांगल्या प्रतीच्या बियाणांची पैदास या शेतीमधून केली जात होती.

४) कोणत्या हवामानात कोणती पिके येतील यासंबंधीच्या तपासण्या आणि प्रयोग या ठिकाणी केले जात असत.

५) शेतकऱ्यांना आवश्यक त्या घटकांवर, बाबींवर प्रशिक्षण दिले जात होते.

या नमुना शेतीवर एका वर्षात पुढीलप्रमाणे खर्च करण्यात येत असे. इ.स. १९३८-३९ मध्ये बडोदा येथील नमुना शेतीवर ३४,१०८ रुपये, डभोई येथील शेतीवर ३२,८४८ रुपये, व्यारा येथील शेतीवर ९,६३१ रुपये, वेस्मा येथील शेतीवर १०,६०२ रुपये खर्च करण्यात आले. *(B.A.R., 1938-39, P. 170).* प्रत्येक नमुना शेतीवर खर्च करण्यामागे महाराजांचा प्रमुख हेतू हा होता की, बडोदा राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी शेतीबद्दल आधुनिकतेचा ध्यास धरून त्याप्रमाणे शेती करावी. शेती आणि शेतकरी यांच्या विकासाची तळमळच या दातृत्वातून दिसून येते.

## शेतीउपयोगी जनावरांसाठी खर्च

शेती करण्यासाठी मनुष्यबळ तर आवश्यक आहेच; त्याचबरोबर शेतीउपयोगी जनावरांचीही आवश्यकता असते याची महाराजांना कल्पना होती. बडोदा राज्यातील पशुधन सशक्त राहण्यासाठी महाराजांनी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या होत्या. त्यामध्ये

१) जनावरांची उत्तम पैदास आणि चांगल्या प्रजाती यांची वाढ करणे.

२) बकऱ्या आणि शेळ्या यांची संख्या वाढविणे आणि त्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविणे.

३) दूध देणाऱ्यापशूंची संख्या आणि दूध देण्याची क्षमता वाढविणे.

४) पोल्ट्री फार्मसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे, उभारणीसाठी अनुदान देणे, पोल्ट्री उभारल्यावर अंडी देण्याची क्षमता वाढविणे.

५) अधिक उत्पादन आणि उत्तम प्रजनन शक्ती असलेले पशुधन तयार होण्यासाठी उत्कृष्ट प्रजातीचे नर देश-प्रदेशातून मागवून घेणे.

६) उत्तम जातीच्या जनावरांची प्रदर्शने भरवणे.

७) चांगल्या प्रतीच्या जनावरांची पैदास व्हावी यासाठी इ.स.१९३७-३८ मध्ये १,०६,७५४ रुपये आणि इ.स. १९३८-३९ मध्ये १,१८,५६० रुपये खर्च केले. *(B.A.R., 1938-39, P. 180).*

## पशुवैद्यकीय दवाखाने

शेतीला उपयोगी आणि शेतकऱ्याला आर्थिक हातभार लावणाऱ्या जनावरांची देखभाल करणे गरजेचे असते. एक राज्यकर्ता या नात्याने सयाजीराव महाराजांनी यासाठीसुद्धा उपयोजना केल्या. मदत केली. जनावरांना कोणत्याही रोगाची लागण होऊ नये यासाठी लसीकरण करणे महत्त्वाचे असते, जनावरांचे दवाखाने उघडणे, जनावरांना झालेल्या रोगांवर औषधोपचार करणे अशांसाठी पशुवैद्यकीय डॉक्टर नेमले. यासाठी केलेल्या खर्चाचे आकडे पाहिले असता महाराजांनी पशूंसाठी किती महत्त्व दिले हे लक्षात येते.

### पशुवैद्यकीय दवाखान्यांवरील खर्च

| क्र. | वर्ष | खर्च |
|---|---|---|
| १ | १९२२-२३ | २८,७६४ |
| २ | १९२३-२४ | २८,५३७ |
| ३ | १९२४-२५ | २९,०५९ |
| ४ | १९२५-२६ | २८,८९० |
| ५ | १९२६-२७ | ३३,३८९ |
| ६ | १९२७-२८ | ३६,८२१ |
| ७ | १९२८-२९ | ४०,८५१ |
| ८ | १९२९-३० | ४४,९६२ |
| ९ | १९३०-३१ | ५७,४६१ |
| १० | १९३१-३२ | ६५,९१० |
| ११ | १९३२-३३ | ७४,३४२ |
| १२ | १९३३-३४ | ६७,५६२ |
| १३ | १९३४-३५ | ७४,६३१ |
| १४ | १९३५-३६ | ७९,६५१ |
| १५ | १९३६-३७ | ८७,१२१ |
| १६ | १९३७-३८ | ९१,४०० |
| १७ | १९३८-३९ | ९३,६४३ |
| १८ | १९३९-४० | ९३,६४९ |

*(B.A.R., 1922-23 to 1939-40)*

बडोदे राज्यात फक्त पशुवैद्यकीय बाबींसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च केला जात होता. याशिवाय फळबाग लागवडीसाठी, शेतमालाच्या विक्रीसाठी बडोदे सरकारकडून प्रोत्साहन दिले जात होते. या सर्व बाबींवरील एका वर्षाचा खर्च पुढील रकान्यात दिला आहे.

## शेतीवरील खर्च

सयाजीराव महाराजांनी शेतीसाठी वेगळे खाते काढले होते. त्यामुळे त्यावरील करावयाच्या खर्चाची तरतूदही वेगळी असे. शेतीत आधुनिकता येण्यासाठी, शेतीची उत्पादकता वाढण्यासाठी आणि शेतकरी स्वावलंबी होण्यासाठी महाराजांनी भरपूर निधी खर्च केल्याचे दिसते. इ.स. १९३८-३९ मध्ये सरकारी शेती कार्यालयांवर किती खर्च केला गेला याची पुढील तक्त्यावरून कल्पना येईल. (यामध्ये शेतकऱ्यांना मदत केल्याची आकडेवारी नाही).

| No | Section | Expenditure (Y. 1938-39) |
|---|---|---|
| 1. | Head office | 1,36,906 |
| 2. | Plant breeding and plant pathology | 12,609 |
| 3. | Agriculture chemist section | 10,383 |
| 4. | Office of the Dy. Director of Agriculture, Southern circle | 1,38,620 |
| 5. | Office of the Dy. Director of Agriculture, Northern circle | 59,947 |
| 6. | Office of the Dy. Director Animal Husbandry and Veterinary Services Horticulture | 1,18,560 |
| 7. | Rural reconstruction centre, kosamba | 24,327 |
| 8. | Agriculture engineering | 15,163 |
| 9. | Agriculture engineering | 55,103 |
| 10. | Marketing section | 7420 |
| 11. | Poultry officer's | 1,996 |
| | Total | 5,81,034 |

सयाजीराव महाराजांनी शेतीच्या व्यवस्थापनासाठी विविध भागातील शेती कार्यालयांवर अशा प्रकारे दरवर्षी खर्च केला. त्यामुळे अधिकाऱ्यांना महाराजांनी राबविलेल्या योजना सर्वांपर्यंत पोहोचवता आल्या. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे, त्यामुळेच सर्वांना अन्नधान्य मिळते आणि शेतसाऱ्यावर राज्याचे उत्पादन अवलंबून आहे याची महाराजांना जाणीव होती. त्यामुळेच महाराजांनी शेती आणि शेतकऱ्यांना खूप मदत केल्याचे दिसते.

ooo

# प्रकरण ६ वे

# संकटकाळातील मदत

सयाजीराव महाराज हे प्रजेविषयी सहानुभूती आणि आदर असणारे नृपती होते. त्यामुळे ज्या-ज्या वेळी बडोदा संस्थानातील, हिंदुस्थानातील किंवा जगभरातील लोक संकटात असत, नैसर्गिक आपत्ती किंवा मानवनिर्मित आपत्ती उत्पन्न होई तेव्हा-तेव्हा महाराज त्यांना हरेक प्रकारे मदत करत. यात प्रामुख्याने महाराजांनी स्वतःच्या खानगी फंडातील निधीचा वापर केला. वेळप्रसंगी कर्ज घेतले. संकटात सापडलेल्या लोकांना केलेली मदत ही उपकाराच्या भावनेतून न करता ते स्वतःचे कर्तव्यच आहे असे त्यांना वाटत होते.

महाराजांनी बडोदा संस्थानात ६४ वर्षे राज्य केले. या दीर्घकाळात बडोदा संस्थानावर नैसर्गिक आपत्ती अनेक वेळा आली; परंतु महाराजांनी केलेल्या नियोजनामुळे अशा संकटांना सामना करणे सोपे गेले. या काळात त्यांनी संस्थानाच्या सर्व खजिन्याचा उपयोग लोकांचे जीवन आणि पशुधन वाचवण्यासाठी केला. महाराज अशा कठीण प्रसंगी लोकांच्या भेटी घेत, त्यांना दिलासा देत. लोकांच्या भेटीसाठी आणि संकटांचा सामना करण्यासाठी योजलेल्या उपाययोजना पाहण्यासाठी केलेल्या दौऱ्यामुळे अधिकारी वर्गात आणि प्रजेत एक प्रकारचे चैतन्य निर्माण होत असे. दिलासा मिळत असे.

ज्या काळात राजाचे दर्शन होणे दुर्लभ होते, त्या काळात महाराज स्वत: आपल्या भेटीला आले आहेत याचे लोकांना नवल वाटत असे. प्रथम-प्रथम महाराज अशा भेटी द्यायला जात, त्या काळात आदिवासी आणि जंगलात राहणारी प्रजा झाडांवर जाऊन बसत असे. त्यामुळे नंतर महाराजांनी टप्प्या-टप्प्याने स्वत:बरोबरचा लवाजमा कमी केला. प्रजेला आणि त्यांच्या पुढाऱ्यांना त्यांनी विश्वासात घेतले. हळूहळू जनता आणि राजा यांतील अंतर कमी झाले. परिणामस्वरूप लोकांना राजाविषयी आणि त्यांनी केलेल्या उपाययोजनांविषयी आपुलकी वाटू लागली.

सयाजीराव महाराज संकटकाळात जे संस्थानाच्या वेगवेगळ्या भागाचे दौरे काढत त्यावेळी त्यांच्याबरोबर फक्त चार-दोन व्यक्तीच असत. त्यामुळे विनाकारण राजकोषातील पैशाचा अपव्यय होत असे. या काळात महाराजांनी त्यांचा सत्कार किंवा स्वागत करण्यासाठी कोणीही हार किंवा इतर भेटवस्तू देऊ नयेत यासाठी हुजूर हुकूम काढला. हा महत्त्वाचा हुजूर हुकूम पुढीलप्रमाणे होता. ‘दुष्काळाची पाहणी करण्याकरिता हुजुरांची स्वारी आली असता अधिकारी

वर्गाने किंवा स्थानिक लोकांनी स्वागत करू नये. स्वागताकरिता आवश्यक हार, गुच्छ आणि नजराणे आणू नयेत.' महाराजांचा हा हुकूम आजच्या काळातही दिशादर्शक आहे. रयतेचे दुःख समजून घेण्यासाठी आलेल्या राज्यप्रमुखाला लोकांच्या दुःखावर फुंकर घालता आली पाहिजे. महाराजांचा याबाबतचा शहाणपणा खरोखरच अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा आहे.

महाराज दुष्काळ पडल्यावर ज्या-ज्या भागात जात त्या भागातील प्रजेची थेट भेट घेत. त्यामुळे लोकांची नेमकी अडचण आणि समस्या समजत. प्रजेला प्रत्यक्ष भेटल्यावर तेथील स्थानिक आणि इतर अधिकारी वर्गांच्या काही तक्रारी असल्यास त्याही समजत.

## दुष्काळनिवारण

महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वेगवेगळया उपाययोजना केल्या होत्या. इ.स. १९०० साली बडोदे संस्थानात मोठा दुष्काळ पडला. त्याची झळ प्रजेला बसू नये म्हणून त्यांनी अनेक उपाय योजले. त्याचा आढावा त्यांनी स्वत: संस्थानात विविध ठिकाणी भेटी देऊन घेतला. दुष्काळाचा सामना करण्यासाठी दूरदृष्टीने उपाययोजना आखल्या.

दुष्काळी भागातील प्रत्येक निराधार व्यक्तीला तीस रुपयांपर्यंतची मदत दिली. महाराजांनी आपला खाजगी निधी दुष्काळ निवारणाकडे वळविला. लोकांसाठी अन्नछत्रे उघडली होती. जनावरांसाठी चारा पुरविला होता. ज्या भागात दुष्काळाच्या झळा जास्त होत्या त्या भागात विहिरींची कामे सुरू केली. गावातील ओढ्यांना, नाल्यांना बांध घातले. पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबविली होती. सरकारी तिजोरीतले ४७ लक्ष रुपये दुष्काळी कामासाठी खर्च केले. यात स्वतःचे खासगी खात्यातील साडेतीन लक्ष रुपयेही त्यांनी दिले. सारा माफी केली. महाराजांनी या काळात विविध अधिकारी आणि मित्रांना लिहिलेल्या पत्रांतून या दुष्काळाची दाहकता समजते. तसेच त्यांनी केलेल्या मदतीचे प्रतिबिंबही दिसते. महाराज डॉ. नेव्हिन्स यांना पत्रात लिहितात, 'सध्या आम्ही भयंकर दुष्काळाच्या पकडीत आहोत. हल्लीच्या पिढीच्या हयातीत असा भयंकर दुष्काळ पडल्याचे कोणास आठवत नाही. गेल्या केवळ तीन महिन्यांत मी लोकांच्या मदतीसाठी पंधरा लाख रुपये मंजूर केले आहेत. या कामी मला एकतर कर्ज घ्यावे लागेल किंवा जुने रोखे विकावे लागतील. पैशांची काहीतरी तजवीज करण्याच्या खटपटीत मी आहे.' *(पत्र क्र. ४३५)*. दुष्काळ निवारणासाठी सरकारी खजिना रिता केला आणि इतर अनेक उपाययोजना केल्या. दुष्काळासाठी तयार केलेला 'फॅमिन कोड'नुसार कार्यवाही केली. गरीब लोकांना, शेतकऱ्यांना मोठा आधार दिला. महाराजांनी या संकटावर श्रम, पैसा आणि लोकांचे पाठबळ वापरत मात केली.

बडोदा संस्थानात १८९८-१९०० साली मोठा दुष्काळ पडला. त्यांनी जुन्या Famine Code मध्ये सुधारणा केली. दुष्काळाची पाहणी करण्यासाठी संस्थानात फिरत असताना केलेल्या उपाययोजना आणि मदत यावर आधारित नोंदी घेतल्या. त्या नोंदी 'दुष्काळी दौऱ्याच्या नोंदी' या ग्रंथात प्रसिद्ध केल्या.

दुष्काळी दौऱ्याच्या नोंदी (Notes on The Famine Tour By His Highness The Maharaja Gaekwad)

बडोदा संस्थानाला इ.स. १८९६ पासून ते इ.स. १९०० पर्यंत प्लेग आणि प्लेग संपताच दुष्काळ या अस्मानी संकटांचा सामना करावा लागला. महाराजांना या दुष्काळाचा अंदाज लवकरच आला होता. त्यांनी माणसे आणि पशुधन वाचवण्यासाठी जिवाचे रान केले.

सयाजीराव महाराजांनी या काळात लिहिलेल्या पत्रांतून प्रजेबद्दल आणि दुष्काळाबद्दलची चिंता व्यक्त केलेली दिसते. २६ ऑगस्ट १८९९ रोजी ठाकूरसाहेब गोंडल यांना महाराज लिहितात, 'इकडे अजूनही पाऊस नसून दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. आवश्यक तेथे आपत्ती निवारणाची कामे सुरू करण्याची तयारी होत आहे. गरीब जनतेला हे वर्ष फार कठीण जाणार असे वाटते.' *(पत्र क्र. ४२४)*. महाराजांना दुष्काळाची चाहूल लागताच उपाययोजना सुरू केल्या. संकट काळात प्रजेला हानी पोहोचू नये यासाठी महाराज नेहमी तत्पर असत. या काळात लिहिलेल्या अनेक पत्रांत याबाबतचा मजकूर दिसतो. त्यानंतर काही दिवसांनी महाराज त्यांचे शिक्षक गुरू इलियट यांना लिहितात, 'गुजरातमध्ये झालेल्या भीषण दुष्काळामध्ये माझ्यावरील कामाचा ताण बराच वाढला. दुष्काळाचे दुष्परिणाम आणि कठीण परिस्थिती लक्षात घेऊन मागच्या तीन महिन्यात मी १४-१५ लाख रुपये खर्च मंजूर केला आहे. अशा प्रकारची मंजुरी अजून वाढणार आहे असे वाटते. आमची सर्व शिल्लक संपून बँकेचे रोखेही वापरात घ्यावे लागतील असे दिसते. काही आस्थापनांचा खर्च तर फारच वाढणार आहे; पण त्यांनी आधीच्या मंजूर झालेल्या निधीचा योग्य उपयोग करावा. नवसारी विभागाची अवस्था फारच गंभीर असून तेथे पेयजलाची समस्या वाढणार आहे. जनावरांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत आहे.' *(पत्र क्र. ४३७)*. प्रजा आणि पशुबळ यांची हानी कमीत कमी कशी होईल याची काळजी घेतल्याचे पत्रांतून दिसते. दुष्काळाबद्दल वाटणारी चिंता पत्रांतून स्पष्ट दिसते.

महाराजांनी दुष्काळातील दुर्धर परिस्थितीची स्वत: खडतर प्रवास करून पाहणी केली. प्रवास करताना त्यांनी कोणत्याही प्रकारचे सत्कार, भेटवस्तू स्वीकारल्या नाहीत. आपले सत्कार आणि स्वागत करण्यासाठी खर्च करू नये यासाठी पुन्हा हुकूम काढला. या प्रवासाचा खर्च वाढू नये म्हणून त्यांनी सोबतचा लवाजमा कमी केला. त्या-त्या भागातील माहिती असणाऱ्याअगदी निवडक लोकांना आणि जबाबदार अधिकाऱ्यांना सोबत घेऊन प्रवास केला. दुष्काळाची पाहणी केली. (याचा उल्लेख याअगोदरच आला आहे) बडोदा संस्थानाच्या इतिहासात हे प्रथमच घडत होते.

या प्रवासात अनेक ठिकाणचे प्रश्न जागेवरच सोडवले. लोकांच्या हाताला काम दिले. पाण्यापासून ते अन्नधान्यापर्यंत मदत केली. त्यांनी दुष्काळ निवारणार्थ तीन प्रकारची मदत हुकूम काढून केली.

**१) तात्कालिक मदत -** यावर्षी शेतात अन्नधान्य न पिकल्याने गरजू लोकांना धान्याची मदत करणे, अनाथगृहे उघडणे, लोकांना वस्त्रे पुरवणे ताबडतोब करावेत. गावोगावी विहिरी

करणे, रस्ते दुरुस्त करणे अशी कामे सुरू करून लोकांना मजुरी मिळण्याची सोय करावी. चालू घटकेला लोकांची भूक शमविणे इतकाच या गोष्टींचा उपयोग होऊ शकेल. माणसापेक्षा सर्वांत वाईट अवस्था जनावरांची होत आहे. त्यांच्यासाठी चारापाणी पुरवण्यासाठीही मार्ग काढावा. दुष्काळ नसलेल्या भागातून अन्न आणि चारा आणावा.

**२) संपर्कासाठी सोयी करणे -** एका भागातून दुसऱ्या भागात जलदगतीने मदत पोहोचवण्याकरिता रेल्वे, सडकास वाहतुकीच्या साधनांची सोय व्हावी, याकरिता सडका दुरुस्ती आणि नवे रस्ते दुष्काळी कामाचा भाग म्हणून प्राधान्याने व्हावे. माणसाच्या शरीरात रक्त वाहून नेण्याचे काम जशा अनेक धमन्या करत असतात तसे रस्ते राज्याच्या प्रगतीसाठी मदत करतात. संकटात या रस्त्यांची मदत होते.

**३) चिरकाल स्वरूपाच्या सोयी -** आमच्याकडे बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर केली जाते. अलीकडे आपण काही वर्षांपासून विहीर खोदून पिकासाठी पाणी द्यावे, असा प्रयत्न सुरू केला आहे; पण आताच्या दुष्काळाने तर माणसाच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. पुढच्या काळातही अवर्षणाचे संकट पुन्हा येऊ शकते. या संकटाला तोंड देण्यासाठी शेतकऱ्याने शेतात विहिरी खोदल्या पाहिजे. आता या दुष्काळी कामात प्राधान्याने विहीर खोदणे, पाटबंधाऱ्याची कामे करणे, कालवे काढणे ही कामे करावीत. हीच कामे दुष्काळावर चिरकालीन साधन होऊ शकेल.

त्यांनी अशा प्रकारची कामे केल्यामुळे दुष्काळाच्या संकटात जनतेचे दु:ख कमी झाले. त्यातून दुष्काळात आपला राजा खंबीरपणे पाठीशी उभा आहे, आपणाला मदत करतो आहे म्हटल्यावर त्यांना धीर आला.

महाराजांनी त्यांच्या शिक्षण काळापासून लिखाणाचा सराव चालू ठेवला होता. वेगवेगळ्या कारणाने विविध विषयांत त्यांचे लिहिणे चालू होते. संस्थानात दुष्काळ पडताच संस्थानच्या प्रत्येक भागाचा दौरा करताना तेथील लोकांच्या अडचणी प्रत्यक्षात समजावून घेतल्या. त्यांना हवी ती मदत केली. त्यांच्या तपशिलावर नोंदी करून घेतल्या. या नोंदी म्हणजेच ‘Notes on The Famine Tour By His Highness The Maharaja Gaekwad’ हा ग्रंथ होय. या ग्रंथाबाबत आपटे म्हणतात, ‘महाराजांनी प्रथम कडी प्रांतात जाऊन तेथील वस्तुस्थिती आपल्या नजरेखाली घातली. या प्रांतात व यापुढे राज्यातील बाकीच्या प्रांतांतही प्रवास केल्यावर त्यांना जी वस्तुस्थिती दिसली, तिचे प्रत्यक्ष वर्णन व तिच्यावरून सुचलेले विचार त्यांनी स्वतंत्र पुस्तक रूपाने छापवून प्रसिद्ध केल्यामुळे, तत्कालीन पुरावा म्हणून या पुस्तकाचे फार महत्त्व आहे.’ *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ४८३).* या नोंदी इंग्रजीतून घेण्यात आल्या होत्या. यात प्रत्येक भागात दुष्काळ निवारणासाठी महाराजांनी काय मदत केली, लोकांना कसा दिलासा दिला याच्या नोंदी केल्या आहेत. या नोंदी ग्रंथरूपाने ‘मॅकमिलन आणि कंपनी, लंडन’ यांनी इ.स. १९०१ साली प्रथम प्रकाशित केल्या. २०१६ साली हा ग्रंथ ‘महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद’ यांनी भारतात प्रथम पुनर्प्रकाशित केला. हा

महाराजांचा दुसरा ग्रंथ होय. पहिला ग्रंथ पाश्चात्त्य देशातील इतिहासावर आधारित होता तर हा ग्रंथ बडोद्यातील दुष्काळाशी निगडित होता.

## Notes on The Famine Tour ... ग्रंथाचे स्वरूप

सयाजीराव महाराजांनी लिहिलेल्या या ग्रंथाचे स्वरूप नोंदीसारखे आहे. त्यांनी ज्या प्रांताचा दौरा केला त्या भागात दुष्काळग्रस्तांसाठी केलेल्या कामाच्या नोंदी घेतल्या. त्या भागातील परिस्थितीचे वर्णन केले. हे वर्णन करत असताना त्यांची जनतेप्रती असणारी प्रेमाची आणि आपुलकीची भावना जागोजागी दिसते.

महाराजांनी बडोदा संस्थानच्या चारही प्रांतांत दौरे केले. या नोंदीमध्ये त्या भागात भेट दिलेली ठिकाणे, त्या भागात दुष्काळासाठी केलेले नियम, दुष्काळग्रस्तांना आगाऊ केलेली मदत, दानधर्म, उपासमारीने होणारे मृत्यू थांबवण्यासाठी दिलेले अनुदान, अनाथालयासाठी मदत, निराधार स्त्रियांसाठी दवाखान्यात निवाऱ्याची सोय, विहिरी आणि तलाव खोदण्यासाठी केलेले हुकूम आणि आर्थिक मदत, कामावरील मजुरांच्या तक्रारींचे निराकरण, पुढील हंगामात बी-बियाणांसाठी दिलेली मदत, गवताच्या लागवडीसाठी केलेली आर्थिक मदत अशा विविध मदतींचा समावेश आहे.

या ग्रंथात त्यावेळी चाललेल्या कामाची छायाचित्रे दिली आहेत. तसेच ग्रंथाच्या शेवटी तीन परिशिष्टेही दिली आहेत. दुष्काळाच्या कामात ज्या-ज्या व्यक्तींनी आणि अधिकाऱ्यांनी उल्लेखनीय काम केले त्यांची माहिती पहिल्या परिशिष्टात आहे. दुसऱ्या परिशिष्टात गरीबखाने व इतर दानधर्म यांची माहिती, तर तिसऱ्या परिशिष्टात समारोपाचे भाष्य केले आहे. त्यामुळे ही परिशिष्टे महत्त्वाची आहेत. हा ग्रंथ बडोद्यातील दुष्काळासंबंधी माहिती देणारा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. फक्त दस्तऐवज नाही, तर दुष्काळ पडल्यानंतर त्यावर काय उपाययोजना कराव्यात यासाठी आजही उपयोगी आहे.

महाराज ज्या दुष्काळी भागाचा दौरा करत त्या भागातील लहान-लहान बाबींकडे त्यांचे लक्ष असे. त्या बाबींच्या पूर्ततेसाठी सूचना करत, हुकूम देत. त्यांनी कडी, अमरेली, बडोदा शहर, दाभोई, नवसारी या क्रमाने प्रत्येक प्रांतांना भेटी दिल्या. त्या-त्या भागात संस्थानातर्फे काय-काय उपाययोजना केल्या याबाबत नोंदी घेतल्या. तसेच त्या प्रांतांत दुष्काळामुळे लोकांचे किती हाल झाले आहेत याचीही दखल या नोंदीत घेतली. त्या भागातील अधिकाऱ्यांना माहिती जमा करण्यास सांगत. त्यावर आधारित तात्पुरत्या आणि दीर्घकालीन उपाययोजना करत. त्यांना तातडीची मदत जाहीर करत.

सयाजीराव महाराजांनी या दौऱ्यांची सुरुवात दुष्काळाने सर्वांत जास्त प्रभावित असलेल्या कडी भागापासून केली. त्यातील काही नोंदी अशा होत्या. दौऱ्यात भेट दिलेली स्थळे, उदरनिर्वाहासाठी तगाई (शेतकऱ्यांना मदतीदाखल सरकारी खजिन्यातून दिलेली आगाऊ रक्कम), विविध भागातील शेतकऱ्यांना दिलेली तगाई, खासगी दानधर्म, ग्यारमी व सदावरत या संस्थांचा दुष्काळ निवारणासाठी उपयोग, उपासमारीने होणारे मृत्यू थांबवण्यासाठी अनुदान,

हरिजनांसाठी दुष्काळी मदत, मेहसाणा येथील अनाथालय, गर्भवतींसाठी दवाखान्यात निवास व्यवस्था, दुष्काळी दीर्घकालीन उपाययोजना (गंगाडी तलाव-कामाची पद्धत, कामाची सक्ती, मजुरांचा दुसरा वर्ग, मजुरांच्या तक्रारी, समस्यांचे निराकरण), अधिकाऱ्यांच्या मर्यादा, मजुरांच्या वेतनासंदर्भातील समस्या आणि त्यांचे निराकरण, करनिर्धारण आणि करमाफी, विहिरी खोदण्याचे आदेश, बियाण्यांसाठी तगाई, गवत व चाऱ्यासाठी तगाई, सोनगडचे गवत, स्थानिक अधिकाऱ्यांच्या तक्रारी आणि उपाय, अधिकाऱ्यांचे अधिकार वाढवण्यात आले.' या विविध शीर्षकांखाली त्यांनी कडी प्रांतात केलेल्या दौऱ्याच्या नोंदी घेतल्या. त्यांनी निसर्गाच्या या रुद्रावताराला गांभीर्याने घेतले. या आपत्तीला दूर करण्यासाठी कष्ट घेतले. प्रत्येक मजुराची, या दुष्काळाने बाधित झालेल्या प्रत्येक माणसाची दखल महाराजांनी घेतली. बाधित लोकांना मदत केली.

## Notes on The Famine Tour... ग्रंथाची वैशिष्ट्ये

दुष्काळाची आपत्ती संस्थानात असताना महाराजांनी या नोंदी घेतल्या. त्यातून पुढील लोकांना आगामी संकट निवारणासाठी दिशादर्शक राजमार्ग तयार झाला. या ग्रंथाचे महत्त्व कालातीत आहे. त्यामुळे या ग्रंथाची वैशिष्ट्ये पाहणे महत्त्वाचे ठरेल.

त्यांनी दुष्काळातील नोंदी सूक्ष्मपणे घेतल्या. त्यांच्या नजरेतून लहान-लहान बाबी सुटल्या नाहीत. त्याबाबतची अनेक उदाहरणे ग्रंथात दिसतात. 'The other objects of special pity and solicitude were woman who had either just been confined or about to be confined. There were instances in which such women had to work on relief-works when on the eve of their travail. Orders were issued to grant accommodation and assistance to all child-bearing women who could obtain no other assistance. The hospitals and dispensaries of the state were thrown open to them for certain period of the time before and after their confinement. It is gratifying to see from the monthly returns that number of these destitute women are taking advantage of provision made for them.' *(Gaekwad, 1901, p. 10).* कडी प्रांतात महाराजांनी गरोदर बायका आणि नुकत्याच मुलाला जन्म दिलेल्या स्त्रियांसाठी मदत केली. प्रसूतीच्या अगोदर आणि नंतर या स्त्रियांची सोय दवाखान्यात केली. या सोयीचा फायदा कडी प्रांतातील स्त्रिया घेत होत्या. हे पाहून त्यांनी समाधानही व्यक्त केले व तशी नोंद घेतली. महाराजांनी भेट दिलेल्या प्रांतांत दुष्काळामुळे सर्वाधिक प्रभावित झालेल्या घटकाची प्रथम दखल घेतली. त्यावर तातडीने उपाययोजना केल्या.

महाराजांच्या दुष्काळी दौऱ्यात त्या-त्या भागातील उच्चपदस्थ अधिकारी सोबत असत. पाण्याची, अन्नाची आणि जनावरांच्या चाऱ्याची भीषणता ज्या भागात जास्त आहे अशा भागांना प्रथम भेटी दिल्या. संध्याकाळी त्याच्या नोंदी घेतल्या. या नोंदींचा मराठीमध्ये भाषांतरित

केलेला काही भाग आपटे लिखित चरित्रात आला आहे. दभोई प्रांताला भेट दिल्यानंतर महाराज लिहितात, 'आगगाडीतून डभोईजवळ येताच मी खिडकीतून बाहेर पाहिले, तो त्या गावच्या ऐतिहासिक व पुराणसंशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या दगडांच्या जाड भिंती माझ्या दृष्टीस पडल्या व त्यांना पाहून त्यांचा पूर्वकाल माझ्या नजरेसमोर उभा राहिला. त्यावेळी मजुरी स्वस्त असे व धान्याची सुबत्ता असे. निसर्गच जेव्हा कोपे, तेव्हा अर्थात त्या वेळीही पुष्कळ लोक मरत; परंतु हल्लीच्या तीव्र वर्ग कलहाच्या काळापेक्षा त्या काळी लोकांत औदार्य अधिक असल्यामुळे निराधारांचे कष्ट पुष्कळसे कमी होत असत. वाहतुकीची साधने त्याकाळी कमी असल्याने नित्याच्या उपयोगाला लागून उरणारे धान्य लोक साठवून ठेवीत, त्याचा दुष्काळाच्या प्रसंगी उपयोग होत असे.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ४८३).* महाराजांनी कमी शब्दांत पूर्वीच्या दुष्काळाची तीव्रता आणि इ.स. १८९९ साली पडलेल्या दुष्काळाची अचूक तुलना केली, तसेच आत्ताच्या दुष्काळात धनिक लोकांनी उदारहस्ते मदत करावी असे नमूद केले. वाहतुकीच्या साधनांचे महत्त्व सांगितले.

महाराजांच्या नोंदीत दुष्काळातील निसर्गाचे भयानक रूपही सुटले नाही. त्यावेळी दिसणाऱ्या निसर्गाचे वर्णन केले. 'या शहराच्या जीर्ण झालेल्या भिंतींना जर वाचा फुटेल, तर त्यांचा प्राचीन इतिहास आपल्याला कळून, इतिहासाच्या ज्ञानातील आपले वैगुण्य त्या योगाने भरून निघेल. अशा अनेक प्राचीन नगरांचा मिळून केवढा मोठा चित्रपट आपल्या नजरेसमोर त्यामुळे उभा राहू शकेल! सनोत्तर अकराव्या शतकाच्या वेळच्या या शहराच्या वैभवाचे, त्यातील उद्योगधंद्यांचे व कलाकुसरींचे, त्यातील लोकांच्या खऱ्या शौर्याला मिळणाऱ्या उत्तेजनांचे व त्यातील शूरवीरांच्या अनुयायांच्या चित्रविचित्र रणसामग्रीचे किती विलक्षण चित्र आपल्याला पाहावयास सापडेल! त्यानंतरच्या मुसलमानी अमलातील शूर, र्गिवष्ठ, धर्मवेडूया व मूर्तीभंजक लोकांचा व त्यानंतरच्या अल्पकालिक मराठी साम्राज्याच्या अमदानीचा देखावाही आपल्याला दिसून येईल. येथील मराठ्यांच्या कारभाराचा काल फार अल्प असल्यामुळे, आपल्या विधायक कर्तृत्वाची छाप या शहरावर बसविण्यास त्यांना पुरेसा अवधीच मिळाला नाही. या शहराच्या तटाच्या भितींच्या आत त्या काळी दंगे, तुफान, जातिमत्सर, आपसातील यादवी, जन्म-मृत्यू, सुख-दु:खाचे प्रसंग कितीतरी झाले असतील. त्यांचे पडसाद हल्ली शांत झाले असून, या दगडात लीन झाले आहेत. नाही म्हणावयास सांप्रतच्या भयंकर प्रसंगातील लोकांचे हाल पाहत फिरणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या अंत:करणात भावी वैभवाची सुखस्वप्ने सुचविण्यास मात्र त्यांचा उपयोग होत आहे.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ४८४).* महाराजांच्या मते, शहराचे दिसणे सत्ताधीश बदलला की बदलते. सत्ताधीश आणि दुष्काळ यांचा सहसंबंध दाखवत त्या ठिकाणाचे वर्णन केले आहे. महाराजांच्या या वर्णनातून त्यांच्यातील श्रेष्ठ साहित्यिक दिसतो.

दुष्काळात निसर्ग कोपतो. त्यामुळे प्रजा, पशुपक्षी यांची अवस्था बिकट होते. पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होते. महाराज दभोई प्रांतात गेले असता त्यांना हे सर्व जवळून पाहावयास मिळाले आणि याबाबतचे त्यांनी वर्णन केले. 'कडाक्याचे ऊन पडल्यामुळे सर्वत्र निस्तब्धता पसरली होती.

वाऱ्याची लहानशी झुळूकसुद्धा येत नव्हती अथवा झाडाचे एखादे पानही हलत नव्हते. नील व विशाल आकाशात एखाद्या घारीच्या पंखांचे फडफडणेही ऐकू येत नव्हते. शहरात माणसांच्या रहदारीचा गजबजाट मुळीच नव्हता. एखाद्या मंदिरातील घंटेचा नादही ऐकू येत नव्हता. प्रत्यक्ष परमेश्वरच कोपल्यामुळे त्याची घाबरलेली अपत्ये बिचारी सांधीकोंदीत दडून राहिल्याप्रमाणे मूक झाली होती. निसर्गाच्या इतर सर्व शक्तींना मागे सारून सुऱ्याने आपल्या असह्य उष्णतेचा अंमल सर्वत्र बसविला होता व पृथ्वी हीनदीन होऊन त्याच्या पायाशी लोळत पडली होती. लोककल्याणासाठी आपल्या उदरात निरंतर फलधान्यादी धारण करणारी ती भूमाता आज स्वत:च रुक्ष होऊन थोड्याशा उदकासाठी आतुर झाली होती. चोहोकडे लांबवर दृष्टी फिरवली तरी गवताची एखादी काडी अथवा झाडाचे एखादे पानही कोठे दिसत नव्हते. सगळीकडे शुष्क, रुक्ष व पांढराफटक असा तिचा पृष्ठभाग सूर्याच्या तापाने भाजून निघाला होता. फक्त झाडे तेवढी पर्णहीन असली, तरी जर्जर वीरांप्रमाणे सूर्याला न जुमानता ताठ उभी होती.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ४८४).* महाराजांचे बालपण खेडेगावात गेले. पुढे राजपदी निवड झाल्यावरही त्यांनी ग्रामीण भागाशी, शेतीशी असणारे नाते तोडले नाही. त्यामुळे त्यांना शेतकरी आणि कष्टकरी यांच्याविषयी नेहमीच आस्था वाटत होती. या नोंदीत समोर जे दिसले ते त्यांनी मांडले. त्यांनी केलेले हे वर्णन वस्तुस्थितीदर्शक आहे.

महाराजांना संस्थानातील प्रवासामुळे दुष्काळाची दाहकता अनुभवता आली. एक राज्यकर्ता या नात्याने त्यांनी प्रजेसाठी जे-जे करता आले ते केले. महाराज दुष्काळात लोकांना मदत करून थांबले नाहीत, तर भविष्यकाळात अशा प्रकारच्या येणाऱ्या संकटांना तोंड देण्याची तयारी या ग्रंथाच्या माध्यमातून केली. हे एक या ग्रंथाचे महत्त्वाचे फलित होते. या संकट निवारणानंतर त्यांनी काढलेल्या हुकुमात भविष्यकाळात येणाऱ्या संकटांना तोंड देण्याची तयारी केल्याचे दिसते. हुकुमात महाराज लिहितात, 'दुष्काळ वगैरे प्रसंगी राज्याच्या चालू खर्चाउपरांत अधिक खर्चासाठी शिलकेत रक्कम ठेवण्याची जरूर आहे. अशी शिल्लक दोन कोटी रुपये ठेवण्याची शिफारस करण्यात आली; परंतु इतकी रक्कम पुरी होईल असे न वाटल्याने राज्याच्या तीन वर्षांच्या उत्पन्नाइतकी म्हणजे सातपासून आठ कोटी रुपयांइतकी रक्कम शिलकेत हमेशा राहील, असे धोरण ठेवावे. इतकी मोठी रक्कम अर्थातच बिनव्याजी ठेवावयाची नसून, ती सुरक्षित राहील व हवी त्या वेळी मिळू शकेल अशा रीतीने व्याजी लावून ठेवावी.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. १२३५).* महाराजांनी बडोद्यात पडलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारचे संकट भविष्यकाळात आले तर त्याबाबतची उपाययोजना करून ठेवली होती. थोडक्यात, या ग्रंथामुळे त्यातील केलेल्या निरनिराळ्या नोंदींमुळे पुढे येणाऱ्या संकटांचा सामना करण्याची त्यांची तयारी झाली.

महाराजांचा हा ग्रंथ राज्यकर्त्यांना आजही उपयोगी पडणारा आहे. त्यांनी केलेल्या नोंदी आणि दुष्काळावर योजलेल्या उपाययोजना आजही मार्गदर्शक आणि दीपस्तंभासारख्या दिशादर्शक आहेत.

१) Notes on Famine Tour...मधील मदत (१८९९-१९००)

सयाजीराव महाराजांनी केलेल्या मदतीबद्दल या ग्रंथात काही नोंदी घेतल्या आहेत. त्या नोंदी विभागवार पुढीलप्रमाणे -

कडी विभाग - (४ डिसेंबर ते ११ डिसेंबर १८९९)

१) ज्यांच्याकडे जमीन नाही मात्र दुष्काळी कामावर जाण्यास कमीपणाचे वाटते त्यांच्यासाठी महाराजांनी तीस रुपयांपर्यंतची आगाऊ रक्कम (तगाई) म्हणून मंजूर केली.

२) शेतीवर जगणाऱ्या एकनकडी आणि फरतानकडी येथील शेतकऱ्यांसाठी तगाई म्हणून एक लाख रुपये मंजूर केले.

३) विसनगर ताबटांना तगाई म्हणून २०० रुपये मंजूर केले (दुष्काळामुळे तांब्याची बाजारपेठ मोडकळीस आल्याने या व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या लोकांसाठी म्हणून महाराजांनी ही रक्कम मंजूर केली.)

४) या भागातील प्रत्येक शहरात अन्नछत्र उघडण्यात आले.

५) साधू आणि फकिरांसाठी उघडण्यात आलेल्या ग्यारमी व सदावरत या संस्थांचा उपयोग दुष्काळाने प्रभावित झालेल्या लोकांना व्हावा तसेच फकीर आणि जोग्यांना देण्यात येणाऱ्या अन्नधान्यांवर प्रतिबंध आणावेत आणि हे सर्व अन्नधान्य बाधित लोकांना द्यावे असा आदेश महाराजांनी काढला. दुष्काळाने प्रभावित लोकांना मदत व्हावी या उद्देशाने महाराजांनी या संस्थांना आदेश दिले.

६) उपासमारीने होणारे मृत्यू टाळण्यासाठी अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात नेहमी फिरते राहण्याचा सल्ला देण्यात आला. तसेच मदतीची गरज असलेल्या माणसांसाठी सुभा (कलेक्टर) यांना १०० रुपये आणि वहिवाटदारास ५० रुपये निधी मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आले. निधी संपल्यावर नव्याने निधी देण्यात येत होता.

७) अस्पृश्य लोकांचे जीवन दुष्काळात अधिकच दुर्धर आणि कठीण झाल्याचे महाराजांच्या अभ्यासांती लक्षात आले. त्यामुळे त्यांच्यासाठी महाराजांनी निधीची सोय करण्यात आली.

८) अनाथ, निराधार असहाय मुलांची परिस्थिती महाराजांनी पाहिली. त्यांच्यासाठी मेहसाणा येथील अनाथालयात बारा वर्षांच्या आतील २०० मुलांची सोय करण्यात आली. बडोद्यातही अशाच प्रकारचे अनाथालय उघडण्यात आले. त्या ठिकाणी ३०० मुलांची सोय करण्यात आली.

९) दुष्काळात ज्या महिला गर्भवती होत्या, ज्या महिलांना लहान मुले होती अशा महिलांची सोय दवाखान्यात करण्यात आली.

१०) प्रजेला दुष्काळात काम मिळत नव्हते. त्यामुळे महाराजांनी महिन्याभरात या भागासाठी साठ मदत कार्ये सुरू केली. त्यामधून जवळजवळ १६,००० लोकांना काम देण्यात आले.

११) सयाजीराव महाराजांनी कडी भागात दुष्काळाच्या कामात गंगाडी तलावाचे काम सुरू केले. गंगाडी तलावाचे काम मोठे असल्यामुळे या कामावर अनेक लोक जाऊ लागले. यावर अनेकांची उपजीविका सुरू झाली. दुष्काळात लोकांना चांगल्या पद्धतीने जीवन जगता येऊ लागले.

१२) महाराजांनी सुरू केलेल्या दुष्काळी कामावर स्थानिक आणि ऐतखाऊ लोकांची गर्दी होऊ लागली. त्यामुळे गरजू आणि दुष्काळाचा जबर फटका बसलेल्या लोकांना या कामावर काम मिळेना. याची तक्रार त्यांना प्राप्त झाली. यावर उपाययोजना करत महाराजांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या तक्रारींचा निपटारा केला.

१३) ज्या भागात दुष्काळाचा जबर फटका बसला आहे अशा भागात महाराजांनी नवजात बालके आणि विकलांगांसाठी तात्पुरत्या राहुट्या उभ्या केल्या. या राहुट्या उभ्या करण्यासाठी ४,००० रुपये इतकी मोठी रक्कम कडी, बडोदा व अमरेली या प्रांतांसाठी देण्यात आली.

१४) ही रक्कम दिल्यावर महाराजांनी काढलेले उद्गार अत्यंत महत्त्वाचे आहेत. महाराज म्हणाले, ‘ऋतूंच्या तडाख्यापासून गरीब लोकांना वाचवण्यासाठी या निधीचा विनियोग झाला तर मला खूप आनंद होईल.’

१५) या दुष्काळात आणि अगोदर दिलेल्या करमाफीबाबत महाराज म्हणतात, ‘जवळपास ७५ टक्के अर्ज हे करमाफीसाठी होते. हा महत्त्वाचा प्रश्न आधीच विचाराधीन होता.’

१६) दुष्काळात शेतकऱ्यांचे पिकाअभावी खूप नुकसान होते. त्यामुळे शेतसारा भरण्यास खूप अडचणी होतात. यावर महाराजांनी उपाय काढला. शेतसारा वसुलीसाठी कोणत्याही कठोर उपाययोजना करण्यासाठी प्रतिबंध करणारा आदेश देण्यात आला.

१७) या भागात (कडी) सर्व गावांतून विहिरी खोदण्याचे आदेश देण्यात आले. त्यासाठी सरकारी खजिन्यातून पैसा उपलब्ध करून देण्यात आला.

१८) पुढील हंगामात शेतकऱ्यांना शेतीतून उत्पादन करण्यासाठी लागणारी सामग्री सहज उपलब्ध होण्यासाठी महाराजांनी बियाण्यांसाठी तगाई देण्यात आली. हिवाळी पिकांसाठी बी-बियाणे आणि शेतीच्या उपयुक्त वस्तूंसाठी ५०,००० रुपये मंजूर करण्यात आले.

१९) मेवासी खेडी महाराजांच्या महसुली नियमांत बसत नव्हती. तरी महाराजांनी त्यासाठी स्वतंत्रपणे १५,००० रुपये तगाई म्हणून मंजूर केली.

२०) दुष्काळात कडी भागात सर्वांत मोठी अडचण झाली ती जनावरांची. त्यामुळे हे पशुधन वाचण्यासाठी महाराजांनी अनेक उपाययोजना केल्या. चाऱ्याच्या लागवडीसाठी काही माळराने सरकारने खुली केली. जंगलाचा काही भाग जनावरांच्या चाऱ्यासाठी खुला केला. पशुधनासाठी लागणाऱ्या साहित्यासाठी करमाफी देण्यात आली. जनावरांच्या चाऱ्यासाठी जे शेतकरी लागवड करतील त्यासाठी महाराजांनी एका बिघ्यासाठी दोन रुपये देण्याचे आश्वासन दिले.

२१) या उपाययोजना दुष्काळाच्या भयानतेमुळे कमी पडू लागल्या. शेतकऱ्यांचे पशुधन वाचवण्यासाठी सोनगडच्या जंगलातून गवत आणण्याचा निर्णय करण्यात आला. हे गवत आणत असताना महाराजांना अनियमितता आढळली. त्यावर महाराजांनी उपाय काढले.

२२) महाराज दुष्काळासाठी उपाययोजना करत असताना काही अधिकारी, मध्यस्थ आणि लाभ घेणारे यांच्याविषयी अनेक तक्रारी त्यांना प्राप्त होत होत्या. त्या प्राप्त झाल्यावर त्यावर उपाय काढले. अनेकांना दंड केले, तर काही अधिकाऱ्यांना दुसऱ्या खात्यात बदलले. यामुळे कामात नियमितता राखता आली.

२३) दुष्काळाची दाहकता वाढत असताना प्रत्येक योजना बडोद्यातून मंजूर होत असे. पण त्यासाठी अधिकारी आणि इतर लोक यांच्याकडून त्यास विलंब होत असे हे महाराजांच्या लक्षात आले. त्यासाठी त्यांनी सुभा आणि कार्यकारी अभियंता यांनी स्वत: निर्णय घ्यावा यासाठी प्रत्येकी ३,००० रुपये व एकूण २०,००० रुपये इतका निधी मंजूर केला.

२४) स्थानिक पातळीवरील अधिकारी आणि दुष्काळी कामावर काम करणारे अधिकारी यांना महाराजांनी अनेक अधिकार दिले. त्यांना ताबडतोब काम सुरू करता यावे यासाठी वेळोवेळी अधिकार देताना त्यांच्या कामाची चौकशी करण्यासाठी वेगळी व्यवस्थाही केली.

अमरेली विभाग -

१) अमरेली भागात दुष्काळाचा तडाखा कडी प्रांतापेक्षा कमी बसला होता. त्यामुळे महाराजांनी कडी प्रांतानंतर या भागाला भेट दिली. यासाठी या कामाचा अनुभव आणि हुशार लोकांकडून या कामाविषयी माहिती मागविण्यात आली.

२) या भागात प्राकृतिक रचनेनुसार छोटे-छोटे तलाव खोदणे या कामाला प्राधान्य देण्यात आले.

३) अशा अनेक तलावांच्या कामांची मंजुरी देण्यात आली. त्यामुळे दुष्काळामुळे अनेकांना काम मिळत नव्हते. त्यांना या कामावर जाता येऊ लागले.

४) चितळ ते अमरेली या रेल्वेचे काम या काळात सुरू करण्यात आले; परंतु इंग्रजांनी या कामाला परवानगी नाकारली. त्यामुळे महाराजांनी स्वतःच्या तिजोरीतून यासाठी पैसा उभा केला आणि काम सुरू केले.

५) वेलन बंदराचे काम दुष्काळात सुरू केल्याने लोकांना आणखी काम मिळाले.

६) या भागात सिंचनाची सोय व्हावी म्हणून शत्रुंजा नदीवर आणि कोडिनारमधील शिदगंद या ठिकाणी हा प्रकल्प सुरू करण्यात आला.

७) सर्व कामे व्यवस्थित व्हावीत यासाठी महाराजांनी दुष्काळनिवारण करणाऱ्या अधिकाऱ्यांना आणखी सहायक दिले.

८) विहिरी खोदण्यासाठी अधिकारी म्हणून अप्पासाहेब मोहिते यांची नेमणूक करण्यात आली. या भागातील दामनगर व दारी येथील शेतकरी अशा विहिरी खोदण्यास उत्सुक असल्याचे लक्षात आल्यावर महाराजांनी दामनगरसाठी ५,००० रुपये आणि धारी तालुक्यासाठी १४,००० रुपये मंजूर केले.

९) विहिरी खोदण्यासाठी कामावर ३२,००० मजूर येत होते. यामुळे अनेकांच्या उदरनिर्वाहाची सोय झाली.

१०) महाराजांच्या नोंदीनुसार या भागात २,५०,००० रुपये खर्च करून विहिरी खोदल्या होत्या. या रकमेतून अनेकांची सोय झाली. त्या काळात लोकांना काम मिळाले आणि पुढील काळासाठी पाण्याची सोय झाली.

११) महाराजांना कडी भागाप्रमाणे या भागातही कामाबाबत अनेक तक्रारी मिळाल्या. महाराजांनी यावर तेथेच तोडगा काढला; परंतु दुष्काळातील कामे बंद होऊ दिली नाहीत.

१२) खंभा येथे अन्नछत्र उभारण्यात आले. त्याठिकाणी महाराजांनी कामगार लोकांच्या व कामावर येणाऱ्या बालकांची सोय केली. या अन्नछत्रात सात वर्षांखालील मुलांना अर्धा आण्याची तरतूद करण्यात आली.

१३) अमरेली भागात कामावर असलेल्या लोकांना थंड वाऱ्यापासून त्रास होत असे. महाराजांनी हे प्रत्यक्षात पाहिले. त्यामुळे त्यांनी लगेचच मजुरांच्या कपडे वाटपासाठी १,५०० रुपये मंजूर केले.

१४) अमरेली येथील दवाखान्यात दुष्काळाने बाधित झालेल्या लोकांसाठी वेगळा विभाग सुरू करण्यात आला.

१५) कामावर आलेल्या मजुरांसाठी निवाऱ्याची व्यवस्था कामाच्या ठिकाणी नव्हती. त्यासाठी तात्पुरता निवारा उभारावा म्हणून महाराजांनी ४,००० रुपये मंजूर केले.

१६) अमरेली येथील विणकर या दुष्काळामुळे त्रस्त झाले होते. अशा लोकांना काम मिळत नव्हते. तयार केलेल्या मालाला गिऱ्हाईक मिळत नव्हते; त्यांच्यासाठी महाराजांनी ५,००० रुपये मंजूर केले.

१७) अमरेली प्रांतात दुष्काळाची कामे सुरू असताना अनेक तक्रारी प्राप्त होत्या. यासंबंधीच्या सर्व तक्रारींचा निपटारा महाराजांनी जागेवरच केला. ज्या तक्रारी गुंतागुंतीच्या होत्या त्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश दिले.

१८) कडी प्रांताप्रमाणे या भागासाठीही विहिरी बांधण्यास, बी-बियाणे, शेतीसाठी आणि इतर कामासाठी महाराजांनी २०,००० रुपये तगाई मंजूर केली. याचा लाभ पुढील हंगामासाठी शेतकरी घेऊ शकत होते.

१९) या प्रांतात गिरासिया (जमीनदार) होते. त्यांना दुष्काळी कामावर जाण्यास कमीपणाचे वाटत होते. त्यासाठी त्यांना सयाजीराव महाराजांनी सावकारांकडून कर्ज मंजूर करून

दिले. यामुळे अशा लोकांची चांगली सोय झाली. (मजुरीच्या बदल्यात दिलेले पैसे घेणे गिरासिया लोकांना मंजूर नव्हते.)

२०) जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होता. तो मार्गी लागावा यासाठी महाराजांनी तगाई मंजूर केली.

२१) अमरेली विभागात आडवी या ठिकाणी दगडाची खाण होती. त्यामधील दगड विकण्याच्या प्रतीचा होता. तो दगड सुरत आणि बडोदा या ठिकाणी विकण्यास नेला तर त्यातून खूप पैसा उभा राहील हा विचार त्यांच्या मनात आला. त्यासाठी महाराजांनी ३,००० रुपये मंजूर केले.

२२) ओखामंडल येथील वाघेर लोकांना महाराजांनी मदत दिली.

२३) या भागाच्या शेवटी महाराजांनी दिलेली माहिती आजही दिशादर्शक आहे. महाराज जेव्हा दुष्काळी भागाची पाहणी करण्याकरिता जात त्यावेळी अनेक लोक त्यांचा सत्कार करत, नजराणा देत. त्यावर महाराजांनी हुकूम काढला. त्याबद्दल या ग्रंथात महाराज लिहितात, 'Before I undertook to travel in my districts I had ordered (and I think that the order was published in the Adnya-patrika) that no money was to be spent on celebrating my arrival at my place, and that no rayat was to make me nazarana in the accor dance with old custom. Sometimes, however, a few well-to-do people insisted upon breaking this order. Under the circumstances, when ever any nazarana was made, I gave all the money to inflict of the poor.' महाराजांनी अशा प्रकारे स्वत:वरती आणि प्रजेला त्रास होऊ नये यासाठी हा हुकूम काढून आपण प्रजेच्या दु:खात सहभागी आहोत हे दाखवून दिले.

बडोदा शहर व विभाग

हा भाग राजधानीच्या जवळचा असला तरी या भागाला दुष्काळाची तीव्रता अधिक जाणवत होती. ज्यावेळी महाराज कडी आणि अमरेली प्रांताचा दुष्काळी दौरा करून आले त्यावेळी त्यांना या भागातील संकट तीव्रपणे दिसले. जीवाच्या आकांताने या विभागातील, ग्रामीण भागातील अनेक लोक बडोदा शहरात आले होते. त्यामुळे येथील लोकसंख्या पूर्वीच्या तुलनेने अधिक वाढली होती. या सर्वांच्या अन्नधान्याचा भार सरकारवर आला होता. महाराजांनी या सर्वांच्या कामाची सोय केली. त्याची नोंद त्यांनी या ग्रंथात घेतली आहे.

१) बडोदा शहराच्या आजूबाजूच्या खेड्यांतून आलेल्या लोकांची स्थिती अतिशय दयनीय झाली होती. त्यांची सर्वप्रथम महाराजांनी सोय केली.

२) बडोद्यातील दुष्काळाने बाधित लोकांसाठी त्यांनी कामे सुरू केली.

३) भविष्यात लोकांना जेवढी कामे कमी पडतील त्यापेक्षा जास्त कामे महाराजांनी या भागासाठी सुरू केली.

४) या कामांमध्ये रेल्वेसाठी बांध बांधणे, सिंचन व सांडपाण्याच्या योजना सुरू करणे, मोठे तलाव बांधणे, आवश्यक असलेले रस्ते तयार करणे, खाणीमधून सापडणारे खनिज शोधून काढणे.

५) बडोदा विभागासाठी आवश्यक असणाऱ्या रेल्वे मार्गाच्या कामाचा समावेश दुष्काळी कामात केला. त्यामध्ये बडोदा ते गोध्रा, कॅम्बे ते पेटलाद या दोन कामांसाठी महाराजांनी दुष्काळापूर्वीच मंजुरी दिलेली होती. त्यामुळे या कामांचा समावेश दुष्काळी कामात केला. ही कामे जोमाने सुरू केली.

६) वरील कामाव्यतिरिक्त मियागाम ते सिनोर, बहादपूर ते सोनगीर आणि पद्रा ते मोभे या रेल्वेमार्गाच्या कामांची मंजुरी दिली. या कामांमुळे अनेकांना दुष्काळात हाताला काम मिळाले.

७) दुष्काळात लोकांना कामे कमी पडू नयेत म्हणून महाराजांनी आणखी रेल्वे मार्गांची आखणी करून ठेवली. त्यामध्ये नाडियाद ते सोजीत्रा आणि वाघोडिया ते सावली या मार्गांचा समावेश केला.

८) दुष्काळात बडोदा आणि शहर विभागाचे सुभे (कलेक्टर) खासेराव जाधव यांनी खूप मोठे काम केले. त्यांनी केलेल्या कामामुळे अनेकांना आधार मिळाला होता.

९) खासेराव जाधव यांनी महाराजांनी सुचविलेल्या काराचिया आणि हरीपुरा तलावांची कामे लागलीच निधी देऊन सुरू केली.

१०) या भागातील भिल्ल लोक काहीच काम नसल्याने शेती उपयोगी आणि दूध देणाऱ्या जनावरांची कत्तल करत. ही कत्तल थांबावी म्हणून त्यांच्यासाठी महाराजांनी ताबडतोब कामे सुरू केली. त्या भागात लहान-मोठी मदत कार्ये सुरू केली.

११) असोज येथील तलावासाठी पूर्वीच योजना तयार केली होती; परंतु दुष्काळामुळे ती लगेचच सुरू करण्यात आली.

१२) या भागातील जोजवा येथील ओसांग पाटाचे काम सुरू करण्यात आले. हे काम अत्यंत महत्त्वाचे होते. त्यासाठी महाराजांनी एक लाख रुपये निधी मंजूर केला. महाराजांच्या मते या कामामुळे तीस मैलापर्यंतच्या शेतीला याचा उपयोग होईल.

१३) बडोदा शहराजवळ असणाऱ्या खेड्यांतून आलेल्या लोकांसाठी शहरात कामांची व्यवस्था करण्यात आली. त्यामध्ये सौंदर्यीकरण, सांडपाण्याची व्यवस्था, भीमनाथ व मदन तलावांचा भराव, डफरीन दवाखाना आणि बगीखाना येथील दुरुस्ती, हत्तीखाना जवळील तलावांची खोली वाढवणे, आकोटा व पद्रा रस्त्यांची दुरुस्ती अशी कामे सुरू करण्यात आली.

१४) पाद्रा जिल्ह्यासाठी महाराजांनी १५,००० रुपये निधी ताबडतोब मंजूर केला.

१५) गरीबखाना व अन्नछत्रांसाठी हजार रुपये मंजूर केले.

१६) महाराजांनी गरीबखान्यास भेट दिली. त्या ठिकाणी आढळणाऱ्या त्रुटीत सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

१७) ओरसांग सिंचन प्रकल्प हा बडोदा विभागात सुरू करण्यात आलेला सर्वांत मोठा प्रकल्प होता.

१८) दभोई भागात यावेळी खूप मोठा दुष्काळ पडला होता. त्याबद्दल महाराजांनी नोंदविलेले मत असे होते. 'देव करो आणि पुन्हा कधीही इतकी वेदनादायी दृश्ये आणि दुःख बघायला न मिळो! लोकांना या हालअपेष्टांचा सामना करताना बघणे खरोखर अवाक् करणारे होते.'

१९) मोठी कामे या दुष्काळात सुरू करणे फायद्याचे होते; परंतु काही मोठी कामे बंद करून मजुरांना लहान-लहान गटात त्यांच्या गावाजवळ किंवा घराजवळ देणे फायद्याचे आहे हे महाराजांच्या प्रथम लक्षात आले. त्यामुळे अशी कामे सुरू करण्यासाठी त्यांनी १,००० रुपये मंजूर केले.

नवसारी विभाग

महाराजांनी कडी, बडोदे आणि शहर विभाग या नंतर नवसारी विभागाला भेट दिली. तेथील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. त्यामध्ये लोकांच्या जीविताला आणि पशुधन वाचवण्यासाठी त्यांनी प्राधान्य दिले. लोकांच्या हाताला काम दिले. कामासाठी निधी मंजूर केला.

१) तुलनेने सर्वांत कमी दुष्काळाचा तडाखा बसलेल्या नवसारी विभागाला महाराजांनी सर्वांत शेवटी भेट दिली; परंतु या ठिकाणीही त्यांनी ताबडतोब निधी देत दुष्काळाची कामे सुरू केली.

२) नवसारी विभागातील वेलछा जिल्ह्यातील कोसंबा ते वाकल या तीन मैल अंतराच्या रेल्वेमार्गाचे काम ताबडतोब सुरू केले.

३) नवसारी विभागात जंगलात नवीन रस्ते सुरू करण्याचे काम सुरू करण्यात आले. त्यामुळे या भागातील दुष्काळात होरपळत असलेल्या लोकांना लगेचच काम उपलब्ध झाले.

४) काही कामांच्या बाबतीत अधिकाऱ्यांना त्यांचा स्वतःचा विवेक वापरून जागेवर निर्णय घेण्याचा अधिकार दिला. त्यामुळे स्थानिक पातळीवर काही कामे अधिकाऱ्यांना सुरू करता आली.

५) या भागात काय-काय मदत करायची यासाठी नवीन महल कचेरी येथे पोहोचल्यावर महाराजांनी सुभा, नायब सुभा, कार्यकारी अभियंता, वन संरक्षक, वहिवाटदार आणि शहरातील काही मान्यवरांना उपाययोजना करण्यासाठी बोलावून घेतले. त्यांची मते जाणून घेतली. त्यानुसार त्यांनी लोकांना मदत आणि कामे उपलब्ध करून दिली.



एच-४८
१३

६) अमकुटीला जात असताना सोनगड तालुक्यातील गरीबखाना महाराजांना दिसला. हा गरीबखाना काही लोकांनी व्यक्तिगत पैशातून चालवला होता; परंतु महाराजांनी चौकशी करता त्यांना या गरीबखान्याची अवस्था वाईट असल्याचे समजले. त्यांनी या गरीबखान्यासाठी १०,००० रुपये मंजूर केले.

७) नवसारी विभागात जेथे जेथे दुष्काळ आहे, त्या ठिकाणी लोकांना दिलासा देणारी कामे सुरू करण्यासाठी त्यांनी हुकूम दिला. त्यासाठी लागणाऱ्या रकमा त्यांनी मंजूर केल्या.

८) दुष्काळाची झळ सरकारी कर्मचाऱ्यांना बसली होती. त्यांनीही करमाफीसाठी अर्ज केले. महाराजांनी अशा अर्जांची चौकशी सुरू केली. त्यानंतर काही लोकांचे कर माफ केले.

९) दुष्काळाने बाधित लोकांची महाराज भेट घेत. एक राजा आपल्याला भेटायला येतो हे पाहून अनेकांना दिलासा मिळत होता. त्यामध्ये दुर्बल, धनका, चोन्धार, नाईकदास, भिल्ल, कोकणी या लोकांची महाराजांनी जंगलात जाऊन भेट घेतली.

१०) रुपये ६,००० पेक्षा जास्त खर्च नसलेल्या कामांसाठी स्थानिक अधिकाऱ्यांना स्वेच्छाधिकार देण्यात आला.

११) बांबूपासून चटया बनवण्याच्या उद्योगाला ६,००० रुपये मंजूर केले. दुष्काळात लोकांना तात्पुरत्या राहुट्या उभारण्यासाठी याची गरज असल्याचे महाराजांनी ओळखले होते.

१२) अमकुटी विभागातील जमीन लागवडीसाठी खूप चांगली होती; परंतु लोकांना दुष्काळात पैशाची गरज होती. अशा आशयाचा अभिप्राय सुभा यांनी दिल्यावर महाराजांनी व्यारा आणि महुआ जिल्ह्यासाठी ३०,००० रुपये मंजूर केले.

१३) या जिल्ह्यासाठीही बाकीच्या जिल्ह्यांप्रमाणे शेतकऱ्यांना कर्ज मंजूर करण्याचे निर्देश महाराजांनी दिले.

१४) पूर्व नवसारी जिल्ह्यासाठी तगाईची बडोदा संस्थानातील इतर भागाप्रमाणे आगाऊ रक्कम म्हणून ३०,००० रुपये मंजूर केले.

१५) महाराजांनी संपूर्ण राज्यासाठी अगोदरच २५,००० रुपये मंजूर केले होते. याच योजनेला वाढीव निधी म्हणून पुन्हा ३०,००० रुपये मंजूर केले.

१६) या भागातील अनेक प्रतिष्ठित लोकांना दुष्काळामुळे दारिद्र्य आले होते; परंतु प्रतिष्ठेपायी हे लोक दुष्काळी कामावर जात नव्हते. त्यासाठी महाराजांनी १५,००० रुपये तगाई म्हणून मंजूर केले.

१७) पशुधन वाचावे म्हणून गवत खरेदीसाठी तगाई म्हणून आणखी १५,००० मंजूर केले.

१८) अनाथ मुलांची दुष्काळात खूपच वाईट अवस्था होते. त्यामुळे या भागातील अनाथ मुलांना सोनगडच्या बोर्डिंगच्या स्कूलमध्ये दाखल करावे असे आदेश महाराजांनी अधिकाऱ्यांना दिले. त्यामुळे अनेकांची सोय झाली.

१९) संपूर्ण संस्थानात दुष्काळ निवारणासाठी अंदाजे किती पैसे लागतील याची माहिती महाराजांनी अधिकारी वर्गांकडून घेतली. अधिकाऱ्यांनी ४० लाख रुपये मंजूर करण्यास

सांगितले; परंतु महाराजांनी पैसे कमी पडू नयेत म्हणून ५० लाख रुपये मंजूर केले. महाराजांच्या दातृत्वाची यावरून पुरेपूर कल्पना येते.

२०) बडोदा संस्थानातील महत्त्वाचे धरण म्हणून ओरसंग नदीवरील सिंचन प्रकल्प महाराजांनी मंजूर केला होता. महाराजांनी या प्रकल्पाची पायाभरणी संखेडा येथे केली. यावेळी महाराजांनी केलेले भाषण मोठे उद्बोधक आणि सर्व प्रजेला दुष्काळात दिलासा देणारे आहे.

२१) ओरसंग नदीवरील सिंचन प्रकल्पासाठी १ लाख रुपये मंजूर केले. या प्रकल्पामुळे २०,००० बिघे जमीन ओलिताखाली येणार होती. या धरणाचा मुख्य कालवा १३ मैलांचा असेल, एक उपकालवा ५ मैलांचा आणि दुसरा उपकालवा १२ मैलांचा असेल असे महाराजांनी आपल्या भाषणात सांगितले. यावरून महाराजांच्या दातृत्वाची आणि दुष्काळात करत असलेल्या कामांची कल्पना येते.

२२) राज्याच्या ज्या भागात मोठ्या प्रमाणावरचे सिंचन प्रकल्प करणे शक्य नाही; मात्र विहिरी खोदणे व्यवहार्य आहे अशा ठिकाणी त्या मोठ्या प्रमाणावर खोदल्या जाव्यात यासाठी दोन लाख रुपयांचा स्वतंत्र निधी महाराजांनी राखून ठेवला होता.

महाराजांनी अशा प्रकारे वेगवेगळ्या भागांना भेटी देऊन त्या-त्या भागातील लोकांना दुष्काळात मदत केली. लोकांच्या हाताला काम दिले. यातून दोन गोष्टी साध्य झाल्या. त्यामधील एक म्हणजे लोकांना सन्मानाने जीवन जगता येऊ लागले. दुसरे म्हणजे लोकांकडून कामे करून घेतल्यामुळे या कामांचा उपयोग भविष्यासाठी होऊ लागला. दुष्काळात होरपळत असलेल्या लोकांना मदत करून बडोदा राज्याच्या प्रमुखाची भूमिका ही अंतिमत: मानवी भावनेतून आणि माणसांविषयीच्या खुल्या दृष्टिकोनातून प्रेरित आहे हे सिद्ध केले.

सयाजीराव महाराज हे दातृत्वासाठी नेहमी तयार असत; परंतु ते दान देताना त्यांनी नेहमी गरज पाहून दान दिले. या भयंकर पडलेल्या दुष्काळात त्यांनी याबाबत जास्त विचार करत समाजात ज्यांना-ज्यांना दुष्काळाची झळ बसलेली आहे, त्यांना मदत केली. महाराज अशा गरजवंतांना दान देण्यास नेहमीच उत्सुक असत.

महाराजांनी या दुष्काळात ओरसंग नदीवर सिंचन प्रकल्प उभारण्याचे नियोजन केले. या प्रकल्पाच्या संखेडा या ठिकाणी झालेल्या समारंभात केलेले भाषण प्रजेला आधार देणारे होते. या भाषणातून महाराजांनी दुष्काळात केलेले दान हे किती सत्पात्री होते हे लक्षात येते.

सद्गृहस्थहो,

आजच्या कामास सुरुवात करण्यापूर्वी मला एक गोड काम करावयाचे आहे. ते म्हणजे मुख्यत: ज्यांच्या श्रमाने व हुशारीमुळे या कामास सुरुवात झाली त्या आपल्या अंमलदाराचे आभार मानणे हे होय. या कामाची कल्पना प्रथम सुचविल्याबद्दल रा. खासेरावांचा मी आभारी आहे. या स्थळी या दुष्काळी कामाची शक्यता कशी आहे हे त्यांच्या सूक्ष्म व खोल दृष्टीने हेरले त्याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत (टाळ्या). ज्या इंजिनिअरांनी उत्साहाने व नेटाने या कामाची

पुढची रूपरेषा आखली त्यांचेही आभार मानणे युक्त होईल. त्यांच्या पेशास शोभणाऱ्या बुद्धीला या सुंदर व व्यवहार्य कल्पनेला मूर्त स्वरूप देता आले. त्यांचे उदाहरण खरोखर अनुकरणीय आहे. ज्यांना ही कल्पना प्रथम सुचली व पुढे तिचा तपशील ज्यांना मांडता आला, त्यांना तिची पूर्तताही उत्तम रीतीने करता येईल व हे काम चांगल्या रीतीने पूर्ण केल्याबद्दल त्यांचे पुन्हा एकदा आभार मानण्याचा मला प्रसंग येईल अशी खात्री वाटते. (टाळ्या).

दुष्काळी म्हणून आंरभिलेले हे काम बरेच महत्त्वाचे आहे. कारण तात्कालिक मदत देण्याखेरीज या कामाचे आणखीही हितकर परिणाम होतील अशी माझी अटकळ आहे. देशावरील आजच्या भयंकर आपत्तीचे व तिच्या भावी परिणामांचे निवारण करण्यासाठी अशी कामे विशेषच उपयुक्त असतात. प्रस्तुतचा दुष्काळ हा माणसे, गुरेढोरे व शेती यांचा अमानुष संहार करणारा आहे. या अवर्षणामुळे सर्व जमीन जणू काय भयंकर शाप मिळाल्याप्रमाणे कोरडी ठणठणीत पडली असून शेतीची निर्जीव साधनेच नव्हेत तर पुष्कळ सजीव साधनेही नष्ट झाली आहेत. वर्तमानकाळाप्रमाणे भविष्यकाळही कंगाल होतो की काय अशी भीती वाटत आहे. या सर्वांहून अधिक विशेष म्हणजे हा दुष्काळ हा एक दैवी इशाराच आहे असे वाटते. कारण जिच्यावर राज्याची प्रगती व राज्यकारभाराची सारी मदार, ती लोकांची आर्थिक परिस्थिती यापुढे अत्यंत हलाखीची राहणार असा तिचा अर्थ आहे. हा आर्थिक हलाखीचा महत्त्वाचा प्रश्न तुम्ही ताबडतोब हाती घेतला पाहिजे असे हा दुष्काळ लोकांना व सरकारला स्पष्ट बजावीत आहे. अज्ञानाने किंवा आळसाने या कामी दिरंगाई झाली तर कुचंबणा, अधोगती व नाश यामध्ये तिचे पर्यवसान होईल.

अशी आपत्ती दत्त म्हणून पुढे उभी राहताच आपद्ग्रस्तांना मदत करणे हे सरकारचे पहिले कर्तव्य होय. कारण स्वत:चे क्षेमकुशल रयतेच्या क्षेमकुशलात सामावलेले आहे ही जाणीव सरकारला असतेच. इतर व्यापक विचार बाजूस ठेवून या एकाच दुष्काळी प्रश्नाचा आपण विचार केला तर हा प्रश्न सोडविण्याचे भिन्न भिन्न मार्ग आपल्याला दिसू लागतात. पुष्कळ वेळा असे होते की, प्रासंगिक मदत करण्याच्या भरात अधिकारी वर्ग दूरवर विचार करीत नाही. फक्त तोंड देण्याची ज्यांची काहीच तयारी नसते अशा अधिकाऱ्यांत तर हा दृष्टीचा कोतेपणा विशेषच संभवतो.

अशा चुका टाळण्यासाठी आपल्याला दोन गोष्टी उपयोगी पडतात. एक सार्थकी लागलेला अनुभव किंवा सुबुद्ध व सशास्त्र रीतीने कामकाज करण्याची उत्कट वृत्ती. या दोहोंपैकी पहिलीचा, म्हणजे इतक्या भयंकर दुष्काळाचा आपणास अनुभव नाही. या सुपीक प्रदेशात एवढा भयंकर दुष्काळ पडल्याचे गेल्या एक-दोन पिढ्यांच्या लोकांना तरी आठवत नाही; पण ती दुष्काळाच्या अनुभवाची उणीव त्यातल्या त्यात आपले अभिनंदन करून घेण्यासारखीच गोष्ट आहे.

परंतु अशा सुपीक प्रदेशातल्या अधिकाऱ्यांनी दुसऱ्या कमी भाग्यशाली प्रदेशाला येणारे अनुभव काळजीपूर्वक अभ्यासावे हे विशेष उचित होय. अशा आपत्तीच्या स्वरूपाचा दूरदर्शीपणाने व पंडिती दुराग्रह सोडून अचूक अंदाज बांधता आला पाहिजे. नंतर त्या

अंदाजानुसार त्यांनी आपल्या योजना तयार करून प्रसंगानुसार त्यात फेरबदल केला पाहिजे. दुष्काळ निवारणाच्या सर्व प्रकारच्या योजनांची नीट शहानिशा करून, त्याचा तरतमभाव ठरवून, भावी कालात सुपरिणामी होतील अशाच योजनांचा प्रामुख्याने पुरस्कार करणे इष्ट होय.

राज्यातील जबाबदार अधिकाऱ्यांनी असल्याप्रसंगी केवळ गतानुगतिक होता कामा नये. तसेच वरवर काम करून ते कसेबसे पुरे करण्याची घाईही करू नये. प्रसंग काय आहे हे पाहून अमलात आणावयाचे एक सामान्य धोरण ठरविले पाहिजे, वस्तुस्थितीशी त्यांचा मेळ बसवून पाहिला पाहिजे आणि विधायक व सुपरिणामकारक सूचना करण्याची त्याची नेहमी तयारी पाहिजे. या गुणांना अनुभवाची जोड मिळाली म्हणजे शक्य तितकी सुरळीत व चोख अशी कार्यपद्धती निर्माण होण्यास मदत होते.

दुष्काळी कामाचे त्यांच्या परिणामानुसार तीन वर्ग करता येतील, पहिल्या वर्गात तात्कालिक मदतीसाठी योजिलेल्या उपायांचा समावेश होतो. या वर्गातील कामाचा अर्थात एका ठराविक मर्यादेपर्यंत उपयोग असतो. उदाहरणार्थ, कंगालखाने उघडणे, निर्वाहापुरते धान्य देणे, आगाऊ पैसे देणे इत्यादी कामे या वर्गातली होत. ज्यांना कुठल्या तरी कारणाने काहीही काम करता येत नाही अशांचे प्राण वाचविण्यास असल्या कामाचा उपयोग होतो. सामान्य भूतदयेचा प्रश्न जरी बाजूला ठेवला तरी नागरिकांचे प्राण, विशेषत: कामकरी वर्गाचे प्राण ही समाजाची संपत्ती होय; परंतु ज्या ठिकाणी असल्या योजना आवश्यक व फायदेशीर नाहीत, त्या ठिकाणी अधिक फलदायक अशा दुसऱ्या काही योजना हव्यात.

दुसरा वर्ग म्हणजे अप्रत्यक्षरीत्या फलदायी होणाऱ्या कामांचा. उदाहरणार्थ, नवीन दळणवळणाचे मार्ग व त्यातल्या त्यात महत्त्वाचे जे रेल्वेरस्ते ते तयार करविणे. दुष्काळ निवारण्याच्या दृष्टीने पाहता, रेल्वेचे जाळे पसरणे निव्वळ फायद्याचे आहे की नाही, याविषयी बराच वाद आहे. कारण त्यामुळे एका प्रांतातले शिलकी धान्य जागच्या जागीच राहण्याऐवजी परप्रांतात नेले जाते. उलट असेही दाखविता येईल की, रेल्वेमुळे दुसरीकडचे जिन्नस आपल्याही प्रांतात आणले जातात. या प्रश्नाचा साधकबाधक विचार करून न्यायत: असे म्हणता येईल की, दुष्काळाच्या काळात रेल्वेमुळे दुष्काळग्रस्त क्षेत्र वाढते मात्र खास. त्याचा परिणाम फारसा जाचक झाला नाही तर गोष्ट निराळी.

परंतु एकंदरीत रेल्वेचा व्यापारोद्योगाला कल्पनेबाहेर उपयोग होतो खरा. म्हणूनच रेल्वेकामाची गणना यथार्थ रीतीने दुष्काळी कामात करता येते. कारण देशाच्या भावी अभिवृद्धीला याचा उपयोग होतो. तरीपण देश आळसातून जागा होऊन नवीन उद्योगधंदे काढीपावेतो त्याचा पूर्ण उपयोग करून घेता येत नाही हेही खरे.

तिसऱ्या वर्गातली कामे म्हणजे जी तात्काल आपत्ती निवारण करू शकतात व त्याबरोबरच पुढचे दुष्काळही थांबवितात ती होत. वाहतुकीची साधने जिन्नस इकडचा तिकडे नेऊन पोहोचवितील; पण पोहोचवायला जिन्नसच नसला तर त्याचा काही उपयोग होत नाही; परंतु पाटबंधाऱ्याची कामे, विहिरी खणणे, धरणे बांधणे, कालवे काढणे ही कामे एकदम पिके तर

वाढवितातच; पण भावी दुष्काळाचाही परिहार करतात. म्हणून या वर्गातील सर्व कामात ही कामे अतिशय महत्त्वाची होत. विहिरी खणण्याकरिता तगावी देणे फारच इष्ट आहे, कारण तीत सरकारची मदत व शेतकऱ्यांचे स्वावलंबन याचा मिलाफ दृष्टीस पडतो; परंतु याहूनही मोठी व अधिक फलदायी कामे असू शकतात. आज मी चालू करीत आहे तो कालवा याच सदरातले कार्य आहे. कडी प्रांतात कादरपूरला मोठा जलाशय करण्याचे असलेच दुसरे काम आहे व असली आणखी काही कामे मी योजून ठेविलीही आहेत. ज्या ठिकाणी असली पाटबंधाऱ्याची कामे शक्य नाहीत; पण विहिरीच खणणे हितावह आहे, तेथे विहिरी खणण्याचे ठरविले असून त्याकरिता सरकार प्रतिवर्षी दोन लाख रुपये काढून ठेवीत आहे. लोक त्याचा फायदा घेतील अशी मला अशा आहे.

आपद्ग्रस्तांना मदत करण्याच्या कामी सरकारने मुळीच मागेपुढे पाहिले नाही. सर्वप्रकारे यथाकाल यथायोग्य साहाय्य केले आहे. दुष्काळग्रस्त प्रदेशात भरपूर कंगालखाने उघडले; ज्यांना सामाजिक दर्जामुळे किंवा अन्य सबळ कारणांनी दुष्काळी कामावर जाणे शक्य नाही अशांना मुक्तहस्ताने द्रव्यसाहाय्य केले; गुरांचा संहार थांबविण्याचा प्रयत्न केला; लोकांना विहिरी खणण्याकरिता व अन्य कामाकरिता तगाई म्हणून रकमा दिल्या आणि सबंध तालुकेच्या तालुके ज्याचा शेतासाठी सदैव उपयोग करून घेऊ शकतील असे हे धरण आज सरकारने बांधून दिले आहे.

सरकार सर्व काम उत्तम रीतीने करण्यास उद्युक्त झाले असून उत्कृष्ट कारभाराबरोबरच लोकांचे कल्याण साधण्याचा त्याचा उद्देश त्यात दिसून येतो. जुजबी तपशिलात काही चुका झाल्या असल्यास त्या सुधारल्या जात आहेत व पुढेही सुधारल्या जातील.

असल्या कामामुळे लोकांकडून साहजिकच आदर व स्तुती प्राप्त होते खरी; परंतु अधिकाऱ्यांनी असल्या स्तुतीने अंध बनू नये, तर अधिक चिरस्थायी व फलदायक उपायांची योजना केल्याखेरीज ती स्तुती फार वेळ टिकू शकणार नाही, हे ध्यानात धरावे.

आल्या संकटांचा परिहार करण्याकरिता योजलेल्या उपायांचे एवढे वर्णन पुरे; परंतु येथेच थांबून या दुष्काळाने जाणीव करून दिलेल्या दुसऱ्या मोठ्या परिस्थितीकडे आपण डोळेझाक केली, तर आपण असमंजस ठरू. कारण वरील उपायांनी फार तर आजचे संकट टळेल; पण संकटाचे मूळ नाहीसे होणार नाही. ते मूळ जर वाढू दिले, तर मोठमोठ्या वैभवसंपन्न सरकाराची विपुल साधनेही ते पुढे खणून काढण्यास कमकुवत ठरतील.

आपल्या लोकांत कोणतेही त्राण उरले नाही याचे कारण काय? एका वर्षी पाऊस पडला नाही तर सर्वत्र हाहाकार उडाला व लाखो लोकांना सरकारच्या आश्रयावर राहणे भाग पडले. असल्या दु:स्थितीची कारणे काय व ती निर्मूल होणार कशी? अधिकाऱ्यांनी विचार करण्याचा हाच मोठा प्रश्न आहे.

या स्थळी मला जरी बारीकसारीक कारणांची चर्चा करता आली नाही, तथापि त्यांच्या मथितार्थाबद्दल कोठे वाद नाही. लोकांचे दारिद्र्य हेच खरे कारण आहे. एका ठिकाणच्या

पिकाचा हंगाम व्यर्थ गेल्यास वाहतुकीच्या साधनांनी अन्य ठिकाणांहून जीवनोपयोगी वस्तू आणता येतात; परंतु त्या विकत घेण्यास पैसाच नसला तर त्यांचा काय उपयोग? हिंदुस्थानात सर्वत्र अठराविश्वे दारिद्र्य. याच्याच जोडीला आपल्या स्वभावाचे दोषही (कदाचित दारिद्र्य हे अंशत: या दोषांचा परिणाम किंवा अंशत: कारणही असेल) सांगितले पाहिजेत. उदाहरणार्थ, मितव्ययाचा अभाव, उद्योगाची व धाडसाची वाण, वाजवी महत्त्वाकांक्षेची व उच्च ध्येयाची उणीव, निष्क्रियता, दैववाद आणि संकटकालीही सुस्तपणा हे आपले दोष पाहा. ही स्थिती पालटल्याखेरीज, लोकांना स्वावलंबन आल्याविना, चालू दु:स्थिती दूर न होता वाढतच जाणार. अनेक वेळा लोकांत मिसळून त्यांच्याशी मी संभाषण केले आहे. केव्हा राजवाड्यात तर केव्हा त्यांच्या कामाच्या ठिकाणी, केव्हा एकट्यादुकट्याशी तर केव्हा पुष्कळांशी, मी वेळोवेळी विचारविनिमयही केला आहे. कदाचित माझ्या उच्च दर्जामुळे त्यांनी आपली अंत:करणे मजजवळ उघडी केली नसतील म्हणून सर्व दर्जाचे अधिकारी व इतर मंडळी यांच्याकडूनही लोकांच्या भावनांचा पडताळा मी घेतला आहे. त्या सर्वावरून लोकांची असहायता व निष्क्रियताच मला कळून आली आहे. त्यांची सारी उमेदच खचलेली दिसते. संकटाला तोंड देऊन त्याचा परिहार करणे त्यांच्या स्वभावालाच मानवेनासे झाले आहे.

या दारिद्र्याचे स्वावलंबनशून्यतेप्रमाणे आणखीही एक कारण आहे. हिंदुस्थानच्या लोकांचे जीवित दोन गोष्टींवर अवलंबून आहे. सुशिक्षितांचे सरकारी नोकरीवर व अशिक्षितांचे शेतीवर. याच्या कारणांची मीमांसा येथे नको; पण वस्तुस्थिती मात्र अशी आहे. आता एक गोष्ट निश्चित की, हिंदुस्थान, रशिया यांच्यासारखे केवळ कृषिप्रधान देश हे दुष्काळाच्या तावडीतून पूर्णपणे सुटणे कधीच शक्य नाही. पाश्चिमात्य देशांचे वैभव त्यांच्या उद्योगधंद्यावर अवलंबून आहे आणि म्हणून त्यांना मात्र अशा दुष्काळाची भीती नसते. इंग्लंडमध्ये पाहा. लँकेशायर, मँचेस्टर यासारखे प्रांतचे प्रांत केवळ धंद्याला वाहिलेले आहेत. गावेच्या गावे एकेका विशेष धंद्याची आहेत. हे प्रांत आणि ही गावे हाच इंग्लंडच्या वैभवाचा आधार आहे. त्यांच्याच संपत्तीने इंग्लंडला आपले अन्न परराष्ट्रातून विकत आणता येते व पर्जन्याच्या कृपेची किंवा अवकृपेची अवहेलना करता येते.

परंतु हिंदुस्थानला मात्र कितीही इच्छा असली तरी इंग्लंडप्रमाणे केवळ धंद्यांचा अवलंब करता येणार नाही. तथापि, एकट्या शेतीच्या पायी आज आपण देशाची सर्व शक्ती सर्वस्वी जी वाहत आहोत ती परिस्थिती बदलली पाहिजे. दारिद्र्यातून वर येऊन जगातील मोठमोठ्या व्यापारी राष्ट्रांच्या पंक्तीला बसणाऱ्या जर्मनी व जपान या राष्ट्रांचीच उदाहरणे आपणाला या कामी उद्बोधक होतील.

या दुष्काळाच्या आपत्तीपासून आपण एक शिकावयाचे की, आता शक्यतोवर व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ करावयाची. ती अनेक तऱ्हेने करता येईल. उदाहरणार्थ, नवीन उपक्रमांना सर्व प्रकारचे उत्तेजन द्यावे; ज्या ठिकाणी आवश्यक त्या ठिकाणी संरक्षण व मदत धंद्यांना द्यावी. आरंभा-आरंभाला अशा प्रकारचे संरक्षण काही उद्योगधंद्यांना हवेच. ही सुरक्षितता अर्थात ते धंदे

स्वयंपूर्ण होईपावेतोच द्यावी लागते. इतर देशांचे ज्ञान व विज्ञान यांचा फायदा हिंदुस्थानने घ्यावा. देशातल्या देशात किंवा देशाबाहेरही जनतेने नवी वसती करावी. त्यालाही माझे उत्तेजन आहे.

तथापि सरकारने कितीही उत्तेजन दिले किंवा हवे ते साहाय्य केले, तरी लोकांनी स्वत:च स्वत:ची उन्नती केल्याविना ते सर्व व्यर्थ आहे. उपदेशाचे व अनुभवाचे शिक्षण हेच सर्वांत उत्तम शिक्षण आहे; परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, हिंदुस्थानातले सुशिक्षितही अशिक्षितांइतकेच असहाय व निष्क्रिय बनतात. कारण त्यांची दृष्टी केवळ सरकारी नोकऱ्यांवर खिळलेली असते. सुशिक्षित वर्गाने परावलंबनाची ही बंधने तोडली पाहिजेत. त्याने आत्मविश्वासाने व स्वपराक्रमाने नवीन नवीन मार्ग काढले पाहिजेत, तरच काही सुधारणा होऊ शकेल. ज्या वेळेला सुशिक्षितवर्ग आत्मविश्वासाने व धाडसाने नवीन नवीन मार्ग काढील व त्याला सरकारची मदत व उत्तेजन मिळू लागेल, तेव्हाच एका नवीन युगाला सुरुवात होऊन आजच्यासारखे आपत्तीचे प्रसंग म्हणजे केवळ जुन्या पुराण्या व अशक्य अशा प्रकारच्या गोष्टी वाटू लागतील. *(भाषण क्र. १८)*

## महाराजांनी दुष्काळात केलेली मदत

महाराजांनी बडोदा संस्थानात ज्या-ज्या वेळी दुष्काळ पडला त्यावेळी प्रजेला खूप मदत केली. त्यांनी यासाठी केलेल्या मदतीबद्दल बडोदा संस्थानच्या प्रशासकीय अहवालात नोंदी आल्या आहेत. त्या नोंदी पुढीलप्रमाणे

### २) इ.स. १९०२-०३ आणि १९०३-०४

गुजरात राज्यात दुष्काळाचा सामना करण्याची शक्ती होती म्हणून मुंबई विभागाने १८७७-७८ मध्ये पडलेल्या भयंकर दुष्काळानंतर तयार केलेल्या दुष्काळी भागातून गुजरातचे नाव वगळले होते; परंतु १८९९ मध्ये हा भाग 'भारताचा बगिच्याचा प्रदेश' या गैरसमजातून बाहेर आला. या भागालासुद्धा वेदनांचा संसर्ग झाला. ऑगस्ट १८९९ ते डिसेंबर १९०२ या तीन वर्षांत लोकांना चांगले पीक मिळाले; परंतु १९०४ मध्ये पावसाने पुन्हा दडी मारली. आता पावसाची आशा करणे व्यर्थ होते. पावसाविना असेच वर्ष वाया गेले. दक्षिण-पूर्व दिशेकडून येणाऱ्या मान्सूनकडे सरकारचे डोळे लागले होते. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंतही पाऊस पडला नाही. सगळी पिके जळून गेली. सप्टेंबर १९०४ च्या शेवटपर्यंत सगळीकडे सरासरीपेक्षा खूप कमी पाऊस झाला. मागील दुष्काळाच्या अनुभवाचा आधार घेऊन सयाजीराव महाराजांच्या सरकारने सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यास सुरुवात केली. येऊ घातलेल्या संकटाचा सामना करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली.

पावसाची कमतरता, अन्नधान्याच्या किमतीमध्ये वाढ व दुष्काळ यामुळे संस्थानावर पुढील दुष्परिणाम झाले. १) खाजगी दानधर्म कमी झाल्यामुळे गरिबांचे हाल होऊ लागले, २) खाजगी विश्वासावर चालणाऱ्या व्यवहारांमध्ये घट झाली, ३) धान्याच्या व्यापारात फसवाफसवी करणाऱ्या घटनांमध्ये वाढ झाली, ४) गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ झाली, ५) गवत, चारा व कुरणांच्या शोधात जनावरांची विनाकारण धावपळ सुरू झाली, ६) लोकांची भटकंती सुरू

झाली. महाराजांचे याकडे बारीक लक्ष होते. त्यांनी राज्याचे महसूलमंत्री आर.सी. दत्त यांच्या मार्गदर्शनाखाली दुष्काळ निवारण कार्य करण्यासाठी मनुभाई मेहता यांची दुष्काळ आयुक्त म्हणून नेमणूक केली.

सयाजीराव महाराजांनी अधिकारी वर्ग आणि राजपुत्रांच्या मार्फत दुष्काळात नुकसान झाल्याची माहिती जमा केली. त्यावर तातडीने उपाययोजना सुरू केल्या. महाराजांनी या दुष्काळात प्रजेला उदारहस्ते मदत केली. त्यातील ठळक बाबी पुढे दिल्या आहेत.

१) सयाजीराव महाराजांचे सरकार दरवर्षी विहीर पुनर्भरण करण्यासाठी १ ते २ लाखांची तरतूद करते. हा निधी शेतकऱ्यांना सोप्या पद्धतीने, परतफेडीच्या सोयीच्या मार्गांसह व सहज परताव्यासह उपलब्ध करून दिला जात असे. परतफेडीचा काळही ३० वर्षांपर्यंतचा दिला जात असे.

२) यावर्षी दुष्काळ असल्यामुळे १,००,००० रुपये कडी प्रांतासाठी ५०,००० रुपये अमरेली साठी चालू वर्षातील अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आले होते. या व्यतिरिक्त दुष्काळामुळे कडीसाठी ५०,००० रुपये, अमरेलीसाठी  ५०,००० रुपये आणि ओखामंडलसाठी १७,००० रुपयांप्रमाणे अतिरिक्त निधीसुद्धा देण्यात आला. यातील बहुतांश रक्कम वाटप करण्यात आली व उर्वरित रक्कम नजीकच्या काळात देण्यात येणार होती. यामुळे हजारो शेतकऱ्यांना आपल्या शेतांमध्ये विहिरी बांधता आल्या, पुनर्भरण करण्यात आल्या. रबी पिकांसाठी, कुटुंबासाठी व जनावरांसाठी सुद्धा काही रक्कम वापरता आली.

३) ओखामंडल येथील विहीर पुनर्भरण कामासाठी १,५०० मजूर तैनात करण्यात आले होते.

४) बी-बियाणे खरेदी करणे, विहिरींसाठी सोल, मोट इ. व इतर शेती उपकरणे व औजारे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर अग्रीम देण्यात आला होता. एकट्या अमरेली जिल्ह्यासाठी बियाणांच्या खरेदीसाठी ६०,००० रुपये, तर पशुधनाच्या देखभालीसाठी २५,००० रुपये मंजूर करण्यात आले. याच कारणांसाठी कडी जिल्ह्याला मोठी रक्कम मंजूर करण्यात आली होती. त्यामध्ये ५०,००० रुपये बियाणांसाठी व ३०,००० रुपये शेती उपकरणे व औजारे खरेदीसाठी मंजूर करण्यात आली होती. बडोदा जिल्ह्यासाठी सुद्धा आवश्यक ती तरतूद करण्यात आली होती.

५) मागील वर्षांचे दुष्काळातील अनुभव संस्थानाच्या पाठीशी असल्याने यावर्षी काही ठिकाणे वगळता बडोदा सरकारला चारा दुष्काळाचा सामना करावा लागला नाही. त्यामुळे चारा कर्जासाठी अतिशय कमी रकमेची गरज भासली. कडीसाठी ५०,००० रुपये तर अमरेली आणि ओखामंडलसाठी २०,००० रुपये मंजूर करण्यात आले. जनावरांचे मृत्यूचे प्रमाण लक्षात घेता बैलांच्या खरेदीसाठी कडी जिल्ह्याला ३५,००० रुपये तर अमरेलीसाठी १६,००० रुपये मंजूर करण्यात आले. चारा खरेदीसाठी अमरेली व ओखामंडलला मंजूर केलेल्या निधीप्रमाणेच बडोदा जिल्ह्यातील पेटलाद आणि पाद्रा तालुक्यांना निधी मंजूर करण्यात आला होता.

६) या वर्षी दुष्काळ पडूनसुद्धा अन्नधान्याच्या किमती वाढल्या नाहीत. दुष्काळ पडल्यानंतरच्या काही आठवड्यांमध्ये नेहमीच्या किमतीपेक्षा अन्नधान्याच्या किमती २५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढल्या नव्हत्या. तेव्हापासून त्या स्थिर होत्या. धान्य बाजारातही काही गैरप्रकार घडले नाहीत. या सकारात्मक परिस्थितीमुळे सरकारला अनेक नोकरांना टंचाई भत्ता देण्याची व मोठ्या रकमा देखभलीसाठी देण्याची गरज भासली नाही. तरीसुद्धा तातडीची उपाययोजना करता यावी तसेच देखभाल निधी म्हणून कडी प्रांतासाठी २८,००० रुपये मंजूर करण्यात आले. २०,००० रुपये अमरेलीसाठी म्हणून, तर बडोदा आणि ओखामंडल तालुक्याला प्रत्येकी १०,००० रुपये देण्यात आले.

७) विणकर, कुंभार, सुतार आणि लोहार या कारागिरांना दुष्काळाची झळ जास्त जाणवत होती. दुष्काळात त्यांना काम मिळत नाही व संपूर्ण परिवारावर उपासमारीची वेळ येते. त्यामुळे त्यांना सरकारने मदत केली तर ते सरकारला दुष्काळ निवारणासाठी लागणाऱ्या खूप वस्तू देऊ शकत होते. दूरच्या बाजारातून कमी प्रतीचा कपडा मागवण्यापेक्षा स्थानिक विणकरांनी विणलेल्या कापडाचे गणवेश दुष्काळी काम करणाऱ्या मजुरांसाठी टिकाऊ आणि आरामदायी ठरतात. या दुष्काळात कारागिरांचे हाल होऊ नयेत म्हणून विशेष कर्ज देण्यात आले. कडी येथील कारागिरांसाठी ६,००० रुपये व अमरेली आणि ओखामंडल येथील कारागिरांसाठी ५,००० रुपये मंजूर करण्यात आले.

८) या दुष्काळात पिण्याच्या पाण्याची फारच टंचाई भासली. विहिरींमधील पाण्याची पातळी फारच खालावली होती. पाणीटंचाई व लवकरात लवकर उपाय करण्याची गरज होती. वर्षामागून वर्ष पडणारा दुष्काळ व कमी पावसामुळे जमिनीखालच्या पाण्याची पातळी घटली होती. त्यामुळे दुर्गम भागातील गाव व दूरदूरच्या ठिकाणांच्या वस्त्यांसाठी सुद्धा पाण्याची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक होते. दुष्काळ आयुक्तांनी विविध तालुक्यांमधून पाणी पुरवठ्यासंबंधी माहिती मागवली. जिल्हाधिकाऱ्यांकडे यासाठी मोठी रक्कम देण्यात आली होती. विहिरी जमिनीत अगदी खोलवर खोदण्यासाठी लागणारी अवजारे युरोप आणि अमेरिकेहून मागवण्यात आली. राज्य सरकारच्या खर्चाने तात्पुरती तळी बांधणे, नदीच्या पात्रांचे खोलीकरण व पाण्याच्या टाक्या बांधण्याचे काम करण्यात आले. गुरांसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मोठ्या विहिरींमध्ये पाण्याचा उपसा करण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे सयाजीराव महाराजांनी कडीसाठी ५०,००० रुपये, नवसारीसाठी २०,००० रुपये, बडोद्यासाठी ५०,००० रुपये व अमरेलीसाठी १०,००० रुपये पाण्याची व्यवस्था करण्यासाठी दिले.

९) सयाजीराव महाराजांचे दुष्काळ निवारणातील पुढचे काम म्हणजे वृद्ध, अपंग निराधार व अनाथांना सर्व प्रकारची मदत करणे. कुटुंबातील कमी होणारी कमाई व दानधर्मातील कमतरता यामुळे सरकारवर ही जबाबदारी येऊन पडली होती. दुष्काळात गावागावांमध्ये अनाथालय व गरीबगृह उघडणे क्रमप्राप्तच होते. हे अनाथाश्रम उघडण्यासाठी कडी जिल्ह्याला १,००,००० रुपये तर अमरेली व बडोदा जिल्ह्यांसाठी प्रत्येकी २०,००० रुपये देण्यात आले. अनाथ व

आई-वडिलांनी टाकून दिलेल्या मुलांसाठी असलेले अनाथालय व संस्था ज्या इ.स. १८९९ मध्ये सुरू करण्यात आल्या होत्या त्या शिक्षण विभागाकडे सोपवण्यात आल्या होत्या. या धर्मादाय संस्थांमध्ये सगळ्या निराधार व अनाथ लोकांची सोय करण्यात आली. महिलांच्या बाळंतपणासाठी असणाऱ्या दवाखान्यांना; पण मागील दुष्काळापासून या योजनेत सामावून घेण्यात आले. सुधारित दुष्काळ निवारण कायद्यात त्यांना मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे त्यांच्यापर्यंत मदत देणे सोपे झाले होते.

१०) दुष्काळ निवारण प्रशासनातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे लोकोपयोगी कामे. कडी, अमरेली आणि बडोदा जिल्ह्यातील कामे महाराजांनी मंजूर केल्याप्रमाणे व मंत्रिमंडळाने आदेश दिल्याप्रमाणे संस्थानाच्या अत्युच्च अधिकाऱ्यांनी पूर्ण केली. तातडीने लागणाऱ्या कामांचीही पूर्ण तयारी करून ठेवण्यात आली होती. मागील अनुभवातून धडे घेऊन या वर्षीचा दुष्काळ निवारण कार्यक्रम संस्थानात व ब्रिटिशव्याप्त भागात राबविण्यात आला. मागील दुष्काळात सुरू झालेली कामे पूर्ण करणे यासाठी प्राधान्य देण्यात आले व अतिशय निकड असणारी दुष्काळ निवारणाची कामे अगोदर सुरू करण्यात आली होती. रस्तेबांधणी, भूकंपरोधक कामे नव्याने सुरू करण्यात आली होती. कृषी उपयोगासाठी लागणारे पाण्याचे सरोवर, टाक्या, साठवण, धरणे व जलनिस्सारण व्यवस्थेच्या कामांवर अधिक भर देण्यात आला होता.

११) संस्थानातील काही भागांमध्ये कृषी सुविधांचा आभाव होता तर काही ठिकाणी वार्षिक प्रलयामुळे कृषी सुविधांचे नुकसान झाले होते. या भागांमध्ये शेतीची कामे आणि जलनिस्सारणाची कामे करण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले. त्यामुळे महाराजांनी निष्णात अभियंत्याची नेमणूक केली होती. खंडूभाई गुलाबजी देसाई यांनी बाँबे येथे प्रेसिडेन्सी इंजिनिअर म्हणून काम केले होते, त्यांना या कामासाठी पाचारण करण्यात आले होते. त्यांच्या अधिपत्याखाली एक विशेष कृषी विभाग उघडण्यात आला होता. त्यांच्या सल्ल्यानुसार आणि कृषी अभियंत्यांच्या मदतीने कृषी योजना सुरू करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये ओखामंडल येथील भीमगाजा जलाशय, जोजवा ओरसांग कामांना मदत करणारी बडोदा येथील अल्वा पाण्याची टाकी, अमरेली येथील शतरंज धरण, अमरेली येथील भंडारिया टाकी, दामनगर येथील धामेल टाकी, कोडीनार येथील पिचवी आणि शिंगौडा प्रकल्प, वडनगर, उम्टा, अनावडा येथील कालवे, थोल व काखहारी टाक्या (कडी जिल्ह्यातील), हरीज येथील बांध प्रकल्प या सगळ्या प्रकल्पांची तज्ज्ञांकडून बारकाईने निरीक्षण व तपासणी करणात आली. नवसारी येथील झनकारी व ताप्ती प्रकल्पाशिवाय कडी येथील साबरमती योजनासुद्धा या अभियंत्यांकडे व्यावहारिक मत घेण्यासाठी सोपविण्यात आली होती.

१२) कृषी योजनांनंतर संस्थानातील दुष्काळ निवारण कामांमध्ये रेल्वे बांधणीचा क्रमांक येतो. बडोदा संस्थानाला रेल्वेच्या लहान, लहान जाळ्यांनी जोडलेले असून ते फार उपयुक्त आहे. त्यामुळे दुष्काळात काम मागणाऱ्या बहुतांश लोकांना रेल्वे काम मिळू शकते. रेल्वे कामांवर होणाऱ्या खर्चातील मोठा भाग रेल्वेपूल बांधणे व इतर तांत्रिक काम करणाऱ्या मजुरांवर खर्च

करण्यात येतो. इतर रकमेतून रुळांची व रेल्वेला इतर आवश्यक असणाऱ्या सामग्रीची खरेदी करण्यात येते. यासोबतच गुजरातच्या वाळू भरल्या जमिनींवर धातूचे रस्ते बांधण्याचे कामही खूप खर्चिक आहे. त्यांच्या वार्षिक देखरेखीच्या कामाचा खर्च मीटर आणि नॅरो गेज रेल्वेंपेक्षाही जास्त असल्यामुळे शेवटी मीटर व नॅरो गेज रेल्वेच आर्थिक दृष्टीने परवडते हे महाराजांना माहीत होते, त्यामुळे त्यांनी या दुष्काळात नार-वासो लाईन, कडी जिल्ह्यातील बेचराजी, हरीज लाईन्स शिवाय विजापूर-वडनगर लाईन व अमरेली जिल्ह्यातील अमरेली-चिताड व जामनगर-द्वारका लाईन्सचा समावेश करून त्याची कामे करून घेतली. यामुळे अनेकांना रोजगार मिळाला.

१३) दुष्काळ निवारण कामांच्या निवडीचा शेवटचा टप्पा म्हणजे अतिशय मागासलेले जिल्हे, गावे जिथे आदिवासी व पददलित समाज मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास होता. मागासलेल्या समाजातील अशा लोकांचे जीव वाचवण्यासाठी या वर्षीच्या दुष्काळ निवारण कामाअंतर्गत गावागावात पाण्याच्या टाक्या उपलब्ध करून देण्यात आल्या. मान्सून सुरू होताच शेतकऱ्यांना या टाक्यातील पाण्याचा शेतीसाठी सुद्धा उपयोग करता येणार होता. प्रत्येक टाकीतील जादा पाणी दुसऱ्या टाकीत टाकण्याची सोय करण्यात आली होती. हे महाराजांच्या दूरदृष्टीचे द्योतक होते.

१४) यावर्षीच्या दुष्काळ निवारण कार्यक्रमासाठी एकट्या कडी जिल्ह्यात लोकोपयोगी कामांसाठी ९,७०,००० रुपये, स्थापत्य कामांसाठी ३,३३,००० रुपये असे एकूण १३ लाख रुपये मंजूर करण्यात आले. त्यानंतर अमरेली जिल्ह्यातील लोकोपयोगी कामांसाठी ४,००,००० रुपये, स्थापत्य कामांसाठी २,००,००० रुपये तर ओखामंडलसाठी खास ७०,००० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. बडोदा जिल्ह्यासाठी २,६५,००० रुपये त्यापैकी १,६८,००० रुपये लोकोपयोगी कामांसाठी मंजूर करण्यात आले होते. शेवटी, या संकटातून सुटलेल्या अशा एकमेव नवसारी जिल्ह्याला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी ४०,००० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. अशा प्रकारे या वर्षीच्या दुष्काळाचा सामना करण्यासाठी महाराजांनी सढळ हस्ते २२,७०,००० रुपयांचा निधी मंजूर केला.

१५) या दुष्काळातील आणखी एका बाबींची येथे नोंद घेणे महत्त्वाचे आहे ती म्हणजे जमीन महसुलाची वसुली. वरती नमूद केलेल्या दुष्काळी परिस्थितीला अनुसरून महसूल वसुलीबाबत मानवतेच्या भावनेतून विचार करण्यात आला. जास्त प्रभावित तालुक्यांना १०० टक्के माफी देण्यात आली, तर दुष्काळाने कमी प्रभावित तालुक्यांना काही प्रमाणात माफी देण्यात आली. त्यामध्ये फक्त अमरेली तालुक्याला ४ लाख रुपयांची माफी देण्यात आली. (B.A.R., 1902-03, 1903-04)

सयाजीराव महाराजांचे दूरदृष्टीचे धोरण, जनतेप्रती त्यांची असणारी ममत्वाची भावना यामुळे त्यांनी प्रजेला या दुष्काळाच्या खाईतून बाहेर काढले. यासाठी त्यांनी खानगीतून आणि सरकारमधून मोठ्या प्रमाणात देणग्या दिल्या. महाराजांच्या दातृत्वामुळे लोकांचे जीवन सुसह्य झाले.

३) इ.स. १९०४-०५

गुजरातमध्ये खूप दिवस दुष्काळ काय ते माहीत नव्हते. पाऊस वेळेवर होत होता. पिके फार कमी प्रमाणात नाश होत; परंतु या स्वप्नातून गुजरात मागील काही वर्षांत दुष्काळामुळे खडबडून जागा झाला. मागील दुष्काळ इ.स.१८९९ ते १९०२ पर्यंत चालला होता. इ.स.१९०३ मध्ये चांगला पाऊस होता; पण १९०४ मध्ये पाऊस झालाच नाही. अगदी थोड्या विश्रांतीनंतर दुष्काळ निवारणाच्या मोहिमेला पुन्हा सुरुवात करण्यात आली. दक्षिण-पश्चिम मान्सूनकडे सगळ्यांचे डोळे लागले होते. जनता तसेच अधिकारीसुद्धा या पावसाची वाट पाहत होते. सप्टेंबरचा पहिला आठवडा पावसाशिवाय गेल्यावर काहीही वेळ न दवडता दुष्काळ निवारणासाठी एका विशेष विभागाची स्थापना केली. महसूलमंत्री आर.सी. दत्त यांच्याकडे दुष्काळनिवारण कामांची सर्व सूत्रे देण्यात आली, तर त्यांच्या हाताखाली दुष्काळ आयुक्त म्हणून मनुभाई एन. मेहता यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांना दुष्काळ निवारणाच्या विविध कामांची आखणी व आराखडा तयार करण्याचे काम देण्यात आले.

संस्थानच्या चार जिल्ह्यांपैकी तीन जिल्ह्यांत मान्सून आला नाही. सप्टेंबरमध्ये पडलेल्या पावसामुळे नवसारी आणि बडोदा जिल्ह्यातील काही भागांना दिलासा मिळाला; परंतु कडी आणि अमरेली जिल्ह्यांमध्ये थेंबभरही पाऊस झाला नाही. महाराजांना या येऊ घातलेल्या संकटाची जाणीव होती. मनुभाई मेहता यांची दुष्काळ आयुक्त म्हणून नियुक्ती केल्यामुळे गुप्तहेर खात्याची शक्ती दुप्पट झाली होती. दुष्काळाची कारणे व उपाय याबद्दल अतिशय सूक्ष्मपणे आराखडा तयार करण्यात आला. जिल्हा आणि तालुका अधिकाऱ्यांना सर्व परिस्थितीचा नियमित आढावा घेऊन दर आठवड्याला सरकारला अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले. अन्नधान्याच्या किमतीमध्ये झालेल्या वाढीची नोंद करण्यापासून ते पुढे नमूद केलेल्या बाबींवरही बारकाईने लक्ष देण्याचे आदेश देण्यात आले.

सयाजीराव महाराजांच्या दुष्काळाची तीव्रता लक्षात आल्यामुळे दुष्काळ निवारण कामांची यादी व आवश्यक त्या मनुष्यबळासह सज्ज राहण्याचे आदेश जिल्हा एक्झिकेटिव्ह इंजिनिअरला देण्यात आले. दुष्काळ निवारण कामे सुरू असताना इतर कामे करावी लागू नये, म्हणून महत्त्वाचे कृषी प्रकल्पांची कामे करण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली. पोलीस आणि आरोग्य खात्यांनाही सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले.

सयाजीराव महाराज आणि त्यांच्या अधिकाऱ्यांनी पाहणी आणि निरीक्षणासाठी दौरे काढले. दरम्यान, दुष्काळ आयुक्तांनी वित्त आयुक्तांच्या मदतीने दुष्काळ निवारण कायदा कोशाच्या पुनरावलोकनाचे काम पूर्ण केले. त्यानुसार जनतेला सेवा-सुविधा पुरविण्यास सुरुवात केली. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होता.

१) चालू वर्षाचा व मागील वर्षाच्या जमीन महसुलास माफी देण्यात आली. तसेच जमीन महसुलास तात्काळ स्थगिती देण्यात आली.

२) शेतकऱ्यांना जमिनीत सुधारणा करण्यासाठी व संकटाचा सामना करण्यासाठी तगाईच्या स्वरूपात अग्रीम देण्यास सुरुवात केली.

३) पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यात सुधारणा करणे. चारा टंचाई दूर करण्यासाठी उपाययोजना करणे. दुष्काळ निवारणाची कामे करणे, अशा प्रकारची सर्व कामे सुरू करण्यात आली.

४) दुष्काळ निवारणातील या सर्व कामांसाठी महाराजांनी २७,३३,९८५ रुपयांचा निधी मंजूर केला. या निधीतील १६,५१,८०० रुपये सार्वजनिक कामांसाठी, तर १०,८२,१८५ रुपये सिव्हिल एजन्सी प्रोग्रॅम (नागरी सुविधा कार्यक्रम) यासाठी मंजूर करण्यात आले होते.

## जमीन महसूल माफी

महाराजांनी जातीने दुष्काळग्रस्त भागांचा दौरा केला व पाहणी केली. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जमीन महसूल माफ करण्यात आला. या निर्णयाचे या वर्षी खूप स्वागत झाले. प्रत्येक शेतकऱ्याची चौकशी करून, जमीन महसूल देण्याची त्याची क्षमता ओळखून महसूल माफ करण्यात आला होता. जमीन महसूल माफी देताना महाराजांनी पुढील गोष्टींचा अवलंब केला.

१) दिलेल्या आदेशांचा लवकरात लवकर प्रसार आणि प्रचार करणे जेणेकरून कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होणार नाही.

२) पिकांच्या चौकशीसाठी कोणत्याही व्यक्तीची नेमणूक न करता गावकऱ्यांच्या समूहाची त्या कामासाठी नेमणूक करण्यात आली.

३) जमीन महसूल माफ करण्यात आलेल्या गावांमध्ये गरीब व श्रीमंत हा भेद नष्ट करणे.

४) खालसा जमीनधारकासारखीच वागणूक स्वतंत्र जमीनधारकांना व इनामदारांनाही देण्यात यावी.

५) माफ केलेल्या महसुलाची एकूण रक्कम जवळपास २९ लाख रुपये होती.

## शेतकऱ्यांना अग्रिम

विहीर पुनर्भरण व मातीचा पोत सुधारण्यासाठी महाराजांच्या वार्षिक अर्थसंकल्पात नेहमी तगाईची तरतूद असते. मातीचा पोत सुधारण्याअंतर्गत शेतावर खाचा मारणे, भाताच्या पेरणीसाठी शेत तयार करणे इ. कामांचा समावेश होतो. मात्र विहीर पुनर्भरण करण्यासाठीच जास्तीत जास्त प्रमाणात अग्रिम रक्कम घेतली जाते. दर वर्षी या कामासाठी ०२ लाख रुपये दिले जात असत व अगदी ३० वर्षे चालणाऱ्यामुदतीपर्यंत सुलभ हप्त्यांनी ते परत करण्याची मुभा शेतकऱ्यांना देण्यात येत असे. ५०० रुपयांच्या खाली व्याजही आकारण्यात येत नाही. वरती नमूद केलेल्या रकमेपैकी १,००,००० रुपये कडीसाठी, ५०,००० रुपये अमरेली जिल्ह्यासाठी निर्धारित करण्यात आले होते.  या रकमेत दुष्काळ निवारणफंडातूनही भर घालण्यात आली. पुन्हा ५०,००० रुपये कडी आणि अमरेलीसाठी, तर ओखामंडलसाठी २६,००० रुपयांची भर घालण्यात आली.

यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना विहिरी पुनर्भरण करता येऊन काही प्रमाणात रबी पीक घेता आले. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाला, गुरांना आधार मिळाला व दुष्काळ निवारण छावण्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या मजुरांना स्वत:च्याच गावांमध्ये रोजगार मिळाला.

आणखी कोणत्या गोष्टींसाठी तगाई कर्ज देण्यात येईल त्याबद्दल विचार करण्यात आला. टंचाईच्या काळात शेतकऱ्यांना बी-बियाणे, जनावरे, खत, औजारे व शेतीसंबंधी इतर साहित्याची आवश्यकता असते. यासाठी मोठ्या प्रमाणावर रक्कम मंजूर करण्यात आली. रक्कम परत फेडीसाठी सुलभ हप्ते व संकटाच्या काळात उपलब्ध करून देण्यात आले. नेहमीचे नियम लागू न करता या कर्जांवर खूप सवलती देण्यात आल्या. कारण जास्तीत जास्त शेतकऱ्यांना त्याची गरज होती. ५०० रुपयांच्या खाली असलेल्या सर्व कर्जांवर व्याज माफ करण्यात आले. परत फेडीची मुदत एक वर्षाने वाढवण्यात आली. स्वतंत्रपणे तारण घेण्यापेक्षा सामूहिक तारण घेऊन कर्ज देण्यात आले. जमीन महसूल थकबाकी असणाऱ्या शेतकऱ्यांवरील कर्जबंदी उठवून त्यांनाही कर्ज देण्यात आले. एकाच कारणासाठी एका व्यक्तीला दोन किंवा अधिक वेळा कर्ज देण्यात आले. अशा प्रकारच्या कर्जांची कमीत कमी मर्यादा ठेवण्यात आली म्हणजे सर्वसामान्य लोकांना ते जास्तीत जास्त प्रमाणात घेता येईल. कर्ज देताना शेतावर पूर्वीचे काही कर्ज आहे का व इतर बाबींची चौकशी टाळून कर्ज देऊन कामांना सुरुवात करण्यात आली. महाराजांच्या आदेशाने या काळात ४,७९,७२९ रुपये कर्ज वाटण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य झाले.

## पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

दुष्काळग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होता. अगदी लवकर म्हणजे ऑक्टोबर १९०४ मध्ये विहिरींमधील पाण्याची पातळी अगदीच खालावली. त्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले. दुष्काळ आयुक्तांनी विविध तालुक्यांतील पाणी पुरवठ्यासंबंधीचा आराखडा मागवला. पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदण्यासाठी जिल्हा अधिकाऱ्यांना भरघोस रक्कम देण्यात आल्या. विहिरी अगदी खोल खोदण्यासाठी युरोप आणि अमेरिकेहून विशेष औजारे मागवण्यात आली. खोलवर खोदल्यानंतर खारे पाणी लागले त्या ठिकाणी खड्डे व नदीच्या पात्रात खड्डे खोदून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. गुरांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले. मोठ्या विहिरींमध्ये पाणीपुरवठ्याची वेगळी व्यवस्था सुद्धा करण्यात आली. ५० रुपयांपर्यंतच्या लहान अस्थायी विहिरी मंजूर करण्याचे अधिकार तालुका अधिकाऱ्यांना देण्यात आले.

कडक उन्हाळ्याच्या सुरुवातीस दुष्काळ आयुक्तांनी तीन महिन्यांचा मोठा दौरा केला. या तीन महिन्यांमध्ये त्यांनी प्रत्येक गावात जाऊन कसून तपासणी केली. दौरा केलेल्या बहुतांश भागांमध्ये त्यांनी विहिरी बांधण्यासाठीच्या सूचना दिल्या. जेणेकरून येणाऱ्या प्रखर उन्हाळ्यात पाण्याच्या दुष्काळाचा सामना करता येऊ शकेल. या विहिरींपैकी बहुसंख्य विहिरींचे बांधकाम

कंत्राटदारांनी नाही, तर गावातील बोर्डांनी किंवा स्थानिक बोर्डांनी केले. कोणतेही बांधकाम फसले नाही. त्यामुळे खूप पैसा वाचला व लोकांनी स्वत:साठीच काम केले. या काळात बडोदा, कडी, नवसारी आणि अमरेली भागांत ६९८ विहिरी बांधण्यात आल्या. त्यासाठी सयाजीराव महाराजांनी २,६८,१२४ रुपये खर्च करण्यात आले. या रकमेपैकी १,१४,६१८ रुपये उन्हाळ्यात खर्च करण्यात आले. येथेही महाराजांच्या दूरदृष्टीसह प्रजेला मदत करण्याची वृत्ती प्रामुख्याने दिसते.

## चारा पुरवठा

इ.स. १८९९ च्या दुष्काळाच्या तुलनेत १९०४-०५ मध्ये पडलेल्या दुष्काळात शेतकऱ्यांनी गुरांसाठी चाऱ्याची व्यवस्था केली होती. मागील दुष्काळात, दुष्काळ सुरू होण्यापूर्वीच खूप दुभती व शेतात काम करणारी जनावरे चाऱ्याअभावी मरण पावली होती. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात या मुक्या प्राण्यांचे मृत्यूचे प्रमाण फारच वाढले आणि नोव्हेंबरमध्ये तर वॅगन भरभरून कातडी आणि हाडे निर्यात करण्यात आली; परंतु १९०४ च्या शरद ऋतूमध्ये असे काही घडले नाही. मागील वर्षाचा शिल्लक चारा व यावर्षी माणसाच्या खाण्यायोग्य नसलेल्या धान्यातून निर्माण झालेला चारा, असा भरपूर चारासाठा उपलब्ध होता. यामध्ये महाराजांनी निर्माण केलेल्या 'फॅमीन कोड'चा फायदा झाला. त्यामुळे काही भाग वगळता बडोदा सरकारला चारा टंचाईचा सामना करावा लागला नाही. चारा खरेदीसाठी फार कमी रकमेचे कर्ज द्यावे लागले. ५३,००० रुपये कडीसाठी २१,००० रुपये अमरेली आणि ओखामंडलसाठी, तर १८,००० रुपये बडोदा जिल्ह्यातील पेटलाद आणि पादरा तालुक्यांसाठी मंजूर करण्यात आले.

जनावरांच्या चाऱ्यासाठी वन विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली कुरणे, नवसारी जिल्ह्यातील सोनगढ आणि व्यारा तालुका, अमरेली जिल्ह्यातील घारी आणि कोडीनार तालुके येथील चराई कुरणे गुरांच्या चराईसाठी खुली करण्यात आली.

## दुष्काळ निवारण कार्य

कडी, अमरेली आणि बडोदा जिल्ह्यातील दुष्काळ कामांचा आराखडा अधिकाऱ्यांनी डिसेंबरपर्यंत तयार केला. महाराजांनी तो मंजूरही केला. दोन प्रकारच्या कामांचा आराखडा तयार करण्यात आला. पहिल्या प्रकारात तात्काळ कामे करणे मान्य करण्यात आले. त्यासाठी संपूर्ण नियोजन व होणारा खर्च याविषयी तयारी करण्यात आली. दुसऱ्या प्रकारात अकस्मात कराव्या लागणाऱ्या कामांचा समावेश होता.

१) सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वार्षिक अर्थसंकल्पात नमूद करण्यात आलेल्या कामांना दुष्काळाच्या सुरुवातीस चाचणी कामे म्हणून घोषित करण्यात आले.

२) त्यानंतर सुरू झालेली पण अपूर्ण राहिलेली कामे, मागील दुष्काळातील अपूर्ण कामांना पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यात आले.

३) नवीन कामे लगेच सुरू करण्याऐवजी सुरू असलेल्या रस्ते, रेल्वे व इतर दुरुस्तीच्या कामांना अगोदर पूर्ण करण्यात आले.
४) नवीन कामांमध्ये मोबदला मिळणाऱ्याकामांना अगोदर सुरू करण्यात आले.
५) त्यानंतर संरक्षणासाठी व संकट निवारणासाठी लागणारी कामे करण्यात आली.
६) शेवटी स्थानिक उपयोगाकरिता, विशेष परिस्थितीत करावी लागणारी, मागासवर्ग व आदिवासींच्या उपयोगाची दुष्काळ निवारण कामे करण्यात आली.

## सिंचन कामे

नवीन आणि मोबदला देणाऱ्याकामांमध्ये सिंचनासाठी लागणारे पाण्याचे साठे, धरणे आणि जलनिस्सारण कामांना प्राधान्य देण्यात आले. या कामासाठी महाराजांनी तज्ज्ञांची मदत घेतली. सर कॉलीन स्कॉट-मॉन्क्रीम यांच्या कमिशनने असा अहवाल दिला, की गुजरात प्रांतात जास्त क्षमता असलेले मोठे सिंचन प्रकल्प बांधणे शक्य नाही. दुष्काळ आयुक्तांकडे यावर्षी पुढील प्रकल्प सोपवण्यात आले. १) ओखामंडल येथील भीमगाजा धरण, २) अमरेलीतील अंकाडिया तलाव ३) दामनगर येथील धामेल तलाव आणि ४) पेटलाद तालुक्यातील लहान सिंचन तलाव. दुष्काळ निवारण कामांसोबतच ही कामेदेखील सुरू करण्यात आली. या कामांमुळे अनेक लोकांच्या हाताला काम मिळाले. जूनमध्ये अंकाडिया तलावावर काम करण्यासाठी दररोज सरासरी ३,००० मजूर येत. पेटलादमधील एका कामावर मार्चमध्ये २,००० मजुरांनी हजेरी लावली होती.

## रेल्वे आणि रस्ते

सयाजीराव महाराजांनी संस्थानाच्या दुष्काळ निवारण आराखड्यात सिंचन प्रकल्पानंतर रेल्वेच्या कामांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले. रेल्वेच्या जमिनीवरील कामांसाठी अकुशल कामगारही चालतात. त्यामुळे दुष्काळग्रस्त लोक हे काम करू शकतात. रेल्वेच्या खर्चाच्या अंदाजपत्रातील मोठा भाग पूल बांधणारे किंवा तांत्रिक काम करणारे मजूर व परदेशातून रूळ व इतर उपयोगी साहित्य खरेदी करण्यासाठी राखून ठेवलेला असतो. यावर्षीच्या दुष्काळ निवारण कार्यक्रमात नर-वासो, खेरालू-दाभोडा, अमरेली-चिताल व जामनगर-द्वारका इत्यादी मार्गांचा समावेश केला.

या कामातून नवीन रेल्वे मार्ग तयार झाले. तसेच दुष्काळात लोकांच्या हाताला काम मिळाले.

रस्ते बांधणी हे दुष्काळ निवारणातील अतिशय महत्त्वाचे काम होते. ते रेल्वेला पूरक ठरतात. रस्ते तालुक्याला तालुक्याशी व गावाला गावाशी जोडतात. सामान्य माणसाच्या उपयोगाची ठिकाणे, जसे की बाजार, देवस्थान, महत्त्वाची शहरे, शेतातील माल विकण्यासाठी बाजारपेठ इ. गोष्टी लक्षात ठेवून रस्ते निवडण्यात येतात. बडोदा आणि कडी जिल्ह्यात कामासाठी निवडलेल्या रस्त्यांसाठी फार लोक आले नाहीत. मोठ्या प्रमाणावर लोकांना त्यांच्या स्वत:च्या शेतात काम

करण्यासाठी, गावातील विहिरींचे पुनर्भरणा करण्यासाठी अग्रिम देण्यात आले होते. काहीजण गवत कापणीच्या कामासाठी गेले होते; पण अमरेलीतील रस्त्यांद्वारे बरीच प्रगती करण्यात आली. तेथील रस्त्यांचे कामही चांगले करण्यात आले. दामनगर-धासा आणि चुलाला-धास-दलखानिया रस्त्यांचे काम या वर्षी सुरू करण्यात आले. छलाला आणि धनाग्रामधील पूर्वी वगळण्यात आलेले कामसुद्धा आता पूर्ण करण्यात आले. याद्वारे खंबा आणि चिताल रेल्वे स्थानकामधील दळणवळणाचे चक्र पूर्ण झाले. ओखामंडल तालुक्यात नवीन रस्ते बांधणीचे काम हाती घेण्यात आले नाही; केवळ द्वारका आणि बेएतला जोडणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली. कोडीनार तालुक्यातील वेलन, ढोलासा आणि घाटवड रस्त्यांच्या डागडुजीचे काम करण्यात आले.

## दुष्काळी कामातील मजुरांची संख्या

दुष्काळ निवारणासाठी सुरू केलेल्या कामांवरील मजुरांना दररोज मजुरी दिली जात असे. अशा कामांवर नियमित येणाऱ्या मजुरांची संख्या २२,४६,६८९ होती. ही संख्या बडोदा संस्थानच्या प्रशासकीय अहवालावरून घेण्यात आली आहे.

## मदत

प्रत्येक दुष्काळात सर्व प्रकारची मदत नागरिकांना देणे हे आपले आद्यकर्तव्य आहे हे महाराजांनी ओळखले होते. ही मदत वृद्ध, निराधार, गरीब आणि दानधर्मावर जगणाऱ्या लोकांना दिली जाते. दुष्काळाच्या वेळी गावामध्ये शिधा वाटणे, निराधारांसाठी, गरिबांसाठी राहण्याची व्यवस्था करणे यासारखी मदत दिली जाते. अहवालात म्हटल्याप्रमाणे त्या वर्षात पाच लाख लोकांना सरकारने मदत केली. यातील निम्म्या लोकांना गावातील शिधा व अन्य सामग्रीद्वारे मदत झाली तर बाकी अर्ध्यांना दुष्काळ निवारण कामांवर काम करणाऱ्या मजुरांनी मदत दिली. छोट्या कामांवर अवलंबून असणाऱ्या लोकांना गावातील शिधा घेणाऱ्या मध्ये सामावून घेण्यात आले. त्यामुळे त्यांना मदत मिळाली, तर तान्ह्याबाळांच्या मातांना एक पैसा अधिक देण्यात आल्या.

## खाजगी मदत

सयाजीराव महाराजांच्या प्रेरणेने खाजगी दानधर्माद्वारे सुद्धा सरकारच्या मदत कार्यात भर घालण्यात आली. यातील उल्लेखनीय काम म्हणजे धारमज आणि सिसवा टाकी, पेटलाद तालुक्यातील कार्य, सिद्धपूर येथील महंत इनामदारांनी सदावर्तांची घेतलेली काळजी, दिलेली मदत. द्वारका आणि बेएतच्या देवस्थानातही अशाच प्रकारच्या सेवाभावी संस्थांनी मदत कार्य केले. अमरेली आणि धारीमध्ये धान्य व्यापाऱ्यांकडून वर्गणी गोळा करून गावातील निराधारांना शिधा वाटप करण्यात आला.

## दुष्काळावर करण्यात आलेला खर्च

या वर्षअखेरपर्यंत दुष्काळाविरुद्ध लढण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या मोहिमांना लागलेला खर्च पुढील तक्त्यात दाखवण्यात आला असून यापूर्वीच्या दुष्काळांमध्ये केलेल्या खर्चाचा तुलनात्मक आराखडाही देण्यात आला आहे.

| खर्च कशासाठी करण्यात आला | १८९९-१९०० | १९००-१९०१ | १९०१-१९०२ | १९०४-१९०५ |
|---|---|---|---|---|
| १) सर्व प्रकारची मदत | १,५७,८९३ | १,५७,४१३ | १,१४,५९३ | ५,८५० |
| २) विहिरींसाठी विशेष तगाई | १५,१६,५२५ | १२,२३,८०८ | ३,१४,६८६ | ६,६६,५३१ |
| ३) गुरांसाठी निधी | ७,१७६ | १,५७१ | ४०० | ५२ |
| ४) धान्य नुकसान भरपाई | ४,०९,६३८ | १,७७,४८० | - | ५५८ |
| ५) लोकोपयोगी | २०,२१,७४२ | १४,६५,४७२ | १०,९१,८९६ | २,०१,१९३ |
| ६) देखरेख मोबदला | १,५७,२९५ | २,५०,६१० | ७७,३०५ | ३५,८५० |
| ७) इतर | ३,३५,०२९ | २,२४,४२२ | ५,०९,९३१ | ७९,०५३ |
| एकूण | ४६,०५,२८८ | ३५,००,७८५ | २१,०८,८११ | ९,६९,०८७ |

## महाराजांचे दुष्काळातील अद्वितीय दातृत्व

इ.स. १८९९, इ.स. १९०० आणि इ.स. १९०१ मध्ये पडलेल्या दुष्काळांच्या तुलनेत १९०५ मध्ये पडलेल्या दुष्काळाची दाहकता कमी होती; पण यावर्षी महाराजांच्या सरकारने सर्व तयारीनिशी दुष्काळाचा सामना केला. १९०५ सालचे दुष्काळ निवारण कार्य अतिशय शिस्तीत आणि व्यवस्थित पार पडले, शिवाय खर्चावरही बरेच नियंत्रण होते. १९०४-०५ च्या दुष्काळात १० लाखांच्या आतच खर्च झाला; आणि या १० लाखांपैकी ६,६६,५३१ रुपये संस्थानातील सिंचनासाठी अग्रिम म्हणून देण्यात आले होते. ३ वर्षांच्या दुष्काळात १ कोटीपेक्षा जास्त खर्च झाला. *(B.A.R., 1904-05)*

## ४) इ.स. १९०५-०६

इ.स. १९०४-०५ मध्ये बडोदा, कडी आणि नवसारी जिल्ह्यांमध्ये पुरेसा पाऊस झाला. मात्र अमरेली जिल्ह्यामध्ये पुरेसा पाऊस झाला नाही. या जिल्ह्यातील पाच तालुक्यांमध्ये आणखी ५० टक्के पाऊस हवा होता. गेल्या सात वर्षांपासून या जिल्ह्याला कमी पाऊस मिळत आहे. ओखामंडलमध्ये ९० टक्के पावसाचा तुटवडा होता. त्यामुळे यावर्षी बडोद्यात पुन्हा दुष्काळाची छाया गडद झाली.

मागील वर्षापेक्षा यावर्षी जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई फारच वाढली आणि चाऱ्याच्या अभावी गुरांचा प्रश्न गंभीर झाला. संपूर्ण जिल्ह्यात अन्नधान्याच्या किमती स्थिरपणे

वाढत राहिल्या. ओखामंडल तालुक्यात चाऱ्याचे संपूर्ण अपयश, अन्नधान्य पिकांची पूर्ण नासाडी आणि खोल गेलेल्या विहिरींमुळे प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची गरज होती. जंगल संरक्षकांना कोडीनार येथील जंगलांमधून गवत कापून मागील वर्षाप्रमाणे द्वारकेला पाठवण्याचे आदेश देण्यात आले. वाघेर लोकांची गुरे ओखामंडलहून संस्थानातील इतर जंगलांमध्ये हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. पुरुष, स्त्रिया, मुले असे मिळून २,८०० वाघेरांनी ओखामंडलमधून स्थलांतर केले. पण त्यांना कोणतेही काम मिळाले नाही. म्हणून मग एका वाघेराने १० गुरांसह राहावे आणि बाकीच्यांनी ओखामंडलला परत जावे असा निर्णय घेण्यात आला. या परतीच्या प्रवासासाठी तगाई कर्ज देण्यात आले. डिसेंबर १९०५ पूर्वी २,४०० वाघेर अशा प्रकारे ओखामंडलला परतले. दुष्काळ निवारणासाठी एक कार्यक्रम तयार करण्यात आला. सयाजीराव महाराजांनी त्याला मान्यता दिली. दुष्काळाचे संकट अमरेली जिल्ह्यावर आणि अमरेली व ओखामंडल तालुक्यांपर्यंतच सीमित असल्यामुळे मागील वर्षांच्या तुलनेत या वर्षी दुष्काळ निवारणाचे काम कमी विस्ताराचे होते.

## जमीन महसूल स्थगिती आणि माफी

जमीन महसूल वसुलीसंदर्भात सरकारच्या निर्णयामुळे लोकांमध्ये ऊर्जा संचारली व त्या निर्णयाचा लोकांना खूपच फायदा झाला. डिसेंबरच्या शेवटी अशी घोषणा करण्यात आली की, संपूर्ण जमीन महसूल एका वर्षासाठी तहकूब करण्यात येत आहे. केवळ ओखामंडल आणि बेएत तालुक्यांसाठीच ही घोषणा होती. जमीन महसुलाची संपूर्ण माफी अमरेली, कोडीनार आणि शियानगर येथील ११ गावांमध्ये देण्यात आली. येथे पिकांचे उत्पादन चार आण्यांपेक्षा कमी होते. कोडीनार आणि शियानगरमधील आठ गावांच्या दुसऱ्या समूहात पिकांचे नुकसान आठ आण्यांपेक्षा जास्त होते. तिथे जमीन महसुलाच्या एक चौथ्या भागाला माफ करण्याचे आदेश देण्यात आले. तेवढ्याच किमतीचा महसूल स्थगित करण्यात आला. केवळ धारी, खंबा आणि कोडीनार येथील ४० गावांचा तिसरा समूह कमी-अधिक प्रमाणात प्रभावित होता. तिथे चार आण्यांपर्यंत जमीन महसूल माफी देण्यात आली आणि या वर्षीच्या सरकारच्या महसुलाच्या मागणीतील बारा आणे कमी करण्यात आले. वसुली करताना गरीब, श्रीमंत असा भेद करण्यात आला नाही.

## तगाई

विहिरी पुनर्भरणा करण्यासाठी देण्यात येणारे तगाई अग्रिम दुष्काळ निवारण कामाचा एक महत्त्वाचा भाग आहे. तसेच जिल्ह्यातील दुष्काळ निवारण कामाचा एक महत्त्वाचा भाग आहे. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये विहिरींसाठी मोठ्या रकमा मंजूर करण्यात आला. २१८ विहिरींसाठी ३६,३३५ रुपये मंजूर करण्यात आले; त्यापैकी १८७ नवीन पक्क्या विहिरी बांधणे, ७ अस्थायी किंवा कच्च्या विहिरी बांधणे आणि २७ विहिरींच्या दुरुस्तीसाठी दररोज सात लोकांची गरज भासली, तर या कामातून दररोज १,५२६ लोकांना रोजगार मिळाला. या कामासाठी अग्रिम

दिला असल्यामुळे दुष्काळ निवारण कामांवर त्यांचा कोणताही विपरीत परिणाम होणार नव्हता. कृषी कर्जांचा पुढचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे रबी आणि सिंचनाखाली असलेल्या पिकांच्या पेरणीसाठी, बी-बियाणांसाठी तगाई कर्ज उपलब्ध-करून देणे. लोकांनी २५,०६६ रुपये बियाणांसाठी तर ९,००० रुपये मोर, सोल व इतर शेती उपयोगी साहित्य खरेदीसाठी कर्ज म्हणून घेतले. पाणी उपलब्ध असणाऱ्या ओसाड जमिनींवरही शेती करण्याची परवानगी देण्यात आली आणि अनधिकृतपणे शेती करण्यावर असणारे सर्व कर काही काळासाठी तहकूब करण्यात आले.

## चारा पुरवठा

सरकारने फार आधीच घोषित केले, की दुष्काळामुळे जमिनीवरील सर्व कर तात्पुरते माफ करण्यात येतील व चारा उत्पादन करणाऱ्या जमिनीचे मूल्यांकनही वर्षभरासाठी करण्यात येणार नाही. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जनावरांसाठी घोडघास व इतर चाऱ्याचे पीक घेण्यास प्रोत्साहन मिळाले. गवत खरेदी करण्यात आले आणि लोकांनी याचा उपयोग केला. वर्षाच्या सुरुवातीला कोडीनार आणि धारी येथील जंगले गुरांच्या मोफत चराईसाठी खुली करण्यात आली. आणि २,२३० जनावरांनी याचा फायदा घेतला. जंगल संरक्षकांनी ४,८७,५०० पाऊंड गवत ओखामंडलला पाठवले. भविष्यात उद्योगासाठी १,९४,१६४ पाऊंड गवत कापून धारीमध्ये साठवून ठेवण्यात आले. फेब्रुवारी १९०६ मध्ये ओखामंडल येथे पडलेल्या ३ इंच पावसामुळे सगळी भीती दूर केली व पुढे गवत निर्यात करण्याची गरज उरली नाही. या गवत मोहिमेमुळे शेतीला उपयोगी पडणाऱ्या हजारो जनावरांचे जीव वाचवण्यात आले. म्हणून अशा प्रकारच्या जनावरांना गमावण्याचे प्रमाण कमी झाले. बैल खरेदी करण्यासाठी लोकांनी केवळ ७,७९२ रुपये कर्ज घेतले.

## दुष्काळ निवारण कामे

दुष्काळ निवारण कामांमध्ये समाविष्ट करण्यात आलेली कामे म्हणजे अमरेलीतील अंकाडिया सिंचन तलाव, ओखामंडल येथील भीमगाजा गोमती सिंचन तलाव आणि गोमती सिंचन बंधारा. यापैकी भीमगाजा आणि अंकाडिया तलावाचे काम मागील वर्षी सुरू झाले आणि पुढे यावर्षीही सुरू ठेवण्यात आले. या दोन प्रकल्पांची प्रगती समाधानकारक होती. दुष्काळ निवारणाचे काम पूर्ण करत असतानाच या प्रकल्पांचे कामही पूर्ण करण्यात आले.

गोमती सिंचन तलावही आशावादी प्रकल्प होता. गोमती नदीतील पुरामुळे जमा झालेले पाणी द्वारकेच्या उत्तर पूर्व दिशेला वळवण्यासाठी हा सिंचन तलाव बांधण्यात येणार होता. सिंचनाच्या कामांना मदत करण्याबरोबरच द्वारका शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठाही या तलावातून करण्यात येणार होता. जमीन सिंचनाखाली करण्यासाठी गोमती नदीवरील बंधाऱ्यासाठी ८,००० रुपये खर्च करण्यात आले.

ओखामंडलमध्ये हाती घेण्यात आलेली इतर कामे म्हणजे सार्वजनिक बांधकाम खात्याची सामान्य कामे होत. त्यामध्ये अर्थसंकल्पात समावेश करण्यात आलेल्या महत्त्वाच्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली. जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये धारी-छलाला आणि दामनगर-धासा रस्त्यांचे दुरुस्तीचे काम करण्यात आले. नंतरच्या काळात अमरेली रेल्वेच्या जमिनीवरील कामांना सुरुवात करण्यात आली. हे काम जलद गतीने करण्यात आले.

या वर्षात सगळ्या कामांवर मिळून सव्वादहा लाख लोकांना मदत देण्यात आली. हा आकडा खूप मोठा झाला. एप्रिल महिन्यात १,१७,८९२ लोकांना सात कामांवर एकाच वेळी रोजगार देण्यात आला. यापैकी ५ कामे ओखामध्ये, एक अमरेलीत आणि एक धारीमध्ये होते. यापैकी १,११,९५४ मजूर होते व ५,९३८ त्यांच्यावर अवलंबून असणारे लोक होते. म्हणजेच दररोज सरासरी ३,७३२ मजूर व १९८ त्यांच्यावर अवलंबून असणारे लोक कामासाठी येत होते. ऑक्टोबरमध्ये अवलंबून असणाऱ्या लोकांची दररोजची संख्या सर्वांत जास्त, म्हणजे ३४४ होती. त्यांना सर्व प्रकारची मदत देण्यात येत असे.

## सर्व प्रकारची मदत

दुष्काळ निवारण कार्यक्रमात पीडितांना सर्वच प्रकारची मदत दिली जाते. यावेळचे संकट फार गंभीर नसल्यामुळे अशा प्रकारच्या कामासाठी केवळ ३,०५७ रुपये खर्च करण्यात आले. गावातील लोकांना केवळ शिधा वाटप करण्याची व्यवस्था करण्यात आली. अशा प्रकारची मदत घेणारांची संख्या ओखामंडलमध्ये सर्वांत जास्त होती. कारागिरांसाठी, गरासिया लोकांसाठी आणि धर्मादाय शिधा घेऊ न शकणाऱ्या स्वाभिमानी गरिबांसाठी कर्जाची सोय या दुष्काळ निवारण कार्यक्रमात करण्यात आली होती. मात्र मंजूर केलेल्या रकमेपैकी केवळ ७३३ रुपये अशा लोकांनी कर्ज म्हणून घेतले.

## दुष्काळातील खर्च

इ.स. १९०४-०५ मध्ये तीन जिल्ह्यांमध्ये दुष्काळ होता. त्यावर दुष्काळ निवारणासाठी ९,८९,०८७ रुपये खर्च करण्यात आले. यावर्षी एकट्या अमरेली जिल्ह्यासाठी ५,९१,१११ रुपये खर्च करण्यात आले. पुढील तक्त्यात मागील वर्षाच्या तुलनेत करण्यात आलेल्या खर्चाचे विवरण देण्यात आले आहे.

| अ. क्र. | कशासाठी खर्च करण्यात आला | खर्च करण्यात आलेले वर्ष | |
|---|---|---|---|
| | | १९०४-०५ (रु) | १९०५-०६ (रु) |
| १ | सर्व प्रकारची मदत | ५,८५० | ३,०५७ |
| २ | विहिरींच्या दिलेल्या | | |
| | कर्जासह तगाई | ६,६६,५३१ | २,४६,८३५ |
| ३ | जनावरांसाठी | ५२ | १,५,४० |
| ४ | धान्य मोबदला | ५५८ | - |
| ५ | लोकोपयोगी कामे | २,०१,७९३ | १,६५,२२८ |
| ६ | देखरेख मोबदला | ३५,८५० | ३७,०५५ |
| ७ | इतर | ७९,०५३ | १,३७,३९६ |
| | एकूण | ९,८९,०८७ | ५,९१,१११ |

वरील तक्त्यात नमूद केलेल्या सहाव्या आणि सातव्या भागातील नोंदींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. इतर खर्चाच्या भागात खूप मोठी रक्कम टाकण्यात आली आहे. ही रक्कम मागील वर्षाच्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरींसाठी मंजूर करण्यात आली होती. ही कामे वर्षाच्या सुरुवातीस अपूर्ण होती, पुढे ती सुरू करून पूर्ण करण्यात आली. त्यासाठी लागणारा खर्च या वर्षीच्या खात्यात टाकण्यात आला.

दुष्काळ निवारणाच्या कामाच्या देखरेखीच्या खर्चाखाली १०,८४६ रुपये खर्च करण्यात आले. दुष्काळ निवारण कामांसाठी तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या आस्थापनेसाठी हा खर्च करण्यात आला. लोकोपयोगी कामांसाठी १,६५,२२८ रुपये खर्च करण्यात आले, १२,४४,१२६ लोकांना मदत करण्यात आली आणि प्रत्येक व्यक्तीसाठी संपूर्ण काळात २ आणे खर्च करण्यात आले.

दोन वर्षांचे आकडे एकत्रितपणे पाहिले तर संस्थानाला जवळपास १६ लाख रुपये खर्च आला. यापैकी ९ लाख रुपये व त्यापेक्षाही जास्त विहिरी पुनर्भरण व इतर कामांसाठी तगाईच्या स्वरूपात देण्यात आले. ३० लाखांचा जमीन महसूल माफ करून शेतकऱ्यांना बराच दिलासा देण्यात आला. हे सर्व या दोन वर्षांमध्ये करण्यात आले.

‘१९०४-०५ आणि १९०५-०६ मध्ये दुष्काळ निवारणाचे काम अतिशय यशस्वीपणे पार पाडण्यात आले. आमच्या दुष्काळ निवारण छावण्यांमध्ये कोणतीही महामारी आली नाही, मृत्यूदर वाढला नाही आणि दुष्काळामुळे कोणी मरणही पावले नाही. मनुभाई मेहता, दुष्काळ आयुक्त यांच्या दूरदृष्टी, विचारपूर्वक निर्णय आणि अथक परिश्रमांमुळे हे शक्य होऊ शकले. अतिशय बिकट महिन्यांमध्ये दोन्ही वर्षी सयाजीराव महाराजांनी आणि मनुभाई मेहतांनी दुष्काळग्रस्त तालुक्याचे खूप दिवस दौरे केले. जागीच दुष्काळ निवारण कामांना सुरुवात केली. त्यांच्या सततच्या आणि काळजीपूर्वक निरीक्षणामुळे दुष्काळ निवारणाचे कार्य तत्परतेने, कमी खर्चात यशस्वी झाले. हे दुष्काळ सुलभ होण्यास सयाजीराव महाराजांचे दातृत्व आणि अधिकारी

वर्गाची महाराजांप्रती आणि प्रजेविषयी असणारी आस्थाही कारणीभूत होती.' असा अभिप्राय प्रशासकीय अहवालात नमूद करण्यात आला आहे. *(B.A.R., 1905-06)*

५) इ.स. १९०७-०८

इ.स.१९०७-०८ यावर्षी पुन्हा पाऊस पडला नाही. मान्सूनने दमदार सुरुवात केली; परंतु ऑगस्ट महिन्याचा शेवटचा आठवडा आणि पूर्ण सप्टेंबर महिना पावसाशिवाय गेला. पावसाचे मोजमाप केले असता असे लक्षात आले की, मोसमाच्या या अनिश्चित चक्रामध्ये अपेक्षेपेक्षा बरा पाऊस पडला होता; राज्याच्या काही भागांमध्ये मात्र हा सुद्धा चिंतेचा विषय होता. त्यामुळे पिकांच्या नुकसानीसाठी कोणत्याही इतर कारणांपेक्षा पावसाने खूप लवकर दडी मारली हे मुख्य कारण होते.

सयाजीराव महाराजांनी बडोदा प्रशासनाच्या मदतीने बडोद्यात प्रजेच्या सोयीसाठी पुढील उपाययोजना केल्या.

१) इ.स. १९०० साली पडलेल्या दुष्काळापेक्षाही भयंकर परिस्थिती निर्माण झाली. मध्यमवर्गही धास्तावला आणि वर्षभर हीच स्थिती राहिली. महिन्याकाठी १० रुपये आणि त्यापेक्षा कमी वेतन असणाऱ्या नोकरांसाठी सरकारने उदारपणे १ रुपया प्रति महिना असा टंचाई भत्ता दिला. त्यासाठी १,२८,२३४ इतका खर्च आला.

२) संस्थानातील खूप भागांमधील महसूल स्थगित करण्यात आला. ४० टक्के महसूल अमरेलीमध्ये, ३० टक्के महसूल कडी जिल्ह्यात, तर बडोदा विभागात १० टक्के महसूल स्थगित करण्यात आला. नवसारीमध्ये महसूल स्थगित करण्याची आवश्यकता नव्हती.

३) या वर्षभरातील मदतकार्यासाठी तगाई कर्जांनी भरीव रकमेची तरतूद करण्यात आली. महसुलाविषयीच्या प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे गवत, चारा, बी-बियाणे आणि बैलांच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांना ३,६१,१४७ रुपये अग्रिम देण्यात आले.

४) विहिरी खोदणे आणि दुरुस्त करण्यासाठी १,२५,९८८ रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्यात आला.

५) तगाई कर्जांद्वारे मिळालेल्या रकमांमुळे शेतकऱ्यांना रबी पिकांच्या सिंचनासाठी मोठी मदत मिळाली. लोकांची ३५००० बिघा जमीन सिंचनाखाली आली.

६) ओरसांग कालव्यातील पाण्यामुळेसुद्धा एवढ्याच बिघा जमिनीवर सिंचन झाले. वत्रास्कर आणि अनावाडा कालव्यातील पाण्यामुळे हजार बिघांपेक्षा जास्त शेतीवर सिंचन झाले.

७) या दुष्काळात कामाचा मोबदला चांगला मिळत होता. त्यामुळे खूप लोकांनी मदतकार्यात सहभाग घेतला नाही. मदतकार्यासाठी सरकारने अतिशय उदारपणे ४ लाखांपर्यंतचा निधी मंजूर केला, गरजेच्या वेळी सुरू झालेल्या मदतकार्याला मात्र जास्त प्रमाणात मजूर मिळाले नाहीत.

८) दुष्काळ निवारणासाठी विविध तालुका पंचायतींच्या व्यवस्थापनाखाली देण्यात आलेल्या स्थानिक मंडळांच्या निधीतून खर्च करण्यात आला.

९) नवसारी विभागात काही प्रमाणात पाणी टंचाई होती; परंतु रजत जयंतीच्या वेळी महाराजांनी रयतेच्या पिण्याच्या पाण्यासाठी भेट म्हणून दिलेल्या पैशांची रयतेला फार मदत झाली. पिण्याच्या पाण्याच्या विहिरींचे पुनर्भरण करण्यासाठी खासकरून हा निधी देण्यात आला होता.

१०) विहिरींचे काम मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आले.

११) या वर्षीच्या दुष्काळाचे निवारण करण्यासाठी वर्षभरात अस्थापनेसाठी २,०२२ मदतकार्यासाठी १६,९४४, तगाई कर्ज ३,६१,१४७, टंचाई भत्ता १,२८,२३४ एवढा खर्च करण्यात आला *(B.A.R.,1907-08)*

६) इ.स. १९११-१२

इ.स. १९११ साली पडलेला मान्सून निष्फळ ठरला, म्हणून संस्थानातील बराच मोठा भाग पुन्हा कडक दुष्काळाच्या विळख्यात अडकला. कडी आणि अमरेली जिल्ह्यांमध्ये या दुष्काळाची सर्वांत जास्त झळ पोहोचली. कडी जिल्ह्यामध्ये पडलेला पाऊस मागील पाच वर्षांतील पडलेल्या सरासरी पावसाच्या चौथ्या भागापेक्षाही कमी होता. संपूर्ण अमरेलीमध्ये ७५ टक्के कमी पाऊस झाला. काही तालुक्यांमध्ये जसे की विसनगर आणि सिद्धपूरमध्ये संपूर्ण वर्षभरात तीन इंचही पाऊस पडला नाही, तर ओखामंडल आणि बेएत येथे केवळ दोन इंच पाऊस झाला. त्या मानाने नवसारी आणि बडोदा जिल्ह्यांची परिस्थिती बरी होती. नेहमीपेक्षा तिथे ९० टक्केच पाऊस झाला; पण तरीही परिस्थिती काही फार वाईट नव्हती.

जुलै महिन्यात पावसाने दडी मारल्यामुळे, अगोदरच अंदाज आलेल्या संकटाने उसळी मारली. अमरेलीमध्ये अन्नधान्याचे भाव गगनाला भिडले. ज्वारीच्या भावात ५० टक्के तर बाजरीच्या किमतीमध्ये ३३ टक्के वाढ झाली. वर्षभर या किमती फुगलेल्याच राहिल्या. कडी जिल्ह्यात गवताचे भाव वर्षाच्या सुरुवातीलाच वाढले आणि ऑगस्ट महिना सुरू होताच चाऱ्याचा दुष्काळ लोकांना भेडसावू लागला. गुरांची अवस्था अतिशय दयनीय झाली. खूप मोठ्या प्रमाणात गुरे दक्षिणेकडील जंगलांमध्ये स्थलांतरित झाली.

१) सरकारने लवकरच स्थितीचा अंदाज घेतला आणि सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला प्रशासकीय मंडळाने सर्व गुरेचराईसाठी कुरणे आणि पडीक जमिनींचा लिलाव थांबवून तो सर्व भाग मोफत चराईसाठी गुरांना खुला केला. संस्थानातील सर्व गुरांसाठी आरक्षित नसलेली सर्व जंगले चराईसाठी खुली करण्यात आली.

२) तगाई अग्रिम रक्कम आणि जमीन महसूल वसुली संदर्भात सूट देण्यात आली.

३) दुष्काळ निवारण कार्यक्रम तयार केला. यासाठी ३१,३५,०००/- रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. ऑक्टोबर १९११ मध्ये श्री. मनुभाई एन. मेहता यांची दुष्काळ

आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. नोव्हेंबरमध्ये महाराज भारतात परतले आणि त्यांनी दुष्काळ निवारण्याच्या सगळया कार्यक्रमांना स्वीकृती दिली.

४) दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून हाती घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले. १) जमीन महसूल स्थगित आणि माफ करणे, २) कृषी कर्ज, ३) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ४) चाऱ्याचा पुरवठा, ५) चारा छावण्या, ६) दुष्काळ निवारण कार्य, ७) सर्व प्रकारची मोफत मदत

## जमीन महसूल स्थगित आणि माफ करणे

१) मागील काही वर्षांच्या अनुभवातून जमीन महसूल स्थगित आणि माफ करण्याचे नियम करण्यात आले. गैरसमज होऊ नयेत म्हणून जास्तीत जास्त लोकांपर्यंत आणि अगदी वेळेत हे नियम पोहोचवण्यात आले. शेतीतील उत्पादनाची चौकशी प्रत्येक गावात जाऊन न करता गावांच्या समूहाची करण्याचे आदेश देण्यात आले. जमीन महसूल स्थगित करण्याचे आदेश देताना गरीब आणि श्रीमंत हा भेद करण्यात आला नाही. या आणि अशाच इतर उपायांमुळे लोकांचा आत्मविश्वास वाढला. ते स्थलांतर न करता आपापल्या गावातच राहिले. १९११-१२मध्ये देण्यात आलेल्या जमीन महसूल स्थगिती आणि माफी आदेशामुळे कडी जिल्ह्यात रुपयामध्ये ०६ आणे, अमरेली जिल्ह्यात रुपयामध्ये ०२ आणे आणि बडोदा जिल्ह्यात रुपयामध्ये १५ आणे जमा करण्यात आले.

२) याशिवाय चालू वर्षातील जमीन महसुलाच्या मागणीव्यतिरिक्त मागील वर्षीची खूप थकबाकी होती. या सगळ्या वसुलींना स्थगित करण्याचे आदेश देण्यात आले. वर्षाच्या सुरुवातीला आणि शेवटी या तीनही जिल्ह्यांचा जमा न झालेला महसूल अनुक्रमे २६,२१,०४० रुपये आणि ५६,३२,४९३ रुपये होता.

## शेती कर्ज

१) दुष्काळ निवारणाच्या प्रत्येक कार्यक्रमात अग्रिम दिलेल्या तगाई रकमांना एक महत्त्वाचे स्थान आहे. तगाई अग्रिम दिल्याशिवाय दुष्काळ निवारणाचे काम पूर्ण होऊ शकत नाही. जमीन सुधारण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या देखभालीसाठी सुद्धा हे अग्रिम दिले जाते. जमीन सुधारणा म्हणजे विहिरींचे पुनर्भरण, विहिरींची डागडुजी, शेतीतील विविध कामे, कायरी लागवडीसाठी तटबंदी उभी करणे, शेतजमीन सपाट करणे इ. आणि शेतकऱ्यांची देखभाल म्हणजे बियाणांसाठी अग्रिम, खत आणि गुरे घेण्यासाठी अग्रिम. या सर्व प्रकारच्या अग्रिमांसाठी प्रथम १२,५०,००० रुपये मंजूर करण्यात आले. नंतर कडी जिल्ह्यांसाठी याच रकमेत १,००,००० रुपये आणि बडोदा जिल्ह्यासाठी ३०,००० रुपये टाकण्यात आले. मंजूर झालेल्या १४,३०,००० रुपयांपैकी १२,१२,८४७ रुपये तगाई देण्यासाठी खर्च करण्यात आले. परंतु ती सगळी रक्कम काहीही व्याज न लावता अग्रिम देण्यात आली.

२) मागील एक दशकापासून संस्थानाने कृषी विहिरी पुनर्भरण धोरण हाती घेतले आहे. या वर्षी या कामासाठी लागणाऱ्याकर्जात ३.८ टक्के कपात केली. खाजगी संस्थांना या कामासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने स्वत:च्या खर्चाने विहिरी पुनर्भरणाचे काम करणाऱ्यांनी एकूण खर्चाच्या दहा टक्के रकमेचे बक्षीस देण्याचे आदेश देण्यात आले. या वर्षभरात तगाईच्या मदतीने कडी जिल्ह्यात २,६०९, अमरेली जिल्ह्यात ७५९, तर याच जिल्ह्यांमध्ये खाजगी भांडवलातून अनुक्रमे २,०५८ आणि खर्चातून आणि सरकारी कर्जाद्वारे खूप मोठ्या प्रमाणात 'कच्च्या' विहिरींचे पुनर्भरण करण्यात आले.

३) सर्व वस्तूंच्या किमतीमध्ये सूट दिल्यामुळे लोकांनी मोठ्या प्रमाणावर शेतजमीन लागवडीखाली आणली आणि पाणी योग्य प्रमाणात वापरून ओली पिके घेतली.

## पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

इ.स.१९११ मध्ये पावसाने दडी मारल्यामुळे पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली. अजवा जलाशयामधून होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी वेळीच चांगले नियोजन केल्यामुळे बडोदा शहरात ही टंचाई जाणवली नाही. कडी आणि बडोदा जिल्ह्यांमधील विहिरी कोरड्या झाल्या आणि गावांमधील गुरांचे गाळे पाण्याने भरण्यासाठी हिवाळयाच्या सुरुवातीला सरकारी अनुदानाची गरज भासली. या कामासाठी सरकारने २०,००० रुपये दिले तर जिल्हा स्थानिक बोर्डाने त्यांच्या राखीव निधीतून गावातील पाणीपुरवठ्यासाठी १.५० लाख रुपये बाजूला काढून ठेवले.

## विहीर खोदण्याची साधने

मंजूर झालेल्या ३६,६०० रुपयांच्या निधीतून कृषी संचालकांना १८ विहिरी खोदण्याच्या साधनांचा संच खरेदी करण्यासाठी २९,२८५ रुपये खर्च केले. बडोदा आणि कडी जिल्ह्यांमध्ये या साधनांचा पुरेपूर उपयोग करण्यात आला. खोदलेल्या ११८ विहिरींपैकी ९५ यशस्वी झाल्या. लहान साखळी पंप बसविणे आणि त्यांचे प्रात्यक्षिक दाखवणे, जेणेकरून आवश्यकतेप्रमाणे तगाई कर्जाद्वारे शेतकरी ते विकत घेतील, यासाठी कृषी संचालकांकडे ६,००० रुपयांचा निधी देण्यात आला.

## चाऱ्याचा पुरवठा

१) चारा टंचाई हा या दुष्काळातील मुख्य प्रश्न होता. दक्षिणेकडील जंगलांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुरे स्थलांतरित झाली आणि बाजारातील मोठ्या प्रमाणावर गुरे विक्रीसाठी दिसून आली. त्यामुळे सरकारने खबरदारी म्हणून चाऱ्याचा पुरवठा सुरू केला. गवतासाठी असलेल्या पडीक जमिनी आणि गुरे चराई यांच्या लिलावावर बंदी घालण्यात आली; आरक्षित नसलेल्या जंगलांचा भाग गुरांना चरण्यासाठी खुला करण्यात आला. दुसऱ्या जंगलांमधील उपलब्ध असलेले गवत तोडून, कापून मोठ्या प्रमाणावर गवत खरेदी

करून बडोदा, कडी आणि अमरेली जिल्ह्यांमध्ये उघडण्यात येणाऱ्या कोठारांमध्ये पाठवण्याचेही आदेश देण्यात आले. खऱ्याखुऱ्या शेतकऱ्यांना हे गवत १ रुपयाला २ मण याप्रमाणे विकण्याची व्यवस्था करण्यात आली.

२) द्वारका वहिवाटदार यांना ८,००० रुपये देण्यात आले आणि एका वाघेराला प्रत्येक बैलासाठी मासिक ३ रुपये देण्याचे आदेश देण्यात आले. 'चेर' पानांच्या मदतीने बहुतांश भीमकट्टा जनावरे वाचवण्यात आली. अमरेली, कोडीनार आणि धारीमधील शेतकऱ्यांनी गीर टेकड्यांवरून गवत मिळविले. दामनगर आणि रतनपूरमध्ये सरकारने गवत पुरविले. बडोदा जिल्ह्यामध्ये पेटलाद महाल परिसरात खरी चारा टंचाई जाणवली.

३) या चाऱ्यासाठी एकूण ५,०९,६०७१ रुपये खर्च करण्यात आले. लष्कर आणि उद्यान विभागावर केलेला खर्चही या रकमेत जमा केला, तर संपूर्ण खर्च ५,३३,८८६ रुपयांपर्यंत येऊ शकेल. गवत विक्रीतून एकूण २९,९९,७५२ रुपये मिळाले. महालांना विक्री केलेले गवत, लष्करी विभागांना, सोनगड येथील खातेदारांना, वुकाल येथील खातेदारांना विक्री केलेले गवत आणि बँकांमधील ठेवींवरील व्याज हे सगळे मिळून ३,०५,८७४ रुपये उत्पन्न झाले. ही रक्कम एकूण खर्चातून वजा केल्यानंतर सरकारला एकूण २,०३,१९६ रुपयांचा तोटा झाला. या आकड्यांवरून असे दिसून येते की, गवताचा पुरवठा करण्याचे काम अतिशय अभूतपूर्व आणि मोठ्या प्रमाणात करण्यात आले.

गुरांच्या छावण्या

१) या पूर्वी नमूद केल्याप्रमाणे खूप मोठ्या प्रमाणावर गुरे कडी आणि अमरेलीहून नरबाडा आणि ताप्ती येथे असलेल्या जंगलांकडे स्थलांतर करत होती. दररोज हजारो जनावरे असहाय अवस्थेत अनोळखी प्रदेशात जाताना दिसत होती आणि त्यांना खाऊ घालण्याची व त्यांची काळजी घेण्याची गरज दिवसेंदिवस वाढत होती. बडोदा शहरात महाजन यांनी गुरांना काही दिवस चारा देण्याचा प्रयत्न केला; पण त्यात फार यश आले नाही. मुंबई गोरक्षा मंडळाने त्यांच्या सदस्यांना या मुक्या जनावरांच्या मदतीसाठी पाठवले; परंतु खाजगी प्रयत्नांना फारसे यश येत नाही हे पाहून सरकारने मध्यस्थी करून जंगलांच्या रस्त्यांवर गुरे छावण्या उभारल्या. रस्त्याजवळ असलेल्या कवायती मैदानावर गुरांना आराम करू देण्याची परवानगी त्यांना हाकणाऱ्या रबारींना देण्यात आली व तिथेच गुरांसाठी २४ तास चाऱ्याची देखील सोय करण्यात आली.

२) १ऑक्टोबर १९११ रोजी सुरू करण्यात आलेली ही गुरे छावणी ३० जून १९१२ रोजी बंद करण्यात आली. या काळात ६८,३९६ जनावरांना चारा देण्यात आला आणि हा सर्व चारा बडोद्यातील कोठारामधून पुरवण्यात आला.

३) या चाऱ्यासाठी एकूण ६०,००० रुपये किंवा प्रति जनावर साधारण १ आणा खर्च झाला.

४) नवसारीमधील गुरे छावण्यांसाठी २७,५०० रुपये मंजूर करण्यात आले. त्यातील २४,७३० रुपये खर्च झाले. गुरे छावण्यांद्वारे झालेले उत्पन्न २४,४०१ रुपये होते. या शिवाय जंगले चरण्यासाठी मोफत देण्यात आली. त्यामुळे चरण्याची फी आणि मोबदला हे एकूण ४६,८८४ रुपये झाले.

## निवारण कार्य

१) दुष्काळाचा सामना करण्यासाठी दुष्काळ निवारण कार्ये अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात. सप्टेंबर १९११ मध्ये सर्व दुष्काळग्रस्त भागांमध्ये चाचणी कार्य करण्याचे आदेश देण्यात आले. दुष्काळाची तीव्रता जाणून घेण्यासाठी रस्ते दुरुस्तीची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली.

२) जून १९१२ मध्ये दुष्काळ निवारणाची कामे अतिशय जोमाने सुरू होती. कडी जिल्ह्यात तेव्हा दररोज सरासरी २,३०० लोक ही कामे करत असत.

३) दुष्काळ निवारणाच्या कामांमध्ये रेल्वेची कामे आणि शेतीसाठी जलाशय तयार करण्याची कामे मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. ही कामे दुष्काळ निवारणासाठी फार उपयुक्त ठरली. या वर्षीच्या रेल्वे कामांत कडी येथील पट्टण-वाघदोड रेल्वे, अमरेली जिल्ह्यातील अमरेली-छलाला, छलाला-धारी आणि ओखामंडल रेल्वेचा समावेश होता. या रेल्वे कामांनी हजारो लोकांना रोजगार दिला आणि त्यामुळे इतर दुष्काळ निवारण कामांवरील आर्थिक भार कमी झाला.

४) अमरेली-छलाला-धारी रेल्वेने २००० मजुरांना दररोजचा रोजगार दिला. जानेवारी महिन्यात जेव्हा दुष्काळ खूपच भीषण होता तेव्हा हा रोजगार देण्यात आला. याच महिन्यात ओखामंडल रेल्वे कामांवरील मजुरांची संख्या १,५०० पर्यंत गेली, तर पट्टण-वाघदोड रेल्वे कामांनी ७००-९०० लोकांना वर्षभर रोजगार दिला.

५) प्रथमदर्शनी असे वाटले की सामान्य लोकहित कार्य करण्यापेक्षा दुष्काळ निवारणाचे काम म्हणून रेल्वे काम चांगले आहे; परंतु परिस्थिती तशी नव्हती. सर्वांत प्रथम ओखामंडल रेल्वेला दुष्काळ निवारण काम सुरू करण्यास सांगण्यात आले. मात्र तिथे लोकांचा अत्यल्प प्रतिसाद मिळाला. त्यामुळे ते केवळ साधारण काम म्हणून सुरू राहिले. पट्टण-वाघदोड रेल्वे कामांचीसुद्धा हीच स्थिती होती. अमरेली-छलाला-धारी रेल्वेची कामे कंत्राटी पद्धतीने करण्यात येत होती आणि त्यांना दुष्काळ निवारण काम म्हणून करणे निश्चितच हितावह नव्हते.

## शेतीची कामे

१) शेतीची मोठ्या प्रमाणावरील कामे अकुशल कामगारांना प्रोत्साहन देतात व दुष्काळ निवारणासाठी उपयुक्त ठरतात. शेतीची नवीन कामे हाती घेण्यापेक्षा अर्धवट राहिलेल्या कामांना पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. कडी जिल्ह्यातील शेर जलाशय आणि

कलोज तालुक्यातील संतेज जलाशयाने दुष्काळ निवारण कामात मोठे सहकार्य केले. दोन्ही जलाशयांचे बांधकाम दुष्काळापूर्वीच सुरू झाले व नंतर ते दुष्काळ निवारण्याचे काम म्हणून करण्यात आले. कडी जिल्ह्यातील थोल जलाशयालासुद्धा रुंद करण्यात आले. त्यामुळे पूर्वेकडील पाणी निचरा व्यवस्थापनाचे कामही सुरू करण्यात आले. या सोबतच पश्चिमेकडील पाणी निचरा व्यवस्थापनाचा आराखडा तयार करण्यात आला, जेणेकरून मोठ्या प्रमाणावर वाहून जाणाऱ्या पाण्याचा योग्य उपयोग होऊ शकेल. वाया जाणारे पाणी जमा करण्यासाठी ठराविक अंतरावर छोटे छोटे जलाशय तयार करण्यात आले. हरीज गावातील गरीब लोकांना गौना-जमनापूर जलाशयातील पाण्यामुळे खूप मदत झाली.

२) अमरेली जिल्ह्यात हाती घेण्यात आलेले सर्वांत मोठे शेतीविषयक काम म्हणजे दामनगर येथील कुंभनाथ जलाशय आणि धामेल येथील फतसर जलाशय. जलाशयानंतर रस्ते बांधणीचे काम हाती घेण्यात आले. दुष्काळ निवारणाच्या या कामात अमिलीहून मोठा अंकाडिया रस्ता आणि सराशिया आणि जिराहून दुधालाकडे जाणाऱ्या धारीपासूनच्या रस्त्याचे काम सुरू करण्यात आले. या सोबतच दामनगर येथील धामेल रस्ता, वेलन येथील कोतडा रस्त्याचा काही भाग आणि मांदवड बंदर रस्त्याचे कामही या वर्षात सुरू करण्यात आले. कडीमध्ये दुष्काळ निवारण कामांमध्ये उंझा-उनाव रस्ता, बेचराजी-मुधेरा रस्ता आणि बोरा भाविक मोठ्या संख्येने जातात त्या देलमल येथील दुर्गा आणि शेलारी रस्त्याचे काम समाविष्ट करण्यात आले. दुष्काळ निवारण कामांमध्ये लहान-मोठ्या कामांचाही समावेश होता. जसे की, कडी आणि अमरेली जिल्ह्यांमध्ये पाण्याच्या टाक्या दुरुस्त करणे. या कामाचा बहुतांश खर्च स्थानिक बोर्डाने उचलला.

३) वर्षातील ९ महिने दुष्काळ निवारण काम सुरू ठेवण्यात आले. या संपूर्ण काळात कडी येथे सरकार आणि पंचायतीने मिळून ६,०४,३५० एककांमध्ये काम केले. अमरेली मध्ये हीच संख्या १६,०७,१२८ होती.

## न मागता दिलेली मदत

१) गावांमधील वृद्ध आणि निराधार लोकांना नियमितपणे शिधा वाटप करण्यात आला. या कामासाठी १ लाख रुपये मंजूर करण्यात आले होते; परंतु १,९६,३८१ एककांच्या मदतीसाठी या १ लाखातील १२,४९७ रुपये खर्च करण्यात आले. दररोज सरासरी ७२९ लोकांना मदत करण्यात आली. महाराज आणि महाराणी यांच्या खाजगी बटव्यातून हा निधी देण्यात आला. अमरेली जिल्ह्यातील दुष्काळ निवारण कामांवर अवलंबून असणाऱ्या सर्व गरीब लोकांना डिसेंबर १९११मध्ये कपडे देण्यात आले. मार्च महिन्यात महाराजांच्या वाढदिवशी सर्व कामगार आणि दुष्काळ निवारण कामांवर अवलंबून असणाऱ्या लोकांना जेवण आणि कपडे देण्यात आले. मार्च महिन्यात महाराज आणि

महाराणींनी अमरेली जिल्ह्यातील दुष्काळ निवारण कामांना भेट दिली. तेव्हा महाराजांनी सर्व मजुरांना आणि कामांवर अवलंबून असणाऱ्या लोकांना दुप्पट वेतन देण्याचे आदेश दिले तर महाराणींनी गरिबांना कपडे वाटले. उन्हाळ्यात ऊन खूप वाढल्यामुळे दुष्काळ निवारण काम करणाऱ्या मजुरांना तापलेल्या मातीपासून बचावासाठी बूट आणि सँडल देण्यात आले. अशा प्रकारे खानगी निधीतून अमरेलीमध्ये १,८०० रुपये, तर कडी जिल्ह्यामध्ये १,२०० रुपये खर्च करण्यात आले.

### टंचाई भत्ता

अमरेलीमध्ये अन्नपदार्थांचे भाव वाढल्यामुळे मामुली काम करणाऱ्या लोकांना मासिक टंचाई भत्ता देण्यासाठी १८,०९९ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

### कलाकारांना कर्ज

अमरेली जिल्ह्यात कलाकारांना आणि इतर व्यावसायिक वर्गाला तगाई अग्रिम (कर्ज) देण्यासाठी ४०५ रुपये खर्च करण्यात आले.

### गिरासियांना कर्ज

अमरेलीतील गिरासियांना कर्ज देण्यासाठी सरकारने मोठी रक्कम मंजूर केली. त्यांच्या गिरास जमिनी गहाण ठेवून घेऊन त्यांना हे कर्ज देण्यात आले. १५४ गिरासियांना देखभालीसाठी कर्ज मिळाले आणि ही रक्कम १४,७४५ रुपये होती.

### इनामदारांच्या रयतांना कर्ज

इनामी आणि एका अनकडी गावामधील जनतेला त्यांच्या जमिनी गहाण ठेवून घेऊन कर्ज देण्यात आले, तगाई कर्ज देण्यात आले. इनामदारांच्या रयतेने कर्जाची मागणी केल्याची माहिती प्रथम इनामदारांना देण्यात आली.

### एकूण खर्च

दुष्काळग्रस्त असलेल्या ०३ जिल्ह्यांसाठी ३१,३५,००० निवारण निधी मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी २०,७३,२९९ रुपये खर्च करण्यात आले. *(B.A.R., 1911-12).*

### ७) इ.स. १९१५-१६

इ.स.१९१५-१६ वर्षीचा मान्सून चांगला होता. जूनमध्ये सर्वच जिल्ह्यांमध्ये पुरेसा पाऊस पडला. त्यामुळे शेतीची कामे जोमाने सुरू झाली. जुलैच्या सुरुवातीलासुद्धा थोडा पाऊस झाला; परंतु जुलैच्या शेवटी, संपूर्ण ऑगस्ट आणि सप्टेंबरचे काही दिवस कडी आणि अमरेली जिल्ह्यात अजिबात पाऊस पडला नाही. त्यामुळे शेतात केलेली पेरणी वाया गेली. नवसारी आणि बडोदा जिल्ह्यांमध्ये चांगला पाऊस होता; पण कडी आणि अमरेली जिल्ह्यांमधील स्थिती चिंताजनक होती. कोणत्याही जिल्ह्यात नोंद घेण्याइतपत अन्नधान्याचे भाव वाढले नाही; चाऱ्याचे भाव मात्र वाढले.

ऑगस्टच्या सुरुवातीपासून शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे असलेल्या जादा जनावरांची विक्री करण्यास सुरुवात केली. आठवडा दर आठवडा पाटण येथील आठवडी बाजारात गायी, म्हशी आणि बैलांची संख्या वाढत होती. नेहमीपेक्षा अर्ध्या किमतीमध्ये गुरे विकली जाऊ लागली. त्यामुळे चारा उपलब्ध करून देणे अतिशय तातडीचे आणि महत्त्वाचे होऊन बसले.

सर्वांत प्रथम सरकारी जमिनीवरील आणि गायरान जमिनीवरील गवताचा लिलाव बंद करण्यात आला. या जमिनीवर लोकांना मोफत गुरे चरावयाची परवानगी देण्यात आली. नंतर असे लक्षात आले की, या दोन जिल्ह्यांमधील लोकांना नैतिक बळ देण्यासाठी मोफत तगाई देणे आवश्यक आहे. सप्टेंबर १९१५ च्या दुसऱ्या आठवड्यात कडी जिल्ह्याचा दौरा केल्यानंतर निंबाळकरांना असे दिसून आले की, पावसाने दडी मारल्यामुळे चाऱ्याची गंभीर टंचाई निर्माण होऊ शकते; आणि वेळीच उपाययोजना केली नाही तर जिल्ह्यातील गुरांचे मोठे नुकसान होऊ शकते.

त्यामुळे तातडीने निर्णय घेऊन, गवत विकत घेऊन कडी जिल्ह्यांमधील रेल्वे स्टेशनवर पाठवण्यात आले. या नंतर लगेच संपूर्ण संस्थानात २५ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर पाऊस झाला आणि वातावरण प्रफुल्लित झाले. अगदी वेळेवर आलेल्या या पावसामुळे शेतकरी शेतात ज्वारी, गहू, करडी, तेलबिया आणि इतर पिके घेऊ शकले. चाऱ्याच्या वाढलेल्या किमती एकदम कमी झाल्या आणि लोकांच्या मनातील भयंकर दुष्काळाची भीती दूर झाली. सर्व तालुक्यांमध्ये अन्नपुरवठा चांगला होता आणि किमतीही सामान्य होत्या. याचे कारण होते, नंतर पडलेल्या पावसामुळे घेतलेले ज्वारीचे पीक आणि जावनपोर व इतर ठिकाणांहून बाजरी व डाळी आयात केल्या होत्या. या बाजरी व डाळी अरेबियाला निर्यात करण्यात येत; मात्र महायुद्ध असल्यामुळे या जिल्ह्यांमध्येच ठेवण्यात आल्या व मागील वर्षीपेक्षा त्यांच्या किमतीमध्ये चार ते सहा आणे कपात करण्यात आली. गरजू लोकांना, बेरोजगारांना भरपूर काम उपलब्ध होते आणि गुन्हेगारीत वाढ झाली नव्हती. भिकारी रस्त्याने फिरताना दिसत नव्हते. फक्त गवताची मागणी थोडी वाढली होती. बाकी या वर्षी काहीच वेगळे घडले नाही. तरीही दुष्काळ निवारणासाठी पुढील उपाययोजना करण्यात आल्या.

## केलेल्या उपाययोजना

१) तगाई देणे
२) चारा पुरविणे
३) पिण्याचे पाणी पुरविणे
४) दुष्काळ निवारण कामे करणे
५) जमीन महसूल स्थगित करणे
६) इतर

## तगाई

१) ४,४४,००० रुपये कडी जिल्ह्यासाठी व १,३३,००० रुपये अमरेली जिल्ह्यासाठी शेतकऱ्यांना तगाई देण्यासाठी मंजूर करण्यात आले.

२) विहिरी खोदणे, पुनर्भरण करणे, चारा खरेदी करणे, जनावरे, बी-बियाणे आणि शेतीसाठी लागणारी औजारे खरेदी करण्यासाठी हे तगाई कर्ज देण्यात येत असे. तगाई कर्ज व्याजाशिवाय दिले जात असे. शिवाय नेहमीच्या पद्धती जसे की तारण, साक्षीदार याचीही या कर्जाला आवश्यकता नसे. या पद्धती स्थगित किंवा बदलण्यात येत असत.

३) कडी जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमेपैकी २५,००० रुपये ऑइलचे इंजिन पंप खरेदी करण्यासाठी विविध महालांमधील सहा खातेदारांना अग्रिम म्हणून देण्यात आले.

४) तगाई कर्ज देण्यासाठी खर्च करण्यात आलेली निव्वळ रक्कम कडी जिल्ह्यासाठी ३,५१,५५९ आणि अमरेली जिल्ह्यासाठी ९४,८६६ रुपये मंजूर करण्यात आले.

५) तगाई कर्ज हा दुष्काळ निवारणाच्या प्रत्येक मोहिमेतील नैतिक बळ देणारा भाग आहे. मुक्तहस्ते तगाई कर्ज दिल्यामुळे ते शेतकऱ्यांना एक वरदान ठरले

## चारा

एक हजार पौंड चाऱ्यासाठी साधारण १ ते ६ रुपये आकारले जात. मात्र या दुष्काळात ते ३० रुपयांपर्यंत वाढले. आणखी वाढतील असा अंदाज होता. त्यामुळे चारा खरेदी करण्यासाठी १,००,००० रुपये मंजूर करण्यात आले.

## पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

१) कडी आणि अमरेली जिल्ह्यांमध्ये अशी गावे आहेत जिथे नेहमी पाण्याची टंचाई असते. शेती विभाग या गावांना पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न करत आहे; परंतु अद्याप काही गावांना पाणी मिळाले नाही. यावर्षी अपुऱ्या पावसामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होईल अशी भीती व्यक्त केली जात होती. त्यामुळे वेळीच उपाययोजना करण्यात येत होत्या.

२) कडी जिल्हा स्थानिक बोर्डाने गरज असेल तिथे पाणीपुरवठ्यासाठी ३०,२५० रुपये निश्चित केले व त्यात सरकारने १०,००० रुपयांची भर घातली. विहिरी खोदण्याच्या सामग्री (यंत्र सामग्री) चे ७ संच जिल्हा बोर्डाने तर ७ संच शेती विभागाने वापरून ९५ विहिरी खोदल्या. त्यापैकी ८० विहिरी यशस्वीपणे खोदल्या गेल्या व त्यांना पाणी लागले. जिथे विहिरी नाहीत तिथे नदीच्या पात्रात किंवा तळयात तात्पुरते खड्डे खोदून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. यासाठी अमरेली जिल्ह्यात १०,७४३-१२-१० रुपये खर्च करण्यात आले.

३) गावातील टाक्यांमध्ये पाणी नसल्यामुळे विहिरीमधील पाण्याचा उपसा करून गुरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. एकूण काय तर, माणसांना आणि प्राण्यांना, जनावरांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यात आले.

४) कडी जिल्ह्यात दुष्काळ निवारणाची कामे करण्यासाठी स्थानिक बोर्डाने दिलेल्या ५६,४९४ रुपयांसह १,८७,२८३ रुपये मंजूर करण्यात आले, तर अमरेली जिल्ह्यासाठी १,००,००० रुपये देण्यात आले. चाचणी कामे सुरू झाली; पण मजुरांअभावी ती लवकरच बंद करण्यात आली. यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे अन्नधान्याच्या किमतीमध्ये वाढ झाली नव्हती. जास्तीत जास्त लोकांना विहीर पुनर्भरण, खत वाहून नेणे, घराचे बांधकाम करणे व इतर खाजगी कामे भरपूर प्रमाणात उपलब्ध होती. त्यामुळे दुष्काळ निवारण कामांसाठी अगदी ४ किंवा ५ आणे प्रति दिवस मजुरीवरही कोणीच काम करण्यास तयार नव्हते.

## जमीन महसूल स्थगिती

सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात पडलेल्या पावसामुळे स्थिती थोडी सुधारली; मात्र पाऊस सगळीकडे सारखा न पडल्यामुळे काही ठिकाणी दुष्काळ होता. शेतीचे उत्पन्न कमी प्रमाणात झाल्यामुळे कडी आणि अमरेली जिल्ह्यातील काही गावांमध्ये पूर्ण किंवा अंशत: जमीन महसूल स्थगित करण्याची आवश्यकता होती. कडी जिल्ह्यात स्थगित केलेल्या जमीन महसुलाची रक्कम ८,७४,५१७-६-२ होती, तर अमरेली जिल्ह्यात हीच रक्कम १,९९,९६८-७-२ इतकी होती. या शिवाय मागील वर्षीची थकबाकीसुद्धा स्थगित करण्यात आली. जमीन महसूल वसुलीसाठी कोणत्याही उपाययोजना करण्याची आवश्यकता यावर्षी तरी भासली नाही.

## इतर

जनावरांच्या चाऱ्यासाठी लागणाऱ्या पिकांच्या लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने कडी आणि अमरेली जिल्ह्यांमध्ये पाणी कराचे नेहमीचे नियम स्थगित करण्यात आले. यासाठी ४,१००-४-० रुपये महसुलाचा तोटा झाला. बेवारस, पडीक जमिनींवर लागवड करण्यासाठी परवानगी देण्यात आली. या जमिनींवर उत्तम प्रकारे चारा पिकांची लागवड करणाऱ्यांना बक्षिसे जाहीर करण्यात आली. कडी जिल्ह्यातील मेहसाना, पट्टण आणि चनास्मा व अमरेली जिल्ह्यातील अमरेली व रतनपूर येथे बियाणांची कोठारे उघडण्यात आली. या कोठारांची खास गोष्ट म्हणजे सरकारने बियाणे खरेदीसाठी पैसा पुरवला व त्यांच्या विक्री व वाटपासाठी खाजगी लोकांची नेमणूक करण्यात आली होती. ११०-४-७ या अगदी नाममात्र दरात लोकांना ज्वारी, कापूस व कडधान्यांचे बियाणे उपलब्ध करून देण्यात आले.

## खर्च

दुष्काळ निवारण कार्यासाठी एकूण ६,५०,०२८-१४-११ रुपये खर्च करण्यात आले. *(B.A.R., 1915-16)*

## ८) इ.स. १९१८-१९१९

मे आणि जून १९१८ मध्ये नवसारी जिल्ह्यात थोडा पाऊस झाला; परंतु बाकी जिल्ह्यात फारच कमी झाल्यामुळे पेरण्यांना उशीर झाला. जुलैमध्ये परिस्थिती थोडी सुधारली; परंतु सगळीकडे समप्रमाणात पाऊस पडला नाही. ऑगस्टमध्ये चांगला पाऊस झाला; पण सप्टेंबर महिन्यात फार कमी आणि ऑक्टोबर महिन्यात पाऊस झालाच नाही. ओखामंडल भागात एक इंचही पाऊस न झाल्यामुळे तिथे दुष्काळ निवारण कार्य पुन्हा सुरू करावे लागले.

## उपाययोजना

टंचाई आणि दुष्काळग्रस्त भागांमध्ये तात्काळ उपाययोजना करण्यात आली.

१) कर्ज देणे (तगाई)

२) स्वस्त धन्य दुकान

३) अन्नधान्य व चारा पुरवठा

४) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

५) दुष्काळ निवारण कार्य

६) गुरे छावण्या

७) गरीबगृहांना सर्व प्रकारची मदत

८) जमीन महसूल स्थगिती व माफी

## तगाई

१) शेती करण्यासाठी, विहीर पुनर्भरण, विहीर खोदण्यासाठी आणि शेतीची इतर कामे करण्यासाठी खेडुतांना स्वयंपूर्ण करण्याच्या हेतूने मुक्तहस्ते तगाई कर्ज वाटप करण्यात आली. यासाठी बडोद्यासाठी १,७०,००० रुपये, कडीसाठी ३,००,००० रुपये आणि अमरेली जिल्ह्यासाठी २,९७,००० रुपये मंजूर करण्यात आले. हे कर्ज व्याजाशिवाय देण्यात येत असे. याशिवाय बडोदा जिल्ह्यातील विविध महालांतील ६ खातेदारांना ऑईल इंजिन खरेदीसाठी २४,००० रुपये अग्रिम देण्यात आले.

२) अन्नधान्याच्या किमती प्रमाणाबाहेर वाढल्यामुळे गरिबांना दिलासा देण्यासाठी स्वस्त धान्य दुकाने उघडण्यात आली, जिथे बाजारभावापेक्षा कमी भावात धान्य विक्री केली जात असे. यामुळे खाजगी व्यापार करणाऱ्यांनाही गरिबांची मदत करता येत असे. कमी भावात धान्य विक्री केल्यामुळे झालेला अर्धा तोटा महाराजांच्या खानंगी निधीतून

गरिबांच्या मदतीसाठी बाजूला काढलेल्या १० लाख रुपयांमधून भरून काढण्यात येईल असे आश्वासन सरकारने दिले.

३) दुकानदारला तोटा झाल्यास खानगी देणग्यांमधून भरून काढण्यात येईल. या योजनेला भरपूर प्रतिसाद मिळाला. जवळपास सगळ्याच तालुक्यांमधून आणि महत्त्वाच्या शहरांमधून देणग्या गोळा करण्यात आल्या आणि गोळा झालेली ७२,२४६ रुपयांची रक्कम महाराजांच्या रकमेत जमा करण्यात आली. कष्टकरी गरीब वर्गाला यामुळे मोठा दिलासा मिळाला. त्यांना कमी भावात धान्य खरेदी करण्याची सुविधा प्राप्त झाली. स्वस्त धान्य दुकाने बडोदा, पेटलाद, संजित्रा, सिनॉर, वसो, पाटण, कालोल, अमरेली, दामनगर, धारी, द्वारका, बेएत (Beyt) सह इतर अनेक ठिकाणी उघडण्यात आली.

चारा पुरवठा

१) दुष्काळादरम्यान लोकांची झालेली सगळ्यात मोठी अडचण म्हणजे चारा टंचाई. अन्नधान्य टंचाईवर आयातीद्वारे मात करता आली; मात्र चारा मिळवणे सोपे नव्हते. मुंबई विभागात सुद्धा चारा टंचाई असल्यामुळे मुंबई सरकारने चाऱ्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. त्यामुळे संस्थानात चारा पुरवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अमरेली जिल्ह्यासाठी गीर जंगल आणि बडोदा व कडी जिल्ह्यांसाठी नवसारी जंगल होता. मात्र दुष्काळाची चाहूल लागताच कृषी विभागातर्फे नागपूर येथील लष्करी दुकानातून २५० टन चाऱ्याच्या पेंड्या आयात केल्या व १ रुपया प्रति मणाप्रमाणे बडोदा जिल्ह्यात विकल्या. या व्यवहारामुळे ५,८५७ रुपयांचा तोटा झाला. सुदैवाने नवसारी जिल्हा आणि गीर जंगल नेहमीपेक्षा जास्त गवत देऊ शकले. कडी जिल्ह्यातील मागील वर्षाचे जादा गवत आणि या वर्षीचे गवत उत्पादन समाधानकारक होते. अपवाद फक्त देहगाव, कालोल आणि कडी तालुक्यांचा होता.

२) नवसारी जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या सर्व गवतावर नियंत्रण ठेवून ५० लाख lbs गवत दुष्काळ विभागाच्या वतीने सरकारने स्थापन केलेल्या कोठारांना पाठविण्यात आले. ही कोठारे बडोदा जिल्ह्यात विविध ठिकाणी व कडी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये उघडण्यात आली होती. शेतकऱ्यांना हे गवत ११/२ मणासाठी १ रुपया याप्रमाणे उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे सरकारला २७,५९४ रुपयांचा तोटा झाला. नागरी सुविधा संचालकांनी तातडीचे पत्र काढल्यामुळे १ कोटी lbs गवत नवसारी जिल्ह्यातून व्यापारी आणि खातेदारांना देण्यात आले. संस्थानातील लष्करासाठी बडोदा शहरातून सरकारने ३० लाख lbs पेक्षा जास्त गवत आयात केले. हे गवत आणि नवीन उगवण्यात आलेले गवत गुरांसाठी पुरेसे ठरले. अमरेली जिल्ह्याबाबत बोलायचे तर, गिदारदी (गीर) जंगलातून ४ लाख lbs गवत कापून द्वारकेला रवाना करण्यात आले. रस्त्याच्या मार्गाने हे गवत अगोदर जाफ्राबाद व नंतर देशी जहाजाद्वारे पुढे पाठवण्यात आले. त्यामुळे

त्याची किंमत १,००० lbs साठी ४० रुपये इतकी झाली; परंतु महाराजांच्या सरकारने ते गवत ६० रुपये lbs साठी १ रुपयाप्रमाणे विक्री करण्याचे आदेश दिले. त्यामुळे ७,०३९ रुपयांचा तोटा झाला. यामुळे ज्या लोकांची खरेदी करण्याची क्षमता आहे, त्या लोकांसाठी गवत उपलब्ध करून देण्यात आले; परंतु कडी आणि बडोदा जिल्ह्यात रबारी लोकांचा मोठा वर्ग होता, ज्यांच्याकडे भरपूर जनावरे होती; पण चारा विकत घेण्यासाठी पैसे नव्हते. त्यांच्या जनावरांच्या चराईसाठी नवसारी आणि गीर जंगलांमध्ये मोफत व्यवस्था करण्यात आली. ८,३५४ रुपये खर्च करून अनेक गुरे छावण्या उभारण्यात आल्या. तिथे गुरांना व माणसांनाही वैद्यकीय मदत देण्यात येत असे. बडोदा आणि कडी जिल्ह्यातील रबारींनी जवळपास १६,००० जनावरांना नवसारी जंगलांमध्ये चराईसाठी नेले. तसेच ४०० अहेरांनी ओखामंडलहून त्यांची गुरे चराईसाठी गीर जंगलामध्ये नेली. दरवर्षी पडीक जमिनींवर गुरे चराईचे हक्क देण्यासाठी लिलाव करण्यात येतो. मात्र यावर्षी त्या जमिनीवर मोफत चराईसाठी परवानगी देण्यात आली. यामुळे बराच मोठा तोटा झाला, महसूल बुडाला आणि गवत वाहून नेण्यासाठी असणाऱ्या बैलगाड्यांचे भाडेही गीर जंगलातील वन विभागाने बरेच कमी केले.

### पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

१) पाऊस कमी झाला तरीही यावर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवली नाही. मागील वर्षी झालेल्या जोरदार पावसामुळे विहिरींच्या पाण्याची पातळी वाढली होती; परंतु काही ठिकाणी गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न होता. त्यामुळे विहिरीतील पाणी शेंदून त्यांची व्यवस्था करावी लागत होती.

२) नवसारी जिल्ह्यातील जंगलाच्या पट्ट्यात जिथे पाणी टंचाई होती तिथे खड्डे खोदण्यासाठी (तात्पुरत्या स्वरूपात) वन विभागाने १,१९१ रुपये खर्च केले. नवीन विहिरी खोदण्यासोबतच जुन्या विहिरीसुद्धा पाणी पातळी वाढविण्यासाठी खोदण्यात आल्या. पाणीपुरवठा वाढविण्यासाठी शेती विभागाने १४० विहिरी खोदल्या. स्थानिक बोर्डाच्या मदतीने बडोदा, कडी आणि अमरेली जिल्ह्यांमध्ये खोदण्यात आलेल्या या विहिरींपैकी १०५ यशस्वी झाल्या.

### दुष्काळ निवारण कार्य

१) बडोदा, कडी आणि अमरेली जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुष्काळ निवारणाची कामे करावी लागतील असे वाटल्यामुळे सरकारने १५,५०,४९९ रुपये तर स्थानिक बोर्डाने २,२०,५६९ रुपये या कामासाठी मंजूर केले.

२) जिल्ह्यात मंजूर झालेल्या १७ कामांपैकी बडोद्यात २ व अमरेलीत १३ कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने १,१७,५३८ रुपये खर्च करून सुरू करण्याची गरज होती.

या रकमेपैकी एकट्या ओखामंडल महाल येथील दुष्काळ निवारण कामांसाठी ७७,५३४ रुपये खर्च करण्यात आले. या कामावर दररोज सरासरी १,६०० मजूर काम करत होते. मुख्य कामे म्हणजे वनकिया बंधाऱ्याची दुरुस्ती, खंबा-गडियाचवाड आणि थीमगाजा-मुलवेल रस्त्याचे बांधकाम आणि अमरेली जिल्ह्यात द्वारका रेल्वेसाठी लोखंड फोडण्याचे काम हाती घेण्यात आले.

## गुरे छावण्या

गवत पुरवठा आणि मोफत चराईची व्यवस्था करूनही काही लोकांना घरी गुरांची काळजी घेणे किंवा त्यांना चराई क्षेत्रापर्यंत घेऊन जाणे शक्य नव्हते. अशा गुरांसाठी खाजगी देणग्या आणि सरकारी निधीतून बडोदा, पेटलाद, पादरा, सांजित्रा, अमरेली, द्वारका, बेएत (Beyt), धारीसह अन्य ठिकाणी गुरे छावण्या उभारण्यात आल्या. यासाठी सरकारने १८,००० रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. गुरांच्या संरक्षणासाठी काही सन्माननीय नागरिकांनी सरकारच्या परवानगीने 'गो-रक्षा' लॉटरी सुरू केली. यामुळे गुरांना चारा वाटप करण्यासाठी, बडोद्यात गुरे छावणी सुरू करण्यासाठी व इतर छावण्यांना मदत करण्यासाठी जवळपास १ लाख रुपये उपलब्ध झाले.

## न मागता दिलेली मदत व गरीब गृहांसाठी निधी

आता मोठ्या प्रमाणावर मदतीची आवश्यकता नव्हती; परंतु काही नागरिकांना, विशेषत: ज्येष्ठ आणि अपंग आणि विधवांना काही ठिकाणी, खास करून बडोद्यात धान्याची आवश्यकता होती, त्यामुळे सरकारने २४,२२५ रुपये धान्यासाठी, २,९७० रुपये कपड्यांसाठी व ५,६०० रुपये गरीब गृहांसाठी दिले. अमरेली व धारी येथे खाजगी देणग्यांतून ही गरीब गृहे सुरू करण्यात आली होती.

## जमीन महसूल माफी व स्थगिती

अर्ध्या पिकांचे नुकसान झाल्यामुळे सरकारने २,१०,०३७ रुपयांपर्यंतचा जमीन महसूल माफ केला व ३६,११,५२० रुपयांपर्यंतचा जमीन महसूल स्थगित केला. शेतकऱ्यांना चारा पिके घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने पाणी शुल्क आणि इतर शुल्क माफ करण्यात आले. बडोदा, कडी आणि अमरेली जिल्ह्यात केलेल्या या उपक्रमामुळे सरकारला ५,९५१ रुपयांच्या महसुलाचा तोटा झाला.

## खर्च

दुष्काळ निवारणासाठी उपाययोजना करण्यासाठी सरकारला एकूण १०,७३,३६७ रुपये खर्च आला.

### टंचाई भत्ता

नोकरांना दिला जाणारा प्रति महिना २ रुपये टंचाई भत्ता ३० रुपयांपर्यंत पुढे संपूर्ण वर्षभर देण्यात आला. आणि त्यासाठी संस्थानाला ६,०८,६९६ रुपयांचा भार पडला. *(B.A.R., 1918-19).*

### ९) पूरग्रस्तांना मदत (१९२७-२८)

अरबी समुद्रात आलेल्या वादळामुळे चार दिवस प्रचंड वाऱ्यासह मुसळधार पाऊस सतत पडल्यामुळे १९२७ च्या जुलै महिन्यात बडोदा आणि आसपासच्या गावांत पूर आला. कॅम्बेच्या खाडीमध्ये भयंकर वादळ आल्यामुळे हा पूर आला आणि ब्रोच, कैश व अहमदाबाद हा ब्रिटिश गुजरातमधील भाग व संस्थानातील बडोदा आणि कडी जिल्हे या नैसर्गिक आपत्तीखाली आले. या चार दिवसांमध्ये बहुतांश ठिकाणी नेहमीपेक्षा जास्त पाऊस पडला. वाघोडियामध्ये २० ते ५५ इंच पावसाची नोंद करण्यात आली. सखल भागातील गाळ असलेल्या जमिनीवर असलेले नाले या पावसाचा भार सहन न करू शकल्याने, सगळीकडून नदी-नाल्यातून प्रमाणाबाहेर पाणी वाहिल्यामुळे पूर आला. हे सगळे इतके अचानक घडले, की लोकांना तातडीने केवळ जवळच्या ठिकाणी आसरा घ्यावा लागला. त्यामुळे त्यांना आपली घरेदारे, जनावरे व साधन संपत्ती सोडून जीव वाचवण्यासाठी पलायन करावे लागले.

पूर येण्यापूर्वी मोसम सामान्य होता. दहा दिवसांपूर्वी संस्थानात सर्वत्र जोरदार पाऊस झाला आणि विश्वामित्रीला १३ आणि १४ जुलैला पूर आला; परंतु २४ आणि २८ जुलैच्या दरम्यान ३९ इंच पावसाची नोंद शहरात झाली, इतर ठिकाणी आकडा वर-खाली होता; परंतु वाघोडिया मध्ये ५५ इंच पर्जन्यमानाची नोंद झाली.

बडोदा जिल्ह्यातील सवली आणि वाघोडिया तालुक्यात आणखी एक पंधरवडा संपूर्ण पावसाचा जोर होता. पुरानंतर हा पाऊस बरसला. माऊंट अबू भागात वादळी वारे आणि इतर समस्या निर्माण झाल्यामुळे ऑगस्टच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात कडी जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागाला हानी पोहोचली.

### शहरे आणि गावांमधील स्थिती

रविवार, २४ जुलैच्या संध्याकाळी वादळ आले. सोमवारी धुवांधार पाऊस आला. दुपारपर्यंत शहर आणि विश्वामित्रीच्या आसपासच्या भागांचा संपर्क तुटला. त्याच वेळी बडोदा आणि इतर ठिकाणांचा रेल्वे संपर्क ही बारगळला. टेलिग्राफ आणि टेलिफोन दूरध्वनी बंद पडले. त्यामुळे मुंबई आणि सुरतला मदत मागणारे टेलिग्राम पोचू शकले नाहीत. त्यांना स्टीम बोटींची मागणी सुद्धा करण्यात आली होती. सोमवार संध्याकाळपर्यंत बडोदा संपूर्णपणे एकाकी झाले आणि बडोद्यात नेमके काय झाले, कशाप्रकारचे संकट आले हे बाहेरच्या जगाला कळण्यापूर्वीच अतिशयोक्तीपूर्ण अफवांचे पेव फुटले; आणि त्या सर्वत्र पसरल्या. त्यापैकी एक म्हणजे, सयाजी

सरोवर धरण फुटून बडोदा शहराचा काही भाग वाहून गेला आहे. २५ तारखेच्या रात्रीपासून शहराची अवस्था वाईट होत चालली होती. सयाजीगंज भाग दोन्ही बाजूंनी पाण्याखाली आला होता आणि रेल्वे सेवा विस्कळीत झाली होती. सार्वजनिक उद्यानाचीही मोठी हानी झाली. तिथे असलेल्या प्राण्यांपैकी कोणीच वाचले नाही. वस्तुसंग्रहालयाची इमारतही उद्‌ध्वस्त झाली. संस्थानाच्या सार्वजनिक रुग्णालयातील रुग्णांना पहिल्या मजल्यावर हलविण्यात आले. शहराचे इतर भाग जसे की फत्तेपुरा, दांडिया बाजार आणि नवीन गोलवड भागाचे खूप नुकसान झाले. २६ तारखेला पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा खंडित झाला. खेड्यांचीसुद्धा हीच अवस्था होती. झोपड्या कोसळल्या आणि लोकांना गावांच्या शाळेत व इमारतींमध्ये आसरा शोधावा लागला. काही ठिकाणी स्त्रियांनी आणि लहान मुलांनी मोठ्या झाडांवर तीन तीन दिवस काढले आणि त्यांची सुटका होण्यापूर्वी त्यांचे फारच हाल झाले. मही नदीच्या काठावर असलेल्या गावातील लोकांचे तर वाईट हाल झाले. संपूर्ण गावेच्या गावे वाहून गेली आणि सर्वांत जास्त मनुष्यहानी या ठिकाणी झाली. दूध आणि दुधापासून तयार होणाऱ्या पदार्थांचे माहेरघर असलेल्या, जास्त लोकसंख्या असलेल्या आणि खूप मोठ्या प्रमाणात लागवडीखाली क्षेत्र असलेल्या पेटलाद भागाचे नुकसान तर झालेच; पण येथील मोठ्या प्रमाणावर असलेली गुरेही दगावली.

### शहरात आणि इतर भागात मदतकार्य

अधिकारी आणि अधिकारी नसलेल्या लोकांनीही सर्व प्रकारच्या मदत कार्यात भाग घेतला. शहरात सर्वांनी मिळून काम केले. वर्क शॉपमध्ये तराफे तात्काळ तयार करण्यात आले. हत्ती आणि बग्गीखाने कामाला लावले आणि उपलब्ध असलेल्या बोटी वापरण्यात आल्या. स्थानिक आखाड्यातील तरुण पैलवानांनी वेळप्रसंगी स्वत:चा जीव धोक्यात घालून घरात किंवा घरांच्या छतावर व झाडांवर अडकलेल्या लोकांचे प्राण वाचविले. जामिनावर काही काळासाठी तुरुंगाबाहेर असलेल्या ९ कैद्यांनी या कामात खूप सहकार्य केले. सगळीकडे मदतकार्य युद्धपातळीवर सुरू होते आणि यामुळेच की काय पुराच्या महाभयंकर स्वरूपाच्या तुलनेत मनुष्यहानी कमी झाली होती.

### निराधार लोकांची अन्न व निवाऱ्याची सोय

निराधार आणि बेघर लोकांना तात्काळ मदत पुरविणे आवश्यक होते. सर्व सार्वजनिक इमारती, छोरा शहरात व जिल्ह्यात सर्व धर्मशाळा आणि जातींच्या वाड्या सर्व नागरिकांसाठी खुल्या करण्यात आल्या व सामाजिक भान असणाऱ्या बऱ्याच जणांनी या लोकांना अन्न व वस्त्राचे वाटप केले. सरकारने ५०,००० रुपये मंजूर केले व ही रक्कम त्यांच्या अधिकाऱ्यांच्या व सर्वत्र तयार करण्यात आलेल्या स्थानिक समित्यांच्या ताब्यात दिली. दरम्यान, बाहेरून खूप मोठ्या प्रमाणावर मदत येत होती. मुंबई, पुणे, सुरत, नवसारी आणि इतर ठिकाणांहून मदत येत होती. खूप कमी वेळातच सर्व पूरग्रस्तांना अन्न, वस्त्र व तात्पुरता निवारा देण्यात आला.

## आरोग्यासंबंधीची उपाययोजना आणि शहर व आसपासची स्वच्छता

२८ तारखेला पूर ओसरू लागला; मात्र मागे अस्वच्छता आणि घाण ठेवून गेला. शहरात भीतीचे वातावरण होते. कारण माणसांचे व प्राण्यांचे मृतदेह शेतात, रस्त्यावर व इतर अनेक ठिकाणी विखुरले होते.

शहरात सगळीकडे इमारती पडून ढिगारे साचले होते. सडलेले धान्य दुकानांच्या व घरांच्या बाहेर फेकलेले होते. पाणीपुरवठा खंडित झाला होता आणि वीजपुरवठा बंद झाला होता. सगळ्या उपलब्ध संस्थांना स्वच्छतेचे व आरोग्यासंबंधी उपाययोजना करण्याचे काम देण्यात आले. पाणीपुरवठा २४ तासात सुरळीत करण्यात आला, ३ ते ४ दिवसांमध्ये जलनिस्सारण व्यवस्था पूर्ववत करण्यात आली आणि अतिशय घाण झालेले भाग स्वच्छ करण्यात आले. या उपाययोजनांमुळे शहर महामारीपासून वाचवण्यात आले. दुसऱ्या शहरांमध्ये पंचायती आणि सरकारने अशाच प्रकारचे काम केले. शहरांमध्ये, गावांमध्ये आरोग्य तपासणी करणे, विहिरी निर्जंतुक करणे आणि नागरिकांचे व गावकऱ्यांचे आरोग्यासंबंधी उद्बोधन करणे यासाठी सरकारने ८ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एक पथक तयार केले.

## अन्नपुरवठा व फायदा मिळवणे

शहरात अन्नपुरवठ्याची टंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात येत होती. त्यामुळे व्यापाऱ्यांनी याचा फायदाही मिळवला असता. त्यामुळे कोणी टंचाईचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला तर सरकार किमतीवर निर्बंध घालणार अशी सूचना काढण्यात आली; परंतु सुदैवाने असे काही करण्याची गरज भासली नाही. स्थानिक साठ्यातून १० दिवस व्यवस्थित अन्नधान्य पुरवठा झाला व मुंबईशी संपर्क सुरू झाल्यानंतर तिथून नवीन पुरवठा सुरू झाला.

## नुकसानीचा आढावा

संपर्क सुरळीत होताच बडोदा आणि कडी जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांना मनुष्यहानी, जनावरांची हानी, संपत्तीची व पिकांची हानी याबाबत सविस्तर माहिती गोळा करून अहवाल तयार करण्यास सांगण्यात आले. बडोदा जिल्ह्यातील शैक्षणिक अधिकाऱ्यांना त्यांच्या शिक्षकांना घरोघरी जाऊन जनगणना करावी असे आदेश देण्यात आले.

### १) मनुष्यहानी

बडोदा शहरामध्ये ६० व्यक्ती मृत्युमुखी पडल्या. ४० पुरात वाहून गेले व इमारत अंगावर कोसळून २० जण मरण पावले. जिल्ह्यात एकूण ५२ मृत्यू झाले. ३९ पुरात वाहून गेले आणि १३ इमारतीखाली मरण पावले. कडी जिल्ह्यात १५ मृत्यू झाले. १४ इमारती कोसळल्यामुळे, घरे पडल्यामुळे मरण पावले. आणि १ जण पुरात वाहून गेला. एकूण १०७ जण मृत्युमुखी पडले. बडोदा जिल्ह्यात २,३०० जनावरे मरण पावली आणि कडी जिल्ह्यात ६०० जनावरे मृत्युमुखी

पडली. यामध्ये म्हशी आणि इतर जनावरे पुरातही वाहून गेली. या पुरामुळे घरांचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

## २) सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान

शासकीय इमारती, रस्ते, पूल आणि रेल्वे इ. खालून नेलेल्या पाण्याचा पाट, नळ. इ. चे १३ लाख रुपयांच्या वर नुकसान झाले. २९ मैलांपर्यंतची रेल्वे रूळ, २४ पूल आणि रेल्वे रुळानजीक असलेल्या भूमिगत नळांचेही नुकसान झाले. शहरातील पाणीपुरवठा, जलनिस्सारण आणि वीजपुरवठाही सुरळीत करण्याची आवश्यकता होती.

## मदतकार्य उपाययोजना

पुरासंबंधीचे प्रथम विवरण हाती लागताच महाराजांनी मदतकार्याचे आदेश दिले. लोकोपयोगी आणि सर्वांचे हित लक्षात घेऊन उपाययोजना आणि कार्य करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. नदीच्या काठावर आणि इतर ठिकाणी असलेल्या गावांचे पुनर्वसन करण्यासाठी महाराजांनी वैयक्तिक देणगी म्हणून १ लाख रुपये दिले. पुनर्वसन करताना पुढील बाबी करण्यात आल्या -

१) कष्टी लोकांना तात्काळ मदत करणे

२) प्रभावित क्षेत्रांमध्ये पुन्हा पेरणी करणे

३) घरांची पुनर्बांधणी व डागडुजी करणे

४) स्वच्छता आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करणे

५) कष्टी लोकांना तात्काळ मदत करणे

यापूर्वी या मदतीचे विश्लेषण करण्यात आले आहे. पुरानंतर लगेच संकट निवारणासाठी व घरे बांधण्यासाठी १०,००० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

सरकारी जमिनीवरील वृक्ष तोडणे व दगड, खडी, वाळू इ. स्वच्छ करण्याची परवानगी गावकऱ्यांना देण्यात आली. यासाठी १५,००० रुपये खर्च करण्यात आले. त्यातील बहुतांश रक्कम खूप जास्त नुकसान झालेल्या पाद्रा, पेटलाद, भदरन आणि वाघोडिया तालुक्यांमध्ये खर्च करण्यात आली. मदतकार्य करणाऱ्या संस्थांनी लाखो रुपये या कामावर व अन्न, वस्त्र पुरवठा व घरबांधणीसाठी लोखंडी पत्रे तयार करण्यावर खर्च केले. गरीब लोकांना स्वस्त वस्तू गावात खरेदी करता याव्यात यासाठी स्थानिक समित्यांनी जीवनावश्यक वस्तूंची तात्पुरती दुकाने थाटली होती.

कडी जिल्ह्यात सर्वांत जास्त कर्ज रबी हंगामासाठी देण्यात आले. २१,००० शेतकऱ्यांना ४.७० लाखांचे म्हणजे दरडोई सरासरी २२ रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले. म्हणजेच लहान शेतकऱ्यांनी या योजनेचा भरपूर लाभ घेतला.

## कोठारे बियाणे

आता बियाणे मिळवणे व स्वस्त मिळवणे ही समस्या होती. शेती विभागाने बियाणांचे दुकान सुरू केले ते फार उपयुक्त ठरले. आणखी दुकाने दोन्ही जिल्ह्यांमध्ये प्रजामंडळ आणि स्थानिक समित्यांनी सुरू केली. काही दुकाने नेहमीच्या भावाने तर काही स्वस्त दरात बियाणे विक्री करत असत. त्यामुळे नफा अतिशय खाली ठेवण्यात आला होता.

## बियाणे आणि रोपांची संयुक्त खरेदी

छन्नी गावाने बियाणे आणि रोपांच्या संयुक्त खरेदीचा उपक्रम राबवला. छन्नी गाव बडोदा जिल्ह्यात आहे. या गावात बटाट्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. येथे ३०,००० रुपयांची तगाई व्याजाशिवाय देण्यात आली होती. या रकमेतून गावकऱ्यांनी संयुक्तपणे रोपे खरेदी केली. गुणवत्ता व किंमत यांच्या दृष्टीने हा प्रयोग फारच यशस्वी झाला.

## संपूर्ण क्षेत्रात पुन्हा पेरणी करण्यात आली

या उपाययोजनांमुळे पिकांचे नुकसान झालेल्या संपूर्ण क्षेत्रात पुन्हा पेरणी करण्यात आली. ही प्रेरणा उशिरा केली गेली किंवा अयशस्वी झाली, अशा क्षेत्रांमध्ये महसूल स्थगित करण्यात आला.

## घरांसाठी योजना

घरांची दुरुस्ती व पुनर्बांधकाम यासाठी देण्यात आलेल्या सूट व सवलती पुढीलप्रमाणे देण्यात आल्या.

१) गरिबांसाठी मोफत निधी

२) वैयक्तिक आणि सहकारी संस्थांना कर्ज याशिवाय विटा उत्पादनासाठी, बांधकाम साहित्य विक्री, दुकानांसाठी व्याजाशिवाय कर्ज, रेल्वे भाड्यात सूट, बांधकाम साहित्यावरील करात सूट देण्यात आली.

## गरीब लोकांच्या घरबांधणीसाठी मोफत निधी

सर्व प्रकारच्या मदतीशिवाय जे गरीब लोक त्यांच्या झोपड्या दुरुस्त करू शकत नाहीत किंवा बांधूही शकत नाहीत अशा लोकांची स्थानिक समित्यांच्या मदतीने यादी तयार करण्याचे आदेश विशेष अधिकाऱ्यांना देण्यात आले. आलेल्या प्रस्तावांवर विचार करून सरकारने घरबांधणीसाठी एक योजना मंजूर केली. या अंतर्गत ६० रुपयांची मदत, शक्यतो घरबांधणीच्या साहित्याच्या स्वरूपात व काही रक्कम घर बांधणाऱ्या मजुरांच्या मजुरीसाठी देण्यात येणार होती. या कामासाठी सरसुभा यांच्याकडे पुढील रकमांचा प्रस्ताव ठेवण्यात आला २ लाख सरकारी निधी म्हणून ७५,००० बडोद्याच्या दिवाणांच्या दुष्काळ निधीतून ६२,००० बडोदा आणि कडी प्रांत पंचायतींनी दिलेली रक्कम ३,३७,००० एवढ्या मोठ्या रकमा घर बांधणीसाठी दिल्या. महाराजांनी संपूर्ण गावांच्या पुनर्वसनासाठी दिलेल्या रकमेपेक्षा ही रक्कम जास्त होती.

## घरबांधणी निधीसाठी रक्कम

घरबांधणी योजनेचा लाभ घेतलेल्या लोकांची संख्या आणि प्रत्येक जिल्ह्यात गरिबांना घरे बांधून देण्यासाठी खर्च करण्यात आलेली रक्कम एकूण ८,८५० देवून लोकांना मदत करण्यात आली व त्यांना ३ लाख रुपये वाटप करण्यात आले. यामध्ये पुढील बाबींचा समावेश नव्हता.

१) शहर समितीद्वारे शहरांना दिली जाणारी मदत व मागासवर्गीयांसाठी विशेष सहकारी संस्था.

२) पेटलाद शहर जिथे स्थानिक समितीला मदतकार्यासाठी निधी दिला व त्यात स्थानिक निधीची भर घालण्यात आली.

३) पट्टण, विसानगरसारखी इतर ठिकाणे ज्यांना मुंबईत स्थायिक झालेल्या व्यापाऱ्यांकडून मुक्तहस्ते मदत मिळत असे.

## निम्न मध्यमवर्गीयांसाठी मोफत निधी

मुंबई सेंट्रल रिलीफ फंड या निधीद्वारे निम्न मध्यमवर्गीयांना खुल्या हाताने मदत करण्यात आली. घरबांधणीसाठी या समितीने दिलेला निधी वेगळाच ठेवण्यात आला. शहर समितीने या समस्येकडे विशेष लक्ष दिले व या कामासाठी २०,००० रुपये आणि ५,००० रुपये शहरासाठी (शहर समितीच्या प्रशासनाखाली) व १५,००० रुपये खेड्यांसाठी दिले.

## घरबांधणीसाठी कर्ज योजना

वर नमूद केलेली सूट केवळ अतिशय गरीब लोकांसाठी होती. खातेदार आणि इतर लोकांची घरेही पुरामुळे पडली होती किंवा त्यांचे नुकसान झाले होते. उधारीवर काम करूनही त्यांच्या गरजा पूर्ण होणार नव्हत्या. एरवीसुद्धा अगदी कमी व्याजदरात खूप मोठ्या काळासाठी कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही आणि आता या संकटाच्या काळातही ते उपलब्ध होत नव्हते. त्यामुळे सरकारला योजना तयार करणे आवश्यक होते. ही योजना सरकारी अधिकाऱ्यांनी केलेल्या घरांच्या नुकसानीची पाहणी आणि विशेष अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावात जाऊन समक्ष केलेली चौकशी व घेतलेला आर्थिक आढावा या सर्वांच्या आधारे तयार करण्यात येणार होती.

अतिवृष्टी झालेल्या दोन्ही जिल्ह्यांमध्ये १९,१८३ लोकांना २२ लाखांचे कर्ज देण्यात आले. प्रत्येक व्यक्तीला सरासरी ११५ रुपये कर्ज देण्यात आल्यामुळे असे दिसते, की गरीब वर्गात ही योजना फारच प्रसिद्ध झाली. १२५ रुपयांपेक्षा कमी रकमेची असल्यामुळे हे सर्व कर्ज व्याजाशिवाय देण्यात आले.

## सरकारी नोकरांना कर्ज

सरकारी नोकर, निवृत्तीवेतनधारक आणि अस्समदार (Assamdars) ज्यांना ५० रुपयांपेक्षा कमी पैसे महिन्याकाठी मिळतात व ज्यांच्या घरांना पुरामुळे नुकसान झाले आहे अशा लोकांसाठी ६ महिन्यांच्या पगाराएवढी रक्कम घरे पुन्हा बांधण्यासाठी अग्रिम देण्यात आली. ही रक्कम

व्याजविरहित होती व दर महिन्याला त्यांच्या पगारातील २५ टक्के रक्कम परतफेडीसाठी घेण्यात येणार होती. सर्व विभागांतील २२७ सरकारी नोकरांनी या योजनेचा लाभ घेतला व याकरिता ३६,००० रुपये खर्च करण्यात आले.

### अस्समदार (Assamdars) व सरदारांना कर्ज

सरदार आणि अस्समदारांसाठी एक विशेष कर्ज योजना मंजूर करण्यात आली. या योजनेअंतर्गत

अ) वैयक्तिक कर्जाची मर्यादा ३,००० रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली.

ब) १०० रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी ४.२ टक्के व्याज व त्यापुढील रकमेसाठी ५ टक्के व्याज आकारण्याचे ठरले.

क) कर्ज परतफेडीची मुदत १० वर्षांपर्यंत करण्यात आली. १६ अस्समदार व सरदारांना ३४,१०० रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले.

### सहकारी गृहनिर्माण संस्था

वैयक्तिक कर्जाशिवाय सहकारी गृहनिर्माण संस्थांनाही कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली. परिस्थिती पूरक असलेल्या ठिकाणीच हे कर्ज देण्यात आले. प्रबंधक (रजिस्ट्रार) व त्यांच्या सहकाऱ्यांनी अशा प्रकारच्या संस्था शहर आणि मोठ्या गावामध्ये सुरू केल्या, जिथे मोठ्या प्रमाणावर घरे पुन्हा बांधायची होती किंवा दुरुस्त करायची होती. बडोदा शहराबाहेर २२ संस्था स्थापन करण्यात आल्या. ७२८ सदस्य असलेल्या या संस्थांना १.६४ लाख रुपये कर्ज म्हणून देण्यात आले.

### शहरामध्ये विशेष प्रयत्न

बडोदा शहरामध्ये विशेष योजना राबविण्यात आली. येथे अतिशय घाणेरड्या अवस्थेत झोपडपट्टीत राहणाऱ्या मागासवर्गीय लोकांना पुराचा सर्वांत जास्त फटका बसला होता. त्यामुळे त्यांच्या आरोग्याला मोठा धोका होता.

आरोग्य राखण्याच्या दृष्टीने या २३ झोपडपट्ट्यांना परत चांगल्या प्रकारे तयार करण्याची योजना समितीने तयार केली. या योजनेअंतर्गत पाणी निचऱ्याची व्यवस्था, रस्ते, संरक्षित मार्ग, विटांच्या उंच झोपड्या बांधणे इ. कामे करण्यात येणार होती. यासंबंधीच्या लोकांची एक सहकारी संस्था तयार करण्यात आली व त्यांना पुढीलप्रमाणे आर्थिक मदत देण्यात आली. अ) सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी, दिवाण पूर निवारण निधी व इतर संस्थांनी दिलेली रक्कम. ब) कर्ज वर्ष संपेपर्यंत अशा प्रकारच्या २२ संस्था स्थापन करण्यात आल्या आणि ८२,००० रुपये खर्चून ३१५ घरे बांधण्यात आली. ८२,००० रकमेत १५,५७५ रुपये विविध निधींद्वारे, तर ६३,००० रुपये कर्जाद्वारे देण्यात आले. शहरात इतर २५ संस्थांची ८१६ सदस्यांसह नोंद झाली. या वर्षी नोंद झालेल्या संस्थांसाठी ३.८२ लाख रुपयांचे कर्ज देण्यात आले.

## विटा आणि फरशा उत्पादनासाठी सवलत

कर्ज मिळाल्यामुळे घरबांधणीला जोर आला व विटा व फरशांची मागणी वाढली. ती इतकी वाढली की किमती गगनाला भिडण्याची भीती व्यक्त करण्यात येत होती. हे टाळण्यासाठी सर्व गावांमध्ये विटा आणि फरशा तयार करण्याचे ठरवण्यात आले. अनुकूल परिस्थिती असणाऱ्या गावांमध्येच हे काम करण्यात आले. विशेष अधिकाऱ्यांनी अशा प्रकारच्या गावांची निवड करून, आवश्यक असलेल्या जमिनी प्रदान करून विटा व फरशा उत्पादनासाठी स्थानिक पंचायतींच्या मदतीने सर्व व्यवस्था केली. सरकारने पुढील घोषणा केल्या. १) या कामासाठी योग्य असणाऱ्या जमिनी मोफत देण्यात येतील, २) या जमिनींवर असणारे वृक्ष तोडून मोफत वापरण्यात येतील. मात्र वहिवाटदारांच्या नियंत्रणाखाली पंचायतींनी ठरवून दिलेल्या किमतीतच विटांची विक्री करण्यात यावी. या योजनेअंतर्गत विटा व फरशा तयार करण्याचे काम १७४ गावांमध्ये सुरू करण्यात आले व ६८,००० रुपये किमतीचे वृक्ष मोफत देण्यात आले. १ हजार विटांसाठी ७ ते १० रुपये भाव ठरवण्यात आला. आवश्यक असलेल्या विटा आणि फरशांपैकी तीन चतुर्थांश भाग या गावांमध्ये तयार करण्यात आला असा अंदाज आहे.

## बांधकाम साहित्याची कोठारे

बांधकाम साहित्याच्या चढ्या भावाला पायबंद घालण्यासाठी महत्त्वाच्या केंद्रांवर समितीद्वारे बांधकाम साहित्याची कोठारे उघडण्यात आली. याद्वारे गरीब वर्गाला मोफत साहित्यसुद्धा दिले जात असे. या कोठारांना सरकारने व्याजाशिवाय पैसा दिला. अशा प्रकारची ११ कोठारे उघडण्यात आली व १.१५ लाख रुपयांचे कर्ज देण्यात आले. या कोठारांनी साहित्याचा भाव नियंत्रणाखाली ठेवला.

## सरकारतर्फे देण्यात आलेल्या इतर सवलती

१) रेल्वेद्वारे बांधकाम साहित्याची वाहतूक केल्यास मालवाहतूक भाड्यात सवलत देण्यात आली. ही सवलत जून १९२८च्या शेवटपर्यंत सुरू होती व त्यासाठी अंदाजे २ लाख रुपये लागले.

२) बांधकाम साहित्याला शहर करातून सूट आणि कडी जिल्ह्यात लोखंडाच्या पन्हाळी पत्र्यांच्या आयातीवर आयात करातून सूट दिली.

सरकारकडे अशी माहिती पोचली की, तगाई म्हणून घेतलेले कर्ज हुकूमनाम्याला संलग्न करण्यात येत आहे. त्यामुळे नागरी न्यायालयातील हुकूमनाम्याच्या संलग्नीकरणावर व इतर कर्ज देणे किंवा घरे विक्री करण्यावर मे १९२८ पर्यंत स्थगिती देण्यात आली.

## संपूर्ण गावांची पुर्नरचना

पुरानंतर लगेच महाराजांनी नुकसान झालेल्या गावांची पुनर्रचना करण्याचे आदेश दिले. शक्य असेल तर आदर्श तत्त्वांवर गावे पुन्हा वसवण्यात यावी असेही त्यांनी सांगितले. या कामासाठी

दिलेल्या निधीतून जास्तीत जास्त रक्कम वापरण्यात यावी अशी सूचना त्यांनी केली. ८ गावे माही नदीकाठची व १ पेटलाद तालुक्यातील गावे संपूर्णपणे वाहून गेली होती. या गावांना उंच ठिकाणी पुन्हा वसवण्यात आले. त्यासाठी महाराजांनी १,००,००० रुपये दान केले. त्यातून हा खर्च करण्यात आला.

## वैद्यकीय मदत आणि स्वच्छतेसाठी उपाययोजना

पुरानंतर लगेच सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला. शहरामध्ये खाजगी डॉक्टरांच्या मदतीने घरोघरी जाऊन आरोग्याविषयीचे निरीक्षण करण्याची नियमित योजना सुरुवातीचे काही आठवडे राबविण्यात आली. ८ सहाय्यक शल्यविशारदांना संस्थानाच्या दुर्गम भागात पाठवण्यात आले. 'क्विनाईन'हे औषध मोफत वाटण्यात आले. विहिरी व पाण्याचे इतर साठे निर्जंतुक करण्यात आले व मलेरिया विरोधी उपाययोजना करण्यात आल्या. प्रजामंडळ समितींनी मोफत क्विनाईन वाटपासाठी सहकार्य केले.

## महाराजांची पूरग्रस्त भागांना भेट व कामाचे कौतुक

युरोप दौऱ्याहून परतल्यानंतर लगेच महाराजांनी बडोदा आणि कडी जिल्ह्यातील पूरग्रस्त भागांना भेट देऊन पूर निवारण कामांची पाहणी केली. त्यांनी पंचारानिया नावाच्या नवीन गावाची कोनशिलाही ठेवली. ९ एप्रिल १९२८ रोजी महाराजांनी एक विशेष दरबार भरवला आणि पुरादरम्यान काम केलेल्या लोकांचा सन्मान आणि सत्कार केला. हे सन्मान आणि सत्कार राजपुत्र धैर्यशीलराव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या एका समितीच्या शिफारशींवरून देण्यात आले. याप्रसंगी महाराजांनी भाषण केले व आपल्या भाषणात त्यांनी लोकांच्या धैर्याचा, उद्योगशीलतेचा आणि कष्टांचा तर अधिकारी आणि अधिकारी नसलेल्या लोकांमधील सामंजस्य व सहकाराचा उल्लेख केला.

## मदतकार्य करणाऱ्या समित्यांचे उदार सहकार्य आणि अथक परिश्रम

संस्थानात आणि संस्थानाबाहेर पूरनिवारणासाठी अथक परिश्रम करणाऱ्या, उदारपणे मदतकार्य करणाऱ्या समित्यांचा उल्लेख केल्याशिवाय पूरनिवारण कार्याचा अहवाल पूर्ण होऊ शकत नाही. मुंबई सेंट्रल रिलीफ फंडातून १.७८ लाखांची घसघशीत मदत केली. बडोद्याच्या दिवाणांच्या पूरनिवारण निधीतून १.७६ लाखांची तर संस्थानाबाहेरून ६३,५०० रुपयांची मदत मिळाली. ६७,१५० रुपये अमरेली जिल्ह्यातून मदतीच्या स्वरूपात प्राप्त झाले. शहराच्या दुष्काळ निवारण समितीच्या विनंतीमुळे सढळ हाताने मदत मिळाली. अनेक ठिकाणांहून धान्य, कपडे व इतर साहित्याच्या स्वरूपातही मदत प्राप्त झाली.

मदतकार्याच्या प्रत्यक्ष कामात संस्थानात काम करणाऱ्या समित्यांच्या सहकाऱ्यांची खूप मदत झाली. राजपुत्र धैर्यशीलराव यांच्या खंबीर नेतृत्वाखाली तयार करण्यात आलेल्या समितीने व त्याच समितीअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या श्रीमंत राजस्नुषा शकुंतलाराजे

यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या महिलांच्या समितीने, प्रजामंडळाने, विविध केंद्रांनी, स्थानिक समित्यांनी आणि संस्थानातील सर्वच महत्त्वाच्या ठिकाणी असलेल्या समित्यांनी अथक परिश्रम घेऊन सहकार्य केले.

शेवटी जनतेच्या धैर्यामुळे, उद्योगशीलतेमुळे व सहनशीलतेमुळे महाराजांनी सुरू केलेले पूरनिवारणाचे कार्य यशस्वी होऊ शकले *(B.A.R., 1927-28).*

### १०) पूरग्रस्तांना मदत केल्याबद्दल कृतज्ञता


बडोदा राज्यातील किंवा अन्य व्यक्तीने बडोदा राज्यास मदत केल्यास महाराज त्याबद्दल नेहमीच कृतज्ञ राहत. महाराजांनी इ.स. १९२७-२८ च्या पूरामध्ये मदत केल्याबद्दल अनेकांना सन्मानित केले होते. याबद्दलचा मजकूर पूर्वीच आला आहे. इ.स. १९३५-३६ च्या दरम्यान विश्वामित्री नदीला पूर आला. त्यावेळी बडोद्यात कार्लेकर यांच्या सर्कस आली होती. या सर्कसमधील हरी नावाच्या हत्तीने अनेकांचे प्राण वाचवले. त्याबद्दल कार्लेकर यांचे चिरंजीवांनी आठवण सांगितली आहे. 'बडोद्याचे महाराज सयाजीराव हे खरोखर गुणग्राही होते आणि त्यांनी अनेक वेळा आमच्या वडिलांचं कौतुक करून त्यांना बक्षीस दिलं. त्यातलं एक उदाहरण सांगतो, १९३५ मध्ये आमची सर्कस बडोद्याला गेली होती. बडोद्याच्या शेजारी एक डभोई नावाचे गाव आहे, त्या गावाशेजारून विश्वामित्री नदी वहात होती. पावसाळ्याचे दिवस होते. महापूर होता आणि त्या पुरातून अनेक माणसे वाहून चालली होती. तर आमच्या हरी हत्तीने २५ लोकांचे प्राण वाचवले. सोंडेने उचलून पाठीवर टाकायचं आणि नदीच्या किनाऱ्यावर आणून ठेवायचं, असं तो करीत होता. जेव्हा सयाजीराव गायकवाड महाराजांना ही बातमी समजली, तेव्हा त्यांनी हरीला बडोद्याला बोलावून घेतलं. त्याच्या पायात सोन्याचा तोडा घालून बँड लावून त्याची बडोदा शहरातून मिरवणूक काढली. त्यावेळी आमच्या वडिलांना १०,००० रुपयांचे बक्षीस देऊन त्यांचा गौरव केला.' (सृजन संवाद) अशा संकटकाळीच नव्हे; तर सयाजीराव महाराज बडोदा राज्याबद्दल, प्रजेबद्दल सहानभूती दाखवणाऱ्या, आर्थिक किंवा इतर बाबतीत मदत करणाऱ्या, कोणत्याही बाबतीत सहकार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांबाबत नेहमीच कृतज्ञता दाखवत.

सयाजीराव महाराजांनी बडोद्यातील प्रजेला संकटकाळात बडोदा राज्यातील प्रजेबद्दल नेहमीच सहानभूती दाखवली. संकट काळात राज्याची तिजोरी खुली करून प्रजेच्या जीविताला प्राधान्य दिले. त्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण केल्या. मदत केली. यापुढे जाऊन असेही म्हणता येईल की, महाराज संकटकाळात प्रजेचे तारणहार होते.

❍❍❍

प्रकरण ७ वे

# महाराजांची मदत मिळालेल्या काही व्यक्तींची आणि संस्थांची छायाचित्रे



महात्मा जोतिबा फुले




गंगारामभाऊ म्हस्के




लो. बाळ गंगाधर टिळक




डॉ. बाबासाहेब आंबेडकर




महर्षी विठ्ठल रामजी शिंदे




रियासतकार गो. स. सरदेसाई



अरविंद घोष




खासेराव जाधव




रवींद्रनाथ टागोर




बनारस हिंदू विश्वविद्यालय, अलाहाबाद



भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्था, पुणे




डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे




फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे



शनिवारवाडा, पुणे




महाराणी जमनाबाई बोर्डिंग उद्घाटन, सातारा



श्री शिवाजी मराठा हायस्कूल भेट, पुणे



विश्रामबाग वाडा, पुणे



रायगड
(महाराजांनी रायगडावर धर्मशाळा बांधकामास ५०० रुपयांची मदत केली होती.)



सज्जनगड
(श्री. कृष्णाबाई हरदासी यांचाकडे सज्जनगड सभामंडप बांधण्यासाठी १०० रुपये दिले.)

# प्रकरण ८ वे

# संस्थांना मदत

सयाजीराव महाराज म्हणजे एक चालते बोलते विद्यापीठच होते. त्यांनी आपल्या विचारांतून अनेकांना मार्गदर्शन केले. त्यामुळे त्या काळात अनेक विचारवंत तयार झाले. महाराज ज्या काळात राज्य करत होते, त्या काळात हिंदुस्थानावर इंग्रजांचे राज्य होते. इंग्रजी शिक्षण घेऊन तयार झालेली एक पिढी तयार झाली होती. त्यांना हिंदुस्थानातील दारिद्र्य, समाजसुधारणा आणि शिक्षण महत्त्वाचे वाटत होते. ही पिढी देशातील बांधवांसाठी काम करू इच्छित होती; परंतु त्यांच्याकडे आर्थिक पाठबळ नव्हते. त्यांना आर्थिक मदत करण्याचे काम महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी त्या काळात केले. या काळात देशभरात लोककल्याणासाठी काम करणाऱ्या अनेक संस्था उभारत होत्या. काही कालावधीत त्या पैशाअभावी बंद पडत होत्या. महाराजांनी अशा संस्थांना आर्थिक मदत केली. अव्वल इंग्रज कालखंडात देशभरातील संस्था उभारणीस महाराजांनी मोठी आर्थिक मदत केली.

सयाजीराव महाराजांनी केलेल्या मदतीमुळे अनेक नामांकित संस्था उभारल्या. त्यांनी केलेल्या मदतीमुळे अनेकांचे संसार उभारले. ज्या शिक्षण संस्थांना महाराजांनी मदत केली त्या संस्थांमधून लाखो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले. शिक्षण घेऊन नवी पिढी तयार झाली. शिक्षणामुळे लोकांमध्ये सर्वच बाबतीत सुधारणा दिसून येऊ लागल्या. याचे श्रेय प्रामुख्याने महाराजांच्या दातृत्वाला आहे.

महाराजांनी ज्या संस्थांना मदत केली, त्या संस्था नावारूपाला आल्या. त्यांचे कार्य लोकाभिमुख झाले. संस्थांच्या माध्यमातून कर्त्या पुरुषांनी विकसित आणि समतेवर आधारित समाजाचे स्वप्न पाहिले होते; ते त्यांनी सयाजीराव महाराजांची मदत घेऊन पूर्ण केले. यामुळे महाराजांची मदत अत्यंत महत्त्वाची ठरते. महाराजांनी ज्या संस्थांना मदत केली त्यातील काही संस्थांची ओळख पुढे करून दिली आहे. त्यातील अनेक संस्थांना त्यांनी स्वतःच्या खानगी निधीतून मदत केली.

## बनारस हिंदू विश्वविद्यालय, अलाहाबाद

हिंदुस्थानातील इतिहासात महत्त्वाचा बदल घडवणाऱ्या ज्या-ज्या संस्था आहेत त्यामध्ये बनारस हिंदू विश्वविद्यालयाचा महत्त्वाचा वाटा आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी या

संस्थेला स्थापनेपासूनच मोठी मदत केली. या संस्थेच्या निर्मितीत त्यांनी आर्थिक मदतीबरोबरच इतरही पाठबळ दिले.

सयाजीराव महाराज आणि या संस्थेचे संस्थापक पंडित मदन मोहन मालवीय यांचे मित्रत्वाचे संबंध होते. दोघांनाही एकमेकांबद्दल आदर आणि आत्मीयता वाटत होती. अधूनमधून महाराज अलाहाबादला नेहमी भेट देत. तर पंडित मदन मोहन मालवीयही बडोदा संस्थानाला भेट देत. या दोघांच्या स्नेहसंबंधांमुळे आणि सयाजीराव महाराजांना शिक्षणाबद्दल वाटणाऱ्या आस्थेमुळे त्यांनी या संस्थेला भरघोस मदत केली.

सयाजीराव महाराज विश्वविद्यालयांच्या Schedule I मधील ३ (१) clause २ नुसार या संस्थेचे दाते होते. तसेच Class II मधील clause (b) नुसारही महाराज या संस्थेचे आश्रयदाते होते. या संदर्भाचा उल्लेख 'The History of Banaras Hindu University' या ग्रंथात आला आहे. (पृ. ३७१ व ३७४). या ग्रंथातील नोंदीनुसार महाराज या संस्थेचे प्रथमपासूनच आश्रयदाते होते.

महाराज बनारस विद्यापीठाचे कुलपती होते. 'The Court at its annual meeting held on the 30th November, 1922 elected His Highness Maharaja sir Sayaji Rao Gaekwad of Baroda as Chancellor of the University for next three years, and His Highness Maharajadhiraj sir Ganga Singh Bahadur of Bikaner as Pro-Chancellor for one year.' *(Dar and Somaskandan, 1966, p.561)* त्यानंतरही महाराजांची दोन वेळा पुन्हा कुलपतीपदी निवड झाली. महाराज या विद्यापीठाचे ३० नोव्हेंबर १९२२ ते ३१ मार्च १९२९ पर्यंत कुलपती होते; परंतु तिसऱ्या वेळी महाराजांनी कामाच्या व्यस्ततेमुळे पुन्हा कुलगुरूपदी राहण्यास नकार दिला.

सयाजीराव महाराजांना बनारस विद्यापीठाने 'Degree of Doctor of Laws' ही पदवी दिली. 'The Senate also decided to confer the Honorary Degree of Doctor of Laws upon His Highness Maharaja sir Sayaji Rao Gaekwad Bahadur of Baroda.' *(Dar and Somaskandan, 1966, p.562)* महाराजांना विद्यापीठाने ही पदवी दिली असली, तरी त्यांना या पदवीदान समारंभाला आजारी पडल्याने उपस्थित राहता आले नाही. त्यांच्यासाठी २४ जानेवारी १९२४ रोजी पुन्हा दीक्षांत समारंभ घेऊन ही पदवी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आली.

बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या १ डिसेंबर १९२८ च्या दीक्षांत समारंभात डॉ. भगवान दास यांनी सयाजीराव महाराजांच्या बडोद्यातील शिक्षण क्षेत्रातील कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, 'His Highness Maharaja sir Sayaji Rao Gaekwad had done a lot for the spread of education and uplift of the backward and depressed classes in his own State. Soon after his accession to the Gaddi he issued a proclamation in 1885 in wich he ordered the opening of thirty new schools in state every

year. This scheme of the expansion of education by the opening of thirty schools every year was continued on till 1892-93. But not satisfied with the progress which was then achived. His Highness decided to promulgate a compulsory and free Educational System and as an Experimental measure sanctioned in 1892-93 its application to 10 selected villages of his State. The experiment having yielded satisfactory results, His Highness sanctioned the introduction of compulsory Free Education in the whole State and the scheme was finally promulagated under the Compulsory Education Act of 1906-07.' *(Dar and Somaskandan, 1966, p.569.)* महाराजांच्या कार्याचा गौरव बनारससारख्या विश्वविद्यालयाच्या दीक्षांत समारंभात झाला. यावरून महाराजांच्या शिक्षणविषयक कार्याची महती समजते.

सयाजीराव महाराज बनारस विश्वविद्यालयाचे फक्त कुलगुरूच नव्हते, तर त्या संस्थेचे आश्रयदाते होते. त्यांनी विद्यापीठाचे कुलगुरू असताना विद्यार्थ्यांच्या करमणुकीसाठी स्वतःच्या खानगी फंडातून इ.स. १९२४ साली २,००० रुपये दिले. 'तसेच त्यांनी स्वतःच्या खासगी फंडातून इ.स. १९१६ साली १,००,००० रुपये दिले.' *(जोशी, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४५१).* बनारस विश्वविद्यालयाला एवढी मोठी एकरकमी मदत करणारे सयाजीराव महाराज एकमेव होते.

महाराज हे विद्येचे चाहते असल्यामुळे त्यांना ग्रंथालयांचे महत्त्व माहीत होते. बनारस विद्यापीठाचे नाव जागतिक स्तरावर झळकू लागल्यावर या संस्थेस वाचनालयासाठी चांगली इमारत नव्हती. ही अडचण महाराजांना समजली. त्या काळात महाराजांनी फक्त वाचनालयासाठी २,००,००० रुपये दिले. 'In Augest 1926, His Highness Maharaja Sir Sayaji Rao Gaekwad of baroda sanctioned a donation of Rupees two lakhs to the University out of which one lakh was kept as a permanent endowment for a building itself. The foundation stone of the 'Sayaji Rao Gaekwad Library' was laid by His Excellency Lord Irwin on January 4, 1927.' *(Dar and Somaskandan, 1966, p. 570).* सयाजीराव महाराजांच्या नावे या विद्यापीठात ग्रंथालय आहे. बनारस विद्यापीठाला त्यांनी ज्या काळात मदत दिली त्यावेळी इतरांनी दिलेल्या देणग्या पाहिल्या तर सयाजीराव महाराजांनी दिलेल्या मदतीच्या जवळपासही इतर कोणताही दाता दिसत नाही.

महाराजांनी आश्रय आणि मदत दिलेल्या संस्थांमधून हजारो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले. आधुनिक भारतातील अनेक शिक्षण संस्था त्यांच्या मदतीने उभारल्या. त्यामुळे आधुनिक भारताची जडणघडण होत असताना महाराजांचे त्यात महत्त्वाचे योगदान राहिले आहे.

## शांतिनिकेतन-विश्वभारती

सयाजीराव महाराजांनी हिंदुस्थानातील ज्या महान व्यक्तींना मदत केली त्यामध्ये रवींद्रनाथ टागोर या सुप्रसिद्ध आणि थोर भारतीयांचा समावेश होतो. सयाजीराव महाराज हे मुळातच प्रज्ञावंत आणि साहित्यप्रेमी राजा असल्यामुळे त्यांना साहित्यिकांविषयी आस्था होती. सयाजीराव महाराज आणि रवींद्रनाथ टागोर यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. रवींद्रनाथ टागोर यांनी कित्येक वेळा बडोद्याला भेट दिली होती. महाराजांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त टागोरांनी महाराजांना शुभसंदेश पाठवला. त्यात टागोर म्हणतात, 'My sincerest felicitations to H.H. The Maharaja Saheb of Baroda on his birthday. I take this opportunity to express my deep blessing for his personality, and may appreciation of his great gifts as a ruler of the peoples, his far-sighted statesmanship and wisdom which have made Baroda, one of the most prosperous and progressive states of India. His generosity, as we all know, has not been limited to his neighborhood but come to the aid of indigenous enterprise all over India, helping the cause of practical idealism which may truly benefit our peoples. It is a rare power of uniting in his vision the undying traditions of Indian thought and culture with the spirit of Modern Age which, I believe, specially distinguishes His Highness genius as a ruler. I fervently pray that he may live for many more years to continue his beneficient service to india and humanity.' बडोद्यात नव्हे तर भारतभर महाराजांचा ७१ वा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला होता. यावेळी रवींद्रनाथ टागोरांनी महाराजांविषयी व्यक्त केलेल्या सदिच्छा महनीय आहेतच, त्याचबरोबर त्यात महाराजांच्या कर्तृत्वाची छाप दिसते. महाराजांविषयी टागोर यांना कायमच आदर वाटत होता.

सयाजीराव महाराजांना रवींद्रनाथ टागोर करत असलेल्या कामाबद्दल नितांत आदर होता. यांच्या 'शांतिनिकेतन विश्वभारती' या संस्थेला 'भारतीय तत्त्वज्ञान आणि हिंदू संस्कृती' या अध्यासनासाठी प्रतिवर्ष ६,००० रुपये मंजूर केले *(B.A.R., 1923-24, p. 295).* तत्त्वज्ञान आणि संस्कृती या विषयांवरील आस्थेमुळे महाराजांनी ही मदत केल्याचे दिसते.

## भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे

संस्कृत साहित्य आणि प्राच्यविद्या याविषयी महाराजांना नेहमीच आपुलकी वाटत होती. संस्कृत ग्रंथांमध्ये असणारे ज्ञान सर्वसामान्य लोकांना उपलब्ध व्हावे म्हणून महाराजांनी बडोदा संस्थानात इ.स. १८९३ साली 'प्राच्यविद्यामंदिर' संस्था स्थापन केली होती. त्यांना या विषयाचे महत्त्व समजले होते. त्यांनी हिंदुस्थानात स्थापन होणाऱ्या 'प्राच्यविद्या संशोधन' संस्थांना मदत केली.

सयाजीराव महाराजांना प्राच्यविद्येविषयी आस्था, प्रेम आणि आपुलकी आहे हे समजल्यावर भांडारकर संस्थेच्या संस्थापक सदस्यांपैकी एक डॉ. श्रीपाद कृष्ण बेलवलकर यांनी बडोद्यात जाऊन महाराजांची भेट घेतली. त्यासंबंधीची माहिती 'श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या कारकिर्दीत झालेली संस्कृत साहित्याची प्रगती' या लेखात बेलवलकर देतात, 'गुरुवर्य डॉक्टर सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या नावाने व त्यांच्या ८० व्या वाढदिवसाचे प्रसंगी एक 'प्राच्यविद्या संशोधन मंदिर' स्थापन करण्याचा मी आणि माझ्या सहकारी मित्रांनी इ.स. १९१५ च्या मे महिन्यात उपक्रम केला. त्या निमित्ताने इ.स. १९१६ साली आम्ही श्रीमंत सरकारास पत्र पाठवून मुलाखतीची याचना केली होती. त्या पत्रास आलेल्या उत्तरात 'आपण अवश्य यावे. श्री. सरकारांना आपल्या भेटीने आनंद होईल' असे लिहिले होते.' *(बेलवलकर, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २३४).* या पत्रामुळे आणि महाराजांना या विषयाचे महत्त्व माहीत असल्यामुळे डॉ. बेलवलकर आणि डॉ. गुणे महाराजांच्या भेटीला गेले. तोपर्यंत बडोद्यात या विषयाच्या अनुषंगाने खूप मोठे काम झाले होते; परंतु अधिकृतरीत्या 'प्राच्यविद्या संस्था' स्थापन झाली नव्हती. महाराजांनी याची पूर्वतयारी इ.स. १८९३ पासूनच करून ठेवली होती.

बेलवलकर आणि गुणे महाराजांच्या भेटीस गेल्यावर महाराज त्यांना सविस्तर भेटले. त्याबाबत बेलवलकर लिहितात, 'श्री. सयाजीराव महाराजांची कीर्ती आम्ही पूर्वीच ऐकलेली असल्याने माझे सहकारी मित्र परलोकवासी डॉ.गुणे व महाराजसरकारांच्या निमंत्रणाप्रमाणे भेटीला बडोद्यास गेलो व तेथे सुमारे अर्धा तास सरकारी मुलाखत झाल्यावर त्यांच्याच सांगण्यावरून विद्याधिकारी व इतर तज्ज्ञ विद्वानांशी विचारविनिमय केला. मुलाखतीवरून संशोधन संस्था म्हणजे काय, तिचे काय काय कार्य केले पाहिजे व त्यास कोणकोणती साधने लागतील त्याची महाराजांस बरीच परिपूर्ण कल्पना होती याबद्दल आमची खात्री झाली.' *(बेलवलकर, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २३५).* याप्रमाणे सर्व माहिती करून घेतल्यावर पुण्यात भांडारकर संस्था स्थापन झाली.

या संस्थेच्या निर्मितीपासून महाराजांनी या संस्थेस सहकार्य केले. अशा प्रकारची संस्था स्थापन करण्यास आवश्यक असणाऱ्या बाबींची माहिती दिली. या संस्थेस आर्थिक मदत केली. 'बेलवलकर आणि गुणे यांनी बडोद्यास भेट दिल्यावर भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे संस्थेस महाराजांनी १,००० रुपये मदत केली.' *(जोशी, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४५१).* महाराजांनी या संस्थेस पुढेही वारंवार मदत केली. त्याबद्दल बेलवलकर म्हणतात, 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराला जरी महाराजांनी एक हजार रुपयांचीच देणगी दिली असली तरी महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीला संस्थानामधून दरसाल ५०० रुपयांची मदत आजतागायत (इ.स.१९३३) होत आहे.' *(बेलवलकर, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. २४३).* महाराजांनी या संस्थेला वारंवार मदत केली होती.

मानवी विकासाच्या दृष्टीने घडणाऱ्या प्रत्येक संशोधनास महाराजांचे सहकार्य होते. प्राच्यविद्या आणि संस्कृत साहित्य महाराजांना महत्त्वाचे वाटत होते. या देशातील अमूल्य ठेव्याच्या माध्यमातून मानवी उत्कर्ष साधता येतो याविषयी महाराजांना खात्री होती, त्यामुळेच त्यांनी अशा सर्व संस्थांना आणि प्रयत्न करत असलेल्या प्रत्येक उपक्रमास मोठी आर्थिक मदत केली.

## रयत शिक्षण संस्था, सातारा

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात वेगवेगळ्या शहरांतून शिक्षण संस्था उदयास येत होत्या; परंतु ग्रामीण भागातील खेडीपाडी शिक्षणापासून दूर राहिली होती. हे त्या काळातील काही समाजधुरिणांनी ओळखले होते. त्यापैकीच एक म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील. महाराष्ट्रातील खेडी शिक्षणापासून दूर राहू नयेत म्हणून त्यांनी आयुष्यभर कष्ट घेतले.

कर्मवीर भाऊराव पाटलांनी जे अनमोल कार्य केले, त्यामागची प्रेरणा महाराजा सयाजीराव गायकवाड होते. महाराजांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रात जे सत्कार झाले त्यानिमित्त महाराजांनी सातारा येथील रयत शिक्षण संस्थेला आणि शाहू वसतिगृहाला भेट दिली. त्याबद्दल रामचंद्रराव शामराव माने पाटील यांनी माहिती दिली आहे. ‘श्रीमंतांची स्वारी तेथून निघून रा. भाऊराव पाटील एतवडेकर यांनी चालविलेल्या सर्व जातींच्या विद्यार्थ्यांचे ‘श्री शाहू छत्रपती बोर्डिंग हाऊस’मध्ये दाखल झाले. प्रवेशद्वारी रा. भाऊराव पाटील यांनी श्रीमंतांना हारगुच्छ अर्पण करून त्यांचे प्रेमाने स्वागत केले. नंतर आम्रवृक्षांचे छायेखाली खुल्या पटांगणात तयार केलेल्या सभास्थानी श्रीमंतांची स्वारी दाखल होताच सर्व जातींच्या जमलेल्या प्रचंड जनसमूहाने उभे राहून श्रीमंतांचे स्वागत केले. वेळ दोन प्रहराची साडेअकराची होती. सूर्यनारायण जरी स्वतःच्या प्रखर किरणांनी संतप्त होता, तरी आमराईच्या त्या गर्द छायेने एवढ्या मोठ्या-अजमासे तीन हजार जनसंमर्दाचे उन्हापासून संरक्षण होत होते. मधूनमधून शीतल वायूच्या लहरी येत असल्यामुळे विद्युत व्यंजनांचे कामही आपोआपच होत होते. एकंदर स्त्री-पुरुष प्रमुदित व आनंदित मनाने श्रीमंतांचे दर्शन करून आपल्या डोळयांचे पारणे फेडीत होते. सर्वांचे डोळे श्रीमंतांच्या त्या तेजस्वी मूर्तीकडे वेधून गेल्याचे स्पष्ट दिसत होते.’ *(माने पाटील, १९३३, पृ. ११८)*. महाराजांना शिक्षण संस्थांबद्दल नेहमीच प्रेम राहिल्याने त्यांनी भाऊराव पाटील चालवत असलेल्या संस्थेला भेट दिली. महाराजांची ही भेट भाऊराव पाटील यांना आणि या शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी होती.

महाराजांच्या आदर सत्कारानंतर कर्मवीर भाऊराव पाटलांनी स्वागतपर जे भाषण केले ते भाषण महत्त्वाचे आहे. ‘श्रीमंत महाराजसाहेब, श्रीमंत युवराज प्रतापसिंह, श्रीमंत राजपौत्र उदयसिंह व बंधूभगिनींनो, माझ्यासारख्या फकिराच्या आमंत्रणास मान देऊन श्रीमंत महाराज साहेब, आपणास हजार प्रकारची महत्त्वाची कामे असताना व आपले प्रकृतिमान बरे नसताना देखील आपण तकलीफ सोसून, वेळात वेळ काढून सर्व परिवारासह या संन्याशाच्या झोपडीत आलात

त्याबद्दल मी श्रीमंतांचे आभार कोणत्या शब्दांनी मानू तेच मला समजत नाही. माझ्याजवळ आपल्यासारख्या थोर राजर्षीचे योग्य स्वागत करण्यास अंतःकरणाच्या जिव्हाळ्याशिवाय दुसरे काही नाही. महाराज, आपण केलेल्या या अनुग्रहाबद्दल मी आपला उतराई कसा होऊ तेच मला समजत नाही.' *(माने पाटील, १९३३, पृ. ११९)*. सयाजीराव महाराजांचे स्वागत करताना एका शिक्षण क्षेत्रातील जाणकार आणि शतप्रतिशत योगदान असणाऱ्या महान विभूतींचे स्वागत आपण करत आहोत याची भाऊराव पाटील यांना कल्पना होती.

सयाजीराव महाराजांच्या प्रेरणेने आपण ही शिक्षण संस्था उभी केल्याचे भाऊराव पाटील यांनी या भाषणात सांगितले, 'महाराज, आपण थोर विभूती असून, आपल्या विचक्षण राजपद्धतीमुळे व राजकारणपटुत्वामुळे फक्त हिंदुस्थानचेच नव्हे, तर अखिल दुनियेचे डोळे आपल्याकडे वेधून घेतले आहेत. त्याशिवाय आपण कट्टे सुधारक व उच्चतम कोटीतील देशभक्त आहात. १९०६ साली मी आपले अंत्यजोद्धारासंबंधी भाषण वाचले व त्या भाषणाने माझ्या मनामध्ये अतिशय खळबळ उडवून दिली. मी तेव्हाच निश्चय केला की, श्रीमंत महाराजांनी दर्शविलेल्या विचाराप्रमाणे व व्यक्त केलेल्या ध्येयास अनुसरून आजन्म प्रयत्न करावयाचा' *(माने पाटील, १९३३, पृ. १२०)*. महाराजांच्या शिक्षण कार्याची प्रेरणा घेऊन भाऊराव पाटलांनी कार्य आरंभले होते. सयाजीराव महाराजांनी नेहमीच कर्मवीर भाऊराव पाटलांना प्रेरणा दिली, मार्गदर्शन केले. या भेटीतच महाराज सयाजीराव गायकवाड यांनी महाराणी जमनाबाई बोर्डिंगचे उद्घाटन केले.

'सयाजीराव महाराजांनी मागासलेल्या वर्गाच्या शिक्षणासाठी काम करत असलेल्या भाऊराव पाटलांना मुंबईला बोलावून घेतले. त्यावेळी महाराज पंचविसाव्या परदेश प्रवासाहून परत आले होते. भाऊराव पाटलांच्या संस्थेला विश्वस्त निधी म्हणून ३,००० रुपये आणि १,००० रुपये देणगी दिली.' *(पंचविसावा परदेश प्रवास टिपण, इ.स. १९३७)*

## डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे

महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य समजली जाणारी डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही संस्था आहे. या संस्थेची स्थापना विष्णुशास्त्री चिपळूणकर, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महादेव बल्लाळ नामजोशी यांनी इ.स. १८८४ मध्ये केली. त्यावेळी त्यांच्यासोबत वामन शिवराम आपटे, वासुदेव बळवंत केळकर, महादेव शिवराम गोळे आणि एन.के. धारप हे संस्थेचे इतर संस्थापक सदस्य होते. या संस्थेने शिक्षण क्षेत्रात मोलाची कामगिरी केली.

सयाजीराव महाराज आणि लोकमान्य टिळक यांचे प्रथमपासूनच मित्रत्वाचे संबंध असल्याने अर्थातच त्यांनी या संस्थेच्या स्थापनेपासून मदत केली. महाराजांनी या संस्थेला स्थापनेच्या सुरुवातीलाच भेट दिली. 'Among distinguished visitors to the Deccan Education Society's institutions during this period of twelve years were His Highness Sir Bhagvat-singji Thakorsaheb of Gondal (Jan. 1885), His Highness Maharaj Sayajirao of Baroda (Sept. 1885).' *(Limaye, 1935, p.153)*. सयाजीराव

महाराजांना शिक्षणाविषयी खास आस्था असल्याने ते ज्या भागात जात तेथील शिक्षण संस्थांना भेट देत. महाराज वारंवार पुण्यास भेट देत. त्यामध्ये पुण्यातील या शिक्षण संस्थेलाही भेट दिली होती.

या संस्थेला भेट दिल्यानंतर महाराजांनी भाषण केले आणि शिक्षणाबद्दल आपली आस्था व्यक्त केली. महाराज म्हणाले, 'One of the main objects of the Society was to initiate a system of National Education imparted in ways adapted to the wants and necessities of the people.' *(Limaye, 1935, p. 153)*. महाराज शिक्षणाबद्दल नेहमीच आग्रही होते. त्यांना हिंदुस्थानातील लोकांच्या शिक्षणाची चिंता वाटत होती. अशा संस्थांच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या लोकांचे शिक्षण व्हावे असे त्यांना वाटत होते.

सयाजीराव महाराजांनी या संस्थेला खूप मदत केली. त्यांनी त्यांचा पुण्यातील 'गायकवाड वाडा' अनेक वर्षांसाठी या संस्थेला नाममात्र भाडेतत्त्वावर दिला. संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलला वसतिगृहासाठी हा वाडा देण्यात आला, त्याबद्दल लिमये म्हणतात, 'During the first year Holkar's Vada housed the institution, which was removed in 1895 to Gaikwad's Vada in Narayan Peth, obtained at a nominal rent of Re. 1 per year from His Highness the Maharaja of Baroda.' *(Limaye, 1935, p. 149)*. त्यानंतर अनेक वर्षे हा वाडा या संस्थेकडे होता. तो वाडा इ.स.१८९९ मध्ये परत देण्यात आला. त्याबद्दल पुन्हा लिमये म्हणतात, 'It has been already remarked that when the Gaikwad Vada was commandered for plague purposes in 1899, the Boarding House was temporarily closed, and that it was revived in December 1901 in the premises of the Fergusson College, As the Gaikwad Vada was handed back to the Baroda Durbar by the Society about this time .' *(Limaye, 1935, p. 198)*. त्यानंतर काही दिवसांनी महाराजांनी हा वाडा टिळकांना कायमचा देऊन टाकला.

सयाजीराव महाराजांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला प्रथमपासूनच आर्थिक मदत केली होती. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने बडोद्याच्या राजकन्या कमलादेवी यांनी या संस्थेला अभिनंदनपर पत्र लिहिले.

MOTIBAG PALACE,
BARODA. 19th April 1935.

Dear Sir,

Princess Kamaladevi Bai Sahib read your letter with great pleasure and has desired me to convey her thanks to you for inviting her to be present at the Golden Jubilee Celebrations of the D. E. Society and the Fergusson College on 20th and 21st April 1935.

She, certainly, wished to be present on such a grand occasion, but as we are shortly leaving for Massoorie to stay there during summer and our programme being already fixed up, it is not possible for her to come to Poona for which she expresses her regret.

Princess, however, wishes you hearty success in the Golden Jubilee Celebrations.

Yours Faithfully,
D.K.YARDY,
Secretary to Princess Kamala Devi Bai Saheb Gaekwar.

महाराज या संस्थेचे सुरुवातीचे दाते होते. त्यांनी संस्थेच्या कार्यात प्रारंभीच्या काळात मोठा हातभार लावला होता. या संस्थेला दिलेल्या देणग्यांची यादी पुढीलप्रमाणे - (यात बडोद्यातील अन्य व्यक्तींचाही समावेश आहे.)

His Highness Maharaja Sir Sayajirao Gaekwar - 12,000/- (1889)
Prince Dhairyasheelrao Gaekwar - 1,500/- (1927)
Sardar Narsingrao Babasheb Ghorpade (Bedagkar) - 2,000/- (1915)
Rao Bahadur Raghunath Mahadeo Kelkar - 2,500/- (1913)
Dewan Bahadur Vasudev Mahadev Samarth - 1,050/- (1912)

*(Limaye, 1940, Appendex p. 67)*

सयाजीराव महाराज आणि बडोदा संस्थानामधून या संस्थेसाठी प्रारंभीच्या काळात मोठ्या प्रमाणात मदत झाल्याचे वरील यादीवरून लक्षात येते.

## डांग सेवा मंडळ साल्हेर, नाशिक

सयाजीराव महाराजांनी अस्पृश्य आणि आदिवासींच्या शिक्षणासाठी खूप मदत केली. संस्थान आणि संस्थानाबाहेरही त्यांनी मदत केली. साल्हेर, नाशिक या भागात J.L. Lantham आणि दादासाहेब बीडकर आदिवासींसाठी काम करत होते. दादासाहेब बीडकर यांनी आदिवासींच्या शिक्षणासाठी काम करावे असे J.L. Lantham बाईंना वाटत होते. मुळातच बिडकर आदिवासी लोकांत सुधारणा व्हाव्यात यासाठी काम करत होते. J.L. Lantham बाईंच्या इच्छेनुसार आणि त्यांच्या स्वतःच्या आंतरिक ओढीला अनुसरून त्यांनी डांग सेवा मंडळ साल्हेर, नाशिक ही संस्था स्थापन केली. या मंडळात त्या काळातील काँग्रेसमधील ज्येष्ठ नेतेमंडळी शंकरराव देव, भाई धोत्रे, वैकुंठभाई मेहता यांचा समावेश होता. या मंडळाच्या अध्यक्ष J.L. Lantham होत्या, तर दादासाहेब बिडकर सचिव होते. या मंडळाची स्थापना २३ जून १९३७ रोजी झाली. *(धारणकर, २०१२, पृ. २८).*

या मंडळातील अनेकांना महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य माहीत होते. त्यांनी बडोद्यात जाऊन महाराजांची भेट घेतली होती. महाराजांच्या वयाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाल्यावर बिडकर काम करत असलेल्या साल्हेर आणि मुल्हेर भागाला भेट देण्याचे निश्चित झाले. त्यावेळी अनेक सुधारणा करण्यात आल्या. 'फेब्रुवारी १९३८ मध्ये बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड डांगच्या परिसरात साल्हेर येथे येणार असे ठरले. सर्वांमध्ये उत्साह संचारला. साल्हेर, वाघंबे आणि त्याच्या परिसरातील १०-१२ पाडे असलेला आदिवासी विभाग बडोदा संस्थानाशी जोडलेला होता. कवळाणे हे महाराजांचे जन्मगाव होते. आदिवासी भागात मुलांसाठी शाळा काढावी, आदिवासींसाठी काही सोयी पाहाव्यात, साल्हेर चावडीची व्यवस्था पाहावी हा हेतू महाराजांच्या भेटीमागे होता. जय्यत तयारी सुरू झाली.' *(धारणकर, २०१२, पृ. ३२-३३)*. महाराज या आदिवासी भागाला भेट देणार असल्याने काही सेवासुविधा करण्यात आल्या. त्यामध्ये ताहाराबाद ते मुल्हेर कच्ची सडक बनविण्यात आली. जेथे-जेथे पाणी आवश्यक आहे त्या ठिकाणी विहिरींवर इंजिन बसवून पाणीपुरवठा करण्यात आला.

सयाजीराव महाराज सुरत-नागपूर रेल्वेने आणि नंतर खास मोटारीने मुल्हेरला पोहोचले. त्या वेळी त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात महाराजांनी आदिवासी पुढाऱ्यांना सुधारणेसाठी काय पाहिजे ते मागा असे सांगितले. त्यावेळी एकजण म्हणाला, 'महाराज आमचं एवढच मागणं आहे की, आमच्या मुलांना शाळेत जाण्याची सक्ती नको आणि दारूवर बंधन आहेत, ती नकोतमहाराज आणि तेथे जमलेले सर्वजणच अवाक् झाले. यानंतर महाराजांनी केलेले भाषण मोठे उद्बोधक आहे. महाराज म्हणाले, 'पाहा मी आयुष्यभर यांच्यासाठी एवढे श्रम केले, पैसा खर्च केला, पण मला पाहिजे तशी प्रगती बिचाऱ्या दलित समाजाची होऊ शकली नाही; याची मला खंत वाटते. मी त्यांना काही कमी पडू देणार नाही. सोनगडला आमची आश्रमशाळा आहे. ती पाहा. त्या पद्धतीवर माझ्या साल्हेर मुल्हेर परिसरात असं काही काम करावं, अशी माझी इच्छा आहे. त्यांच्यातून कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. तेच कार्यकर्ते या समाजाची प्रगती अधिक जिव्हाळयानं, अधिक आत्मीयतेने करू शकतील, अशी मला खात्री आहे.' महाराजांना या भागात आदिवासींच्या शिक्षणासाठी कार्य करावे असे वाटत होते. त्यासाठी त्यांनी आवाहन केले. दादासाहेब बिडकर यांनी या भागात अगोदरच काम सुरू केले होते.

J.L. Lantham आणि दादासाहेब बिडकर या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यावेळी 'महाराजांनी ताबडतोब तीन हजारांचा चेक J.L. Lantham आणि दादासाहेब बिडकर यांच्या हातात ठेवला.' *(धारणकर, २०१२, पृ. ३४)*. या मदतीमुळे डांग सेवा मंडळाचे काम जोमाने सुरू झाले. प्रथम या मंडळाने प्राथमिक शाळा सुरू केल्या. यातील शिक्षक दिवसा मुलांना आणि रात्री प्रौढ व्यक्तींना शिकवू लागले. या मंडळाने महाराजांपासून प्रेरणा घेऊन इ.स. १९३९ मध्ये बागलाण येथील गोळवाड भागात पहिली शाळा काढली. त्यावेळी यांच्यासोबत भाऊसाहेब हिरे हेही होते.

## डिप्रेस्ड क्लास मिशन, पुणे

सयाजीराव महाराजांना समाजसुधारणेच्या दृष्टीने महाराष्ट्रात घडणाऱ्या प्रत्येक घटनेविषयी आणि व्यक्तीविषयी आस्था वाटत होती. त्यामुळे पुणे-मुंबईबरोबर महाराष्ट्राच्या इतर भागांत घडणाऱ्या अशा घटनांविषयी त्यांना आस्था होती. आणि अशा प्रयत्नांना त्यांनी जाणीवपूर्वक राजाश्रय दिला.

सयाजीराव महाराज महाराष्ट्रात पुणे, मुंबई आणि इतर ठिकाणी वारंवार दौरा करत. या भागात राहणाऱ्या समाजधुरिणांची वारंवार भेट घेत. अशाच एका दौऱ्यात ते पुणे येथे आले असता त्यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या पुणे येथील शाळेला बक्षीस समारंभानिमित्त भेट दिली. त्यावेळी केलेल्या भाषणात अस्पृश्यांच्या शिक्षणाबद्दल त्यांनी विचार व्यक्त केले. 'हे अस्पृश्य लोक शिकले तर ते कसचे आपल्या उपयोगी पडतात, अशी उगीचच लोकांची समजूत होऊन बसणे साहजिक आहे. ही समजूत अर्थात चुकीचीच आहे. तुम्हाला जितके म्हणून शिकता येईल तितके शिकण्यासाठी तुम्ही झटलेच पाहिजे. माझे मत या प्रकारचे असल्यामुळे तुम्हाला सांगताना मला आनंद वाटतो की, माझ्या राज्यात सध्या ३३५ शाळा आहेत. त्यात ८२ हजार मुले व मुली शिकत आहेत व ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याखेरीज विद्यार्थ्यांसाठी मी वसतिगृहे करविली आहेतच.' *(भाषण क्र. ५१)*. महाराजांनी येथील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासंबंधी अनमोल मार्गदर्शन केले. शिक्षण घेतल्यामुळे होणारे फायदे त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्टपणे सांगितले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी इ.स.१९०६ साली स्थापन केलेल्या डिप्रेस्ड क्लास मिशन या संस्थेला महाराजांनी मदत केली.

याच संस्थेच्या दुसऱ्या एका शाळेच्या बक्षीस समारंभात त्यांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नावर विचार व्यक्त केले. 'हिंदू जातीच्या दृष्टीने पाहिले तर धर्म व रूढी अस्पृश्यता पाळा असे म्हणताना आढळतील; पण माणुसकीच्या दृष्टीने पाहिले, तर अस्पृष्यतेचे समर्थन करणे अशक्यच आहे. समाजात एक कायमचा दलित वर्ग असणे, हा प्रकार जगातल्या दुसऱ्या कोणत्याही देशात तुम्हाला दिसणार नाही.' *(भाषण क्र. ५२)*. महाराज नेहमीच अस्पृश्यांच्या उन्नतीचा विचार करत. त्यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याला पाठबळ दिले. त्यांना मदत केली.

सयाजीराव महाराजांनी धर्मशिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन विठ्ठल रामजी शिंदे यांना परदेशात शिक्षणासाठी पाठवले. त्यांनी शिक्षण पूर्ण केल्यावर बडोद्याची शिष्यवृत्ती परत करणे बंधनकारक होते. मात्र अस्पृश्य समाजासाठी शिंदे कार्य करत आहेत म्हटल्यावर महाराजांनी त्यांची शिष्यवृत्ती माफ केली. वि.रा. शिंदेंनी स्थापन केलेल्या या संस्थेलाही महाराजांनी मोठी मदत केली. त्याबाबत शिंदे म्हणतात, 'इ.स. १९०९ साली महाराजांचा मुक्काम पुणे-मुंबईत झाला, त्यावेळी सप्टेंबर महिन्यात आमच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या पुणे शाखेच्या शाळांच्या बक्षीस समारंभाचे आणि मुंबई टाऊन हॉलमध्ये १८ ऑक्टोबर रोजी भरलेल्या आमच्या मिशनच्या भ्रातृ संस्थेच्या वाढदिवस समारंभाचे महाराज अध्यक्ष झाले. ह्या दोन्ही ठिकाणी अनुक्रमे १,००० रु.

व २,००० रु. देणगी दिली. ही मदत देऊन महाराज मिशनचे आश्रयदाते झाले.' *(शिंदे वि.रा., समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग - ६, १९३३, पृ. ८७).* महाराजांनी अस्पृश्यता निवारणासाठी कार्य करणाऱ्या सुधारकांना आणि  संस्थेला मदत दिली. त्याचबरोबर समतेवर आधारित समाज उभा राहावा यासाठी भरघोस मदत केली.

## अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद

मराठा जातीच्या उन्नतीसाठी आणि शिक्षणासाठी ही संस्था स्थापन झाली. महाराष्ट्रात या संस्थेच्या स्थापनेविषयी बरीच मतमतांतरे होती. अनेकांनी या संस्थेच्या निर्मितीबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला. अनुकूल मते व्यक्त केली. त्यामुळे ही संस्था स्थापन झाली. इ.स. १९०७ मध्ये बडोद्याचे महाराज परदेशातून मुंबईमध्ये आले त्यावेळी क्षत्रिय मराठा समाजाच्या वतीने आणि मुंबईतील मराठा रहिवाशांनी केलेल्या सत्कार समारंभात मराठा शिक्षण परिषदेचा उल्लेख आला होता. त्यास महाराजांनी केलेल्या भाषणांत सकारात्मक प्रतिसाद नोंदविला. त्या भाषणांत म्हणाले, 'आपण जी मराठा शिक्षण परिषद भरविण्याबद्दल खटपट करीत आहा, त्यांत आपणांस पूर्ण यश येवो असे मनापासून इच्छितो. ती उत्तम रीतीने पार पडण्यास माझी मदत आपणास पाहिजे असल्यास ती देण्यास मी मोठ्या खुशीने तयार होईन.' थोडक्यात, ही परिषद अस्तित्वात येण्यापूर्वीच सयाजीराव महाराजांचा राजाश्रय या संस्थेला लाभला होता.

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे पहिले अधिवेशन ३० डिसेंबर १९०७ रोजी धारवाड येथील सरकारी दरबार हॉलमध्ये भरविण्यात आले. या परिषदेच्या स्वागत मंडळाचे अध्यक्ष भास्करराव जाधव, कोल्हापूर यांनी स्वागतपर भाषणात सयाजीराव महाराजांचा आदरपूर्वक उल्लेख केला. ते म्हणाले, 'मराठे लोकांत विद्येचा प्रसार करण्याचे कामी मराठा जातीचे राजे लोकांनी आजपर्यंत चांगले श्रम घेतले आहेत. श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहाद्दर यांचे नाव या कामी प्रमुखत्वाने घ्यावे लागते. यांनी अधिकारसूत्रे हाती घेतल्यापासून या कामी चांगले लक्ष दिल्याकारणाने येथील व युरोपातील विद्यालयांतून बरेच मराठा ग्रॅज्युएट तयार होऊन गायकवाडीत (बडोदा संस्थानात) त्यांना चांगलाच आश्रय मिळाला आहे.' *(जगताप, १९४१, पृ. १).* सयाजीराव महाराजांचा आश्रय लाभल्यामुळे अनेक मराठा तरुण परदेशातून शिक्षण घेऊन परत आले होते. त्यामुळे तमाम मराठा समाजातील पुढाऱ्यांना त्यांचा आधार वाटत होता.

या परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष बडोद्यातील सयाजीराव महाराजांचे नातेवाईक खासेराव जाधव होते. त्यांनी महाराजांच्या आश्रयाने बडोद्यातील तसेच हिंदुस्थानातील अनेकांना बडोद्यातून शिष्यवृत्ती मिळवून दिली होती. मराठा समाजाच्या शिक्षणासाठी त्यांनी अपार कष्ट घेतल्यामुळे या परिषदेच्या अध्यक्षस्थानी निवड होणे योग्य होते. महाराजांच्या कार्याचा उल्लेख आपल्या भाषणात केला. खासेराव जाधव म्हणाले, 'आपण श्रीमंत गायकवाड सरकारचे नाव ऐकलेच आहे. त्यांनी आपल्या पंचवीस वर्षांच्या कारकीर्दीत आमच्या लोकांवर कितीतरी

उपकार केले आहेत. त्यांची धूर्तता आणि हुशारी यांचे वर्णन करावे तितके थोडेच. त्यांची कीर्ती सर्व हिंदुस्थानभर पसरली आहे. आपल्या लोकांचा ऱ्हास होण्यास आमच्यातील दुही हे होय आणि त्या दुहीचे कारण आपले अज्ञान आहे अशी त्यांची खात्री होऊन गेली आहे.' *(जगताप, १९४१, पृ. १५)*. खासेराव जाधवांनी ही शिक्षण परिषद स्थापन व्हावी यासाठी कष्ट घेतले होते. त्यांनी या शिक्षण परिषदेसाठी महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील मराठा समाजातील अनेकांना एकत्र केले.

याच पहिल्या अधिवेशनात त्यांनी सयाजीराव महाराजांनी शिक्षणाबद्दल केलेल्या कार्याचा गौरव केला. 'शिक्षणाची ही शोचनीय स्थिती सुधारण्यास ज्ञानप्रसार हा एकच इलाज आहे. श्रीमंत सयाजीराव महाराज हे फार धोरणी राजे आहेत. त्यांनी ह्या संबंधाचा खोल विचार करून चांगली व्यवस्था केली आहे. आपल्या राज्यात गावोगावी शाळा स्थापून तीत प्रत्येक मुलाने आणि मुलीने शिकण्यास गेलेच पाहिजे असा कायदा त्यांनी केला आहे. आज अवघ्या दीड वर्षांच्या अवधीत या कायद्याचा उत्तम परिणाम नजरेस पडत आहे. हल्ली दर तीन गावास दोन शाळा या प्रमाणाने शाळा स्थापन झाल्या आहेत.' *(जगताप, १९४१, पृ. १८)*. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून सयाजीराव महाराजांनी केलेल्या कामाचा गौरव केला. खासेराव जाधवांना महाराजांचे शिक्षणातील दातृत्व चांगले माहीत असल्याने याही परिषदेला महाराजांचा आश्रय लाभू शकतो याचा त्यांना विश्वास होता.

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद ही महाराजा सयाजीराव, खासेराव जाधव आणि संपतराव गायकवाड यांच्या प्रयत्नांतून उदयास आली होती. त्यामुळे या परिषदेला आर्थिक मदत करणाऱ्या व्यक्तीत वरील तीन व्यक्तींचा प्रामुख्याने समावेश होतो. धारवाड आणि मुंबई येथे भरलेल्या पहिल्या दोन अधिवेशनांचे अध्यक्ष खासेराव जाधव होते. अमरावती येथे भरलेल्या तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष संपतराव गायकवाड होते, तर चौथी शिक्षण परिषद बडोद्यात २७ व २८ डिसेंबर १९१० रोजी इंदुमती महालात भरली होती. यावेळी सयाजीराव महाराज स्वत: उपस्थित होते. त्यांनी त्यावेळी केलेले भाषण मोठे उद्बोधक होते. महाराज या भाषणात मराठा समाजाविषयी म्हणाले, 'तुमच्या समाजातील पुष्कळ घराण्यांनी शूरत्वाची कामे केली आहेत. तथापि, आजची तुमच्या समाजाची स्थिती कीव करण्यासारखी आहे. तुमचेवर हा प्रसंग अज्ञानामुळे आला आहे असे माझे मत आहे. आपण आपल्या स्थितीची इतर लोकांशी तुलना करा. इतर जाती कोणत्या उपायांनी पुढे गेल्या आहेत त्याचा विचार करा व आपली स्थिती सुधारण्याच्या मार्गास लागा. चांगल्या गोष्टींचा व्यवहारात उपयोग करा. तो न केला तर ज्ञान ही निरर्थक गोष्ट आहे, असे दिसून येईल. त्याविषयी इतिहासातील उदाहरणे सांगितली तर बराच वेळ लागेल. ...त्याचप्रमाणे आपल्यांतील दुष्ट व घातुक रूढी सुधारल्या पाहिजेत. शिक्षण हे तुम्हासच पाहिजे असे मानावयाचे नाही; तर त्याची रावापासून रंकापर्यंत सर्वांसच जरुरी आहे.' *(भाषण क्र. ६६)*. सयाजीराव महाराजांना मराठा समाजाची झालेली अवनती आणि परवशता माहीत होती. हे दारिद्र्य आणि अज्ञान घालवायचे असेल तर या समाजाने जुन्या चालीरीती सोडल्या पाहिजेत

आणि ज्ञानाची साधना करत प्रगती केली पाहिजे हा विचार त्यांनी या भाषणातून मांडला. *(गेली पंचवीस अधिवेशने, अ.भा. मराठा शिक्षण परिषद, १९४१, पृ. ५०).*

सयाजीराव महाराज अशा कामी आपले दातृत्व कधीही कमी पडू देत नसत. या संस्थेच्या कार्यासाठी सयाजीराव महाराजांनी मोठी देणगी दिली. बडोद्यात भरलेल्या चौथ्या संमेलनाच्या शेवटी जनरल फंड स्थापन करण्याचा ठराव प्रमुख होता. त्याबाबतची हकिगत गेली पंचवीस अधिवेशने : 'अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचा इतिहास' या ग्रंथात पुढीलप्रमाणे नमूद केला आहे. 'शिक्षण परिषदेच्या शेवटी अनेक ठराव सभेपुढे आले. त्यात एक जनरलफंड स्थापन करण्याचा ठराव प्रमुख होता. श्रीमंत महाराज साहेबांनी एका चांगल्या वजनदार कमिटीचे अध्यक्षतेखाली सव्वा लक्ष रुपयांची देणगी शिक्षण प्रसाराकरिता देऊन सर्वांस ऋणी केले. ... कै.रा.वि. धामणसकर, माजी दिवाण, बडोदा यांच्या कुटुंबाने पतीच्या इच्छेनुसार ७५ हजार रुपयांची इस्टेट मराठे लोकांच्या विद्याप्रसाराकरिता देण्याचे ठरवले.' *(गेली पंचवीस अधिवेशने, अ. भा. मराठा शिक्षण परिषद, १९४१, पृ. ५०).* महाराजांनी या संस्थेच्या निर्मितीपासूनच मोठे आर्थिक पाठबळ निर्माण केल्याने ही संस्था अल्पावधीतच नावारूपाला आली.

## अ. भा. मराठा शिक्षण परिषदेला बडोद्यातून मिळालेल्या देणग्या

१) श्रीमंत सयाजीराव महाराज - १,२५,००० (बडोद्यात भरलेल्या चौथ्या अधिवेशनावेळी)

२) श्रीमंत सयाजीराव महाराज - २५,०००

३) श्रीमंत प्रतापसिंह महाराज - १०,०००

४) श्रीमंत खासेराव जाधव - १,०००

५) श्रीमंत अवचितराव गायकवाड - ५०० रुपये

६) श्रीमंत सयाजीराव गायकवाड - १९४८ रुपये (परिषदेसाठी) *(B.A.R., 1923-24, P. 303).*

महाराजांनी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेला दरवर्षी मदत सुरू केली. याबाबतची सर्व हकीगत शिक्षण क्षेत्रातील दातृत्व या प्रकरणातील 'शिक्षणासाठी दिलेल्या शिष्यवृत्त्या' या भागात दिली आहे.

## अ. भा. मराठा शिक्षण परिषदेला संलग्न संस्था

सयाजीराव महाराज, खासेराव जाधव आणि संपतराव गायकवाड यांचा मोठा आश्रय लाभलेल्या या परिषदेला संलग्न संस्थांमधून हजारो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले. त्या संस्थांची यादी -

१) फत्तेसिंह मराठा बोर्डिंग, अक्कलकोट

२) मराठा शिक्षण समाज, जत

३) श्री करवीर छ. चौथे शिवाजी मराठा बोर्डिंग, अहमदनगर

४) मराठा शिक्षण समाज, वर्धा
५) देवस्थ मराठा ज्ञातिसमाज व पंचायत सभा, मुंबई
६) मराठा शिक्षण प्रसारक मंडळी, सोलापूर
७) श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे
८) मराठा विद्याप्रसारक समाज, जळगाव
९) जनरल मराठा एज्युकेशन सोसायटी, कराची
१०) मराठा शिक्षण समाज, देवास सिनियर
११) श्री नारायण महाराज मराठा शिक्षण प्र. स., देवास ज्युनियर
१२) महाराष्ट्र हितिंचतक सभा, ग्वाल्हेर
१३) मराठा विद्याप्रसारक समाज, नाशिक
१४) मराठा उन्नती समाज, नागपूर
१५) श्री शिवाजी मराठा एज्युकेशन सोसायटी, अमरावती
१६) क्षत्रिय मराठा ज्ञाती समाज, मुंबई
१७) मराठा समाज, रायपूर
१८) मराठा समाज, जबलपूर
१९) मराठा विद्याप्रसारक समाज, नागपूर
२०) मराठा विद्याप्रसारक समाज, धारवाड
२१) मराठा विद्याप्रसारक संस्था, धुळे
२२) मराठा विद्याप्रसारक संस्था, विजापूर
२३) मराठा विद्याप्रसारक संस्था, सातारा
२४) सातारा जिल्हा मराठा संघ, मुंबई
२५) मराठा सेवा संघ, अथणी
२६) मराठा शिक्षक संघ, धर्मतरी
२७) मराठा उन्नती समाज, हिंगणघाट
२८) मराठा विद्यार्थी संघ, मुंबई
२९) मराठा समाज, कवठे महंकाळ
३०) मराठा ग्रामसुधारणा मंडळ, बस्तवडे, कोल्हापूर
३१) मराठा मंडळ, अमरावती
३२) तालुका मराठा शिक्षण परिषद, जुन्नर
३३) तालुका मराठा शिक्षण परिषद, चिपळूण
३४) श्री शाहू मराठा बोर्डिंग, बारामती
३५) मराठा समाज, यल्लूर
३६) मराठा समाज, हुबळी

३७) मराठा ज्ञानप्रसारक समाज, नागपूर
३८) श्री शिवाजी मराठा एज्युकेशन सोसायटी, चिखली
३९) मराठा विद्याप्रसारक मंडळी, निपाणी
४०) मराठा समाज, भुसावळ
४१) मराठा संघ, शहापूर
४२) मराठा फ्री बोर्डिंग, पुणे
४३) मराठा मंडळ, इचलकरंजी
४४) मराठा शिक्षण मंडळ, कल्याण
४५) मराठा संघ, दुधगाव
४६) मराठा समाज सुधारणा मंडळ, बेळगाव
४७) मराठा मंडळ, बेळगाव *(अ. भा. मराठा शिक्षण परिषदेचा इतिहास : गेली पंचवीस अधिवेशने, १९४१, परिशिष्ट - सहावे, पृ. ३२७ व ३२८)*

## डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन, पुणे

पुणे येथील गंगारामभाऊ म्हस्के या विद्वान मराठा वकिलांनी बहुजनांच्या उद्धारासाठी खूप काम केले. तसेच सामाजिक चळवळीतही नेहमीच नेहमीच अग्रेसर राहिले. सत्यशोधक समाजाची तत्त्वे त्यांना आवडत होती. त्यांना माहीत होते, समाजात शिक्षणाशिवाय जागृती होऊ शकत नाही. यासाठी हिंदुस्थानातील लोकांत शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार होणे अत्यंत गरजेचे आहे यासाठी ते नेहमीच आग्रही होते. परंतु समाजातील दुर्बल आर्थिक परिस्थितीमुळे लोक शिक्षण घेऊ शकत नव्हते. स्वत: पैसे खर्च करून समाज शिक्षण घेऊ शकत नाही हे त्यांना माहीत असल्यामुळे शिक्षणासाठी पैशाची अडचण दूर करण्याचे ठरवले. समाजाला इंग्रजी शिक्षण देण्याचे त्यांनी समविचारी मित्रांच्या साहाय्याने ठरवले. त्यासाठी त्यांनी पुणे येथे 'डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन' नावाची संस्था इ.स १८८५ मध्ये स्थापन केली. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देत. शिष्यवृत्ती साठी आवश्यक असणारा निधी त्यांनी अनेक मान्यवर व्यक्तींकडून मिळवला होता.

ही संस्था जरी इ.स.१८८३ मध्ये स्थापन झाली, तरी त्याची तयारी त्यापूर्वी अनेक दिवस गंगारामभाऊ म्हस्के यांनी केली होती. त्याबद्दलची हकिगत 'ब्राह्मणेतर व मराठे ह्यांच्या चळवळींचा पूर्वेतिहास आणि मराठ्यांची पूर्वपीठिका' या ग्रंथात सीताराम रघुनाथ तारकुंडे यांनी सविस्तर दिली आहे. 'सन १८८२ साली श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड सरकार, सेना खासखेल समशेर बहाद्दूर, ह्यांची स्वारी पुणे मुक्कामी आली होती. श्रीमंतांकडे रा.ब. महादेव गोविंद रानडे, रा.रा. गंगाराम भाऊ म्हस्के, वकील रा.रा.राजन्ना लिंगू वकील व आणखी दोन-तीन सभ्य गृहस्थ ह्यांचे डेप्युटेशन गेले. रा.ब. रानड्यांनी गायकवाड सरकारास डेप्युटेशनचा उद्देश सांगितला. डेप्युटेशनचा उद्देश हा होता की, मराठे लोकांची, त्यांस विद्या नसल्यामुळे,

किती शोचनीय स्थिती झाली आहे हे श्रीमंतांस विदित आहेच. तरी मराठ्यांच्या गरीब व होतकरू मुलांस हायस्कूलमध्ये शिक्षण मिळण्याकरिता त्यांस स्कॉलरशिप दिल्या पाहिजेत. या कामाकरिता आम्ही एक फंड काढला आहे. त्यास श्रीमंतांनी हातभार लावावा. गायकवाड सरकारांनी डेप्युटेशनचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले व डेप्युटेशनास कळविले की, मंडळींचा उद्देश फार चांगला आहे. आम्ही फंडास दरसाल बाराशे रुपये देत जाऊ. सदरहू संस्थेस 'डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन' असे नाव दिले असून अद्याप पावेतो सदर संस्थेस गायकवाड सरकारांकडून दरसाल सदर रक्कम येत असून ह्या संस्थेपासून मराठा विद्यार्थ्यांना अतिशय उपयोग झाला आहे.' *(तारकुंडे, १९२२, पृ. १३७)*. प्रथम प्रतिवर्षी बाराशे रुपये दिले. पुढे ही रक्कम २,४०० रुपये करण्यात आली. त्याशिवाय मराठा समाजातील हुशार, होतकरू आणि गरीब मुलींना महाराजांनी १,४०० रुपये वेगळे दिले. ही रक्कम इ.स. १८८५ पासून पुढे महाराजांच्या मृत्युपर्यंत सुरू होती.

'सयाजीराव महाराज, महाराणी चिमणाबाई आणि महाराजांचे वारसदार महाराज प्रतापसिंह यांनी ५,२९,२५६ रुपये या संस्थेला दिले.' *(वार्षिक अहवाल, डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन पुणे, २०१६-२०१७)*. या संस्थेला इतरही अनेकांनी मदत केली असली तरी त्यामध्ये महाराजांचा वाटा खूप मोठा होता.

मराठा शिक्षण परिषदेच्या पहिल्या बैठकीच्या वेळी 'अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद' स्थापनेविषयी अनेकांची मते मागवली होती. त्यावेळी बडोद्यातील बापूराव रामचंद्र आवटे यांनी 'मराठा शिक्षण परिषद, तिची आवश्यकता, उद्देश आणि कार्ये' या विषयावर एक बोधपर आणि दिशादर्शक निबंध पाठवला होता. त्यात महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी 'डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन' या संस्थेला केलेल्या मदतीबद्दल उल्लेख केला आहे. त्याबद्दल आवटे म्हणतात, 'केवळ वीस वर्षांच्या अल्पावधीत डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन या संस्थेने शिक्षणाच्या बाबतीत आपल्या ज्ञातीची मोठी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. संस्थेच्या आश्रयामुळे ३ एम.ए., ५ बी.ए.एलएल.बी., १७ बी.ए., १ एल.एम.अँड.एस., २ एल.सी.ई., ८६ मॅट्रिक, २२ यू.एस.एफ. इत्यादी परीक्षा उत्तीर्ण होऊन बाहेर पडले आहेत. या संस्थेस मुख्य साहाय्य बडोद्याचे श्री. सयाजीराव गायकवाड व कोल्हापूरचे श्री. शाहू छत्रपती या उभय सरकारचे आहे. आज वीस वर्षेपर्यंत या संस्थेचे काम मोठ्या व्यवस्थित रीतीने चालले आहे.' *(मराठा शिक्षण परिषद, पहिल्या बैठकीचा अहवाल, १९०७, पृ. ९४)*. थोडक्यात गंगारामभाऊ म्हस्के यांनी 'डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन' ही संस्था सास्थापन केली असली तरी तिचे पालनपोषण आणि वृद्धी सयाजीराव महाराजांनी मोठी देणगी देऊन केली.केली.

सयाजीराव महाराजांनी दिलेल्या या शिष्यवृत्तीवर महाराष्ट्रातील अनेकांनी शिक्षण घेतले. या शिष्यवृत्तीवर शिक्षण घेतलेल्यांनी महाराष्ट्रात समाज आणि लोकांच्या सुधारणेसाठी फार मोठे काम केले. त्यामधील एक महत्त्वाचे नाव म्हणजे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे होय. या संस्थेच्या माध्यमातून गंगारामभाऊ म्हस्के यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या

आर्थिक सहकार्याने अनेकांना मदत केली. (महाराजांनी प्रत्येक वर्षी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनला किती रक्कम दिली याची नोंद ‘शिक्षण क्षेत्रातील दातृत्व’ या प्रकरणातील ‘शिक्षणासाठी दिलेल्या शिष्यवृत्त्या’ या भागात घेतली आहे.)

## डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनची शिष्यवृत्ती मिळालेल्या व्यक्ती

सयाजीराव महाराजांनी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनला सर्वाधिक मदत केली. या मदतीतून या संस्थेने अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. यातून अनेकांना उच्च शिक्षण घेता आले. इ.स.१९३४-३५ मध्ये संस्थेचा सुवर्ण महोत्सव साजरा केला. त्यावेळी प्रकाशित त्यांच्या अहवालात पन्नास वर्षांत संस्थेने केलेल्या मदतीवर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती दिली आहे. ‘पीएच.डी.-३, बार ॲट लॉ-३, एम.एस्सी.-३, एम.इडी-१, डी. एस्सी.१, एम.ए.एलएल.बी.-७, एम.ए.-१०, बी.ए. एलएल.बी.-५०, ॲडव्होकेट -६, बी.ए.-१५४, एल.जी. आणि बी.जी.-४०, बी.एस्सी. -९, एल.सी.ई.आणि बी.ई.-१२, बी.कॉम-१, बी.टी.-३, एम.बी.बी.एस.-५, एल.सी.पी.एस. आणि सब.(अ.सर्जन)-१३, सब.ओव्हरसिअर-१५, जी.बी. व्ही.सी.-३, एकूण -३३८.’ *(सुवर्ण महोत्सव ग्रंथ, डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन, १९३५-३६, पृ. ७).* या उच्चशिक्षितांमध्ये अनेकांना महाराजा सयाजीराव यांची शिष्यवृत्ती मिळाली होती.

ज्या विद्यार्थ्यांनी संस्थेची शिष्यवृत्ती घेऊन शिक्षण पूर्ण केले आणि पुढे समाजासाठी चांगले काम केले. अशा काही नामांकित विद्यार्थ्यांची नावे- (कंसात त्यांचे कार्यक्षेत्र दिले आहे.)

१) लक्ष्मणराव गणपतराव माने (पहिले शिष्यवृत्तीधारक, समाजसेवा)
२) दाजीराव अमृतराव विचारे (कोल्हापूर संस्थानात विविध पदांवर चांगली कामगिरी)
३) रामचंद्रराव नारायणराव जाधव (बडोद्याचे राजरत्न)
४) गोविंदराव बाबाजी पवार (श्री. शिवछत्रपती जन्मस्थान जीर्णोद्धार कमिटीची स्थापना, श्री. शिवाजी मराठा सोसायटी, पुणेचे आश्रयदाते)
५) रावसाहेब महादेवराव देबजीराव राणे (शिक्षण)
६) रामचंद्र जनार्दन सावंत (बडोदे संस्थानात नायब सुभे, असि.अकौंटंट जनरल)
७) विठ्ठलराव गोविंदराव माने (बडोदे संस्थान नायब सुभे)
८) वासुदेव लिंगोजीराव बिर्जे (बडोदे संस्थान राजमहालात ग्रंथपाल, इतिहासकार, लेखक)
९) भास्करराव विठोजीराव जाधव (कोल्हापूर संस्थानात नोकरी)
१०) महादेवराव गोविंदराव पवार (बडोदा संस्थानात नोकरी)
११) खंडेराव गोपाळ बागल (मराठा समाजातील पहिले वकील)
१२) यशवंतराव भगवंतराव मोहिते (बडोदा संस्थानात शिक्षक)
१३) जिजाबा बजाराम मोहिते (बडोदा संस्थानात खानगी कारभारी, बॅरिस्टर)
१४) रामचंद्र नारायण जाधव (बडोदा संस्थानात नोकरी)

१५) कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे (समाजसेवा)
१६) तुकोजीराव अप्पाजीराव चव्हाण (बडोदा संस्थानात विविध पदांवर नोकरी)
१७) राजाराम सतोबा परब (बडोद्यात खानगी कारभारी)
१८) रामचंद्रराव आसवले (शिक्षण आणि समाजसेवा)
१९) गणपतराव भाऊराव तावडे (जिल्हा न्यायाधीश नवसारी, बडोदा (समाजसेवा)
२०) जयराम जनार्दन सावंत (बडोदा राज्यात इंजिनिअर)
२१) रामचंद्रराव रावजी पवार (बडोदा संस्थानात अधिकारी)
२२) पांडुरंग चिमणाजी पाटील थोरात (समाजसेवा)
२३) विठ्ठलराव मार्तंडराव कारळे (पोलीस खात्यात नोकरी)
२४) गोपाळराव दाजीबा नाईक (समाजसेवा)
२५) लक्ष्मणराव भाऊराव खैरे (बडोदा संस्थानात नोकरी)
२६) रामचंद्रराव बळवंतराव चव्हाण, देशमुख आटपाडीकर (पोलीस खात्यात नोकरी, बडोदा)
२७) गोपाळराव लिंगोजीराव बिरजे पाटील (बडोदा संस्थानात असि. जज्ज)
२८) रावसाहेब दाजी देशमुख (बडोदा संस्थानात सव्हे खात्यात नोकरी)
२९) दत्तात्रय रामचंद्र भोसले (श्रीउदोजी बोर्डिंग, नाशिक स्थापना)
३०) रावसाहेब के.एम.पवार (लेखक, सेक्रेटरी, डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन आणि श्रीशिवाजी मराठा सोसायटी)
३१) डॉ. लक्ष्मणराव सदुजी साळुंखे (बडोदा संस्थानात नोकरी, डॉक्टर)
३२) रामचंद्र सदाशिव परब (बडोदा संस्थानच्या लष्करात नोकरी)
३३) राजाराम गोविंद शिंदे (समाजसेवा)
३४) राजरत्न रामचंद्रराव शामराव माने पाटील (लेखक, बडोदा संस्थानात नोकरी, समाजसेवा)
३५) सदाशिवराव लक्ष्मणराव पाटील (क्षात्रजगद्गुरू पदाकरिता निवड, लेखक)
३६) आबासाहेब बाळासाहेब मोहिते (बडोदा संस्थानात न्याय खात्यात मुन्सफ)
३७) सीताराम रामजी तावडे (लेखक, सेक्रेटरी, डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन, पुणे)
३८) बाळकृष्ण गणपतराव सावंत (बडोद्यास खानगी खात्यात चिटणीस)
३९) फत्तेसिंगराव सदाशिव काळे (बडोद्यास खानगी खात्यात नोकरी)
४०) नारायणराव रावजी तावडे (बडोद्यास खानगी खात्यात नोकरी)
४१) हनुमंत परशुराम सूर्यवंशी (धारवाड येथे शाहू बोर्डिंगची स्थापना)
४२) तुकाराम गोपाळ शिरनामे (शेतीविषयक अभ्यास)
४३) प्रभाकर कोंडाजी भापकर (अहमदनगर लोकल बोर्डाचे व्हाईस प्रेसिडेंट)
४४) नामदेवराव एकनाथराव नवले (समाजसेवा)
४५) रवळनाथ कृष्णाजी तोरसकर (समाजसेवा)

४६) परशराम गणपतराव तिडके (सेक्रेटरी, श्रीउदाजी बोर्डिंग नाशिक, समाजसेवा)
४७) दत्तात्रय नारायण चव्हाण (बडोदा संस्थानात असि. एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर)
४८) वामनराव गणपराव तिडके (नामांकित वकील)
४९) आनंदराव अवचितराव चव्हाण (समाजसेवा )
५०) विठ्ठलराव महादेव घुले (लेखक, सेक्रेटरी छत्रपती एज्यु. सोसायटी संगमनेर) अशा अनेक लोकांना या संस्थेच्या माध्यमातून शिष्यवृत्ती मिळाली. महाराजांच्या दातृत्वामुळे महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेता आले. या शिष्यवृत्तीवर शिक्षण घेऊन या विद्यार्थ्यांनी पुढे समाजसुधारणेत काम केले. महाराष्ट्रात विविध प्रांतांत शिक्षण संस्था काढल्या. या शिक्षण संस्थांच्या माध्यमांतून अनेक विद्यार्थी शिक्षणासारख्या ज्ञानगंगेत सामील झाले. त्यामुळेच पुढे पुरोगामी राष्ट्र अशी महाराष्ट्राची ओळख झाली.

## श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे

पुणे येथील बुधवार पेठेत जन्मलेल्या बाबुराव जगताप यांनी या संस्थेची स्थापना केली. तत्पूर्वी सयाजीराव महाराजांच्या सेवेत त्यांची लष्करात लेफ्टनंट (शिकाऊ) म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर त्यांची महाराणी चिमणाबाई साहेब यांचे ए.सी.डी. म्हणून नेमणूक झाली. पुढे काही कालावधीनंतर त्यांची महाराजांचे ए.सी.डी. म्हणून नेमणूक झाली; परंतु त्यांच्या अंगी असणाऱ्या समाजसेवेच्या गुणांमुळे त्यांनी या नोकरीचा इ.स.१९१८ मध्ये राजीनामा दिला. पुढे पुणे येथे आल्यावर 'श्री. शिवाजी मराठा स्कूल' ही शाळा काढली.

बडोद्यातील नोकरीचा राजीनामा दिल्यावर सुद्धा सयाजीराव महाराजांची कृपादृष्टी त्यांच्यावर राहिली. महाराजांना जगताप हे बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य करत असल्याचे माहीत असल्यामुळे या शाळेस खूप मदत केली.

सयाजीराव महाराजांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रात जे अनेक सत्कार झाले, त्यावेळी त्यांनी जगताप यांच्या श्री शिवाजी मराठा स्कूल, श्री शिवाजी फ्री बोर्डिंग, ताराबाई वसतिगृह, श्री शिवाजी मिलटरी स्कूल या संस्थांना भेट दिली आणि संस्था चालकांचा उत्साह द्विगुणित केला.

बाबुराव जगताप जरी बडोद्याची नोकरी अर्ध्यावर सोडून आले होते, तरी महाराजांनी त्यांना मदत केली. त्यांचा या कार्यातील उत्साह वाढविला. (याबाबत रकमांचा तपशील उपलब्ध नाही.)

## ग्रंथ प्रसारक मंडळी, बडोदे आणि मुंबई

सयाजीराव महाराज ग्रंथ निर्माण करणाऱ्या, साहित्य निर्मितीस मदत करणाऱ्या संस्थांना नेहमीच मदत करत. (याबद्दलची संपूर्ण हकिगत 'साहित्य निर्मितीतील दातृत्व' या प्रकरणात आली आहे).

साहित्यिक आणि विचारवंत दामोदर सावळाराम यंदे 'शेतकऱ्यांचा कैवारी' हे वृत्तपत्र मुंबई येथे चालवत होते. या वृत्तपत्राविषयी समजताच महाराजांनी त्यांना बडोद्यात बोलावून घेतले. बडोद्यात आल्यावर यंदेंनी 'बडोदा वत्सल' हे वृत्तपत्र सुरू केले. काही कालावधीनंतर त्यांनी 'श्रीसयाजी विजय' हे साप्ताहिक चालवले. यंदे यांची साहित्याविषयीची धडपड पाहून महाराज प्रभावित झाले. अल्पशा कालावधीतच यंदे महाराजांचे मित्र झाले. त्यांच्या भेटी नेहमी होत होत्या. साहित्याविषयी त्या दोघांमध्ये वारंवार चर्चा होत होत्या. पुढे यंदे यांनी बडोद्यात 'ग्रंथ संपादक आणि प्रसारक मंडळी' नावाची संस्था स्थापन केली.

सयाजीराव महाराजांनी यंदेंना प्रोत्साहन दिल्यामुळे त्यांनी अनेक महत्त्वाच्या विषयांवरील इंग्रजी ग्रंथांचे भाषांतर प्रकाशित केले. त्यांची ही संस्था साहित्यनिर्मितीस नेहमीच प्रोत्साहन आणि प्रेरणा देत होती. त्यामुळे साहजिक अल्पावधीत या संस्थेकडे महाराजांची कृपादृष्टी वळली. त्यांनी या संस्थेला वारंवार मदत केली.

दामोदर सावळाराम यंदे यांचे साहित्यातील कार्य पाहून महाराजांनी १६ फेब्रुवारी १९३० रोजी यंदे यांचा सन्मान करण्यासाठी खास दरबार भरवला होता. या दरबारात त्यांना सन्मानचिन्ह दिले. या दरबारप्रसंगी रवींद्रनाथ टागोर उपस्थित होते. महाराजांनी यंदे यांचा भाषणातून गौरव आणि आदरसत्कार केला. यंदेंनी बडोदा सोडल्यावर महाराज आणि त्यांच्यामध्ये पुढेही कायम जिव्हाळा राहिला. यंदे यांच्या विनंतीवरून मुंबईतील 'ग्रंथ संपादक मंडळी'च्या ज्युबली कार्यक्रमास (इ.स. १९३०) महाराज आजारी असतानाही स्वत: उपस्थित राहिले. या संस्थेचे कार्य पाहून महाराजांनी इ.स. १९०१ मध्ये १,२०० रुपयांची मदत केली.

दामोदर सावळाराम यंदे हे सर्वपरिचित समाजसुधारकही होते. सयाजीराव महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रथम भेटीच्या वेळी केळुसकर गुरुजी आणि आंबेडकर यांना महाराजांकडे घेऊन जाण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले होते.

## जागतिक प्राच्यविद्या परिषद

सयाजीराव महाराजांना प्राच्यविद्येविषयी खूप आस्था होती. त्यांनी बडोदा संस्थानात अशा प्रकारची संस्था स्थापन केली होती. या संस्थेच्या अनुषंगाने जगभरात घडणाऱ्या प्रत्येक घटनेकडे त्यांचे लक्ष होते. सयाजीराव महाराज उदारहस्ते मदत करत होते. (याबाबतची अधिक माहिती 'ग्रंथालय व प्राच्यविद्येला मदत' या प्रकरणात दिली आहे).

## डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटी, पुणे

डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटी, पुणे (आताचे नाव- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था) गेली १२३ वर्षे उत्कृष्ट मराठी ग्रंथांना पुरस्कार देऊन उत्तेजन देण्याचे कार्य करीत आहे. ही संस्था महाराष्ट्रातील जुनी साहित्य संस्था आहे. आधुनिक महाराष्ट्राचे आद्य प्रवर्तक न्या. महादेव गोविंद रानडे, हरी नारायण आपटे, डॉ. रामकृष्ण भांडारकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, आबाजी वि. काथवटे इत्यादी पंचवीस द्रष्ट्या महाराष्ट्रीय समाजसुधारकांनी ही संस्था इ.स. २९

ऑक्टोबर १८९४ रोजी स्थापन केली. मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या विकासासाठी काम करण्याचे उद्दिष्ट या स्थापनेमागे होते.

इ.स. १८९४ मध्ये संस्था स्थापन झाल्यावर या संस्थेचे महत्त्व सर्वांना पटले. या संस्थेच्या स्थापनेनंतर पुढील वर्षीच इंग्रज सरकारच्या दक्षिणा प्राईझ कमिटीचे सर्व काम संस्थेकडे आले. इ.स. १८८७ पासून कमिटीकडे आलेली १०२ पुस्तकेही त्यावेळी संस्थेकडे पारितोषिकांच्या शिफारशीसाठी पाठविण्यात आली. इंग्रज सरकार मराठी ग्रंथांना पुरस्कार देत असे. त्याची शिफारस करण्याचे काम संस्थेकडे आले.

सयाजीराव महाराज ही संस्था स्थापन होण्यापूर्वीच बडोद्यात मराठी आणि देशी भाषांतील साहित्यासाठी मदत करत होते. ज्या मान्यवरांनी ही संस्था स्थापन केली होती; त्यातील बरीचशी मंडळी महाराजांचे मित्र होते. त्यांना यापूर्वीही महाराजांनी मदत केली होती. 'ही संस्था स्थापन झाल्यावर महाराजांनी या संस्थेला मदत म्हणून इ.स. १८९५ मध्ये ५,००० रुपये दिले.' *(जोशी, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४५०).*

## ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई

इ.स. १८४५ मध्ये स्थापन झालेले 'द ग्रँट गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, मुंबई' हे एक भारतातील प्रमुख नामांकित वैद्यकीय महाविद्यालय आहे. भारतातील प्रमुख वैद्यकीय संस्थांमध्ये आणि आशियातील पाश्चात्त्य औषधांचे शिक्षण देणारी सर्वांत जुनी संस्था आहे. देशभरातील पहिल्या दहा मेडिकल कॉलेजांच्या यादीमध्ये हे सातत्याने क्रमवारीत असते. महाविद्यालयात पदवीसाठी दरवर्षी सुमारे २०० मुलांसाठी आणि १०० विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश मिळतो.

आज या संस्थेची जरी भरभराट झाली असली तरी पूर्वी या संस्थेला अनेकांच्या मदतीची गरज होती. सयाजीराव महाराज बडोदा संस्थानात लोकांच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणात खर्च करत होते. त्यांना आरोग्याचे महत्त्व माहीत होते. त्यामुळे मुंबईसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी असणारी ही संस्था समाजाचे आरोग्य व्यवस्थित करण्यासाठी काम करत आहे हे महाराजांना ज्ञात होते. त्यामुळे महाराजांनी या संस्थेला अनेक वेळा मदत केली. 'ग्रँट मेडिकल कॉलेजचे प्रिन्सिपॉल यांच्याकडे विद्यार्थ्यांचे वसतिगृह बांधण्यासाठी महाराजांनी इ.स. १९०१ मध्ये १,००० रुपये दिले. त्यानंतर ग्रँट मेडिकल कॉलेजचे प्रिन्सिपॉल यांच्याकडे कान व घशाच्या आजारासंबंधी पुरवणी व्याख्याने देण्याकरिता इ.स.१९०२ मध्ये ५,००० रुपये दिले.' *(जोशी, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४५०-४४९)* अशा पद्धतीने महाराजांनी मोठ्या रकमा या संस्थेसाठी दिल्या. यातून महाराजांचे लोकांच्या आरोग्याकडेही किती लक्ष होते हे लक्षात येते.

## उद्योगमहर्षी टाटांना मदत

जमशेटजी टाटा बडोदा राज्यातील नवसारी प्रांताचे रहिवासी होते. महाराज आणि त्यांचे संबंध मैत्रीचे होते. त्यामुळे महाराजांनी सुरुवातीच्या काळात टाटांना खूप मदत केली. त्यातील

काही नोंदी

१) ते सुरू करत असलेल्या 'टाटा आयर्न अँड स्टील'साठी इंग्रज त्रास देत होते. या कठीण काळात सयाजीराव महाराज त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. अनेक वेळा आपले वजन इंग्रजांजवळ खर्ची घातले. यामुळे टाटांना उद्योग उभारणे शक्य झाले. तसेच 'ताजमहाल' हॉटेल उभारणीसाठी पाठबळ दिले.

२) द्वारका बंदराजवळ मिठागर येथे 'टाटा केमिकल्स' उभारणीसाठी महाराजांनी जागा उपलब्ध करून दिली. तसेच कारखान्याचे १,२५,००,००० रुपये (एक कोटी पंचवीस लाख) शेअर्स खरेदी करून मदत केली. *(B.A.R., 1940-41, p. 219)*

३) टाटा सन्स लि. मुंबई कंपनीचे २५,००,००० (पंचवीस लाख) रुपयांचे शेअर्स इ.स. १९३९ मध्ये खरेदी केले. For Manufacture of Soda, Ash, Caustic Soda and other Chemicals. *(Baroda Guide Book, 1941, p.97.)*

४) सयाजीराव महाराजांनी टाटा स्मारकफंडाला २,००० रुपये दिले. *(इ.स. १९०५)*

५) बडोदा राज्यातील रेल्वेसाठी 'टाटा आयर्न वर्क'कंपनीकडून कोळसा विकत घेण्यास मंजुरी दिली. (२२ ऑगस्ट १९१९) या काळात इंग्रज कंपनीकडून कोळसा घ्यावा असा अलिखित नियम होता. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९१९-२०, पृ. २१५.)*

६) नवसारी येथे महाराजांनी आर.डी. टाटा यांच्या संगमरवरी अर्धपुतळ्याचे अनावरण महाराजांनी २९ डिसेंबर १९२८ रोजी केले. यावेळी महाराज म्हणाले, 'मरहूम टाटा माझे स्नेही होते. त्यांच्याच सूचनेवरून आणि त्यांच्या मदतीने बडोदा कॉलेजात फ्रेंच भाषा शिकवण्याची मी सोय केली. त्यांचे कायमचे वास्तव्य जरी मुंबईत असे, तरीसुद्धा नवसारी शहरातल्या आपल्या गावकऱ्यांच्या उन्नतीची त्यांना नेहमीच कळकळ वाटत असे, आणि स्वतःचे जन्मस्थान असलेल्या या नवसारी शहरात शिक्षणाचा प्रसार करण्याकरिता ते अधूनमधून उदार देणग्याही देत असत. तेव्हा मला ज्याचे अनावरण करण्याचे तुम्ही सांगितले तो त्यांचा सुंदर अर्धपुतळा तयार करण्यासाठी त्यांच्या अनेक मित्रांनी व चाहत्यांनी वर्गणी गोळा केली, हे सर्वस्वी योग्य झाले. या पुतळ्याचे अनावरण मी मोठ्या आनंदाने करतो. हा पुतळा टाटांच्या कीर्तीचे स्मारक, तुमच्या आदराचे व प्रेमाचे द्योतक आणि त्यांच्या वडिलांचे नाव धारण करणाऱ्या या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पूज्य भावनेचे व अभिमानाचे प्रतीक होऊन राहील अशी मला आशा आहे.' *(भाषण क्र. १३९)*

## जे.एन. टाटा औद्योगिक शाळा, नवसारी

सयाजीराव महाराजांनी इ.स. १८९० मध्ये बडोद्यात कलाभवन नावाची नावीन्यपूर्ण शाळा उभारली. त्यामुळे तांत्रिक आणि आद्योगिक शिक्षण बडोद्यात सुरू झाले. हिंदुस्थानात कलकत्ता सोडता इतर ठिकाणी अशा प्रकारचे शिक्षण कोठेही नव्हते. बडोद्यात सुरू झालेल्या या संस्थेमुळे

अनेक विद्यार्थी परदेशात न जाता शिक्षण घेऊ लागले. महाराजांच्या आधुनिक दृष्टिकोनातून ही संस्था उभारली होती. दिवसेंदिवस या संस्थेची प्रगती झाली. काही कालावधीनंतर बडोदा संस्थानच्या ग्रामीण भागातसुद्धा या तांत्रिक शिक्षणाची आवश्यकता भासू लागली.

त्यावेळी नवसारीमध्ये खासगी जे.एन. टाटा आद्योगिक शाळा इ.स.१९०८-०९ मध्ये उघडण्यात आली. या शाळेला प्रतिवर्ष ७,५४१-९-९ एवढा खर्च होत होता. या शाळेमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि कॅबिनेट बनविणे आणि चित्रकलेचे वर्ग चालत असत. ही खासगी शाळा असल्यामुळे या शाळेला अनुदानाची गरज निर्माण झाली. सयाजीराव महाराजांच्या ही बाब लक्षात येताच या संस्थेसाठी इ.स. १९२१-२२ पासून प्रतिवर्षी ३,४०० रुपये अनुदान सुरू केले. ते इ.स. १९३९-४० पर्यंत महाराज हयात असताना सुरू होते. पुढेही सुरू होते. या संस्थेसाठी महाराजांनी एकूण ६८,००० रुपये अनुदान दिले.' *(B.A.R., 1921-22 to 1939-40)*. ग्रामीण भागात त्याकाळी अशा शिक्षणासाठी कोणीही एवढी मोठी रक्कम खर्च केली नाही.

महाराजांनी राज्यकारभाराच्या संपूर्ण कार्यकाळात अनेक संस्थांना मदत केली. त्यामध्ये अनेक नामांकित संस्था होत्या. त्या सर्वच संस्थांना केलेली मदत तपशीलवार देणे विस्तारभयास्तव शक्य नाही. त्यामुळे पुढे काही संस्था आणि केलेली मदत यांची यादी दिली आहे.

### सयाजीराव महाराजांनी खानगी फंडातून संस्थांना दिलेल्या देणग्या

१) इंडियन इन्स्टिट्यूट ऑक्स्फर्ड (बांधकामास) २,५०० रु. (इ.स.१८७९)
२) गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीस (महाराजांच्या नावे बक्षीस देण्यासाठी) ५००० रु. (१८८२)
३) माजगाव कॉन्व्हेंट व सेंट एलिझाबेथ विधवाश्रमास मदत ५०० रुपये (१८८३)
४) अंजुमन इस्लाम संस्था, अहमदाबाद, १००० रुपये (१८८५)
५) अनाथाश्रम, बंगलोर, ३०० रुपये (इ.स. १८८५)
६) लिटररी सोसायटी, कलकत्ता, १,५०० रुपये (इ.स.१८८५)
७) ओरिएंटल इन्स्टिट्यूट, इंग्लंड, ६००० रुपये (१८८७)
८) इम्पीरियल इन्स्टिट्यूट, लंडन, ५०,००० रुपये (१८८७)
९) क्षात्रधर्म प्रतिपादक सभा, मुंबई, २०० रुपये (इ.स.१८८८)
१०) फर्ग्युसन कॉलेज, पुणे (इमारतीसाठी), ६००० रुपये (इ.स.१८८८)
११) डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे (आश्रयदातृत्वाची देणगी), ६००० रुपये (इ.स.१८८८)
१२) गायन समाज, पुणे (रामकृष्णबुवा), १०० रुपये (१८९०)
१३) केशव उद्योग शाळा, कलकत्ता (बाबू प्रसन्नसेन), ३०० रुपये (१८९०)
१४) Nasik sanitorium करिता ४००० रुपये (१२/०५/१८९२)
१५) इंडियन नॅशनल असोसिएशन, गुजरात (सेक्रेटरी), ५०० रुपये (इ.स.१८९०)
१६) Stundents लिटररी आणि सायंटिफिक सोसायटी, मुंबई (का.त्र्य. तेलंग), ५०० रुपये (इ.स. १८९०)

१७) महारोगी आश्रम, मुंबई (म्युन्सिपल कमिशनर), १०,००० रुपये (इ.स.१८९२)

१८) महाराष्ट्र वक्तृत्वोत्तेजक मंडळ (साठे व भट), ५०० रुपये (इ.स. १८९२)

१९) सेंट जोसेफ अनाथाश्रम (सेक्रेटरी), ८०० रुपये (पूर्वीपासून) (इ.स.१८९२)

२०) राखी समिती, कलकत्ता (सेक्रेटरी), २,००० रुपये (इ.स. १८९२)

२१) ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई (सेक्रेटरी), १००० रुपये (इ.स.१८९३)

२२) मुंबई विद्यापीठात मातृभाषेला आवश्यक ते समाधानकारक स्थान देण्याला प्रोत्साहन म्हणून ५०० रुपये प्रती वर्ष पाच वर्षांकरिता देण्याचा हुकूम महाराजांनी काढला. (१८९३)

२३) नेटिव्ह इन्स्टिट्यूट, पुणे (सेक्रेटरी), इमारत बांधकामासाठी, १,००० रुपये (इ.स.१८९४)

२४) लिटररी असोसिएशन, कडप्पा (सेक्रेटरी), १००० रुपये (इ.स.१८९५)

२५) डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटी, पुणे (आबाजी वि. काथवटे), ५,००० रुपये (इ.स.१८९५)

२६) ग्रंथप्रसारक मंडळी, (दा.सा.यंदे), १,२०० रुपये (इ.स.१९०१)

२७) सेन्ट्रल हिंदू कॉलेज, बनारस (धर्मशिक्षणाकरिता), १,००० रुपये (इ.स.१९०१)

२८) ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई (विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाकरिता), १००० रुपये (१९०१)

२९) इंडियन कॉलेज अलिगढ, (कॉलेजला जोडून इस्पितळ बांधण्यासाठी), १००० रुपये (इ.स.१९०१)

३०) ग्रँट मेडिकल कॉलेज, (प्रिन्सिपॉल) मुंबई (कान व घशाच्या आजारासंबंधी पुरवणी व्याख्याने देण्याकरिता), ५,००० रुपये. (इ.स.१९०२)

३१) प्राण्यांचे कौर्य निवारण मंडळी, मद्रास (जस्टिस बॉडम), ५०० रुपये (इ.स.१९०२)

३२) अंजुमन इस्लाम, मोफत वाचनालय, हिंदू आश्रम, गरिबांची शाळा, अंधशाळा, स्त्रियांची शाळा (सर्व संस्था, मद्रास), ९७५ रुपये (इ.स. १९०२)

३३) अलेक्झांड्रा नेटिव्ह गर्ल्स इन्स्टिट्यूट (अध्यक्ष), २०० रुपये (इ.स.१९०४)

३४) अनाथ बालिकाश्रम, हिंगणे (प्रो.धों.के. कर्वे), ७०० रुपये (इ.स.१९०४)

३५) पंचांग संशोधन मंडळ, पुणे (सर भालचंद्र), १००० रुपये (इ.स.१९०४)

३६) देव समाज, लाहोर (सेक्रेटरी), २५० रुपये (इ.स. १९०४)

३७) हिंदू बोर्डर असोसिएशन, अलाहाबाद (इमारत व लायब्ररी बांधण्याकरिता) ४००० रुपये (इ.स.१९०४)

३८) अनाथाश्रम (पंडित मदन मोहन मालवीय), ३०० रुपये (इ.स.१९०४)

३९) इस्पितळ, उटकमंड (सेक्रेटरी), ५०० रुपये (इ.स. १९०४)

४०) मेयो कॉलेज, अजमीर (फंड), १०,००० रुपये (इ.स. १९०४)

४१) जैन कॉन्फरन्स, अहमदाबाद (लालभाई दलपत), ५०० रुपये (इ.स. १९०४)

४२) अल्बर्ट हॉस्पिटल, कलकत्ता (सेक्रेटरी), ५००० रुपये (इ.स. १९०५)

४३) रॉयल म्युझियम, मुंबई (सेक्रेटरी) ५००० रुपये (इ.स. १९०५)

४४) राष्ट्रीय सामाजिक परिषद, मुंबई (ना.न्या. चंदावरकर), २०० रुपये (इ.स.१९०७)
४५) अंजुमन इस्लाम इमारत (मे. अब्बास तय्यबजी), २०,००० रुपये (इ.स. १९०७)
४६) श्री सयाजी बोर्डिंग पेटलाद (मदत), ५०० रुपये (इ.स. १९०९)
४७) अजमीर कॉलेज, डॅली कॉलेज आणि इंदूर कॉलेज (प्रिन्सिपॉल ) सर्वांना मिळून ७,००० रुपये (इ.स. १९०९)
४८) डॅली कॉलेज, इंदोरसाठी ग्वाल्हेरच्या महाराजांकडे २०,००० रुपये दिले.
४९) धर्म परिषद, बंगलोर (व्ही.पी.माधवराव), ५०० रुपये (इ.स. १९१२)
५०) लेडी हार्डिंग स्त्री वैद्य विद्यालय, दिल्ली (सेक्रेटरी), १,००,००० रुपये (इ.स. १९१३)
५१) जुमा मशीद, बडोदे (जीर्णोद्धार), ४००० रुपये, खासगीतून आणि सरकारमधून धर्मार्थ देणगी रुपये ४५,००० दिली. (इ.स. १९१३)
५२) मुलींचे कॉलेज, दिल्ली (संस्थेस मदत), २५,००० रुपये (इ.स.१९१५)
५३) लेडी हार्डिंग इस्पितळ, दिल्ली, ६२,००० रुपये (इ.स. १९१६)
५४) स्टेट जनरल इस्पितळ, बडोदे (क्ष-किरणांची सामग्री), ३,००० रुपये (इ.स. १९१६)
५५) सेंट जॉन्स ॲम्ब्युलन्स फंड, मेसोपोटेमिया (डॉ. मेयर), १,२०० रुपये (इ.स. १९१६)
५६) बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी (पं.मदन मोहन मालवीय) १,००,००० रुपये (इ.स. १९१६)
५७) अनाथ बालकाश्रम, पंढरपूर (मदत), २५० रुपये (इ.स. १९१६)
५८) कन्या महाविद्यालय, जालंदर (मदत), १०० रुपये (इ.स. १९१६)
५९) म. गरोळ धर्मशाळा (बांधकाम), १२,१८६ रुपये (इ.स. १९१६)
६०) भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे (सेक्रेटरी), १,००० रुपये (इ.स.१९१६)
६१) महिला परिषद, अहमदाबाद (मिसेस ब्रुमफिल्ड), १,००० रुपये (इ.स.१९१६)
६२) मिसेस ब्रुमफिल्ड वेगळाली महायुद्धाने मिळून, १०,३०० रुपये (इ.स.१९१६)
६३) मुंबई आर्ट सोसायटी, मुंबई (प्रदर्शन), १०० रुपये (इ.स.१९१७)
६४) वेगळाली महायुद्ध पुन्हा मदत, २,६७४ रुपये (इ.स.१९१७)
६५) इंडियन क्लब, म्हैसूर (देणगी), ५,००० रुपये (इ.स.१९१७)
६६) अखिल भारतीय संगीत परिषद, मुंबई (रा. भातखंडे), १००० रुपये (इ.स.१९१८)
६७) संस्कृत पाठशाला, त्र्यंबकेश्वर (देणगी), ३०० रुपये (इ.स.१९१८)
६८) उदोजी बोर्डिंग, नाशिक (विद्यार्थ्यांस मेजवानी), ३०० रुपये (इ.स.१९१८)
६९) काठेवाड दुष्काळ संकट निवारणफंड (कर्नल वुड), ३,००० रुपये (इ.स. १९१९)
७०) एल्फिन्स्टन कॉलेज (प्रिन्सिपॉल) (देणगी), ३,००० रुपये (इ.स. १९१९)
७१) पाश्चूर चिकित्सालय, कमोली (सेक्रेटरी), ५,००० रुपये (इ.स. १९१९)
७२) शारीरिक खेळांचे आणि कुस्त्यांचे अखिल भारतीय सामने, पुणे, ३०० रुपये (इ.स. १९१९)

७३) रु.५०,००० Lady Chelmsford League of Maternity and child welfare in India या संस्थेस दिले. (इ.स. १९२०) *(खासगी व कौटुंबिक वृत्तांत, १९२५, पृ. २८७)*

७४) रुपये २५,००० disabled officer's fund या संस्थेस दिले. (इ.स. १९२०) *(खासगी व कौटुंबिक वृत्तांत, १९२५, पृ. २८७)*

७५) शिशुसंगोपन संघाच्या स्थापनेसाठी (बडोदा रेसिडेंट), ५०,००० रुपये (इ.स. १९२०)

७६) उदोजी बोर्डिंग, नाशिक (इमारतीसाठी), १२,००० रुपये (इ.स.१९२०)

७७) The Bombay Natural History Society साठी महाराजांनी १००० रुपये तीन वर्षांसाठी दान दिले.

७८) हिंद विजय जिमखाना या संस्थेसाठी शारीरिक शिक्षण आणि खेळाच्या स्पर्धेसाठी (पुढील ३ वर्षांकरिता) १,००० रुपये दिले.

७९) पुणे शनिवारवाड्याच्या जीर्णोद्धाराकरिता (ना.मुंबई गव्हर्नर) ५००० रुपये (इ.स.१९२१)

८०) बडोदे हॉस्पिटल (रोग्यांस मेजवानी), १८२ रुपये (इ.स. १९२१)

८१) ब्राह्मण समाज हैदराबाद (प्रो. ना.गु. वेलिणकर), २०००रुपये (इ.स. १९२१)

८२) ब्राह्मण समाज हैदराबाद, प्रो. ना.गु. वेलिणकर, (मुलांना बक्षिसे खाऊ वगैरे वाटण्यासाठी), २०६ रुपये (इ.स. १९२१)

८३) जनरल स्टोअर्स (म्युझियम जेरुसलेम), ३७९ रुपये (इ.स. १९२१)

८४) गोशाळा भेट (गोरक्षण), ६४५ रुपये (इ.स. १९२२)

८५) भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे (महाभारताच्या प्रकाशनाकरिता), ५,५०० रुपये (इ.स. १९२२)

८६) लेडी रीडिंग वुइमेन ऑफ इंडियाफंड (रेसिडेंट बडोदा), २५,००० रुपये (इ.स. १९२२)

८७) मराठा युद्धस्मारक (मि. कॅडेल), ५,००० रुपये (इ.स. १९२२)

८८) राजकोट इस्पितळ, राजकोट (कर्नल वुड), ३,००० रुपये (इ.स. १९२२)

८९) बनारस हिंदू विद्यापीठ, अलाहाबाद (विद्यार्थ्यांच्या करमणुकीसाठी), २,००० रुपये (इ.स.१९२४)

९०) सोशल वर्क र्स परिषद, मुंबई, ५०० रुपये (इ.स. १९२४)

९१) हिंदी पहिलवान युरोपात पाठविण्याचा फंड, कलकत्ता (के.टी.पाल), १,००० रुपये (इ.स.१९२४)

९२) अखिल भारतीय संगीत परिषद, लखनौ (सेक्रेटरी), ५०० रुपये (इ.स. १९२४)

९३) पंचांग समिती (रा.चिं.वि. वैद्य), ११० रुपये (इ.स. १९२४)

९४) अखिल भारतीय संगीत परिषद, (सेक्रेटरी), ५०० रुपये (इ.स. १९२६)

९५) इंडियन रेडक्रॉस सोसायटी (चीफ मेडिकल ऑफिसर, बडोदे), ५००० रुपये (इ.स.१९२६)

९६) ज्योतिष संमेलन (विद्याधिकारी), १०० रुपये (इ.स.१९२६)

९७) बनारस हिंदू विश्वविद्यालय, अलाहाबाद (प्रो. व्हाईस चान्सेलर) (ग्रंथालय बांधकामाकरिता), २,००,००० रुपये (इ.स. १९२७)

९८) रायगड किल्ला धर्मशाळा, ५०० रुपये (इ.स. १९२७)

९९) सर्व्हटस ऑफ इंडिया सोसायटी, पुणे (ज्ञानप्रकाश छापखाना आग लागून झालेल्या नुकसान भरपाईसाठी), ४,००० रुपये (इ.स. १९२७)

१००) आर्टस् सोसायटी, मुंबई (सेक्रेटरी) २०० रुपये (इ.स. १९२७)

१०१) सर लेस्ली विल्सन हॉस्पिटल, १००० रुपये (इ.स. १९२७)

१०२) हिंदू महासभा (डॉ. मुंजे) यांच्याकडे अस्पृश्यता निवारणासाठी १२,००० रुपये

१०३) महाराजा सयाजीराव 'दि ऑल इंडिया हिंदू लॉ रीफॉर्म ॲड रिसर्च असोसिएशन, मुंबई' या संस्थेचे आश्रयदाते होते. संस्थेचे प्रमुख सर गोविंदराव डी. माडगावकर होते. (रकमेचा तपशील उपलब्ध नाही. पत्र क्र. २०७४)

१०४) सार्वजनिक सभा, पुणे ४०,००० रुपये दिले.

## सरकारी तिजोरीतून दिलेल्या देणग्या

१) डेहराडून पब्लिक स्कूलसाठी ५,००० रु. दिले.

## दातृत्वाच्या वेगळ्या नोंदी

१) हल्लीच्या पद्धतीस अनुसरून गरीब व व्याधीग्रस्त लोकांस, सरकारातून फुकट औषधे देण्यासाठी मोठमोठ्या शहरांतून व तालुक्यांतून धर्मार्थ दवाखाने उघडण्यात आले होते अशा दवाखान्यात आजारी माणसांवर औषधोपचार करण्यासाठी विद्वान डॉक्टर, वैद्य व हकीम यांची योजना करण्यात आली होती. याबाबतचा खर्च दरसाल सुमारे ३,००००० (तीन लक्ष रुपये) होता. यावरून महाराजांचा कनवाळूपणा व दातृत्व उघड दिसून येते. *(गोत्री, १९०५, पृ. ५९)*

## संस्थांना केलेल्या मदतीच्या वेगळ्या नोंदी

१) इंडियन रेसिंलग ॲड ॲथलेटीक टूर्नामेंटला ३०० रुपये मदत केली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९१९-२०, पृ.१९.)*

२) ब्रह्मभट बोर्डिंग बडोदा, ५० रुपये दरमहा मदत सुरू केली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९२०-२१, भाग-१, पृ.७२,७३.)*

३) तत्त्वज्ञान परिषद, मुंबई ३०० रुपये दिले. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९२७-२८, भाग-२, पृ.२९,३०.)*

४) सिंध रिलीफ फंडासाठी ५,००० रुपये दिले. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९२९- ३०, भाग-१, पृ.२७,२८)*

५) रॉस इन्स्टिट्यूट या संस्थेला ५,००० रुपये देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो.,१९२९-३०, भाग-४, पृ.२५३,२५४)*

६) पॅरीस विश्वविद्यालयातील एल इन्स्टिट्यूट सिव्हिलायझेशन ऑफ इंडियाना या संस्थेला २,००० पौंड देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९२९-३०, भाग-४, पृ.२४९,२५०)*

७) मद्रास येथील पूर निवारणासाठी ३,००० रुपयेफंड दिला. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९२४-२५, भाग-१ पृ.११)*

८) जपानमधील भूकंपामुळे बाधित झालेल्या लोकांना मदत म्हणून ५,००० रुपये दिले. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९२३-२४, भाग-१ पृ.३०,३१)*

९) महाराणी चिमणाबाई विद्यालयास ५,००० रुपये देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३०-३१, भाग-४, पृ.२१७ ते २२०)*

१०) इलस्ट्रेटेड संडे न्यूज या वर्तमानपत्राच्या मालकास १,००० रुपये दिले. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो.अ., १९३०-३१, भाग-३, पृ.३५, ३६)*

११) इरविन स्मारकफंडास ३,००० रुपये दिले. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो.अ., १९३०-३१, भाग-३, पृ.३७ ते ३८)*

१२) द लिओनेल कर्टीस पोट्रेटफंड या संस्थेस २५ पौंड दिले *(रा.स.खा.हु.झा.हु.नो.अ., १९३०-३१, भाग-३, पृ.३९ ते ४०)*

१३) इंडियनसोसायटीलंडनयासंस्थेस१००पौंडदिले.*(रा.स.खा.हु.झा.हु.नो.अ.,१९३०-३१, भाग-३, पृ.२०९, २१०.)*

१४) द यंगमेन्स खिश्चन असोशिएशन, मुंबई या संस्थेस मदत म्हणून १००० रुपये दिले. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३०-३१, भाग-३, पृ.२२७, २२८.)*

१५) जी.बी. म्हात्रे यांना १० पौंड देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३०-३१, भाग-२, पृ.१०७, १०८.)*

१६) इंपिरियल हॉर्स शो, दिल्ली या संस्थेस प्रती वर्ष पाच वर्षासाठी ३०० रुपयांची देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३२-३३, भाग-३, पृ.६१,६२.)*

१७) सर्वधर्म परिषद, नाशिक साठी १००० रुपयांची देणगी खानगी फंडातून दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो.., १९३२-३३, भाग-४, पृ.३१, ३२.)*

१८) आर्टस सोसायटी, मुंबई या संस्थेस २०० रुपये देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो.., १९३३-३४, भाग-२, पृ.१५,१६.)*

१९) फाईन आर्टस सोसायटी, सिमला या संस्थेस २०० रुपये दिले. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो.., १९३३-३४, भाग-२, पृ.१९,२०.)*

२०) पाली टेक्स्ट सोसायटी, लंडन या संस्थेस १०० पौंडची देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३३-३४, भाग-२, पृ.२४९,२५०.)*

२१) रणजी मेमोरियलफंडासाठी २,००० रुपये दिले. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३३-३४, भाग-३, पृ. ४१,४२.)*

२२) महिला पाठशाला, बडोदा यांना वार्षिक ४,००० रुपये सुरू केले. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३३-३४, भाग-३, पृ.३६१,३६२.)*

२३) विल्यम स्मारकफंड, लंडन यांस ५० पौंड रक्कम मदत म्हणून दिली. *(रा.स.खा.हु.झा. हु.नो., १९३३-३४, भाग-३, पृ.३३९,३४०.)*

२४) व्हाईसरॉय यांच्या धरणीकंपफंडास ५,००० रुपये देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३३-३४, भाग-३, पृ.३३,३४.)*

२५) द ग्रेटर इंडिया एक्सपीडिशन या संस्थेस ५०० पौंड देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३३-३४, भाग-४, पृ.२१, २२.)*

२६) आंतरराष्ट्रीय वैमानिक संस्था, कलकत्ता या संस्थेस १०० रुपयांची देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३३-३४, भाग-४, पृ.२५,२६.)*

२७) नॅशनल हॉर्स ब्रीडिंग अँड शो सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेस ३०० रुपये देणगी दिली. *(रा.स.खा.हु.झा.हु.नो., १९३३-३४, भाग-४, पृ.२७, २८.)*

(टीप - रा.स.खा.हु.झा.हु.नो. म्हणजे राज्यातील सर्व खात्यासंबंधाने हुजुराच्या झालेल्या हुकुमांची नोंद)

२८) संस्थानिक राज्यसंघ संघटनेला दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या वेळी ३,००० रुपये दिले. (पहिल्या गोलमेज परिषदेवेळी २,००० रुपये दिले होते.) (इ.स. १९३१)

## विविध औद्योगिक कारखान्यांना महाराजांनी कर्ज आणि शेअर्स खरेदी करून केलेली मदत-

१) चंदुलाल अंबाभाई आणि ब्रदर्स प्रा.लि. बडोदा (A Match Factory) १६,००० रुपये. (इ.स.१९३१)

२) भावसर पुंजीवराम त्रिकमदास आणि ब्रदर्स विसानगर महल, (Dyeing and Calico Printing Works) ५,००० रुपये. (इ.स.१९३१)

३) Okha Salt Works या कामास २,५०,००० रुपये. (इ.स.१९३१)

४) सदवलाल जयकिसनदास, बडोदा (Powerloom Weaving Factory) २,५०० रुपये. (इ.स.१९३१)

५) मेसर्स बबन आणि कंपनी, बडोदा (Enamelling Works) ५०० रुपये. (इ.स. १९३४)

६) नेबुभाई रेहमूभाई, बडोदा शहर बेकरी (Biscuits factory) ३,००० रुपये. (इ.स. १९३७)

७) दि ब्राऊन हँडल फॅक्टरी, बडोदा (Brown Clips, Tin Bags, etc) २,००० रुपये. (इ.स. १९३८)

८) मे.बी.बबन को.ऑ. बडोदा (Enamelling Works- for Purchase of Machinery) २,९०० रुपये. (इ.स. १९३८)

९) बडोदा इंडस्ट्रीयल को.ऑ. बडोदा (Bakelite Factory) २५,००० रुपये. (इ.स. १९३८)

१०) मगनलाल लालुभाई कॉन्ट्राक्तर, बडोदा (Manufacture of Leather Articles) २०,००० रुपये. (इ.स.१९३८)

११) महम्मद अबुसाहेन अबुबक्कर निझामी, (Tannery at Patan) ५,००० रुपये. (इ.स. १९३९)

१२) खडी कार्यालय छालाल, (Cottage Industries, i.e. Hand Spinning,Weaving, etc.) १,५०० रुपये. (इ.स.१९३९)

१३) सर्वोदय मंदिर, तारावडा (Tanning and Leather Manufacture) २,००० रुपये. (इ.स. १९३९)

१४) भिमाभाई दायाभाई करण, पलसाना तालुका (Manufazture of Rice and Pulse Mill Machinery and Agricultural Implements) ७,००० रुपये. (इ.स. १९३९)

१५) हिरालाल मोतीलाल भकरवाला Starting a factory for the manufacture of spare parts of Sewing machines, Gramophones, Rifles, etc.) ७,००० रुपये. (इ.स. १९३९)

१६) मे. टाटा सन्स लि. मुंबई (Manufacture of Soda Ash, Caustic Soda and other Chemicals) २५,००,००० रुपये, (इ.स. १९३९)

१७) हिरवानिया सेफ कॉ.ऑ. खेरालू (Manufacturing Safes) ४,००० रुपये. (इ.स. १९४०) *(Baroda A Guide book, 1941, p. 96, 97)*

संस्थात्मक कार्यामुळे समाजात सुधारणा होतात, संघटीत प्रयत्नामुळे कोणतेही काम लवकर कमी परिश्रमात होऊन त्याचा परिणाम सयाजीराव महाराजांनी दिलेल्या मदतीमुळे देशातील संस्थाबरोबर जगभरातील संस्थांना उभा राहता आले. त्यातून अनेक व्यक्तींना मदत झाली.

ooo

# प्रकरण ९ वे

# ललित कलांना मदत

'कोणत्याही देशाच्या संस्कृतीची किंमत जर आपल्याला अजमावयाची असेल, तर त्या देशातील ललित कलांकडे आपण लक्ष द्यावे. गायन, चित्रकला, शिल्पकला या राष्ट्राच्या संस्कृतीची चिन्हे आहेत व त्यांच्यापासून राष्ट्राला प्रकाश व चैतन्य प्राप्त होते असे माझे ठाम मत आहे.'

*- महाराजा सयाजीराव गायकवाड*

सयाजीराव महाराजांनी ललित कलासंबंधीचे वरील विचार १० मार्च १९२९ रोजी बडोद्यात गायन परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले. राज्याच्या प्रमुखाने कशा प्रकारे कलांची जपणूक केली पाहिजे याबद्दलचे आदर्श विचार वरील भाषणांत आहेत. महाराज हे कृतिशील सुधारक असल्याने वरील विचार त्यांनी फक्त व्यक्त केले नाहीत, तर त्यांनी आपल्या आचरणातून त्यात सुधारणा करण्यासाठी सर्व सोयी कलावंतांना उपलब्ध करून दिल्या.

महाराज ज्याप्रमाणे प्रजेच्या सर्वांगीण सुधारणेसाठी तत्पर होते. त्याचप्रमाणे देशातील संस्कृतीची जपणूक करण्यासाठी प्रयत्नशील होते. ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या सर्व ललित कलांचे व्यक्तीच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे हे महाराजांनी ओळखले होते. त्यामुळे ज्या-ज्या वेळी या कलांच्या संबंधित कामे महाराजांच्या समोर येत, त्यावेळी त्यांनी प्राधान्य देत यासाठी निधी आणि इतर सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. सर्वच ललित कलांना राजाश्रय दिला.

## चित्रकला

सयाजीराव महाराज हे कलांचे भोक्ते असल्याने लोकांच्या मनोरंजनासाठी आणि ज्ञानवर्धन होण्यासाठी सन १९११-१२ च्या सुमारास आपल्या राज्यात प्रशस्त पदार्थसंग्रहालय असावे व त्याला जोडूनच एक चित्रसंग्रहही असावा, अशी इच्छा व्यक्त केली. पुढे महाराज युरोप प्रवासात असताना मि. स्पीलमन् नावाच्या एका चित्रकला विशारद गृहस्थांशी त्यांची ओळख झाली. या गृहस्थांच्या गुणांमुळे आणि त्यांच्या अंगी असणाऱ्या कलासक्ततेमुळे त्या ओळखीचे रूपांतर गाढ मैत्रीत झाले. मि. स्पीलमन् यांच्या सल्ल्याने व मदतीने महाराजांनी चित्रसंग्रह जमा करवण्याचे ठरवले. यामुळे चित्रसंग्रहालय अधिक विस्तृत होईल असे महाराजांना वाटत होते.

महाराजांच्या अंगी मुळातच चित्रकलेबाबत आवड असल्याने अशा व्यक्तीची भेट झाल्याने त्यांना योग्य मोबदला देऊन राज्यासाठी त्यांचा उपयोग करून घेण्याचे ठरवले. इ.स. एप्रिल

१९१२ मध्ये मि. स्पीलमन् यांना पत्रात लिहिले, ‘नुकतीच मी आमच्या येथील चित्रसंग्रहालयाला भेट दिली. त्याची इमारत आता पुरी झाली आहे व तीत तुमच्या सांगण्याप्रमाणे चित्रे लावण्याची व्यवस्था करण्याबद्दल मी चीफ इंजिनिअर यांना कळविले आहे.’ यानंतर या संग्रहालयात ठेवण्यासाठी अधिक चित्रांची खरेदी करावी यासाठी त्यांना पत्रातून कळवले. मि. स्पीलमन् हे युरोपीय राष्ट्रांतील चित्रकलेचे व चित्रसंग्रहाचे तज्ज्ञ होते. त्यामुळे युरोपातील प्रख्यात चित्रकारांची चित्रे विकावयास निघाल्याची बातमी त्यांना कळताच, त्या चित्रांची खरेदी बडोदे येथील संग्रहासाठी करत. अशा प्रकारे वेळोवेळी ते चित्रे खरेदी करून बडोद्यास पाठवत. अशी अनेक नामांकित चित्रे ती काढल्याच्या शतकांच्या अनुक्रमाने व निरनिराळ्या चित्रकला संप्रदायांच्या धोरणाने व्यवस्थित रीतीने लावणे जरूर होते. हे काम अर्थातच मि. स्पीलमन् यांना सांगण्यात आले होते; परंतु काही कारणांमुळे त्यांना ते करता न आल्याने त्यांच्या ऐवजी मि. डिबडिन् या तज्ज्ञांची नेमणूक करण्यात आली. मि. डिबडिन् यांनी बडोद्यास येऊन हे काम व्यवस्थित पूर्ण केले. महाराजांनी या दोन्ही कलावंतांना चांगले मानधन दिले.

महाराजांची चित्रनिवड अत्यंत सुंदर होती. तसेच याबाबतचे त्यांचे ज्ञान अत्यंत चांगले होते. महाराज या कलाकार लोकांची नेहमीच कदर करत. त्यांना मदत करत. महाराज हे किती चाणाक्ष आहेत याबद्दलचा अभिप्राय मि. डिबडिन् यांनी पुढीलप्रमाणे दिला होता. ‘महाराजांचा चित्रसंग्रह हा उत्कृष्ट निवडीचा एक आदर्श आहे. त्याच्याद्वारे युरोपियन चित्रकलेच्या आरंभापासून आजपर्यंतचा तिचा विकास येथे साररूपाने दिल्याप्रमाणे आढळतो. या संग्रहालयात १९० चित्रे असून ती सर्व भिन्न भिन्न संप्रदायांचे उत्तम नमुने म्हणून समजले जाण्यासारखी आहेत. या संग्रहाचा मुख्य उद्देश महाराजांच्या मते बडोद्यातील विद्यार्थ्यांपुढे व कलाप्रिय लोकांपुढे एक वस्तुपाठ तयार करवून ठेवावा हा आहे.’ *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ९०५)*. पुढील पिढीला आदर्श निर्माण करण्यासाठी महाराज अशा गोष्टींना नेहमीच प्राधान्य देत होते.

पुढे युरोपात महायुद्धाचे ढग जमा होऊ लागल्याने या संग्रहाची वाढ काही काळ थांबली; परंतु युद्ध संपल्यावर अपूर्ण राहिलेले हे काम पुरे करून घेण्यात आले. या चित्रसंग्रहाचा उद्घाटन समारंभ २३ मार्च १९२१ रोजी करण्यात आला. ‘या पाश्चात्त्य चित्रसंग्रहात इटालियन, फ्लेमिश, डच, स्पॅनिश, पोर्तुगीज, फ्रेंच, जर्मन, ऑस्ट्रियन, रशियन, ग्रीक, ब्रिटिश वगैरे सर्व संप्रदायांतील नमुने संग्रहित केलेले असून, त्यांचे कर्तृत्व बॉनिफाझिओ, ड्यूरर, टिशिअन, पुइसीन, क्लॉड, रुबेन्स, फॅगोनॉर्ड, हॉपनर, रेनॉल्डस्, लायटन, मिले, नॉर्थ, पॉइंटर, लॅन्डसिअर, ऑरचर्डसन वगैरेसारख्या युरोपांत अत्यंत विख्यात म्हणून गणल्या गेलेल्या चित्रकारांकडे आहे ही गोष्ट ध्यानात ठेविली, म्हणजे हा चित्रसंग्रह किती अपूर्व आहे याची कल्पना येऊ शकेल. तो व्यवस्थित रीतीने ठेवण्यासाठी छायाप्रकाशाला अनुकूल पडेल अशी स्वतंत्र इमारत बांधण्यात आली असून, तीत ही सर्व चित्रकलेच्या दृष्टीने अनुकूल अशा स्थानी टांगण्यात आली आहेत. त्या योगाने त्या चित्रांचा पाहणारांवर उत्कृष्ट परिणाम व्हावा, अशी सोय झाली आहे.’ *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ९०५)*.

सयाजीराव महाराजांनी पाश्चात्त्य चित्रकलेचा संग्रह संस्थानात केला होता; परंतु तेवढ्याने महाराजांचे समाधान होण्यासारखे नव्हते. या संग्रहाच्या जोडीला भारतीय चित्रकलेचा संग्रह

असल्याशिवाय ती योजना परिपूर्ण होणार नाही असे त्यांना वाटत होते. प्रत्येक सुधारणा करताना त्या सुधारणेत पाश्चात्त्य व देशी असे दोन्ही आदर्श आपल्यापुढे ठेवून त्या दोहोंतील गुणांच्या मिश्रणाने आपल्या देशाची उन्नती घडवून आणणे हे त्यांचे मुख्य धोरण होते. त्यासाठी त्यांनी पाश्चात्त्य संग्रहाप्रमाणेच भारतीय चित्रकलेचाही मोठा संग्रह यानंतर करून तो त्याच इमारतीतील तळमजल्यावर ठेवला होता. याची विशालता आणि महाराजांची कलाआवड यासंबंधी महाराजांचे इंग्रजी चरित्रकार मि. राइस म्हणतात, ‘It contains the best collection of Indian paintings in the world.’ (हा संग्रह सर्व जगातील भारतीय चित्रसंग्रहांत श्रेष्ठ आहे). यावरून त्याच्या विशालतेची व विविधपणाची कल्पना येते. यात हिंदुस्थानातील हिंदी चित्र विभागात सुमारे ४०० चित्रांचा संग्रह केलेला आहे.

या चित्रसंग्रहातील अनेक तसबिरी अमूल्य होत्या. त्यामध्ये अकबराच्या अमदानीत रामायण व महाभारत यातील देखावे, रजपूत संप्रदायातील रागरागिणींच्या चित्रांचा संग्रह, यानंतर मोगल व रजपूत काळातील अनेक इतिहासप्रसिद्ध व्यक्तींच्या प्रतिकृती होत्या. पर्शिया अथवा इराण देशातील चित्रकारांनी काढलेली चित्रे लावली होती. जयपूर, कांग्रा व्हॅली, लखनौ, दिल्ली वगैरे संप्रदायातील अनेक चित्रे या संग्रहात ठेवली होती. ती सर्व त्या त्या संप्रदायांपैकी उत्तमोत्तम निवडूनच ठेवलेली होती. त्यामुळे उत्तम भारतीय चित्रकलेची निदर्शक झाली होती.

याप्रमाणे एकत्र केलेला हा चित्रसंग्रह सर्वसाधारण लोकांना प्रेक्षणीय वाटला, तरी चित्रकलेच्या अभ्यासू विद्यार्थ्यांच्या दृष्टीने पाहता काही एका मर्यादेपर्यंत त्या कलेचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच तो उपयोगी पडण्यासारखा होता. त्या मर्यादेपर्यंत चित्रकलेचे शिक्षण देण्याची व्यवस्था केल्याशिवाय या संग्रहाचा लाभ करून घेण्यासारखा विद्यार्थी वर्ग या राज्यात तयार असणे शक्य नव्हते. म्हणून त्याबद्दलची सोयही येथील कलाभवनात करण्यात आली. त्यात चित्रकला, मूर्तीकला, फोटोग्राफी, प्रोसेस पद्धती इत्यादी कलांचे शिक्षण देणारे स्वतंत्र वर्ग ठेवून, त्यावर चांगल्या योग्यतेचे अध्यापक नेमण्याची तरतूद करण्यात आली होती. अशा प्रकारे आरंभापासून वरपर्यंत या ललितकलांच्या विकासाची सोय महाराजांनी करून दिली होती.

बडोद्यातील चित्रकला आणि चित्रकलेसंबंधी इतर पायाभूत सुधारणा महाराजांनी संस्थानात सुरू केल्यावर त्याविषयी लोकांना जास्त माहिती मिळू लागली. या कलेकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन वृद्धींगत होऊ लागला. यामागे महाराजांचे दातृत्व होते. महाराजांनी बडोद्यात आलेल्या प्रत्येक चित्रकाराला त्याच्या-त्याच्या कुवतीप्रमाणे आणि योग्यतेप्रमाणे मोबदला दिला. त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अधिकचे मानधन दिले. यामुळे कलाकारांना राजाश्रय लाभला.

महाराजांना चित्रकलेची आवड असल्याने त्यांनी लक्ष्मीविलास राजवाड्यातील दोन दिवाणखाने त्यांनी प्राचीन भारतातील पद्धतीच्या चित्रांत शृंगारून घेतले होते. त्यापैकी एका दिवाणखान्याला ‘वीणा मंदिर’ असे नाव दिले होते. त्यात कॅन्व्हासवर अजंठ्याच्या लेण्यांतील चित्राप्रमाणे चित्रे काढून तो कॅनव्हास लाकडी चौकटीवर चिकटवून त्या चौकटी दिवाणखान्याच्या चारी भिंतीस लावल्या होत्या. या दिवाणखान्यात छतावर आणि चारही भिंतींवर अशा प्रकारची चित्रे लावली होती. हे काम बडोद्यातील तरुण व गुणवंत चित्रकार तवकर यांनी केले होते. या

त्यांच्या कामाबद्दल कॅप्टन हाइम यांनी 'ही चित्रे अत्यंत समाधानकारक झाली आहेत.' असा शेरा मारला. हे काम महाराजांना खूप आवडल्यामुळे या चित्रकारांना सहा हजार रुपये देण्यात आले होते. महाराजांच्या दातृत्वाचा लाभ अशा प्रकारे अनेक परदेशी आणि देशी चित्रकारांना झाला होता.

बडोद्यातील चित्रकलेतील महत्त्वाचे दुसरे एक नाव म्हणजे चित्रकलेतील मुकुटमणी राजा रवि वर्मा. बडोदा संस्थानात त्यांनी चित्रे काढावीत म्हणून महाराजा सयाजीराव यांनी त्यांना खास राजसन्मानाने बडोद्यात ठेवून घेतले होते. त्यापूर्वी भारतीय संस्कृतीचा आणि देशातील विविध परंपरांचा अभ्यास करण्यासाठी महाराजांनी त्यांना भारतभर फिरण्यास परवानगी दिली. त्यानंतर त्यांचा बडोद्यातील मुक्काम जवळजवळ दोन वर्षे होता. लक्ष्मीविलास राजवाड्याच्या आवारातील एका बंगल्यात त्यांचा मुक्काम होता. राजा रवि वर्मा यांच्या चित्रकलेविषयी जास्त माहिती पाहण्यापेक्षा त्यांनी बडोद्यात काढलेल्या चित्राविषयी माहिती घेणे अधिक योग्य ठरेल.

राजा रवि वर्मा यांनी भारत भ्रमण केल्यावर भारतीय आणि पाश्चिमात्य चित्रकलेतील फरक समजावून घेतला. त्याप्रमाणे भारतीय प्रसंगचित्रे पाश्चिमात्य शैलीने काढून चित्रकलेत नवे युग सुरू केले. बडोद्यात त्यांच्या चित्रकलेला आणखी बहार आला. त्यांनी बडोद्यात अनेक सुंदर चित्रे काढली. त्यामध्ये १) श्रीरामचंद्रांचा विवाह, २) श्रीकृष्णाची दृष्ट, ३) गंगा व शंतनु, ४) कारागृहातून श्रीकृष्णाला वसुदेव घेऊन जातो, ५) मत्स्यगंधा, ६) विश्वामित्र-मेनका, ७) कीचक व सैरंध्री ८) हरिश्चंद्र तारामतीच्या वधास उद्युक्त झाला आहे, ९) राधा-माधव, १०) भरत, ११) कंस व माया, १२) यतिवेशधारी अर्जुन व सुभद्रा, १३) नलदमयंती आणि १४) द्रोपदी वस्त्रहरण या चित्रांचा समावेश होता. भारतीय संस्कृतीचे दर्शन खऱ्या अर्थाने या चित्रांतून आपणास पाहावयास मिळते.

याशिवाय राजा रवि वर्मा यांनी राजघराण्यातील १) राजमाता महाराणी चिमणाबाई (पहिल्या) यांची दोन चित्रे, २) राजमाता महाराणी चिमणाबाई (दुसऱ्या) यांची दोन चित्रे काढली. महाराजांनी यासाठी राजा रवि वर्मा यांना वेगवेगळया रूपात मानधन दिले. यावरूनही महाराजांच्या कलेविषयीच्या आस्थेची कल्पना येते. तसेच अन्य चित्रांसाठी महाराजांनी खूपच पैसे खर्च केल्याचे महाराजांचे चरित्रकार सांगतात.

राजा रवि वर्मा यांनी काढलेली चित्रे सर्वसामान्य लोकांना पाहता यावीत यासाठी महाराजांनी या चित्रांचे प्रदर्शन भरविले. 'हे प्रदर्शन पाहण्यासाठी महाराष्ट्रातून विशेषत: नाशिक, पुणे, मुंबईहून अनेक जाणकार रसिक आले होते.' *(पवार, २००८, पृ. १६९)*. हे प्रदर्शन त्या काळातील सर्वोत्तम होते. बडोद्यातील नवीन कलाकारांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले. त्यामुळे त्यांना उत्तेजन मिळाले.

राजा रवि वर्मा यांच्या अशा सर्वोत्तम कामगिरीनंतर महाराजांनी त्यांचा सन्मान करण्यासाठी खास दरबार भरवला. रवि वर्मा यांना मानवस्त्रे देऊन सत्कार केला व पन्नास हजार रुपये मानधन दिले. त्याचबरोबर युरोपातून खास मागविलेले चित्रकलेचे भारी किमतीचे साहित्य, रंग, कुंचले वगैरे त्यांना भेट म्हणून दिले.' *(पवार, २००८, पृ. १६९)*. महाराज अशा प्रकारे प्रत्येक चित्रकाराला मानधन आणि इतर रकमा देऊन त्यांचा सत्कार आणि सन्मान करत होते.

## फोटोग्राफी

चित्रकलेच्या जवळची दुसरी कला म्हणून फोटोग्राफीला महाराजांनी राजाश्रय दिला. उत्तेजन दिले. कलाभवनातून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी विविध कलांमध्ये पारंगत झाले. त्यापैकीच एक कुशल कारागीर म्हणून रा. शितूत यांचा समावेश होत होता. कलाभवनातून शिक्षण घेतलेले शितूत हे त्याच संस्थेत शिक्षकाची नोकरी करत होते. महाराजांच्या इ.स. १९०० मध्ये कलाभवनाच्या भेटीत शितूत यांचे या क्षेत्रातील कार्य नजरेस भरले.

महाराजांनी रा. शितूत यांना शिक्षकाच्या नोकरीपासून परावृत्त केले. फोटोग्राफीत अधिक प्रगती करण्यासाठी 'विविध कलामंदिर' नावाची संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. ही स्वतंत्र संस्था स्थापन करण्यासाठी त्यांनी मोठी मदत केली. ही संस्था बडोद्यात सुप्रसिद्ध होती.

सयाजीराव महाराजांचा सर्व राज्यकाल हा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यापूर्वीचा कालखंड होता. हिंदुस्थानच्या इतर भागात फोटोग्राफी ही कला म्हणावी तितकी वाढली नव्हती. त्यात आधुनिकता नव्हती. त्या काळात सयाजीराव महाराजांनी या कलेला आश्रय दिला. त्यात आधुनिकता आणण्यासाठी प्रोत्साहन दिले.

## मूर्तीकला

चित्रकलेप्रमाणेच मूर्तीकलेलाही उत्तेजन देण्याचे जे प्रयत्न महाराजांनी केले, त्या प्रयत्नांचा उद्देश जरी इतरांना सौंदर्यदृष्टी प्राप्त करून द्यावी हा होता. तथापि, त्याच्या मुळाशी महाराजांची स्वत:ची सौंदर्यदृष्टी हीच मुख्यत: होती.

सन १८८७ मध्ये महाराजांनी युरोपची पहिली सफर केली. त्यावेळेपर्यंत त्यांच्या अंगी ललितकलांबद्दल जी काही अभिरुची होती, ती सुप्त अवस्थेत होती. या पहिल्या सफरीत मात्र त्यांनी जे शिल्पकलेचे, मूर्तीकलेचे आणि चित्रकलेचे नमुने पाहिले, त्यांच्यामुळे या अभिरुचीला मूर्त स्वरूप आले. त्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या पत्रांतून परदेशातील कलांबद्दलचे अभिप्राय व्यक्त केले आहेत. यावरून त्यांच्या अभिरुचीला कसे वळण लागत चालले होते, हे दिसून येते. अर्थात, या सर्व कला बडोदा संस्थानात वाढाव्यात, त्यांचा विकास राज्यात व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

या सर्व कलांचा राज्यात विकास व्हावा अशी महाराजांची इच्छा होती. यादृष्टीने त्यांनी प्रयत्न सुरू केले. प्रथम इ.स. १८९३ मध्ये प्रसिद्ध इटालियन मूर्तीकार फेलिची याला बडोद्याला आणले. हा कारागीर अप्रतिम कलाकार होता. तो बडोद्यास चार वर्षे राहिला. तेवढ्या अवधीत त्याने बनविलेल्या अनेक पुतळ्यांत त्याची उत्कृष्ट कारागिरी दिसून येते. त्याने बनविलेल्या पुतळ्याबाबत आपटे म्हणतात, 'फेलिचीने आपल्या पुतळ्याच्या डोक्यापासून तो पायाच्या बोटापर्यंतच्या सर्व अवयवांत हुबेहूबपणा आणला आहे. त्याने बनविलेल्या पुतळ्यात श्री. सौ. महाराणीसाहेबांचा आरसपानी पुतळा, महाराजांचे जनक पिता श्री. काशीराव गायकवाड यांचा बसलेला पुतळा, कै. श्री. फत्तेसिंहराव व जयसिंहराव या उभय राजपुत्रांची जोडी उभी असलेला ब्रॉंझचा पुतळा, पाणी वाहणारा भिस्ती, नाचणारी बाई, दोन चित्ते व त्यांना पाळणारे रक्षक,

सारंगीवाला वगैरे पुतळे फार उत्कृष्ट आहेत. याशिवाय लक्ष्मीविलास राजवाड्यातील मुख्य दरबारच्या दिवाणखान्यात पूर्वीच्या दिवाणांचे व इतर कित्येक राजकुटुंबियांचे अर्धपुतळे हेही फेलिचीच्या कलेचे उत्कृष्ट नमुने आहेत; पण या सर्वांपेक्षा त्याचा उत्कृष्ट पुतळा म्हणजे हातात बंदूक घेतलेला अरब शिकारी हा होय. तो मुख्य जिन्याच्या कठड्यावर उभा केला आहे. त्यातील शिकाऱ्याची सडपातळ; पण चपळ शरीरयष्टी, तीक्ष्ण दृष्टी, धाडसी व बेदरकार मुद्रा व हातातील बंदूक धरण्याची ऐट, ही सर्व वाखाणण्याजोगी आहेत. याशिवाय फेलिचीने केलेले दुसरे अप्रतिम कुसरीचे काम म्हणजे निजलेल्या ईव्हचा शुभ्र संगमरवरी दगडाचा भर आकाराहून मोठा असा बनविलेला पुतळा हा होय. जगातील उत्तम कारागिरीत या पुतळ्याची गणना करण्याजोगी आहे.' *(आपटे, खंड-२, १९३६, पृ. ६७०)*. महाराजांच्या नजरेत नेहमी उत्कृष्ट विचार येत असल्यामुळे जगातील अशा सर्वोत्तम कलावंतांना त्यांनी बडोद्यात आणले. त्यांच्याकडून चांगली कामगिरी व्हावी यासाठी भरपूर मानधन दिले.

फेलिचीनंतर फॅमटन नावाचा दुसरा एक कारागीर महाराजांनी बडोद्यात आणला होता. त्याने केलेले उत्कृष्ट काम म्हणजे रोम शहराची स्थापना करणारे महापुरुष रॉम्युलस व रीमा हे दोघे लहान असताना त्यांना एका लांडगीने स्तनपान करवून वाढविल्याच्या प्रसंगाचा पुतळा होय. आल्बर्ट टॅफ्ट नावाच्या आणखी एका मूर्तीकाराकडूनही महाराजांनी काही कामे करवून घेतली होती.

महाराजांना या कलांना प्रोत्साहन देताना पुष्कळ अडचणी आल्या. त्यांना रिवाज, परंपरा, धर्मकल्पना आणि अंधश्रद्धा यामुळे या कलांना त्यांनी मदत करू नये असा सूर दबक्या आवाजात बडोद्यात त्या काळात सुरू होता; परंतु त्यांनी अशा कुचकामी विचारांना कधीच सुधारणेत स्थान दिले नाही. त्यामुळे साहजिकच त्यांच्या सौंदर्यदृष्टीचा विकास झाला. उदाहरणार्थ, इ.स. १९१३ मध्ये राजपुत्र शिवाजीराव यांच्या विवाह प्रसंगानिमित्त भरविलेल्या शिशुसंमेलनात केलेल्या भाषणात महाराज म्हणतात, 'आपले लोक धार्मिक बुद्धीने ज्या मूर्तींची पूजा करितात, त्यांच्याकडे आपण क्षणभर लक्ष दिले, तर आपल्याला असे दिसून येईल की, त्यापैकीच्या बहुतेक मूर्ती कुरूप असतात. अशा मूर्तींचे चेहरे, नाक, डोळे वगैरे अवयवही ओळखता येत नाहीत. याहून अधिक चांगल्या मूर्ती आपण का ठेवू नयेत? वस्तुत: आपल्या देवतांच्या मूर्ती म्हणजे सुंदरपणाचे उत्कृष्ट नमुने असावेत. यासंबंधाने मी एका शास्त्र्यांना प्रश्न विचारला असता त्यांनी असे उत्तर दिले की, धर्मश्रद्धेच्या बाबतीत उपास्यमूर्तीच्या बाह्य आकाराकडे लक्ष न देता उपासकाच्या श्रद्धेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. हे म्हणणे ठीक आहे, परंतु माझ्या मते अशा बाबतीत उपासकाच्या विवेचक बुद्धीलाही श्रद्धेइतकेच महत्त्व दिले पाहिजे.' *(आपटे खंड-३, १९३६, पृ. ९०८)*. यावरून महाराजांची कलेबद्दलची अभिरुची किती जागरूक होती हे दिसून येते. यामुळेच त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीच्या पहिल्या भागात पाश्चात्त्य मूर्तीकारांकडून उत्तम पुतळे बनवून घेतले. या काळात भारतीय मूर्तीकारांची संख्या कमी होती; परंतु नंतर हिंदी मूर्तीकारांच्या कलेचा विशेष प्रभाव दिसून आला.

सयाजीराव महाराज नेहमीच जे-जे सर्वोत्तम त्याच्या शोधात असत. त्यामुळे जगभरातील अनेक मूर्तीकार बडोद्यात आले होते. त्यामध्ये आल्बर्ट टॅफ्ट नावाचा एक विद्वान मूर्तीकार बडोद्यात आला होता. त्याने महाराजांचा एक सुंदर पुतळा बनवला होता. इ.स. १९१४ आणि इ.स. १९२४ साली फणींद्रनाथ बोस या बंगाली मूर्तीकारांना महाराजांनी सन्मानाने बडोद्यात बोलावून घेतले. फणींद्रनाथ बोस यांनी बडोद्यात अनेक लहान-मोठे पुतळे बनवले. महाराजांनी त्यांचा 'सयाजीपदक' देऊन सन्मान केला.

अशा मूर्तीकारांमध्ये महाराष्ट्रातील मूर्तीकारांनी हिंदुस्थानात विशेष कीर्ती मिळविली. फणींद्रनाथ बोस ह्या हिंदुस्थानातील देशी मूर्तीकाराला महाराजांनी खूप मोठा राजाश्रय दिला. तसेच इतर प्रांतांतील कारागीर या कलेत निष्णात म्हणून प्रसिद्ध झाले आहेत, त्यांना उत्तेजन देऊन त्यांच्या कलेचा गौरवही महाराजांनी केला होता. महाराजांनी म्हात्रे, फडके, गोखले, करमरकर, कोल्हटकर, तालीम वगैरे हिंदुस्थानातील बहुतेक उत्कृष्ट कारागिरांना मदत केली. त्यांच्याकडून वेगवेगळ्या प्रकारचे पुतळे आणि मूर्ती तयार करून घेतल्या.

फडके यांनी बनविलेला एक पुतळा महाराजांनी विकत घेऊन म्युझियममध्ये ठेवला आहे. तो पुतळा अतिशय सुंदर होता. एक म्हातारा ब्राह्मण हातात पोथी घेऊन वाचताना बसल्याबसल्याच डुलकी घेत असल्याचा हा पुतळा आहे. याशिवाय रा. तालीम यांनी बनविलेला 'रस्त्यातील भिकारी' हा पुतळा महाराजांनी खरेदी केला.

महाराष्ट्रातील अनेक मूर्तीकारांनी बडोद्यात जाऊन वेगवेगळ्या मूर्ती बनवल्या होत्या. त्यामध्ये कोल्हटकर यांच्या मूर्ती दर्जेदार होत्या. बडोद्यातील कलाभवनातून त्यांनी संपूर्ण शिक्षण घेतले होते. थोडक्यात, ते पूर्णपणे 'स्वदेशी' मूर्तीकार होते. महाराजांना कोल्हटकरांचा अभिमान वाटत होता. त्यांच्याकडून महाराजांनी वडील बंधू आनंदराव गायकवाड व दिवाण व्ही.पी. माधवराव यांचे अर्धपुतळे तयार करून घेतले. याशिवाय कोल्हटकर यांच्या स्टुडिओमध्ये स्वत: दोन-दोन तास उभे राहून पाच बैठका केल्या. त्यानंतर त्यांचा अतिशय सुंदर आणि हुबेहूब पुतळा कोल्हटकर यांनी बनवला. महाराजांप्रमाणे महाराणी चिमणाबाई यांनी 'दीडशे तोळ्यांचा सुंदर गणपती' तयार करून घेतला. कोल्हटकर यांनी विठ्ठल क्रीडा भुवनातील 'शिवाजी महाराजांचा अर्धपुतळा' बनवला होता. त्यामुळे अल्पावधीत ते प्रसिद्ध झाले.

कोल्हटकर यांचे एक शिष्य रा. चव्हाण यांनी बनवलेला शाहूंचा एक पुतळा श्री. महाराजांनी विकत घेतला. महाराज अशा प्रकारे नवोदित मूर्तीकारांना नेहमीच प्रोत्साहन देत असत. त्यांनी बनवलेले पुतळे विकत घेत. त्यांना मदत करत.

मूर्तीकलेबाबत तत्कालीन काळात बडोद्याचा नंबर खूपच वरचा होता. अनेक मान्यवर मूर्तीकार बडोद्याचा आश्रय घेत होते. महाराजांच्या दातृत्वामुळे त्यांना कला दाखवण्याची संधी मिळत असे. याशिवाय बडोद्यात महाराजांच्या सूचनेनुसार अनेक प्रदर्शने भरवली जात होती. त्यामध्ये अनेक प्रकारच्या मूर्ती प्रजेला पाहण्यासाठी ठेवल्या जात. अशा प्रदर्शनातून देशी मूर्तीकारांना आपली कला सादर करण्याचे आदेश दिले जात. त्यातून फडके, गोखले वगैरे कारागिरांचे शाडूच्या मातीचे, मेणाचे पुतळे मांडले जात. अनेक धनिक लोक आणि राज्यातील अधिकारी अशा प्रदर्शनातून मूर्ती विकत घेत. यामुळे मूर्तीकारांना बराच धनलाभ होत असे.

अनेक मूर्तीकारांनी तयार केलेल्या मूर्ती ठेवण्यासाठी महाराजांनी 'पदार्थसंग्रहालय' तयार केले होते. या संग्रहालयाचा हिंदुस्थानात खूप बोलबाला होता. यामध्ये प्राचीन ग्रीक व रोमन मूर्तीकारांच्या पुतळयांच्या उत्कृष्ट प्रतिकृती ठेवल्या होत्या. तसेच शाडूच्या अनेक लहान-मोठ्या प्रतिकृती यात ठेवल्या होत्या. आजही त्यांचे जतन आणि संवर्धन सुरू असून पाहणाऱ्याला त्याचा लाभ घेता येतो.

या पदार्थ संग्रहालयात ठेवलेल्या अनेक मौल्यवान ठेव्याविषयी महाराजांचे चरित्रकार आपटे म्हणतात, 'मिलो येथील 'व्हीनस डी मेडिसी'सारखे उत्कृष्ट नमुने या संग्रहात ठेवले आहेत. शारीरिक सौंदर्याची अत्युत्कृष्ट कल्पना व निर्मिती यात ग्रीस देशाच्या तोडीला अजूनही कोठला देश उतरला नाही. अशा ग्रीस देशातल्या कामगिरीच्या नमुन्यातही वरील दोन पुतळे सर्वोत्कृष्ट गणले जातात. लाखो मूर्तीकारांनी त्यांच्या अवयवाच्या प्रमाणाचा, सौष्ठवाचा, सौंदर्याचा, आविर्भावाचा अभ्यास केला आहे, तरी अजून त्या पुतळयांचे खरे सौंदर्य त्यांना हस्तगत झाले नाही. कारण अशा तोडीचे दुसरे पुतळे अजून निर्माण झाले नाहीत. तथापि, त्यांच्या खालोखाल असा निजलेल्या ईव्हचा शुभ्र संगमरवरचा भर आकृतीहूनही थोडा मोठा असा पुतळा 'फेलिची' ने तयार करवून येथील पदार्थसंग्रहालयात ठेविला आहे, तो अप्रतिम आहे.' *(आपटे, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४१९)*. पूर्वेकडील देशाच्या कामगिरीचा एक उत्तम नमुना म्हणून जपान या देशातून आणलेला गौतम बुद्धांचा पुतळा होय. महाराज जपान प्रवासात असताना त्यांना हा पुतळा पसंत पडला होता. हा अतिशय सुंदर असा पुतळा ज्युबली बागेत बसवला आहे. या मूर्तीच्या चेहऱ्यावर आर्यपद्धतीचे आध्यात्मिक तेज दिसते. या पुतळयामुळे अनेक नवोदित मूर्तीकारांना चालना मिळाली.

अशा प्रकारे अनेक मूर्तीकारांना महाराज प्रोत्साहन देत होते. त्यातील आणखी एक उदाहरण म्हणजे महाराजांनी उभारलेले 'कीर्तीमंदिर' होय. या मंदिरात महाराजांच्या पूर्वजांचे पुतळे बसवले आहेत. यामुळे गत विभूतींचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याचा आनंद व समाधान पुढील पिढीला होतो. या कीर्तीमंदिरात दरवर्षी प्रजेसाठी मोठमोठ्या, जाणकार आणि विद्वान लोकांची व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचा फायदा त्या विशिष्ट वक्त्याला आणि प्रजेला घेता येतो. हे महाराजांच्या दातृत्वामुळेच शक्य झाले.

## शिल्पकला

कोणत्याही शहराचे किंवा राज्याचे सौंदर्य वाढायचे असेल तर त्या राज्यात सुंदर इमारती असाव्या लागतात. जगभरात प्रवास केल्यानंतर ही बाब महाराजांच्या लक्षात आली. याअगोदर पाहिल्याप्रमाणे महाराजांची याबाबतची सौंदर्य दृष्टी त्यांच्या मनात होती; परंतु राज्यकारभार हाती आल्यावर त्याबाबत त्यांनी अधिक विचार आणि अंमलबजावणी करायला सुरुवात केली.

चित्रकला व मूर्तीकला यांच्याप्रमाणेच शिल्पकला ही उपयोगी आहे. किंबहुना व्यवहारात त्यांच्याहून अधिक उपयोगी आहे. कारण पहिल्या दोन कलांचा उपयोग केवळ त्या कलांच्या रसिकांनाच होऊ शकतो. शिल्पकलेच्या आणि नगरांच्या सौंदर्यात भर पडावी म्हणून बांधलेल्या

इमारतीमुळे कलाप्रिय लोकांना आनंद होतो. त्याबरोबरच प्रजेला या इमारतींचा व्यवहारदृष्ट्या उपयोग होतो. बडोद्यातील उत्कृष्ट शिल्पाच्या इमारतीमुळे त्या शहराला किती सौंदर्य आले आहे, याची कल्पना प्रत्यक्ष पाहणारांनाच होऊ शकेल. आजही या इमारतींमुळे बडोद्याचे सौंदर्य अबाधित आहे.

शिल्पकला का महत्त्वाची आहे हे महाराजांच्या विचारांतूनच आपल्याला समजेल. मार्च १९३० मध्ये प्रतापसागर सरोवराच्या उद्घाटन प्रसंगीच्या भाषणात महाराज म्हणाले, 'गेल्या पन्नास वर्षांत या राज्यातील बांधकामात जे धोरण राखण्यात आले आहे, त्यात मी मुख्यत: दोन तत्त्वे आपल्या नजरेसमोर ठेवविली होती. ज्या-ज्या वेळी एखाद्या नव्या संस्थेला जागेची गरज पडते, त्या-त्या वेळी ती गरज पुरी करण्याचे दोन मार्ग असू शकतात. एक मार्ग हा की, केवळ व्यावहारिक उपयोगाकडे लक्ष देऊन या संस्थेसाठी बराकीप्रमाणे अथवा वखारीप्रमाणे, वरती छपरे व बाजूंना भिती असलेल्या खोल्या बांधून आपल्याला गरज भागविता येईल; परंतु या मार्गाचा अवलंब मोठमोठी शहरे बांधणारांनी कधीही केलेला नाही. यासाठी अशा प्रसंगी उपयुक्तता व सौंदर्य या दोन दृष्टींचा मिलाफ करून त्या संस्थेला जागेची असलेली गरज पुरविण्याबरोबरच त्या कामासाठी बांधली जाणारी इमारत ही शहराला भूषणरूप व्हावी, असे धोरण मी नेहमी ठेवले आहे. प्राचीन काळच्या रोम शहराचे वैभव तत्कालीन प्रचंड इमारतींवरून समजून येते व मध्ययुगीन रोमचे ऐश्वर्य सेंट पीटर्सच्या प्रचंड मंदिराच्या रूपाने दृग्गोचर होते. पॅरिस शहराचा आत्मा आपल्याशी त्या शहरांतील भव्य इमारतींच्या रूपाने प्रत्यक्ष बोलत असल्याचा भास होतो. घाणेरड्या गावातून घाणेरड्या लोकांचीच पैदास होते, म्हणून सुंदर इमारतीच्या सांस्कृतिक महत्त्वाकडे मी दुर्लक्ष केले असते, तर माझ्या प्रजेवर मी अन्याय केला असे झाले असते. आपण हिंदी लोक कलाविद आहोत या गोष्टीचा आपल्याला अभिमान आहे व तो यथायोग्यही आहे. हिंदू व मुसलमान राजांनी यापूर्वी आपल्या देशांत उत्कृष्ट शिल्पकलेचे नमुने म्हणून गाजण्यासारख्या इमारती बांधून आपल्या देशाला अमूल्य अलंकाराचे लेणे चढविले आहे. या शिल्पकलेची किंमत पाश्चात्त्य कलेहून कोणत्याही प्रकारे कमी नाही. याच दृष्टीने बडोदे शहर सुंदर व शोभिवंत करण्याचा प्रयत्न मी केला आहे, की जेणेकरून या शहराबद्दल तुम्हाला अभिमान व प्रेम वाटावे. त्याचप्रमाणे शहरातील रस्ते रुंद करण्यात, त्यात जागोजागी बगीचे बनविण्यात व इतर सुधारणा करण्यातही मी हीच जोडदृष्टी ठेविली आहे, की या सर्वांपासून लोकांना आरोग्याच्या दृष्टीने जसा व्यावहारिक उपयोग व्हावा, त्याचप्रमाणे सौंदर्यदृष्ट्या त्यांच्या संस्कृतीत भर पडावी.' *(आपटे, खंड-३, १९३६, पृ. ११० ते १११).* महाराजांनी बांधलेल्या अनेक सुंदर इमारती बडोद्याला सौंदर्य प्राप्त करून देतात. महाराजांच्या या कलासक्त दृष्टीमुळे गुजरातमधील संस्कृतीची जपणूक बडोद्यात झाली. त्यामुळेच बडोद्याला आज गुजरातची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख आहे. ही ओळख अनंत काळापर्यंत केवळ महाराजांच्या दूरदृष्टीमुळे राहणार आहे.

महाराजांनी बडोद्यात सरकारवाडा, लक्ष्मीविलास राजवाडा, प्रतापविलास राजवाडा, न्यायमंदिर, पदार्थसंग्रहालय, मध्यवर्ती तुरुंग, रुग्णालय, बडोद्यातील विविध बागा, शिक्षणासाठी

बांधलेल्या विविध संस्था (बडोदा कॉलेज), महिला अध्यापन शाळा, श्री चिमणाबाई टॉवर, कीर्तीमंदिर अशा कितीतरी नानाविध वास्तू बांधल्या. त्यातील काही वास्तूंच्या बांधकामाचे आकडे वसुदेव रामचंद्र तळवलकर यांनी दिले आहेत. 'राज्यकारभाराच्या अहवालावरून असे दिसून येते की, राज्याच्या उत्पन्नापैकी १५ टक्के उत्पन्न जाहीर बांधकामांवर दरवर्षी खर्च करण्यात येते. ह्यात रस्ते, पाटबंधारे, इमारती वगैरेंचा समावेश होतो. ही सर्व कामे लोकांची सोय, सार्वजनिक हितसंवर्धन वगैरे करताच करण्यात येतात. आजपावेतो श्रीमंतांनी अनेक शिक्षणसंस्था, राजकीय शासनसंस्था ह्याकडे पुष्कळ पैसे खर्च केले आहेत. त्यातील मुख्य बाबी खालीलप्रमाणे नमूद करता येतील. १) कॉलेज - ८.३., २) मिडल स्कूल - १.४, ३) फीमेल ट्रेनिंग स्कूल - ०.९, ४) मेल ट्रेनिंग स्कूल - १.१, ५) म्युझियम - २.६, ६) पिक्चर गॅलरी - १.६, ७) सार्वजनिक बागा - १२.२, ८) ज्युबली बाग - ०.५, ९) कलाभवन - ५.५, १०) कीर्तीमंदिर - ४.१, ११) लक्ष्मीविलास राजवाडा - ५२.५, १२) मकरपुरा राजवाडा - १२.८, १३) प्रतापविलास - १२.०, १४) न्यायमंदिर - ७.३, १५) खंडेराव मार्केट - १.४, १६) सेंट्रल जेल - ७.७, १७) हॉस्पिटल्स - ६.८, १८) वॉटर वर्क - ४३.०, १९) सायन्स इन्स्टिट्यूट ६.३, २०) सेंट्रल लायब्ररी - १.९, २१) बडोदा हायस्कूल - २.८, २२) ड्रेनेज काम - २५.० (सर्व आकडे - लाखात आहेत.) वरील बाबतीत पाटबंधारे, रेल्वे व राज्यात बडोदे शहराशिवाय इतर ठिकाणी बांधलेल्या इमारतींचा उल्लेख केलेला नाही. एकंदर झालेल्या खर्चाचा आकडा गोळा करू म्हटले तर तो २१ कोटीपावेतो जाईल असे वाटते.' *(तळवलकर, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ३८५).* महाराजांनी केलेल्या बांधकामामुळे प्रजेची मोठ्या प्रमाणात सोय झाली. शहराला एक वेगळीच सौंदर्यपूर्ण ओळख मिळाली. ही सर्व कामे करण्यामागे महाराजांचे दातृत्वच कारणीभूत आहे.

महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात सार्वजनिक कार्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक सुंदर इमारती बांधल्या. त्यावर अमाप पैसा खर्च केला. त्याबाबत आपटे म्हणतात, 'केवळ बडोदे शहरातील शिल्पकामाच्या कार्यात मिळून महाराजांच्या कारकीर्दीत आजपर्यंत एकंदर खर्च सुमारे वीस कोटी रुपयांपर्यंत झाला आहे! याशिवाय या राज्यात बडोदे शहराबाहेर इतरत्र बांधलेल्या इमारतींवर झालेला खर्च हा निराळाच. अर्थात या खर्चात पाटबंधारे, पिण्याच्या पाण्याचे तलाव, वगैरेसारख्या शिल्पकलेत समावेश न होणाऱ्या बाबतींचा अंतर्भाव केलेला नाही हे सांगणे नकोच.' *(आपटे, खंड -३, १९३६, पृ. ९११).* यावरून महाराजांनी फक्त बडोदा शहरात बांधलेल्या इमारतींची माहिती आणि महत्त्व समजते. याकामी महाराजांनी पैशाची कमतरता जाणवू दिली नाही.

## गायनकला

चित्रकला, मूर्तीकला आणि शिल्पकला या कलांप्रमाणेच गायनकला ही ललितकलेत प्रमुख मानली जाते. गायनकलेचे खाते महाराजांनी प्रथमत: निराळे केले. त्यावर देखरेख करण्याकरिता एक दरोगा नेमला. त्यानंतर तंजावरी नृत्यांगनाचा एक नवीन ताफा नोकरीत ठेवला.

महाराजांची या खात्याबाबत आस्था असल्यामुळेच इ.स.१८९७-९८ मध्ये प्रसिद्ध गवई मौलाबक्ष यांचे चिरंजीव अल्लाउद्दीन यांस पाश्चिमात्य संगीतशास्त्राची माहिती करून घेण्यासाठी विलायतेस पाठवले. त्यांनी तेथील संगीतशास्त्राची माहिती करून घेतली. परत आल्यावर त्यांना या खात्याच्या प्रमुखपदी नेमणूक करत राजाश्रय दिला. महाराजांच्या दातृत्वामुळे अनेक गायकांना राज्यात आश्रय मिळाला. यातील काही नावे मौलाबक्ष (गवई), फैझ महंमद (गवई), अल्लाउद्दीन मौलाबक्ष (गवई), इनायतखां (सातारीये), जमालउद्दीनखा (वीणकार), नासारखॉ (पखवाजी), गुलाबिंसग (तब्बलजी) अशा ४१ जणांचा समावेश या खात्यात होता. महाराजांच्या दातृत्वामुळे गायनकलेतील अनेकांना राजाआश्रय लाभला.

महाराजांच्या दातृत्वाचा फायदा या गायक मंडळींना होत असे; त्याचबरोबर बडोद्यातील सयाजीबागेत दर मंगळवारी युरोपियन पद्धतीच्या बँडचा ताफा लोकांचे मनोरंजन करीत असे. त्यावेळी लोकांची खूपच गर्दी होत होती. महाराजांनी सुरू केलेली ही पद्धत पुढे खूपच लोकप्रिय झाली. त्यामुळे परदेशात न जाताही तेथील संगीताची ओळख बडोद्यातील प्रजेला झाली. या संगीतामध्ये अनेक देशांचे राष्ट्रगीत वाजवले जात असे. त्यांच्या दातृत्वाचा अशा प्रकारे गायकांबरोबर प्रजेलाही फायदा होत असे.

गायनकलेचा प्रसार आणि प्रचार अधिक विस्तृत प्रमाणावर होण्यासाठी व भिन्न भिन्न संगीत संप्रदायांच्या तज्ज्ञांना एकत्र आणवून त्यांना परस्परांशी विचारविनिमय करण्यासाठी महाराजांनी मार्च १९१६ मध्ये ‘अखिल भारतीय संगीत परिषदे’ची बैठक बडोद्यास भरविली. त्यावेळी अनेक मान्यवर गायक उपस्थित होते. याबद्दल आपटे म्हणतात, ‘उदेपूरचे झकरुद्दीन खान, अलवरचे मुझफरखान, येथील मौलाबक्ष फैझ महंमद व फैयाझ हुसेन, टोकचे गुलाम हुसेनखान, जयपूरचे कल्लनखां व अल्ली हुसेनखां, इंदोरचे इमदादखां वगैरे अनेक गुणीजन उपस्थित झाले होते. येथील त्यावेळचे दिवाण श्रीयुत व्ही. पी. माधवराव व इतर अनेक सद्गृहस्थही या परिषदेस हजर होते. सभेच्या अध्यक्षस्थानी अकबरपूरचे ठाकूर नबाबअल्ली यांची योजना करण्यात आली होती. मुंबई इलाख्यातील सिव्हिल सर्व्हिस पैकींचे गायनप्रेमी डिस्ट्रिक्ट जज्ज मि. क्लेमंटस् यांनी या परिषदेत ‘हिंदी गायनपद्धतीची सुरावर्त’ या विषयावर एक निबंध वाचला होता व असेच इतर अनेक महत्त्वाचे निबंध वाचण्यात आले होते. एकंदरीने परिषदेचे अधिवेशन मोठ्या उत्साहाने पार पडले.’ *(आपटे, खंड -३, १९३६, पृ. ११२)*. महाराजांच्या विशाल दृष्टीमुळे हिंदुस्थानातील अनेकांना या क्षेत्रात आपली छाप पाडता आली.

यानंतर आणखी एक गायन परिषद मार्च १९२९ साली बडोदे येथे आयोजित केली गेली. ती परिषद राजवाड्याच्या विशाल दिवाणखान्यात भरली होती. त्यावेळी महाराजांना भाषण करण्याबद्दल आयत्या वेळी विनंती करण्यात आल्यावरून त्यांनी यासंबंधीचे आपले विचार थोडक्यात प्रर्दिशत केले. ते म्हणाले, ‘गायनाच्या योगाने तुम्हास जरी सांपत्तिक लाभ झाला नाही, तरी आनंद व सौख्य यांचा लाभ खात्रीने होईल. संगीत, चित्रकला वगैरे कला या हिंदुस्थानच्या लोकांना आपल्या पूर्वजांपासून मिळालेला अमूल्य वारसा आहे व तो त्यांच्या मनोभावनांशी

सर्वस्वी निगडित झालेला आहे.' हा वारसा न गमावता त्यांनी आपल्या कारकीर्दीत यथाशक्ती वाढच केली. हेच त्यांच्या खऱ्या स्वदेशी वृत्तीचे लक्षण होय. तसेच त्यांच्या दातृत्वामुळे अशा प्रकारच्या सर्वच ललित कलांना राजाश्रय मिळाला.

## नाटक

महाराजांचे दातृत्व फक्त चित्रकला, शिल्पकला किंवा गायनकलेपुरते मर्यादित नव्हते तर नाटक आणि इतर कलांनाही महाराजांनी आश्रय दिला होता. त्यातील एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे बालगंधर्व. याबाबत आपटे म्हणतात, 'महाराजांनी महाराष्ट्रीय संगीताला दिलेले मोठे उत्तेजन म्हणजे त्यांनी गंधर्व नाटक मंडळीला दिलेला राजाश्रय होय. बालगंधर्व यांनी आजपर्यंत आपल्या अपूर्व गुणांवर लक्षावधी रुपये पैदा केले. अनेक राजेरजवाड्यांनी त्यांना द्रव्य देऊन त्यांची कदर केली; पण श्री. सयाजीराव महाराजांनी त्यांना आपले म्हटल्याने त्यांच्या 'खास आश्रयाखालील मंडळी'हे म्हणण्यात रा. नारायणरावांना जे भूषण वाटते, त्याच्या शतांशानेही इतर कशाचे त्यांना वाटत नाही, हे त्यांनी स्वत: प्रस्तुत लेखकाजवळ अनेक वेळा बोलून दाखविले आहे. दरवर्षी गंधर्व मंडळी एक सव्वा महिना येथे येते.' *(आपटे, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४३८).* बालगंधर्व नाटक मंडळीला बडोद्याचा राजाश्रय लाभला होता. त्यामुळे त्यांना अनेक दर्जेदार नाटके सादर करता आली. हिंदुस्थानभर त्यांच्या नाटकाचे सादरीकरण होऊ लागले.

महाराजांनी बालगंधर्व यांना मोक्याच्या वेळी मदत केली. याबाबत महाराजांचे चरित्रकार स्मिता भागवत आणि अविनाश कसान म्हणतात, 'ही नाटक मंडळी बंद पडण्याच्या निर्णायक क्षणी सयाजीराव महाराजांकडे मदतीसाठी सादर करण्याचा विचार आला. महाराज दानशूर! पण बडोदे राज्याच्या तिजोरीतून जाणारी आर्थिक मदत बिनशर्त कधीच नसे. त्याचा रास्त मोबदला बडोद्याच्या प्रजेस या ना त्या रूपाने मिळाला पाहिजे असा महाराजांचा कटाक्ष असे. त्या दंडकानुसार याचिका मंजूर केली. परंतु गंधर्व नाटक मंडळीस राजाश्रय देण्यापूर्वी त्यांनी एक अट घातली. या नाटक मंडळीने दरवर्षी बडोद्याचा दौरा करावा. दौऱ्यात निदान एका नव्या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग बडोद्यात सादर करावा. ही प्रेमळ अट गंधर्व नाटक मंडळीला जाचक ठरण्याची सुतराम शक्यता नव्हती. त्यांनी ती सहर्ष मंजूर केली. गंधर्व नाटक मंडळीला बडोदा संस्थानाचा राजाश्रय १९१३ साली मिळाला. त्यामुळे 'संगीत एकच प्याला' सहित अनेक नाटकांचे शुभारंभाचे प्रयोग बघायचे भाग्य बडोदेकरांना लाभले. राजाश्रय मिळाल्यामुळे गंधर्व नाटक मंडळीने हलाखीच्या परिस्थितीतून वेगाने डोके वर काढले. मराठी रंभूमीस पुनश्च वैभव प्राप्त करून देण्याचे राजस काम केले.' *(भागवत, कसान, २००४, पृ. १४२).* महाराजांनी ज्या वेळेपासून या नाटक मंडळींना मदत सुरू केली तेव्हापासून विविध वृत्तपत्रांत या नाटक मंडळींच्या जाहिरातीत 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड राज्य बडोदे यांचे खास आश्रयाखाली' असा मजकूर छापण्यात येत होता. महाराजांच्या दातृत्वामुळे ह्या नाटक मंडळीने मराठी नाट्यक्षेत्रात इतिहास निर्माण केला.

सयाजीराव महाराज कोणत्याही प्रकारच्या कलाकारांनी कला सादर केल्यावर त्यांना मानधन देत. हे मानधन इतर राजांच्या तुलनेत अधिक असे. त्यामुळे आपल्या कलेचे आणि कौशल्याचे चीज झाल्याचे त्यांना समाधान मिळत असे.

## सयाजीराव महाराजांचे ललित कलांसाठीचे दातृत्व

१) राजा रविवर्मा यांना खास दरबार भरवून मानवस्त्रे आणि पन्नास हजार रुपये दिले.

२) बडोद्यातील चित्रकार रा. तवकर यांना महाराजांनी सहा हजार रुपये दिले.
*(आपटे, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४३२)*

३) फणींद्रनाथ बोस या बंगाली मूर्तीकाराला 'सयाजीपदक' देऊन सन्मान केला.

४) रा. शितूत यांना फोटोग्राफी कलेसाठी मदत केली.

५) ललित कला प्रदर्शन, पुणे २०० रुपये (इ.स. १८७८)

६) ललित कला प्रदर्शन, मद्रास, २०० रुपये (इ.स. १८७९)

७) ललित कला प्रदर्शन, पुणे २०० रुपये (इ.स. १८८०)

८) ललित कला प्रदर्शन, पुणे आणि मद्रास ७०० रुपये (इ.स. १८८१)

९) ललित कला प्रदर्शन, पुणे २०० रुपये (इ.स. १८८८)

१०) रा. रामकृष्णबाबा यांच्या गायन समाज, पुणे ह्या संस्थेसाठी १०० रुपये (इ.स.१८९०)

११) ललित कला प्रदर्शन, पुणे २०० रुपये (इ.स. १८९०)

१२) युवराज श्री.जयसिंगराव, फत्तेसिंगराव व श्री. संपतराव गायकवाड यांच्या तसबिरींच्या चौकटीसाठी रुपये १,०३७-८-३ खर्च केले.

१३) साठे व भट यांच्या महाराष्ट्र वक्तृत्वोत्तेजक मंडळी यांना ५०० रुपये (इ.स.१८९२)

१४) रॉयल म्युझियम, मुंबई यांना ५००० रुपये (इ.स. १९०५)

१५) फैजी रहमान यांना इ.स. १९११ पासून १९१५ पर्यंत काढलेल्या १५ चित्रांबद्दल एकंदर ८८,००० रुपये दिले.

१६) मुंबई आर्ट सोसायटी यांना प्रदर्शन भरवण्यासाठी १०० रुपये (इ.स. १९१७)

१७) रा. भातखंडे (मुंबई) यांना अखिल भारतीय संगीत परिषदेसाठी १,००० रुपये दिले. (इ.स. १९१८)

१८) अखिल भारतीय संगीत परिषद, लखनौ (सेक्रेटरी ) ५०० रुपये (इ.स. १९२४)

१९) अखिल भारतीय संगीत परिषद, ५०० रुपये (इ.स. १९२५)

२०) इंग्रज चित्रकार जे. सॉलोमन यांनी महाराजांची एक भव्य तसबीर काढली होती. त्यासाठी त्यांना १,४०० पौंड म्हणजे २०,००० रुपये सन १९२६ साली देण्यात आले.

२१) मुंबई आर्ट सोसायटी २०० रुपये (इ.स.१९२७)

❍❍❍

# प्रकरण १० वे

# आनंदोत्सवाप्रीत्यर्थ केलेले दान

सयाजीराव महाराजांनी राज्यातील प्रजेला सुखी आणि समृद्ध करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. त्या उपाययोजनांपैकी लोकांना पैसा आणि वास्तूंच्या स्वरूपात दान देणे हा एक उत्कृष्ट पर्याय त्यांनी निवडला होता. महाराज जे दान करत ते प्रजेच्या उपयोगी पडणारे, त्यांच्या समस्या मुळातून नष्ट करणारे असे. त्यामुळे महाराजांचे दातृत्व नेहमीच सत्पात्री समजले जात होते.

महाराजांच्या जीवनात जे काही आनंदाचे क्षण, घटना-प्रसंग आले त्याप्रीत्यर्थ त्यांनी राज्यातील समग्र प्रजेच्या सुधारणेसाठी, सुखासाठी राज्याच्या तिजोरीतून आणि स्वतःच्या खानगी फंडातून पैसा उपलब्ध करून दिला. त्यामुळे प्रजेला अनेक सुविधा निर्माण झाल्या. महाराजांनी त्यांच्या आनंदात प्रजेलाही सामावून घेतले. त्यांच्या समस्या कमी केल्या. या प्रकरणात महाराजांनी बडोदा राज्यात त्यांच्या आनंदोत्सवानिमित्त जे-जे दान केले त्याबद्दल निवेदन केले आहे.

## इंग्लंडच्या राणीचा हीरक महोत्सव

इंग्रजांचे संपूर्ण हिंदुस्थानवर राज्य असल्याकारणाने तेथील राज्यकर्त्यांचे उत्सव साजरे करण्याची पद्धत त्या काळात रूढ झाली. त्यामध्ये संस्थानातूनही त्यांचे आनंदोत्सव साजरे केले जात असत. १८९६-९७ मध्ये इंग्लंडच्या महाराणींचा हीरक महोत्सव बडोदा संस्थानात साजरा केला गेला. या निमित्ताने ६० तोफांची सलामी देण्यात आली, तर महाराजांनी या प्रसंगी बडोदा संस्थानाच्या ताब्यात असणाऱ्या एकशे वीस कैद्यांना मुक्त करण्यात आले. या निमित्ताने बडोद्यात सैनिकांचे संचालन घेण्यात आले. सर्व शाळेतील मुलांना गोड खाऊ वाटण्यात आला.

महाराजांनी या उत्सवानिमित्त कलकत्ता या ठिकाणी महाराणींचा जो पुतळा उभारला जाणार होता त्यासाठी २,००० रुपयांची देणगी दिली. बडोद्यातील डफरीन हॉस्पिटलमध्ये अस्पृश्य आणि गोषातील महिलांसाठी वेगळा वार्ड (विभाग) जोडण्यात आला. या शुभप्रसंगी या विभागाचे महाराणींच्या नावे नामकरण करण्यात आले. तसेच या प्रसंगी महाराजांनी महाराणींना शुभचिंतनाचा संदेश पाठवला *(B.A.R., 1896-97, P. 1).*

इंग्लंडच्या महाराणींचा हीरक महोत्सव बडोद्यात महाराजांनी साजरा केला असला, तरी त्यामधून प्रजेला कशा प्रकारे आनंद देता येईल याकडेच महाराजांचे लक्ष होते. या निमित्ताने महाराजांनी प्रजेला दातृत्वातून मदत केली.

## राज्यकारभाराचा रौप्य महोत्सव

सयाजीराव महाराजांनी इ.स. १८८१ मध्ये राज्यकारभार हाती घेतला. त्यानंतर इ.स. १९०६-०७ मध्ये त्यांच्या राज्यकारभाराला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने रौप्य महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला गेला. महाराजांनी या पंचवीस वर्षांत प्रजेच्या कल्याणाची खूप मोठी कामे केली होती. शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, राज्यव्यवस्था अशा अनेक बाबतीत त्यांनी खूप सुधारणा केल्या होत्या. त्यामुळे बडोद्यातील अधिकारी वर्गाबरोबर प्रजेलाही या दिवसाचे खूप कुतूहल होते. त्यामुळे हा दिवसही मोठ्या उत्साहाने साजरा करण्याचे ठरले. त्यावेळी महाराजांनी प्रजेला मोठ्या प्रमाणात दान, देणग्या देऊन त्यांच्यावरील प्रेम दर्शवले. या प्रसंगी महाराजांनी दिलेल्या देणग्यांची ०५ मार्च १९०७ रोजी आज्ञापत्रिकेचा जादा अंक काढून नोंद घेतली होती. हा अंक तत्कालीन दिवाण केरशास्प रुस्तमजी यांनी प्रकाशित केला. त्यातील नोंदी पुढीलप्रमाणे

१) पेटलाद तालुक्यातील लोकांना जमीन महसूल भारी पडतो. असे वाटत असल्याने संवत १९६२ अखेर जमीन महसुलाबद्दलची असलेली बाकी माफ केली आहे.

२) आयात वेरा (इन्कमटॅक्स) रुपये ७५० च्या उत्पन्नाच्या आतील लोकांपासून घेण्याचे माफ केले.

३) बडोदे शहरात अनाथ, अपंग लोकांकरिता ‘अनाथाश्रम’ काढण्याचा हुकूम दिला.

४) लायक ग्रामपंचायतीस दिवाणी फौजदारी काम चालविण्याचे अधिकार दिले.

५) खंडेराव मार्केट, बडोदे शहर म्युनिसिपालटीस बक्षीस दिले.

६) बडोदे शहरात सार्वजनिक लोकांच्या हितासाठी ‘विहारस्थान' तयार करण्याचा हुकूम दिला.

७) राज्यात पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी नवीन विहिरी बांधण्यास साडेपाच लक्ष रुपयांची मंजुरी दिली. यात निकृष्ट जातीच्या लोकांच्या सोयीकडे विशेष लक्ष द्यावे असे फर्माविले आहे.

८) राज्यात सक्तीचे शिक्षण सुरू झाले आहे. तथापि लोकांना अधिक सोयीचे पडावे म्हणून प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची फी माफ केली आहे.

९) पाटण व अमरेली येथे साठ विद्यार्थी राहू शकतील अशी दोन वसतिगृहे (बोर्डिंग) काढण्यास मंजुरी दिली.

१०) राज्याच्या खर्चाने दरसाल पाच विद्यार्थी परदेशात विद्याभ्यासाकरिता पाठविण्याचे मंजूर केले.

११) लांब व कमी वस्तीच्या प्रदेशात लोकांना औषधपाण्यासाठी सोय व्हावी म्हणून तिलकवाडा, वेलछा आणि खांबा येथे तीन दवाखाने काढण्याचा हुकूम दिला.

१२) बडोदे शहरात स्त्रियांसाठी 'प्रसूतिगृह' काढण्याचा हुकूम दिला.

१३) बावीस कैद्यांची मुक्तता केली. यात एक फाशीच्या शिक्षेचा व पाच जन्मठेप शिक्षेचे कैदी होते.

१४) बडोदे प्रांतांपैकी चोरंदा, संखेडा, शिनोर, तिलकवाडा, बडोदे, डभोई आणि पादरा महालात कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमीन महसुलाचा एक हप्ता घेण्याचे एक वर्ष तहकूब केले.

१५) रिसाले, बॉडीगार्ड व तोफखान्याच्या सर्व नोकर लोकांचे पगार वाढविले व घोडे चंदीघास आणि ड्रेसांच्या रकमा वाढवून दिल्या. या बाबतीबद्दल दरसाल रु. ९५,६४२ जास्त खर्च करण्याची परवानगी दिली.

१६) राज्यात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या शाळा उघडण्याकरिता १,६०,००० रुपयांची ग्रँट दिली आहे. त्याशिवाय ३०,००० एकवेळच्या खर्चासाठी मंजूर केले व शाळा उघडणे बाकी असलेल्या ६२२ गावांत शाळा उघडण्यासाठी रुपये १,००,००० (एक लक्ष) खर्चाची मंजुरी दिली.' *(मालकर आणि मगर, २०१८, पृ. १३८).*

या व्यतिरिक्त सयाजीराव महाराजांनी या रौप्य महोत्सवानिमित्त आपल्या दातृत्वाने प्रजेच्या जीवनात सुख निर्माण करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. अनेक योजनांसाठी निधी दिला. करातून लोकांना मुक्त केले. याबाबत य.रा. दाते या समकालीन चरित्रकारांनी अधिक माहिती दिली आहे. 'या रौप्य आनंदोत्सवाप्रीत्यर्थ महाराजांनी पाच लक्ष रुपयांची साराबाकी मांडून वाळली, बडोदे येथे ज्युबली बाग उघडून बडोदा सुधराईस मार्केटसाठी एक भव्य इमारत बक्षीस भेट दिली. अंत्यज विद्यार्थ्यांसाठी पाटण व अमरेली येथे दोन वसतिगृहे उघडली, राज्यात चार मोठे दवाखाने काढले व खेडोपाडी विहिरी खणण्यासाठी पाच लक्षाची जादा रक्कम मंजूर केली.' *(दाते, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ भाग-१, १९३३, पृ. ८०).* याशिवाय महाराजांनी किरकोळ करांतून प्रजेला सूट दिली. त्यामुळे प्रजेला महाराजांच्या या रौप्य महोत्सवाचे कित्येक दिवस खूप नवल वाटत होते.

चरित्रकारांनी दिलेल्या या नोंदींशिवाय बडोद्याच्या प्रशासकीय अहवालातही या आनंद उत्सवाप्रीत्यर्थ दातृत्वाच्या इतर अनेक नोंदी आहेत. त्या पुढीलप्रमाणे

१) या वेळी महाराज बडोद्यात नसल्याने हा आनंदाचा प्रसंग महाराजांच्या पुढील वाढदिवसाच्या वेळी साजरा करण्याचे ठरले. त्यानिमित्ताने सलग पाच दिवस सार्वजनिक सुटी देण्यात आली.

२) हा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी 'रौप्य महोत्सव समिती' नेमण्यात आली. अशाच प्रकारच्या समित्या बडोदा संस्थानातील शहरांतून आणि खेडेगावांतून स्थापन करण्यात आल्या.

३) या उत्सवानिमित्त महाराजांनी प्रजेला राज्य करण्याचे अधिकार दिले. 'It went on to say that panchayates had been established in every village, taluka and district; self government had been given to municipalities with a view to give to people practical training in local self-grievances; that local boards and municipalities had been instituted on an elective basis and indigenous industries and commerce had been fostered and encouraged; and railways, canals, tankes and public works of all kinds had been encouraged.'

४) लोकांना मोकळी हवा मिळण्यासाठी बडोदा शहरातील गर्दीच्या भागात उपाययोजना करण्यात आल्या.

५) गरीब लोकांना जेवण देण्यात आले आणि सर्व शाळेतील मुलांना गोड खाऊ वाटण्यात आला. संध्याकाळी सुंदर दारूकाम उडवण्यात आले होते.

६) संध्याकाळी सर्व लोकांना पाहण्यासाठी शेतीविषयक प्रदर्शन भरवण्यात आले होते.

७) महाराजांच्या हस्ते लोकांना उपयोगी पडतील अशा वृक्षांचे रोपण करण्यात आले होते.

८) महाराजांच्या हस्ते मुलांना बक्षिसे वाटण्यात आली *(B.A.R., 1906-07, p. 4 to 8).*

या निमित्ताने प्रजेने महाराजांचा सन्मान केला. देश प्रदेशांतील अनेक नामांकित व्यक्तींनी त्यांना शुभेच्छा पत्रे पाठवली. महाराजांनी या सर्व सदिच्छांचा स्वीकार करत प्रजेला खूप मदत केली. या माध्यमातून प्रजेला महाराजांच्या दानशूरपणाचा प्रत्यय आला.

## सुवर्ण महोत्सव

सन १९२५ मध्ये महाराजांना गादीवर बसून पन्नास वर्षे पुरी होत होती. त्यानिमित्त मोठा समारंभ घडवून आणण्यात आला. या कार्यक्रमासाठी बडोद्यातील जाणकार मंडळींनी एक कमिटी स्थापन करून हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचे ठरले. यासाठी बडोदा सरकार आणि कमिटीच्या वतीने चार दिवसांचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. त्यातील पहिले तीन दिवस सार्वजनिक सुट्टी देण्यात आली. हा आनंदोत्सव राज्यातील सर्व लोकांनी खेड्यापाड्यातून साजरा करण्याचे नियोजन केले होते.

या प्रसंगी दररोज तीन दिवस निरनिराळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमात ५० तोफांची सलामी देण्यात आली. त्यामध्ये वेगवेगळया संस्था आणि व्यक्तींकडून महाराजांना शुभेच्छा दिल्या गेल्या. सत्कार केले गेले. अनेक नामांकित संस्थांनी मानपत्रे दिली. महाराजांनी या सुवर्ण महोत्सवानिमित्त प्रजेला अनेक प्रकारच्या सुविधा दिल्या. या निमित्ताने महाराजांचे दातृत्व पुन्हा एकदा दिसून आले.

१) राजदरबारानंतर लक्ष्मीविलास राजवाड्यासमोर शाळेतील मुलांचे खेळ घेण्यात आले. त्यामध्ये बक्षीसपात्र मुला-मुलींना महाराज आणि महाराणींच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

२) संध्याकाळी प्रजेच्या मनोरंजनासाठी सुरसागर तलावावर सुंदर असे दारूकाम उडवण्यात आले.

३) कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी लोकांच्या मनोरंजनासाठी वेगवेगळ्या यात्रा भरविण्यात आल्या. त्यामध्ये अनेकांनी दुकाने सजविली होती.

४) यानिमित्ताने महाराजांनी गरीब लोकांना गोड आणि चमचमीत जेवण दिले. तसेच सर्वांना कपडे वाटण्यात आले.

५) आपल्या पूर्वजांच्या स्मृती जागविण्यासाठी महाराजांनी याच काळात किर्तीमंदिराची पायाभरणी केली.

६) बडोदा कॉलेज आणि शहरातील निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांमधून शिक्षणाद्वारे आपला ठसा उमटविणाऱ्या ६ विद्यार्थ्यांना महाराजांनी सन्मानित केले.

७) लक्ष्मीविलास राजवाड्यात भरविलेल्या दरबारात महाराजांच्या सत्कार आणि अभिनंदनपर झालेल्या भाषणानंतर महाराजांनी राज्यात चांगले काम करत असलेल्या अधिकारी आणि व्यक्तींचा सन्मान केला.

८) या आनंदोत्सवानिमित्त महाराजांनी विशेष गॅझेट काढून प्रजेला सवलती जाहीर केल्या.

९) प्रजेकडे असणाऱ्या विविध करांतील चार लाख रुपयांपैकी तीन लाख रुपये महाराजांनी माफ केले.

१०) कापसावर असणारी जकात १ डिसेंबर १९२५ पासून माफ करण्यात आली.

११) सर्व राज्यांतील प्रमुख गावांतून टेलिफोनची सोय करून देण्याचे ठरले.

१२) बडोदा राज्यातील नऊ जन्मठेप झालेल्या व इतर शिक्षा झालेल्या १७ गुन्हेगारांना या निमित्ताने सोडण्यात आले *(B.A.R., 1926-27, P. 11 to 16).*

अशा प्रकारे सयाजीराव महाराजांनी या मंगलप्रसंगी प्रजेला अनेक बाबतीत सूट दिली, मदत केली. हे महाराजांच्या दातृत्वाचे आणखी एक उदाहरण पाहायला मिळाले.

## इंग्लंडच्या राजाचा रौप्य महोत्सव

इंग्लंडच्या महाराणींचा हीरक महोत्सव इ.स.१८९६-९७ साली ज्याप्रमाणे बडोदा संस्थानात साजरा केला गेला; त्याप्रमाणे इंग्लंडच्या राजाचा रौप्य महोत्सवही इ.स. १९३५ मध्ये मोठ्या प्रमाणात साजरा केला. या निमित्ताने महाराजांनी प्रजेला पुढील सवलती जाहीर केल्या.

१) या उत्सवानिमित्त बडोद्यातील प्रजेला आणि हिंदुस्थान सरकारने स्थापन केलेल्या समितीला सहकार्य करण्यासाठी महाराजांनी बडोद्यात एक समिती स्थापन केली. त्यामध्ये चार जिल्ह्याचे सुभे (जिल्हाधिकारी), नायब सुभे यांचा समावेश केला.

२) ६ मे १९३५ पासून दोन दिवस सार्वजनिक सुटी देण्यात आली. त्या दिवशी ३१ तोफांची सलामी देण्यात आली.

३) या उत्सवानिमित्त महाराजांनी विशेष दरबार आयोजित केला. या दरबारामध्ये इंग्लंडच्या राजाला शुभेच्छा देण्यात आल्या. या निमित्ताने महाराजांनी राज्यात चांगले काम करणाऱ्या अधिकारी आणि इतर लोकांना पोशाख आणि पदके देऊन सन्मान केला.

४) बडोदा शहर आणि राज्यात लहान मुलांचे खेळ घेण्यात येऊन त्यांना बक्षीस वाटण्यात आले. गरीब आणि अनाथांना गोड जेवण देण्यात आले.

५) प्रत्येक जिल्ह्यात अशाच प्रकारचे कार्यक्रम घेण्यात आले.

६) महाराजांनी हिंदुस्थानभर साजऱ्याहोणाऱ्याया कार्यक्रमासाठी ५०,००० रुपये दान दिले. त्यातील ७० टक्के पैसे परत बडोद्यात येणार होते. हे सर्व पैसे महाराजांनी प्रजेला नवनवीन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वापरले *(B.A.R., 1934-35, p. 16 to17).*

सयाजीराव महाराज इंग्लंडच्या महाराणी किंवा महाराज यांचे विविध महोत्सव बडोद्यात साजरे करत होते. त्यानिमित्ताने त्यांना वेगवेगळ्या कारणांसाठी निधी द्यावा लागत होता; परंतु महाराज हा निधी दिल्यानंतर त्या निधीचा बडोद्यातील प्रजेला कसा उपयोग होईल यासाठी मनापासून प्रयत्न करत होते. हे सुद्धा महाराजांच्या दातृत्वाचे एक अनोखे उदाहरण आहे.

## हीरक महोत्सव

सयाजीराव महाराज गादीवर येऊन २६ मे १९३५ रोजी ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल हीरक महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला गेला. हा उत्सव सर्व प्रजेने आनंदाने साजरा करण्यासाठी बडोद्यातील मान्यवर मंडळींनी एक सभा घेतली. बडोदा राज्याच्या वतीने सर्व मंत्र्यांची एक समिती स्थापन केली गेली. तसेच जिल्हावार समित्या स्थापन केल्या गेल्या. या निमित्ताने बडोद्यात पुढील कार्यक्रम आयोजित केले गेले. तसेच प्रजेला वेगवेगळ्या सुविधा देण्यात आल्या.

१) हा महोत्सव साजरा करण्यासाठी स्थापन झालेल्या कमिटीने अकरा दिवसांच्या कार्यक्रमांचे नियोजन केले.

२) त्यातील पहिले पाच दिवस बडोदा सरकारच्या वतीने सार्वजनिक सुटी देण्यात आली.

३) १ जानेवारी १९३६ पासून या कार्यक्रमाला सुरुवात झाली. पहिल्या दिवशी २१ तोफांची सलामी दिल्यावर महाराजांना अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

४) ३ जानेवारी रोजी मोठ्या सभामंडपात महाराजांना अनेक मान्यवर व्यक्तींनी आणि नानाविध संस्थांनी मानपत्रे देऊन सत्कार केला. भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर महाराजांनी केलेले भाषण महत्त्वाचे होते. या भाषणांतून महाराजांनी प्रजेच्या सुखासाठी आणि कल्याणासाठी केलेल्या उपाययोजनाबद्दल निवेदन केले.

५) महाराजांनी हा मोठा उत्सव साजरा करताना आपल्या आनंदाबरोबर प्रजेलाही सामील करून घेतले. या महोत्सवाच्या निमित्ताने महाराजांनी १ कोटी रुपयांचा निधी उभा करण्याचा संकल्प केला. या निधीचा उपयोग ग्रामीण लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि अस्पृश्य लोकांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी उपयोग केला जाणार होता.

६) ७ जानेवारीला लक्ष्मीविलास राजवाड्याच्या दरबार हॉलमध्ये आयोजित केलेल्या दरबारात अनेक अधिकाऱ्यांना आणि संस्थानातील लोकांना त्यांनी केलेल्या कामाबद्दल पुरस्कार आणि पदके देण्यात आली.

७) सर्व शाळांमधून मुलांचे खेळ घेण्यात आले. त्यांना खाऊ आणि बक्षिसे वाटण्यात आली.

८) गरीब आणि अनाथ लोकांना अन्नदान करण्यात आले.

९) शेती आणि औद्योगिक प्रदर्शने भरविण्यात आली. याचा लाभ अनेक खेडेगावांतील लोकांनी घेतला.

१०) प्रत्येक जिल्ह्यातून अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले गेले. यामध्ये सुद्धा अनेक स्त्री-पुरुष आणि मुले सामील झाली.

११) प्रजेला आनंदात सहभागी होता यावे यासाठी वेगवेगळ्या संस्थांनी कार्यक्रम आयोजित केले. त्यामध्ये महिला मंडळ बडोदे यांनी भाषणे आणि संमेलनाचे आयोजन केले होते.

१२) बडोदा महानगरपालिकेने भाषणे आणि बागेत पार्टी आयोजित केली.

१३) धारासभेने सर्व लोकांकरिता जेवण दिले.

१४) बडोद्यातील ठाकोर मंडळाने बागेत पार्टी आयोजित केली.

१५) बडोद्यातील वेगवेगळ्या कारखान्यांच्या मालकांनीसुद्धा लोकांकरीता पार्टी आयोजित केली. *(B.A.R., 1935-36, p. 4 to 11).*

## हीरक महोत्सव स्मारक फंड

महाराजांनी या उत्सवाच्या निमित्ताने प्रजेच्या कल्याणासाठी उभारलेला १ कोटींचा निधी हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. जीवनात आश्वासक बदल होण्यासाठी या निधीचा उपयोग केला. यामधील निधी आणि त्याचा वापर वर्षानुसार कसा केला याची माहिती पुढीलप्रमाणे-

## इ.स. १९३५-३६

१) पहिल्या वर्षी उपलब्ध झालेल्या ७,५५,१६०-८-६ रकमेपैकी उत्सव साजरा करण्यासाठी ८०,६५१-७-९ रुपये खर्च करण्यात आले. या उत्सवाच्या निमित्ताने उरलेली रक्कम ट्रस्ट स्थापून ती रक्कम महाराजांच्या संकल्पनेनुसार ग्रामीण भागांतील कायमस्वरूपाच्या सुधारणांसाठी वापरण्याचे ठरले.

२) त्यानुसार या पैशाचा विनियोग कसा करावा यासाठी नियम तयार करण्यात आले *(B.A.R., 1935-36, p. 10).*

## इ.स. १९३६-३७

१) हीरक महोत्सव स्मारक फंडाचा खर्च कसा करावा यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. त्यामध्ये दिवाण यांना अध्यक्षपद देण्यात आले, तर दहा अधिकारी, लोकल बोर्डाचे ६ प्रतिनिधी, २ मागासवर्गीय प्रतिनिधी आणि याफंडाच्या सचिवपदी डेव्हलपमेंट सेक्रेटरी यांची निवड करण्यात आली. इ.स.१९३६-३७ या वर्षी खर्च करण्यासाठी ३,५१,४२४ रुपये उपलब्ध होते. यातून ग्रामीण पातळीवर काम करणाऱ्या गावपंचायतींना निधी देण्यात आला. या निधीतून लोकांच्या कल्याणाची कामे करण्यात आली.

२) वरील फंडाव्यतिरिक्त लोकांच्या सहभागातून उभारलेलाफंडही 'ग्रामीण प्रजेच्या उन्नतीसाठी' वापरला जावा असे ठरले. १ कोटी फंडाशिवाय प्रजेने या उत्सवासाठी दिलेला फंड ६,५८,९८६-१२-६ रुपये इतका जमा झाला. या प्रजेचा फंड कसा खर्च करावा यासाठी पुन्हा दिवाणांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. यामध्ये एक अधिकारी आणि जनतेचे ३९ प्रतिनिधी निवडण्यात आले.

३) हे दोन्ही संपूर्ण निधी समितीमार्फत ग्रामीण लोकांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी वापरावा असे ठरले *(B.A.R., 1936-37).*

## इ.स. १९३७-३८

१) हीरक महोत्सव स्मारक फंडासाठी यावर्षी २,३६,७०५ रुपये उपलब्ध झाले. ती सर्व रक्कम २११ ग्रामपंचायतींना देण्यात आली.

२) ग्रामीण भागातील शिक्षणासाठीही मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करण्यात आला. यासाठी साडेचार लाखांचा निधी वेगळा ठेवला होता. यावर्षी या कामासाठी २३,६०० रुपये देण्यात आले.

३) त्यानंतरचा निधी सूतगिरण्या, पोल्ट्री फार्म यांच्या सुधारणेसाठी वापरण्यात आला.

४) प्रजेने उभारलेल्या ६,५८,९८६-१२-६ फंडाच्या व्याजातून येणारी रक्कम २२,००० रुपये शेतीच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्तीच्या रूपाने आणि अनुदानासाठी वापरण्यात यावी असे ठरले *(B.A.R., 1937-38).*

## इ.स. १९३८-३९

१) महाराजांच्या हीरक महोत्सवानिमित्त उभारलेल्या फंडातून इ.स. १९३८ -३९ या वर्षीसाठी जमलेल्या रकमेवरील व्याज, गेल्या वर्षीची शिल्लक हे सर्व मिळून या वर्षीसाठी एकूण १०,६९,८४५ रुपये उपलब्ध होते

२) त्यापैकी २,२७,९७९ रुपये विविध ग्रामीण भागातील विविध योजनांसाठी देण्यात आले, तर यावर्षीच्या शेवटी ८,४१,८६५ रुपये शिल्लक राहिले.

३) हा निधी खर्च करण्यासाठी तीन भाग करण्यात आले. त्यामध्ये पहिल्या भागात प्रजेला उपयुक्त असणाऱ्या बाबींवर खर्च करणे, दुसऱ्या भागात आदिवासी आणि अस्पृश्य प्रजेच्या सुधारणेसाठी खर्च करणे आणि तिसऱ्या भागात बडोदा राज्यातील सर्व ग्रामीण प्रजेसाठी खर्च करणे असे ठरविण्यात आले. या नियोजनाप्रमाणे इ.स. १९३८-३९ साली पहिल्या भागासाठी ६०,००० रुपये देण्यात आले. दुसऱ्या भागासाठी ५०,००० रुपये आणि तिसऱ्या भागासाठी ५०,००० रुपये देण्यात आले.

४) इ.स. १९३८-३९ या वर्षीसाठी २४० गावांतून १,९४,०८० रुपये खर्च करण्यात आले. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे ४६ गावांमधून पिण्याच्या पाण्यासाठी ४९,२०० रुपये, गायींच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्याकरिता ९३ गावांतून ६२,६७० रुपये, ८६ गावांतील दळणवळणाच्या सोयीसाठी ८१,९०५ रुपये मंजूर केले, तर गावठाणाच्या वाढीसाठी ३०५ रुपये खर्च करण्यात आले. अशा प्रकारे एकूण २४० कामांसाठी १,९४,०८० रु. खर्च करण्यात आले.

५) ग्रामीण भागात सहकार, आरोग्याच्या सुविधा, शिक्षण आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी हीरक महोत्सवानिमित्त उभारलेल्या फंडातून २,८९,००० रुपये रक्कम मंजूर करण्यात आली. त्यासाठी ग्रामीण भागात एक केंद्र उघडले जाणार होते. या माध्यमातून वरील सर्व सेवा प्रजेपर्यंत पोहोचाव्यात हा मुख्य उद्देश होता.

६) लोकांनी जमा केलेल्या रकमेतून उभारलेला फंड ग्रामीण भागातील कोंबडी पालन, वीणकाम, कताई आणि इतर लघु उद्योगांना दिला जात असे. या अंतर्गत या वर्षी २,००० रुपये मंजूर केले गेले *(B.A.R., 1938-39, p. 145-148).*

## इ.स. १९३९-४०

६ फेब्रुवारी १९३९ रोजी महाराजांचा मृत्यू झाला, तरी या हीरक महोत्सवानिमित्त उभारलेल्या फंडाचा विनियोग सुरूच होता. याफंडाच्या 'ग्रामीण भागाचा आर्थिकदृष्ट्या विकास करणे' हा मुख्य उद्देश समोर ठेवून या समितीच्या लोकांनी फंडातून काम सुरू ठेवले. याफंडाचे पैसे तीन भागात दिले जात होते. या कामाचे वर्गीकरण याअगोदरच पाहिले आहे. याफंडातून पुढीलप्रमाणे रकमा देण्याचे ठरले. यातील पहिल्या वर्गासाठी (ग्रामपंचायती) २.५० लाख रुपये, अस्पृश्य आणि आदिवासी लोकांच्या सुधारणेसाठी ०.५० लाख रुपये आणि संपूर्ण संस्थानासाठीच्या योजनेतून ०.५० लाख रुपये देण्याचे ठरले. प्रत्यक्षात पुढीलप्रमाणे रकमा देण्यात आल्या.

१) ग्रामपंचायतींना २.५५ लाख रुपये, अस्पृश्य आणि आदिवासी लोकांच्या सुधारणेसाठी ०.४३ लाख रुपये आणि संपूर्ण संस्थानसाठीच्या योजनेतून ०.११ लाख रुपये देण्यात आले. यामुळे यावर्षी (इ.स.१९३९-४०) ५,०६,३२६ रुपये खर्च करण्यात आले, तर पुढील वर्षीसाठी ८,७१,३९१ रुपये रक्कम शिल्लक राहिली.

२) ग्रामीण भागासाठी नियोजन (village works) केलेल्या योजनेतून मागील वर्षीची २४८ चालू कामे आणि या वर्षी मंजुरी दिलेली ३५३ कामे सुरू करण्यात आली. यातील रक्कम पुढीलप्रमाणे खर्च करण्यात आली. अ) सुरक्षित पिण्याच्या पाण्याच्या सुविधेसाठी बडोदा, मेहसाणा, नवसारी, अमरेली आणि ओखामंडळ या भागांसाठी ५८,६८८ रुपये खर्च करण्यात आले. ब) याच भागातील जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी ४४,२४५ रुपये खर्च करण्यात आले. क) ग्रामीण भागातील विकासाच्या विस्तार केंद्रासाठी ५४,१२६ रुपये आणि खेडेगावांच्या सुरक्षेसाठी ९३,८७६ रुपये खर्च करण्यात आले.

३) अस्पृश्य आणि मागासवर्गाच्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी या वर्षी ४३,३९४ रुपये खर्च करण्यात आले.

४) संपूर्ण संस्थानसाठीच्या योजनेतून कोसंबाजवळ जनावरांच्या आरोग्यासाठी १०,६७७ रुपये खर्च करण्यात आले.

५) ग्रामीण भागात सहकार, आरोग्याच्या सुविधा, शिक्षण आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी हीरक महोत्सवानिमित्त उभारलेल्या फंडातून २,८९,००० रुपये रक्कम खर्च करण्यात आली.

६) प्रजेने उभारलेल्या रकमेतून काही भाग कोंबडी पालन, विणकाम, कताई आणि इतर लघु उद्योगांना दिला जात असे. या अंतर्गत या वर्षी ७,९३३ रुपये खर्च केले गेले. त्याअंतर्गत सूतगिरणी, शेतीविषयक शिक्षण या विषयांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली गेली. या वर्षीच्याफंडातून ११४ शेतकऱ्यांना सरकारी शेती पाहण्यासाठी सहल काढण्यात आली *(B.A.R., 1939-40, p. 145-148).*

सयाजीराव महाराज हे जनतेचे कल्याण पाहणारे असल्यामुळे त्यांनी स्वतःच्या आनंदात नेहमीच प्रजेला सामावून घेतले. बडोद्यात वेगेवगळया निमित्ताने जे उत्सव झाले; त्यावेळी त्यांनी प्रजेला अनेक प्रकारे मदत केली. सुविधा पुरवल्या. त्यांच्या जीवनमानात कशा प्रकारे सुख निर्माण होईल यासाठी प्रसंगी संस्थानाच्या आणि स्वत:च्या खानगी खात्यातून तोटा सहन केला. त्यांनी फक्त आपल्या प्रजेचा विचार केला. मोठमोठ्या उत्सवप्रसंगी त्यांनी दातृत्वाचा वसा सोडला नाही. यामुळे महाराजा सयाजीराव गायकवाड हे ‘जनसेवेतच मोक्ष पाहणारे राजे होते’ हे पुन्हा एखादा सिद्ध होते.

❍❍❍

# प्रकरण ११ वे

# व्यक्तिगत मदत

सयाजीराव महाराजांनी त्यांना लाभलेल्या संपत्ती आणि बुद्धी या दोन्ही वरदानांचा उपयोग बडोदा राज्यातील प्रजेच्या हितासाठी केला. राज्याची तिजोरी ही जनतेची आहे असे ते मानत होते. या धनराशीचा उपयोग प्रजेच्या कल्याणासाठी करणे हे आपले कर्तव्य आहे असे ते नेहमी म्हणत. त्यामुळे त्यांनी बडोदा संस्थानात तसेच हिंदुस्थानात लोककल्याणार्थ झटणाऱ्या समकालीन सर्वच क्षेत्रातील धुरंदर व्यक्तींना आर्थिक साहाय्य केले.

महाराजांनी दिलेल्या मदतीचा उपयोग त्या-त्या व्यक्तींनी लोकांच्या सुधारणेसाठी केला. समाजोन्नतीसाठी केला. यामधील काही महनीय व्यक्तींचा परिचय आणि त्यांना महाराजांनी केलेल्या मदतीची माहिती पुढे दिली आहे.

## महात्मा जोतीराव फुले

सयाजीराव महाराज आणि महात्मा फुले यांचा स्नेहसंबंध होता. महाराजांनी फुलेंना साहित्य प्रकाशनात, आजारपणात मदत केली. फुलेंच्या मृत्यूनंतरही सावित्रीबाई फुले आणि पुत्र यशवंत यांना मदत केली. (याबद्दलची सविस्तर माहिती 'साहित्य निर्मितीतील दातृत्व' या प्रकरणात दिली आहे.)

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आंबेडकरांना मॅट्रिकपासून ते परदेशातील शिक्षणापर्यंत शिष्यवृत्ती दिली. पुढे आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या दोन्हीतून अर्थशास्त्रातील डॉक्टरेट पदव्या मिळवल्या. आपल्या सुरुवातीच्या कारकीर्दीत त्यांनी बडोदा संस्थानात काही काळ नोकरी केली; परंतु त्यांना पुढे आणखी शिक्षण घ्यावयाचे असल्याने महाराजा सयाजीराव यांनी त्यांना नोकरीतून सूट दिली. पुढील शिक्षणासाठी परदेशात पाठवले.

महाराजांनी भीमराव आंबेडकरांना चार वेळा शिष्यवृत्ती दिली. त्यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी परदेशात शिक्षण घेतले. त्यांनी पुढे जाऊन समाजासाठी चांगले काम केले. तसेच गोलमेज परिषदांमध्ये अभ्यासपूर्ण भाषणे केली. इ.स. १९३१ सालच्या

गोलमेज परिषदेतही आंबेडकरांनी उत्कृष्ट भाषण केले. त्याबद्दल आंबेडकरांचे चरित्रकार खैरमोडे म्हणतात, '१९३१ साली लंडन येथे गोलमेज परिषदेचे अधिवेशन होते. महाराजही यास उपस्थित होते. पंतप्रधानांच्या भाषणानंतर हिंदुस्थानातील संस्थानिकांचे प्रतिनिधी म्हणून पहिले भाषण सयाजीरावांचे झाले. या परिषदेतील बाबासाहेबांचे दलित आणि त्यांच्या हक्कासंबंधीचे विचार बघून त्यांना समाधान वाटले. सयाजीरावांनी बाबासाहेब आंबेडकरांना हॅन्स क्रिसेंट हॉटेलवर जंगी पार्टी दिली. या पार्टीत बरेच संस्थानिकही हजर होते. महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. त्यामुळे पार्टीतल्या आमंत्रित हिंदुस्थानी व ब्रिटिश सभासदांचा बाबासाहेबांबद्दल आदर वाढला.' *(खैरमोडे, खंड-४, १९६८, पृ. ११४)*. महाराज आणि बाबासाहेब यांच्यात या कार्यक्रमाच्या अगोदर बरेच दिवस भेट किंवा पत्रव्यवहार नव्हता. तरीही या भाषणानंतर सर्वांसमोर त्यांच्या विद्वत्तेचा सन्मान केला. त्याच कार्यक्रमात डॉ. आंबेडकर महाराजांस म्हणाले, 'आपण अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न करत आहोत. यासाठी मदत करावी.' मदतीसाठी दानशूर आणि तत्पर असणाऱ्या महाराजांनी कोणतीही विचारपूस न करता त्यांना १५० पौंडाचा चेक दिला. महाराजांच्या दानशूरपणामुळे डॉ. आंबेडकरांनी उच्चशिक्षण घेतले आणि उच्चशिक्षण घेऊन समाजात सुधारणा केल्या.

### सयाजीराव महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना केलेली मदत

सयाजीराव महाराजांनी डॉ. आंबेडकरांना पदवी शिक्षणासाठी इ.स. १९०८ ते इ.स. १९१३ या कालावधीत रक्कम १,८०० रुपये, उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत ३ वर्षे आणि इंग्लंडमध्ये १ वर्ष. (इ.स. १९१३ ते इ.स. १९१७) एकूण रक्कम ५५२ पौंड. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्लंडमधून परत येताना पुस्तके घेऊन येणारी बोट बुडाली. यावेळी नुकसानभरपाई म्हणून बाबासाहेबांनी पैसे मागितले नव्हते. तरीसुद्धा महाराजांनी ५०० रुपये दिले. दुसऱ्या गोलमेज परिषदेतील भाषाणानंतर लंडनमध्ये हॅन्स क्रिसेंट हॉटेलवर मेजवानी दिली. त्यावेळी महाराजांनी १५० पौंडचा चेक दिला. याच मेजवानीत सयाजीराव महाराजांनी बाबासाहेबांबद्दल दिलेल्या माहितीमुळे उपस्थितीत इतर मान्यवरांनी एकूण १३३५ पौंड मदत दिली. महाराजांनी डॉ. आंबेडकरांना केलेल्या मदतीचे आजच्या काळातील अंदाजे मूल्य - ४ कोटी ४४ लाख २३ हजार ८३९ रुपये होते.

## महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म जमखंडी (कर्नाटक) या गावी झाला. घरातील वारकरी सांप्रदायिक वातावरणाचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. त्यांना मराठी व कानडी या भाषा चांगल्या अवगत होत्या. पुढे ते संस्कृत, पाली, इंग्रजी व इतर प्राकृत भाषा शिकले. पुण्यात फर्ग्युसनमध्ये शिकत असताना त्यांना 'डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन'ची शिष्यवृत्ती मिळाली. (या संस्थेला सयाजीराव महाराजांनी स्थापनेपासून ते इ.स. १९३९ सालापर्यंत मदत

केली. याबद्दलची अधिक माहिती 'संस्थांना मदत'या प्रकरणात सविस्तर दिली आहे.) इ.स. १८९८ मध्ये ते बी.ए. झाले आणि एलएल.बी. च्या पहिल्या वर्षाचा अभ्यासक्रमही त्यांनी पूर्ण केला. पुढे बडोदे संस्थानात नोकरी करण्याच्या अटीवर महाराजांनी त्यांना दरमहा २५ रुपयांची शिष्यवृत्ती सुरू केली. याच साली शिंदे प्रार्थना समाजाकडे आकृष्ट झाले. इ.स. १९०१ मध्ये ते विलायतेतील मँचेस्टर कॉलेजात गेले. तेथे त्यांनी दोन वर्षे तौलनिक धर्म, पाली भाषा आणि बौद्ध धर्म या विषयांचा अभ्यास केला. समाजाचा, समाजशास्त्राचा तसेच अस्पृश्यतेसह अनेक सामाजिक समस्यांचा त्यांनी शास्त्रशुद्ध रीतीने अभ्यास केला. असा अभ्यास करणारे ते भारतातील पहिले शास्त्रज्ञ - अभ्यासक मानले जातात. इ.स. १९०३ च्या ऑक्टोबर महिन्यात ते मुंबईस परत आले. इ.स. १९०५ मध्ये त्यांनी अस्पृश्यांसाठी रात्रशाळा उघडली. साधारणपणे इ.स. १९०३ ते इ.स. १९१० या काळात त्यांनी एकेश्वरवादी तत्त्वज्ञानाचा प्रचार करत प्रार्थना समाजाचे कार्य केले.

वि.रा. शिंदे महात्मा जोतीबा फुले यांना गुरुस्थानी मानीत. १८ ऑक्टोबर १९०६ रोजी त्यांनी मुंबईत भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळीची (डिप्रेस्ड क्लास मिशन) स्थापना केली. मिशनचे हेतू पुढीलप्रमाणे निश्चित केले गेले. शिक्षण प्रसार निराश्रितांना नोकऱ्या मिळवून देणे, सामाजिक अडचणींचे निराकरण करणे, सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत शील, नागरिकता वगैरे गुणांचा प्रसार. मिशनतर्फे पुढील दोन वर्षे मोफत दवाखान्याचेही काम चालू होते.

१४ मार्च १९०७ रोजी सोमवंशीय मित्र समाजाची स्थापना महर्षी शिंदे यांनी केली. अस्पृश्य लोकांकरवीच स्व-उद्धारार्थ धार्मिक व सामाजिक सुधारणा करवून घेणे हा त्यामागचा हेतू होता. इ.स. १९१० पासून त्यांनी प्रार्थना समाजाशी असलेले संबंध संपवले. इ.स. १९१२ मध्ये डिप्रेस्ड क्लास मिशनच्या एकंदर १४ ठिकाणी २३ शाळा, ५५ शिक्षक, ११०० मुले, ५ वसतिगृहे, इतर बारा संस्था व ५ प्रचारक होते. निरनिराळ्या सात प्रांतांत मिशनचे काम पसरले होते. इ.स. १९१७ मध्ये त्यांनी 'अखिल भारतीय निराश्रित अस्पृश्यता निवारक संघ' स्थापन केला.

मुंबईला अखिल भारतीय पातळीवरील अस्पृश्यता निवारक परिषद आयोजित केली. अशा अनेक अस्पृश्यता विरोधक परिषदा आयोजित करून त्यांनी समाजसुधारणेचे प्रयत्न केले. इ.स. १९२२ मध्ये त्यांनी 'अहिल्याश्रम' बांधून पूर्ण केला. इ.स. १९२५-२६ मध्ये ते ब्रह्मदेशाच्या दौऱ्यावर गेले आणि तेथील समाज व बौद्धधर्माचा अभ्यास करून परतले.

महर्षी शिंदे यांनी आपल्या लेखनातून समाजसुधारणेचे विचार मांडले. त्यांनी 'उपासना' या मासिकातून व 'सुबोधचंद्रिका' या साप्ताहिकातून लेखन केले. 'बहिष्कृत भारत' (संशोधनात्मक प्रबंध), 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या लेखनाच्या माध्यमातून त्यांनी अस्पृश्यतेचा प्रश्न समाजासमोर मांडला. हॉलंडच्या धार्मिक परिषदेत सादर केलेला 'हिंदुस्थानातील उदार धर्म' हा त्यांचा प्रबंध त्या काळी गाजला होता. त्यांनी 'आठवणी आणि अनुभव' हे आत्मचरित्रात्मक पुस्तकही त्यांनी लिहिले आहे. एक सत्याग्रही म्हणून ते स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होते.

उपरोक्त संस्थांसह त्यांनी राष्ट्रीय मराठा संघ, समता सैनिक दल, बहुजन समाज पक्ष या संस्था-संघटनांच्या माध्यमातून सामाजिक व राजकीय कार्य केले. मुरळीची प्रथा, अस्पृश्यांना मंदिर प्रवेश, होळी उत्सवातील बीभत्स प्रकार या सर्वच समस्यांबाबत त्यांनी लक्षणीय कार्य केले. शेतकऱ्यांच्या समस्याही त्यांनी अभ्यासल्या, त्यासाठी शेतकऱ्यांच्या संघटनेचाही त्यांनी प्रयत्न केला.' *(www.virashinde.com).*

महर्षी शिंदे पुण्यात शिकत असताना वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांना डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनची शिष्यवृत्ती मिळाली. या असोसिएशनला सयाजीराव महाराज मदत करत होते. त्यामुळे असे म्हणता येईल की, महाराजांनी महर्षी शिंदेंना त्यांच्या पुण्यातील शिक्षणापासून ते परदेशातील उच्चशिक्षणापर्यंत आणि त्यांच्या पुढील समाजकार्यात मदत केली. तसेच महर्षी शिंदेंनी स्थापन केलेल्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन'च्या शाळांना मदत केली. (याबाबतची अधिक माहिती 'संस्थांना मदत' या भागात दिली आहे.) या मदतीबद्दल शिंदेंनी अनेक वेळा कृतज्ञतेचे उद्गार काढले आहेत.

इ.स. १९३५ मध्ये मराठी साहित्य संमेलन बडोद्यास भरले. त्या वेळी संमेलनात निरनिराळ्या विषयांवरील चर्चेसाठी निरनिराळ्या शाखा तयार करून प्रत्येक शाखेवर स्वतंत्र उपाध्यक्ष नेमण्यात आला होता. 'धर्माचे तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र' या शाखेच्या उपाध्यक्षपदी महर्षी शिंदे होते.

## दिवाण टी. माधवराव

सयाजीराव महाराजांचे पहिले दिवाण टी. माधवराव यांनी बडोदा संस्थानात जी अव्यवस्था होती ती दूर केली. महाराजांना राज्यकारभारासाठी तयार करण्याचे महत्त्वपूर्ण काम टी. माधवराव यांनी केले. महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर त्यांनी दिवाणगिरीचा राजीनामा दिला. सयाजीराव महाराज आणि त्यांचे काही बाबतीत मतभेद झाल्याची नोंद चरित्रकारांनी घेतली आहे; परंतु राजीनामा दिल्यावर महाराजांनी त्यांना सन्मानपूर्वक निरोप दिला.

'दिवाण टी.माधवराव यांनी बडोदा संस्थानाच्या केलेल्या सेवेबद्दल त्यांना तीन लक्ष रुपयांची देणगी दिली.' *(आपटे, खंड-१, १९३६, पृ. २८४).* त्यानंतर महाराज आणि टी. माधवराव यांच्यात खूप दिवस पत्रव्यवहार चालू होता. महाराजांनी त्यांना वेळोवेळी मदत केल्याची नोंद चरित्रकारांनी घेतली आहे.

## रियासतकार गो.स. सरदेसाई

रियासतकार गो.स. सरदेसाई महाराजांचे वाचक म्हणून बडोदा राज्यात १ जानेवारी १८८९ रोजी रुजू झाले. ते महाराजांना वेगवेगळ्या भाषांतील पुस्तके वाचून दाखवत. सरदेसाई हे हुशार, अभ्यासू आणि कामसू असल्याने महाराजांनी त्यांच्यावर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या टाकल्या. त्या त्यांनी समर्थपणे पेलत महाराजांचा विश्वास संपादन केला. महाराजांना न समजणाऱ्या विषयांतील माहिती त्यांनी दिली. राजपुत्रांचे शिक्षक म्हणूनही त्यांनी उत्तम काम पाहिले. महाराजांचे खासगी

तसेच सरकारी हिशेबनीस, भाषांतर शाखा आणि चरित्रसंग्रह शाखेचे प्रमुख म्हणून काम पाहिले. महाराज भाषण करताना त्यातील चांगल्या बाबी किंवा उणेपणा शोधण्यासाठी सरदेसाईंना सांगत. तीही जबाबदारी त्यांनी पार पाडली. महाराजांच्या सहवासात त्यांनी सदतीस वर्षे नोकरी केली. निवृत्तीनंतरही त्यांनी बडोद्यात काम करावे असा महाराजांचा आग्रह होता; परंतु त्यांनी राजीनामा दिला.

सयाजीराव महाराजांनी सरदेसाई यांच्याकडे ‘राष्ट्रकथामाला’ व ‘महाराष्ट्रग्रंथमाला’ या दोन मालांची सर्व व्यवस्था आरंभी त्यांच्याकडे सोपवली. महाराजांनी सुचवलेल्या दोन इंग्रजी पुस्तकांचे भाषांतर सरदेसाई यांनी प्रथम केले. पुढे त्यांनी इतिहास लेखनात फार मोठे काम केले. सरदेसाई नेहमी म्हणत, ‘मी रियासतकार म्हणून मिरवतो त्याचे श्रेय मुख्यत: सयाजीराव महाराजांस आहे.’ महाराजांनी त्यांना वेळोवेळी खूप मदत केल्याने सरदेसाई यांना इतिहास लेखनात खूप मोठा पल्ला गाठता आला. (सयाजीराव महाराजांनी सरदेसाई यांना लेखनात मदत केल्याचे सविस्तर विवेचन ‘साहित्य निर्मितीतील दातृत्व’ या भागात केले आहे.)

## अरविंद घोष

८ फेब्रुवारी १८९३ रोजी अरविंद घोष बडोद्यात आले. त्यावेळी प्रथम त्यांची बडोदा महाविद्यालयात फ्रेंच आणि इंग्रजी विषयांचे प्राध्यापक म्हणून निवड झाली. त्यानंतर काही काळ उपप्राचार्य म्हणूनही काम पाहिले. त्यांनी बंगाली आणि संस्कृत शिकून वेदांचा अभ्यास केला. योगसाधनेस प्रारंभ केला. यासाठी अरविंदांना सयाजीराव महाराजांचे प्रोत्साहन होते. त्यांचे बडोद्यात येण्यामागचे कारण वरवर जरी बडोदा कॉलेजमध्ये प्राध्यापक होणे असले तरी खरे कारण निराळेच होते. त्यांच्यातील देशप्रेमाचा व राष्ट्रभक्तीचा जोश सयाजीरावांनी हेरला होता. देशातील क्रांतिकारकांचा मोठा समूह महाराजांच्या आश्रयाने राहत होता. त्यामध्ये सामील होण्यासाठी ते बडोद्यात आले होते. त्यांनी बडोद्यात येताच ‘इंदुप्रकाश’ वृत्तपत्रामध्ये आपल्या धारदार लेखणीने लिहिण्यास प्रारंभ केला. त्यांची लेखनशैली आणि स्वातंत्र्यलढ्यासाठीचे लेखन सर्वांनाच मोहिनी घालत होते. त्यामुळे बडोद्यातील विद्यार्थ्यांपासून ते प्रजेपर्यंत सर्वजणच त्यांच्याकडे आर्किषले गेले.

बडोदे राज्यातील मेहसाणा या जिल्ह्याच्या ठिकाणी असणाऱ्या ‘शिक्षक’ नावाच्या छापखान्यातून अरविंद घोष यांच्या काही लेखांचे भाषांतर प्रसिद्ध केल्याचा संशय ब्रिटिश सरकारास आला होता; तथापि तो त्यावेळी तसाच अनिर्णीत राहिला; पण पुढे इ.स. १९११ मध्ये त्याच छापखान्यातून ‘मुक्तिकोनपथे’ या आक्षिप्त बंगाली पुस्तकाचे गुजरातीत भाषांतर करून ते भलत्याच नावाने प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती हिंदुस्थान सरकारास लागल्यावरून त्यांनी तपास केला. नवसारी या गावी सदर पुस्तकाच्या काही प्रती एका विहिरीत टाकून दिल्याचे आढळले. यामागे अरविंद घोषच आहेत असा इंग्रजांचा संशय होता. अरविंद घोष आणि महाराजांच्या चलाखीने इंग्रजांना ठोस पुरावे सापडले नाहीत.

अरविंद घोष संस्थानच्या नोकरीत असल्याने निनावी लेखन करून राष्ट्रसेवा करत होते. यास महाराजांचा आश्रय होता. सयाजीराव महाराजांनी त्यांना राजाश्रय देऊन बडोद्यात क्रांतिकारकांना मदत केली. त्यामध्ये अरविंद घोष यांचाही समावेश होतो. बडोद्यात सयाजीरावांचे प्रमुख अधिकारी म्हणून अरविंदांनी १३ वर्षे काम पाहिले.

## केशवराव देशपांडे

बडोदा संस्थानात क्रांतिकारकांच्या ज्या चळवळी चालत होत्या त्याच्या केंद्रस्थानी खासेराव जाधव आणि केशवराव देशपांडे होते. केशवराव देशपांडेंनी परदेशात बॅरिस्टर पदवी मिळवली होती. तेव्हापासूनच त्यांना इंग्रजांच्या जुलमी राजवटीचा राग होता. परदेशात असतानाच त्यांचे क्रांतिकारकांशी संबंध येत गेले. परत आल्यावर महाराजांनी त्यांना सुभे (कलेक्टर) पदावर नेमले. या दोघांविषयी ब्रिटिशांना संशय असल्यामुळे वारंवार त्यांची चौकशी केली जात असे.

बडोद्यातून देशविघातक आणि ब्रिटिशांच्या विरोधातील साहित्य छापले जात आहे असा आरोप इंग्रजांचे अधिकारी करत. त्यांचा रोख प्रामुख्याने बडोदे राज्यातील या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांवर असे. ते अधिकारी म्हणजे खासेराव जाधव आणि केशवराव देशपांडे हे होत. हे दोघे त्यावेळी अनुक्रमे मेहसाणा व नवसारी प्रांताच्या ठिकाणी सुभ्याच्या जागांवर होते. त्यांच्या अडथळ्यामुळेच ब्रिटिश पोलिसांना 'शिक्षक छापखान्यात' छापलेल्या पुस्तकाचा शोध व्यवस्थितपणे करता आला नाही, अशी ब्रिटिश पोलीस खात्याची तक्रार होती. त्यावरून तपास करण्यात आला, तेव्हा त्यांच्या विरुद्ध समाधानकारक असा काहीही पुरावा आढळला नाही. तरीही देशपांडे यांना न्याय खात्यात बदलण्यात आले. त्यामुळे अखेर त्यांनी राजीनामा दिला. पुढील गुंतागुंत वाढू नये म्हणून तो महाराजांनी मंजूर केला. केशवराव देशपांडे यांनी महाराजांकडे अतिशय प्रामाणिकपणे सेवा बजावल्यामुळे नोकरी सोडताना त्यांना महाराजांनी दहा हजार रुपये निवृत्ती पारितोषिक म्हणून दिले.

केशवराव देशपांडे, खासेराव जाधव आणि अरविंद घोष बडोद्यात आल्यावर त्यांनी क्रांतिकारकांना मदत करण्याचे काम सुरू केले. त्या काळात बडोदे हे क्रांतिकारकांना मदत करणारे केंद्रच बनले. केशवराव देशपांडेंनी अरविंद घोष, माधवराव जाधव यांच्या मदतीने 'गंगानाथ विद्यालया'तून क्रांतिकारकांना मदत केली. या विद्यालयात काका कालेलकर आणि मामा फडके हे शिक्षक म्हणून काम पाहत होते.

अतिशय गोपनीय पद्धतीने केशवराव देशपांडे यांनी इंग्रजांच्या विरोधात सयाजीराव महाराजांच्या साहाय्याने क्रांतिकारकांना मदत केली.

## एफ.ए.एच. इलियट

इंग्रज अधिकारी इलियट यांनी महाराजांना त्यांच्या सर्व कर्तव्याची जाणीव करून दिली. महाराजांना त्यांच्याविषयी नेहमी आदर वाटत असे. महाराजांच्या शिक्षणातील इलियट सरांच्या योगदानाबद्दल सयाजीराव महाराजांचे अभ्यासक बाबा भांड म्हणतात, 'सयाजीरावांत

शिक्षणाबद्दल जिज्ञासा, इतिहासाबद्दल आवड आणि प्रशासनातील दूरदृष्टी विकसित करण्यात गुरूंचा फार मोठा वाटा आहे. आपल्या विद्यार्थ्यामधील उद्योगप्रियता हा गुण इलियट यांनी ओळखला. प्रजाहित हे राजाचं पहिलं कर्तव्य आहे. साहित्य, कला, संस्कृती संवर्धन हेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासोबत स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाची ज्योतही प्रज्वलित केली.' *(भांड, लोकपाळ राजा सयाजीराव, २०१३, पृ. २६)*. सयाजीराव महाराजांचे गुरू इलियट यांनी महाराजांची जडणघडण करण्यासाठी खूप कष्ट घेतले.

महाराजांना इलियट सरांबद्दल नेहमीच आदर राहिला होता. इलियट सरांच्या निवृत्तीनंतरही दोघांमधील पत्रव्यवहार खूप दिवस सुरू होता. महाराजांनी बडोदा संस्थानच्या सेवेतून निवृत्त होताना इलियट यांचा सन्मान केला. त्यांना पोशाख दिला. पुढेही त्यांना वेळोवेळी मदत केली. (मदतीची रक्कम उपलब्ध नाही .)

## वासुदेव बापट

सयाजीराव महाराजांनी इलियट यांना सेटलमेंट खात्याच्या कमिशनर पदावर नेमले. त्यांना सहकार्य करण्यासाठी महाराजांनी हुशार अशा वासुदेव बापट यांची निवड केली. बापट हे महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातून आले होते. त्यांनी आपल्या कामाच्या चिकाटीने आणि वरिष्ठांची मर्जी सांभाळत स्वतःची प्रगती केली. त्यांनी सेटलमेंट खात्यात खूप काम केले. इलियट यांना सहकार्य करत असताना त्यांनी काही कठोर निर्णय घेतले. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध अनेक तक्रारी रेसिडेंट यांच्याकडे करण्यात आल्या. तसेच त्यांच्या तापट स्वभावामुळे त्यांच्याविरुद्ध अनेकांचा सूर होता. त्यामुळे अनेक निवाडे करताना त्यांनी लाच घेतली, बळजबरीने पैसे घेतले अशा तक्रारी करणारे अनेक अर्ज रेसिडेंटकडे आले. या काळात नेमके सयाजीराव महाराज बडोद्यात नव्हते. त्यामुळे हे प्रकरण विकोपास गेले. त्यांच्या चौकशीसाठी कमिशन नेमले. त्यांच्यावर खटला चालवण्यात आला आणि त्यांना दोषी करण्यात आले. या खटल्यावेळी बापट यांचे मित्र लोकमान्य टिळक त्यांची वकिली करण्यासाठी बडोद्यात आले होते.

पुढे महाराज काही कालावधीनंतर बडोद्यात परत आले. हे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी महाराजांकडे आले. महाराजांनी खासेराव जाधव आणि अरविंद घोष यांना या प्रकरणाची माहिती विचारली. या दोघांनी सविस्तर आणि गोपनीय अहवाल दिले. त्यात महाराजांना बापट दोषी आढळले नाहीत. पुढे महाराजांनीही त्यांना दोषमुक्त केले; परंतु सर्वच प्रकरण चिघळू नये म्हणून त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडले; परंतु महाराजांनी बापटांना मासिक दीडशे रुपये पेन्शन देण्याचा निर्णय घेतला.' *(भांड, २०१३, पृ. ७८)*. महाराजांनी अशा प्रकारे बापटांना मदत करून रेसिडेंट आणि इंग्रजांच्या चौकशीतून मुक्त केले. शिक्षा होऊ दिली नाही.

## दामोदर सावळाराम यंदे

मराठीतील नामवंत लेखक आणि प्रकाशक अशी ओळख असणाऱ्या दामोदर सावळाराम यंदेंना महाराजांनी ग्रंथ प्रकाशनासाठी मदत केली. विशेष दरबार भरवून त्यांचा सन्मान केला

(महाराजांनी दामोदर सावळाराम यंदे यांना लेखनात आणि ग्रंथ प्रकाशनात मदत केल्याची सविस्तर माहिती ‘साहित्य निर्मितीतील दातृत्व’ या भागात दिली आहे.)

## आचार्य धर्मानंद कोसंबी

आचार्य धर्मानंद दामोदर हे एक बौद्ध धर्माचे व पाली भाषेचे अभ्यासक होते आणि लेखक होते. त्यांनी श्रीलंकेत जाऊन तेथील विद्योदय विद्यापीठात बौद्ध धर्माचा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला होता. तसेच म्यानमारमध्ये (ब्रह्मदेश) जाऊन त्यांनी ब्रह्मी भाषेतील बौद्ध साहित्याचा तौलनिक अभ्यास केला.

डिसेंबर १९०६ मध्ये कलकत्ता येथील औद्योगिक परिषदेचे उद्घाटन सयाजीराव महाराजांनी केले. त्यावेळी धर्मानंद कोसंबी हे कलकत्ता येथे राहत होते. त्यावेळी कोसंबी यांनी महाराजांची भेट घेतली. महाराजांनी त्यांना बडोद्यास येऊन सविस्तर भेटावे म्हणून सांगितले. यावरून कोसंबी हे महाराजांना इ.स.१९०७ मध्ये सविस्तर भेटले. त्या दोघांमध्ये त्यावेळी पाली भाषा, बौद्धधर्म याबद्दल खूप चर्चा झाली. त्यावेळी महाराजांनी त्यांना मदत केली. त्याबद्दल कोसंबी म्हणतात, ‘माझ्या जाण्यायेण्याच्या खर्चासाठी १६० रुपये त्यांनी खानगीतून देवविले व माझी रवानगी केली.’ *(सुखठणकर, संपादक, २०१५, पृ. १५२)*. महाराजांना त्यांच्या कार्याची महती पटली होती म्हणून त्यांनी भेटीसाठी बोलावले.

महाराज नेहमीच गुणवान लोकांचा संग्रह करण्यात माहीर होते. त्यामुळेच त्यांनी कोसंबी यांनासुद्धा बडोद्यात राहण्यास सांगितले; परंतु ही अट कोसंबी यांना पसंत पडली नाही. तरीही महाराष्ट्रातील कोणत्याही शहरात राहून बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यास तयार असल्याचेही त्यांनी सयाजीराव महाराजांना कळविले होते. त्याबद्दल कोसंबी यांना बडोद्याहून पुढीलप्रमाणे तार आली. ‘तुम्ही महाराष्ट्रातील कोणत्याही शहरी राहत असाल तर तुम्हाला बडोदे सरकारातून दरमहा ५० रुपये मिळतील, ही मदत तीन वर्षेपर्यंत चालू राहील. मात्र वर्षांतून एखादे पुस्तक बडोदे सरकारसाठी तुम्ही लिहून तयार केले पाहिजे.’ *(सुखठणकर, संपादक, २०१५, पृ. १५३)*. अशा प्रकारे महाराजांनी पालीच्या आणि धर्मप्रचारासाठी कोसंबींना मदत करण्याचे ठरवले. महाराजांच्या वरील मदतीचा उपयोग घेत कोसंबींनी बौद्ध धर्म प्रसाराचे कार्य केले.

महाराजांनी मासिक मानधन सुरू केल्यामुळे धर्मानंद कोसंबी हे कार्य करण्याकरिता पुण्यात येऊन राहिले. या काळातील स्वतःच्या कार्याबद्दल म्हणतात, ‘विशुद्धिमार्गाचा’ बराचसा भाग मी देवनागरी लीपीत लिहून काढला. ‘बोधिचर्या-अवतार’चे मराठी भाषांतर तयार केले. एक लहानसे पाली व्याकरण संस्कृत भाषेत लिहिले आणि बडोदे येथील निरनिराळ्या ठिकाणी पाच व्याख्याने दिली. त्यातील तीन व्याख्याने ‘बुद्ध, धर्म आणि संघ’ नावाच्या पुस्तकरूपाने छापून प्रसिद्ध झाली आहेत.’ *(सुखठणकर, संपादक, २०१५, पृ. १५६)*. महाराजांच्या मदतीने कोसंबी यांनी पाली भाषेच्या आणि बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी आवश्यक असणारे साहित्य निर्माण केले.

धर्मानंद कोसंबी हे हार्वर्ड युनिव्हर्सिटीत मि. वारन यांच्या संशोधनासाठी साहाय्य करण्याकरिता जाणार होते; त्यावेळी महाराजांनी त्यांना प्रोत्साहन दिले. महाराजही त्यावेळी अमेरिकेला जाणार होते. त्यांना सोबत नेण्याची तयारी त्यांनी दर्शवली होती; परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे ते शक्य झाले नाही; परंतु महाराजांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन त्यांच्या कायमच पाठीशी राहिले. सयाजीराव महाराज हे साहित्यप्रेमी राजा असल्यामुळे पुस्तक निर्मितीस कायमच साहाय्य करत राहिले होते. महाराजांनी पुढे कोसंबी यांना 'बुद्ध, धर्म आणि संघ' या पुस्तकासाठी ५०० रुपयांची देणगी दिली.

अमेरिकेतील हार्वर्ड युनिव्हर्सिटीतून कोसंबी परत आल्यावर त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयात नोकरी धरली, त्याबद्दल महाराजांना आश्चर्य वाटले; परंतु विनापरवाना नोकरी केल्याबद्दल रागावलेही नाहीत. उलट कोसंबी यांच्या केलेल्या विनंतीनुसार या महाविद्यालायत शिष्यवृत्त्या सुरू केल्या. त्याबद्दल सुखठवणकर म्हणतात, 'फर्ग्युसनमध्ये शिकणाऱ्या पालीच्या विद्यार्थ्यांस काही स्कॉलरशिपा द्यावात अशी या वेळी धर्मानंदांनी केलेली विनंती महाराजांनी मान्य केली. आणि परत गेल्यावर दर महिन्याला पंधरा रुपयांच्या दोन आणि दहा रुपयांच्या दोन अशा चार स्कॉलरशिपा दिल्याचे पत्र प्रि. परांजपे यांस पाठवले. या स्कॉलरशिपा धर्मानंद या कॉलेजात असेपर्यंत चालू राहिल्या.' *(सुखठणकर, संपादक, २०१५, पृ. १९३)*. महाराज अशा प्रकारे गुणी व्यक्तीचे कार्य समजले की त्यांना भरपूर मदत करत.यामध्ये वैयक्तिक मतभेद कधीही समोर येऊ देत नसत.

धर्मानंद यांच्या ठायी सयाजीराव महाराजांबद्दल कायमच आदर वसत असे. त्यामुळे ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात, 'दरमहा २५० रुपयांची नोकरी सोडून श्रीमंत गायकवाड महाराजांनी दिलेल्या ५० रुपयांच्या वेतनाचा स्वीकार केल्याबद्दल मला कधीही पश्चात्ताप झाला नाही. हे वेतन स्वीकारले नसते, तर डॉ. वूडस् यांची गाठ पडली नसती आणि अमेरिकेला जाण्याची संधी सापडली नसती. पुण्याला येऊन राहिल्यामुळे डॉ. भांडारकर यांचा निकट संबंध जडला व त्यांच्या प्रयत्नाने मुंबई युनिव्हर्सिटीत पाली भाषेचा प्रवेश करवून घेता आला. महाराजांच्या मदतीमुळे महाराष्ट्र देशबांधवांची सेवा करण्याची माझी उत्कट इच्छा अंशत: तरी तृप्त होण्यास श्रीमंत गायकवाड महाराजांचाच आश्रय कारणीभूत झाला आहे, आणि या प्रांतात पाली भाषेच्या प्रसाराचे पुष्कळसे श्रेय त्यांना देणे योग्य आहे.' *(सुखठणकर, संपादक, २०१५, पृ. १५६, १५७)*. महाराजांच्या अशा मदतीमुळे, गुणवंतांची योग्य निवड केल्यामुळे या देशात अनेक सुधारणांचा पाया घातला गेला.

## न्यायमूर्ती नारायण गणेश चंदावरकर

मुंबईतील नामांकित वकील म्हणून चंदावरकरांची ओळख होती. त्यांच्याकडे उत्कृष्ट बुद्धिमत्ता, अप्रतिम सौजन्य आणि अतिशय शुद्ध आचरण हे गुण होते. तसेच देशभक्त आणि सुधारक म्हणूनही त्यांची ओळख होती. हिंदू स्त्रियांच्या अवनतीबद्दल त्यांना नेहमी खेद वाटत

असे. म्हणून त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी कार्य करण्याचे ठरवले. चंदावरकर समाजकार्य करणारे समाजधुरीण होते. त्यांचे हे काम सयाजीराव महाराजांच्या कानावर गेले. महाराजांना पूर्वीपासूनच या विषयाबद्दल कमालीची आस्था होती. त्यामुळे या विषयाबद्दल देशात कोणी काम करत असल्याचे त्यांना समजल्यास महाराज त्यांना मदत करत.

महाराजांनी न्यायमूर्ती नारायण गणेश चंदावरकर यांना इ.स. १९०९ मध्ये खानगीतून महिला शिक्षणासाठी १,००००० रुपये दिले *(जोशी, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४५०)*. ही त्या काळातील खूप मोठी रक्कम होती.

तसेच मुंबईमध्ये इ.स. १९०७ मध्ये भरलेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेस सयाजीराव महाराजांनी (ना.न्या. चंदावरकर यांच्याकडे) २०० रुपयांची मदत दिली. स्त्रीशिक्षण आणि समाजकार्य महाराजांना महत्त्वाचे वाटत असल्याने त्यासाठी मदत केली.

## पंडित विष्णू नारायण भातखंडे

विष्णू नारायण भातखंडे हिंदुस्थानातील शास्त्रीय संगीताचे विद्वान होते. आधुनिक भारतातील शास्त्रीय संगीताचे पुनरुज्जीवन करण्यामध्ये त्यांचा मोठा वाटा होता. भातखंडे यांनी संगीत शास्त्राच्या अनेक नवीन रचना केल्या. तसेच त्यांनी संगीतासाठी अनेक नवीन संस्था स्थापन केल्या. त्यांनी प्रथम संगीताची समीक्षा करणारे ग्रंथ लिहिले. ‘हिंदुस्तानी संगीत पद्धती’ या विषयावर चार भागात ग्रंथ लिहून प्रकाशित केले. तसेच ‘हिंदुस्तानी संगीत क्रमिक’ नावाचा ग्रंथ सहा भागात लिहिला. त्यामुळे त्यांचे भारतीय संगीतात खूप मोठे नाव झाले.

महाराजा सयाजीराव यांनी विष्णू नारायण भातखंडे यांना संगीतातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवले. भारतीय संगीत आणि परदेशातील संगीत यावरही त्यांनी काही ग्रंथ लिहिले. त्यांच्या संगीतविषयक कार्यामुळे महाराजांनी त्यांना बक्षीस म्हणून १,००० आणि रुपये १,२०० रुपये वर्षासन इ.स. १९३४-३५ मध्ये सुरू केले. *(B.A.R., 1934-35, P. 224)*. सयाजीराव महाराजांचे संगीत प्रेम आणि देशातील संगीत फक्त टिकून न राहता त्यात आधुनिकता आणता आली पहिजे यासाठी त्यांनी भातखंडे यांना खूप मदत केली.

## दादाभाई नौरोजी

दादाभाई नौरोजी भारतीय राजकारणातील भीष्माचार्य हे होते. हे पारशी विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, कापूस-व्यापारी व भारतीय स्वातंत्र्यलढ्यातल्या राजकारण्यांच्या पहिल्या पिढीतील होते. त्यांनी लिहिलेल्या ‘पॉव्हर्टी अँड अन्-ब्रिटिश रूल इन इंडिया’ (भारतातील अ-ब्रिटिश राजवट आणि गरिबी) या पुस्तकाने भारतातील संपत्तीचा ओघ ब्रिटनकडे कसा वाहिला जात होता, याकडे लक्ष वेधले. इ.स. १८९२ ते इ.स. १८९५ या कालखंडात ते ब्रिटिश संसदेच्या कनिष्ठ गृहात संसद सदस्य होते. ब्रिटिश संसदेत निवडून गेलेले ते पहिलेच आशियाई व्यक्ती ठरले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या स्थापनेचे श्रेय ए.ओ. ह्यूम व दिनशा एडलजी वाच्छा यांच्यासह दादाभाई नौरोजींना दिले जाते. दादाभाई नौरोजी यांना भारताचे पितामह

म्हणून ओळखतात. ते भारतीय राष्ट्रवादाचे प्रणेते होते. भारतीय अर्थशास्त्राचे जनक, जहाल व मवाळ यांच्यात सुवर्णमध्य साधणारे नेते, भारतीय स्वराज्याचे पहिले उद्गाते आणि इंग्रजांच्या मतदारसंघातून निवडून येणारे व तेथील हाउस ऑफ कॉमन्सचे सभासद बनणारे ते पहिले भारतीय होते. भारताच्या लुटीच्या सिद्धांताचे ते जनक होते. इ.स. १८८३ मध्ये ब्रिटिशांकडून त्यांना 'जस्टिस ऑफ पीस' हा किताब देण्यात आला. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात नियुक्त होणारे ते पहिले भारतीय होते.

दादाभाई नौरोजी आणि बडोदा संस्थान यांचा सयाजीराव महाराजांच्या अगोदरपासूनच घनिष्ठ संबंध होता. महाराजांच्या पूर्वी बडोदा संस्थानचे असणारे राजे मल्हारराव गायकवाड यांनी आपल्या वागणुकीने बडोदा संस्थानात गोंधळ घातला होता. इंग्रज हे संस्थान खालसा करण्याच्या तयारीत होते. त्या काळात दादाभाई नौरोजी यांनी या संस्थानच्या दिवाण पदाचा कारभार हाती घेतला. राज्यकारभारात सुधारणा व्हाव्यात म्हणून त्यांनी खूप कष्ट घेतले; परंतु राजाची दृष्टीच सुधारणावादी नसल्याने त्यांना यात यश आले नाही. शेवटी राजीनामा देऊन ते मुंबईत परत आले. काही कालावधीनंतर महाराजा सयाजीराव गादीवर आले. या राजाकडून त्यांना खूप अपेक्षा होत्या. त्यामुळे दोघांमधील स्नेहसंबंध दिवसेंदिवस दृढ होत गेले.

सयाजीराव महाराजांना दादाभाई नौरोजी यांचे कार्य आणि कर्तृत्व माहीत असल्यामुळे त्यांना मोठी आर्थिक मदत केली. दादाभाई नौरोजी यांना इंग्लंडमधील निवडणूक लढवण्यास प्रथम १५,००० रुपये दिले. त्यामुळेच ते इ.स. १८९२ ते इ.स. १८९५ या कालखंडात ते ब्रिटिश संसदेच्या कनिष्ठ गृहात संसद सदस्य बनले. पुन्हा भेटीदाखल म्हणून सयाजीराव महाराजांनी त्यांना इ.स. १८९३ साली १५,००० रुपये दिले. सयाजीराव महाराजांचा दादाभाई नौरोजी यांच्यावर लोभ होता. नौरोजी यांच्या मृत्यूनंतर लगेच सर दिनशा वाच्छा यांच्याकडे 'दादाभाई स्मारकफंडा'साठी इ.स. १९१७ साली ५,००० रुपये दिले.

## सरोजिनी नायडू

सरोजिनी नायडू या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक थोर कार्यकर्त्या, प्रभावी वक्त्या व कवयित्री होत्या. त्यांचा जन्म हैदराबाद येथे सधन कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सरोजिनी अघोरनाथ चट्टोपाध्याय (चतर्जी) होते. सरोजिनींच्या आई वरदासुंदरीदेवी मूळच्या बंगालच्याच होत्या. त्या बंगालीमध्ये कविता करीत असत. सरोजिनींवर अशा सुसंस्कृत पालकांचे संस्कार लहानपणीच झाले. यातून त्यांचे कविमन घडले आणि लहानपणीच त्यांना कविता रचण्याचा छंद जडला व स्फूर्ती मिळाली. त्यांचे प्राथमिक शिक्षण घरीच खाजगीरीत्या झाले. वयाच्या बाराव्या वर्षी त्या मद्रास प्रदेशात मॅट्रिक परीक्षेत पहिल्या आल्या. (१८९२) त्यानंतर सुमारे तीन वर्षे प्रकृती ठीक नसल्यामुळे त्या घरीच राहिल्या. निजामाची छात्रवृत्ती घेऊन पुढे त्या इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी गेल्या. (१८९५) लंडन आणि केंब्रिज येथे थोडे शिक्षण घेतल्यानंतर प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे अर्धवट शिक्षण सोडून इटली पाहून त्या मायदेशी परतल्या.

या परदेशातील वास्तव्यात त्यांचा एडमंड गॉस या इंग्रज साहित्य समीक्षकाशी चांगला परिचय झाला. त्यांनी आपल्या काही कविता त्यांस दाखविल्या आणि पुढील काव्यलेखनात गॉस यांचे त्यांना चांगलेच मार्गदर्शन लाभले. 'द गोल्डन थ्रेशहोल्ड' (१९०५) या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहास गॉसनी प्रस्तावना लिहिली. हा काव्यसंग्रह त्या वेळच्या साहित्यक्षेत्रात चांगलाच गाजला. त्याला वृत्तपत्रांतून यथोचित प्रतिसाद मिळाला. रवींद्रनाथ टागोरांनीही सरोजिनींचे कौतुक केले होते.

भारतात परत आल्यावर त्यांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. यासाठी त्यांना इंग्रजांच्या त्रासाला सामोरे जावे लागले; परंतु त्यांच्या रक्तातच देशभक्ती आणि स्वातंत्र्य रुजले असल्यामुळे त्यांनी यातून माघार घेतली नाही. त्यांनी होमरूल लीगसाठी ॲनी बेझंट आणि सी.पी. रामस्वामी अय्यर यांच्या बरोबर हिंदुस्थानभर दौरा काढला. आपल्या भाषणांतून त्यांनी तरुणांचे कल्याण, श्रमप्रतिष्ठा, स्त्रीस्वातंत्र्य व राष्ट्रवाद यांचा पुरस्कार केला. सरोजिनी नायडूंनी गोखल्यांना गुरुस्थानी मानले आणि महात्मा गांधींचे नेतृत्व पूर्णत: स्वीकारले. हैदराबाद येथील प्लेगच्या साथीत त्यांनी फार परिश्रम घेऊन जनतेला सर्वतोपरी मदत केली. त्याबद्दल त्यांना 'कैसर-इ-हिंद' हे सुवर्णपदक देण्यात आले; पण ते त्यांनी जालियनवाला बाग येथील हत्याकांडानंतर ब्रिटिश सरकारला हत्याकांडाच्या निषेधार्थ परत केले. रौलट कायदा, मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा, खिलाफत चळवळ, साबरमती करार वगैरे विविध चळवळींचा त्यांनी काँग्रेसच्या ध्येयधोरणांनुसार प्रसार आणि प्रचार केला, मोहिमा काढल्या आणि गांधींच्या असहकार चळवळीत हिरीरीने भाग घेतला. सरोजिनींनी हिंदू-मुसलमान ऐक्य, स्त्रियांचे पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याचे हक्क आणि स्वातंत्र्य हेच आपले जीवनकार्य मानले.

त्यांच्या या कार्याची सयाजीराव महाराजांनी दखल घेतली. त्यांनी सरोजिनी नायडू यांना समाजकार्यातील योगदानासाठी बक्षीस म्हणून १,००० रुपये दिले आणि १,२०० रुपये वर्षासन इ.स. १९३६-३७ मध्ये सुरू केले *(B.A.R., 1936-37, P. 239)*. महाराज नेहमीच लोकांच्या सुधारणेसाठी काम करत राहिले. त्यामुळे ज्या व्यक्ती समाजासाठी, लोकांच्या उन्नतीसाठी काम करतात, त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांनी त्यांना मदत केली.

## रावबहादूर शंकर पांडुरंग पंडित

शंकर पंडित यांचा जन्म सावंतवाडी संस्थानात बांबुळीगावी झाला. ते इ.स. १८६५ मध्ये एम.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे शंकर पंडित हे वेदाभ्यासक, उत्तम प्रशासक बनले. त्यांनी 'महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी, हुजूरपागा' या शाळेची स्थापना केली. तसेच 'वेदार्थरत्न' हे मासिकही चालविले. तुकाराम गाथेची संशोधित प्रत 'इंदुप्रकाश गाथा' तयार केली. ते पुण्याच्या कॉलेजात 'फेलो' व 'दक्षिणा प्राईझ कमिटीचे सेक्रेटरी' झाले. त्यांनी संस्कृत व जर्मन भाषांचा अभ्यास करून त्यांत प्रावीण्य संपादन केले होते. इ.स.१८७४ मध्ये सरकारने त्यांना इंटरनॅशनल काँग्रेसला प्रतिनिधी म्हणून युरोपात पाठविले. त्यानंतर त्यांची मुंबईस 'इन्कमटॅक्स

कलेक्टर' व 'ओरिएंटल ट्रान्सलेटर' वगैरे हुद्यांवरही निवड झाली होती. ते पोरबंदर संस्थानचे ॲडमिनिस्ट्रेटरही होते. त्यांनी पुढे 'अथर्ववेदाचे' संपादन केले.

सयाजीराव महाराजांनी शंकर पाडुरंग पंडित यांना पुणे फीमेल हायस्कुलातील मुलींस छात्रवृत्ती देण्यासाठी ६,००० रुपये (इ.स.१८८५) स्वतःच्या खानगी फंडातून दिले.

## भारताचार्य चिं.वि. ऊर्फ नानासाहेब वैद्य

चिं.वि. वैद्य यांचे घराणे मूळ कोकणातले होते; परंतु त्यांचे वास्तव्य आजोबांच्या काळापासून ठाणे जिल्ह्यातल्या कल्याण येथे होते. त्यांचे वडील वकील होते. नानासाहेब वैद्यांनी आपल्या शिक्षणादरम्यान अनेक शिष्यवृत्त्या, पारितोषिक आणि चार्लस्टनसारखे मेडल मिळवले होते. मराठी आणि संस्कृत या विषयांची त्यांना खास आवड होती. चिं.वि. वैद्यांनी एम.ए.ची पदवी गणितात घेतली. त्यावेळी ते विद्यापीठात पहिले आले. पुढे एलएल.बी.चा अभ्यास करताना ते कॉलेजच्या हॉस्टेलचे सुपरिटेंडेंट आणि लायब्रेरियन होते. इ.स. १८८४ मध्ये एलएल.बी.ची परीक्षा उत्तीर्ण होताना त्यांना 'अनॉल्ड' पारितोषिक मिळाले.

पुढे चिं.वि. वैद्यांनी कोल्हापूर संस्थानात दीड वर्षे मुन्सफाची नोकरी केली. ती सोडून ते ठाणे शहरात वकिली करू लागले. अभ्यासू वकील म्हणून लोकप्रियता मिळालेल्या वैद्यांना सरकारने इ.स. १८८७ मध्ये उज्जैन न्यायालयात सत्र न्यायाधीश केले. दहा वर्षात सरन्यायाधीशापर्यंत पोहोचल्यावर प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी इ.स.१९०५ मध्ये नोकरीचा राजीनामा दिला. सरकारी नोकरीतून मुक्त झाल्यावर चिं.वि. वैद्यांनी आपले उर्वरित आयुष्य वाङ्मयसेवा आणि नाट्यसेवेत व्यतीत केले.

चिं.वि. वैद्य यांच्या नावे असलेल्या शाळेस महाराजांनी इ.स. १९२५ मध्ये १,०९६ रुपये खानगीतून दिले. वैद्य यांना एक पारितोषिक आणि तीन वर्षांपर्यंत एक वर्षासन महाराजांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या नावे दिले. (१९२८) चिं.वि. वैद्य त्यावेळी भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे येथे अध्यक्ष (१९२६-३६) होते. त्यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे पहिले कुलगुरू (१९२२-३४) आणि कुलपती (१९३४-३६) ही महत्त्वाची पदे भूषवली.

## रामकृष्ण गोपाळ भांडारकर

रामकृष्ण भांडारकरांचा जन्म ६ जुलै १८३७ रोजी महाराष्ट्रात मालवण येथे झाला. त्यांचे शिक्षण मालवण, रत्नागिरी, मुंबई येथे झाले. काही काळ शाळांमध्ये मुख्याध्यापक म्हणून काम केल्यानंतर त्यांना मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात आणि नंतर पुण्याला डेक्कन कॉलेजामध्ये संस्कृत भाषेचे प्राध्यापक म्हणून नेमणूक मिळाली. इ.स. १८९२ मध्ये डेक्कन कॉलेजातून ते निवृत्त झाले. पुढे इ.स. १८९३-९५ दरम्यान ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू होते. भांडारकर संस्कृत पंडित, मराठी शिक्षणतज्ज्ञ, समाजसुधारक व प्रार्थना समाजाचे कार्यकर्ते होते. ज्या काळात पाली, मागधी यांसारख्या प्राकृत भाषांचा अभ्यास करणारे अभ्यासक नगण्य

होते, त्या काळात डॉ. भांडारकरांनी प्राकृत भाषा, ब्राह्मी, खरोष्टी या लिप्या वगैरेंचे संपूर्ण ज्ञान मिळवून भारताच्या इतिहासाचे संशोधन केले. लुप्तप्राय झालेल्या इतिहासाची पुनर्मांडणी करून तो प्रकाशात आणला.

भारतातील हस्तलिखित ग्रंथांचा शोध घेऊन त्यांना प्रकाशित करण्याचे काम तत्कालीन सरकारने भांडारकरांवर सोपवले. त्यांनी पाच ग्रंथ लिहून हे काम बऱ्याच प्रमाणात साध्य केले. पुरातत्त्वशास्त्राचा अभ्यास करणारे संशोधक त्यांचे ग्रंथ आजही प्रमाण मानतात.

इ.स. १८८३ मध्ये व्हिएन्नामध्ये भरलेल्या प्राच्यविद्या विद्वानांच्या परिषदेत हजर राहिलेल्या भांडारकरांच्या अभ्यासाचा आवाका पाहून तेथले सरकार तसेच जागतिक विद्वान अचंबित झाले. त्यांनी भांडारकरांना सी.आय.ई. (Companion of the Order of the Indian Empire) ही पदवी देऊन सन्मानित केले. त्या पहिल्या युरोपीय प्राच्यविद्या परिषदेत भांडारकरांनी नाशिकजवळील लेण्यांमधल्या शिलालेखांचा अर्थ विशद करून सांगितला. या घटनेमुळे युरोपात प्राच्यविद्या विशारद म्हणून त्यांच्या कार्याची महती पसरली. त्यांना डॉक्टर ऑफ लेटर्ससह अनेक मानसन्मान मिळाले. भांडारकरांनी प्राच्यविद्याविषयक विपुल ग्रंथरचना केली. भांडारकरांच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या नावाने पुण्यात इ.स. १९१७ मध्ये 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था' स्थापन केली.

अशा विद्वान आणि प्रकांड पंडित डॉ.रा.गो. भांडारकर यांच्या शाळेस सयाजीराव महाराजांनी इ.स. १८८९ मध्ये १५० रुपयांची मदत केली. *(जोशी, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४४८).* तसेच 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था पुणे' या संस्थेला महाराजांनी मदत केली. (या मदतीबद्दल 'संस्थांना' या भागात अधिक माहिती दिली आहे).

पुढे रामकृष्ण भांडारकर यांचे नातू अच्युत भांडारकर यांनाही महाराजांनी मदत केल्याचे एका पत्रावरून दिसते. सेडॉन यांना लिहिलेल्या पत्रात महाराज लिहितात, '४ मार्चचे आपले पत्र मिळाले. शिक्षण विभागात त्यांच्यासाठी (अच्युत श्रीधर भांडारकर, सर रामकृष्ण भांडारकर यांचे नातू) एखादी जागा असेल असे मला वाटत नाही. त्यांना दुसऱ्या एखाद्या खात्यात नोकरी करायची असेल तर त्यांनी बडोद्यास यावे, मी त्यांचा इंटरव्ह्यू घेईन.' *(पत्र क्र. १४२०).* महाराजांनी रामकृष्ण भांडारकर यांना मदत केलीच; पण त्यांच्या पुढील पिढीलाही मदतीचा हात पुढे केला.

## खासेराव जाधव

सयाजीराव महाराजांचे जे विश्वासू नोकर संस्थानात होते; त्यात खासेराव जाधव यांचा वरचा क्रमांक लागतो. खासेराव जाधव महाराजांचे नातेवाईकही होते. बडोदा संस्थानातील बहुसंख्य लोकांचा शेती हाच उपजीविकेचा मार्ग होता. शेतीव्यवसायात उद्योगधंद्याप्रमाणेच नावीन्यपूर्ण बदल घडावेत असा सयाजीराव महाराजांचा ध्यास होता. यासाठी विश्वासू व अभ्यासू व्यक्ती कृषी खात्यात असावा असे त्यांना वाटत होते. म्हणून महाराजांनी खासेराव जाधव यांची

बुद्धिमत्ता लक्षात घेऊन उच्च शिक्षणासाठी जाणीवपूर्वक ऑक्स्फर्ड विद्यापीठात पाठवले. शिक्षणानंतर महाराज खासेराव यांच्याशी शेती, शेतकरी व त्यांचे प्रश्न याविषयी चर्चा करत. खासेरावांनी पारंपरिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयी मार्गदर्शन करावे, शेतीत टप्प्याटप्प्याने बदल करावा असे महाराज त्यांना वेळोवेळी पत्रव्यवहारातून सुचवत होते. खासेरावांनी शेतातील पिकांवर येणाऱ्या विविध अस्मानी संकटांवर प्रात्यक्षिकातून उपाय केले. त्यांनी बडोद्यात आधुनिक शेतीचे नमुने तयार केले.

विविध तंत्रशिक्षणाची सोय एकाच छत्राखाली असावी असे त्यांना जर्मनी दौऱ्यावर असताना आढळले. त्यानुसार आराखडा तयार करून सयाजीरावांना पाठवला. बडोद्यास पाणीपुरवठा करण्यासाठी अशक्य वाटणारे आजवा धरण बांधण्याची संकल्पना खासेराव जाधवांची होती. यातून त्यांच्या बुद्धिचातुर्याची चुणूक दिसते. बडोद्यात प्लेगची साथ पसरली त्यावेळी खासेराव जाधव नवसारी प्रांताचे कलेक्टर होते. त्यांच्या परिश्रम व सावधगिरीमुळे प्लेगचा प्रसार इतर प्रांतांच्या तुलनेत नवसारी प्रांतात कमी झाला. यामुळे अनेकांचे जीव वाचले. इ.स.१८९९-१९०० मध्ये बडोद्यात पडलेल्या दुष्काळात खासेरावांनी खूप कष्ट घेतले. त्यांनी महाराजांच्या सल्ल्याने केलेल्या उपाययोजनांमुळे प्रजेला दुष्काळाची झळ कमी प्रमाणात बसली.

सयाजीराव महाराजांनी बडोद्यात मराठा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी फंड स्थापन केला होता. त्याचे अध्यक्ष खासेराव जाधव होते. याफंडातून शिष्यवृत्ती घेऊन शिक्षण घेतलेल्या अनेकांनी पुढे महाराष्ट्रात शैक्षणिक संस्था काढून नावारूपाला आणल्या. खासेरावांनी पुण्यातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचा वाद भावनिक आवाहन करून सोडवण्याचा प्रयत्न केला. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद स्थापन करण्यात खासेरावांचा मोठा वाटा होता. इ.स. १९०७ मध्ये धारवाड येथे भरलेल्या पहिल्या आणि इ.स. १९०८ मध्ये मुंबई येथे भरलेल्या दुसऱ्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे खासेराव अध्यक्ष होते.

खासेराव जाधवांचे परदेशात शिक्षण घेत असल्यापासूनच क्रांतिकारकांशी संबंध होते. केशवराव देशपांडे आणि अरविंद घोष त्यांचे मित्र होते. अरविंद घोष यांना बडोद्यात आणण्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. त्यांनी अनेक क्रांतिकारकांना महाराजांच्या सल्ल्याने बडोद्याचा आश्रय दिला. याचा इंग्रजांना संशय आला होता. यामुळे त्यांना बडतर्फ करण्याची मागणी केली. महाराजांनी कारवाईचे नाटक करत काही काळ त्यांची कमी पदावर नेमणूक केली.

खासेराव जाधव महाराजांचे विश्वासू, निष्ठावंत अधिकारी होते. त्यांच्या अंगी सत्यवक्तेपणा, औदार्य, उत्कृष्ट नीतिमत्ता, निस्सीम स्वामीनिष्ठा, धाडसी व उतावळा स्वभाव, निर्भीड नि:स्पृहपणा आणि अप्रिय; पण पथ्यकर स्पष्टवक्तेपणा हे गुण होते. यामुळे महाराजांनी सोपवलेली प्रत्येक जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. यावरून महाराजांनी त्यांची केलेली निवड सार्थ ठरते.

खासेराव जाधव यांच्यावर इंग्रजांनी राजद्रोहाचे आरोप केले, त्यावेळी महाराजांनी चौकशी केल्याचे दाखवत निर्दोष मुक्त केले आणि काही काळ खालच्या पदांवर नेमणूक दिली. ही सयाजीराव महाराजांनी त्यांना केलेली मोठी मदत होती. परदेशात शिक्षण घेत असतांना त्यांना

१०,००० रुपयांची मदत केली. महाराजांनी खासेरावांचे विविध हुद्यांवरील काम आणि जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची धमक यामुळे त्यांना 'सुवर्णपदक' (इ.स.१९११) दिले. *(सरदेसाई, १९२५, पृ. २६०)*. महाराजांचा खासेरावांवर विशेष लोभ होता.

## राजरत्न प्रो. माणिकराव

सयाजीराव महाराजांकडे जी काही व्यक्तिरूपी रत्ने होती त्यात प्रो. माणिकरावांचा समावेश होतो. महाराज दूरदृष्टी व गुणग्राहक असल्याने माणिकराव लहान असतानाच एका प्रसंगातून त्यांचे संस्थानोपयोगी गुण महाराजांनी हेरले. महाराजांच्या प्रेरणेने आणि मदतीने त्यांनी 'जुम्मादादा व्यायाम मंदिर' काढले आणि मराठी वळणाचे ठेवले.

इंग्रजांविरुद्ध चालू असलेल्या स्वातंत्र्यलढ्याला व क्रांतिकारकांना महाराजांचा छुपा पाठिंबा होता. त्यासाठी कणखर व ध्येयनिष्ठ माणसे तयार होणे आवश्यक होते. त्या इच्छेला बळ देण्याचे काम माणिकराव या आखाड्यातून करत होते. त्यामुळे महाराज माणिकरावांना पाठिंबा देत होते. या व्यायाम शाळेची उद्दिष्टे व्यायाम मंदिरे उभारणे, व्यायाम प्रचार करणे, मल्लविद्येला उत्तेजन देणे तसेच संकट प्रसंगी राजा व प्रजा यांची सेवा करणे अशी होती.

बडोदा संस्थानात प्लेगची भयानक साथ आली होती. तेव्हा सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले असताना माणिकराव व त्यांच्या अनुयायांनी जीवापाड मेहनत घेऊन महाराजांना साथ दिली. या महाभयानक स्थितीत मदत करताना माणिकरावांचे अनेक अनुयायी मरण पावले.

माणिकराव यांनी महाराजांच्या सहकार्यातून शाळांमध्ये आखाडे स्थापन केले. गावागावात व्यायाम शाळा बांधण्यासाठी व खेळाचे सामान खरेदी करण्यासाठी महाराजांनी त्यांना मुबलक पैसे दिले. बाहेरगावचे अनेक विद्यार्थी बडोद्यात येऊ लागले. त्यांच्यासाठी वसतिगृह सुरू केले. महाराजांना संकटप्रसंगी स्वसंरक्षण करता यावे म्हणून जंबियाची कुस्ती, फिरंग आणि बिन्नोट या अवघड कला माणिकरावांनी त्यांना शिकवल्या. 'पहिलवान लोक व त्यांच्या कुस्त्यांसंबंधीचे नियम' हे पुस्तक माणिकरावांकडून महाराजांनी लिहून घेतले. यातूनच खुनशी व प्रतिस्पर्ध्याच्या जीवावर बेतणारे अनेक डावपेच नियम करून बंद केले. इ.स. १९१२ मध्ये आलेल्या एन्फ्ल्यूएंझा साथीत माणिकरावांनी दिलेल्या औषधी गोळ्या खूप उपयोगी पडल्या.

इ.स.१९२७ मध्ये बडोद्यात निर्माण झालेल्या भयानक पूरस्थितीत माणिकरावांनी अनेक पूरग्रस्तांना वाचवून व्यायाम मंदिरात आश्रय दिला. त्यांच्याकडे अस्थिसंधनाचे अद्भुत ज्ञान होते, ज्याचे अनेक डॉक्टरांना कौतुक वाटे. डॉक्टरांनी हात टेकलेल्या हजारो दुखापतग्रस्तांवर विनामूल्य उपचार केले. त्यांना अनेक प्रकारच्या आयुर्वेदिक वनौषधींचे ज्ञान होते. इ.स. १९१९ मध्ये पहिल्या महायुद्धानंतर मानमोडी आजारात अनेकांचे प्राण जाऊ लागले त्यावेळी माणिकरावांनी तयार केलेल्या औषधाने अनेकांचा जीव वाचला. इ.स.१९२५ मध्ये पॅरिस येथील ऑलिम्पिक स्पर्धेत बडोद्याच्या खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यावेळी लाठी व लेझीम पथकाने सगळ्यांची वाहवा मिळवली होती. त्याची दखल जगातील नामांकित वर्तमानपत्रातून घेतली गेली. हे पथक

माणिकरावांच्या आखाड्यात तयार झाले होते. जागतिक स्तरावरील अनेक अभ्यासकांनी माणिकरावांच्या शारीरिक शिक्षणातील व्यायाम प्रकार, खेळ व स्वसंरक्षणाचे डावपेच हे खूपच प्रभावी असल्याचे मत व्यक्त केले आहे.

व्यायाम प्रसारासाठी त्यांनी विविध भाषांत अनेक पुस्तके लिहिली. 'बोधपत्रक', 'संघव्यायाम', 'पहिलवान व कुस्त्यांचे नियम', 'शस्त्र व प्रतापशस्त्रागार' अशी अनेक पुस्तके सयाजीराव महाराजांच्या प्रोत्साहनामुळे लिहिली. नवजीवन या गांधीजींच्या पत्रामध्ये त्यांचे क्रमश: लेख प्रसिद्ध झाले होते.

बडोद्यातील जुम्मादादा व्यायाम मंदिर हे भारतातील क्रांतिकारकांचे आश्रयस्थान होते. त्यास सयाजीराव महाराजांचा पाठिंबा होता. भारतीय क्रांतिकारकांचे अनेक कट या व्यायाम मंदिरात शिजले. त्यामुळे अनेकदा संशय येऊन इंग्रजी अधिकाऱ्यांचे छापे पडले; परंतु महाराज आणि माणिकराव यांच्या चाणाक्षपणामुळे प्रत्येक वेळी बचाव होत गेला. एकाअर्थी सयाजीराव महाराजांचा भारतीय स्वातंत्र्याचा लढा माणिकरावांनी सुरू ठेवला. स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्या क्रांतिकारी देशभक्तांना सयाजीराव महाराज आणि प्रो. माणिकराव यांनी मनापासून सहकार्य केले.

माणिकरावांचे हिंदुस्थानातील समकालीन सर्व महान व्यक्तींशी चांगले संबंध होते. त्यांनी जुम्मादादा व्यायाम शाळेत महात्मा गांधी, पंडित मदनमोहन मालवीय, सरोजिनी नायडू, रवींद्रनाथ टागोर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांची व्याख्याने आयोजित केली. बडोद्यातील शारीरिक शिक्षण, अनेक प्रकारचे खेळ, प्रतापशस्त्रागाराची निर्मिती, जुम्मादादा व्यायाम मंदिर, महिलांचे शारीरिक शिक्षण, क्रांतिकारकांना मदत आणि आश्रय, साहित्य लेखन, कवायतींमधील सूचनांचे हिंदीत भाषांतर, अशी विविध प्रकारची महत्तम कामे केली. इ.स. १९३२ मध्ये नाशिक येथे भरलेल्या अखिल भारतीय शारीरिक शिक्षण मंडळ अधिवेशनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती. कलकत्ता येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी यांच्या संरक्षणाची जबाबदारी प्रो. माणिकरावांवर होती. माणिकरावांचे सहायक सुभाषचंद्र बोस होते. सयाजीराव महाराज त्यांचा 'तळपती तलावर' असा उल्लेख करत. त्यांच्या अनमोल कार्यामुळे महाराजा सयाजीराव यांनी माणिकरावांना 'राजरत्न' हा किताब दिला.

कीर्तीमंदिरात फक्त राजवाड्यातील लोकांचे अंतिम संस्कार केले जात असत; परंतु माणिकरावांचे राजघराण्याशी असणारे दृढसंबंध आणि जवळीकता यामुळे त्यांचे अंतिम संस्कार कीर्तीमंदिरात केले. याबाबतीत प्रो. माणिकराव एकमेव अपवाद ठरले.

महाराजांनी बडोदा राज्यातील तसेच राज्याबाहेरील अनेक समाजधुरीण, महनीय व्यक्तींना मदत केली. या सर्वांचीच माहिती देणे विस्तारभयास्तव योग्य नाही. पुढे फक्त व्यक्ती आणि त्यांना केलेली मदत यांची यादी दिली आहे.

### पहिल्या महायुद्धात केलेली मदत

१) लॉर्ड व्हाईसरॉय वेलिंग्टन यांच्या पत्नीला (लेडी वेलिंग्टन) यांना युद्ध मदत म्हणून ६०,००० रुपये दिले.

२) लॉर्ड हार्डिंग यांना विमान खरेदीसाठी ५,००,००० (पाच लाख) रुपये दिले.

३) युद्ध संपत नाही तोपर्यंत इंग्रज सरकारला प्रती महिना १२,००० रुपये मदत दिली.

४) फोर्ड व्हॅनसाठी १,५०,०००(दिड लाख) रुपये दिले.

५) युद्धातील जखमी सैनिकांसाठी काम करणाऱ्यारेड क्रॉस सोसायटीसाठी ४०,००० रुपये दिले.

६) प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या युद्ध मदतीसाठी ३०,००० रुपये दिले.

७) बडोद्याचे रेसिडेंट यांच्या मुलीने चालवलेल्या युद्ध मदतनिधीसाठी ४,००० रुपये दिले.

८) सयाजीराव महाराजांनी एकंदर पहिल्या महायुद्धासाठी केलेली मदत ४०,००,००० (चाळीस लाख रुपये) होती. *(Gaekwad Fatesinghrao, 1989, p. 286.)*

### पुतळे किंवा स्मारक उभारण्यासाठी मदत

सयाजीराव महाराज ज्या व्यक्तींनी आपल्या आयुष्यात अफाट कर्तृत्व करून ठेवले त्यांच्याबद्दल नेहमीच आदर ठेवत. ‘थोर महापुरुषांचे गुणस्मरण करणे हे एक महत्कार्य आहे.’ असे एका भाषणात बोलताना त्यांनी विचार व्यक्त केले होते. अशा थोर पुरुषांचा आदर्श विचार घेऊन नवीन पिढीने मार्गक्रमण करायला पाहिजे असे ते नेहमी म्हणत. अशा व्यक्तींच्या आठवणी जागवण्यासाठी जी पुढील पिढी प्रयत्न करत असे त्यांना महाराज मदत करत. महाराजांनी अशा स्मारकफंडासाठी लाखो रुपये दान केले.

अशा महनीय व्यक्तींची चरित्रे लिहिली पाहिजेत यावरही त्यांनी भर दिला. अनेकांची चरित्रे जाणकार व्यक्तींकडून लिहून घेतली. त्यासाठी चरित्रकारांना मदत केली. चरित्र हा महाराजांच्या आवडीचा प्रांत होता. त्याबद्दलचे विचार त्यांनी भाषणातून व्यक्त केले. तरुणांमध्ये राष्ट्रभक्ती, देशप्रेम जागृत व्हावे आणि स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा यासाठी काय वाचावे याबद्दल महाराज म्हणतात, ‘आजच्या तरुणांना अत्यंत स्फूर्तीदायक असे कोणते वाङ्मय असेल तर ते थोर महात्म्यांची चरित्रे हेच होय व हे आजच्या तरुणांचे वैशिष्ट्य लक्षात ठेवून तुम्ही आपला वाङ्मय संसार थाटत चला. ‘थोर महात्मे’ या माझ्या शब्दाचा अर्थ ‘अलौकिक पुरुष’ असा संकुचित नाही. ज्या-ज्या स्त्रीपुरुषांनी आपल्या कुटुंबाचे, शेजाऱ्याचे, जातीचे किंवा राष्ट्राचे कल्याण होईल, असाच आपला जीवनक्रम ठेवला त्या सर्व स्त्रीपुरुषांची चरित्रे, माझ्या मते, स्फूर्तीप्रद असतात.’ *(भाषण क्र. ७७)*. तरुणांना प्रेरणा देणारी चरित्रे वाचावयास दिली पाहिजेत असा विचार त्यांनी मांडला; परंतु ती चरित्रे वाचनास देताना सामान्य वाचकास जवळची वाटली पाहिजेत. अनेक अलौकिक, श्रेष्ठ लोकांची चरित्रे उच्च दर्जाची असली तरी त्याचे अनुकरण करणे सामान्य व्यक्तीला शक्य नसते. त्यामुळे त्यांची चरित्रे वाचनास देऊन काहीही

उपयोग होणार नाही, असे स्पष्ट मतही त्यांनी मांडले. 'अत्युत्कृष्ट राजचरित्र सामान्य वाचकाला मोठे उदात्त वाटेल, वंदनीय वाटेल; पण अनुकरणीय वाटणार नाही. कारण परिस्थितीच्या भिन्नत्वामुळे अनुकरण करणे मुळीच शक्यच नसते. ...एरवी सामान्य, पण नेटाने काम करून इतर चारचौघांपेक्षा अंमळ डोके वर काढणारे, असेच चरित्रनायक तरुण वाचकांना आवडतात व परवडतात. अचाट शक्तीचे अलौकिक महात्मे त्यांना तितके प्रिय किंवा उपयुक्त वाटत नाहीत.' *(भाषण क्र. ७७)*. समाजातील सामान्य व्यक्तीने संधीचे सोने करत, समाजाचे किंवा राष्ट्राचे हित साधले त्या असामान्य चरित्रनायकांची चरित्रे सामान्य व्यक्तींना वाचावयास दिली पाहिजेत. ती चरित्रे राजांच्या, देवदेवतांच्या चरित्रांपेक्षा वाचनीय, अनुकरणीय आणि वंदनीय असतात. थोडक्यात, तरुणांना वाचावयास देण्यात येणाऱ्या चरित्रांचे नायक हे स्वतःच्या कर्तृत्वाने, कष्टाने पुढे गेलेले असावेत असे त्यांना वाटत होते. त्यांना वाचनाची प्रक्रिया ही बदल घडवणारी हवी होती. त्याबद्दल त्यांनी विविध लोकांना लिहिलेल्या पत्रांतूनही विचार मांडले.

अशा दृष्टिकोनातून महाराजांनी थोर व्यक्तींच्या स्मृती जागवण्यासाठी मोठी आर्थिक मदत केली. त्यात प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यासाठी सर एफ.ई. वाच्छा यांच्याकडे खानगीतून ३०,००० रुपये दिले. *(जोशी, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-२, १९३३, पृ. ४५२)*. सयाजीराव महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांना आपला आदर्श मानले होते. शिवाजी महाराजांच्या राज्य निर्मितीचा, त्यांच्या प्रशासकीय कौशल्याचा अभ्यास त्यांनी केलेला होता. त्याची प्रचीती त्यांच्या राज्यकारभारातील प्रशासकीय कौशल्यातून येते. शिवाजी महाराजांविषयीच्या भाषणात ते म्हणाले, 'काळ कितीही बंडाळीचा व धामधुमीचा असला, तरी राजाला न्यायनीतीने वागणे शक्य असते. अपराधी असलेल्या पोटच्या पोरालाही न्यायनिष्ठुरतेने शिक्षा करण्याचे कर्तव्य राजाला पार पाडता येते. खासगी आयुष्यात तो धुतल्या तांदळासारखा शुद्ध राहू शकतो. जोडीदाराशी उदार दिलदारीने वागू शकतो, जाज्वल्य धर्मनिष्ठ राहूनही परधर्मसहिष्णू व प्रजावत्सल होऊ शकतो आणि स्वाऱ्या-लढायांतून थोडी उसंत मिळताच शेतकरी व खेडवळ लोकांच्या हक्कांचे संरक्षण जागरूकतेने करू शकतो. या सर्व गोष्टी शिवाजी महाराजांनी जगाच्या नजरेस आणून दिल्या.' *(भाषण क्र. १८४)*. आपल्या संस्कृतीचा, संस्कृतीमधील आदर्श बाबींचा सयाजीराव महाराजांना अभिमान वाटत होता. त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडावे असे त्यांना वाटत होते. त्याबद्दलचे उल्लेख त्यांनी भाषणांतून, लेखातून आणि पत्रांतूनही अनेक वेळा केले.

सयाजीराव महाराजांनी अशा थोर पुरुषांच्या स्मारकासाठी मदत केली. यामध्ये दलपतराम डायाभाई, काजीसाहेब, स.ज. मूर, लॉर्ड रे, महाराणी व्हिक्टोरिया, इलियट, जमनाबाई, लॉर्ड हॅरिस, न्यायमूर्ती रानडे, जमशेटजी टाटा, एडवर्ड बादशाह, मिंटो, सेंट जॉन्स ॲम्बुलन्स फंड, दादाभाई नौरोजी, सर जॉर्ज वर्डवुड, विलिंग्डन, मसाणी, राजा राममोहन रॉय, मराठा युद्ध स्मारक, शाहू स्मारक, सर प्रतापिंसग या आणि अशा अनेक लोकांच्या स्मारकफंडासाठी महाराजांनी मदत केली आहे. (याची सविस्तर यादी पुढे दिली आहे.)

अनेक व्यक्तींना समाजोपयोगी कामासाठी महाराजांनी लाखो रुपयांची मदत केली. त्यामधील काही व्यक्ती आणि त्यांना दिलेल्या मदतीची यादी पुढे दिली आहे.

## खासगी निधीतून व्यक्तिगत मदत

१) सर रिचर्ड मिड, ब्रिटिश व देशी फौजास करमणुकीसाठी २,००० रुपये. (इ.स. १८७५)

२) सर रिचर्ड मिड, अहमदाबाद जलप्रलय संकटनिवारणार्थ ३,००० रुपये. (इ.स. १८७५)

३) सेक्रेटरी, अजबखाना पुणे ३०० रुपये. (इ.स. १८७५)

४) सेक्रेटरी, अजबखाना पुणे ३०० रुपये. (इ.स. १८७६)

५) सेक्रेटरी, पशुक्लेशनिवारक मंडळी २०० रुपये. (इ.स. १८७७)

६) प्रो. मोनियर विलियम्स, सेक्रेटरी ऑक्स्फर्ड येथे इंडियन इन्स्टिट्यूट बांधणे २,५०० रुपये. (इ.स. १८७९)

७) रे. मि. फॉक्स, पुणे लष्करात मेथॉडिस्ट एपिस्कोपल प्रार्थना मंदिर बांधणे ९५० रुपये. (इ.स. १८८०)

८) मि.मेलविल, काबूल वेढ्यात मयत झालेल्या शिपायांच्या वारसांस देण्याकरिता १०,००० रुपये. (इ.स. १८८०)

९) सेक्रेटरी, पुणे विश्रामबाग वाड्याचा जीर्णोद्धार १,५०० रुपये. (इ.स. १८८०)

१०) लेडी सुपीरियरेस, माजगाव कान्व्हेंट व सेंट एलिझाबेथ विधवाश्रमास मदत ५०० रुपये, (इ.स. १८८३)

११) एजंट, ग.ज. बडोदे, बडोद्यास रोमन कॅथॉ. प्रार्थना मंदिर बांधणे १,००० रुपये. (इ.स. १८८४)

१२) एजंट, ग.ज. बडोदे, मुंबई आंतरराष्ट्रीय प्रदर्शनास मदत २५,००० रुपये. (इ.स. १८८४)

१३) एजंट, ग.ज. बडोदे, नडियाद कृषी प्रदर्शन १,००० रुपये. (इ.स. १८८५)

१४) चेअरमन, वांद्रा, म्युनि. वांद्रे येथे धमार्थ दवाखाना बांधणे १,००० रुपये. (इ.स. १८८५)

१५) शंकर पाडुरंग पंडित, पुणे फीमेल हायस्कुलातील मुलींस छात्रवृत्ती देण्यासाठी ६,००० रुपये. (इ.स. १८८५)

१६) ए.ग. जनरल, बडोदे, स्त्रियांच्या आरोग्यासाठी उभारलेल्या काउंटेस ऑफ डफरीनफंडास १०,००० रुपये. (इ.स. १८८५)

१७) शेवंतीबाई, मुंबई यांना खालच्या कुलाब्यात शाळा काढण्यासाठी ४,००० रुपये. (इ.स. १८८५)

१८) सेक्रेटरी, दलपतराम डायाभाई स्मारकफंड १,००० रुपये. (इ.स. १८८५)

१९) सेक्रेटरी, काजीसाहेब स्मारकफंड १,००० रुपये. (इ.स. १८८८)

२०) सेक्रेटरी, स. ज. मूर स्मारकफंड ५०० रुपये. (इ.स. १८८८)

२१) अध्यक्ष, वैतरणा संकटनिवारणफंड १,२०० रुपये. (इ.स. १८८८)

२२) ए.ग. जनरल, बडोदे, मुंबई येथे थेराप्युटिक्सच्या अध्यापकांचा ३ वर्षांचा पगार ६००० रुपये. (इ.स. १८८९ )
२३) ए.ग. सुरत, अग्निसंकटनिवारणार्थ ५००० रुपये. (इ.स. १८८९)
२४) डॉ. रा.गो. भांडारकर यांच्या शाळेस १५० रुपये. (इ.स. १८८९)
२५) भाऊबुवा नागपूरकर बडोदे, रघुपतीबुवांच्या देवळाचा जीर्णोद्धार ३०० रुपये. (इ.स. १८९०)
२६) नागेश वि. बापट, मोफत शाळेस मदत १०० रुपये. (इ.स. १८९०)
२७) नौरोजी वाडिया, लॉर्ड रे स्मारकफंड १,००० रुपये. (इ.स. १८९०)
२८) शेट शिवजी नथू, मुंबई, घेलाभाई हरिदास इंटरटेन्मेंटफंड ३०० रुपये. (इ.स. १८९६)
२९) ए.ग. जनरल, बडोदे, दुष्काळ निवारणफंडास ८,००० रुपये. (इ.स. १८९७)
३०) मि. पार्सन्स कलकत्ता, महाराणी व्हिक्टोरिया हीरक उत्सवफंड २,००० रुपये. (इ.स. १८९७)
३१) अकाउंटंट जनरल बडोदे, एलियट स्मारकफंड ५,००० रुपये. (इ.स. १८९९)
३२) अकाउंटंट जनरल बडोदे, जमनाबाई स्मारकफंड ५,००० रुपये. (इ.स. १८९९)
३३) लेडी जहांगीर, दुष्काळ निवारणार्थ १,६०० रुपये. (इ.स. १९००)
३४) कुमार रणजितसिंहजी भेट ७,००० रुपये. (इ.स. १९००)
३५) रा. ऐयर राणीच्या व्यापारशाळेस १,००० रुपये. (इ.स. १९००)
३६) रेसिडेंट, बडोदे महाराणी व्हिक्टोरिया स्मारकफंड १,००,००० रुपये. (इ.स. १९०१)
३७) साबाजीराव शिंदे, धारवाड, मराठा विद्यार्थ्यांना मदत ५०० रुपये. (इ.स. १९०२)
३८) सेन्ट्रल हिंदू कॉलेज, बनारस (धर्मशिक्षणाकरिता) १,००० रुपये. (इ.स. १९०१)
३९) लाला श्रीकृष्ण सेक्रेटरी (हिंदू कॉलेज, दिल्ली बक्षीस समारंभ) २,००० रुपये. (इ.स. १९०३)
४०) गो.कृ, गोखले, रानडे स्मारकफंड १००० रुपये. (इ.स. १९०४)
४१) सर वि.दा. ठाकरसी (शेतकी प्रदर्शनासाठी) ५,००० रुपये (इ.स. १९०४)
४२) मिस सोराबजी, पुणे फीमेल हायस्कूल १,००० रुपये. (इ.स. १९०४)
४३) लिंबडीचे कारभारी, मुलांस बक्षिसे वाटण्यासाठी १,५०० रुपये. (इ.स. १९०५)
४४) रेसिडेंट बडोदे, उत्तर हिंदुस्थानात धरणीकंपाने नुकसान पावलेल्यांस मदत ५,००० रुपये. (इ.स. १९०५)
४५) सेक्रेटरी, टाटा स्मारकफंड २,००० रुपये. (इ.स. १९०५)
४६) सर दिनशा पेटिट, सर फिरोजशहा मेहता यांचा पुतळा उभारण्यास १,००० रुपये. (इ.स. १९०७)
४७) सेक्रेटरी, एडवर्ड बादशाह स्मारक समिती १५,००० रुपये. (इ.स. १९१०)
४८) सेक्रेटरी, मिटो स्मारकफंड ४,५०० रुपये. (इ.स. १९१०)

४९) सेक्रेटरी, डेरागाजीखान संकट निवारण ५०० रुपये. (इ.स. १९१०)

५०) एस.सी.सेन, भेटीदाखल ५०० रुपये. (इ.स. १९१०)

५१) मि. स्पिलमन, टिटानिक बोटीवरील बुडालेल्या उतारूंच्या कुटुंबास मदत ७,५०० रुपये. (इ.स. १९१२)

५२) सय्यद महंमद, मद्रास, तुर्क स्तानातील संकटग्रस्तांना मदत १,००० रुपये. (इ.स. १९१२)

५३) सर भालचंद्र कृष्ण, कार्ले आरोग्यभवनास मदत १२,००० रुपये. (इ.स. १९१३)

५४) सर जमशेटजी, जि.मुंबई, दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांस मदत ५,५०० रुपये. (इ.स. १९१३)

५५) मा. नगरकर (शिवाजी हायस्कूल, मुंबई) १०० रुपये. (इ.स. १८९०)

५६) ए.ग.ज. बडोदे, कॉलेज आणि इस्पितळ साद्रा २,००० रुपये. (इ.स. १८९१)

५७) सेक्रेटरी, सेंट जोसेफ अनाथाश्रम ८०० रुपये. (पूर्वीपासून) (इ.स. १८९२)

५८) सेक्रेटरी (मूक विद्यालय, मुंबई) ३०० रुपये. (पूर्वीपासून) (इ.स. १८९२)

५९) श्री.कृष्णाबाई हरदासी (सज्जनगड सभामंडप बांधण्यासाठी) १०० रुपये. (इ.स. १८९२)

६०) सेक्रेटरी, व्हिक्टोरिया स्मारक ६९२१ रुपये. (इ.स. १८९२)

६१) दादाभाई नौरोजी (यांस भेटीदाखल) १५,००० रुपये. (इ.स. १८९३)

६२) ना.फाजलभाई विश्राम (लॉर्ड हॅरिस स्मारक) १,००० रुपये. (इ.स. १८९३)

६३) मिस सोराबजी (फिमेल हायस्कूल, पुणे) १,००० रुपये. (इ.स. १९०४)

६४) न्या. चंदावरकर (हिंदू स्त्रियांच्या शिक्षणासाठी) १,००००० रुपये. (इ.स. १९०९)

६५) सर दिनशा वाच्छा, दादाभाई स्मारकफंड ५,००० रुपये. (इ.स. १९१७)

६६) सर दिनशा वाच्छा, महायुद्धाप्रीत्यर्थ देणग्या ३०० रुपये. (इ.स. १९१८)

६७) सर जॉर्ज वर्डवुड स्मारक १,३२९ रुपये. (इ.स. १९१८)

६८) विलिंग्डन स्मारकफंड २,००० रुपये. (इ.स. १९१८)

६९) प्रो.त्रिवेदी बडोदे, मसाणी स्मारकफंड १,१०० रुपये. (इ.स. १९२१)

७०) माधवराव जाधव, ग्रामपुस्तक मंदिर पिंरचे २०० रुपये. (इ.स. १९२२)

७१) ना.सर भूपेंद्रनाथ, राजा राममोहन रॉय स्मारक हॉलसाठी ५,००० रुपये. (इ.स. १९२२)

७२) मि. कॅडेल, मराठा युद्धस्मारक ५,००० रुपये. (इ.स. १९२२)

७३) विद्याधिकारी बडोदे, शालांत छात्रवृत्त्यासाठी १,००,००० रुपये. (इ.स. १९२२)

७४) सर एफ.वाच्छा, श्री. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याकरिता ३०,००० रुपये. (इ.स. १९२२)

७५) देवासचे महाराज थोरली पाती, शाहू स्मारकफंड ६,००० रुपये. (इ.स. १९२३)

७६) नेक ना. व्हाईसरॉय, जपान संकटनिवारणफंड ५,००० रुपये. (इ.स. १९२३)

७७) हार्वर्ड विद्यापीठातील वैद्यक विद्यार्थ्यांसाठी कै. राजपुत्र श्री. जयसिंह यांचे नावे ७,५०० रुपये. (इ.स. १९२३)

७८) कमिशनर तेहरीगढवाल, बदरीनाथ-केदारनाथ रस्त्यावर सदावर्ते घालण्यासाठी २,००० रुपये. (इ.स. १९२३)

७९) के.टी. पाल कलकत्ता, हिंदी पहेलवान युरोपात पाठविण्याच्याफंडास १,००० रुपये. (इ.स. १९२४)

८०) अध्यक्ष, कोचीन जलसंकट निवारणफंड ३०० रुपये. (इ.स. १९२४)

८१) रा. साबावाला, दक्षिण जलसंकट निवारणफंड ३००० रुपये. (इ.स. १९२४)

८२) हि.चे. सेनापती, सर प्रतापिंसग स्मारकफंड ५००० रुपये. (इ.स. १९२४)

८३) चिं. वि. वैद्य, शाळेतील मुलांस खाऊस १०९६ रुपये. (इ.स. १९२५)

८४) सेक्रेटरी, शाळेतील मुलांस खाऊस २७३ रुपये. (इ.स. १९२५)

८५) डॉ. बम्पस, अमेरिका (हार्वर्ड विद्यापीठातील वैद्यक विद्यार्थ्यांसाठी कै. राजपुत्र जयसिंह यांच्या नावे) ७,५०० रुपये. (इ.स. १९२३)

### सयाजीराव महाराजांची राजदरबारातून व्यक्तिगत मदत

१) काझी शहाबुद्दीन यांना निवृत्तीच्या वेळी दरबार भारावून पोशाख दिला. (८ ऑगस्ट १८८६)

२) बाजीराव सर्जेराव घाडगे यांना बहुमान पोशाख, चांदीची छडी वगैरे दिली. (इ.स. १८८६)

३) बाबुराव भिकाजीराव गायकवाड यास पोशाख, पालखी, छत्री, मशाल वगैरे दिले. (इ.स. १८८६)

४) बाबुराव गायकवाड यांस पालखी, छडी व पोशाखाचा बहुमान दिला. (२६ जानेवारी १८८७)

५) दिवाण बहाद्दूर लक्ष्मण जगन्नाथ हे दिवाणगिरीतून मुक्त झाल्याने उमरठ येथे त्यांस बहुमान पोशाख दिला. त्यांना रोकड रक्कम बांधून दिली. (इ.स. १८९०)

६) पांडुरंगराव बळवंतराव माने यांस छत्री, मशालीचा बहुमान व रु. १२० ची नेमणूक दिली. (०३ फेब्रुवारी १९९२)

७) सयाजीराव महाराजांनी वि.का. राजवाडे यांच्या 'भाषांतर' मासिकाच्या प्रती दरसाल विकत घेण्यासाठी हुजूर हुकूम काढला. ( इ.स. १८९५)

८) विजयादशमी दिवशी डॉ. समसुद्दीन व मानकरी महिपतराव फडतरे यांना छत्री, मशालीचे बहुमान रुपये १,८९६ (प्रत्येकी) दिले. (इ.स. १८९६)

९) आठल्ये, महाराजांचे नोकर यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलास ७५ रुपये महिना शिष्यवृत्ती दिली. (इ.स. १८९३)

१०) डॉ. बटूकराव यांस छत्री, मशालीचा बहुमान व सालीना नेमणूक रुपये १,३२० दिले. (इ.स. १८९६)

११) महाराणी व्हिक्टोरिया यांच्या स्मारकफंडाचे आश्रयदाते महाराज झाले.

१२) महाराज साहेब यांनी ‘National Indian Memorial’ फंडाला रुपये ८०,००० दिले.

१३) महाराणी चिमणाबाई यांनी ‘Lady Curzno’s Victoria Memorial Scholarship’ फंडाला रु. २०,००० दिले.

१४) ‘Bombay Victoria Memorial’ फंडाला १०,००० रुपये मिळून एकंदर व्हिक्टोरिया मेमोरियल फंडास रुपये १,१०,००० दिले.

१५) कुमार रणजितसिंह (जामनगर, क्रिकेटपटू) यांना महाराजांनी ७,००० रुपये बक्षीस म्हणून दिले. (इ.स. १९००)

१६) न्यायमूर्ती रानडे यांच्या स्मृती फंडासाठी १,००० रुपये दिले.

१७) इ.स. १९०१-०२ मध्ये दुष्काळात रामजी संतुजी आवटे यांनी लोकांना चांगली मदत केल्याने त्यांना रु. ७५ चा बहुमान दिला. (इ.स. १९०२).

१८) उखाजीराव गायकवाड यांना चांदीची छडी व बहुमान पोशाख दिला. (इ.स. १९०२)

१९) अप्पाजीराव जोत्याजीराव फाकडे यांना बहुमान पोशाख व छत्री-मशाल दिली. (इ.स.१९०२)

२०) आनंदराव पवार मानकरी यांना छत्री-मशाल व बहुमान पोशाख दिला. (इ.स. १९०२)

२१) माधवराव रामचंद्र फडणीस यांना ‘राजकार्य धुरंधर' हा किताब व पोशाख दिला.(इ.स. १९०२)

२२) आनंदराव गायकवाड सेनापती यांना ‘हिंमत बहाद्दूर’ चा किताब दिला. (इ.स. १९०२)

२३) संपतराव गायकवाड यांना हत्ती, पदक, छत्री, मशाल व अबदागीर दिला. (इ.स. १९०४)

२४) अमीर-उल-उमराव श्रीमंत नरसिंगराव घोरपडे यांस हत्ती व पदक दिले. (इ.स. १९०४)

२५) उखाजीराव गायकवाड (काका) यांना पदक दिले. (इ.स. १९०४)

२६) अवचितराव गायकवाड यांना छडी व छत्री-मशाल दिली. (इ.स. १९०४)

२७) नारायण घाडगे यांना छत्री-मशाल दिली. (इ.स. १९०४)

२८) दस्तूर दोराबजी मेहेरजी यांना छत्री-मशाल दिली. (इ.स. १९०४)

२९) बद्रीनाथ शास्त्री यांस ‘तर्क वाचस्पती’ ही पदवी व क्रमांक २ चे पदक व बहुमान पोशाख दिला. (२७ मार्च १९०५)

३०) कासममिया चाबुकस्वार यांना छत्री-मशाल दिली. (इ.स. १९०५)

३१) शेठ मगनभाई हरिभक्ती यांना ‘सुवर्णपदक व राजरत्न मंडळ’ हा किताब दिला. (इ.स. १९०७)

३२) मियागावचे ठाकूर रमणलालिंसग व गणपतराव तात्यासाहेब माने यांना रौप्य पदक व राजरत्न मंडळ हा किताब दिला. (इ.स. १९०७)

३३) आनंदराव मानकरी यांना छत्री-मशाल दिली. (इ.स. १९०७)

३४) शेट रतनजी दादाभाई टाटा यांना ‘दातारमंडळ’ सुवर्णपदक दिले. (इ.स.१९०८)

३५) वडनगरचे शेठ गोकुळदास दौलतराव यांची विधवा स्त्री शेठाणी चुनीबाई यांस ‘दातारमंडळ’ संज्ञेचा सोन्याचा चांद दिला. (इ.स. १९०८)
३६) जव्हेर लक्ष्मीचंद यांना ‘राजरत्नमंडळ’ संज्ञेचा सोन्याचा चांद दिला. (इ.स. १९०८)
३७) शेठ नारायणभाई केशवलाल (पेटलाद) यांना ‘राजरत्नमंडळ’ संज्ञेचा सोन्याचा चांद दिला. (इ.स. १९०८)
३८) मनुभाई नंदशंकर मेहता यांस ‘राजरत्नमंडळ’ संज्ञेचे सुवर्णपदक दिले. (इ.स. १९१०)
३९) गुणाजीराव राजाबा निंबाळकर यांस ‘राजरत्नमंडळ’ संज्ञेचे सुवर्णपदक दिले. (इ.स. १९१०)
४०) महाराणीसाहेब यांच्याकडील गोप्रदानाच्या रुपये १,०५० रकमेतून २४ मार्च १९१० पासून बडोद्याचे शिलेदार व मराठे यांना विद्यावेतन सुरू केले. (इ.स. १९१०)
४१) बादशहा एडवर्ड निवर्तले. त्यांच्या अंत्यविधीच्या दिवशी गरिबांना भोजन व कपडे वाटप केले. (२० मे १९१०)
४२) सॅम्युअल व बापूसाहेब काळे यांना ‘सुवर्णपदक’ दिले. (१४ जानेवारी १९११)
४३) माधवराव गाबाजीराव गायकवाड यांना ‘हिरेजडित सुवर्णपदक’ दिले. (इ.स. १९११)
४४) खासेराव भगवंतराव जाधव यांना सुवर्णपदक दिले. (इ.स. १९११)
४५) रामचंद्र विठ्ठल घाडगे यांना चांदीचे पदक, रु. ५०० बक्षीस व तहहयात रु. २५ ची नेमणूक दिली. (इ.स. १९११)
४६) गणपतराव गायकवाड व गणेश बळवंत आंबेगावकर यांस ‘सुवर्णपदके’ दिली. (इ.स. १९१२)
४७) बाई रुक्मिणी, हिंमतलाल शिवलाल यांच्या विधवा पत्नीस ‘सुवर्णपदक’ दिले. (इ.स. १९१३)
४८) मानकरी आनंदराव वामनराव पवार यांना ‘सुवर्णपदक’ दिले. (इ.स. १९१३)
४९) भद्राण येथील जेठाभाई नारणभाई, वडनगरचे भोगीलाल चातुरभाई, बडोद्याचे वकील रामचंद्र हरी गोखले आणि लालभाई कल्याणभाई जव्हेरी यांना ‘रौप्यपदके’ देण्यात आली.(इ.स. १९१३)
५०) कॅ. भाऊसाहेब विठ्ठलराव गायकवाड यांना सोन्याचे घड्याळ व साखळी बक्षीस देण्यात आली. (इ.स. १९१३)
५१) व्ही.पी. माधवराव यांना ‘सुवर्णपदक व दिवाणगिरीची वस्त्रे’ देण्यात आली. (इ.स. १९१४)
५२) माणेकलाल सांकरलाल यांना ‘सुवर्णपदक’ दिले. (इ.स. १९१४)
५३) हरगोविंददास द्वारकादास कांटावाला यांना ‘सुवर्णपदक’ दिले. (इ.स. १९१४)
५४) शेठ बहिराम नसरवानजी सिरवाई नवसारी यांना ‘सुवर्णपदक’ दिले. (इ.स. १९१४)
५५) शेठ महमदअल्ली सरफअल्ली यांना ‘सुवर्णपदक’ दिले. (इ.स. १९१४)

५६) शेठ जमशेटजी मोरीनास यांना ‘सरदार पदवी व छत्री-मशाल’ दिले. (इ.स. १९१४)
५७) शेठ पेस्तमजी रतनजी डाबू यांना ‘दातार मंडळ’ संज्ञेचे सुवर्णपदक देण्यात आले. (इ.स. १९१५)
५८) गोविंदराव नारायणराव दळवी यांना ‘राजरत्न’ संज्ञेचे सुवर्णपदक दिले. (इ.स. १९१५)
५९) छत्री, मशाल, पालखी, म्याना, चवरी, अबदागीर व सोन्याची छडी, या प्रमाणे राजपुत्रास सन्मान देण्यात आला. (१२ डिसेंबर १९१६)
६०) रा. वणीकर यांना ‘अरुणादित्य’ संज्ञेचे सुवर्णपदक दिले. (१५ नोव्हेंबर १९१७)
६१) गुढीपाडव्याच्या दरबारात गोविंदभाई हाथीभाई आणि दातार यांना ‘राजरत्न’ सुवर्णपदके दिली. (इ.स. १९१८)
६२) नवसारीचे रतनजी शापुरजी टाटा, भाद्राणचे तुळशीभाई बकोरभाई आणि पट्टणचे विठ्ठलदास चतुर्भुज यांना ‘दातारमंडळ’ ही सुवर्णपदके, छत्री मशाल व अमीन हा हुद्दा दिला. (इ.स. १९१८)
६३) सरदार नरसिंगराव राजे घोरपडे यांस सुवर्णाचा तोडा व लालभाई कल्याणभाई जव्हेरी यांना छत्री-मशाल दिली. (इ.स. १९१८)
६४) वाढदिवसाच्या दरबारात पेटलादचे शेठ रमणलाल केशवलाल व द्वारकेचे शेठ सुंदरराव पदमसी यांना ‘दातारमंडळ’ सुवर्णपदक दिले. (इ.स. १९१९)
६५) शेठ पुरुषोत्तम मावजी यांना ‘राजरत्न’ सुवर्णपदक दिले. (इ.स. १९१९)
६६) हरगोविंद शामजी व देवनंद रामजी यांना ‘राजरत्न’ या संज्ञेचे ब्राँझपदक दिले. (इ.स. १९१९)
६७) रणछोडदास चक्का आणि भगवान अमरिंसग यांना बहुमान पोशाख दिला. (इ.स. १९१९)
६८) श्रीमंत धैर्यशीलराव यांना ‘राजवल्लभ’ या संज्ञेचे सुवर्णपदक, छत्री, मशाल, पालखी, जिलीब वगैरे दिली. (इ.स. १९२२)
६९) सी.एन. सेडन यांना ‘उदयादित्य’ सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२२)
७०) जी.बी. आंबेगावकर यांना ‘अरुणादित्य’ सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२२)
७१) गुणाजीराव निंबाळकर यांना ‘अरुणादित्य’ सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२२)
७२) शेठ निहालचंद लल्लूभाई पट्टण यांना ‘दातार मंडळ’ संज्ञेचे सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२२) (पट्टण या ठिकाणी सर्व सुविधायुक्त हॉस्पिटल उघडण्यासाठी शेठ निहालचंद लल्लूभाई यांनी १,४१,००० रुपये दिले होते.)
७३) शेठ उजमसी पितांबर यांनी पट्टण या ठिकाणी आयुर्वेदिक शाळा उघडल्याबद्दल ‘सुवर्णपदक’ दिले. (इ.स. १९२२) (शेठ उजमसी पितांबर शाळा उघडण्यासाठी १,००००० रुपये दिले होते.)

७४) अमीन तुळशीभाई बकोरभाई यांना छत्री, मशाल व पोशाख दिला आणि ९६ रुपयांचे वर्षासन सुरू केले. (इ.स. १९२२)

७५) वकील गुणवंतराव गिरधरलाल, बेचरभाई रणछोडभाई सरार, सामंत विरमाळ कोडीनार व जामदार तात्याबा फडतरे यांना 'राजरत्नमंडळ' सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२२)

७६) काजी अब्दुल लतीफ यांना एका महिन्याचा पगार बक्षीस दिला. (इ.स. १९२२)

७७) फ्रेडिलीस यांना एक पगार व पोशाख बक्षीस दिला. (इ.स. १९२२)

७८) व्ही.आर. तळवळकर यांना एक पगार व पोशाख बक्षीस दिला. (इ.स. १९२२)

७९) मेजर भाऊसाहेब गायकवाड यांना 'राजरत्न' सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२२)

८०) गणपतराव हनुमंतराव पवार आणि कप्तान नरहरराव यादवराव काळे यांना सोनेरी घड्याळ आणि चैन बक्षीस दिले. (कडी प्रांतातील चोरीच्या डाका प्रसंगात यांनी चांगली कामगिरी बजावल्याबद्दल हे सन्मान देण्यात आले.) (इ.स. १९२३)

८१) गोविंदभाई हाथीभाई देसाई यांना 'अरुणादित्य' संज्ञेचे सुवर्णपदक आणि पोशाख दिला. (इ.स. १९२४)

८२) रावजी रघुनाथ शिरगावकर यांना 'राजरत्न' संज्ञेचे सुवर्णपदक आणि पोशाख दिला. (इ.स. १९२४)

८३) मोतीलाल छोटाभाई देसाई यांना 'राजरत्न' संज्ञेचे सुवर्णपदक आणि पोशाख दिला. (इ.स. १९२४)

८४) शेठ मगनलाल प्रभुदास यांना 'राजरत्न' संज्ञेचे सुवर्णपदक आणि पोशाख दिला.(इ.स. १९२४)

८५) व्रजभाई वाघजीभाई पटेल यांना 'राजरत्न' संज्ञेचे रौप्यपदक दिले. (इ.स. १९२४)

८६) डॉ. राधाकृष्ण मुखर्जी (एम.ए.पीएच.डी.) यांना १,००० रुपये बक्षीस आणि १,२०० रुपये वर्षासन (भारतीय इतिहास लेखनातील योगदान) इ.स. १९२५-२६ सालापासून सुरू केले.

८७) व्ही.टी. कृष्णम्माचारी यांना 'उदयमंडल' संज्ञेचे सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२६-२७)

८८) आनंदराव पांढरे (कोंदाव, सोलापूर) 'राजवल्लभ' सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२६-२७)

८९) झवेरी मगनलाल मोहनलाल (बरोडा) यांना 'दातारमंडळ' सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२६-२७)

९०) डॉ. रामचंद्र नारायणराव जाधव (रत्नागिरी) यांना 'राजरत्नमंडळ' सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२६-२७)

९१) दिनशा रतनजी डबू (नवसारी) यांना 'राजरत्नमंडळ' सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२६-२७)

९२) माणेकलाल अंबादास डॉक्टर (बडोदा) यांना 'राजरत्नमंडळ' सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२६-२७)

९३) मि. बापूभाई हिराभाई वैद्य (बडोदा) यांना ‘राजरत्नमंडळ’ सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२६-२७)

९४) शंकरभाई पुरुषोत्तम देसाई यांना ‘राजरत्नमंडळ’ सुवर्णपदक दिले. (इ.स. १९२६-२७)

९५) के. नटराजन यांना १,००० रुपये बक्षीस आणि १,२०० रुपये वर्षासन (समाजसेवेसाठी) इ.स. १९३०-३१ सालापासून सुरू केले.

९६) सर राधाकृष्णन (M.A.PH.D., vice-chancellor आंध्रप्रदेश, विद्यापीठ) यांची गोल्डन ज्युबली कार्यक्रमातील भाषणासाठी निवड झाली.

९७) सी.व्ही. रमण यांना बक्षीस म्हणून ५,००० रुपये दिले.

९८) डॉ. सर शफी अहमदखान (प्राध्यापक, अहमदाबाद विद्यापीठ) यांना बक्षीस १,००० रुपये आणि वर्षासन १२०० रुपये, इ.स. १९३६-३७ सालापासून सुरू केले.

९९) डॉ. नीलकंठराव राणे यांच्या वैद्यकीय शिक्षणासाठी बडोदा सरकारमधून १६,००० रुपये खर्च करण्यात आले *(वार्षिक अहवाल, डेक्कन मराठा एज्युकेशन अहवाल, १९३४-३५ पृ. ७७).*

१००) प्रो. सिल्व्हाया यांच्या संस्कृत साहित्य संवर्धन संस्थेला ३,००० रुपये दिले.

वैयक्तिक मदतीच्या वेगळया नोंदी

१) नामदार गोपालकृष्ण गोखले वेल्वी कमिशनसमोर भारताची बाजू मांडण्यासाठी इंग्लंडला जाणार होते. त्यांच्या प्रवास खर्चासाठी २५०० रुपये सयाजीराव महाराजांनी दिले.

२) मणिलाल बाळाभाई नानावटी यांना व्यापार उद्योगासाठी लागणारी पुस्तके खरेदी करण्यासाठी २५० पौंड रुपये दिले. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९१९-२०, पृ.३७६.)*

३) मयत बापुमीया बाळूमीया माने यांच्या बहिणीस ३०० रुपये मदत म्हणून दिले. *(रा.स.खा. हू.झा.हू.नो., १९२२-२३, भाग-२, पृ.३८.)*

४) बापूसाहेब हांडे यांना १००० रुपये बक्षीस म्हणून दिले. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९२३-२४, भाग-२, पृ.११६, ११७.)*

५) डॉ. राधामुकुंद मुखर्जी यांना परदेशातील शिक्षण संस्थांना भेट देण्यासाठी मदत म्हणून ३००० रुपये दिले. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९२५-२६, भाग-४, पृ.५१, ५२.)*

६) दावडी गावचे केशव रंभाजी शिंदे यांना महाराजांनी खानगीतून १२ रुपये प्रती महिना विद्यावेतन दिले. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९२७-२८, भाग-३, पृ.३२७, ३२८.)*

७) राजाराम महाविद्यालय कोल्हापूर येथील शिक्षक डॉ. बाळकृष्ण यांना ‘शिवाजी' नावाचे पुस्तक लिहिण्यासाठी १,००० रुपये दिले. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९३०-३१, भाग-४, पृ.२१३, २१४.)*

८) लतीफ यांना हिंदुस्थानातील सर्व भाषेस लागू पडेल अशी लिपी तयार करण्यासाठी ५०० पौंड दिले. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९३०-३१, भाग-३, पृ.२१३, २१४.)*

९) हरी भानुदास यांना वयाचे २० वर्षांपर्यंत विद्यावेतन म्हणून वार्षिक ३०० रुपये दिले. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९३०-३१, भाग-२, पृ.५१, ५२.)*

१०) सरदार नक्षाबंदखान (अफगाणिस्थान) यांना मदत म्हणून ३०० रुपयांची देणगी दिली. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९३२-३३, भाग-३, पृ.६३, ६४.)*

११) शिल्पकार म्हात्रे यांनी तयार केलेला शिवाजी महाराजांचा पुतळा ३०,००० रुपयांना विकत घेतला. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९३२-३३, भाग-३, पृ.२९१, २९२.)*

१२) मध्यवर्ती ग्रंथालयाचे व्यवस्थापक न्यूटन मोहन दत्त यांना बक्षीस म्हणून १००० रुपये दिले. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९३३-३४, भाग-३, पृ.३३५,३३६.)*

१३) सी.एफ. अ‍ॅड्यूज यांना मदत म्हणून १५० पौंड देणगी दिली. *(रा.स.खा.हू.झा.हू.नो., १९३१-३२, भाग-२, पृ.१९,२०.)*

(टीप- रा.स.खा.हु.झा.हु.नो.- राज्यातील सर्व खात्यासंबंधाने हुजुराच्या झालेल्या हुकुमांची नोंद)

१४) सर जगदीशचंद्र बोस (कलकत्ता) यांच्या शास्त्रीय प्रयोगाची दोन व्याख्याने बडोद्यात आयोजित केली होती. त्यावेळी १,००० रुपयांचे बक्षीस आणि १,२०० रुपये विद्यावेतन तीन वर्षासाठी दिले. (इ.स. १९३३)

१५) व्हाईसरॉय विलिंग्डन यांच्या पत्नी लेडी विलिंग्डन यांना दिल्लीतील अ‍ॅम्पी थिएटरजवळील टेकडी हटवण्यासाठी आणि गर्ल्स गाईड मुव्हमेंटसाठी २५,००० रुपये दिले. (२ जुलै १९३३)

सयाजीराव महाराजांची राज्यव्यवस्था ही व्यक्तिकेंद्रित नव्हती. सर्व समाजाचा आणि त्यामधील प्रत्येक व्यक्तीचा विकास कसा होईल यासाठी महाराज नेहमी मदत करत असत. महाराजांनी ज्या व्यक्ती लोकांच्या शिक्षणासाठी, उद्धारासाठी कार्य करतात त्यांना मदत केली. त्यांच्या मदतीमुळे लाखो लोकांचे जीवनमान सुखी आणि समृद्ध झाले.

OOO

# प्रकरण १२ वे

# प्रवासातील दातृत्व

## प्रस्तावना

सयाजीराव महाराज जगप्रवासी म्हणून ओळखले जातात. राज्यकारभार हाती घेतल्यावर काही कालावधीनंतर त्यांनी जगप्रवासाला सुरूवात केली. त्याअगोदरही दत्तकविधानापासून त्यांनी अनेक वेळा राजकीय आणि इतर कारणानेही प्रवास केला; परंतु हा प्रवास देशांतर्गत होता. पुढे राज्यकारभार हाती आल्यावर पाश्चात्य देशांचा प्रवास सुरू केला. या प्रवासात प्रथम खूप मोठा लवाजमा असे. त्यामध्ये आवश्यक लोकांपेक्षा अनावश्यक लोकांचा भरणा असल्यामुळे त्यांची सोय होण्यापेक्षा गैरसोयच अधिक होत असे. पुढे हा बिनकामाचा लवाजमा त्यांनी कमी केला. त्यांना हव्या तेवढ्याच व्यक्ती ते सोबत घेतल्या. यामुळे महाराजांची पर्यायाने बडोदा संस्थानाची मोठी बचत होऊ लागली.

सयाजीराव महाराजांना प्रवासाचे महत्त्व पटले होते. त्यांनी आपल्या एका भाषणात प्रवासाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले. 'Travel in foreign countries is one of the chief sources of knowledge.' महाराजांच्या संपूर्ण आयुष्याचे निरीक्षण केले असता याची प्रचीती येते. महाराज ज्या-ज्या वेळी परदेशात जात त्यावेळी त्या देशांतील शिक्षण संस्था, संशोधन संस्था आणि एकूणच मानवी उत्कर्षासाठी झटणाऱ्या संस्था आवर्जून पाहत. त्यांचा अभ्यास करत. त्यांना शक्य नसल्यास बडोद्यातील अधिकाऱ्याला अभ्यास करण्यास सांगत. आपल्या राज्यासाठी यातून काय घेता येईल याचा विचार करत. त्याप्रमाणे त्याची संस्थानात अंमलबजावणी करत. महाराजांचे चरित्रकार वि.पां. दांडेकर यांनी याबाबतचे अतिशय सुंदर वर्णन केले आहे. 'जगात जे जे काही उच्च, न्याय व सुंदर असेल ते ते आपल्या देशात असावे असे महाराजांना वाटते. त्यांच्या कारकिर्दीकडे पाहिले असता हिच गोष्ट प्रत्ययास येते. समाज, कायदा, राज्यतंत्र व धर्मतंत्र या बाबतीत त्यांनी अग्रणी बनून ज्या सुधारणा घडवून आणिल्या त्यांचे बव्हंशी श्रेय त्यांच्या पौर्वात्य व पाश्चिमात्य देशात झालेल्या प्रवासालाच द्यावे लागेल.' महाराजांच्या प्रवासाचा फायदा त्यांच्या आरोग्यासाठी तर झालाच; परंतु त्यांनी प्रवासाचा उपयोग संस्थानच्या सुधारणेसाठी अधिक केला. यामुळे त्यांच्या राजकीय कारकिर्दीत जगप्रवासाचे महत्त्व महत्त्व अनन्यसाधारण आहे.

सयाजीराव महाराजांनी देशांतर्गत प्रवासाची सुरूवात दत्तकविधान झाल्यावर लगेच केली असली तरी परदेशात प्रवास करण्यासाठी इ.स. १८८७ साल उजाडले. त्यानंतर जागतिक महायुद्धाचा काळ वगळता त्यांनी जवळजवळ प्रत्येक वर्षी जगप्रवास केला. वर्षातील अधिकांश कालखंड त्यांनी परदेशात घालवलेला दिसतो. त्यांनी प्रत्येक वेळी मागील अनुभवाचा फायदा घेत पुढील सफरी सुलभ केल्या. परिणामस्वरूप जगातील महत्त्वाचे खंड, देश त्यांना पाहता आले. यामुळे जगाच्या तुलनेत त्यांना हिंदुस्थानची स्थिती तुलनात्मकरित्या पाहता आली. आपण कोणत्या बाबतीत मागे आहोत, त्याची कारणे, त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना यांची मीमांसा त्यांना सहजपणे करता आली.

## देशांतर्गत प्रवासातील दातृत्व

महाराजांनी संस्थानच्या वेगवेगळ्या भागांचा तसेच देशांतर्गत प्रवास केला. काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत प्रवास करताना वेगवेगळ्या ठिकाणी त्यांचा मुक्काम असे. यामध्ये त्यांनी देशातील नानाविध ठिकाणांना भेटी देताना तेथील संस्कृतीचा अभ्यास केला. महाराज पुढीलप्रमाणे चार प्रकारचे प्रवास करत.

१) आपल्या राज्यातील प्रांतांची व कारभाराची स्थिती प्रत्यक्ष पाहण्यासाठी राज्यात फिरणे.

२) उष्णतेच्या अगर प्रकृतीच्या वगैरे कारणांनी हवा फेरासाठी हिंदुस्थानात कोठे तरी पहाडी व थंड ठिकाणी जाणे.

३) विशिष्ट कामासाठी मुंबई, पुणे, कलकत्ता, दिल्ली, सिमला वगैरे ठिकाणी जाणे आणि

४) परदेशाचा प्रवास.

महाराज हे चारही प्रवास वारंवार करत. ज्या ठिकाणी महाराज राहत त्याठिकाणी असणाऱ्या समाजाची अवस्था आणि लोकांची दयनीय स्थिती त्यांच्या लक्षात आल्यावर त्या लोकांना ते मदत करत. असे देशांतर्गत प्रवास करताना त्यांना अनेक गरजवंत लोक भेट घेत. निरनिराळ्या कामांसाठी मदत मागत. महाराज अतिशय चिकित्सक होते. त्या कामाची स्वतःहून किंवा इतरांकडून माहिती करून घेत. खातरजमा करून घेत आणि नंतरच त्यांना मदत करत. महाराजांनी देशांतर्गत प्रवास करताना जी मदत केली त्या मदतीचे उल्लेख या ग्रंथात इतर ठिकाणी आले आहेत.

## जगप्रवासातील दातृत्व

सयाजीराव महाराजांनी सव्वीस वेळा जगप्रवास केला. त्या प्रवासात त्यांनी अनेक देश पाहिले. त्या देशातील गरजवतांना मदत केली. त्यातील काही नोंदी.

जगप्रवास १ (३१ मे १८८७ ते १९ फेब्रुवारी १८८८)

१) श्रीमंत उखाजीराव (काका) यांना कवळाणे येथील सहा नातेवाईकांना घरे बांधण्यासाठी ३०,००० रुपये दिले.

२) ग्रंथ खरेदी (सर्व प्रकारचे) करण्यासाठी १,५०० रुपये दिले.
३) राजवाड्यातील ग्रंथ खरेदी करण्यासाठी १ लाख रुपये दिले.
४) पाटण येथे स्थापन केलेल्या प्राच्यविद्या संस्थेसाठी संस्कृत हस्तलिखिते खरेदी करण्यासाठी ३०,००० रुपये दिले.
५) महाराणी जमनाबाई (दत्तक माता) यांना कर्ज भरण्यासाठी ५०,००० रुपये दिले.
६) मि. समर्थ यांनी महाराजांच्या पहिल्या जगप्रवासात चोख कामगिरी बजावल्याबद्दल सोन्याची अंगठी भेट दिली.
७) चांगली कामगिरी केल्याबद्दल प्रवासाचे लेखापाल सदाशिव महादेव यांना १०० रुपये बक्षीस देण्यात आले.
८) रामचंद्र धामणसकर यांना उत्कृष्ट कामाबद्दल पगारात १५० रुपयांची वाढ दिली.

जगप्रवास २ (२६ जून १८८८ ते ९ ऑक्टोबर १८८८)

देणगी दिल्याच्या नोंदी उपलब्ध नाहीत.

जगप्रवास ३ (७ मे १८९२ ते ३१ डिसेंबर १८९२)

१) मि. हेनरी (बागकामाचे माळी) यांना १५०० रुपये (ब्रिटिश) देण्यात आले.

जगप्रवास ४ ( १ मे १८९३ ते २७ ऑक्टोबर १८९३)

१) ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई १,००० रुपये दिले. (ही नोंद यापूर्वी आली आहे.)
२) आण्णा भीमराव (महाराजांचे विश्वासू अधिकारी) यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीस १२० रुपये (बाबाशाही) मदत दिली.

जगप्रवास ५ (१६ डिसेंबर १८९३ ते १९ जानेवारी १८९५)

१) राजसेवेतील एका कॉलराग्रस्त कारकुनाचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या पत्नीस दरमहा ३०० रुपये मदत सुरू केली.
२) आठल्ये यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलास महिना ७५ रुपये इतकी शिष्यवृत्ती सुरू केली.
३) या दौऱ्यादरम्यान 'ईस्ट इंडिया असोसिएशन, लंडन' या संस्थेचे उपाध्यक्ष पद स्वीकारावे अशी त्यांना विनंती करण्यात आली. महाराजांनी ती विनंती स्वीकारून भारतात परतल्यावर या संस्थेच्या कामासाठी ५० पौंडची मदत दिली.

जगप्रवास ६ (१९ मे १९०० ते ११ जानेवारी १९०१)

देणगी दिल्याच्या नोंदी उपलब्ध नाहीत.

जगप्रवास ७ (१ एप्रिल १९०५ ते १६ नोव्हेंबर १९०६)

१) क्विन व्हिक्टोरिया मेमोरियल फंडाचे महाराज उपाध्यक्ष झाले. याफंडासाठी ८०,००० रुपये दिले.
२) व्हिक्टोरिया मेमोरियल फंडातील स्कॉलरशिपसाठी २०,००० रुपये दिले.

३) पुस्तकाचे भाषांतर झाल्यावर १०० प्रती विकत घेतल्या. (पुस्तक आणि भाषांतरकाराचे नाव उपलब्ध नाही.)

४) बडोदा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वसतिगृह बांधण्यासाठी ५०,००० रुपये दिले.

५) उत्तर भारतातील भूकंप पिडीतांसाठी २,००० रुपये दिले.

६) राजघराण्याच्या भेटीच्या खर्चासाठी ५,००० रुपये दिले.

७) पॅरिसमध्ये 'सिव्हिलायझेशन इंडियान इन्स्टिट्यूट' ही संस्था कार्यरत होती. ही संस्था संस्कृत साहित्य आणि वैदिक काळातील भारतीय संस्कृती संदर्भात संशोधन करीत असे. सयाजीराव महाराजांनी या संस्थेला २,००० पौंडची मदत दिली. या रकमेतून भारतीय संस्कृतीच्या अनुषंगाने संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना, विशेषत: भारतीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात यावी अशी इच्छा व्यक्त केली.

जगप्रवास ८ - (३० मार्च १९१० ते १ डिसेंबर १९१०)

या प्रवासात बक्षिसे आणि भेटवस्तूंसाठी १५,२५२ रुपये खर्च केले.
(सविस्तर तपशील उपलब्ध नाही.)

जगप्रवास ९ (२२ एप्रिल १९११ ते १० नोव्हेंबर १९११)

या प्रवासात बक्षिसे आणि भेटवस्तूंसाठी १५,५३० रुपये खर्च केले.
(सविस्तर तपशील उपलब्ध नाही.)

जगप्रवास १० (२६ एप्रिल १९१३ ते ७ नोव्हेंबर १९१३)

१) डॉ. मेअर यांना १,२०० फँक बक्षीस म्हणून दिले.

२) या प्रवासात चांगले काम केले म्हणून चाफुर ब्रावी यांना एका महिन्याचा पगार अधिक देण्यात आला.

३) या प्रवासात चांगले काम केले म्हणून शंकर वाघ यांना ३०० रुपये आणि यमुना नावाच्या बाईला १८० रुपये दिले.

४) वरील व्यक्तींशिवाय हकिचंद बन्केर, डॉ. अरीक्राफ्ट, व्यवस्थापक सुवेत्रा हाऊस, सहव्यवस्थापक सुवेत्रा हाऊस, प्राध्यापक सिंक्तग यांना अनुक्रमे १०० पौंड, २०० फँक, १५० रुपये, १०० रुपये आणि एक सन्मान चिन्ह दिले.

५) या प्रवासात बक्षिसे आणि भेटवस्तूंसाठी १५,१४३ रुपये खर्च केले. (इतर सविस्तर तपशील उपलब्ध नाही.)

जगप्रवास ११ (१७ एप्रिल १९१४ ते ४ डिसेंबर १९१४)

या प्रवासात बक्षिसे आणि भेटवस्तूंसाठी ९,८७७ रुपये खर्च केले.
(इतर सविस्तर तपशील उपलब्ध नाही.)

जगप्रवास १२ (२२ सप्टेंबर १९१९ ते ५ फेब्रुवारी १९२१)

१) या प्रवासात बक्षिसे आणि भेटवस्तूंसाठी ३४,९९१ रुपये खर्च केले. (इतर सविस्तर तपशील उपलब्ध नाही.)

जगप्रवास १३ (२६ मार्च १९२१ ते १२ नोव्हेंबर १९२१)

देणगी दिल्याच्या नोंदी उपलब्ध नाहीत.

जगप्रवास १४ (१ एप्रिल १९२२ ते २३ नोव्हेंबर १९२३)

देणगी दिल्याच्या नोंदी उपलब्ध नाहीत.

जगप्रवास १५ (२६ एप्रिल १९२४ ते २० नोव्हेंबर १९२५)

१) बडोद्याचे अधिकारी बी.व्ही. देसाई व व्ही.बी. गुप्ते प्रथमच युरोपात आले होते. त्यांना पॅरीस पाहण्यासाठी काही रक्कम दिली. (रकमेचा तपशील उपलब्ध नाही.)

२) महाराजांनी इंग्लंड मध्ये सुप्रसिद्ध कवी लॉर्ड टेनिसन यांची 'अल्डवर्थ'ही मालमत्ता खरेदी केली होती. इंग्लंडमध्ये 'द पोयट्री सोसायटी ऑफ इंग्लंड' ही संस्था प्रतिवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी आपले वार्षिक संमेलन घेत असे. त्यांचे इ.स. १९२५ सालचे संमेलन 'अल्डवर्थ'मध्ये घेण्यास त्यांना आमंत्रित केले होते. २०० लोक या संमेलनाला उपस्थित राहिले. त्यांची सर्व व्यवस्था महाराजांनी केली.

३) परतीच्या प्रवासात जहाजावरील खेळांच्या स्पर्धांसाठी बक्षीस म्हणून १० पौंड दिले.

४) डॉ. मोडक आणि डॉ. देसाई यांचा या प्रवासात उत्कृष्ट काम केल्याबद्दल गौरव करून बक्षीस देण्यात आले. (रकमेचा तपशील उपलब्ध नाही.)

जगप्रवास १६ (१३ मार्च १९२६ ते १९ नोव्हेंबर १९२६)

देणगी दिल्याच्या नोंदी उपलब्ध नाहीत.

जगप्रवास १७ (९ एप्रिल १९२७ ते १३ जानेवारी १९२८)

१) महाराजांनी डॉ. जनरेट यांना प्रयोगशाळा बांधून दिली. या प्रयोगशाळेत महाराजांचे एक अधिकारी डॉ. प्राणलाल काम करत होते.

२) बडोद्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी खानगीतून १ लाख रुपये दिले.

३) कोपेनहॅम येथे मुकबधीर विद्यार्थ्यांना मिठाई वाटली.

४) या प्रवासात बक्षिसे देण्यासाठी १२,००० रुपये मंजूर केले होते. त्यातील ९,१२५ रुपये खर्च केले. (इतर सविस्तर तपशील उपलब्ध नाही.)

जगप्रवास १८ (इ.स. १४ एप्रिल १९२८ ते २८ डिसेंबर १९२८)

१) या प्रवासात बक्षिसे आणि भेटवस्तूंसाठी १२,००० रुपये मंजूर केले. त्यातील १०,७१८ रुपये खर्च केले. (इतर सविस्तर तपशील उपलब्ध नाही.)

जगप्रवास १९ (१६ मार्च १९२९ ते १० जानेवारी १९३०)

१) दि ला. सिव्हिलिझारिया इंडियन इन्स्टिट्यूटला २,००० पौंड देणगी दिली.

२) इंग्लंडमधील स्काऊट पथकाला २० पौंड देणगी दिली.

३) या प्रवासात बक्षिसे आणि भेटवस्तूंसाठी १२,००० रुपये मंजूर केले. प्रत्यक्षात १२,७२३ रुपये खर्च केले. (वरील दोन नोंदी सोडता इतर सविस्तर तपशील उपलब्ध नाही.)

जगप्रवास २० (१२ एप्रिल १९३० ते ९ फेब्रुवारी १९३१)

१) दि रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थची फेलोशिप अनेकांना प्रदान करण्यात आली. त्यावेळी महाराजांनी खानगी फंडातून १,००० पौंड देणगी दिली.

२) इन्स्टिट्यूट दि ला. सिव्हिलिझारिया इंडियन या संस्थेला पुन्हा या प्रवासात देणगी देण्यात आली. (रक्कम उपलब्ध नाही.)

३) मुंबई मधील एक विद्यार्थी जी.बी. म्हात्रे यांना स्थापत्यशास्त्रातील शिक्षणासाठी २० पौंड मदत दिली.

४) व्ही. माधवराव आणि भुवन मोहन हे प्रवासासाठी लंडनला आले होते. त्यांना परतीच्या प्रवासाच्या तिकिटासाठी पैसे दिले. (रक्कम उपलब्ध नाही.)

५) मंडल यांनी कलकत्ता विद्यापीठातून शिक्षण घेतले होते. हे दलित वर्गातून शिक्षण घेऊन पुढील शिक्षणासाठी लंडन येथे आले होते. त्यांना कायद्याच्या अभ्यासासाठी १२५ पौंड मदत दिली.

६) लंडन मधील 'ईस्ट इंडिया असोसिएशन'ला त्यांनी १०० पौंडाची मदत दिली. या रकमेतून 'द महाराजा गायकवाड लेक्चरफंड' सुरू करून भारतीय कला आणि संस्कृती यावर व्याख्यानमाला आयोजित करण्याचे त्यांनी सुचविले. ही रक्कम पुढील पाच वर्षे पुरवण्याचे त्यांनी नियोजन केले.

७) डॉ. लंकासुंदरम 'भारताचे आंतरराष्ट्रीय स्थान' याविषयी लंडन मध्ये अभ्यास करत होते. त्यांना याविषयावरील पुस्तक लिहिण्यासाठी ३०० पौंड मदत दिली.

८) रामचंद्रराव शामराव माने पाटील (परदेश दौऱ्यातील अधिकारी) यांनी उत्कृष्ट काम केल्याबद्दल १०० रुपयांची पगार वाढ दिली. यासोबत एक सोन्याचे घड्याळ आणि साखळी भेट दिली.

९) या प्रवासातील दुसरे अधिकारी व्ही.जी. मोदी, डॉ. चंद्रचूड आणि बाऊडेन यांना भेटवस्तू दिल्या.

१०) बर्लिन येथील जगप्रसिद्ध वैद्यशाळेला भेट दिली. डॉ.एम.एस. आर्चन होल्ड या वेधशाळेचे प्रमुख होते. महाराजांनी या 'बर्लिनट्रेपस्टोव्ह'ला २०० पौंड मदत दिली; तसेच संबंधितांच्या विनंतीला मान देऊन या संस्थेचे पालकत्वही स्वीकारले.

११) महाराजांना 'रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ, लंडन' या संस्थेने आमंत्रित केले. सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात महाराजांनी केलेल्या भरीव योगदानाचा सन्मान म्हणून

संस्थेने ‘डिप्लोमा ऑफ फेलोशिप ऑफ द इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ’ महाराजांना प्रदान केला. यावेळी संस्थेला मदत म्हणून महाराजांनी स्वत:च्या व्यक्तिगत खर्चातून १,००० पौंड इतकी रक्कम दिली.

१२) पॅरिस मध्ये मि. लुईस बर्टोला हे प्रसिद्ध शिल्पकार होते. त्यांचे कार्य पाहून महाराजांनी स्वत:चे आठ अर्धपुतळे आणि एक पूर्णाकृती पुतळा तयार करण्यास सांगितले. (यासाठी दिलेल्या रकमांचा उल्लेख नाही.)

१३) लंडनमध्ये असताना ‘ब्रिटिश स्पोर्ट्स अण्ड स्पोर्टमन’ हे प्रसिद्ध करण्यासाठी ५२५ पौंड दिले.

१४) महाराजांनी प्रो. ॲलेक्झांडर गौदनी यांना कला या विषयावर पुस्तक लिहिण्यास सांगितले. त्यासाठी आर्थिक मदत केली. पुढे हे पुस्तक हिंदीत अनुवादित करून शाळांना पुरविण्याची योजना होती. (यासाठी दिलेल्या रकमांचा उल्लेख पुढील जगप्रवासात आहे.)

१५) प्रो. सिलव्हाय लेव्ही यांच्या संस्कृत वाङ्मयाचे संवर्धन करणाऱ्या संस्थेला ३०,००० दिले.

१६) या प्रवासात बक्षीस आणि भेटवस्तूंसाठी १२,००० रुपये मंजूर केले. प्रत्यक्षात १४,०१३ रुपये खर्च केले.

जगप्रवास २१ (२३ मे १९३१ ते ५ डिसेंबर १९३२)

१) लंडनमधील ‘इंडियन स्टुडन्ट सेंट्रल असोसिएशन’ला १५० पौंड देणगी दिली.

२) महाराजांना लंडनमधील गिल्ड थिएटर मध्ये ‘पारासाईट’ हे नाटक पाहण्याचे आमंत्रण आले. हे नाटक पाहून ते प्रभावित झाले. त्यांनी ‘द स्टेज गिल्ड असोसिशन’ला १० पौंड देणगी दिली.

३) महाराजांनी न्यू मेक्सिकोच्या गव्हर्नरला १०० डॉलरची देणगी दिली. या देणगीतून काही होतकरू भारतीय हुशार तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी तरतूद करावी असे सूचित केले होते.

४) महाराजांना डॉ. निबाळकर भेटण्यास आले असता त्यांची २५० रुपये पगारावर नेमणूक केली.

५) डॉ. के.जी. दास यांना पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी १०५ पौंड दिले.

६) प्रा. अलेक्झांडर गौदनी यांना कला विषयाचे ३०० पानांचे पुस्तक लिहिण्यासाठी १,००० पौंड (३८०पौंड + ६२० पौंड) दिले. (याअगोदरच्या प्रवासात हे पुस्तक तयार करण्यास सुचवले होते.)

७) लंडनमधील भारतीय विद्यार्थी संघटनेला १५० पौंड देणगी दिली.

८) या प्रवासातील अधिकारी श्रीयुत गायकवाड यांनी उत्तम कामगिरी केल्याबद्दल सोन्याच्या बटनांचा जोड दिला.

९) दुसरे एक अधिकारी श्रीयुत गायकवाड यांनी उत्तम कामगिरी केल्याबद्दल ७ पौंड बक्षीस दिले.

१०) इतर अधिकारी कप्तान, मुख्य अभियंता, सुतार, मुख्य खानसामा, आचारी, स्वयंपाकी आणि सेवक या सर्वांना मिळून १२ पौंड दिले.

११) या प्रवासात बक्षिसे आणि भेटवस्तू देण्यासाठी २७,००० रुपये मंजूर केले होते. त्यातील १४,०१३ खर्च केले.

जगप्रवास २२ (२२ एप्रिल १९३३ ते २३ ऑक्टोबर १९३३)

१) न्यू मेक्सिको मधील तरुण भारतीय बुद्धिमान लोकांना १०० डॉलर भेट दिले.

२) या प्रवासात बक्षिसे देण्यासाठी ४,८०० मंजूर केले. प्रत्यक्षात ४,३४७ रुपये खर्च झाले. (इतर सविस्तर तपशील उपलब्ध नाही.)

जगप्रवास २३ (९ एप्रिल १९३४ ते ५ नोव्हेंबर १९३५)

१) डॉ. क्वारीच वेल्स यांनी 'द गायकवाड ऑफ बडोदा ग्रेटर इंडिया रिसर्च एक्सपिडिशन' असा प्रकल्प हाती घेतल्याचे माहिती झाल्यावर त्यांना ५०० पौंड देणगी दिली.

२) ब्राव्ही (ड्रायव्हर) यांना १,३५० लिअर भेट दिले.

३) महाराजांनी इंग्लंडमध्ये ब्रिटिश एम्पायर गेम्सला मदत म्हणून १२ पौंड देणगी दिली.

४) ऑस्टरले पार्क मधील 'इंडियन जिमखाना'ला १२५ पौंड मदत केली.

५) 'लंडन स्कूल ऑफ हायजीन अ‍ॅण्ड ट्रॉपिकल मेडिसीन' या संस्थेला ३०० पौंड देणगी दिली.

६) महाराजांनी 'हास्लेमीअर डिस्ट्रीक्ट हॉस्पिटल'ला भेट दिली. नंतर देणगीच्या स्वरूपात ४० पौंडचा चेक दिला.

७) मॅडम मोईचंत्र, गडस्टाडच्या इकोल मोन्टेसरीच्या मुख्याध्यापिका यांना १० पौंड बक्षीस दिले.

८) एका धार्मिक संस्थेला ५ गिनीचे दान दिले. (नाव उपलब्ध नाही.)

९) डॉ. सय्यद मुस्तफा अली यांना हॅरो विद्यापीठात डॉक्टरेटसाठी १०० पौंड दिले. (डॉ. सय्यद मुस्तफा अली यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतनमध्ये शिक्षण घेतले होते. ते इस्लाम धर्माचा अभ्यास करून पुन्हा डॉक्टरेट मिळवणार होते.)

१०) ओमर इस्माईल (पेटलाद तालुक्याचे रहिवासी) उद्योग करण्यासाठी इजिप्त देशात आले होते. त्यांना मदत म्हणून ४५ पौंड दिले.

११) महाराजांनी स्वतःच्या रजत मोहत्सवानिमित्त प्रजेला भेट देण्यासाठी ५०,००० रुपये दिले.

१२) हॉलंडमध्ये असताना त्यांनी 'केर्न इन्स्टिट्यूट'ला भेट दिली. या संस्थेला ४५० पौंड देणगी दिली. त्यातील ५० पौंड देणगी संस्थेला तसेच उर्वरित रक्कम आद्य काळातील

भारतीय संस्कृतीवर अभ्यास करून त्या साहित्याचे जतन करणाऱ्या ‘डच ईस्ट इंडीज गव्हर्नमेंट’ला देण्याचे सुचविले.

१३) ‘इंडियन हॉकी फेडरेशन’ला १०० पौंड देणगी दिली.

१४) इंग्लंडच्या महाराणीच्या सिल्व्हर ज्युबलीफंडासाठी त्यांनी ५०,००० रुपये देणगी दिली.

१५) लॉर्ड चाल्सम्फोर्ड यांच्या पुतळयासाठी १,००० रु. दिले.

१६) ‘ऑल इंडिया टेनिस असोसिएशन’ला २५० रुपये दिले.

१७) पॅरीसमधील ‘हर्ट फोर्ट ब्रिटिश हॉस्पिटल’ला २१ पौंड देणगी दिली.

१८) कवी यीटसच्या सहकार्याने पुरोहित स्वामी यांनी अनुवादित केलेल्या गीता या ग्रंथाला सयाजीराव महाराजांनी प्रस्तावना लिहिली. पुस्तक प्रकाशित झाल्यावर १२ प्रतींची खरेदी केली.

१९) ब्रिटिश ॲम्बेसीडर सर जॉर्ज क्लार्क यांच्या विनंतीवरून पॅरिस मधील हार्टफोर्ड ब्रिटिश हॉस्पिटलला महाराजांनी २१ पौंड देणगी दिली.

२०) या दौऱ्यात इंग्लंड मधील ‘इंडिया सोसायटी’ या संस्थेला वार्षिक १०० पौंड अशी पाच वर्षांसाठी देणगी जाहीर केली. ही मदत भारतीय कलेविषयी अधिक अभ्यास करण्यासाठी दिली.

२१) इंग्लंडमध्ये असताना त्यांनी ‘हेस्लेमेअर क्रिकेट क्लब’ला १० पौंड देणगी दिली.

२२) एम्पायर रिव्ह्यू या वृत्तपत्रासाठी २०० पौंड देणगी दिली.

२३) भारतीय समाज (इंडिया सोसायटी) ला १०० पौंडांची देणगी दिली. ही देणगी पुढील दोन वर्षांपर्यंत नियमितपणे दिली जाणार होती. पूर्वीही पाच वर्षांपासून या संस्थेला ही देणगी दिली जात होती.

२४) दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ‘कॉंग्रेस ऑफ द वल्ड फेलोशिप ऑफ फेथला’ (१९३६ साली लंडन मध्ये होणाऱ्या) देणगी स्वरूपात १०० पौंड रकमेचा चेक पाठवून दिला.

२५) पूर्वेकडून आलेल्या प्रवासी कु. खौरी यांना १० पौंड भेट दिले.

२६) वनस्पतीशास्त्रात पीएच.डी. केलेल्या डॉ. पाठक यांना १० पौंड भेट दिले. तसेच युरोप खंडात प्रवास करण्यास मदत केली. (प्रवासासाठी मदत दिलेल्या रकमेचा तपशील उपलब्ध नाही.)

२७) हेन्सल मेअर क्रिकेट क्लबला १० पौंड मदत दिली.

२८) सर्वधर्म परिषदेच्या पुढे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय सभेसाठी १०० पौंडची मदत दिली.

२९) एस.डी. साठे हे बडोद्यात अभियंता होते. ते सुटीवर युरोप दौऱ्यावर आले होते. त्यांनी सुटीवर असतानाच युरोपमधील विविध अभियांत्रिकी प्रकल्पांना भेटी दिल्या. त्यांनी महाराजांची भेट घेतल्यावर त्यांच्या या कामामुळे आनंदी होऊन महाराजांनी त्यांना

आणखी ७५ पौंडांची देणगी देत युरोपातील इतरही प्रकल्पांना भेटी देण्याचे आवाहन केले.

३०) रक्षक आणि सैनिक हेसलमेअर यांना ५ पौंड बक्षीस दिले.

३१) सर्वधर्म परिषदेचे पदाधिकारी दासगुप्ता यांना ८० पौंड भेट दिले.

३२) श्रीमंत आप्पासाहेब घोरपडे यांच्या मुलाला दरमहा २० पौंड शिष्यवृत्ती दिली. त्यांनी पुढे इंग्लंडमध्ये शिक्षण घेतले.

३३) एम.बी. पटेल यांना ४० पौंड मदत दिली.

३४) मि. पाल्मर यांनी इंग्लंडमधील घराची काळजी व्यवस्थित घेतली म्हणून ४० पौंड बक्षीस दिले.

३५) डॉ. स्टनटन कोईट हे आधुनिक समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, सोबत समाजात मूल्यांची रुजवणूक व्हावी यासाठी चळवळ उभारत होते. त्यांना महाराजांनी १०० पौंडचा चेक देऊन त्यांच्या कार्यात मदत केली.

३६) Thomas Cook and sons च्या कर्मचाऱ्यांना ९० पौंड भेट दिले.

जगप्रवास २४ (११ एप्रिल १९३६ ते २३ नोव्हेंबर १९३६)

१) के.एन. दासगुप्ता यांनी अमेरिकेत केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल ६५० डॉलरचा चेक पाठवला.

२) सर फ्रान्सिस यंगहस्बंड यांना जागतिक परिषदेच्या कामासाठी २५० गायनांचा चेक पाठवला.

३) परतीच्या प्रवासात जहाजावर विविध खेळांसाठी (फॅन्सी ड्रेस) बक्षीस म्हणून १० पौंड दिले.

जगप्रवास २५ (१५ डिसेंबर १९३६ ते २७ नोव्हेंबर १९३७)

१) 'दि स्वादेन येथील गोल्फ क्लब' दुरुस्तीसाठी २०० मार्क सची देणगी दिली.

२) कर्मवीर भाऊराव पायगोंडा पाटील, प्राचार्य, शाहू बोर्डिंग सातारा, यांना विश्वस्त निधी म्हणून ३,००० रुपये दिले आणि १,००० रुपये देणगी म्हणून दिले.

३) मिसेस एम.एल. ब्रुमफिल्ड, चेअरमन, महिला समिती रेड क्रॉस सोसायटी मुंबई यांच्याकडे १०० रुपये दिले.

४) वल्ड फेलोशिप ऑफ फेथ हॉटेल, न्यूयॉर्क २६२.१० पौंड दिले.

५) 'दि इंडिया रीफल क्लब, बिसले कॅप, बुकवूड, सरे' येथील भारतीय खेळाडूंना प्रोत्साहन म्हणून ५० पौंड दिले.

६) लेडी नायके (Noyce) यांना मुक्या मुलांच्या शाळेसाठी १०० रुपये दिले.

७) मेजर एच.ए. हेलडेरब्रॅड, सचिव, ओटकामंड रेस कोर्स, यांना घोड्याच्या प्रदर्शनासाठी १०० रुपये दिले.

८) दि रॉयल आय हॉस्पिटल, लंडन यांना १० पौंड देणगी दिली.

९) सेक्रेटरी, शिक्षकांची दुसरी परिषद, कलकत्ता यांना १०० रुपये देणगी दिली.

१०) Cecil Jones, Hon. Treasuver of Coronation Celebration fund 43 Bulevard Des Capucines Paris 20 Pond.

११) M. chille Fould, President du camile Des Drags de L Etrier 92, venue Henri Martin Paris - 300 pond.

१२) British social Hygine Council, Carteret House, Carteret Street London, S.W. 5.5. Pond

१३) मि. बेनर्ड, फग्ज डोनिंग कॉलेज बोट, केंब्रीज यांना नवीन बोट खरेदीसाठी ३० पौंड दिले.

१४) लॉर्ड रुदरफोर्ड, बरली गॉटन हाऊस, लंडन यांना १०० पौंड दिले.

१५) मुंबई आर्ट सोसायटी, मुंबई (४७व्या प्रदर्शनातील बक्षीस वितरणासाठी) २०० रुपये दिले.

१६) अध्यक्ष, फायन आर्ट सोसायटी सिमला (प्रदर्शनातील बक्षीस वितरणासाठी) २०० रुपये दिले.

१७) सेक्रेटरी, गोल्फ पेव्हेलियन विस्बेडन यांना २०० जर्मन मार्कस दिले.

१८) एस. एस. रिलायन्स यांना १०० जर्मन मार्कस दिले.

१९) हेड मोर बॉईज क्लब वल्डवस्थ कॉमन स्टेशन (चहापान) २ पौंड दिले.

२०) थॉमस कुक अँड सन्सचे प्रतिनिधी मि. रुटस यांना १० पौंड दिले.

२१) Mr. Kalidas Narottam of Harkisands and co. Omdurman Khartoum 300 Paistres.

२२) मि.जे.वाय. पांड्या (भावनगर) यांना १० पौंड दिले.

२३) मॅनेजर, जुबा हॉटेल जुबा यांना ५ पौंड दिले.

२४) असि. मॅनेजर, जुबा हॉटेल जुबा यांना १ पौंड दिले.

२५) Abdel Raman El. Barkourkey chief of Verification Bureau House of Deputies Cairo Piastres 1000.

२६) मि.सी.ई. न्युहम यांना २५० पौंड दिले.

२७) सी.एल. बोवडेन यांना ५.१५ पौंड दिले.

२८) यु.ए. जमादार यांना ५.१५ पौंड दिले.

२९) जर्मने मर्लंग, पॅरीस यांना ९१ रुपये दिले.

३०) Lahellec, पॅरीस यांना ८२ रुपये दिले.

३१) प्रो. फारबेल, पॅरीस यांना ९१ रुपये दिले.

३२) मि.सी.एन. सेडन, नॉर्थमूर, ऑक्सफर्ड रोड, (लग्नाची भेट) २० पौंड दिले.

३३) Sir Horace Rumbold, London, १६.१० पौंड भेट दिले.

३४) श्रीमती रागिणी देवी पॅरीस यांना भेटीदाखल २५ पौंड दिले.

३५) प्रतापसिंह महाराज यांचे चिरंजीव यांना बाहुल्या घेण्यासाठी ३.२ पौंड दिले.
३६) कॅप्टन एच.ओ. वुडहाउस, इम्प्रीरीयल एअरवेज लंडन, यांना ८२ पौंड दिले.
३७) आर.सी. पारकर, इम्प्रीरीयल एअरवेज लंडन, यांना ५२ पौंड दिले.
३८) आर.डी. ऐटकिन्स, वायरलेस ऑपरेटर, इम्प्रीरीयल एअरवेज लंडन, यांना ५० पौंड दिले.
३९) डेप्युटी सार्जंट, एल. जॉनसन्स, स्पेशल ब्रँच, स्कॉटलंड यार्ड यांना ५२ रुपये दिले.
४०) ए.सी. पनेल, स्पेशल ब्रँच, स्कॉटलंड यार्ड यांना ५७ रुपये दिले.
४१) डॉ. डूकेन एम. मेमीन, व्याख्याते, डरहॅम युनिर्विसटी यांना ५१ रुपये दिले.
४२) रामचंद्रराव माने पाटील यांना बक्षीस म्हणून १८५ रुपये दिले. तसेच फ्रेंच बनावटीच्या ४५० रुपये किमतीच्या दोन टोप्या भेट दिल्या.
४३) मि. पागे यांच्या मुलीला चॉकलेट आणि इतर बक्षीस घेण्यासाठी १ पौंड दिले.
४४) मि.एफ.सी. निसान यांना ५४ रुपयांची सोनेरी फ्रेम भेट दिली.
४५) कॅप्टन निट्टे, यांना ५५ रुपयांची चांदीची फ्रेम भेट दिली.
४६) एच.इ. एरिक फिप्प्स (ब्रिटिश राजदूत) यांना ८१ रुपयांची चांदीची फ्रेम भेट दिली.
४७) मि. फ्रेडी नार यांना ८१ रुपयांची चांदीची फ्रेम भेट दिली.
४८) मँडम सिल्वा यांना ७२५ फ्रेंच किमतीची लाकडी फ्रेम भेट देण्यात आली.

जगप्रवास २६ (११ मार्च १९३८ ते ३१ ऑक्टोबर १९३८)

१) घोरपडे (युवराज्ञी शांताबाई यांचे बंधू) यांना २१० पौंड किमतीची वस्तू भेट दिली.
२) राजपुतना क्रिकेट क्लब मधील सदस्यांना प्रवासी एजंटने फसवले होते. त्यामुळे त्यांना परदेशातून स्वदेशात परतण्यासाठी मदत केली. तसेच हॉटेलचे बिल भरण्यासाठी २५ पौंड दिले.
३) परदेश प्रवासात गाडीच्या चालकाला हाताची करंगळीस अपघात झाला. करंगळी नीट करण्यास १०० फँक दिले.
४) 'नाकारलेला भूतान' या चित्रपटाच्या निर्मात्यास १० पौंड बक्षीस दिले.
५) राणी व्हिक्टोरिया फंडाला २० पौंड दिले.

*(संदर्भ - महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे परदेश प्रवास रिपोर्ट -१ ते २६)*

सयाजीराव महाराज बडोदा राज्यात असोत किंवा परदेश प्रवासात दुसऱ्यांना मदत करण्यास ते नेहमी तत्पर असत. त्यामुळे अनेकांना साहाय्य मिळत असे. महाराजांचे दातृत्व कोणत्याही घटना प्रसंगात कधीही कमी झाले नाही.

OOO

# प्रकरण १३ वे

# सयाजीराव महाराजांची मार्गदर्शनपर मदत

सयाजीराव महाराजांना शिक्षणकाळापासून राज्यकारभाराचे व्यवस्थित धडे मिळाले होते. शिक्षणाच्या शेवटी आयोजित केलेल्या व्याख्यानमालेतून त्यांना राज्यकारभारासाठी मार्गदर्शन मिळाले. राज्यकारभाराच्या प्रारंभी त्यातील सूक्ष्म बाबी त्यांच्या लक्षात आल्या नसल्या तरी अनुभवाने आणि मिळालेल्या शिक्षणाने त्यांना याबद्दलची सर्वंकष माहिती मिळत गेली. त्यांनीही जाणीवपूर्वक या बाबी आत्मसात केल्या. कोणतीही नवीन गोष्ट शिकण्याअगोदर त्या बाबींच्या सकारात्मक आणि नकारात्मक बाजू पाहून महाराज त्या आत्मसात करत. शिक्षणकाळापासून विद्याव्यासंगाने महाराज स्वत: ज्ञानात भर टाकत गेले. त्यांनी विविध विषयांवरील ग्रंथ वाचनाने स्वतःचा व्यासंग वाढवला होता. महाराज नेहमी विद्वानांच्या संगतीत राहण्याचा प्रयत्न करत. त्याचबरोबर त्यांनी जगप्रवास केल्याने त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वात कमालीचा बदल झाला होता. विविध विषयांबद्दलची सखोल माहिती त्यांनी मिळवली होती.

सयाजीराव महाराजांचे दत्तकविधान झाल्यावर काही वर्षांतच बडोद्यातील अनेक ज्येष्ठ मार्गदर्शक व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यामुळे त्यांच्यावरील राज्यकारभाराचा ताण वाढला. एक राजा म्हणून महाराजांना राज्य सांभाळावे लागत होतेच, त्याचबरोबर इंग्रजांबरोबर एक संस्थानिक म्हणून, प्रशासनातील वेगवेगळ्या अधिकाऱ्यांचा प्रमुख म्हणून, संस्थानातील तंटे-बखेड्यांचा न्याय करण्यासाठी न्यायाधीश म्हणून काम पाहावे लागत होते. जगभरातील मित्रांना निरनिराळ्या कारणाने आणि प्रसंगाने मार्गदर्शन करावे लागत होते. हिंदुस्थानातील अनेक संस्थानिक महाराजांचे चांगले मित्र होते. त्यांनाही वडीलकीच्या नात्याने महाराजांनी अनेक वेळा मार्गदर्शन केले. अनेकांनी कठीण प्रसंगी त्यांच्याकडून आवर्जून मार्गदर्शन घेतले. कुटुंबातही एक कुटुंबप्रमुख म्हणून जबाबदारी त्यांना पार पाडत असताना मुलगा, पती, वडील, भाऊ, आजोबा आणि इतर नातेवाईक म्हणूनही जबाबदाऱ्या होत्याच. या सर्व जबाबदाऱ्यांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व कणखर आणि बहुविध बनत गेले. सर्व राज्याची, सर्व कुटुंबाची जबाबदारी त्यांच्या शिरावर असल्याने त्यांना अनेक वेळा मार्गदर्शन करावे लागत असे. असे मार्गदर्शन करण्याची पात्रता महाराजांनी अभ्यासाने, व्यासंगाने, अनुभवाने आणि ग्रंथ वाचनाने मिळवली होती. त्यांचे हे मार्गदर्शन आर्थिक स्वरूपात नसले तरी त्यातून समोरच्या व्यक्तीला, समाजाला त्याचा नक्कीच

फायदा होत असे. त्यामुळे मार्गदर्शन करणे यात जरी पैशांचा प्रश्न उपस्थित होत नसला तरी; हेही एक प्रकारचे महाराजांचे दातृत्वच होते.

## १) नातेवाईकांना केलेले मार्गदर्शन

कोणत्याही राज्याचा प्रमुख म्हटला म्हणजे त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संख्या निश्चितच जास्त असते. त्यामुळे त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी कुटुंबप्रमुख म्हणून त्या राजाकडे असते. अशा वेळी त्यांच्या सर्व गरजा पुरवण्याची जबाबदारी राजाची नसली तरी त्या जबाबदाऱ्यांचे उत्तरदायित्व राजावर येते. अगदी अशाच प्रकारे सयाजीराव महाराजांवर त्यांच्या मोठ्या कुटुंबाची जबाबदारी होती. राजघराण्यात मोठे बंधू आनंदराव, लहान बंधू संपतराव तसेच बडोद्यातील पूर्वीचे खंडेराव महाराजांचे, मल्हारराव महाराजांचे जवळचे नातेवाईक हेही राजकुटुंबात राहत होते. तसेच कवळाणे या त्यांच्या मूळ गावातील जवळच्या नातेवाईकांनी महाराजांना राजपद मिळताच आपल्या कुटुंबासहित बडोद्यात स्थलांतर केले होते. बडोद्यातील मूळ गायकवाड घराण्यातील नातेवाईक, कवळाणे गावातील नातेवाईक, तसेच दोन्ही महाराणींच्या माहेर कडीलही कुटुंबांनी बडोद्यात स्थलांतर केले होते. त्यामुळे बडोद्यात महाराजांचा मोठा गोतावळा जमला होता. या सर्व कुटुंबातील अनेकांना महाराजांनी त्यांच्या-त्यांच्या लायकीप्रमाणे वेगवेगळ्या पदांवरती नेमले होते. त्यातील अनेकांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवले होते. या सर्व सदस्यांचा महाराज संस्थानच्या राज्यकारभारासाठी उपयोग करून घेत होते.

### ज्येष्ठ बंधू आनंदराव गायकवाड

सयाजीराव महाराजांचे ज्येष्ठ बंधू आनंदराव गायकवाड यांना महाराजांनी लष्कराचा सेनापती नेमले होते. दत्तकविधान निवडीच्या वेळी महाराजांबरोबर हेही बडोद्याला आले होते. महाराजांनी त्यांना राज्यकर्ता या नात्याने काही बाबतीत सल्ला दिला. संस्थानातील एक अधिकारी जनरल डिव्हाईनसाहेब वयोवृद्ध झाल्याने त्यांना निवृत्तीचा सल्ला आनंदरावांनी द्यावा यासाठी महाराज पत्रात लिहितात, 'आपण युक्तीने सुचवून जनरल डिव्हाईनसाहेब यांस पेन्शन देण्याची शिफारस करावी. मला वाटते की, ते आता बरेच वयोवृद्ध झाले आहेत आणि त्यांनी पेन्शन घेतली असता फार चांगले आहे, असे सुचवावे.' *(पत्र क्र. ८).* जनरल डिव्हाईनसाहेब हे वयोवृद्ध होऊनसुद्धा निवृत्ती घेत नाहीत हे पाहिल्यावर महाराजांनी आनंदरावांमार्फत त्यांना निवृत्तीचे महत्त्व पटवून दिले. यामागे महाराजांचे मुत्सद्दी धोरण दिसते. तसेच आपल्या बंधूंचा उपयोग सल्ल्याच्या माध्यमातून चांगल्या कामासाठी करून घेतानाही दिसतात. महाराजांनी बंधू आनंदराव यांना पत्रांतून स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याबद्दलही मार्गदर्शनपर सल्ला दिला.

### लहान बंधू संपतराव गायकवाड

सयाजीराव महाराजांचे लहान बंधू संपतराव गायकवाड त्यांच्याबरोबर बडोद्यात होते. त्यांनी महाराजांना राज्यकारभारात खूप मदत केली होती. महाराजांनी संपतरावांना शिष्यवृत्ती देऊन

परदेशात शिक्षणासाठी पाठवले. संपतराव परदेशात असताना या काळात महाराजांनी त्यांना पत्रांतून वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले. संपतराव परदेशात शिक्षणासाठी गेल्यावर त्यांना पाठवलेल्या पहिल्या पत्रात महाराज लिहितात, 'तुमची तब्येत चांगली आहे आणि तुमचा अभ्यासही प्रगतिपथावर आहे हे तुमच्याकडून समजल्याने आनंद झाला. असेच सातत्याने खूप परिश्रम करत राहा; परंतु त्याचा अतिरिक्त ताण येऊ देऊ नका. मला आठवते आहे की, हे मी अनेक वेळा सांगितले आहे. बरोबर आहे ना?' *(पत्र क्र. १६)*. शिक्षण व्यवस्थित घ्या आणि शिक्षणासाठी लागणाऱ्या आरोग्याची काळजी घ्या. महाराजांचे संपतरावांवर पुत्रवत प्रेम होते. त्यामुळे साहजिकच त्यांच्याविषयी त्यांना काळजी वाटत होती.

महाराजांनी राज्यकारभाराच्या प्रारंभी भाषांतराला खूप महत्त्व दिले होते. त्यांना नेहमी वाटत होते की, परदेशातील जे विविध विषयांतील श्रीमंत साहित्य आहे त्याचे देशी भाषांत भाषांतर व्हावे. संपतराव साहित्याचे अभ्यासक होते. देशी भाषांत ग्रंथ व्यवस्थित भाषांतरित व्हावेत यासाठी संपतरावांना मार्गदर्शन केले. महाराज संपतरावांच्या आणि संस्थानातील अधिकाऱ्यांच्या साहाय्याने अनेक ग्रंथ भाषांतर करून देशी भाषेत प्रजेला उपलब्ध करून देऊ इच्छित होते.

सयाजीराव महाराजांना बडोद्यात जवळचे खूप कमी मित्र होते. त्यापैकी संपतराव त्यांना सर्वांत जवळचे मित्र वाटत होते; परंतु ते शिक्षणासाठी परदेशात गेल्याने त्यांना काळजी वाटत होती. संपतरावांनी शिक्षण घेऊन लवकरात लवकर राज्यकारभारात मदत करावी असे त्यांना वाटत होते. ते परदेशातून परत येण्यापूर्वीच महाराजांनी त्यांनी कोणत्या विभागात काम कारावे याबद्दल मार्गदर्शन केले. 'महसूल विभागातील काही निश्चित स्वरूपातील काम तुम्ही स्वीकारणे चांगले होईल. असे मला वाटते. सरसुभ्याचे काम तुमच्याकडे द्यावे असा प्रस्ताव मंत्र्यांनी ठेवला होता; परंतु ते अजिबात योग्य ठरणार नाही असे मला वाटते. कारण तेथे तुम्हाला अगदीच थोडे शिकायला मिळेल.' *(पत्र क्र. ६५)*. एकदम मोठ्या पदावर नोकरी करताना खालच्या स्तरावर कोणत्या अडचणी येतात याची कधी-कधी अधिकाऱ्यांना कल्पना नसते; यासाठी खालच्या पदावर नोकरी केल्यावर संपतरावांना चांगला अनुभव येईल असे महाराजांना वाटत होते. म्हणून संपतरावांनी महसूल विभागात काम करावे असे त्यांना वाटत होते.

महाराज नेहमीच वडीलकीच्या नात्याने संपतरावांना मार्गदर्शन करत होते. संपतराव छोटी बोट आणि टांगा यांची विक्री करून नवीन घेणार हे समजल्यावर महाराजांनी आपल्या काटकसरी स्वभावाप्रमाणे त्यांना मार्गदर्शन केले. महाराज पत्रात लिहितात, 'आपण आपली छोटी बोट आणि टांगा यांना काढून टाकण्याचा विचारात आहात हे कळून मला वाईट वटले. टांगा तुमच्या अटीप्रमाणे घेण्यास मी तयार आहे. मी जरी तो घेतला तरी आपणही त्याचा वापर करू शकता. बोटीच्या बाबतीत तुम्हाला नंतर कळवीन. तुम्हाला सिनोरमध्ये त्यांचा उपयोग नक्कीच होईल. काही काळानंतर मला याची आठवण द्यावी.' *(पत्र क्र. ३२७)*. स्वत:साठी कोणतीही गोष्ट करताना त्याबाबत विचार करावा, त्यांची उपयुक्तता पाहावी असा सल्ला महाराज जवळच्या

व्यक्तींना नेहमीच देत असत. त्याचप्रमाणे त्यांनी स्वतःचे बंधू संपतराव यांनाही हाच सल्ला दिला.

खासेराव जाधव

सयाजीराव महाराजांच्या दत्तक माता जमनाबाई यांचे नातलग भगवंतराव जाधवांचा मुलगा खासेराव जाधव होते. भगवंतराव जाधव महाराणी जमनाबाई गायकवाड यांचे मानकरी होते. मानकरी असल्याने त्यांची मुले आणि राजवाड्यातील मुले एकत्रच राहत होती. त्यातूनच समवयस्क सयाजीराव महाराज आणि खासेराव जाधव यांची चांगली ओळख आणि मैत्री झाली. महाराजांनी राज्यकारभार हाती आल्यावर इथल्या शेतकऱ्यांचे दुःख जाणले. त्यांना शेतकऱ्यांच्या जीवनात बदल करावयाचा होता. त्यासाठी शेतीतील उच्चशिक्षणासाठी खासेराव जाधवांना इ.स. १८८४ मध्ये इंग्लंडला पाठवले. त्याचबरोबर महाराजांचे बंधू संपतराव गायकवाड आणि गणपतराव गायकवाड हेही होते. खासेरावांनी ठरल्याप्रमाणे ऑक्स्फर्ड विद्यापीठात प्रवेश घेतला. 'खासेरावांनी लंडनला शेतकी विषयातील पदवी शिक्षण सुरू केले. त्या काळात त्यांच्यासमोर विलायतेतील शेती आणि हिंदुस्थानातील शेतकरी, त्यांचे शेतीतंत्र, पीक-पाण्याची पद्धती आणि फळबागांचे प्रयोग या संदर्भात तुलना सुरू केली. याबद्दल ते वेळोवेळी सयाजीराव महाराजांना पत्राने कळवू लागले. महाराजही खासेरावांना सूचना करीत. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश आहे. जनजीवन शेतीवर अवलंबून आहे. तो शेती व्यवहार नीट कसा करावा, हे आपण बारकाईने शिकून घ्या. ब्रिटिशांची शक्तिस्थाने कोणती, याचा नीट अभ्यास करा. शेती करणे हे एक शास्त्र आहे. इकडची शेती आणि विलायतेची शेती, या शास्त्रांचा नीट अभ्यास करा. त्याचा उपयोग आपणास पुढे करून घ्यायचा आहे.' *(भांड, २०१५, पृ. १५)*. सयाजीराव महाराजांनी दूरदृष्टीने खासेराव जाधवांना परदेशात पाठवले होते. त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. सयाजीराव महाराज आणि खासेराव जाधव यांचा या काळातील पुष्कळसा पत्रव्यवहार उपलब्ध आहे. त्यावरून महाराज त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी मार्गदर्शन करत होते हे लक्षात येते.

महाराजांचा जो पत्रव्यवहार उपलब्ध आहे त्यातील दुसरेच पत्र त्यांनी खासेरावांना लिहिले आहे. महाराज या पत्र लिहितात, 'तुम्ही उत्तम आणि यशस्वीरीत्या प्रगती करत असल्याचे वाचून अतिशय आनंद झाला. तुमच्या प्रगतीविषयी आम्ही सदैव अतिशय जागरूक असतो आणि याची कारणे तुम्हीही जाणताच.' *(पत्र क्र. २)*. महाराजांना संस्थानातील शेतीत सुधारणा करण्यासाठी शेतीचे आधुनिक पद्धतीचे शिक्षण घेतलेल्या लोकांची निकड होती. त्यांना परदेशातील शेतीतील सुधारणा माहीत होत्या. त्यामुळे खासेरावांना ते या मार्गाने जाण्यास प्रवृत्त करत होते.

महाराजांना कृषी क्षेत्रात प्रगती साधून शेतकऱ्यांना गरिबीतून बाहेर काढायचे होते. शेतकऱ्यांना शिक्षण देण्यासाठी कृषी विद्यालय संस्थानात स्थापन केले होते. त्याबाबत पत्रात लिहितात, 'माझ्या संस्थानात मी एक कृषी विद्यालय स्थापन करत आहे. त्याचे चांगले परिणाम निष्पन्न होतील अशी अशा आहे. तुमचा डिप्लोमा मिळाल्यावर लगेचच जर तुम्ही भारतात परत

आलात तर बरे होईल असे वाटते. कारण या देशातील कृषी उद्योग समजून घेण्यासाठी तुम्हाला साधारण एक वर्षाचा अवधी लागेल.' *(पत्र क्र. २२)*. सयाजीराव महाराजांना बडोद्यातील शेती आणि शेतकरी यांची प्रगती करण्यासाठी खासेराव जाधवांचा उपयोग करावयाचा होता. त्यासाठी खासेरावांना नेहमीच पत्रांच्या माध्यमातून मार्गदर्शन करत होते. खासेराव शिक्षणासाठी परदेशात असतानाच बडोद्यात शेतीसाठी काय करायचे याचे नियोजन आणि विचारविनिमय दोघे पत्राच्या माध्यमातून करत होते. तसेच महाराज वेळोवेळी खासेरावांना सर्व प्रकारची मदत करत होते. महाराज लिहितात, 'तुमच्या चित्तवेधक योजनांची प्रगती कुठवर आली आहे? तुमच्यासाठी १०,००० रुपयांची मदत व्यवस्था करण्याचे आदेश मी बडोदा सोडण्यापूर्वी दिले होते. ते पैसे तुम्हाला मिळाले असतील असे वाटते. आपल्या स्टेटसमध्ये कृषी क्षेत्रात करण्यासारखे काम खूप मोठ्या प्रमाणावर आहे आणि आपण थोडे थोडे प्रयत्न तरी करायलाच हवे आहेत.' *(पत्र क्र. ४८)*. शेतीची प्रगती करण्यासाठी महाराज सुधारलेल्या देशांतील शेतीत अमलात आणलेल्या योजना बडोदा संस्थानात राबवणार होते. त्यासाठी त्यांना खासेराव जाधवांची मदत घ्यावयाची होती. म्हणून त्यांना पत्रांतून मार्गदर्शन करत होते. त्यांना आर्थिक मदत करत होते.

खासेराव जाधवांनी बडोदा संस्थानात शेतीसाठी तर मदत केलीच, त्याबरोबर राजपुत्रांच्या शिक्षणातही त्यांनी खूप मदत केली. खासेराव जाधव यांनी महाराजांचे नातू प्रतापसिंह यांच्या शिक्षणाची जबाबदारी समर्थपणे पेलली. त्याबाबतचा महाराज आणि खासेराव जाधव यांचा पुष्कळ पत्रव्यवहार उपलब्ध आहे. महाराज खासेरावांना प्रतापसिंहांबद्दल लिहितात, 'प्रतापसिंहला अधिक काम न देण्याविषयी तुम्ही जे लिहिले त्यात बरेच तथ्य आहे. कोणाचीही इच्छा होणार नाही.' *(पत्र क्र. १८३५)*. प्रतापसिंह हे महाराजांचे ज्येष्ठ राजपुत्र फत्तेसिंहराव यांचे सुपुत्र असल्याने महाराजांच्या नंतर गादीचे वारस होते. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाची आणि जडणघडणीची महाराजांना फार काळजी होती. त्यांचे शिक्षण व्यवस्थित व्हावे यासाठी महाराज खासेराव जाधवांना वारंवार पत्रांतून मार्गदर्शन करत. प्रतापसिंहांना राज्यकारभारात प्रगल्भ झाल्याशिवाय राज्यकारभारात आणू नये याबद्दल खासेरावांना पत्रातून मार्गदर्शन करतात, 'मला स्पष्टपणे वाटते की, सध्या याविषयी घाई व्हायला नको. सावकाश, मात्र पुरेशा प्रगल्भतेने प्रशासकीय कामांमध्ये त्याला सामील होऊ द्या. सध्या इतर कोणत्याही सामान्य मुलाप्रमाणे प्रतापसिंहाने अभ्यासात आणि शरीर कमविण्याकडे लक्ष द्यायला हवे. राज्यकारभाराकडे सध्या त्याने लक्ष देऊ नये.' *(पत्र क्र. १८५५)*. महाराज अशा प्रकारे वारसदारांना योग्य पद्धतीने, योग्य लोकांच्या मार्गदर्शनाखाली तयार करत होते. अशा मार्गदर्शक शिक्षकांनाही महाराज अतिशय योग्य प्रकारे सल्ला देत होते. राजपुत्रांना राज्यकारभारासाठी तयार करताना महाराजांनी त्याची काही काळ जबाबदारी खासेराव जाधवांवर टाकली होती. ती त्यांनी समर्थपणे पेलली.

खासेराव जाधव निवृत्ती घेताना त्यांना महाराजांनी नकार कळविला. त्याबाबत पत्रात लिहितात, 'तुमच्या निवृत्ती वेतनासंदर्भात तुम्ही मांडलेले मुद्दे मला योग्य वाटत नाहीत. तुम्ही असा विचार का केला की, मी तुमच्या संदर्भात माझे विचार बदलले आहेत. तुम्हाला इतर लोक

लहरी म्हणतात. मात्र, त्याबद्दल मी काही मत व्यक्त करायला पाहिजे, असे मला वाटत नाही आणि तुम्ही अशा परिस्थितीत निवृत्ती वेतनाचे प्रकरण लावून धरावे हे काही मला योग्य वाटत नाही. मी बऱ्याच काळापासून आजारी आहे आणि अशा प्रकारच्या प्रश्नांचा मला त्रास होतो. मात्र, तुम्ही त्याचा विचार न करता सातत्याने हा मुद्दा लावून धरत आहात.' *(पत्र क्र. १८२०)*. महाराजांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेली निष्ठावंत, विश्वासू माणसे ज्यावेळी निवृत्ती मागत त्यावेळी महाराज त्यांना मुद्दामहून काही काळ थांबण्यास सांगत. रियासतकार सरदेसाई यांच्या निवृत्तीवेळीही असाच प्रकार घडला होता. महाराजांनी या निष्ठावंत लोकांना स्वतःच्या विचारांनी तयार केले होते.

महाराजांनी योग्य व्यक्तींचा उपयोग योग्य मार्गदर्शन करून संस्थानाच्या कामासाठी करून घेतला; परंतु जवळच्या नातेवाईकांना राज्यकारभाराच्या कामात कोणत्याही प्रकारे सवलत देत नव्हते. त्यांच्याकडून योग्य ती कामे करून घेत. यात महाराजांनी त्यांना योग्य सल्ला, मार्गदर्शन करण्याची भूमिका अगदी योग्य रीतीने पार पाडली.

### राजपुत्रांना केलेले मार्गदर्शन

पहिल्या महाराणी चिमणाबाई गायकवाड यांना राजपुत्र फत्तेसिंहराव तर दुसऱ्या महाराणी चिमणाबाई गायकवाड यांना राजपुत्र जयसिंहराव, शिवाजीराव आणि धैर्यशीलराव हे राजपुत्र होते. महाराजांना नेहमी वाटत होते की, आपल्या राजपुत्रांनी व्यवस्थित शिक्षण घ्यावे. राज्यकारभारात मदत करावी, सर्वसामान्य लोकांचे दुःख जाणून ते कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यासाठी महाराज वारंवार त्यांना मार्गदर्शन करत. वेगवेगळ्या पत्रांतून त्यांना त्यांचे ध्येय गाठण्यासाठी सल्ला देत. कठोर कष्ट करण्यासाठी प्रवृत्त करत. महाराजांचे चारही राजपुत्र काही काळ परदेशात शिक्षणासाठी होते. त्यांनी सुसंस्कारी व्हावे यासाठी महाराज नेहमीच काळजी घेत. एका पित्याला वाटणारी काळजी त्यांनी लिहिलेल्या पत्रांतून स्पष्टपणे दिसते.

महाराजांना नेहमी वाटत होते की, आपल्या पुत्रांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात करावीत. यासाठी राजपुत्रांना मार्गदर्शन करत. जयसिंहरावांना इ.स. १९०२ मध्ये पत्रात लिहितात, 'तुम्ही व्हायोलीन वाजवण्यास शिकावे. ते अवघड वाटत असल्यास तुम्ही पियानोवादन शिकावे. तुम्ही रॅकेटस् खेळणेही शिकावे.' *(पत्र क्र. ६६१)*. राजपुत्रांनी नानाविध कला आत्मसात कराव्यात, त्यामुळे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो असे महाराजांचे मत होते. वरील पत्राप्रमाणे सर्वांत लहान पुत्र धैर्यशीलराव यांना ते आजारी असताना पाठविलेल्या पत्रात लिहितात, 'तुझी तब्येत बरी नसल्याचे समजले. मला खूप दुःख झाले. मी डॉक्टरांच्या अहवालाची वाट पाहत आहे. तुझ्या अति बैठ्या कामाच्या सवयीमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत असे मला वाटते. तू पूर्वीप्रमाणे मैदानी खेळाकडे लक्ष द्यायला हवे. तसेच डॉक्टरांच्या सूचनांचे योग्य पालन करायला हवे. तुला कसलाही कोर्स करण्याचे मी सुचविणार नाही. कारण तू स्वत: खूप जबाबदार आहेस, याची मला पूर्ण जाणीव आहे.' *(पत्र क्र. १९९७)*. महाराजांनी नेहमीच सर्व राजपुत्रांना

आरोग्याची काळजी घेण्यास सांगितले होते. त्याबद्दल ते वेगवेगळ्या पत्रांतून मार्गदर्शन करताना दिसतात.

राजपुत्र धैर्यशीलराव यांनी महाराजांना कामात मदत सुरू केल्यावर त्यांना अधिक उत्साही आणि प्रेरणा देणारे पत्र महाराजांनी लिहिले, 'मला हे माहीत पडल्यावर खूप आनंद झाला, की, तू तुझे कार्यालयीन कामकाज व्यवस्थित हाताळत आहेस. हे काम अधिक योग्य रीतीने होण्यासाठी तू प्रत्येक विभागाची सविस्तर माहिती घे. त्यांचे नियम, धोरण समजावून घे. तू बुद्धिमान आहेस. तू मेहनतीने काम करशील, तर त्याचा मला फायदा होईल. मात्र फक्त बुद्धिमत्ता असणे पुरेसे नसते, प्रत्यक्ष काम करणे, त्यात सातत्य असणे, तसेच तुमचा स्वभाव आणि चारित्र्य या बाबीही महत्त्वाच्या असतात.' *(पत्र क्र. २०६८).* महाराज सर्वच राजपुत्रांना राज्यकारभारात लक्ष घालण्यासाठी वारंवार मार्गदर्शन करत होते. याच धैर्यशीलरावांना इ.स. १९३० मध्ये महाराजांनी आणखी एका पत्रातून मार्गदर्शन केले. 'रेल्वे विभागात नियुक्त होण्याचा तुझा निर्णय योग्य असल्याचे मला वाटत नाही. माझ्या मते दिवाणांना सांगून त्यात बदल करून घ्यावास. तसेच तू तुझ्या सवयी बदलाव्यात आणि स्वभावावर नियंत्रण ठेवावे. कामाचे महत्त्व तुझ्या लक्षात येणे गरजेचे आहे. त्यात सातत्य ठेवल्याशिवाय तुला चांगले काम करता येणार नाही.' *(पत्र क्र. २१०८).* महाराज राजपुत्रांना वेगवेगळ्या कामात गुंतवून त्यांना चांगल्या राज्यकारभारासाठी तयार करण्याचे प्रयत्न करत; परंतु राजपुत्र व्यसनी झाल्याचे दुःख त्यांच्या मनात कायम सलत असे. धैर्यशीलरावांना हे पत्र लिहिण्यापूर्वी महाराजांचे राजपुत्र व्यसनामुळे मृत्युमुखी पडले होते. त्यामुळे धैर्यशीलरावांना महाराज पत्रात लिहितात, 'तू कामात झोकून दिल्याशिवाय तुला कोणत्याही विभागावर आपले नियंत्रण ठेवता येणार नाही. मी तुला भाषण देणार नाही. मात्र या काही बाबी तुझ्या भल्यासाठी सांगत आहे. दारू पिणे सोड. दारू तुझा जीव घेईल आणि त्यामुळे अनेकांना दुःख होईल.' *(पत्र क्र. २१०८).* महाराज राजपुत्रांना व्यसनांपासून दूर ठेवू पाहत होते. त्यामुळे राज्यातील कामे व्यवस्थित व्हावीत यासाठी त्यांची मदत घेऊ पाहत होते. याबाबतचे आणखी एक पत्र बोलके आणि मार्गदर्शक आहे. धैर्यशीलराव आजारी होते त्या काळात महाराजांनी पत्रातून योग्य दिशा मिळण्यासाठी लिहिले, 'डॉक्टरांना सहकार्य कर, तरच ते तुझ्यावर योग्य रीतीने उपचार करू शकतील. आपण घोड्याला पाण्याजवळ नेऊ शकतो, मात्र पाणी प्यायचे की नाही हे त्याच्यावर अवलंबून आहे.' *(पत्र क्र. २१५७).* त्या काळात त्यांनी त्यापासून परावृत्त व्हावे यासाठी महाराज त्यांना पत्रातून किंवा भेट झाल्यावर मार्गदर्शन करत असत. हे मार्गदर्शन राजपुत्रांसाठी अमूल्य ठेवा होता.

महाराजांचा स्वत:चा वाचनव्यासंग जबरदस्त होता. त्यामुळेच त्यांनी जीवनात खूप प्रगती केली. जगातील महत्त्वाचे ज्ञान आपणाला हवे यासाठी ते नेहमी वाचन करायचे. इतरांनी असाच वाचन व्यासंग वाढवून जीवनात प्रगती करावी असे त्यांना वाटत होते. त्यांना नेहमी वाटत असे, की राजपुत्रांनीही वाचनव्यासंग वाढवावा. धैर्यशीलराव यांना पत्रात लिहितात, 'सध्या तू वाचन करीत असल्याचे मला माहीत आहे. हे काम कंटाळवाणे आणि थकवणारे असल्याची जाणीव

आहे.’ *(पत्र क्र. २०७९)*. त्यानंतर त्यांचे वाचन वाढावे यासाठी महाराजांनी वाचून दाखवणाऱ्या व्यक्तीची निवड करण्यास परवानगी दिली होती. त्याबाबत महाराज लिहितात, ‘तुमच्यासोबत तुम्हाला वाचून दाखविणारा एक चांगला तरुण बडोद्यातून घ्या.’ *(पुरवणी पत्रसंग्रह, खंड-३, पत्र क्र. २०५७)*. राजपुत्रांनी वाचन करावे, बहुविध व्हावे यासाठी महाराज त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करीत होते.

शिक्षण हा तर महाराजांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. प्रत्येकाने शिक्षण घेऊन स्वत: ज्ञानी व्हावे, त्याचबरोबर समाजासाठी कार्य करावे असे वाटत होते. धैर्यशीलराव यांचे पुत्र अशोक यांना परदेशात शिक्षणासाठी ठेवावे यासाठी त्यांनी महाराजांकडे परवानगी मागितली; परंतु महाराजांनी त्यांना पत्रात लिहिले, ‘सध्याच्या परिस्थितीत सगळयात उत्तम मार्ग म्हणजे त्याला पब्लिक स्कूलमध्ये पाठवण्यापूर्वी आपली भाषा आणि आपल्या देशाचा पूर्ण अभ्यास होणे गरजेचे आहे. त्याशिवाय त्याला देशातच इंग्रजीही शिकता येईल.’ स्वतःचा देश पाहून नंतर परदेशात शिक्षणासाठी पाठवावे हे त्यांचे मत त्यावेळी त्यांनी त्यांना आलेल्या अनुभवावरून व्यक्त केले.

महाराज कोणतीही गोष्ट करताना ती सर्वोत्तम कशी होईल यासाठी प्रयत्न करत. नातेवाईकांनी संस्थानात प्रजेसाठी चांगले काम करावे असे त्यांना वाटत होते. महाराजांनी अनेक नातेवाईकांना शिष्यवृत्ती देऊन देश-परदेशात उच्चशिक्षण घेण्यासाठी पाठवले. त्यांच्या मार्फत कुशल मनुष्यबळ निर्माण करून त्यांना संस्थानात उच्च कोटीची प्रगती करावयाची होती. म्हणून परदेशात पाठवलेल्या नातेवाईकांना पत्रांतून उपदेश आणि मार्गदर्शन करत.

## २) संस्थानातील अधिकाऱ्यांना केलेले मार्गदर्शन

सयाजीराव महाराजांना त्यांच्या शिक्षकांनी राज्यकारभारासाठी तयार करताना संस्थानातील अधिकारी आणि सेवक यांची निवड कशी करावी यासंबंधी माहिती दिली होती. संस्थानचे तत्कालीन दिवाण टी. माधवराव यांनी त्यांच्या शिक्षणाच्या समारोप प्रसंगी दिलेल्या व्याख्यानांतून ‘ब्रिटिश रेसिडेंटशी कसे वागावे, आपला हक्क, स्वाभिमान कसा जपावा. दिवाणासारख्या महत्त्वाच्या पदावर कोणास नेमावे, अधिकारी नेमताना कोणते धोरण डोळयांपुढे ठेवावे, त्या अधिकाऱ्यांचा उपयोग संस्थानासाठी कसा करून घ्यावा. त्या अधिकाऱ्याने वारंवार त्याच-त्याच चुका केल्यास त्यांना कोणती आणि काय शिक्षा द्यावी. संस्थानातील प्रजेशी, नोकर-चाकरांशी, हुजऱ्याशी, स्वत:च्या कुटुंबियांशी व आप्तस्वकीयांशी कसे वागावे, भेटायला येणाऱ्या व्यक्तींना कशा प्रकारे सामोरे जावे, त्यातील कोणाला जवळ करावे आणि कोणाशी लांबून बातचीत करावी. सार्वजनिक पैशाचा उपयोग कशा प्रकारे करावा.’ अशा अनेक सूचना केल्या होत्या. प्रत्येक व्याख्याता त्यांच्यापुढे आदर्श राज्य कसे करावे यासंबंधी मार्गदर्शन करत होता. यातून त्यांना अधिकारी वर्गाचे आणि संस्थानातील गुणी माणसांचे महत्त्व समजले होते. तसेच पुढे महाराजांनी अनेक वेळा परदेश प्रवास केल्याने आणि समकालीन जगातील

महत्त्वाचे ग्रंथ वाचल्याने त्यांना गुणवंत माणसांची उपयोगिता समजली होती. हिंदुस्थानातील आणि प्रगत राष्ट्रांतील राज्यकारभाराचा अभ्यास करताना राज्याच्या प्रगतीत अधिकारी वर्गाचे योगदान किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी जाणले होते. महाराज स्वतः बुद्धिमान आणि प्रतिभावान असल्याने त्यांना याबाबतची पारख थोड्याच दिवसात झाली.

महाराजांच्या अगोदर संस्थानाच्या सेवेत असणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांनी शिक्षणासाठी प्रवृत्त केले. त्यातील काहींना शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना पदोन्नती दिली. बक्षिसे दिली. चांगल्या पदांवर नेमणुका दिल्या. ज्यांनी शिक्षणास नकार दिला त्यांना वयोमानाने निवृत्त केले. एकंदर महाराजांनी संस्थानातील अधिकारी वर्ग सुशिक्षित आणि प्रजेच्या कल्याणासाठी झटणारा हवा होता. त्यासाठी ते दीर्घकाळ प्रयत्न करत होते. महाराज फक्त संस्थानातील अधिकारी सुजाण असावे यासाठी झटत नव्हते; तर संस्थानबाहेरील तसेच जगभरातील गुणवंत व्यक्तींचा संस्थानसाठी उपयोग कसा करता येईल याच्याही शोधात असत. अनेक गुणी व्यक्तींना महाराजांनी हिंदुस्थानातील सर्व भागांतून आणि जगभरातून संस्थानात आणले.

### महाराजांची अधिकारी निवड

सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यावर त्यांच्यावर ज्यावेळी अधिकारी निवडीची वेळ येत असे, त्यावेळी ते वेगवेगळ्या कसोट्या वापरत. त्या व्यक्तीची संस्थानाला कितपत गरज आहे त्यांच्या निवडीनंतर त्यांना कोणत्या खात्यात काम दिल्यावर ते मनापासून काम करतील यासंबंधीची आखणी ते मनात करत. एखादा अधिकारी निवडताना उपलब्ध व्यक्तींपैकी सर्वोत्तम असणाऱ्या व्यक्तीची ते निवड करत. त्यांना पारखून घेत. महाराजांचे समकालीन चरित्रकार य.रा. दाते राज्यकारभाराविषयी म्हणतात, 'श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या अंगी प्लेटो या 'तत्त्ववेत्त्या'चे सर्व गुण तंतोतंत उतरले आहेत किंवा नाहीत, हे आजतागायतच्या (इ.स. १९३३) त्यांच्या कारकीर्दीचे सिंहावलोकनावरून दिसून येईल. राज्यसूत्रे हातांत दिल्यावर प्लेटो या तत्त्ववेत्त्याप्रमाणे आश्चर्यकारक व मती गुंग होण्यासारखी कार्यक्षमता राज्यशकट हाकताना त्यांनी प्रकट केली, हे कोणीही कबूल करील.' *(दाते, श्रीसयाजीगौरवग्रंथ भाग-१, १९३३, पृ. ८८).* महाराजांनी सुधारणा करताना त्यांच्या जवळील शक्तींचा उपयोग केला. त्याचबरोबर संस्थानात असणाऱ्या अधिकारी आणि सेवकांच्या गुणांचा उपयोग केला. महाराजांचे अधिकारी कसे होते याबद्दल समकालीन चरित्रकारांनी काही आठवणी लिहून ठेवल्या आहेत. 'राज्यकर्त्याने मंत्री, सेनाध्यक्ष, अमात्य वगैरे अधिकारी नेमताना व निवडताना भिन्न भिन्न प्रकारांनी त्यांना कसोटी लावून, कडक परीक्षेत ज्यांचे देशाभिमान, निश्चय, धैर्य, स्वामीभक्ती इत्यादी सद्गुण अचल राहतील अशाच निरनिराळ्या अधिकारांच्या जागांवर नेमावे असे कौटिल्यांचे मत आहे. सयाजीरावांचा काळ तर विद्वान, अनुभवी, मुत्सद्दी, राजकार्यधुरंधर, अत्यंत नाणावलेल्या व पुढारी म्हणून गाजलेल्या लोकांच्या सहवासात गेलेला. त्यांच्या राज्यातील मुख्य-मुख्य अधिकाऱ्यांची नुसती

नावे पाहिली तरी त्यावरून महाराजांच्या चतुर राजनीतीची साक्ष पटण्याजोगी आहे.' *(दाते, श्रीसयाजीगौरवग्रंथ भाग-१, १९३३, पृ. ८९).* महाराजांनी प्रत्येक अधिकारी निवडताना त्या व्यक्तीतील गुण पाहून नेमणुका केल्या. त्यांनी संस्थानातील अधिकाऱ्यांची पदे वंशपरंपरागत, जाती, धर्म याच्या पलीकडे जाऊन फक्त आणि फक्त ज्यांच्याकडे गुणवत्ता आहे त्यांनाच दिली. संस्थानबाहेरील जे महान लोक आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करत होते, त्यांच्याही गुणांचा आणि त्यांच्याकडे असणाऱ्या ज्ञानाचा संस्थानसाठी उपयोग करून घेतला. त्यासाठी त्यांची व्याख्याने बडोद्यात आयोजित केली, तर त्यातील काही व्यक्तींना काही काळ संस्थानात आणले. त्यांचा सन्मान केला.

महाराजांनी नातेवाईकांना त्यांच्या गुणवत्तेप्रमाणे संस्थानच्या सेवेत घेतले. राज्यकारभारातील त्यांची कामाची गुणवत्ता आणि उपयुक्तता पाहून त्यांना बढती दिली. हेच धोरण त्यांनी इतर अधिकारी आणि सेवक नेमताना ठेवले. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात संस्थानात अनेक गुणीजनांचा भरणा होता. राजदरबारात अनेक रत्ने होती. अधिकारी निवडताना महाराज अनेक कसोट्या लावून त्यांची निवड करत होते. अशा निवडलेल्या अधिकाऱ्यांना ते वेळोवेळी पत्रांतून, भाषणांतून आणि हुजूर हुकमांतून मार्गदर्शन करत होते.

### दिवाणांना केलेले मार्गदर्शन

इंग्रजांचे हिंदुस्थानवर राज्य असताना अनेक संस्थाने अस्तित्वात होती. त्या संस्थानामध्ये राजाखालोखाल दिवाण हे पद अत्यंत महत्त्वाचे असे. राजानंतर त्यांना संस्थानाचे अधिकार असत. त्यामुळे दिवाण राज्यकारभारात महत्त्वाची भूमिका बजावत असे. सयाजीराव महाराजांच्या ६४ वर्षांच्या कार्यकाळात १४ दिवाण होऊन गेले. यामध्ये टी. माधवराव, शहाबुद्दीन काझी, लक्ष्मणराव वैद्य, मणिभाई जसाभाई, श्रीनिवास अय्यंगार, जयसिंहराव (प्रभारी), रामचंद्र धामणसकर, केरशापजी रुस्तुम, दादाचानजी, रमेशचंद्र दत्त, सी.एन. सेडन, बिहारीलाल गुप्ता, व्ही.पी. माधवराव, गणपतराव (प्रभारी) आणि व्ही.टी. कृष्णम्माचारी यांचा समावेश होता. महाराजांनी राज्यकारभार व्यवस्थित चालावा यासाठी संस्थानातील अधिकारी आणि दिवाण यांना पत्रांद्वारे, बैठकींद्वारे आणि प्रत्यक्ष भेटीतून मार्गदर्शन केले.

महाराज परदेशात असताना पत्राद्वारे बडोद्याशी नेहमी संपर्कात असत. त्या काळात महाराज दिवाणांना वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन करत. त्यांनी अशा प्रकारे सर्वच दिवणांना पत्रे लिहिली. राज्यकारभार हाती घेतल्यावर प्रथम टी. माधवराव हे दिवाण होते. टी. माधवराव यांनी बडोद्यात सुधरणा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती; परंतु महाराज या काळात बडोदा सोडून फार कमी काळ राहिले. त्यामुळे प्रशासकीय कामकाजाबाबत महाराज आणि दिवाण टी. माधवराव यांच्यात पत्रव्यवहार कमी झाला; परंतु त्यानंतर आलेल्या प्रत्येक दिवाणांना महाराजांनी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन करणारी काही पत्रे नमुन्यादाखल पाहता येतील. सयाजीराव महाराजांनी स्थानिक उद्योग करणाऱ्यांना तीन लाख रुपये कर्ज वाटले. परंतु पुढे हे उद्योग करणारे लोक त्याची परतफेड

करू शकले नाहीत. प्रशासन व्यवस्थित आणि काटकसरीने चालवण्याची सवय असलेल्या महाराजांना हे रुचले नाही. यासाठी त्यांनी दिवाण श्रीनिवास अय्यंगार यांना पत्र लिहिले आणि जबाबदार व्यक्तींकडून खुलासा मागवून घेण्याबाबत मार्गदर्शन केले. 'तुम्ही जयसिंगराव आंग्रे यांना स्पष्टीकरण मागवणारे पत्र पाठवल्यास मला आनंद होईल. औद्योगिक योजनांना उत्तेजन देण्यासाठी त्यांनी सरसुभा असण्याच्या नात्याने आगाऊ रोख रक्कम देण्याचे जे पूर्णत: निष्काळजीपणे व दुर्लक्ष दाखवणारे वर्तन केले आहे, त्याबाबत त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागवायचे आहे. त्यांची उद्योगविषयक पद्धती व विशेषत: जामीनविषयक खातरजमा करून न घेणे यामुळे राज्यास आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच केवळ लोककल्याणासाठी परोपकारी योजना केवळ उद्ध्वस्त झाली एवढेच नसून त्यापेक्षाही वाईट परिणाम त्यातून निघाले आहेत.' *(पत्र क्र. २५४)*. महाराजांचे संस्थानच्या राज्यकारभाराकडे पूर्ण लक्ष असे. त्यात वेळोवेळी सुधारणा व्हाव्यात किंवा एखाद्या अधिकाऱ्याकडून कामात हलगर्जीपणा झाला तर महाराज त्याबाबत दिवाणांच्या मार्फत खुलासा मागवून घेत.

महाराज अनेक वेळा दिवाणांना कामात मोकळीक देत. काही निर्णय घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करत. त्यामुळे दिवाणही त्यांच्या या प्रतिसादाला साद देत आपला कार्यभाग निःस्वार्थपणे उरकत. दिवाण लक्ष्मणराव वैद्य यांना लिहिलेले एक पत्र अशाच प्रकारे कामात मार्गदर्शन करणारे आहे. 'आज काम करण्याची माझी इच्छा नसल्यामुळे तुम्हीच माझी कामे कृपया निकाली काढावीत. जेव्हा जेव्हा माझी कामे माझ्याऐवजी तुम्हाला निकाली काढावी लागतील, तेव्हा शक्य असेल तेवढी अधिक कामे तुम्ही करावीत. अशा वेळी जी प्रकरणे स्थगित राहण्यास कोणताही धोका नाही असे तुम्हाला वाटते, अशी महत्त्वाची प्रकरणे माझी मते जाणून घेईपर्यंत राखून ठेवावीत.' *(पत्र क्र. १८)*. महाराज राज्यकारभाराच्या कामात दिवाणांना मोकळीक जरी देत असले, तरी त्याबाबत आगाऊ मार्गदर्शन करत, दक्षता घेत. जेणेकरून त्यांच्याकडून कोणतीही गंभीर चूक होऊ नये.

सयाजीराव महाराजांना इंग्रजांशी ज्या-ज्या वेळी संघर्ष करावा लागे त्यावेळी महाराज दिवाणांकडून त्यांचे अभिप्राय मागवून घेत. त्यात त्यांना अगोदर मार्गदर्शन करत. एकदा संस्थानातील सैनिकांना लाल रंगाचे गणवेश घालण्यास बंदी केली त्यावेळी त्यांनी इंग्रजांना विरोध करण्यापूर्वी त्यांनी पत्राच्या माध्यमातून दिवाणांचा अभिप्राय मागवून घेतला. तसेच त्याबाबत मार्गदर्शनही केले. अशा वेळी अनेक पत्रे महाराज आपल्या वतीने इतरांना लिहिण्यास सांगत. असेच एक पत्र मनुभाई मेहता यांनी तत्कालीन दिवाणांना लिहिले आहे. 'गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने दिल्ली दरबारप्रसंगी व नंतर भारतीय संस्थानिकांच्या सेवकांना व अनुयायांना लाल रंगाचे गणवेश घालण्यावर बंदी घातली आहे. याबद्दल सरकारचा निषेध करावा किंवा कसे यासंदर्भात आपले मत कळवण्याची विनंती करण्यास मला महाराजांनी सांगितले आहे.' *(पत्र क्र. ६८१)*. महाराजांनी यामधून अप्रत्यक्षपणे संस्थानातील अधिकाऱ्यांना या बाबींचा निषेध करावा

यासाठी मार्गदर्शन केले आहे. अशा कठीण प्रसंगी महाराज संस्थानातील महत्त्वाचे अधिकारी यांना विश्वासात घेत. त्या आधी त्यांना मार्गदर्शन करत.

महाराजांनी केलेले मार्गदर्शन हे संस्थानच्या सुधारणेसाठी होते. हे मार्गदर्शन किती महत्त्वाचे हे अत्यंत समर्पक शब्दांत एकनाथ पगारांनी सांगितले आहे. 'सर्व दिवाणांशी झालेला संवाद- पत्रसंवाद म्हणजे महाराजांच्या कारकीर्दीतील प्रशासकीय, खासगी, लौकिक घटनांची इतिहासदृष्ट्या महत्त्वाची सामग्री म्हणावी लागेल. महाराजांचे मुत्सद्दीपण, सत्तासंप्रेषण, आदेशात्मक आणि आत्मगतकथन या पत्रांतून प्रकटते.' *(पगार, संपादक, २०१७, पृ. ३१).* महाराजांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन ही राज्यकारभारात केलेली मदत होती. एका अर्थाने दातृत्व होते.

कोणताही कठीण निर्णय ज्यावेळी दिवाणांना घ्यावा लागे; त्यावेळी महाराज त्यांना फार मौलिक मदत करत. हे महाराजांचे मार्गदर्शन दिवाणांना फार उपयोगी पडे. अशाच काही कठीण प्रसंगी त्यांनी मदत केली. महाराजांनी बडोद्यातील खिचडी आणि ग्यारमी बंद केल्यावर अनेकांनी रेसिडेंटकडे दाद मागितली त्यावेळी महाराजांनी मणिभाई जसाभाई यांना पाठवलेल्या पत्रात या महत्त्वाच्या विषयावर मार्गदर्शन केले. महाराज त्या पत्रात लिहितात, 'खिचडीविषयी पाठवलेली तुमची तार मिळाली. दया आणि सुरक्षेच्या मागणीसाठी ब्राह्मणलोक जसे रेसिडेन्सीकडे धाव घेत आहेत; त्यावरून ते कृतज्ञ नाहीत असे दिसून येते. मी त्या गोष्टीला विशेष महत्त्वही देत नाही; पण जर तसे वागले असतील तर खिचडी ही मदत न राहता तिला वसुलीचे स्वरूप आले आहे, असे म्हणावे लागेल.' *(पत्र क्र. १३३).* महाराज कोणताही निर्णय घेताना त्याबाबत पूर्णपणे विचार करत. पूर्ण विचारांती निर्णय घेतल्यावर त्या संबंधीच्या अडचणी निर्माण झाल्यास महाराज त्याला सडेतोड उत्तर देत. यासंबंधी महाराज नेहमी दिवाणांना मार्गदर्शन करत.

अशाच प्रकारे महाराजांनी बारखळी खात्याची निर्मिती केल्यावर अनेक अडचणी निर्माण झाल्या. त्याबाबत त्यांनी पत्रातून मणिभाई जसभाई यांना आपली याबाबतची भूमिका स्पष्ट केली. बारखळी खात्याबद्दल महाराज दिवाण मणिभाई जसभाई यांना लिहितात, 'बारखळी खात्याचे काम समाधानकारक सुरू असेल, अशी आशा करतो. आपले धोरण सैल सोडू नका किंवा त्यात बदलही करू नका.' *(पत्र क्र. १४०).* बारखळी खात्यामुळे अनेक जमीनदार जे फुकट जमीन कसत होते, त्यांना करपात्र केल्याने महाराजांना रोषाला सामोरे जावे लागले; परंतु महाराजांनी वेळोवेळी याबाबत कठोर भूमिका घेतली. संस्थानातील दिवाण आणि बारखळी खात्याचे प्रमुख मि. इलियट यांना मार्गदर्शन केल्यानेच अशा गुंतागुंतीच्या प्रश्नांवर अधिकाऱ्यांना योग्य तोडगा काढणे शक्य झाले.

महाराजांकडे अनेक तक्रारी आणि विविध मागण्या करण्याचे अर्ज येत. या सर्व अर्जांचा व्यवस्थित पाठपुरवठा होण्यासाठी त्यांनी मणिभाई जसभाई यांना एका पत्रातून मार्गदर्शन केले. ते पत्र अधिकाऱ्यांना केलेल्या मार्गदर्शनाचा आदर्श नमुना ठरावा असा आहे. महाराज लिहितात, 'माझ्या हुजूर कामदार कार्यालयात सुनावणीसाठी आलेल्या सर्व अर्जातील प्रत्येक

शब्दांची नोंद बांधीव पुस्तकात केली गेली पाहिजे. वर्षाच्या शेवटी हुजूर कामदार त्या अर्जाची सुनावणी निकालाबाबत मला माहिती देतील. अर्जाची सुनावणी योग्य वेळेत होण्याविषयीचा ताण माझ्यावर सतत असतो हे वारंवार सांगण्याची गरज नाही. या कामाची सर्वस्वी जबाबदारी हुजूर कामदार असणाऱ्या व्यक्तीवरच आहे. चुकीची दुरुस्ती करणे, त्यात सुधारणा करणे हे त्यांचे कर्तव्य आहे.' *(पत्र क्र. १८६)*. महाराजांना कोणत्याही कामात शिस्त, काटेकोरपणा आणि तात्काळ अंमलबजावणी आवश्यक वाटत होती. त्यामुळे महाराज अशा प्रकारे अधिकाऱ्यांना प्रशासकीय कामाबाबत मार्गदर्शन करत.

महाराजांनी फक्त मणिभाई जसभाई यांनाच मार्गदर्शन केले असे नाही तर प्रत्येक दिवाणांना त्यांनी वेळोवेळी अनेक विषयांवर सखोल आणि प्रजेचे हित कशात आहे याबाबत राजमार्ग सांगितला. अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना अनेक कठीण प्रसंगी मनाचा समतोल कसा जपावा, त्यावेळी आपल्या सदसद्विवेकबुद्धीला अनुसरून निर्णय कसा घ्यावा याविषयी पत्रांतून, प्रत्यक्ष भेटीच्या वेळी किंवा भाषणांतून त्यांना सखोल मार्गदर्शन केले.

दिवाण कार्यालय असेल किंवा इतर कोणत्याही खात्याच्या कामकाजात गती आणण्यासाठी महाराज नेहमीच प्रयत्नशील असल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रांवरून दिसते. त्यांच्या या मार्गदर्शनामुळे प्रशासकीय कामात शिस्त येत असे. त्या-त्या कामाचे नियोजन होत असे. महाराज दिवाणामार्फत सर्व अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवत असत. वारंवार चुका करणाऱ्या अधिकाऱ्यांवर वचक बसेल अशी कारवाई करत किंवा त्याबाबत दिवाणांना मार्गदर्शन करून कामचुकार आणि बेशिस्त अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास सांगत.

महाराजांनी प्रत्येक दिवाणांशी संवाद साधलेला होता. प्रत्येक दिवाण आणि त्यांची कार्यशैली यानुसार त्यांना विविध विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनातून त्यांनी दिवाणांची कार्यक्षमता वाढवली. त्यांना शिस्त लावली. महाराजांचे हे मार्गदर्शन आणि सूचना या प्रशासकीय कामाचा भाग असला तरी त्यातून त्यांना प्रजेचे हित साधावयाचे असल्याने हे एक प्रकारचे दातृत्वच ठरते.

### ३) परदेशातील व्यक्तींना केलेले मार्गदर्शन

सयाजीराव महाराज विद्याव्यासंगाने स्वत:चे ज्ञान नेहमी अद्ययावत ठेवत. त्यामुळे त्यांच्याकडे अनेक व्यक्ती विविध विषयांवर मार्गदर्शन मागत. याबाबत महत्त्वाची बाब अशी की, महाराजांना अनेक महत्त्वाच्या विषयांवर परदेशातील अनेक नामवंत व्यक्ती, मित्र आणि जाणकार व्यक्ती मदत मागत. महाराजही त्यांना ती पुरवत असत. महाराजांची ही मदत नेहमीच जाणीवपूर्वक सद्हेतूने प्रेरित असे.

परदेशातील अनेक व्यक्ती महाराजांचे मित्र होते, तर अनेक परदेशातील अधिकारी त्यांच्या सेवेत असत. परदेशातील अधिकारी अधिक कामसू आणि कार्यतत्पर राहतात असा महाराजांचा विश्वास होता. त्यामुळे असे अनेक अधिकारी महाराजांच्या सेवेत होते. त्यांनाही महाराज पत्रांच्या

माध्यमातून मार्गदर्शन करत. कॅप्टन गॉर्डन यांना लिहिलेल्या पत्रात शिंदे महाराजांना भेटवस्तू घेण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. महाराज लिहितात, 'शिंदे महाराजांसाठी काही भेटवस्तू पाठवावी असा माझा विचार असून, ती वस्तू तुम्ही निवडावी असे मला वाटते. कारण तुमची अभिरुची व निवड ही उच्च दर्जाची आहे, असा माझा विश्वास आहे. कृपया आपण त्यांच्यासाठी बऱ्यापैकी प्रवासी संदूक (कपडे ठेवण्यासाठी) घ्यावी.' *(पत्र क्र. २८९)*. महाराज अशा प्रकारे कोणतीही गोष्ट करताना सर्वोत्तम होण्यासाठी मार्गदर्शन करत.

सयाजीराव महाराजांनी परदेशातील व्यक्तींना केलेले मार्गदर्शन हे काही कारणानिमित्त आहे. त्याचा उपयोग वैयक्तिक कारणांसाठी या व्यक्तींनी करून घेतला आहे. महाराजांचे परदेशातील अनेक मित्र त्यांना विविध विषयांबद्दल आणि त्याविषयीच्या ग्रंथांबद्दल माहिती विचारत. महाराजांचा स्वभाव हा मदत करणारा असल्याने महाराज त्यांना ग्रंथाबद्दल माहिती सांगत किंवा त्या ग्रंथाची प्रत शिल्लक असल्यास पाठवून देत.

### ४) संस्थानिकांना केलेले मार्गदर्शन

सयाजीराव महाराजांनी स्वतःच्या विद्याव्यासंगाने सर्व संस्थानात वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यांचे वाचन आणि जगभरातील प्रवास यामुळे त्यांना देशभरातील अद्ययावत माहिती मिळत असे किंवा महाराज ती मिळवत असत. त्यामुळे हिंदुस्थानातील अनेक संस्थानिक त्यांच्याकडे मार्गदर्शक म्हणून पाहत. त्यांना अनेक बाबतीत सल्ला विचारत. महाराजही अनेक भेटीतून आणि पत्रांच्या माध्यमांतून त्यांना मार्गदर्शन करत. यामध्ये घरगुती प्रश्नांपासून ते इंग्रजांबरोबरील संबंधाबाबत प्रश्न विचारत. महाराज त्यावर सारासार विचार करून मार्गदर्शन करत.

महाराजांनी देवास संस्थानचे महाराज यांना लिहिलेल्या पत्रात त्यांच्या आणि आईच्या ताणलेल्या संबंधाबद्दल उल्लेख केला आहे. महाराज देवासच्या महाराजांना लिहितात, 'काही दिवसांपूर्वी तुमच्या आई येथे आल्या होत्या. त्यांच्याशी चर्चा करताना मला जाणवले की, तुम्हा दोघांमध्ये काही मतभेद आहेत. त्या मला खूप नाराज वाटल्या आणि तुमची कसलीही मदत न घेता त्या बाहेर पडल्या आहेत. त्यामुळे मी तुम्हाला सांगू इच्छितो, की त्यांचा पूर्ण सन्मान केला जावा, तसेच पुरेशा रकमेची तरतूद त्यांच्यासाठी करावी. मला विश्वास वाटतो, की माझ्या या सूचनेमुळे तुमचा गैरसमज होणार नाही. त्यांची तब्येतही तितकीशी बरी वाटली नाही आणि अशा परिस्थितीमध्ये तर ती आणखीनच बिघडेल.' *(पत्र क्र. १९६१)*. महाराजांनी अशा प्रकारे देवास राजघराण्यातील मुलगा आणि आई यांच्यामध्ये सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला.

महाराजांचा ज्या-ज्या राजघराण्याशी चांगला संबंध होता त्या घराण्यातील लोकांना तब्येतीची काळजी घेण्याबद्दल मार्गदर्शन केले होते. महाराज स्वतःही वेगवेगळ्या आजाराने नेहमी त्रस्त असत; परंतु ते यातून लगेच बाहेर येत. त्यामुळे स्वतःच्या अनुभवाचा फायदा इतर राजघराण्यातील लोकांना व्हावा यासाठी महाराज कायमच प्रयत्नशील असल्याचे लक्षात येते. धार संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाई पवार यांना ग्वाल्हेरवरून लिहितात, 'चि.श्री.सौ. सरलाराजे

भोसले यांची प्रकृती चांगली नसल्याचे ऐकून मनास काळजी उत्पन्न झाली आहे. तरी चांगल्या डॉक्टरला दाखवून योग्य औषधोपचार करावा व मधूनमधून त्यांच्या तब्येतीबद्दल हकिगत मला पत्राद्वारे कळवीत जावी.' *(पत्र क्र. २०२५)*. सयाजीराव महाराजांनी हिंदुस्थानातील संस्थानिकांना आणि त्यांच्या राजघराण्यातील लोकांना आरोग्याची काळजी घेण्याबद्दल मार्गदर्शन केले होते.

महाराजांची राजकन्या इंदिराराजे यांनी महाराजांच्या मनाविरुद्ध विवाह केला. त्यामुळे साहजिकच दोघांमध्ये काही काळ दुरावा निर्माण झाला; परंतु हा दुरावा महाराजांनी स्वतःहून दूर करत त्यांना अनेक पत्रे लिहिली. इंदिराराजेंचे पती कुचबिहारचे महाराज यांचा आजारपणात मृत्यू झाला. त्यावेळी महाराजांनी इंदिराराजेंना लिहिलेल्या पत्रांतून राज्यकारभार आणि आरोग्य यासंबंधी वडिलांच्या नात्याने प्रेमळ मार्गदर्शन केले होते.

सयाजीराव महाराजांनी इंदिराराजे यांना त्यांच्या मुलाच्या शिक्षणाबद्दल पत्रातून लिहिले. 'पॅरिसमध्ये तुझ्या मोठ्या मुलाच्या शिक्षणाविषयी आपण सहज केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने मी सुचवू इच्छितो की, त्याला हॅरोमध्ये पूर्ण कोर्स करू द्यावा. तोपर्यंत कदाचित तो एकोणावीस वर्षांचा झालेला असेल. त्यानंतर तो स्वतः ठरवू शकेल की, त्याने सत्ता सांभाळावी, का एखाद्या विद्यापीठात प्रवेश घ्यावा. मग तो प्रवेश पूर्णवेळ किंवा अर्धवेळही असू शकतो. त्याने पदवीसाठी एक वर्ष गांभीर्याने अभ्यास करायला हवा, तर त्याला उत्तम रीतीने एखाद्या चांगल्या कोर्सची पदवी मिळू शकेल.' *(पत्र क्र. २१७१)*. इंदिराराजेंच्या पती निधनानंतर महाराजांनी त्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन केलेले दिसते. साधारणपणे महाराणी जमनाबाई यांच्या मृत्यूनंतर बडोदा राजघराण्यात मार्गदर्शन करण्यास महाराजांशिवाय कोणीही नव्हते; त्यामुळे महाराजांना या सर्व राजकुटुंबाची जबाबदारी सांभाळावी लागली. सर्वांना मार्गदर्शन करावे लागले. त्यामध्ये राजकन्या इंदिराराजेंचाही समावेश होता.

ग्वाल्हेरचे राजघराणे आणि बडोदा राजघराणे यांचे सलोख्याचे संबंध होते. त्यामुळे ग्वाल्हेर राजघराण्यातील मातुःश्री यांना महाराजांनी अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. महाराणी गजराराजे यांना तेथील राजपुत्रांच्या शिक्षणासंबंधी महाराज लिहितात, 'आपण सरदार महाडिक यांच्या हाती पाठविलेले ता. २२/२/१९२८ चे पत्र पावले. मजकूर समजला. चि. महाराजांच्या व राजे श्री. कमलाराजे यांच्या शिक्षणासंबंधी खरी अडचण काय आहे हे मला स्पष्ट समजल्याशिवाय मला निश्चयात्मक सांगता येत नाही. काही जरी असले तरी श्री. बालराजे यांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्यांचा पुढील आयुष्यक्रम त्यावरच अवलंबून आहे.' *(पत्र क्र. २०१६)*. महाराजांनी ज्या प्रकारे इंदिराराजे यांना राजपुत्रांच्या शिक्षणासंबंधी मार्गदर्शन केले होते; अगदी तशाच प्रकारे महाराणी गजराराजे यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. राजपुत्रांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नये यासंबंधी मार्गदर्शन केले.

ग्वाल्हेरच्या महाराणी यांना लिहिलेल्या आणखी एका पत्रात महाराज सर्वांना समजावून सांगण्याची आणि मार्गदर्शनाची किती गरज आहे याबद्दल लिहितात, 'विलायतेहून परत

आल्यावर लोकस्थितीचे निरीक्षण करण्याकरिता सर्व बडोदे प्रांतांमध्ये दौरा केला. ठिकठिकाणी प्रजाजनांना त्यांच्या हितानहितासंबंधी खुल्या दिलाने आणि स्पष्टपणे समजुतीचे चार शब्द सांगितले. 'जे जे आपणांशी ठावे ते ते इतरां शिकवावे, शहाणे करून सोडावे, सकल जन' या उक्तीप्रमाणे मी अहर्निष लोकहित साधण्यासाठी तत्पर असतो. राष्ट्रोद्धारासाठी अशा तपश्चर्येची आवश्यकता फार असते, ही गोष्ट आपणास ठाऊक आहे.' *(पत्र क्र. २१३२)*. सयाजीराव महाराज प्रजेला नेहमीच मार्गदर्शन करत. (प्रजेला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल पुढील भागात सविस्तर माहिती आली आहे.) याबद्दल त्यांनी ग्वाल्हेरच्या महाराणींना अवगत केले.

ग्वाल्हेरचे राजघराणे आणि बडोद्याचे राजघराणे यांचे नातेसंबंध जुळावेत यासाठी महाराज पूर्वीपासून प्रयत्नशील होते; परंतु या ना त्या कारणाने ते घडत नव्हते. ग्वाल्हेर राजपुत्राचे घोरपड्यांच्या मुलीशी जमलेले लग्न मोडले. त्यावेळी महाराजांनी समजूतदारपणे त्यांना मार्गदर्शन केले. 'कोणतेही काम व विशेषत: शरीरसंबंध मोकळ्या मनाने व सर्व बाजूंचा विचार करून करणे सर्वांस लाभकारक आहे. तसे न केल्याने मुलांचे अखेर नुकसान होते. घोरपड्यांची ठरलेली मुलगी बदलण्यास सबब नव्हती. थोर जागा पाहून मुली दिल्याने बाह्यात्कारी उत्तम दिसते; परंतु ते हमेशा सुखकारक निघत नाहीत. बडोद्यात व इतर ठिकाणी याची उदाहरणे मिळतील.' *(पत्र क्र. २०८५)*. सयाजीराव महाराजांनी राजघराण्यातील विवाहाबद्दल मार्गदर्शन केले. याबाबत त्यांनी ग्वाल्हेरच्या राजमातांना दोन-तीनदा पत्रव्यवहार केल्याचे दिसते. यातून त्यांनी वडीलकीच्या नात्याने काही सूचना केलेल्या दिसतात.

महाराजांचे हिंदुस्थानातील समकालीन सर्वच संस्थानिकांबरोबर चांगले संबंध होते. त्यामुळे त्यांनी नातेवाईक, मित्र, संस्थानिक बंधू आणि सर्वांत ज्येष्ठ अनुभवी व्यक्ती असल्यामुळे त्यांनी इतर संस्थानिकांना मार्गदर्शन केले. उपलब्ध कागदपत्रांच्या आधाराने महाराजांनी भोपाळ, बनारस, बिकानेर, कुचबिहार, देवास, धार, गोंडाल, ग्वाल्हेर, इंदूर, जयपूर, कपूरथळा, काश्मीर, मंडी, कोटा, म्हैसूर, पटियाला अशा संस्थानिकांशी पत्राच्या माध्यमातून संवाद साधला होता. तसेच त्यांना वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले होते.

## ५) हिंदुस्थानातील लोकांना केलेले मार्गदर्शन

सयाजीराव महाराज राज्यकारभार करताना सुधारलेल्या समाजाचे स्वप्न पाहत होते. त्यामुळे त्यांनी राज्यकारभाराच्या प्रारंभीपासून प्रजेच्या सुधारणा सुरू केल्या. संस्थानात सुधारणा करताना त्यांना प्रजेकडून चांगल्या प्रतिसादाची अपेक्षा होती. आपण केलेल्या सुधारणेला सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा यासाठी ते बडोदा संस्थानात आणि हिंदुस्थानात इतर ठिकाणी केलेल्या भाषणांत सर्वांना मार्गदर्शन करत. त्यांचे हे मार्गदर्शन एक प्रकारचे दातृत्वच होते.

### शिक्षणाबाबत मार्गदर्शन

सयाजीराव महाराजांना नेहमीच शिक्षणाबाबत आस्था वाटत होती. सर्व प्रजेने शिक्षण घ्यावे यासंबंधी ते नेहमीच मार्गदर्शन करत होते. बडोदे येथे ८ जानेवारी १८७९ रोजी बडोदा

कॉलेजची कोनशिला बसवताना महाराजांनी लोकांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले. त्यावेळी महाराज म्हणाले, 'हिंदुस्थानाला शिक्षण ही वस्तू सर्वतोपरी महत्त्वाचीच आहे. हत्तीएवढ्या दगडांना ज्याप्रमाणे लोखंडाची तरफ हलवून बाजूला करू शकते त्याप्रमाणे असंख्य युगांपासून त्या दगडासारखाच निश्चल पाडून राहिलेल्या या अफाट देशाला हलवू शकणारी, चेतना देऊ शकणारी शिक्षण ही एक तरफच आहे. म्हणून शिक्षणाचा मनःपूर्वक पुरस्कार करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच ठरते.' *(भाषण क्र. ३)*. महाराजांनी संस्थानात शिक्षणाला दिलेल्या महत्त्वामुळे आणि शिक्षण घेण्यासाठी केलेल्या मार्गदर्शनामुळे बडोदा संस्थानात शिक्षणाचा सर्वदूर प्रचार आणि प्रसार झाला.

अलिगढ येथील कॉलेजमध्ये बोलताना महाराजांनी तेथील विद्यार्थ्यांना केलेले मार्गदर्शन महत्त्वाचे आहे. 'आजचे शत्रू निराळे आहेत आणि त्यामुळे आजची आपली लढण्याची साधनेही निराळी झाली आहेत. या दोन्ही गोष्टी अशा बदलल्यामुळे सावधानगिरी व काळजी घेण्याची आपली आवश्यकता अधिकच वाढली आहे. तुमचा आजचा शत्रू अधिक रानटी व चिवट आहे, त्याचे नाव अज्ञान. या अज्ञानाला तुम्ही जिंकलेच तर तुमच्या पूर्वजांनी मागे ठेवली त्यापेक्षा निराळ्याच प्रकारची असली तरी एक प्रकारची कीर्तीच तुम्हीदेखील माग ठेवून जाल, हे नि:संशय.' *(भाषण क्र. २१)*. हिंदुस्थानातील प्रजेला शिक्षणाची नितांत गरज आहे हे महाराजांनी स्वतःच्या शिक्षण काळापासूनच ओळखले होते. त्यामुळे सर्वांनी शिक्षण घ्यावे यासाठी महाराज वारंवार मार्गदर्शन करत. सर्व प्रजेला त्यांनी फक्त शिक्षणासाठी मार्गदर्शन केले नाही तर त्यासाठी संस्थानात सुविधा उपलब्ध करून दिल्या.

महाराजांनी विविध शाळांमधून, महाविद्यालयांतून किंवा लोकांचे उद्बोधन करताना शिक्षणाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांसमोर भाषण करताना शिक्षण किती महत्त्वाचे आहे आणि यामधून कशा प्रकारे स्वतःबरोबर समाजोन्नती आणि देशाची प्रगती होऊ शकते यावर वारंवार मार्गदर्शन केले.

### देशप्रेम

देशातील प्रत्येक व्यक्तीने देशाभिमान बाळगला पाहिजे याबद्दल महाराज सांगत. व्हिक्टोरिया हायस्कूलकडून महाराजांना इ.स. १९०१ मध्ये मानपत्र देण्यात आले होते. या मानपत्राला उत्तर देताना महाराज म्हणाले, 'तुम्ही स्वतःवर जितके प्रेम करता तितकेच दुसऱ्या मनुष्यावरही करीत जा आणि तुमचे सर्व सामर्थ्य खर्चून गरिबांना व अज्ञान्यांना मदत करण्याचा प्रयत्न करा. याहून विशेष म्हणजे स्वदेशाच्या उन्नतीचा प्रश्न हृदयाशी कवटाळून धरून देशाभिमानी व्हा. देशाभिमान हा तुम्हाला वाटतो त्याहून अधिक व विविध अशा हितसंबंधाचा पोशिंदा आहे.' *(भाषण क्र. २२)*. अशाच प्रकारचा उपदेश त्यांनी पाचायाप्पा महाविद्यालयात भाषण करताना दिला. 'उपदेश म्हणून मी तुम्हाला इतकेच सांगेन की, मनुष्यमात्राविषयी मृदू भावना ठेवून वागत चला आणि सत्य, स्वधर्म व स्वदेश यावर भक्ती ठेवा. इतके केल्यावर तुम्हाला सहसा अपयश

येणार नाही, अशी माझी खात्री आहे.' *(भाषण क्र. २५)*. प्रत्येक व्यक्तीने देशाभिमान बाळगला तर त्या देशाची प्रगती लवकर आणि आश्वासक मार्गाने होऊ शकते. याचे उदाहरण देताना ते जपान आणि पाश्चात्त्य पुढारलेल्या देशांची उदाहरणे देतात.

सयाजीराव महाराज नेहमीच देशभक्तीला प्रथम प्राधान्य देत. इ.स. १९१० मध्ये टोकियो, जपान येथील इंडो-जपानीज असोसिएशनतर्फे महाराजांचा सत्कार समारंभ झाला. या सत्काराला उत्तर देताना महाराजांनी त्या देशातील लोकांच्या देशभक्तीची स्तुती केली. त्यावेळी महाराज म्हणाले, 'आता तुमचा एकच विशेष गुण सांगावयाचा उरला. शेवटून सांगितला म्हणून तो फार कमी महत्त्वाचा आहे असे मुळीच नाही. हा तुमचा विशेष गुण म्हणजे तुमचा जाज्वल्य देशाभिमान आणि तुमची राजनिष्ठा.' *(भाषण क्र. ५९)*. सयाजीराव महाराजांनी जपान देशाची प्रगती ही केवळ देशाभिमानामुळे आहे हे ओळखले होते. त्यामुळे त्यांच्या गुणांची कदर केली.

सयाजीराव महाराजांनी देशबांधवांसमोर बोलताना नेहमीच त्यांच्या उत्कर्षासाठी मार्गदर्शन केले. महाराजांनी प्रजेला मार्गदर्शन करताना अस्पृश्य लोकांना मदत, त्यांचा उद्धार, आर्थिक प्रश्न, कला, कौशल्य, उद्योग, व्यावसायिक शिक्षण, कायदेविषयक, कामगार, मजुरांचे प्रश्न, बँका, ग्रंथालय प्रसार, जलसिंचन, जनकल्याणाची कामे, जातीयता, तंत्र-शिक्षण, दारिद्र्य, दुष्काळ निवारण, देशी भाषा, धर्मसुधारणा, पिण्याचे पाणी, जुन्या चालीरीती, परदेशी शिक्षण, हिंदुस्थानातील व्यवसाय, मैदानी खेळ, संस्कार, साहित्यशिक्षण, संशोधन, सामाजिक सुधारणा, सामाजिक एकता, सार्वजनिक आरोग्य, शेती, सार्वजनिक ग्रंथालये, स्वदेशी माल, हस्तकला शिक्षण, हिंदुस्थानातील उद्योग, स्त्री-पुरुष भेदभाव, स्त्रियांचे आरोग्य, सहकारी संस्था आणि त्याचे महत्त्व, शांतता व सुव्यवस्था, शिष्यवृत्त्या अशा एक ना अनेक विषयांवर त्यांनी सखोल आणि उद्बोधक मार्गदर्शन केले.

सयाजीराव महाराजांनी कोणत्याही व्यक्तीला मार्गदर्शन करताना भेदभाव केला नाही. सर्वांना उन्नतीच्या मार्गावर जाण्यासाठी सखोल आणि आपलेपणाने मार्गदर्शन केले. त्यांचे कोणत्याही विषयांवरील मार्गदर्शन हे मानवाच्या उन्नतीसाठी होते. त्यामुळे महाराजांच्या या कार्यातही त्यांची दानशूर वृत्ती पटकन लक्षात येते.

❍❍❍

# परिशिष्टे

# परिशिष्ट १

## श्री सयाजीमालेतून प्रकाशित ग्रंथांची यादी

(सयाजीराव महाराजांनी राज्यकारभाराच्या प्रारंभीच्या कालखंडात मराठी, गुजराती आणि हिंदी या देशी भाषांतून स्वतंत्र, भाषांतरित ग्रंथ तयार व्हावेत यासाठी दोन लाख रुपये वेगळे काढून ठेवले. या मोठ्या रकमेच्या व्याजातून उत्कृष्ट साहित्य निर्मिती व्हावी हा या मागचा प्रधान हेतू होता. या व्याजातून 'श्रीसयाजीसाहित्यमाले'अंतर्गत पुढील ग्रंथांची निर्मिती झाली.)

१) संस्कृत वाङ्मयाचा इतिहास - सी.वा. पेंडसे (१९१५) (मराठी)
२) भूपृष्ठ विचार - क.न. जोशी (१९१७) (गुजराती)
३) अंग्रेज बालजीवन अथवा आपणा लघुबंधू अंग्रेज - ज.पु. जोशीपुरा (१९१७) (गुजराती)
४) अलकानो अद्भूत प्रवास - ज.पु. जोशीपुरा (१९१७) (गुजराती)
५) मा बापने बे बोल - भ.भा. महेता (१९१७) (गुजराती)
६) हिंदुस्थानना देवो - कमळाशंकर त्रिवेदी (१९१७) (गुजराती)
७) नीतिशास्त्र - अ.क. त्रिवेदी (१९१८) (गुजराती)
८) प्रेमानंद - भा.नि. महेता (१९१७) (गुजराती)
९) जगतनो वातीरूप इतिहास - ग्रंथ पहिला - गो.म. शाह (१९१८) (गुजराती)
१०) बालोद्यान पद्धतीचे गृहशिक्षण - वा.गो. आपटे (१९१८) (मराठी)
११) देहधर्मविद्यानां - ल.श्री. दावे (१९१८) (गुजराती)
१२) विज्ञान प्रवेशिका - छोटालाल पुराणी (१९१८) (गुजराती)
१३) जिदगीनो विमो - भो.ज. ओझा (१९१८) (गुजराती)
१४) दयाराम - ज.द. मोदी (१९१८) (गुजराती)
१५) सुधारणा आणि प्रगती - दा.ना. आपटे (१९१८) (मराठी)
१६) वीर पुरुषो - भ.भा. महेता (१९१८) (गुजराती)
१७) उद्भिज्जविद्यानु रेखादर्शन - ल.श्री. दवे (१९१८) (गुजराती)
१८) करोळिया - भा.नि. महेता (१९१९) (गुजराती)
१९) ब्रिटिश राष्ट्रीय संस्थाओ - ह.मा. भट्ट (१९१९) (गुजराती)
२०) मीराबाई - भा.नि. महेता (१९१९) (गुजराती)

२१) शिस्त - कर्नल नानासाहेब शिंदे (१९१८) (मराठी)
२२) प्राणीविद्यानु रेखादर्शन - भा.नि. महेता (१९१८) (गुजराती)
२३) दीघनिकाय भाग-१ - चिं.वै. राजवाडे (१९१८) (मराठी)
२४) पेलेस्टाईननी संस्कृती - सु.रं. घरेखान (१९१८) (गुजराती)
२५) मनुष्यविद्याना तत्त्वो - म.शि. देसाई (१९१८) (गुजराती)
२६) जगतनो वार्तारूप इतिहास (ग्रंथ दुसरा) - गो.म. शाह (१९१९) (गुजराती)
२७) नितीविवेचन - ए.जी. विजरी, अ.क. त्रिवेदी आणि म.मो. झाला (१९१९) (गुजराती)
२८) बालोद्यान पद्धतिनु गृहशिक्षण - भ.भा. महेता (१९१८) (गुजराती)
२९) कॉबेटनी उपदेश - छ.ह. पंड्या (१९१९) (गुजराती)
३०) गिरधर - ज.द. मोदी (१९१९) (गुजराती)
३१) पार्लमेंट - ह.भ. बुच (१९१९) (गुजराती)
३२) तुलनात्मक धर्मविचार - मू.मा. याज्ञिक (१९१९) (गुजराती)
३३) भालण - रा.चु. मोदी (१९१९) (गुजराती)
३४) इतिहासनु प्रभात - वे.जी. अवासिया (१९१९) (गुजराती)
३५) जीवविद्या - छो.बा. पुराणी (१९१९) (गुजराती)
३६) धर्मना मूलतत्वो - रा.का. देसाई (१९१९) (गुजराती)
३७) नैतिक जीवन तथा नैतिक उत्कर्ष - कां.के. नानावटी (१९१९) (गुजराती)
३८) महाराजा शिवाजी - सी.वा. पेंडसे (१९१९) (मराठी)
३९) विविध धर्मानु रेखादर्शन - रा.का. देसाई (१९२०) (गुजराती)
४०) तुलनात्मक भाषाशास्त्र - प्री.न. कच्छी (१९२०) (गुजराती)
४१) हिंदुस्थानचा लष्करी इतिहास व दोस्तराष्ट्रांच्या फौजा - कर्नल नानासाहेब शिंदे (१९२१) (मराठी)
४२) नवीन जापाननी उत्क्रांति - चं.ला. महेता (१९२१) (गुजराती)
४३) उत्तर युरोपनी पुराणकथा - गो.नौ. काजी (१९२१) (गुजराती)
४४) तुकाराम - भ.भा. महेता (१९२२) (गुजराती)
४५) विष्णुदास - भा.नि. महेता (१९२०) (गुजराती)
४६) राजनीती संक्षिप्त इतिहास - के.छो. देसाई (१९२०) (गुजराती)
४७) समाजशास्त्र प्रवेशिका - क.न. जोशी (१९२०) (गुजराती)
४८) बाळ -उछेर - छो.बा. पुराणी (१९२१) (गुजराती)
४९) वीर शिवाजी - मु.नि. महेता (१९२०) (गुजराती)
५०) बाळस्वभाव अने बाळउछेर - हिं.ग. अंजारिया (१९२०) (गुजराती)
५१) शरीरयंत्रनु रेखादर्शन - ल.श्री. दवे (१९२१) (गुजराती)
५२) शाळा अने शिक्षण पद्धती - चु.म. देसाई (१९२०) (गुजराती)

५३) मणिशंकर किकाणी - ज.पु. जोशीपुरा (१९२०) (गुजराती)
५४) संस्कृती अने प्रगती - भ.भा. महेता (१९२१) (गुजराती)
५५) चीननी संस्कृती - गो.म. शाह (१९२०) (गुजराती)
५६) नेपोलियन बोनापार्ट भाग-पहिला - गो.म. शाह (१९२४) (गुजराती)
५७) नेपोलियन बोनापार्ट भाग-दुसरा - गो.म. शाह (१९२४) (गुजराती)
५८) नेपोलियन बोनापार्ट भाग-तिसरा - गो.म. शाह (१९२६) (गुजराती)
५९) नेपोलियन बोनापार्ट भाग-चौथा - गो.म. शाह (१९२६) (गुजराती)
६०) उन्नती विचार, पूर्वार्ध- ज.पु. जोशीपुरा (१९२४) (गुजराती)
६१) प्राचीन हिंदुस्तानमा स्थानिक स्वराज्य - चं.ला. महेता (१९२४) (गुजराती)
६२) दलपतराम - का.मू. दवे (१९२१) (गुजराती)
६३) विद्युत - ह.क. महेता (१९२३) (गुजराती)
६४) सुप्रजनन शास्त्र - न.दे. महेता (१९२३) (गुजराती)
६५) हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास (मध्यविभाग, मराठी रियासत) - गो.स. सरदेसाई (१९२२) (मराठी)
६६) हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास (मध्यविभाग, भाग-२, मराठी रियासत) - गो.स. सरदेसाई (१९२२) (मराठी)
६७) हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास (मध्यविभाग, पानिपत प्रकरण, मराठी रियासत) - गो.स. सरदेसाई (१९२२) (मराठी)
६८) प्राणीसृष्टी - भा.नि. महेता (१९२१) (गुजराती)
६९) हिंदुस्ताननी संस्कृती - म.मो. पोटा (१९२२) (गुजराती)
७०) रसायन प्रवेशिका - ल.श्री. दवे (१९२१) (गुजराती)
७१) उदासीपंथना नीतिवचनो - म.अ. बुच (१९२३) (गुजराती)
७२) समुद्रगुप्त - भ.भा. महेता (१९२१) (गुजराती)
७३) जबाबदार राज्यपद्धती - म.रा. भिडे (१९२१) (मराठी)
७४) मिराबाई - दा.ना. आपटे (१९१३) (गुजराती)
७५) वडोरानु अर्थशास्त्र - रा.रा. पवार (१९२१) (गुजराती)
७६) नीतिविवेचन - कां.के. नाणावटी (१९२२) (हिंदी)
७७) चक्रवर्ती अशोक - ह.भ. बुच (१९२१) (गुजराती)
७८) समुद्रगुप्त - र.अं. छाया (१९२२) (गुजराती)
७९) इंग्रजी शिष्टाचार - चिं.वि. जोशी (१९२३) (गुजराती)
८०) तुलनात्मक धर्मविचार - आ.रा. पंडित (१९२१) (गुजराती)
८१) सत्यमीमांसा - ह.व्र. श्रॉफ (१९२१) (गुजराती)
८२) रोमनो इतिहास - भ.भा. महेता (१९२३) (गुजराती)

८३) पार्लमेंट - दा.ना. आपटे (१९२४) (मराठी)
८४) सनईवादन-पाठमाला (पुस्तक तिसरे) - ग.पी. वसईकर (१९२२) (मराठी)
८५) सनईवादन-पाठमाला (पुस्तक चौथे) - ग.पी. वसईकर (१९२२) (मराठी)
८६) अवतार रहस्य - शां.आ. पंडित (१९२२) (हिंदी)
८७) नागरिकांची कर्तव्ये - कृ.गं. गोगटे (१९२३) (मराठी)
८८) सजीव सृष्टीची उत्क्रांती - स.ना. दातार (१९२४) (मराठी)
८९) प्राचीन हिंदमानी केळवणी - भ.भा. महेता (१९२३) (गुजराती)
९०) मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया - जनरल नानासाहेब शिंदे (१९२२) (मराठी)
९१) यामिक प्रदीप - स.वि. आपटे (१९२४) (गुजराती)
९२) सहकार्य अने राष्ट्रीय जीवन - अं.का. पटेल (१९२४) (गुजराती)
९३) हिंदुस्थानमा क्षयरोग - म.छो. परीख (१९२४) (गुजराती)
९४) बडोद्याचे मराठी साहित्य - ग.रं. दंडवते (१९२५) (गुजराती)
९५) मल्लविद्या - म.शि. देसाई (१९२५) (गुजराती)
९६) नृकुलविद्या - म.शि. देसाई (१९२५) (मराठी)
९७) मनोधर्मविद्याना मूलतत्वो - हि.क. बक्षी (१९२५) (गुजराती)
९८) अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्र - वि.स. वाकसकर (१९२५) (मराठी)
९९) सृष्टीनी बाल्यावस्था - क.न. जोशी (१९२५) (गुजराती)
१००) आयुर्वेदनी संक्षिप्त इतिहास - भा.नि. मेहता (१९२५) (गुजराती)
१०१) अशोकना शिलालेखी - भ.भा. महेता (१९२६) (गुजराती)
१०२) सामर्थ्यु विज्ञान - म.छो. परीख (१९२६) (गुजराती)
१०३) हिंदुस्थानना लोको अने प्रश्नो -प्र.चं. दिवाणजी (१९२६) (गुजराती)
१०४) शेक्सपिअर - चं.म. डॉक्टर (१९२६) (गुजराती)
१०५) जातिस्वभाव शतक (पूर्वार्ध) - शि.ल. बारोट (१९२६) (गुजराती)
१०६) जातिस्वभाव शतक (उत्तरार्ध) - शि.ल. बारोट (१९२६) (गुजराती)
१०७) अकबर - बा.जा. वैष्णव (१९२६) (गुजराती)
१०८) स्थानिक स्वराज्यनी संस्थाओ - रा.रा. पवार (१९२७) (गुजराती)
१०९) वडोदरा राज्यनो इतिहास - चु.म. देसाई (१९२६) (गुजराती)
११०) लंडन निवासिनी केळवणी - न.शि. शास्त्री (१९२६) (गुजराती)
१११) इटलीनु जीवनप्रभात - ल.श्री. दवे (१९२७) (गुजराती)
११२) तत्त्वज्ञानावरील कूटप्रश्न - दा.ना. आपटे (१९२७) (मराठी)
११३) सुबोधकथामाला - दा.गो. चिपळूणकर (१९२७) (मराठी)
११४) प्रजनन शास्त्र - ग.ना. मोडक (१९२७) (मराठी)
११५) इंग्लंड अने हिंदुस्थान - स.भी. दिवेटिया (१९२७) (गुजराती)

११६)  सरोवरना जीवो - भा.नि. महेता (१९२७) (गुजराती)
११७)  सूर्य- ब.ह. बोरा (१९२७) (गुजराती)
११८)  सिद्धांत दर्शन - छो.न. भट्ट (१९२७) (गुजराती)
११९)  मुक्या मुलांचे गृहशिक्षण - पां.रा. नंदुरबारकर (१९२७) (मराठी)
१२०)  कादंबरीची गोष्ट - ग.रं. दंडवते (१९२७) (मराठी)
१२१)  हिंदुस्तानना लोको - चं.अं. छाया (१९२७) (गुजराती)
१२२)  परिवर्तनवाद - द.जे. धोळकिया (१९२८) (गुजराती)
१२३)  हिंदुस्थानच्या इतिहासांतील गोष्टी - म.मु. जोशी (१९२८) (मराठी)
१२४)  निकाबळ - म.न. महेता (१९२८) (गुजराती)
१२५)  अर्वाचीन आर्या भाषाओनी तुलना - प्री.नृ. कच्छी (१९२८) (गुजराती)
१२६)  मराठी रियासत (मध्य विभाग भाग-१) - भ.भा. महेता (१९२८) (गुजराती)
१२७)  पं. जगन्नाथराय चरित्र व संगीत गंगालहरी - रा.मा. भांबुरकर (१९२८) (मराठी)
१२८)  चीन देशातील सुधारणा - रा.ना. पाटणकर (१९२८) (मराठी)
१२९)  जुवानीनी चावी - चु.म. देसाई (१९२८) (गुजराती)
१३०)  आपणु प्राचीन राजतंत्र  (राजाप्रजाना धर्मी) - मू.मा. याज्ञिक (१९२८) (गुजराती)
१३१)  धनविद्या - म.म. परीख (१९२८) (गुजराती)
१३२)  श्रीमद् भगवद्गीता भाग-१ (श्री शंकरानंदी टीका सहित) - मो.र. धोडा (१९२८) (गुजराती)
१३३)  वल्लभ (प्रेमानंदसुत) - ग.ला. पंड्या (१९२८) (गुजराती)
१३४)  समाजशास्त्रना सिद्धांतो - कुमारी सविता त्रिवेदी (१९२८) (गुजराती)
१३५)  वेदमाधुर्य अथवा रुद्राष्टाध्यायी - पु.जो. भट्ट (१९२८) (गुजराती)
१३६)  गर्भविद्या - प्रा.प्र. बक्षी (१९२८) (गुजराती)
१३७)  जर्मन साम्राज्याची पुनःस्थापना - वि.ग. आपटे (१९२८) (मराठी)
१३८)  मुंबई इलाख्यातील जाती - गो.मं. कालेलकर (१९२८) (मराठी)
१३९)  चंद्रगुप्त मोर्य -ज.पु. जोशीपुरा (१९२८) (गुजराती)
१४०)  केटलाक रोगो (भाग-पहिला) - चं.से. द्विवेदी (१९२८) (गुजराती)
१४१)  नेलसननु जीवनचरित्र - हि.ह. गणात्रा (१९२८) (गुजराती)
१४२)  नाणु - र.उ. पंड्या (१९२८) (गुजराती)
१४३)  मधुमक्षिका अने भ्रमर - इं.द. देसाई (१९२८) (गुजराती)
१४४)  चीनकी संस्कृती - शां.आ. पंडित (१९२८) (गुजराती)
१४५)  उत्तर हिंदना संगीतनो इतिहास - वि.शि. देसाई (१९२८) (गुजराती)
१४६)  खेतीना उपद्रवो - छो.उ. पटेल (१९२८) (गुजराती)
१४७)  केटलाक रोगो (भाग-दुसरा) - चं.से. द्विवेदी (१९२८) (गुजराती)
१४८)  लग्न अने भविष्यनी माता - मो.न. शाह (१९२८) (गुजराती)

१४९) संस्कृतिनी उत्पत्ती - र.व. देसाई (१९२८) (गुजराती)
१५०) आदर्शकुमार - अ.चु. मोदी (१९२८) (गुजराती)
१५१) विद्याशाळा - हिं.क. बक्षी (१९२८) (गुजराती)
१५२) हिंदुस्थानना इतिहासनी बातो - भ.भा. महेता (१९२८) (गुजराती)
१५३) गुजराती बहेनो प्रत्ये त्रण लेखो - चैतन्यबाळा मजमुदार (१९२८) (गुजराती)
१५४) तरवानी कळा - श्री.मु. महेता (१९२९) (गुजराती)
१५५) अर्वाचीन मराठी वाङ्मय- ग.रं. दंडवते (१९२९) (मराठी)
१५६) शिक्षणनो शास्त्रार्थ - म.द. शास्त्री (१९२९) (गुजराती)
१५७) सामाजिक सुखरूपता - चि.भो. गांधी (१९२९) (गुजराती)
१५८) भूरचना - मो.उ. अलमौला (१९२९) (गुजराती)
१५९) श्रीमद्भगवद्गीता भाग-२ - मो.र. घोडा (१९२९) (गुजराती)
१६०) इंद्रधनुष्य - दा.ना. आपटे (१९२९) (मराठी)
१६१) माटीनो प्राकृतिक इतिहास - के.ना. दीक्षित (१९२९) (गुजराती)
१६२) प्रगतिने ग्रंथे - प्रे. पंड्या आणि शि. पंड्या (१९२९) (गुजराती)
१६३) कसरत अने आरोग्य - प्रो. माणिकराव (१९२९) (गुजराती)
१६४) मानसशास्त्रनी दृष्टिअ शिक्षणकला - शा.सा. ओझा (१९२९) (गुजराती)
१६५) रोग अने आरोग्य - से.मा. दवे (१९२९) (गुजराती)
१६६) बाळकेळवणी - बा.जा. वैष्णव (१९२९) (गुजराती)
१६७) संगीत प्रणालिकाओ - वि.शि. देसाई (१९२९) (गुजराती)
१६८) आहारशास्त्र - अ.भा. महेता (१९२९) (गुजराती)
१६९) वैयासिक न्यायमाला - छो.न. भट्ट (१९२९) (गुजराती)
१७०) मोन्टेसरी पद्धतिनो आत्मा - न.सि. देसाई (१९२९) (गुजराती)
१७१) फलझाडनो बगीचो - मा.शि. पंड्या (१९२९) (गुजराती)
१७२) ताराशास्त्र - छे.म. हाथी (१९२९) (गुजराती)
१७३) सामाजिक उत्कांति - प्र.छ. दीक्षित (१९२९) (गुजराती)
१७४) महिपतराम - भा.नि. महेता (१९३०) (गुजराती)
१७५) आर्यांग्ल जंतुशास्त्र - ग.शा. गोखले (१९३०) (गुजराती)
१७६) राजनितीशास्त्राची मूलतत्त्वे - भा.त्रि. काळे (१९३०) (मराठी)
१७७) भगवद्गीता भाग -३ - मो.र. घोडा (१९३०) (गुजराती)
१७८) लिंगविचार - चं. से. द्विवेदी (१९३०) (गुजराती)
१७९) स्वयंप्रेरणा - र.अं. छाया (१९३०) (गुजराती)
१८०) ग्रामजीवनमा सहकार्य - के.अं. ठक्कर (१९३०) (गुजराती)
१८१) ग्रामहिंदनी पुनर्घटना - ठा.मो. देसाई (१९३०) (गुजराती)

१८२) ऋग्वेद संहिता (अष्टक पहिले) - मो.र. घोडा (१९३०) (गुजराती)
१८३) वैद्यकीय कायदाशास्त्र - बा.ग. वैद्य (१९३०) (गुजराती)
१८४) मंगोपार्क नी मुसाफरीओ - सु.ना. भट्ट (१९३०) (गुजराती)
१८५) प्राचीन बाबिलोनिया - म.मो. पोटा (१९३०) (गुजराती)
१८६) जातकांतील निवडक गोष्टी (प्रथमार्थ) - चिं.वि. जोशी (१९३०) (मराठी)
१८७) कौटीलिय अर्थशास्त्र - ज.पु. जोशीपुरा (१९३०) (गुजराती)
१८८) भूत अने वर्तमान उद्भिज्ज सृष्टीओनो संबंध - ल.श्री. दवे (१९३०) (गुजराती)
१८९) शिक्षणमा भावप्राधान्यवाद - भ.न. पंड्या (१९३०) (गुजराती)
१९०) बालक, त्याची प्रकृती आणि संवर्धन - वा.गो. आपटे (१९३०) (मराठी)
१९१) नरसिंह महेता - ज.पु. जोशीपुरा (१९३१) (गुजराती)
१९२) पाश्चात्य तत्त्वज्ञान - द.गो. केतकर (१९३१) (मराठी)
१९३) महाराष्ट्र नाट्यकला व नाट्यवाङ्मय - ग.रं. दंडवते (१९३१) (मराठी)
१९४) जिवबा दादा केरकर - के.मं. रांगणेकर (१९३१) (मराठी)
१९५) ऋग्वेद संहिता (अष्टक पहिले उत्तरार्ध) - मो.र. घोडा (१९३१) (गुजराती)
१९६) दीघनिकाय (भाग-२) चिं.वै. राजवाडे (१९३१) (मराठी)
१९७) आलमगीर के पत्र - शांतीप्रिय आत्माराम पंडित (१९३१) (हिंदी)
१९८) जगतनी राजनीति अने हिंद - वि.का. भूता (१९३१) (गुजराती)
१९९) युरोपना प्रसिद्ध शिक्षण सुधारको - वि.व. त्रिवेदी (१९३२) (गुजराती)
२००) धर्मोनी बाल्यावस्था - चु.म. देसाई (१९३१) (गुजराती)
२०१) कळाविषे प्रवचनो - मं.ज. त्रिवेदी (१९३१) (गुजराती)
२०२) बौद्धधर्म अर्थात धर्मचिकित्सा - रा.ना. पाटणकर (१९३२) (मराठी)
२०३) विषतंत्र - ग.शा. गोखले (वैद्य) (१९३२) (गुजराती)
२०४) केटलाक रोगो (भाग-३) - चं.से. त्रिवेदी (१९३२) (गुजराती)
२०५) वीरशैव संस्कृति - शं.गो. साखरपेकर आणि स्वा.रा. करमाळेकर यांच्या मराठी पुस्तकाचा अनुवाद (१९३१) (गुजराती)
२०६) अर्थशास्त्र - के.हि. कामदार (१९३२) (गुजराती)
२०७) सहकारमीमांसा - के.अं. ठक्कर (१९३२) (गुजराती)
२०८) अमेरिकाना संयुक्त राज्यो - म. डॉक्टर (१९३२) (गुजराती)
२०९) कुदरतनु अवलोकन - मा.शि. पंड्या (१९३२) (गुजराती)
२१०) मनुष्य भ्रमण - म.शि. देसाई (१९३२) (गुजराती)
२११) सुलभ नीतिशास्त्र - दा.ना. आपटे (१९३३) (मराठी)
२१२) किडरगार्डन शिक्षा - श्रीराम शर्मा (१९३२) (गुजराती)
२१३) नीतिशास्त्रप्रबोध - दा.ना. आपटे (१९३३) (मराठी)

२१४) तक्रकल्प अथवा छाशसेवनविधि - हरिप्रसाद वैद्य (१९३३) (गुजराती)
२१५) विद्युत - ना.का. आपटे (१९३३) (गुजराती)
२१६) केळवणी : तेना पाया अने सिद्धांतो - सुरेंद्र पाठकजी तथा भालचंद्र व्यास (१९३३) (गुजराती)
२१७) नरसिंह महेता - दा.ना. आपटे (१९३३) (मराठी)
२१८) महासागर - भा.नि. महेता (१९३३) (गुजराती)
२१९) कबीर साहेबनु बीजक (रेमनी विभाग) - प्रा.प्र. बक्षी (१९३३) (गुजराती)
२२०) केनेडानु जबाबदार राजतंत्र - ची.म. डॉक्टर (१९३३) (गुजराती)
२२१) विजयमंत्र याने फतेहनी चावी - ना.ना. शाह (१९३३) (गुजराती)
२२२) उद्भिज्जोनी उत्क्रांति - ल.श्री. दवे (१९३३) (गुजराती)
२२३) तंजावरचे मराठे राजे - वि.स. वाकसकर (१९३३) (मराठी)
२२४) राजा छबीलाराम बहादूर - मा.पी. महेता (१९३३) (गुजराती)
२२५) कुडमुनी ज्ञानामृत - हरिप्रसाद शास्त्री (१९३३) (हिंदी)
२२६) मज्जातंतुनु बळ - गौ.मो. भट्ट (१९३४) (मराठी)
२२७) लौकिक दंतकथा - गो.मं. कालेलकर (१९३४) (मराठी)
२२८) प्राचीन युद्धविद्या - कृ.वि. वझे (१९३४) (मराठी)
२२९) मेगास्थिनीसना समयनु हिंद - चु.बे. भट्ट (१९३४) (गुजराती)
२३०) इटालीमां नवचेतन - न.सि. देसाई (१९३४) (गुजराती)
२३१) इत्सिंगना समयनु हिंद - भा.मे. देसाई (१९३४) (गुजराती)
२३२) ग्राम्य हिंदमां उत्कर्ष - र.अं. छाया (१९३५) (गुजराती)
२३३) भगवान बुद्धचरित्र व धर्मसारसंग्रह - रा.मा. भांबुरकर (१९३४) (मराठी)
२३४) श्री ऋग्वेद संहिता (अष्टक दुसरे पूर्वार्ध) - मो.र. घोडा (१९३४) (गुजराती)
२३५) सरळ राज्यशास्त्र - ज्यो.मा. महेता (१९३५) (गुजराती)
२३६) प्राचीन पूर्व - द.इ. पाठक (१९३५) (गुजराती)
२३७) वेपारनी चावी - भ.भा. महेता (१९३५) (गुजराती)
२३८) हिंदनी सफरे निकळेला वहाणवटीओ - देवेंद्र मुजुमदार (१९३५) (गुजराती)
२३९) एका शिपायाचे आत्मवृत्त - जनरल नानासाहेब शिंदे (१९३५) (मराठी)
२४०) जगातील विद्यमान धर्म - रा.बा. आठवले (१९३५) (मराठी)
२४१) जुनी गुजराती भाषा - च.पु. पटेल (१९३५) (गुजराती)
२४२) जगतना विद्यमान धर्मो - गो.ह. भट्ट (१९३६) (गुजराती)
२४३) ऋग्वेद संहिता (अष्टक २ रे उत्तरार्ध) - मो.र. घोडा (१९३६) (गुजराती)
२४४) जगातील काही धर्मप्रवर्तक - भा.चिं. लेले (१९३६) (मराठी)
२४५) कबीर साहेबनुबीजक : शब्दविभाग - प्रा.प्र. बक्षी (१९३६) (गुजराती)

२४६) बुद्धकालीन भारतीय समाज - ना.गो. कालेलकर (१९३६) (मराठी)
२४७) प्राथमिक शाळाना शिक्षकनो साथी - चु.बे. भट्ट (१९३६) (गुजराती)
२४८) भारतीय समाजस्थिती (वात्सायनकालीन) - वि.पां. दांडेकर (१९३७) (मराठी)
२४९) केमिलो काबुर - वि.व. त्रिवेदी (१९३७) (गुजराती)
२५०) पुनर्जन्म विरुद्ध पुनर्जनन - एस.जी. भालेराव (१९३७) (मराठी)
२५१) महाराष्ट्रीय इतिहासना मुख्य वलण - म.मो. पोटा (१९३७) (गुजराती)
२५२) प्राच्य आणि पाश्चात्त्य नितीध्येये - चि.ह. कर्वे (१९३७) (मराठी)
२५३) धर्मना उत्पत्ती विकास - अ.क. त्रिवेदी (१९३७) (गुजराती)
२५४) विज्ञानना विधायको (गणित, भौतिक विज्ञान आणि खगोल - छो.बा. पुराणी (१९३७) (गुजराती)
२५५) धर्म, उद्गम आणि विकास - कृ.पां. कुलकर्णी (१९३७) (मराठी)
२५६) प्राणीओना शुभाशुभ लक्षण - ल.वि. ऋषि (१९३८) (गुजराती)
२५७) हिंदुस्थानना जुदा जुदा शक - मं.से. दवे (१९३८) (गुजराती)
२५८) विद्युत - दे.म. शास्त्री (१९३८) (गुजराती)
२५९) केळवणीनी कळा - सुरेंद्र पाठकजी (१९३८) (गुजराती)
२६०) भारतीय समाजशास्त्र - चि.म. डॉक्टर (१९३८) (मराठी)
२६१) ग्राम्य हिंदनो विशेष उत्कर्ष - गो.म. शाह (१९३९) (गुजराती)
२६२) भाषाविज्ञान प्रवेशिका - बचुभाई शुक्ल (१९३९) (गुजराती)
२६३) शीघ्र साहित्यदर्श - वा.कृ. भावे (१९३९) (मराठी)
२६४) जीवन अने विज्ञान - र.के. त्रिवेदी (१९३९) (गुजराती)
२६५) श्री. ऋग्वेद संहिता अष्टक : ३ (विभाग पहिला) - मो.र. घोडा (१९३९) (गुजराती)
२६६) पूर्व अने पाश्चिमना नैतिक ध्येयो - मं.र. मुजुमदार (१९३९) (गुजराती)
२६७) काव्यनि शक्ती - रा.वि. पाठक (१९३९) (गुजराती)
२६८) साहित्यविमर्श - रा.वि. पाठक (१९३९) (गुजराती)
२६९) मारु जीवन अने कार्यक्षेत्र - रमणलाल देसाई, रा.वि. पाठक (१९४०) (गुजराती)
२७०) धर्म की उत्पत्ती और विकास - रामचंद्र वर्मा (१९४०) (हिंदी)
२७१) ह्युअेनसंग - दे.र. मुजुमदार (१९४०) (गुजराती)
२७२) साहित्यप्रकाश - दा.ना. आपटे (१९४०) (मराठी)
२७३) ग्राम्यपुनर्घटना - छ.का. पटेल (१९४१) (गुजराती)
२७४) मराठी नाट्यसृष्टी - वि.पां. दांडेकर (१९४१) (मराठी)
२७५) नामदेव चरित्र - ज.र. आजगावकर (१९४१) (मराठी)
२७६) दक्षिणायन - त्रि.पु. लुहार (१९४१) (गुजराती)
२७७) बडोद्याचा राज्यकारभार - वि.पां. नेने (१९४१) (मराठी)

२७८) ब्रह्मदेश - र.रं. गौतम (१९४२) (गुजराती)
२७९) प्रौढशिक्षण - उपेंद्र शर्मा व ज. त्रिवेदी (१९४२) (गुजराती)
२८०) नाट्यनिबंध - वा.वि. जोशी (१९४२) (मराठी)
२८१) खांडनी कथा - बी.एन मांकड (१९४२) (गुजराती)
२८२) पितापुत्रसंबंध - य.रा. दाते (१९४३) (मराठी)
२८३) श्रीमंत सयाजीराव गायकवाड भाग -१ - चि.म. डॉक्टर (१९४३) (गुजराती)
२८४) श्रीमंत सयाजीराव गायकवाड भाग -२ - चि.म. डॉक्टर (१९४३) (गुजराती)
२८५) गुजराती साहित्यनी रूपरेखा - वि.क. वैद्य (१९४३) (गुजराती)
२८६) सुखनी शोध - वि.स. गोगटे (१९४३) (गुजराती)
२८७) भारतीय तर्क शास्त्र प्रवेश - द्रुपदकुमार एस. देसाई (१९४३) (गुजराती)
२८८) ऐतिहासिक पोवाडे (खंड-२) - य.न. केळकर (१९४३) (मराठी)
२८९) वृत्तवेचन - र.रं. गौतम (१९४५) (गुजराती)
२९०) मराठी नाट्यसृष्टी (सामाजिक नाटके) - वि.पां. दांडेकर (१९४५) (मराठी)
२९१) विविध व्याख्यानो (गुच्छ-पहिला) - ब.क. ठाकोर (१९४५) (गुजराती)
२९२) बँक आणि त्यांचे कारभार - चिं.वि. जोग (१९४६) (मराठी)
२९३) सुधारणा सुख व सदाचार - न.चिं. केळकर (१९४५) (मराठी)
२९४) श्रीमन्नुसिंहाचार्यजी - म.मो. देसाई (१९४६) (गुजराती)
२९५) सागर : जीवन अने कवन - यो.ज. त्रिपाठी (१९४६) (गुजराती)
२९६) द्वारका - क.न. जोशी (१९४६) (गुजराती)
२९७) कापडनी कहाणी - कां.म. गांधी (१९४६) (गुजराती)
२९८) मुसलमान पूर्व महाराष्ट्र - वा.कृ. भावे (१९४६) (मराठी)
२९९) मुद्रणकला - ग.पां. विजापुरे (१९४७) (मराठी)
३००) दिव्य प्रेमदर्शन - प्रा.प्र. बक्षी (१९४७) (गुजराती)
३०१) नूतन मानसविज्ञान - चं.का. भट्ट (१९४७) (गुजराती)
३०२) महाराष्ट्र - वि.पां. दांडेकर (१९४७) (गुजराती)
३०३) भ्रमण - र.रं. गौतम (१९४८) (गुजराती)
३०४) राजपुत्रनु शिक्षण - बा.जा. वैष्णव (१९४८) (गुजराती)
३०५) विविध व्याख्यानो (गुच्छ-२) - ब.क. ठाकोर (१९४८) (गुजराती)
३०६) फारसी साहित्यनो इतिहास - एम.एफ. लोखंडवाला (१९४८) (गुजराती)
३०७) पावित्र्य विडंबनाचा वाद - ग.वा. कवीश्वर (१९४८) (मराठी)
३०८) उत्तरापथ - र.रं. गौतम (१९५१) (गुजराती)
३०९) आत्मवृत्तांत - गो.ह. भट्ट (१९५१) (गुजराती)
३१०) प्राचीन कविओ अने तेमनी कृतीओ - र.श्री. देसाई (१९४९) (गुजराती)

३११) सागरनी पत्ररेखा - गो.द्वा. रायचुरा आणि यो.ज. त्रिपाठी (१९५०) (गुजराती)
३१२) राज्याभिषेक ग्रंथ - गो.ह. भट्ट (१९५०) (गुजराती)
३१३) राज्याभिषेक चंद्रिका - दा.ना. आपटे (१९५१) (मराठी)
३१४) आत्मवृत्तांत (छोटालाल नरभेराम भट्ट) - गो.ह. भट्ट (१९५०) (गुजराती)
३१५) भारतीय संस्कृती : एक विहंगावलेखन - र.व. देसाई (१९५४) (गुजराती)
३१६) मराठी साहित्याची रूपरेखा - वि.पां. दांडेकर (१९५२) (मराठी)
३१७) आहारविज्ञान - जयप्रकाश पाठक आणि अनंतराय रावळ (१९५४) (गुजराती)
३१८) दलपतराम - एक अद्ययन - हसित बुच (१९५५) (गुजराती)
३१९) श्रीवल्लभाचार्य महाप्रभुजी - के.का. शास्त्री (१९५५) (गुजराती)
३२०) वैदक संगीत अने अन्य लेखो - वि.शि. देसाई (१९५६) (गुजराती)
३२१) दक्षिण कैलास दर्शन - स्वामी प्रणवतीर्थजी (१९५७) (गुजराती)
३२२) गुजरात - एक दर्शन - शि.बी. राजगोर (१९५७) (गुजराती)
३२३) वडोदरा राज्यनी साहित्य प्रवृत्तिओ - भ.भा. महेता आणि र.श्री. देसाई (१९५७) (गुजराती)
३२४) विज्ञानविनोद - पो.गो. शाह (१९५७) (गुजराती)
३२५) रेवाने तीरे तीरे - मं.र. मजमुदार (१९५८) (गुजराती)
३२६) कहेवत - कथानको - स्वामी प्रणवतीर्थजी (१९५८) (गुजराती)
३२७) प्रो. त्रिभुवनदास कल्याणदास गज्जरनी जीवनकथा - अ.मा. त्रिवेदी, सा.द. शाह आणि र.के. शाह (१९६०) (गुजराती)
३२८) गुजराती भाषाशास्त्र (भाग-१, खंड - ३) - के.का. शास्त्री (१९६०) (गुजराती)
३२९) आपणु विश्व - छोटूभाई सुतार (१९६०) (गुजराती)
३३०) आपणी खनिज संपत्ती - न.मू. शाह (१९६१) (गुजराती)
३३१) भारतीय संस्कृति - कि.एस. याज्ञिक (१९६३) (गुजराती)
३३२) मीराबाई : एक नमन - मं.र. मजमुदार (१९७५) (गुजराती)
३३३) कैलास - स्वामी प्रणवतीर्थजी (१९६२) (गुजराती)
३३४) अंबिका, काटेश्वर अने कुंभारिया - क.भा. दवे (१९६३) (गुजराती)
३३५) ऐतिहासिक लेखसंग्रह - ला.भ. गांधी (१९६३) (गुजराती)
३३६) श्री हरिभद्रसूरि - ही.र. कपाडिया (१९६३) (गुजराती)
३३७) मानवर्सिजत वस्त्रतंतुओ - प.र. शाह (१९६४) (गुजराती)
३३८) भवाईना वंशनी वार्ताओ - भ.भा. महेता (१९६३) (गुजराती)
३३९) श्रीमद्भागवत भा.१ स्कंध (१-३) - अनुवाद ना.अ. पंड्या (१९६५) (गुजराती)
३४०) गुजरात स्थळनाम संसद व्याख्यानमाला भाग - १ संपादक - भो.जे. सांडेसरा (१९६५) (गुजराती)

३४१) आधुनिक गुजरातना संतो - के.अं. ठक्कर (१९६६) (गुजराती)
३४२) कुदारतनी रीते वधु आरोग्य - शां.प्र. पुरोहीत (१९६७) (गुजराती)
३४३) भारतरत्न (महाभारतना सूक्तिरत्नोनु समालोचन) - उ.ज. सांडेसरा (१९६३) (गुजराती)
३४४) महागुजरतना मुसलमानो (भाग-१ व २) - क.म. मास्तर (१९६९) (गुजराती)
३४५) ओखा मंडळ वाघेर - क.न. जोशी (१९६९) (गुजराती)
३४६) पेट्रोलियम - प.र. शाह (१९७०) (गुजराती)
३४७) पंचदर्शी - तात्पर्य - स्वामी श्रीप्रणवतीर्थजी (१९७१) (गुजराती)
३४८) अखो अने मध्यकालीन संतपरंपरा - योगेंद्र ज. त्रिपाठी (१९७२) (गुजराती)
३४९) श्रीमद्भागवत भा. २ स्कंध (४-६) - अनुवाद ना.अ. पंड्या (१९७२) (गुजराती)
३५०) चरकनी स्वाध्याय (भाग - १) बा.ग. वैद्य (१९७३) (गुजराती)
३५१) गुजरातनो पोटरी उद्योग - शां.प्र. पुरोहित (१९७५) (गुजराती)
३५२) उंडाणनो ताग - छोटूभाई सुथार (१९७५) (गुजराती)
३५३) भारतीय वीणा - र.एम. पंड्या (१९७८) (गुजराती)
३५४) चरकनो स्वाध्याय (भाग - २) बा.ग. वैद्य (१९७९) (गुजराती)
३५५) चांपानेर - एक अध्ययन - र.ना. महेता (१९७९) (गुजराती)
३५६) द्वारकाना प्रदेशनो सांस्कृतिक इतिहास - क.न. जोशी (१९७९) (गुजराती)
३५७) आधुनिक गुजरातना संतो (भाग - २) - के.अं. ठक्कर (१९७९) (गुजराती)
३५८) सूर्यशक्ती - प.र. शाह (१९८१) (गुजराती)
३५९) कवि गिरधर -जीवन अने कवन - देवदत्त जोशी (१९८१) (गुजराती)
३६०) वनौषधि कोश - के.का. शास्त्री (१९८२) (गुजराती)
३६१) सहस्त्रिंलग अने रुद्रामहालय - क.भा. दवे (१९८३) (गुजराती)
३६२) वैष्णवतीर्थ डाकोर - मं.रं. मजमूदार (१९८४) (गुजराती)
३६३) वृद्धत्रयी अने लघुत्रयी - बा.ग. शाह (१९८४) (गुजराती)
३६४) महाराजा सयाजीराव त्रीजा - ह.ह. बुच (१९८८) (गुजराती)
३६५) नाभाजीकृत भक्तमाळाना ऐतिहासिक भक्तो : एक अध्ययन - मू.ही. केवलिया (१९८८) (गुजराती)
३६६) परमतेज लेसर - प.र. शाह (१९९०) (गुजराती)
३६७) सदर पुस्तक तयार नाही.
३६८) अर्वाचीन संस्कृत साहित्यनो इतिहास - अ.जे. रावळ (१९९२) (गुजराती)
३६९) मंजुळ विमर्श - ज.प्र. ठाकर (१९९१) (गुजराती)
३७०) प्राणविहस्तोत्रोना रोगो : श्वास, दम - म.ब्र. वैद्य (१९९५) (गुजराती)
३७१) वडोदराणा मंदिरो - मं.एम. ओझा (१९९५) (गुजराती)
३७२) भवाई : स्वरूप अने लक्षणो - कृ.ओ. कडकिया (१९९६) (गुजराती)

३७३) श्रीमदउपेन्द्राचार्यजी - लवकुमार देसाई (१९९६) (गुजराती)

३७४) नाभाजीकृत भक्तमाळना ऐतिहासिक भक्तो (एक अध्ययन भाग-२) - मू.ही. केवलिया (१९९८) (गुजराती)

३७५) भवाई : भक्ती, रस अने आहार्य : कृ.ओ. कडकिया (२००३) (गुजराती)

३७६) प्लेटोना केटलाक संवादो - ह.एम. जोशी (२००४) (गुजराती)

(टीप - वरील सूचीत फक्त 'श्रीसयाजीसाहित्यमाले'मधून प्रकाशित झालेल्या ग्रंथांची यादी दिली आहे. सयाजीराव महाराजांनी याशिवाय क्रीडामाला, पाकशास्त्रमाला, राष्ट्रकथामाला, सयाजीज्ञानमंजूषा, लघुज्ञानमंजूषा, महाराष्ट्र-ग्रंथमाला, धर्मशास्त्र-ग्रंथमाला, नाट्यकथार्णव, महाराष्ट्र काव्यग्रंथमाला, विविधविषयकग्रंथमाला, बालसंगीतमाला, प्राचीनकाव्यमाला या आणि इतरही मालांमधून वेगवेगळ्या विषयांवर ग्रंथांची निर्मिती केली.)

# परिशिष्ट २

# सयाजीराव महाराजांचा राजाश्रय लाभलेले मराठी लेखक

१) अभ्यंकर
२) अलोनी ना.के.
३) आचार्य
४) आठवले रा.स.
५) आपटे दा.ना.
६) आपटे वा.गो.
७) आंबेगावकर नी.का.
८) इंदारकर कृ.रा.
९) इस्लामपूरकर वा.
१०) उपाध्याय व्यं.न.
११) उपाध्याय शा.न.
१२) एनापुरे वि.बा.
१३) ओक वि.को.
१४) कदम ना.रा.
१५) कदम ह.ल.
१६) कर्वे वि.धो.
१७) कवठेकर वि.ल.
१८) काथवटे ना.आ.
१९) कीर्तिकर कान्होबा र.
२०) कुडाळकर ज.स.
२१) केळकर नरहर आ.
२२) केळकर न.चिं.
२३) केळुसकर कृ.अ.
२४) खांडेकर ना.धो.
२५) खासगीवाले जो.भा.
२६) गणपतराव आप्पाजी
२७) गद्रे ना.कृ.
२८) गांगनाईक भा.के.
२९) गायकवाड संपतराव
३०) गायकवाड सी.रा.
३१) गुर्जर
३२) गुणे जगन्नाथ ग.
३३) गुप्ते भ.र.
३४) गोखले नी.ग.
३५) गोखले रा.ह.
३६) गोगटे कृ.गं.
३७) गोत्री का.ना.
३८) गोलतकर स.ह.
३९) गोऱ्हे चं.शि.
४०) ग्रंथसंपादक आणि प्रसारक मंडळी
४१) घाणेकर ल.गो.
४२) चांदोरकर
४३) चापेकर
४४) चापेकर ग.वि.
४५) चापेकर श्री.नी.
४६) चिपळूणकर दा.गो.
४७) चिपळूणकर वि.गो.
४८) छत्रे आ.मो.
४९) जडे रा.वि.
५०) जोग वि.रा.

५१) जोगळेकर द.रा.
५२) जोगळेकर कृ.म.
५३) जोशी चिं.वि.
५४) जोशी ना.गो.
५५) जोशी म.मु.
५६) टाकळकर अ.वा.
५७) डोंगरे शं.गो.
५८) तट्टू या.ना.
५९) तांबे ग.कृ.
६०) तांबे गो.रा.
६१) दंडवते ग.रं.
६२) दत्तात्रेय
६३) दातार स.मा.
६४) दाते वि.स.
६५) दाते य.रा.
६६) दामले मो.के.
६७) दीक्षित ग.के.
६८) देव सी.वा.
६९) देवधर अ.बा.
७०) देशपांडे गो.न.
७१) धनुर्धारी
७२) धुरंधर कृ.वि.
७३) धोंड सा.कृ.
७४) नंदुरबारकर पां.रा.
७५) नवलकर ह.ना.
७६) नाडकर्णी मं.क.
७७) नातू वि.र.
७८) नेने वि.पां.
७९) पंडित ज.प्र.
८०) पंडित क.मो.
८१) पंडित ना.भा.
८२) पंडित प्र.रा.
८३) पंडित भा.ना.
८४) परांजपे के.बा.
८५) परांजपे गं.बा.
८६) परांजपे वि.वि.
८७) पवार बा.वा.
८८) पवार रा.रा.
८९) पांडे आ.आ.
९०) पारनाईक ल. त्रंबक
९१) पाळेकर भ.ब.
९२) पावगी रा.भ.
९३) पुणेकर के.भ.
९४) पुणेकर रा.वि.
९५) पुराणिक शं.वि.
९६) पेंडसे सी.वा.
९७) फडके सी.म.
९८) फळनीकर
९९) फाळके शि.म.
१००) बापट ना.वि.
१०१) बापट वि.वा.
१०२) बापट स.ग.
१०३) बिर्जे वा.लि.
१०४) बेंजामिन सी.
१०५) बेलवलकर ह.स.
१०६) बोडस म.रा.
१०७) भांगले धो.ज.
१०८) भागवत अ.ना.
१०९) भाटवडेकर भा.कृ.
११०) भाटवडेकर वि.कृ.
१११) भांबुरकर रा.मा.
११२) भोसले बा.के.
११३) मटंगे ह.पु.
११४) मराठे ब.रा.
११५) मनोहर शि.स.
११६) महाजगी वि.मो.

११७) माणिकराव ग.य.
११८) माने लक्ष्मणराव
११९) माने पाटील रा.शा.
१२०) मिरज संस्थानाधिपती
१२१) मुजुमदार चिं.ना.
१२२) मुजुमदार ड.चिं.
१२३) मुजुमदार स.ग.
१२४) मोडक बा.प्र.
१२५) रांगणेकर के.
१२६) रामतनय
१२७) राहुकर भा.ग.
१२८) रेशमवाला पी.
१२९) रोकडे श्री. जनाबाई
१३०) राजवाडे चिं.वै.
१३१) राजे रा.आ.
१३२) लेले ग.अ.
१३३) लिमगावकर वि.स.
१३४) लिमये ह.वा.
१३५) वैद्य ग.भा.
१३६) वैद्य गो.अ.
१३७) वैद्य चिं.वि.
१३८) वैद्य वा.रा.
१३९) वर्तक बा.पां.
१४०) वसइकर ग.पी.
१४१) विद्वांस धों.के.
१४२) वासुदेवानंदसरस्वती
१४३) शास्त्री अ.ना.
१४४) शाह के.पु.
१४५) शिर्के शि.द.
१४६) शिंदे नानासाहेब
१४७) संत कृ.रा.
१४८) सनाढय तो.
१४९) सरदेसाई गो.स.
१५०) सहविचारणी सभा
१५१) सहस्रबुद्धे ह.मा.
१५२) सुरतकर कृ.य.
१५३) सेन्ट्रल लायब्ररी

या सूचीत सयाजीराव महाराजांचा राजाश्रय आणि मदत लाभलेल्या फक्त मराठी लेखकांचा समावेश केला आहे. यामध्ये गुजराती, हिंदी, संस्कृत आणि इंग्रजी साहित्यिकांचा समावेश नाही.

# परिशिष्ट ३

# गायकवाड ओरियेंटल सिरीजमधून प्रकाशित ग्रंथ

### A) GAEKWAD'S ORIENTAL SERIES (GOS)

1) KAVYAMIMAMSA of Rajasekhara, ed. C. D. Dalal and R. Shastri, 3 editions -1916, 1924, 1934, (3rd Edition, Revised and enlarged, Reprinted, 1934), Rs. 25/-
2) NARANARAYANANANDA of Mahamatya Vastupala, ed. C.D. Dalal and Anantakrishna Sastry 1916, Rs. 1.40
3) TARKASANGRAHA by Anandajnana or Anandagiri, ed. T.M.Tripathi, 1917, Rs. 2/-
4) PARTHAPARAKRAMAVYAYOGA by Prahladanadeva, ed. C. D. Dalal, 1917, Rs. 6/-
5) RASTRAUDHAVAMSA by Rudra Kavi, ed. Embar Krishnamacharya, 1917, Rs. 1.12
6) LINGANUSASANA by Vamana, ed. C.D. Dalal, 1918, Rs. 0.80
7) VASANTAVILASA by Vatsaraja, ed. C.D. Dalal,1917, Rs. 1.80
8) RUPAKSATAKA by Vatsaraja, ed. C.D. Dalal, 2 editions -1918, 1972, Rs. 35/-
9) MOHAPARAJAYA by Yasapala, ed. Muni Caturvijayaji,1918, Rs.2/-
10) HAMMIRAMADAMARDANA by Jayasimhasuri, ed. C.D. Dalal, 1920, Rs. 20/-
11) UDAYASUNDARIKATHA by Soddhala, ed. C.D. Dalal & Embar Krishnamacharya, 1920, Rs. 2.40
12) MAHAVIDYAVIDAMBANA by Bhatta Vadindra, ed. M.R. Telang, 1920. Rs. 2.80
13) PRACINAGURJARAKAVYASANGRAHA, ed. C.D. Dalal, 1920, Rs. 20/-

14) KUMARAPALAPRATIBODHA by Somaprabhacarya,
ed. Jinavijayaji, 1920, Rs. 225/-

15) GANAKARIKA by Bhasarvajna, ed. C.D. Dalal, 2 editions -1920, 1966, Rs. 7/-

16) SANGITAMAKARANDA by Narada, ed. M.R. Telang, 1920, Rs.3/-

17) KAVINDRACARYAGRANTHASUCI (List of Sanskrit works in the Collection of Kavindracarya, a Benares Pandit-1656 AD)
ed. R.Anantakrishna Sastry, 1921 (price not mentioned)

18) VARAHAGRHYASUTRA, ed. R. Shamasastry, 1921,
(price not mentioned)

19) LEKHAPADDHI (Collection of Model Documents),
ed. C.D. Dalal and G.K. Shrigondekar, 1925, Rs. 2/-

20) BHAVISAYATTAKAHA (PANCAMIKAHA) by Dhanapala,
ed. C.D. Dalal and P.D. Gune, 2 editions -1923, 1967, Rs. 6/-

21) JESALMERABHANDAGARIYA-GRANTHASUCI
(A Descrip tive Catalogue of the Palm-Leaf and important Paper Mss. in the Bhandaras at Jesalmer) Compiled by C.D. Dalal,
ed. L.B. Gandhi, 1923, Rs. 3.40

22) PARASURAMAKALPASUTRA with Ramesvara's Commentary,
ed. A. Mahadeva Shastry, 3 editions - 1923, 1950, 1979, Rs. 116/

23) NITYOTSAVA by Umanandanath, ed. A. Mahadeva Shastry,
(5 editions) 1923,second revised and enlarged edition by Swami Trivikrama Tirtha in 1930, 1948, 1977, 2000 , Rs. 175/-

24) TANTRARAHASYA by Ramanujacarya, ed. R. Shamasastry,
2 editions -1923, 1956, Rs. 1/-

25) SAMARANGANASUTRADHARA (GOS-32 also)
by King Bhoja of Dhara, ed. T. Ganapati Shastri in 2 Vols, Vol. I-1924, Vol. II-1925, second revised edition edited by V. S. Agarwal in 1966 (both Vols combined in one book as No. 25), Rs. 30/-

26) SADHANAMALA (GOS-41 also) in 2 Vols.( Illustrated),
ed. B. Bhattacharya, Vol. I 1925, Vol. II 1928, both reprinted in 1968, Vol. I-2010 Rs. 300/-, Vol. II-2011 Rs. 325/-

27) VADODARARAJKIYAGRANTHSUCI (GOS-96 also)
(A Descriptive Catalogue of Mss. in the Central Library, Baroda), Vol. I ed. G.K. Shrigondekar and K.S. Ramaswami Shastri, 1925, Rs. 6/-

28) MANASOLLASA OR ABHILASITARTHACINTAMANI (GOS-84 & 138 also)in 3 Vols by Somesvaradeva, ed. G.K. Shrigondekar, Vol. I 1925, 1967 (2 editions), Rs. 16/-, Vol. II-1939, 2001, (2 editions) Rs.330/-, Vol. III 1961, Rs.

29) NALAVILASA by Ramacandrasuri, ed. G.K. Shrigondekar and L.B.Gandhi, 1926, Rs. 2.40

30) TATVASANGRAHA (GOS-31 also) by Santaraksita with Panjika by Kamalasila in 2 Vols, ed. Pandit Embar Kirshnamacharya, Vol I-2 editions -1926,( reprint) 1984, Rs. 142 /-

31) TATVASANGRAHA by Santaraksita with Panjika by Kamalasila, ed. Pandit Embar Kirshnamacharya, (see No. 30), Vol. II, 1926, (reprint) 1984, Rs. 240/-

32) SAMARANGANASUTRADHARA by King Bhoja of Dhara, ed. T. Ganapati Shastri, Vol, I 1924, Vol. II 1925, 1966 - 2 editions (see No. 25)

33) MIRAT-E-AHAMADI (GOS-34, 50 & 146 also) in 4 Vols (first 2 Vols Illus.) by Ali Mahammad Khan, ed. Syed Nawab Ali, Vol. I - 1928, Rs. 7.80

34) MIRAT-E-AHAMADI (English Translation of Mirat-i-Ahmadi by M.F. Lokhandwala-GOS NO. 146, 1965) by Ali Mahmmad Khan, ed. Syed Nawab Ali, Vol. I - 1928, Vol. II - 1927, Rs. 12/-

35) MANAVAGRHYASUTRA with Bhasya of Astavakra, ed. Ramkrishna Harshji Sastri, 1926, Rs. 5/-

36) NATYASASTRA (GOS-68, 124 & 145 also) of Bharata with com mentary of Abhinavagupta, Vol.I - ed. R.Kavi- 4 editions 1926, 1956, 1980, revised 4th ed. by. K. Krishnamutri in 1994, Rs. 345/-; Vol II- ed. R. Kavi , 2 editions - 1934, revised ed. by V. M. Kulkarni & Tapasvi Nandi in 2006, Rs. 450/-; Vol. III- ed. R.Kavi- 2 editions -1954, revised ed. by V. M. Kulkarni & Tapasvi Nandi in 2003,

Rs.400/-; Vol. IV, ed. R. Kavi & J.S. Pade , 2 editions - 1964, revised ed. by V. M. Kulkarni & Tapasvi Nandi in 2006, Rs. 640/-

37) APABHRAMSAKAVYATRAYI by Jinadatta Suri, ed. L.B. Gandhi,1927, Rs. 35/-

38) NYAYAPRAVESA - Part I Sanskrit Text, ed. A.B. Dhruva, 2 editions -1930,1968, Rs. 1.80

39) NYAYAPRAVESA - Part II Tibetan Text, ed. Vidhushekrara Bhattacharya, 1927, Rs. 1.80

40) ADVAYAVAJRASANGRAHA by Advayavajra, ed. Haraprasad Shastri, 2 editions -1927, (Reprint) 2014, Rs. 220/-

41) SADHANAMALA , ed. B. Bhattacharya, Vol. II , 2 editions - 1928, (Reprint) 2011, Rs. 325/-(see No.26 also)

42) KALPADRUKOSA (GOS-60 also) by Kesava, ed. Ramavatar Sharma, Vol. I (text), 1928, Rs. 10/-

43) MIRAT-E-AHAMADI-PARISISTA by Ali Mahammad Khan, Translated into English by Syed Nawab Ali and C. N. Seddon, 1928, Rs. 6.80

44) VAJRAYANAGRANTHADVAYA (two Vajrayana works) comprising Prajnopayaviniscayasiddhi of Anangavajra and Jnanasiddhi of Indrabhuti, ed. B. Bhattacharya, 1929, Rs. 3/-

45) BHAVAPRAKASANA of Saradatanaya, ed. Yadugiri Yatiraja and K.S. Ramaswami Shastri, 2 editions -1930, 1968, Rs.45/-

46) RAMACARITA of Abhinanda, ed. E.Krishnamacharya, 1930, Rs.7.80

47) NANJARAJYASOBHUSANA by Nrsimhakavi, ed. G.K. Shrigondekar and L.B. Gandhi, 1930, Rs. 5/-

48) NATYADARPANA by Ramacandra and Gunacandra, ed. G.K. Shrigondekar and L.B. Gandhi, 3 editions -1929, 1959, 1999, Rs. 195/-

49) PRACINABAUDDHATARKAGRANTHA (Pre-Dinnaga Bud dhist-texts on Logic from Chinese Sources) By Giuseppe Tucci, 1929, Rs.9/-

50) MIRAT-E-AHAMADI-PARISISTA (supplement) by Ali Muhammad Khan, ed. Syed Nawab Ali, 1930, Rs.6/-

51) TRISASTISALAKAPURUSACARITRA of Hemacandra (GOS-77, 108, 125, 139 & 140 also), Eng. Trans. by Helan M. Johnson, in 6 Volumes, Vol. I, 1931, Vol. II, 1937, Vol. III, 1949, Vol. IV, 1954, Vol. V, 1962, Vol. VI, 1962, Vol. I Rs. 15/-
52) DANDAVIVEKA by Kamala Krisna Smrtitirtha, 2 editions - 1931, 1967, Rs. 8.80
53) TATHAGATAGUHYAKA or GUHYASAMAJATANTRA, ed. B. Bhattacharya, 2 editions - 1931, 1967, Rs. 24/-
54) JAYAKHYASAMHITA, ed. Pandit E. Krishnamacharya, 2 editions - 1931, 1967, Rs. (?)
55) KAVYALAMKARASARASANGRAHA of Udbhata, ed. K.S. Ramaswami Shastri, 1931, Rs. 2/-
56) PARANANDASUTRA, ed. Swami Trivikrama Tirtha, 1931, Rs. 3.80
57) AHASAN-UT-TAVARIKH (GOS-69 also) by Hasan-i-Rumlu, ed. C.N. Selddon - (Persian text and English Translation in 2 Vols), Vol. I, 1931, Rs.11/- , Vol. II, 1934
58) PADMANANDAMAHAKAVYA by Amaracandra Kavi, ed. H. R.Kapadia, 1932, Rs. 14/-
59) SABDARATNASAMANVAYAKOSA, ed. Vitthala Sastri, 1932, Rs. 11/-
60) KALPADRUKOSA by Kesava, ed. Ramavatar Sharma ,Vol. II (Index), 1932,Rs. 4/- (see No.42 also)
61) SAKTISANGAMATANTRA (GOS-91, 104 & 166 also), in 4 Vols. ed. B. Bhattacarya, Vol. I, Kalikhanda, 1932, Rs. 2.80
62) PRAJNAPARAMITA ,ed. Giuseppe Tucci, in 2 Vols, Vol. I, Ahisamayalankaraloka of Haribhadra, 1932, Rs.12/-
63) TARIKH-E-MUBARAKSAHI, Eng. Tran. by Kamal Krishna Basu, 1932, Rs. 7.80
64) SIDDHANTABINDU by Madhusudana Sarasvati, ed. P.C. Devanji, 1933, Rs. 11/-
65) ISTASIDDHI of Vimuktatma with author's own comm., ed. M. Hiriyanna,1933, Rs. 14/-

66) SABARABHASYA (GOS-70, 73 & 103 also), Translated in English by Ganganath Jha, in 4 Vols, Vol. I- 2 editions -1933,1973, Vol. II- 2 editions - 1934,1973, Vol. III - 2 editions -1936, 1974,
Vol.-IV- Index to English translation bu Umesh Mishra -1945;
Vol I Rs.

67) BALIDVIPAGRANTHA ( SANSKRIT TEXT FROM BALI ),
ed. Sylvain Levi, 1933, Rs. 3.80

68) NATYASASTRA of Bharata with commentary of Abhinavagupta, in 4 Vols, Vol. II , ed. R. Kavi 1934, revised ed. by V. M. Kulkarni & Tapasvi Nandi in 2006, Rs. 450/-

69) AHASAN-UT-TAVARIKH by Hasan-i-Rumlu, ed. C.N. Seddon, Vol. II, 1934, Rs. 8.80 (see No. 57 also)

70) SABARBHASYA, Translated in English by Ganganath Jha,
Vol II, 1934, 1973, Rs. 75/-

71) NARAYANASATAKA by Vidyakara, ed. Shrikant Sharma, 1935, Rs. 2/-

72) RAJADHARMAKAUSTUBHA by Anantadeva, ed. Kamala Krishna Smrtitrirtha, 1935, Rs. 10/-

73) SABARBHASYA, Translated in English by Ganganath Jha, in 4 Vols, Vol. III -1936, 1974, Rs. 75/-

74) PORTUGEESESABDAKOSA (Portuguese Vocables in Asiatic Languages), Translated into English by A.X. Soares, 1936, Rs. 12/-

75) NYAYARATNA - A commentary by Ramanuja with the text of Nayakaratnamala of Parthasarathi Misra of the Prabhakara School, ed. K.S. Ramaswami Shastri, 1937, Rs. 4.80

76) PATTANABHANDAGARIYAGRANTHASUCI
(A Descriptive Catalogue of Mss. in the Bhandaras at Pattan)
by L.B. Gandhi, in 2 Vols, Vol. I -1937, Rs. 8/-

77) TRISASTISALAKAPURUSACARITRA of Hemacandra,
Eng. Trans. by Helan M. Johnson, in 6 Vols , Vol. I, 1931, Vol. II, 1937, Vol. III, 1949, Vol. IV, 1954, Vol. V, 1962, Vol. VI, 1962,
Vol II- Rs. 11/-(see No. 51,108,125,139,140 also)

78) GANITATILAKA of Sripati, with com. of Simhatilaka, ed. H.R. Kapadia, 1937, Rs. 4/-

79) KURANASABDAKOSA (The Foreign Vocabulary of the Quran) Compiled by Arthur Jeffery, 1938, Rs. 12/-

80) TATTVASANGRAHA of Santaraksita, with com. of Kamalasila (GOS-83 also), Translated by Ganganatha Jha, ( in 2 Vols.), Vol. I- 2 editions - 1937,1987, Rs. 217/-

81) HANSAVILASA of Hamsamitthu, ed. Swami Trivikrama Tirtha and Hathibhai Shastri, 1937, Rs. 5.80

82) SUKTIMUKTAVALI of Jalhana, ed. E. Krishnamacharya, 1938, Rs. 207/-

83) TATTVASANGRAHA of Santarakista, with com. of Kamalasila, Translated in English by Ganganath Jha (in 2 Vols.), Vol. II - 2 editions, 1939, 1991, Rs. Rs.240/- (see no. 80)

84) MANASOLLASA-ABHILASITARTHACINTAMANI by Somesvaradeva, ed. G.K. Shrigondekar (in 2 Vols), Vol. II - 2 editions - 1939, 2001, Rs. 330/- (see No. 28)

85) BRHASPATISMRTI, ed. K.V. Rangaswami Aiyangar, 1941, Rs. 15/-

86) PARAMASAMHITA - A work of Pancaratra system, ed. & Translated by S. Krishnaswami Aiyangar, 1940, Rs. 8/-

87) TATTVOPAPLAVASIMHA, ed. & translated by Sukhalalji Sanghavi and R.C. Parekh, 1940, Rs. 4/-

88) ANEKANTAJAYAPATAKA of Haribhadrasuri, ed. H.R. kapadia, in 2 Vols. (GOS-105 also), Vol I -1940, Rs. 10/-

89) SASTRADIPIKA of Tarkapada, Translated in English by S. Krishnaswami Aiyangar,1940, Rs. 5/-

90) SEKODDESATIKA - A Buddhist ritualistic work of Nadapada (Naropa), ed. Mario E. Caselli,

91) SAKTISANGAMATANTRA, ed. B. Bhattacarya (in 4 Vols), Vol. II, Tarakhanda 1941, Rs. 3/-( see No. 61,104,166 also)

92) KRTYAKALPATARU of Laksmidhara ( in 14 Vols) (see GOS 98, 100, 101, 102, 106 110, 111, 112, 119, 123 & 167 also), Vol V, ed. K.V. Rangaswami Aiyangar, 1941, Rs.9/-

93) MADHAVANALAKAMAKANDALA of Ganapati,
ed. M.R. Majumdar, in 2 Vols. , Vol I- 1942, 1981, Rs. 45/-

94) TARKABHASA of Moksakara Gupta, ed. E. Krishnamacharya, 1942, Rs. 2/-

95) ALANKARAMAHODADHI by Narendraprabha Suri,
ed. L.B. Gandhi, 1942, Rs. 7.80

96) VADODARARAJKIYAGRANTHASUCI (A Descriptive Catalogue of Mss. in the Central Library, Baroda), Vol. II by
K.S. Ramaswami Shastri, 1945, Rs. 6.40 (see No. 27).

97) PRACYAVIDYAMANDIRASTHAGRANTHANAM SUCI
(in 4 Vols) (An Alphabetical list of Mss. in the Oriental Institute, Baroda, (GOS-114, 178 & 186 also) Vol. I -1942, Rs. 420/- ;
Vol. II - 1950, - Rs. 500/- ,Compiled by Raghavan Nambiyar;
Vol. III - P.H.Joshi and B.P. Pandya , 1998, Rs. 670/-,
Vol. IV - Usha Brahmachari & Sweta Prajapati , 2008, Rs. 515/-

98) KRTYAKALPATARUH of Laksmidhara,
ed. K.V. Rangaswami Aiyangar, in 14 Vols. Vol. VIII, 1942, Rs.8/-

99) VIVADACHINTAMANI of Vacaspati Misra,
Translated into English by Ganganath Jha, 1942, Rs. 10.40/-

100) KRTYAKALPATARU of Laksmidhara,
ed. K.V. Rangaswami Aiyangar in 14 Vols., Vol XI, 1943, Rs. 10/-, (see No. 92)

101) KRTYAKALPATARU of Laksmidhara,
ed. K.V. Rangaswami Aiyangar, in 14 Vols, .Vol II- 1944, Rs. 12/-, (see No. 92)

102) KRTYAKALPATARU of Laksmidhara,
ed. K.V. Rangaswami Aiyangar, in 14 Vols. Vol XIV, 1945, Rs. 12/-, (see No. 92)

103) SABARBHASYA, Translated in English by Ganganath Jha,
(See No.66 also) in 4 Vols, Vol IV, Index to the English of Sabara-Bhasya by Umesha Mishra, 1945.Rs. 1/-

104) SAKTISANGAMATANTRA, ed. B. Bhattacarya, Vol. III,
Sundarikhanda, 1947 Rs. 3/-

105) ANEKANTAJAYAPATAKA of Haribhadrasuri, ed. H.R. Kapadia, in 2 Vols.,( See No. 88 also ) Vol II- 1947, Rs. 18/-

106) KRTYAKALPATARU of Laksmidhara, ed. K.V. Rangaswami Aiyangar, in 14 Vols, Vol I -1948, Rs. 11/-, (see No. 92)

107) PANCAPADIKA of Padmapada, ed. D. Venkataramiah, 1948, Rs.17/-

108) TRISASTISALAKAPURUSACARITRA of Hemacandra, Eng. Trans. by Helan M. Johnson, in 6 Vols, (See No. 51 also) Vol. III, (Book 4&5 )1949, Rs. 27/-

109) NISPANNAYOGAVALI of Abhayankaragupta, ed.B. Bhattacharya, 2 editions - 1949, 1972, Rs. 25/-

110) KRTYAKALPATARU of Laksmidhara in 14 Vols,( see No. 92 ) Vol- IV -1950, Rs. 15/-

111) KRTYAKALPATARUH of Laksmidhara in 14 Vols,(see No. 92) Vol. III - 1950, Rs. 19.80/-

112) KRTYAKALPATARUH of Laksmidhara in 14 Vols. , (see No. 92) Vol. 10 - 1950, Rs. 9.60/-

113) HETUBINDUTIKA ,Comm. of Arcata, ed. Sukhalal ji Sanghavi and Muni Jinavijayaji, 1949, Rs. 11/-

114) PRACYAVIDYAMANDIRASTHAGRANTHANAM SUCI (An Alphabetical list of Mss. in the Oriental Institute, Baroda) in 4 Vols., (See No. 97 also ) Vol. II- compiled by Raghavan Nambiar, 2 editions - 1950, 1999, Rs. 500/-

115) APARAJITAPRICCHA of Bhuvanadeva, ed. P.A. Mankad, 2 editions - 1950, 2008, Rs. 510/-

116) DVADASARANAYACAKRA of Mallavadisuri, ed. Caturvijayaji and L. B. Gandhi, Vol. I- 1952, Rs. 12.12

117) MADANAMAHARNAVA of Visvesvara Bhatta, ed. E. Krishnamacharya and Raghavan Nambiyar, 1953, Rs. 24/-

118) GURJARARASAVALI, ed. B.K. Thakore, M.D. Desai and M.C. Modi, 1956, Rs. 33/-

119) KRTYAKALPATARUH of Laksmidhara, (See No. 92) in 14 Vols. Vol. XII- 1953, Rs. 26.12/-

120) PARAMANANDAKAVYA of King SamBhaji ed. G.S. Sardesai, 1952, Rs. 10/-

121) DHURTASVAMIBHASYA in 2 Vols ( see No. 92 ), ed. Mm. Chinnasvami Sastri, (GOS-142 also), Vol. I- 1955, Rs. 20/- Vol. II-1963, Rs. 12/-

122) RELHA OF IBN BATUTA, Eng. Trans. by Mahdi Hussain, 1953, 1976, Rs. 100/-

123) KRUTYAKALPATARU of Laksmidhara, in 14 Vols. Vol. VI- 1953, Rs. 17/-( See No. 92 )

124) NATYASASTRA of Bharata with commentary of Abhinavagupta in 4 Vols.( See No. 36 ), Vol.III- ed. R.Kavi, 2 editions - 1954, revised ed. by V. M. Kulkarni & Tapasvi Nandi in 2003, Rs. 400/-

125) TRISASTISALAKAPURUSCARITRA of Hemacandra, Eng. Trans. by Helan M. Johnson in 6 Vols, (See No. 51) Vol.IV - 1954, Rs. 35/-

126) RAGATATTVAVIBODHA of Srinivasa, ed. V.S. Desai, 1956, Rs.

127) VYAVAHARAKANDAPRASTAVANA - KRTYAKALPATARU (Introduction to Vyavaharakanda of Krtyakalpataru of Laksmidhara), ed. K.V. Rangaswami Aiyangar, 1958, Rs. 10.50

128) SANGITCUDAMANI by Jagadekamalla, ed. Velankar Shastri, 1958, Rs. 6.50

129) VALMIKIRAMAYANAPADASUCI (Pada-Index of Valmiki- Ramayana), ed. G.H. Bhatt, 2 Vols. (GOS- 153 also) Vol. I - 1961, Rs. 25/-

130) VISNUDHARMOTTARAPURANA - KHANDA III , ed. Priyabala Shah, 2 Vols. (GOS- 137 also), Vol. I - Text 1958, 1994, Rs. 212/- Vol. II- Introduction, 1961, Rs.

131) VINALAKSANA of Parmeswara and VINAPRAPATHAKA, ed. J.S. Pade, 1959, Rs. 3.50

132) ULLAGHARAGHAVANATAKA of Somesvara, ed. Muni Punyavijayaji and B.J. Sandesara, 1961, Rs. 10/-

133) SANGITOPANISATSARODDHARA of Vacanacarya Sudhakalasa, ed. U.P. Shah, 1961,Rs. 10/-

134) SANSKRITAVYAKARANAKOSA
(Dictionary of Sanskrit Grammar) compiled by K.V. Abhyankar,
4 editions, first edition 1961, Second ed. by J.M. Shukla 1977,
Third ed.(Reprint)1986, fourth ed. (Reprint)2012, Rs.380/-

135) SANTINATHABHANDAGARIYA GRANTHASUCI
(Descriptive Catalogue of Palm-leaf Mss. in Santinatha Bhandara,
Cambay) ed. Muni Shri Punyavijayaji, 2 Vols. (GOS-149 also),
Vol. I 1961, Rs. 15/-

136) VAISESIKASUTRA, ed. Muni Shri Punyavijayaji, 2 Vols. 1961,
Second ed. 1982, Rs. 25/- (old price).

137) VISNUDHARMOTTARAPURANA, ed. Priyabala Shah, 2 Vols.,
Vol. II Introduction etc. 1961, Rs. 20/-

138) MANASOLLASA-ABHILASITARTHACINTAMANI
by Somesvaradeva, ed. G.K. Shrigondekar in 3 Vols (see No. 28 also)
Vol. III, 1961, Rs. 18/-

139) TRISASTISALAKAPURUSACARITRA of Hemacandra,
Eng. Trans. by Helan M. Johnson in 6 Vols. (see No. 51),
Vol V, 1962, Rs. 25/-

140) TRISASTISALAKAPURUSACARITRA of Hemacandra,
Eng. Trans. by Helan M. Johnson in 6 Vols. (see No. 51), Vol VI,
1962, Rs. 25/-

141) NRITYADHYAYA of Asokamalla, ed. Priyabala Shah, 1963, 1982
(1963 price Rs. 10/-)

142) DHURTASVAMIBHASYA, ed. Mm. Chinnasvami Sastri in 2 Vols.
(see No. 121), Vol II 1963, Rs. 12/-

143) RASAKAUMUDI of Srikantha, ed. A.N. Jani, 1963, Rs. 13/-

144) MALLAPURANA, ed. B.J. Sandesara and R.N. Mehta, 1964, Rs.10/-

145) NATYASASTRA of Bharata with commentary of Abhinavagupta,
in 4 Vols,( see No. 36), Vol. IV, ed. R. Kavi & J.S. Pade 1964,
Revised Edition by V.M.Kulkarni & Tapasvi Nandi, 2006, Rs. 640/-

146) MIRAT-I-AHMADI by Ali Muhammad Khan, ed. Syed Nawab Ali,
in 3 Vols,(see No. 33, 34) Vol III English Translation of
Mirat-i-Ahmadi by M.F. Lokhandwala, 1965, Rs. 45/-.

147) RAMASATAKA of Somesvara, ed. Muni Punyavijayaji and B.J. Sandesara, 1965, Rs. 10/-

148) SANKHAPARABHAVAVYAYOGA of Harihara, ed. B.J. Sandesara, 1965, Rs. 4/-

149) SANTINATHBHANDAGARIYAGRANTHASUCI (Descriptive Catalogue of Palm-leaf Mss. in Santinatha Bhandara, Cambay) ed. Muni Shri Punyavijayaji, in 2 Vols. (see No. 135), Vol. II, 1966, Rs. 24/-

150) VIKRAMANKABHYUDAYA of Somesvara, ed. Murari Lal Nagar, 1966, Rs. 6.50

151) BHIMAVIKRAMAVYAYOGA of Moksaditya & HARMODDHARANA, ed. U.P. Shah, 1966, Rs. 7/-

152) ARABIC HISTORY OF GUJARAT ,Translated into English by. M.F. Lokhandwala, in 2 Vols.( No. 157 also) Vol I 1960, Rs. 40/-

153) VALMIKIRAMAYANAPADASUCI (Pada-Index of Valmaki-Ramayana), ed. G.H. Bhatt, in 2 Vols. (see no. 129 also), Vol. II, 1966, Rs. 50/-

154) KIRANAVALI of Udayanacarya, ed. Jitendra S. Jetly,1971, 1991, Rs. 105/-

155) CHAKKAMUVAESO - The discourse on six duties by Amarakirti, ed. Madhusudan Modi, 1972, Rs. 35/-

156) GANGADASAPRATAPAVILASANATAKAM of Gangadhara, ed.B.J. Sandesara and Amritlal M. Pandit, 1973, Rs. 12/-

157) ARABIC HISTORY OF GUJARAT by. M.F. Lokhandwala, in 2 Vols. (GOS- 152 also), Vol. II, 1974, Rs. 100/-

158) MUDRITAPANCARATRAGAMAGRANTHANAM VISAYAVIVARANASUCI (A Descriptive Bibliography of the Printed texts of the Pancaratragamas) by. H. Deniel Smith, in 2 Vols. (GOS-168 also) ,Vol I 1975,Rs. 50/-; Vol II 1980, Rs. 80/-

159) SATYASIDDHISASTRA of Harivarman, ed. N.A. Shastri, in 2 Vols. (GOS-165 also), Vol I 1975, Rs. 65/-; Vol II 1978, Rs. 92/-

160) AGAMAPRAMANYA of Yamunacarya, ed. M. Narsinhachari, 1976, Rs. 18/-

161) SMRTICINTAMANI of Gangaditya, ed. Ludo Rocher,1976, Rs. 26/-

162) VRDDHAYAVANAJATAKA of Minaraja, ed. David Pingree, in 2 Vols.(see No. 162), Vol I -Adh. 1-39, 1976, Rs. 94/-; Vol. II - Adh.40-71, 1976, Rs. 64/-

163) VRIDDHAYAVANAJATAKA of Minaraja, David Pingree, in 2 Vols. (see above), Vol. II - Adh. 40-71, 1976, Rs. 64/-

164) SODHALANIGHANTU of Vaidyacarya Sodhala, ed. Priya Vrat Sharma, 1978,Rs. 53/-

165) SATYASIDDHISASTRA of Harivarman, ed. N.A. Shastri, in 2 Vols., (see No. 159), Vol II 1978, Rs. 92/-

166) SAKTISANGAMTANTRA (in 4 Vols), (see No. 61, 91, 104), Vol. IV, Chinnamasta Khanda, ed.B. Bhattacharyya and Varajavallabh Dwivedi, 1978, Rs. 49/-

167) KRTYAKALPATARU of Laksmidhara, ed. K.V. Rangaswami Aiyangar, in 14 Vols., Vol. IX 1979, Rs. 53/-

168) MUDRITAPANCARATRAGAMAGRANTHANAM VISAYAVIVARANASUCI (A Descriptive Bibliography of the Printed texts of the Pancaratragamas) by. H. Deniel Smith, 2 Vols. (see No. 158), Vol II 1980, Rs. 80/-

169) NYAYALANKARA of Abhayatilaka Upadhyaya, ed. Anantalal Thakur & J.S. Jetly, 1981, Rs. 143/-

170) TRICABHASKARA by Bhaskaracarya, ed. R.G. Sathe, 1982, Rs.100/- (53/-)

171) GANESAVIJAYAKAVYA by Gopalarava Mairala with com. Sarvarthada, ed. B.N. Bhatt, 1983, Rs. 46/-

172) VALMIKIRAMAYANAPADASUCI OF SAMIKSITAVRITTI (Pada-Index of the Critical Edition of Valmiki-Ramayana) in 3 Vols (GOS- 177 & 181 also), ed. R.T. Vyasa, Vol. I- 1989, Rs.303/-; Vol II -1998, Rs. 455/-; Vol. III- 2001, Rs. 310/-

173) GANDHASARA-GANDHAVADA, ed. R.T. Vyasa, 1989, Rs. 128/-

174) NYAYAKANDALI of Sridharacarya, ed. J.S.Jetly & V.G. Parikh, 1991, Rs. 275/-

175) FUTUHAT-I-ALAMGIRI of Isvaradasa Nagar,
ed. Raghubirsingh & Quazi Karmatulla,
translated by Yadunath Sarkar and M.F. Lokhandawala, 1995, Rs. 287/-

176) VISVAMITRIMAHATMYA, ed. J.P. Thaker, 1997, Rs. 280/-

177) VALMIKIRAMAYANAPADASUCI OF SAMIKSITAVRITTI
(Pada-Index of the Critical Edition of Valmiki-Ramayana),
ed. R.I. Nanavati, in 3 Vols., Vol. II,1997, Rs. 466/-
(see No. 172 &181)

178) PRACYAVIDYAMANDIRASTHAGRANTHANAM SUCI
(An Alphabetical list of Mss. in the Oriental Institure, Baroda),
in 4 Vols, Vol. III, Compiled by P.H.Joshi & B.P.Pandya, 1998,
Rs. 670/-

179) ANUMANAKHANDADUSANODDHARA of Narahari,
ed. Vasant G. Parikh

180) GUJARAT UNDER THE MAITRAKAS OF VALABHI
by H.G. Shastri, 2000, Rs. 410/-

181) VALMIKIRAMAYANAPADASUCI OF SAMIKSITAVRITTI
(Pada-Index of the Critical Edition of Valmiki-Ramayana), in 3 Vols,
ed. R.I.Nanavati, Vol. III, 2001, Rs. 310/- (see Nos. 172 &177)

182) THE SURYAPRAKASA of Surayadasa, ed. Pushpa Kumari Jain,
Vol. I, 2001, Rs. 265/-

183) KALANDIKAPRAKASA of Somanatha Vyasa,
ed. Babulal Shukla Shastri, 2002, Rs. 255/-

184) PRIYAMVADACARITA of Bhikudeva, ed. Purushottam H. Joshi,
2002, Rs. 140/-

185) KRTYAKALPATARU of Laksmidhara, in 14 Vols.,
Vol. XIII Santikanda, ed. M.L. Wadekar, 2008, Rs. 265/-

186) PRACYAVIDYAMANDIRASTHAGRANTHANAM SUCI
(An Alphabetical list of Mss. in the Oriental Institute, Baroda),
in 4 Vols, Vol. IV Compiled by U.M.Brahmachari & Sweta Prajapati,
2008, Rs. 515/- (see Nos. 97, 114, 186 also)

187) MEGHADUTA with Commentary of Janardana , Ed. by P.H. Joshi,
Prof. B. P. Pandya & Prof. M.L.Wadekar, 2009, Rs. 170/-

## B) THE MAHARAJA SAYAJIRAO UNIVERSITY ORIENTAL SERIES

1) TAMBULAMANJARI by J. S. Pade (1958), Rs. 5.69
2) MUDRAVICARAPRAKARANA AND MUDRAVIDHI by Priyabala Shah (1958), Rs.
3) PRAMANAMANJARI by Priyabala Shah (1958), Rs. 1.75
4) GIRVANAPADAMANJARI AND GIRVANAVANMANJARI by U. P. Shah (1960), Rs.6.00
5) LEXICOGRAPHICAL STUDIES IN JAINA SANSKRIT by B. J. Sandesara & J. P. Thaker (1962), Rs. 12/-
6) BIBLIOGRAPHY OF STUDIES IN INDIAN EPIGRAPHY (1926-50) by Sibadas Chaudhuri (1966),
7) SISUPRABODHAKAVYALANKARA OF PUNJARAJA, ed. by B. L. Shanbhogue (1965), Rs. 8/-
8) ADVAYASIDDHI, ed.by Malati J. Shendge (1964), Rs. 2.50
9) VIDVAJJANAVALLABHA OF BHOJARAJA, ed. by David Pingree (1970), Rs. 4/-
10) BADARAYANA'S PRASNAVIDYA, ed. by J. S. Pade (1972), Rs. 2.50
11) LAGHUKHECARASIDDHI, ed. by David Pingree (1976), Rs. 4/-
12) BARE CRITICAL TEXT OF AYODHYAKANDA, SARGAS 1-49, ed. by A. N. Jani (1976), Rs.7.50
13) INDEX OF JOURNAL OF THE ORIENTAL INSTITUTE, VOL. I-XXV, compiled by N. N. Shah (1978), Rs. 8/-
14) TILAKAMANJARI KATHODDHARA, ed. by N. M. Kansara (1984), Rs. 16/-
15) MAHAVAKYADARSA OF JAYARAMA NAGARA: TEXT WITH ENGLISH TRANSLATION, ed. by R. T. Vyas (1986), Rs. 19/-
16) CETOVINODANAKAVYA OF DAJI JYOTIRVID, ed. by P. H. Joshi & S. Y. Wakankar (1991), Rs. 30/-
17) BIBLIOGRAPHY OF PANCATANTRA AND ALLIED LIT ERATURE, ed. by Pack Carnes (1996), Rs. 21/-

18) DEVIMAHATMYAM WITH COMMENTARY OF NILAMBARACARYA, ed. by M. L. Wadekar (1997), Rs. 42/-
19) ANANDAKAVYAM OF ANANDA KAVI, ed. by S. Y. Wakankar (2004), Rs. 25/-
20) INDEX TO JOURNAL OF THE ORIENTAL INSTITUTE, VOL. XXVI - L, ed.by U. M. Brahmachari (2005), Rs. 70/-
21) THE GOPINATHASAPTASATI OF GOPINATHA MISRA, ed. by M. L. Wadekar (2006), Rs. 55/-
22) TWO LECTURES ON THE VALIMIKI-RAMAYANA by R. P. Goldman (2007), Rs. 35/-
23) SATAPRASNOTTARI OF AYODHYAPRASADA, ed by S. Y. Wakankar (2007), Rs. 55/-
24) SANSKRIT ASTRONOMICAL INSTRUMENTS IN THE MAHARAJA SAYAJIRAO UNIVERSITY OF BARODA by S. R. Sarma (2009), Rs. 42/-
25) VEDIC ENTITIES AND IDENTITIES by P. V. Pathak (2012), Rs. 265/-

*(Source -http://www.msubaroda.ac.in)*

❍❍❍

# परिशिष्ट ४

# सयाजीराव महाराजांचे दानधर्माविषयी भाषण

स्थळ : बडोदे
काळ : तारीख १० मार्च १९२६.
प्रसंग : ‘पिलाजीराव अनाथाश्रम’उघडण्याचा.

सभ्य स्त्रीपुरुष हो,

समाज हा त्रिविध आहे. त्यात तीन प्रकारचे लोक ठळकपणे दिसतात. एक सर्व समाजाचे नशीब ज्यांच्या मुठीत आहे असे धुरीण व प्रसिद्ध लोक, दुसरे बहुसंख्य; पण सामान्य असे स्वावलंबी वरकड लोक आणि तिसरे स्वत:च्या पोटापाण्यासाठी दुसऱ्याच्या दयाधर्मावर अवलंबून असलेले कंगाल लोक. यापैकी तिसऱ्या प्रकारच्या लोकांचा विचार आज प्रस्तुत आहे. हे लोक नेहमीच काही आपल्या हाताने पायावर धोंडा पाडून घेऊन कंगाल-कायमचे कंगाल बनत नसतात. त्यांचा स्वत:चा दोष बहुश: फारसा, छे! मुळीच नसतो. ज्या कारणामुळे ते जन्माचे भिकारी बनतात, त्यातली काही कारणे उदाहरण म्हणून सांगतो. १) शारीरिक किंवा मानसिक जन्मजात वैगुण्य; २) बुद्धीचा आणि नीतिमत्तेचा अभाव; ३) जीवनशक्ती शोषून घेणारा आजार किंवा हाती घेतलेल्या कामात एकसारखे अपयश अथवा मुळी कामच न मिळाल्यामुळे निराशेच्या व चिंतेच्या पायी हळूहळू होत जाणारा अध:पात; ४) प्लेग, दुष्काळ इत्यादी आपत्तींच्या वेळी येणारी सांपत्तिक व नैतिक हलाखी आणि ५) वार्धक्य. आणखी पुष्कळ कारणे असतात. त्यांची कल्पना तुम्हाला वरच्या उदाहरणांवरून येईलच. एकंदर समाजाच्या हिताचा विचार करताना, ‘या कंगाल वर्गाचे काय करावे?’ हा मोठा प्रश्न येऊन पडतो. या लोकांना जर मन:पूत वावरू दिले, तर समाजाची नीती खालावण्याचा धोका असतो. शिवाय हे लोक म्हणजे अनेक रोगांची चालती-बोलती आगरेच असल्याने त्यांच्यामुळे सार्वजनिक आरोग्यालाही भयंकर धोका पोहोचण्याचा संभव असतो. एकंदरीत या वर्गाच्या लोकांचा विचार करू लागलो म्हणजे मन अनुकंपेने भरून येते.

दानधर्म हा अनुकंपेच्या किंवा एक प्रकारच्या प्रीतीच्या पायावर उभारलेला आहे आणि प्रीतीची भावना ही प्रत्येक मनुष्याच्या अंत:करणाच्या अगदी आतल्या गाभ्यांत तरी असतेच

असते. तीच भावना मनुष्याच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाचा जणू प्राणच आहे. सर्व बाबतीत, सर्व प्रकारे, दुसऱ्यांवर अवलंबून असणाऱ्या बालकांविषयी त्यांच्या आईबापांच्या मनात हीच भावना असते. हे उदाहरण मी मनुष्याच्या वैयक्तिक जीवनातले घेतले. त्याच्या सांघिक, सामुदायिक अथवा सामाजिक जीवनाचा इतिहास पाहाल तर त्यातही हाच प्रकार दिसतो. उदाहरणार्थ, पुष्कळांनी एकत्र जमून एखाद्या देवतेचे भजनपूजन करणे व नंतर सर्वत्रांनी तिथेच एकत्रपणे ओला-कोरडा प्रसाद भक्षण करणे, हे परस्पर प्रीतीचेच काम आहे. त्याने प्रीतीचे संवर्धनही होत असे व जीवन जास्त व्यापक होत असे. या सांघिक पूजाअर्चेला व प्रसाद भक्षणाला धर्माची मान्यताच नव्हे, तर धर्माचे उघड प्रोत्साहनही होते. खुद्द धार्मिक विधीही काही असे असत की, त्यांनी कौटुंबिक व सामाजिक प्रीतीचा परिपोष उत्तम तऱ्हेने होईल. त्यामुळे कुटुंबातल्या मंडळींना वाटे की, आपण सर्व एक आहोत, सर्वांचे हित तेच आपले हित आहे व तत्प्रीत्यर्थ आपण एकदिलाने झटले पाहिजे. त्याचप्रमाणे सांघिक स्वरूपाच्या धार्मिक विधींनी समाजात ऐक्यभावना उत्पन्न करून ज्यात समाजाचे हित त्यात व्यक्तीचेही हित आहेच हा व्यापक विचार प्रत्येकाच्या मनात ठसविला. हेच कार्य आपल्या सांघिक आचारांनी आजही करणे इष्ट आहे; पण आचारविचारांना किंवा विधिपरिपालनाला काही एक मर्यादा असते. एखाद्या विभागापुरतेच किंवा जातीपुरतेच त्याचे क्षेत्र मर्यादित असते. अर्थात याहून पुढे जाणे इष्ट व शक्यही आहे. सबंध राष्ट्राच्या किंबहुना सर्व जगताच्या हिताच्या दृष्टीने या बाबतीत आपण विचार केला पाहिजे व तो करण्याला पुष्कळ वावही आहे. इतका पल्ला गाठणे सामान्यत: कठीण आहे हे मी जाणतो; पण ध्येय ठेवायचे तर ते असे उच्च ठेवायला हवे. ते साधण्यासाठी तूर्त आपण या दानधर्माच्या बाबतीतली आपली एकांगी दृष्टी किंवा जातिनिष्ठता टाकून देण्याचा तरी प्रयत्न केलाच पाहिजे.

कित्येक लोक असे दर्शवितात की, हिंदूधर्म हा व्यक्तिनिष्ठ आहे, समाज ही वस्तूच त्याला माहीत नाही आणि असलीच तर तिची त्याला पर्वा नाही. तो तुसडा आहे; कारण त्या धर्माचा प्रत्येक इसम स्वत:ला मोक्ष कसा मिळेल एवढाच विचार करीत असतो. वस्तुस्थिती अशी नाही. हिंदूधर्म समाजविन्मुख आहे हे म्हणणे खरे नाही. आपल्या कर्मवादामुळे आपल्यात व्यक्तिनिष्ठा बळावली की काय, हा प्रश्न आपण सोडून देऊ. तरी हिंदू धर्मपंथांत परोपकाराची जी महती सर्वत्र वर्णन केलेली आहे, त्यावरून आपला धर्म एकलकोंड्या व माणुसघाण्या नाही असे स्पष्ट दिसते. विक्रमादित्याच्या कथा आणि महाभारत, यात परोपकाराची उज्ज्वल उदाहरणे आहेत. परोपकार हा धार्मिक कर्तव्याचा भागच आहे, महाभारतात तर स्पष्ट म्हटले आहे की, ‘क्षुधेने क्षीण, विद्यासंपन्न अकिंचन आणि विपत्तीमुळे दुर्बळ झालेल्या अशा माणसाला अन्नदान करून संतुष्ट करण्यात जे पुण्य आहे त्यासारखे दुसरे पुण्य नाही. धर्मनियम पाळणारे व धर्मकर्म आचरणारे जे सत्वस्थ, ते धन-पुत्र-दाराविहीन व आपद्ग्रस्त असले तरी, दुसऱ्याजवळ कसल्याही साहाय्याची याचना करीत नाहीत, त्यांच्या विपत्तीचे निवारण, कौंतेया, सर्वकाळ व सर्वशक्तिपूर्वक करीत असावे.’

याचना करणे अनुचित होय, हे वरील वचनावरून तर स्पष्टच होत आहे. अत्यंत गरजू व अत्यंत सत्पात्र असतील तेच तेवढे याचना करीत असतात असे कुठे आहे? तसे असते तर याचना इतकी निंद्य ना ठरती. याचनेने स्वाभिमान ठार होतो. 'भिक्षापात्र अवलंबिणे' म्हणजे 'लाजिरवाणे जिणे' जगणे आहे. भोळ्या, भाविक लोकांच्या आतिथ्यगुणाचा भलताच फायदा घेणे हेही तितकेच निंद्य आहे. 'स्वकष्टार्जित अन्न जो स्वगृहीच सेवन करून राहतो तो मनुष्य मानार्ह होय,' असे महाभारतात वचन आहे. परान्न कुठे व केव्हा घ्यायचे याचाही खुलासा शास्त्रकारांनी करून ठेवला आहे. ते म्हणतात, 'जिथे आपल्याविषयी प्रेम असेल तिथलेच परान्न मनुष्य घेतो. तसेच आपत्ती आली असतानाही मनुष्य परान्नाचे सेवन करतो.' दान घेतल्याने घेणाराच्या अंतस्थ परमात्मशक्तीचा तात्काल नाश होतो, असेही शास्त्रकार म्हणतात; त्याचा अर्थ इतकाच की, दान घेतल्याने मनुष्याची स्वावलंबनशक्ती नष्ट होणे शक्य आहे.

दान करणे किंवा घेणे हे अशा प्रकारे काही वेळी निंद्य असले तरी पुष्कळ प्रसंगी दान हे अवश्य कर्तव्य व अवश्य स्वीकरणीय असतेच. अर्थात त्यावेळी ते शुद्धहेतुपूर्वक दिले-घेतले पाहिजे. दान व प्रतिग्रह दोन्ही शुद्ध स्वरूपाची असावीत. 'युद्धात लढणे सोपे आहे; परंतु अहंकार किंवा अभिमान विसरून दान देणे सोपे नाही.' असे महाभारतकारांचे म्हणणे आहे. उपनिषदेही सांगतात. 'श्रद्धापूर्वक द्या; अश्रद्धेने देऊ नका. भरपूर द्या; विनयपूर्वक द्या. भीती बाळगून द्या; सहानुभूतिपूर्वक द्या. हाच आदेश आहे. हाच उपदेश आहे.' दानाचे पाच प्रकार भगवद्गीतेत सांगितले आहेत. ते प्रत्येकाने मनन करण्यासारखे आहेत. गीतेच्या मते उत्तम दान तेच की, जे परोपकाराच्या दृढ भावनेने (दातव्यमिती), बुद्धीने व सारासारविचाराने देण्यात येते. अशा रीतीचे दान दात्याला भूषणावह असते. 'दानेन पाणि:न तु कंकणेन' हाताचे भूषण दान आहे, कडे किंवा कंकण नव्हे या भर्तृहरीच्या म्हणण्यातला हाच भावार्थ आहे.

हिंदू धर्माच्या प्रमाणभूत संस्कृत ग्रंथांतून मी इतका वेळ दानविषयक उल्लेख दिले. ज्याने एकवेळ सर्व हिंदुस्थान हलवून सोडला होता त्या बौद्धधर्माच्या ग्रंथांतून एक-दोन महत्त्वाचे उल्लेख देतो. बौद्ध उपदेशक व बौद्धधर्मीय राजे यांनी या देशांत एक नैतिक आंदोलनच घडवून आणले ही गोष्ट महशूर आहे. या लोकांचा दानधर्मावर फार भर असे. दानाचा उपदेश व आचरण ते मोठ्या प्रमाणात करीत. त्यामुळे सामान्य जनतेत दानगुणाची अभिवृद्धीही पुष्कळ झाली होती. जुन्या पाली ग्रंथांवरून असे दिसते, की प्रवासी व गरीब यांना (शिजलेला) भात व कपडे दान करण्याची चाल बौद्ध लोकांत होती. बौद्धधर्मीय राजांनी आपापल्या राजधान्यांतून 'दानशाळा' स्थापन करून दानधर्माचे आचरण व्यवस्थितपणे चालविले होते. याहून अत्यंत महत्त्वाचा उल्लेख बौद्धांच्या 'जातक' नावाच्या कथासंग्रहातून पाहावयास मिळतो. जातकातील गोष्टी बुद्ध देवाच्या पूर्वजन्मासंबंधीच्या वाटाव्यात अशा प्रकारच्या आहेत. यावरून त्यांच्या महत्त्वाची कल्पना येते. यातली एक 'ससा व ब्राह्मण' नावाची प्रसिद्ध गोष्ट आपल्या विषयाला उपकारक आहे. एका सशाच्या मनातून एका ब्राह्मणाला अन्नदान करावयाचे होते; परंतु दान करावयाचे कसे? सशाजवळ साधन तर काहीच नव्हते. ना द्रव्य ना धान्यधुन्य; तरी त्याने दान करण्याचा

आपला निश्चय डळमळू दिला नाही. तो म्हणाला, ‘हे ब्राह्मणा, मी माझे शरीर अग्नीत टाकतो. आगीत माझे मांस शिजले गेले म्हणजे ते तू काढून घे, त्याचे सेवन कर व तृप्त हो.’ असे म्हणून त्या धडधडत्या आगीत उडी घेतली; कशी उडी घेतली? ‘जशी हंस एखाद्या कमलयुक्त सरोवरात उडी घेतो तशी!’ इतक्या आनंदाने, श्रद्धेने, सद्‌हेतूने त्याने देहदान केले. अशा उदात्त आचरणाच्या प्राण्याच्या अंगाला अग्नी तरी कसा स्पर्श करील? शिवाय तो ब्राह्मण म्हणजे ब्राह्मणाचा वेश घेतलेला देवच होता व तो या सशाच्या जन्मास आलेल्या बोधिसत्त्वाची, पूर्वजन्मीच्या बुद्धांची परीक्षाच पाहण्यास आलेला होता. सशाची ही दाननिष्ठा पाहून देव संतुष्ट झाला व त्याने त्या निष्ठेचे कायमचे स्मारक म्हणून चंद्रिंबबावर त्या सशाची आकृती कोरून टाकली, असे म्हणतात.

एका पारशी धर्मग्रंथात म्हटले आहे की, ‘धनरूपी सत्ता जर तुमच्या हाती आली तर तिचा विनियोग तुम्ही परोपकारार्थ करा.’ उदारचरित मनुष्याचे अंत:करण व बुद्धी ही सुखकर ऊर्फ उबदार असतात आणि त्यांच्या अंत:करणात अग्निदेवतेचा पवित्र प्रकाश पडलेला असतो, असे या अग्निपूजक पारशी वर्गाचे मत आहे. त्यांच्या दृष्टीने सर्वांत उच्च कोटीचा मनुष्य म्हणजे उदार पुरुष हाच. त्यांच्या धर्मग्रंथांतले एक वचन देऊन मग मुसलमानी धर्मग्रंथाकडे वळतो. ते वचन असे : ‘एकमेकांना यथाशक्ती साहाय्य केल्याने मनुष्याला मोठ्यात मोठे सुख प्राप्त होते; परंतु अपात्री आणि खरा कळवळा आल्यावाचून दान करणे व्यर्थ आहे. हे झरतुष्ट्रा, जे दान देताना स्वत:च्या आत्म्याला आनंद वाटत नाही ते दान देणाऱ्याचा धिक्कार असो; कारण या एकंदर भौतिक जगातले सद्विचार, सद्वचने व सत्कृत्ये निश्चित करण्याचे साधन म्हणजे एक दानधर्मच होय.’

मुसलमानांच्या कुराणामध्ये दानधर्माचा पुरस्कार जोराने केलेलाच आहे; परंतु दानधर्म नेहमी विवेकपूर्वक करावा असेही स्पष्ट सांगितले आहे. ‘दानधर्म फक्त गरिबांना व गरजू लोकांना करावा. या लोकांवर जे छोटे अंमलदार नेमलेले असतात त्यांना करावा, ज्यांच्या मनाचा कल धर्माचरण करण्याकडे आहे त्यांना करावा, लढाईतले कैदी किंवा कर्जग्रस्त यांची सुटका करण्याकरिता दानधर्म करावा, प्रवाशाकरिता करावा आणि अल्लाच्या पंथाची बढती होण्यासाठी करावा.’ युद्धांत मिळालेल्या लुटीतला काही भाग अनाथ, गरजवंत व प्रवासी यांच्या सोयीसाठी खर्चावा अशी मुसलमानांत धर्माज्ञा आहे. दान द्यावयाचे ते फक्त अशाच गरीब लोकांना द्यावे, की आपल्या नित्याच्या गरजा भागविणेही अशक्य असते. सर्व मुसलमानी कुटुंबांनी एक ‘झकत’ नावाचा कर द्यावा असे ठरलेले होते. या कराच्या उत्पन्नापैकी काही निश्चित भाग गरिबांप्रीत्यर्थ खर्चावा असे कायद्यानेच ठरून गेलेले आहे.

हिंदी लोकांची जी राजासंबंधी ध्येयभूत कल्पना आहे तिच्यात राजाने आपल्या सर्व प्रजेच्या कल्याणाची काळजी वहावी ह्या गुणाचा समावेश झालेलाच आहे. राजा हा धर्मावतार आहे असे हिंदी लोक मानतात. त्यामुळे अशी एक लाक्षणिक व काव्यमय कल्पना रूढ झाली की, ‘राजाचे भोजन दुपारी बारा वाजता होते.’ यातला अर्थ इतकाच की, बारा वाजेपर्यंत साधारणत: कोणी जेवायचा बाकी राहत नाही. अर्थात सर्व प्रजाजन जेवल्यावर राजा जेवतो, आधी नाही.

राजाला प्रजेविषयी किती काळजी वाटते ते दर्शविण्याची ही रीत सुंदर तर खरीच. 'बडोद्याला काय, धर्मराज्य आहे हो,' असे पूर्वी म्हणत असत. असे जो कुणी पहिल्यांदा म्हणाला असेल त्याच्या मनातून असेच दर्शवावयाचे असेल की, बडोदे राज्यात सनातन हिंदू धर्माच्या कल्पना रूढ आहेत व जुन्या धर्मशास्त्राच्या आज्ञा कसोशीने पाळल्या जात आहेत; परंतु 'धर्म' शब्दाचा जुना अर्थ सर्वांशाने आज स्वीकारणे शक्य नाही, हे उघड आहे. धर्माने सांगितलेले परोपकाराचे किंवा दानधर्माचे तत्त्व आज मान्य असले तरी ते तत्त्व आचरणात आणण्याची आपली रीत जुन्या रीतीपेक्षा निराळीच असणार हेही स्पष्टच आहे. हा दानधर्माचा प्रश्न फार बिकट आहे. तो सोडविताना दुसऱ्या कितीतरी तितक्याच बिकट उपप्रश्नांचा विचार करावा लागतो. गादीवर आल्यापासून मी या विषयाकडे लक्ष पुरविले आहे. सहानुभूतीने आणि दानधर्म करण्याच्या कळकळीच्या इच्छेने प्रेरित होऊन, मी विचार केला की, कोणत्या प्रकारचा दानधर्म केला तर माझ्या प्रजेचे स्वाभिमान व स्वावलंबन हे गुण अबाधित राहतील. तेव्हा मला असे दिसून आले की, चांगला खोल विचार करून व योग्य मार्गाची नीट छाननी करून दानधर्म केला तरच तो चांगले फळ देतो. 'बडोद्याला धर्मराज्य आहे.' या म्हणण्याची सत्यता आजदेखील अनुभवास यावी यासाठी माझ्या शक्तिबुद्धीप्रमाणे शक्य तितके प्रयत्न केले आहेत व करीतही आहे.

दानधर्माची किंवा परोपकाराची भावना अशी जात्याच उत्कृष्ट असल्यामुळे ती टिकवावी व बलिष्ठ करावी हे आवश्यकच आहे; परंतु या बाबतीत आपण धार्मिक म्हणून मानलेल्या आचाराविचारांवर अथवा आज्ञांवर सर्वस्वी अवलंबून राहता कामा नये. कारण तशा प्रकारे झालेला दानधर्म अथवा परोपकार हा पुष्कळसा लहरीनुसार व फक्त व्यक्तीदृष्ट्याच झालेला आहे असे दिसते. त्याच्यात सातत्य हा गुण नाही आणि त्यामुळे साहजिकच चिरस्थायी कल्याण असे जवळजवळ कुणाचेच त्याने केलेले नाही. क्षणिक क्लेश आणि अडचणी त्याने दूर केल्या आहेत; परंतु क्लेशांचा संभवच होऊ न देणारे आरोग्य व अडचणीची उत्पत्तीच खुंटविणारा स्वाभिमान व स्वावलंबन हे त्याने लोकांना दिले नाहीत. उलट काही प्रसंगी स्वावलंबनाचे महत्त्व कमी करण्याकडेच त्याचा स्पष्ट कल असे. कुटुंबातील दुर्बल मंडळींची उपेक्षा करून स्वकर्तव्य टाळावे कसे हेही त्याने काही प्रसंगी कुटुंबातील इतर समर्थ मंडळींना शिकविण्याचा प्रयत्न केला आहे. एवंच, परोपकार करण्याची आपली पद्धत आपण नीट तपासून पाहावी अशी आज परिस्थिती आहे. परोपकार हा आपण करूच; पण तो कोणत्या मार्गांनी केलेला चांगला हे ठरविण्याची वेळ आली आहे. सुव्यवस्थित परोपकार कोणता व अव्यवस्थित कोणता हे आपण निश्चित करायला हवे.

बडोद्यामध्ये एकेकाळी सरकारी दानधर्म मुळीच पात्रापात्र विचार न करता होत असे. त्यामुळे अनेकांनी अनेक रीतींनी त्या दानधर्माचा दुरुपयोग केला. दानधर्म घेण्यास राज्याचे बाहेरचेही लोक येऊ लागले व बडोद्यास मुक्काम ठोकून बसले. घेणारे वाढले; पण देणाऱ्या जवळ खजिना कुठे वाढता होता? माणसाच्या साधनसंपत्तीला काही झाले तरी मर्यादा ही असतेच आणि ती मर्यादा मोठी कडकही असतेच. त्या मर्यादेबाहेर जाणे काही केल्या शक्य नसते. आजच्या

वाढत्या याचक वर्गाविषयी सहानुभूती वाटत असताही आम्हाला आधी आमच्या राज्यातल्याच याचकांची सोय लावणे भाग पडले. ‘घरात दिवा तर देवळांत दिवा’ अशी म्हण आहे, ती खोटी नाही. अगदी निकटच्या लोकांचे कल्याण केल्यावर मगच जगत्कल्याणाकडे वळण्यात हशील; पण पैशाच्या कमतरतेखेरीज दुसरीही काही कारणे होतीच. दानधर्म मिळण्याच्या सोयीमुळे पुष्कळजण स्वत:वरची नैतिक जबाबदारी विसरू लागले- टाळू लागले, असे आम्हाला दिसले. मुसलमानांकरिता सुरू केलेला ग्यारमी कारखाना व ब्राह्मणांना मिळणारी केदारेश्वराची खिचडी या ठिकाणाहून पुष्कळ धट्ट्या-कट्ट्या इसमांना दानधर्म मिळत गेल्याने ते लोक आळशी बनले. इतकेच नाही तर कुटुंबातल्या मंडळींसाठी म्हणून घेतलेले धान्यधुन्य काही लोक उघड बाजारात नेऊन विकू लागले. ही जी लोकांच्या स्वाभिमानाला कीड लागू लागली तिची वाढ थांबविण्यासाठी आम्हाला दानधर्माच्या पद्धतीत फरक करावा लागला व दानधर्माचा विस्तारही आटोपशीर करावा लागला.

आमच्यातील परोपकारबुद्धी कमी झाली किंवा दानधर्मावरची आमची श्रद्धा उडत चालली म्हणून आम्ही वर सांगितलेले फेरबदल केले असे नाही. आमची ती बुद्धी व श्रद्धा पूर्वीइतकीच होती. फेरबदलांचे एकच कारण होते. त्याचा उल्लेख मी वर केलाच आहे. आमच्या लोकांतली कर्तव्यबुद्धी आधीच फारशी जागृत किंवा जोमदार नसते असा अनुभव आहेच. त्यात आणखी हे ग्यारमी किंवा खिचडीसारखे दानधर्म चालवायचे व ती दुर्बळ कर्तव्यबुद्धी अधिक दुर्लक्ष करावयाला कारणीभूत व्हायचे हे ठीक नाही. अशी तीव्र जाणीव झाल्यामुळेच वरील फेरबदल आम्ही केले. फेरबदल कोणते? दानधर्माचे दुसरे नवे मार्ग स्वीकारले. म्हणजे, पुढे एका अनाथालयाच्या खर्चाची व्यवस्था केली व वसतिगृहे उघडून त्यात काळी परज या अत्यंत मागासलेल्या जातीच्या मुलामुलींच्या राहण्याची, कपड्यालत्त्याची, जेवणाची व शिक्षणाची सोय केली; प्रांतोप्रांती निकृष्ट वर्गाच्या उन्नतीसाठी संस्था स्थापन केल्या; नवीन औषधालये उघडली व गरीब बायकांच्या बाळंतपणासाठी सोयी कराव्या म्हणून मदतीदाखल रकमा दिल्या. ज्या लायक विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाचा खर्च त्यांच्या आईबापांना सोसता येत नव्हता, त्या विद्यार्थ्यांना ते शिक्षण मोफत देऊ केले व निर्वाहास्तव थोडी शिष्यवृत्तीही दिली. दानधर्माच्या या मार्गांचा अवलंब आम्ही केल्यामुळे प्रजेचे कोणतेही नुकसान झालेले नाही. उलट झाला तर फायदाच असा होईल की, प्रजेची भौतिक परिस्थिती या मार्गामुळे थोडीफार तरी सुधारेल व सुशिक्षित व कर्तव्यपरायण असे लोक राज्यात नोकरी करण्यास तयार मिळतील. या नव्या मार्गांचे एक वैशिष्ट्य तुमच्या लक्षात आलेच असेल, ते हे की, फक्त गरजू लोकांची सोय लावणे हाच याचा उद्देश आहे. पाश्चिमात्यांचे जे मत नव्हते; पण पौर्वात्यांचे होते व आपण हिंदी लोक तर ज्या मतावर फारच भर देत असू, ते मत असे की, एखाद्या कुटुंबाने अमुक इसम आपल्यातला असे एकदा मानल्यावर त्या कुटुंबाचा आसरा त्या इसमाला सदैव मिळायचाच. कुटुंबीय म्हटला की, तो कधीही निराश्रित, निराधार नसायचा. कुटुंब त्याला आसरा देई. मग ते कुटुंब कितीही गरीब असो. प्रश्न पैशाचा नाही. कौटुंबिक भावनाच इतकी बलवत्तर असते व कुटुंबाची आपली

कल्पनाही इतकी व्यापक असते की, त्यातला कोणताही इसम निराश्रित झालेला कुटुंबाला खपत नाही; ही आपली पूर्वापार समजूत आजही आपण रक्षण करावी अशी आहे. कुटुंबाला काही विशेष नावलौकिक, मोठेपणा व स्वाभिमान असतो व ते सर्व सांभाळण्यासाठी कुटुंबाने आपल्यातले जे वृद्ध, अशक्त, रोगी व अभागी असतील त्यांची काळजी घेतली पाहिजे. ती घेणे हे काम विशेष मानाचे आहे. इतकेच नव्हे तर, ते अविच्छेद्य असे कर्तव्यही आहे, या मताचा सरकारने पुरस्कार केला पाहिजे. तो केला व काही माणसे हे कर्तव्य टाळणारी असतात त्यांना हे कर्तव्य सरकारने पटवून दिले, तर इतर सदाचरणी लोकांना सरकारचे कृत्य पसंत पडेलच. ज्यांची काळजी घ्यावयाला नातेवाईक अथवा इष्टमित्र आहेत त्यांच्या भरणपोषणाची जबाबदारी सरकारने पत्करणे इष्ट नाही व ती कधीही पत्करू नये. काही कुटुंबेच्या कुटुंबे कंगाल अवस्थेत किंवा निराधारपणे दिवस कंठित असतात. त्यांना सरकारने काही मदत करणे शक्य आहे की नाही, या प्रश्नाचा विचार क्रमप्राप्तच आहे. अर्थात त्यासंबंधी दोषरहित योजना तयार करण्यासाठी एखादी लायक समिती नेमली पाहिजे व त्या योजनेला पुरेसे द्रव्यबळ आधी मिळाले पाहिजे, हे उघड आहे.

दारिद्र्य हा हिंदुस्थानातला एक अत्यंत बिकट प्रश्न आहे. काटकसर करून बचत टाकणे व संकटकालाची त्यायोगे काही तरतूद करून ठेवणे, ही वृत्ती पाश्चिमात्य लोकांत सर्रास आढळून येते; परंतु आपल्याकडे ती क्वचितच दिसते. सुखासमाधानाने राहून जिथे थोडीफार शिल्लक टाकणे शक्य असते, अशा कुटुंबातही ही काटकसरीची व दूरदृष्टीची वृत्ती सहसा नसतेच; मग इतर कुटुंबाची गोष्ट कशाला? देशाचे दारिद्र्य दूर करणे ही काही सरकारने सूट देऊन अथवा आर्थिक मदत देऊन साध्य होणारी गोष्ट नव्हे. सरकारने तसा काही प्रयत्न केलाच तर तो व्यर्थ जाणार हे नक्की. आपल्या एकंदर आर्थिक व्यवहारात जेव्हा प्रगती होईल - देशातील द्रव्योत्पादन करणारी घटनाच जेव्हा सुधारेल, तेव्हा हा प्रश्न सुटणारा आहे आणि ही सबंध घटनेची सुधारणा किंवा आर्थिक व्यवहारातील प्रगती केव्हा शक्य आहे? जेव्हा आपण आधुनिक साधनांचा किंवा पद्धतीचा उपयोग करू व अधिक उत्साहाने झटून काम करू तेव्हाच. आजचे हे अनाथालय फक्त वृद्धांपैकी अत्यंत निराधार असलेल्या लोकांकरिता असावे असा आमचा उद्देश आहे. ज्यांना स्वत:च्या पोटापुरते मिळविणे अशक्य आहे व ज्यांना सांभाळण्यास कोणी नातेवाईक अथवा इष्ट मित्र नाहीत, ते लोक 'वृद्ध निराश्रित' होत असे समजावे. सरकारने किंवा एखाद्या स्थानिक संस्थेने यांच्या अन्नवस्त्राची सोय न लावली तर आपल्यात जी अव्यवस्थित दान पद्धती आहे तिच्या लहरीनुसार या बिचाऱ्यांना रडतरखडत काळ कंठावा लागतो. हे अनाथालय म्हणजे बडोदे शहरापुरता केलेला एक लहानसा प्रयोग आहे. तो यशस्वी झाला तर या अनाथालयाचा आणखी विस्तार करण्यात येईल व प्रत्येक प्रांताच्या गावी असलेच अनाथालय उघडण्याचाही विचार करण्यात येईल. तूर्त आपला हा प्रयोग योग्य दिशेने होत आहे की नाही हेच आपण पाहिले पाहिजे.

सद्गृहस्थहो, काही महिन्यांपूर्वी येथील कीर्तीमंदिराचा पाया घालताना, ज्या प्राचीन यहुदी कवीच्या शब्दांनी माझ्या भाषणाचा मी समारोप केला होता, त्याच लेखकाचे आपल्या आजच्या विषयासंबंधीही काही संस्मरणीय व उत्साहवर्धक विचार आहेत. ते असे :

"वत्सा, गरिबांचा पोटापाण्याचा आधार लुबाडून घेऊ नकोस आणि गरजूच्या (आशाळ) डोळ्यांना फार वेळ ताटकळत ठेवू नकोस. भुकेल्या आत्म्याला दु:खी करू नकोस किंवा विपन्नावस्थेत असलेल्या माणसाला छेडू नकोस. त्रासलेल्या अंत:करणात आणखी एका त्रासाची भर घालू नकोस आणि जो गरजू आहे त्याला मदत देण्याचे लांबणीवर टाकू नकोस. दु:खिताची विनवणी लाथाडून देऊ नकोस किंवा गरिबाला पाहताच मोहरा फिरवू नकोस; गरजू दिसताच दृष्टी वळवू नकोस आणि तुला शाप देण्याची एकही संधी त्याला देऊ नकोस; कारण, अंतरात्मा तळमळून त्याने जर तुला शाप दिला, तर ज्या देवाने त्याला निर्मिले तो त्याची प्रार्थना ऐकेलच ऐकेल. स्वत: तू लोकांचे प्रेम संपादन कर आणि महान पुरुषांपुढे तुझा माथा नम्र कर. खाली वाकून गरिबाच्या शब्दाला मान देण्यात तुला दु:ख वाटू देऊ नकोस आणि (गरिबाच्या प्रश्नाला) प्रेमाचे उत्तर नम्रपणे देत जा. जुलूम करणाऱ्याच्या हातून अन्यायाची शिक्षा भोगणाराची मुक्तता तू कर आणि जेव्हा न्यायदान करायला बसशील तेव्हा कच्च्या दिलाचा होऊ नकोस, पितृविहिनांना तू पित्यासमान हो आणि (त्यांच्या अनाथ) मातेचे रक्षण करणारा हो. अशा रीतीने वागलास, तर तू परमेश्वराला पुत्रासमान वाटशील आणि तो देव तुझ्यावर तुझ्या आईपेक्षा जास्त प्रेम करील."

ooo

# परिशिष्ट ५

# दातृत्वासंबंधी काही पत्रे

१) पुणे येथील गंगाराम भाऊ मस्के यांच्या 'डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन' या संस्थेला मदत सुरू केल्याबद्दलचे पत्र

मकरपुरा
२३ जानेवारी १८८६

प्रिय खाशेराव (जाधव),

तुम्ही उत्तम आणि यशस्वीरीत्या प्रगती करत असल्याचे वाचून अतिशय आनंद झाला. तुमच्या प्रगतीविषयी आम्ही सदैव अतिशय जागरूक असतो आणि याची कारणे तुम्हीही जाणताच. आपल्या समाजाला शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून पुण्यात स्थापन झालेल्या एका मराठा संस्थेला* आम्ही दरमहा दोनशे रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. आमचे हेतू पूर्ण होण्याच्या दृष्टीने ते अनुदान उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे. इकडे आमचे सर्व काही क्षेम आहे आणि तुमच्या बाबतीतही तसेच इच्छितो. पुन्हा कधीतरी अशा छोट्या पत्राऐवजी सविस्तर पत्र पाठवीन.

आपला विश्वासू मित्र,
सयाजीराव गायकवाड

(*श्री. गंगारामभाऊ म्हस्के यांनी बराच काळ या अनुदानाची व्यवस्था पाहिली. आजही हे अनुदान सुरू आहे (१९२२). टीप- या संस्थेला सयाजीराव महाराजांनी २४०० रुपयांचे वर्षासन सुरू केले होते. या व्यतिरिक्त मराठा समाजातील मुलींना वेगळे १४०० रुपयांचे वेगळे वर्षासन सुरू केले. 'सयाजीराव महाराज, महाराणी चिमणाबाई आणि महाराजांचे वारसदार महाराज प्रतापसिंह यांनी ५,२९,२५६ रुपये या संस्थेला दिले.' *(वार्षिक अहवाल, डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन पुणे, २०१६-२०१७).*

२) दिवाण काझी शहाबुद्दीन आणि विनायकराव किर्तनेंना पेन्शन आणि बक्षीस दिल्याबद्दल

बडोदा
२७ ऑगस्ट १८८६

माझे प्रिय बंधू (संपतराव),

तुमची तब्येत चांगली आहे आणि तुमचा अभ्यासही प्रगतिपथावर आहे हे तुमच्याकडून समजल्याने आनंद झाला. असेच सातत्याने खूप परिश्रम करत राहा; परंतु त्याचा अतिरिक्त ताण येऊ देऊ नका. मला आठवते आहे की, हे मी अनेक वेळा सांगितले आहे. बरोबर आहे ना?

येथे मंत्रिमंडळात काही फेरबदल झाल्याचे तुम्हाला माहिती आहेच. महिना १,००० रुपयांच्या पेन्शनवर काझी शहाबुद्दीन निवृत्त झाले आहेत. विनायकराव किर्तनेंना दरमहा १,००० रुपये पेन्शन लागू झाली आहे. याशिवाय मी त्यांना ५,००० रुपये बोनस म्हणून दिले आहेत. काझी यांच्या जागेवर लक्ष्मण जगन्नाथ आणि श्री. विनायकरावांच्या जागेवर श्री. मणीभाई आले आहेत. चांगली आणि निष्ठावंत व विश्वासार्ह माणसे मिळणे ही नेहमीच खूप अवघड गोष्ट असते. या दोघा अधिकाऱ्यांच्या निवृत्तीमुळे कारभारावर कोणताही अनिष्ट परिणाम होईल, असे मला वाटत नाही. गणपतराव लवकरच तुम्हाला भेटतील आणि तुम्ही दोघे मित्रत्वाने व मजेत राहाल अशी आशा करतो. आम्हाला असे समजले आहे की, हैदराबाद संस्थानातील परिस्थिती तितकीशी चांगली नाही. गव्हर्नर जनरल तेथे जाणार असून वाटेत लागत असल्यामुळे ते बडोद्यास येत्या नोव्हेंबरमध्ये येतील असे वाटते. माझ्या मते मंत्री आणि निजाम यांच्यातील संबंध चांगले नाहीत. काय हे दुर्दैव ! वास्तविक पाहता, एकता ही नेहमीच आणि विशेषत: आपल्या आजच्या परिस्थितीत एक प्रबळ शक्ती आहे. काही दिवसांपूर्वी मंगलाबाईंना* मुलगी झाली; पण जन्मानंतर लगेचच ती मुलगी मरण पावली. बाळंतपण सुखरूपपणे झाले एवढीच समाधानाची बाब. आपले बंधू आनंदराव यांनाही मुलगी झाली. त्यांना मुलगा व्हावा, अशी इच्छा आहे. त्यांची पत्नी ठीक असली तरी फार अशक्त असल्याचे समजते. आपल्या मातु:श्री आणि इतर सर्व आप्त कुशल आहेत. चि. फत्तेसिंहरावांची वाढ चांगल्या तब्येतीने व अतिशय आनंदात होत आहे. ते काहीतरी बडबड करतात व छान खेळतात. त्यांची सध्याच्या मातु:श्रीशी जवळीक होत आहे ही चांगली बाब आहे. तुमच्यासाठी शुभेच्छा व तुमच्या पत्रासाठी धन्यवाद देऊन आता हे पत्र मला येथे थांबवावेच लागणार आहे.

तुमचा बंधू
सयाजीराव गायकवाड

---

* संपतरावांची प्रथम पत्नी.

३) खासेराव जाधव यांना मदत केल्याबद्दल पत्र

पाचगणी
१२ जानेवारी १८८९

प्रिय खाशेराव,

बऱ्याच दिवसांत तुमच्याकडून काही समाचार मिळाला नाही आणि त्यासाठी तर मी नेहमी उत्सुक असतो. तुमच्या विविध चित्तवेधक योजनांची प्रगती कुठवर आली आहे? तुमच्यासाठी १०,००० रुपयांची व्यवस्था करण्याचे आदेश मी बडोदा सोडण्यापूर्वी दिले होते. ते पैसे तुम्हाला मिळाले असतील असे वाटते. आपल्या स्टेटमध्ये कृषी क्षेत्रात करण्यासारखे काम खूप मोठ्या प्रमाणावर आहे आणि आपण थोडे थोडे प्रयत्न तरी करायलाच हवे आहेत. येथे काही दिवसांसाठी मी तुम्हाला कदाचित बोलावून घेईन आणि मला असे वाटते की, सध्या नापिक पडून असलेल्या जमिनींची सोनगड धनकांनी* नांगरणी करावी यासाठी तुम्ही त्यांना प्रवृत्त करावे.

तुमचा विश्वासू
सयाजीराव गायकवाड

४) ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई या संस्थेला मदत (या संस्थेला मदत दिल्याबद्दलची आणखी तीन पत्रे आहेत.)

महाबळेश्वर
२१ जानेवारी १८८९

प्रिय लॉर्ड रे,

युवर एक्सलन्सी, तुम्हाला दिलेल्या आश्वासनानुसार द्यावयाचे ५,००० रुपये कोणत्या व्यक्तीला किंवा अधिकाऱ्याला द्यावयाचे आहेत त्याविषयी कृपया मला अवगत करावे. हे नवीन अध्यासन मेडिकल कॉलेज** साठी उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे. तुमच्याकडून काही निर्देश आल्याशिवाय मी या बाबतीत पुढे काही करणार नाही. विद्यापीठाच्या दीक्षांत समारोहात तुम्ही केलेले भाषण अतिशय विद्वत्तापूर्ण आणि रंजक होते. माझ्या सदिच्छा लेडी रेपर्यंत तुम्ही पोहोचवाल, अशी आशा बाळगतो. महाबळेश्वरच्या प्रसन्न वातावरणात आम्ही सर्व उत्तम आहोत. काझीसाहेब अद्याप माझ्या सोबतच आहेत. प्रेंडरगस्ट यांना तुम्ही भेटलात का? त्यांची इच्छा असल्यास त्यांना येथे येण्याचे आमंत्रण मी देत आहे.

तुमचा विश्वासू मित्र
सयाजीराव गायकवाड

---

* एक आदिवासी जमात

** महाराजांनी ग्रँट मेडिकल कॉलेजला विशेष अभ्यासासाठी देणगी दिली, सर ऑलिव्हर सेंट जॉन यांच्या नंतर बडोदा रेसिडेन्सीत यांची नियुक्ती झाली.

५) महाराणी चिमणाबाई यांच्या वडिलांना मदत

बडोदा
२४ डिसेंबर १८९५

प्रिय जयसिंगराव (आंग्रे),

महाराणींचे वडील मामासाहेब घाटगे* यांच्या संदर्भातील आदेश तुमच्याकडे प्राप्त झाले असतील असे वाटते.

कृपया त्यातील रुपये ६,००० ऐवजी रु. ७,२०० असे वाचावे व ही रक्कम मामासाहेबांच्या दत्तक पुत्रास पाठवत राहावे.

सयाजीराव गायकवाड

६) मि. द्रुये यांना बक्षीस देण्यास उशीर का झाला याबद्दल विचारणा करणारे पत्र

लक्ष्मीविलास पॅलेस,बडोदा
१६ एप्रिल १८९७

प्रिय दिवाणसाहेब अय्यंगार,

मि. द्रुये यांनी कडवट शब्दांमध्ये खानगी विभागाबद्दल आणि त्यांचा मेहनताना देण्यात झालेल्या विलंबाबद्दल माझ्याकडे तक्रार केली आहे. याबाबत जर खानगी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून काही कसूर झाला असेल तर त्यांची संपूर्ण चौकशी करून त्यांना काय शिक्षा करावी हे सुचवावे. जेणेकरून ते भविष्यात असे वागणार नाहीत. मि. द्रुये यांनी आपल्या बोलण्यात हेही सुचवले की, त्यांना बक्षीस देण्यात येणार असे बोलण्यात आले. हे खरे आहे का ते तपासून पाहा. हे सर्व मि. फ्रेंच यांच्या उपस्थितीत घडले आहे. म्हणून गरज पडल्यास त्यांनाही पाचारण करा. या सर्व चौकशीचे निष्कर्ष मि. द्रुये यांना कळू द्या. त्यांचा मेहनताना त्यांना आजच दिला जाईल हे पाहावे. हे पत्र अप्पासाहेब आपणास व्यक्तिगतरीत्या देतील. माझी इच्छा आहे की, हे प्रकरण लालफितीमध्ये न राहता तातडीने निकाली निघावे.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

---

* बाजीराव मामासाहेब घाटगे सर्जेराव हे देवासहून आले. ज्या ठिकाणी हुजूर कामदाराचे कार्यालय काही काळ होते, त्या वास्तूस सरोज या नावाने ओळखले जाते. तेथे मामासाहेब राहत होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व धिप्पाड शरीरयष्टीचे, विशाल अंत:करण व सभ्य शिष्टाचारयुक्त असे होते. ते रूपाने उमदे व विशाल नेत्र असणारे होते. त्यांचे रूप त्यांच्या मुलीमध्ये अनुवंशाने आले होते. २१ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पत्नी मामीसाहेब, महाराणींच्या आई या मि. आनंदराव पवार यांच्या वडिलांच्या बहीण होत्या. त्यांचे निधन १ फेब्रुवारी १८९८ रोजी झाले. मि. विश्वासराव घाटगे यांचे दत्तक विधान १६ मार्च १८९६ रोजी झाले.

### ७) ब्रिटनच्या सम्राज्ञीच्या हीरक महोत्सवाच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थापन झालेल्या संस्थेला मदत

बडोदा
२८ एप्रिल १८९७

प्रिय महाराजा राणा, धौलपूर,

आपणाकडून प्राप्त झालेल्या या पाचव्या पत्राबद्दल मी स्वत:स उपकृत मानीत आहे. त्यातील पाश्चर संस्थेबाबतचे आपले विचार जाणून घेतले. पत्रोत्तरास झालेल्या विलंबाबद्दल प्रथमत: मी दिलगिरी व्यक्त करतो. मी १८९४ मध्ये युरोपात असताना भारतामध्ये भारत सरकार आणि स्थानिक संस्थानिक राजपुत्राच्या एकत्रित विचारातून अशा प्रकारची संस्था स्थापन करण्याची चळवळ सुरू होती, असे माझ्या स्मरणात आहे. यासाठी लोकसहभागाचेही आवाहन करण्यात आले होते; पण आज ती चळवळ कोणत्या अवस्थेत आहे, की थांबली आहे, याबाबत मला स्पष्टपणे काही माहिती नाही. तरीसुद्धा हर हायनेस ब्रिटनच्या सम्राज्ञीच्या हीरक महोत्सवाच्या स्मृतिप्रीत्यर्थ अशी एक संस्था स्थापन करण्याच्या कार्यास माझा हातभार लागत असेल तर मला आनंद होईल हे मी याआधीच सांगितले होते. या संस्थेची उपयोगिता भारतास मोठ्या विस्तृत प्रमाणावर होईल हे निश्चित. या संस्थेचे स्मारकवजा स्वरूप, त्याचे व्यवस्थापन आणि संचालन इत्यादी गोष्टींची चर्चा मी भविष्यात करण्यासाठी राखून ठेवत आहे; पण या उद्दिष्टासाठी आनंदाने रुपये पन्नास हजारांपर्यंतचा माझा सहभाग देण्याचा मानस मी जाहीर करत आहे. आपण आपल्या सवडीनुसार बडोद्यास भेट देण्यास यावे, आपले स्वागत आहे. आपणाकडून आलेले आशीर्वाद इकडे मुलांना कळवले असून त्यांना आनंद झाला. मला आपला परममित्र मानावे आणि आपल्या सुपुत्रांना आशीर्वाद कळवावेत.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

### ८) कर्नल कोक्स यांना मदत

लक्ष्मीविलास पॅलेस, बडोदा
२७ मे १८९८

प्रिय कर्नल कोक्स,

आपला झालेला संवाद मी विसरलो नाही. काही कामे मागे लागली म्हणून पत्र पाठविण्यास उशीर झाला. आपणास उद्या मंत्र्याकडून पत्र प्राप्त होईल. मी एक हजार पाऊंडस् मंजूर केले आहेत.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

९) धौलपूरचे महाराज यांना मदत केल्याबद्दलचे पत्र

लक्ष्मीविलास पॅलेस, बडोदा
१६ ऑक्टोबर १८९८

प्रिय महाराज, धौलपूर,

आपले पत्र मिळाले. सोबतची कागदपत्रेही प्राप्त झाली. त्याचबरोबर आज तुमची तारही मिळाली. आनंद वाटला. त्या सर्वांचे वाचन केले व आपल्या सरदाराचे म्हणणे जाणून घेतले. रुपये पन्नास हजार (५०,०००/-) इतके योगदान मी आनंदाने देईन.

आपण व आपले नातेवाईक स्वस्थ असतील, अशी आशा व्यक्त करतो. आपली जखम बरी झाल्याचे समजले. आनंद झाला.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

१०) दुष्काळ निवारणार्थ मदतीबद्दल महाराजांचे पत्र

लक्ष्मीविलास पॅलेस, बडोदा
३ डिसेंबर १८९९

प्रिय सर, (मि. इलियट)

बऱ्याच दिवसांत मी आपणास पत्र लिहिले नाही. माझा मुलगा फत्तेसिंहने मॅट्रिक परीक्षा दिली असून तो या परीक्षेत चांगल्याप्रकारे उत्तीर्ण होईल असे वाटते. शेवटी-शेवटी तो अभ्यासात गढून गेला होता, हे सर्वांनीच पाहिले. त्यामुळे तो यशस्वी होणार यात शंका नाही. त्याचा स्वभाव चांगला असून समजूतदार आणि शिष्टाचार जाणणारा, या सगळया जमेच्या बाजू आहेत. इतर मुलेही आपल्या वयाला साजेशी वागत आहेत. जयसिंहची स्मरणशक्ती अफाट असून त्यालाही इतरांप्रमाणे अभ्यासाचे वेड आहे. तो इंग्रजी कथा सांगतो तेव्हा वाटते ऐकतच राहावे. माझ्या दोन्ही छोट्या मुलांना इटनला पाठवण्याचा विचार आहे; पण त्यांच्या तब्येती नीट असतील आणि पूर्व परीक्षेचा ताण त्यांना सहन होणार असेल तर. सध्या आहे त्यापेक्षा त्यांचे स्वास्थ्य उत्तम राहावे असे मला वाटते. माझी पत्नी आणि मुली पण पुस्तकांच्या दुनियेत दंग असतात. माझी मुलगी आणि सर्वांत लहान मुलगा माथेरानला गेले आहेत. मला त्यांची अनुपस्थिती जाणवते आहे. त्यामुळे मी मन शांत ठेवण्याच्या प्रयत्नात आहे.

गुजरातमध्ये झालेल्या भीषण दुष्काळामध्ये माझ्यावरील कामाचा ताण बराच वाढला. दुष्काळाचे दुष्परिणाम आणि कठीण परिस्थिती लक्षात घेऊन मागच्या तीन महिन्यात मी १४-१५ लाख रुपये खर्च मंजूर केला आहे.

अशा प्रकारची मंजुरी अजून वाढणार आहे असे वाटते. आमची सर्व शिल्लक संपून बँकेचे रोखेही वापरात घ्यावे लागतील असे दिसते. काही आस्थापनांचा खर्च तर फारच वाढणार आहे; पण त्यांनी आधीच्या मंजूर झालेल्या निधीचा योग्य उपयोग करावा. नवसारी विभागाची अवस्था

फारच गंभीर असून तेथे पेयजलाची समस्या वाढणार आहे. जनावरांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. केवळ बडोद्याचा अपवाद आहे जिथे थोडी सुविधा आहे, म्हणून उद्या थोड्या दिवसांसाठी काडीला जाऊन येईन, मग अमरेलीस जाईन.

रेसिडेंटच्या जागेसाठी तात्पुरते म्हणून कर्नल रॉवेन्शॉ आले आहेत. त्यांच्या सुविद्य पत्नी स्वभावाने बऱ्या आहेत. मद्रासहून मी मि. अय्यंगार यांना पुन्हा बोलावून घेऊन दिवाण म्हणून कामावर घेतले आहे. कारण त्यांची काम करण्याची पद्धत मला आवडलेली आहे. आपण आणि आपले सर्व कुटुंबीय स्वस्थ व आनंदी असतील अशी अपेक्षा करतो. टेड आफ्रिकेला जाणार असल्याचे समजले. मी त्याला शुभेच्छा देतो की, त्याने सुवर्णपदके जिंकावीत. इंग्रजांनी आता उत्साहाने मोठ्या प्रमाणात तेथे सैन्य पाठवलेले दिसते. पण हेच जर थोडे आधी, युद्ध सुरू होण्यापूर्वी झाले असते तर याचे परिणाम आजच्यापेक्षा वेगळे झाले असते. पण शेवट हा इंग्रजांच्या बाजूने होईल यात शंका नाही. आपल्या ग्रंथलेखनाची प्रगती कुठपर्यंत आली? पत्र संपवण्यापूर्वी मी आपणास नम्रपणे सदिच्छा देतो.

आपला विश्वासू मित्र
सयाजीराव गायकवाड

## ११) श्री.गव्हाणे यांना शिष्यवृत्ती देण्याबद्दलचे पत्र

लक्ष्मीविलास पॅलेस, बडोदा
२० फेब्रुवारी १९००

प्रिय बंधू संपतराव*,

आपले १९ तारखेचे पत्र आताच मिळाले. जर गव्हाणे यांची शिकायची इच्छा असेल, तर त्यांना लगेच पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये दाखल होण्यास सांगावे. त्यांची स्कॉलरशिप तर चालू राहीलच, शिवाय आपण त्यांना ब्रिटिश १०० रुपये देऊ शकता पुस्तके इत्यादींसाठी.

आपला बंधू
सयाजीराव गायकवाड

## १२) चित्रकाराला योग्य मानधन देण्यासंबंधाने पत्र

लक्ष्मीविलास पॅलेस, बडोदा
२३ मार्च १९००

प्रिय कर्नल रॉवेन्शा,

कृपया आपण आपल्या सोबत अजून कोणी योग्य व्यक्तीने येऊन काढलेल्या चित्राचे अवलोकन करून प्रत्येकी रक्कम किती द्यावी हे सूचित करावे. मी आपणास यासाठी त्रास देत आहे, कारण या विषयातले जाणकार येथे नाहीत. आपणाकडून नकार नाही आला तर मी पेंटरला उद्या सकाळी ८.४५ वाजता थांबवून घेतो अथवा मग आपण सांगाल तो दिवस ठरवू.

---

* जिल्हा न्यायाधीश, नवसारी

तो चित्रकार चार दिवसांनी जाणार असून त्याला त्याच्यापूर्वी मेहनताना दिला जावा असे मला वाटते.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

१३) व्हिक्टोरिया मेमोरियल फंडासाठी मदत

लक्ष्मीविलास पॅलेस, बडोदा
५ मार्च १९०१

प्रिय दिवाणजी अय्यंगार,

आपण व्हिक्टोरिया मेमोरियलफंडासाठी रु. एक लाख दिलेले आहेत, ज्यात राणीसाहेबांचेही योगदान समाविष्ट आहे, याची माहिती रेसिडेंट अधिकाऱ्यांना लेखी स्वरूपात कळवावी म्हणजे नंतर भविष्यात काही समस्या निर्माण होणार नाहीत. या संदर्भात लिहिलेले सविस्तर पत्र मी अजून वाचलेले नाही हे लक्षात ठेवावे. ही रक्कम तीन वर्षांत तीन हप्त्यांमध्ये द्यावी.

आपल्या राज्यात लहान वयातील होणारे विवाह थांबण्यासाठीच्या कायद्याचा मसुदा शक्यतो काटेकोर पद्धतीने तयार करून कृपया लवकरात लवकर सादर करावा, म्हणजे त्यावर सखोल चर्चा होऊ शकेल. लग्नाच्या वयाबाबत महत्त्वपूर्ण चर्चा होणे गरजेचे आहे. मग लोकांनी कायदा स्वीकारण्याच्या बाबतीत कार्यवाही करता येईल.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

१४) सरदार संभाजीराव आंग्रे यांना कर्ज

लक्ष्मीविलास पॅलेस, बडोदा
१२ सप्टेंबर १९०१

प्रिय महाराज सिंदिया,

आपण सर्व मजेत असाल अशी आशा करतो. आपल्या पत्राबद्दल धन्यवाद. सरदार संभाजीराव आंग्रे यांनी आमच्याकडे कर्जाबद्दल विचारणा केली आहे; पण राज्याची सध्याची आर्थिक परिस्थिती तितकी समर्थ नाही, की आम्ही आंग्रे यांना कर्ज देऊ शकू. ते आमच्या फारच मागे लागले आहेत व त्यांना नाराज करणे जिवावर आले आहे. आपण शब्द देत असाल तर मी त्यांना रु. एक लाखापर्यंतचे कर्ज देऊ शकेन. कारण ते फारच अडचणीत दिसत आहेत. हा व्यवहार आपल्या लक्षात असणे हे आंग्रे यांच्यासाठीही योग्य आहे, असे मला वाटते.

या पत्राबाबत आंग्रे यांना काही कल्पना नसून मी त्यांना दिलेल्या पत्रात केवळ 'एक लाखापर्यंतचा प्रयत्न करतो' असे कळवले आहे; पण त्यांच्याकडून उत्तर आलेले नाही. या संदर्भात आपणास काही सुचत असल्यास कळवावे. कारण आंग्रे येत्या सोमवारी येथे येत आहेत.

आम्ही सर्व खुशाल असून, सर्वजण आपणास याच संदर्भात शुभेच्छा देत आहोत.

आपला विश्वासू मित्र
सयाजीराव गायकवाड

१५) दुष्काळ निवारणासाठी पाहिजे तेवढा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल

श्रीनगर

३० मे १९०३

प्रिय कर्नल मीड,

माझे दि. १ चे पत्र हे अर्थातच कार्यालयीन स्वरूपाचे नव्हते आणि त्या पत्रात मी माझी मते अधिक स्वातंत्र्य घेऊन व्यक्त केली होती. ते पत्र व्हाईसरॉय यांना दाखवण्यात काही हरकत नाही असे तुमचे मत आहे, तर त्याप्रमाणे ते पत्र व्हाईसरॉयना फॉरवर्ड करायला हरकत नाही; पण त्याच वेळी मला असेही वाटते की, त्यांना (व्हाईसरॉयना) काहीही पाठवू नये. कारण तो त्यांना उद्धटपणा वाटेल आणि या हेतूमध्ये तुम्ही मला मदत कराल असा मला विश्वास आहे.

तुम्ही उल्लेख केलेल्या दुष्काळासंबंधीच्या गोष्टींवरून मला आठवले की, त्या भेटीत दुष्काळाचा विषय निघाला होता व मी बहुधा उल्लेख केला होता की, माझ्या अधिकाऱ्यांना (दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी) जितका निधी हवा होता, त्यापेक्षा बराच अधिक निधी उपलब्ध करून दिला. कुणालाही तक्रार करण्यासाठी जागा राहू नये, हाच त्यामागचा उद्देश होता. मृत्युदंडाच्या शिक्षेबद्दल आपले स्मरण नि:संशयपणे अचूक असावे.

मी त्याबद्दल फक्त स्मरणाच्या आधारे लिहिले होते आणि त्या मुद्यांवर फारसा भर दिला नव्हता. मला फक्त एवढेच म्हणायचे होते की, जर माझ्या अनुपस्थितीत अधिकार माझ्याचकडे ठेवले तर मुळीच कुठलीही गैरसोय निर्माण होणार नाही. खुद लोकांनाही कुठलीच गैरसोय जाणवत नाही आणि (या संदर्भात) त्यांची काहीच हरकत नाही. त्यामुळे उगाच समस्यांचा पराचा कावळा केला नाही तर कुठलाच प्रश्न उभा राहणार नाही.

पत्रातील काही मुद्दे हे अप्रासंगिक वाटू शकतील, पण वेगवेगळ्या रेसिडेंटस्नी माझ्यावर जी टीका केली, तिला उत्तर देण्याची माझी इच्छा होती. अर्थात तरीही माझे उत्तर परिपूर्ण नव्हतेच. शेवटी आपल्या मनात माझ्याबद्दल असलेल्या मित्रत्वाच्या भावनांबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

आपला विश्वासू मित्र

सयाजीराव गायकवाड

१६) मेयो कॉलेजसाठी मदत

लक्ष्मीविलास पॅलेस, बडोदा

३० जुलै १९०४

प्रिय कर्नल मीड,

मेयो कॉलेजच्या जनरल कौन्सिलचा सदस्य होण्यासंदर्भातील आपल्या आजच्या पत्राबद्दल धन्यवाद. मा. व्हाईसरॉय यांनी माझे नाव सुचवल्यास मला मेयो कॉलेजच्या जनरल कौन्सिलचा सदस्य व्हायला आवडेल. माझी देणगी ही मेयो कॉलेजसाठी आहे, हे कृपया लक्षात घ्यावे.

आपला विश्वासू मित्र

सयाजीराव गायकवाड

१७) साहित्याचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी मदत

खाइस्ट चर्च, ऑक्स्फर्ड,
१० ऑगस्ट १९१०

प्रिय मि. फाऊलर (इदैत),

तुम्ही व तुमचे मित्र शेक्सपियरची नाटके, गीते व नृत्ये सर्वत्र पोचवण्यासाठी जी चळवळ चालवली आहे तिच्याबद्दल मला कौतुक वाटते आहे. ते कळवण्यासाठी हे पत्र लिहीत आहे. मी तुमच्यासाठी वीस पौंड ही छोटीशी रक्कम पाठवीत आहे, ती तुमच्या चळवळीसाठी वापरावी. पैसे माझ्या सचिवांकडून पाठवण्यात येतील. मिसेस फाऊलर व मुलांना माझी आठवण द्यावी.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

१८) दिवाणांच्या कन्येच्या लग्नात मदत

बडोदा
४ जानेवारी १९१२

प्रिय केरशापजी (दिवाण),

तुमच्या ३ जानेवारीच्या पत्राबद्दल धन्यवाद. त्यातील काही भाग मला समजला नाही; पण मी ते पुन्हा संपूर्ण वाचणार आहे.

तुमच्या कन्येचे लग्न १५ जानेवारीला आहे याचा आनंद वाटला. मी या लग्नास उपस्थित राहू शकणार नाही; पण मी दाम्पत्यास आनंदी वैवाहिक जीवन इच्छितो. मी तारेने त्यांना माझ्या शुभकामना योग्य वेळी कळवीन. या विवाहसमारंभासाठी तुम्हाला मोठा खर्च येणार याची मला जाणीव आहे, म्हणून तुम्ही माझ्याकडून भेटवस्तू स्वीकाराल, याची मला आशा आहे. तुम्ही केलेली उत्तम व प्रदीर्घ सेवा मी विसरलेलो नाही. मी तुम्हाला रु. २५,०००/- पाठवीत आहे. तुम्ही एक-दोन दिवस इकडे आला असता, तर बरे झाले असते. तुम्हा सर्वांना माझ्या शुभेच्छा.

तुमचा विश्वासू
सयाजीराव गायकवाड

१९) संकटसमयी मदत

मुंबई
२४ एप्रिल १९१२

प्रिय मि. स्पिएलमन (Spielman),

मी टायटॅनिक फंडास ५०० पौंड इतकी वर्गणी दिली आहे व लवकरच ती रक्कम तुम्हास मिळेल. माझे मंत्री श्री. गुप्ता यांना ती रक्कम तुमच्याकडे पाठवण्यास मी सांगितले आहे.

मला मनमोकळेपणा आवडतो आणि खरे मित्र हे आरशाप्रमाणे असतात. त्यांनी कधी कधी वस्तुस्थिती जशी आहे तशी प्रतिबिंबित करावी.

मी पेंटिंग्ज गॅलरीला भेट देत असतो. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे आणि पेंटिंग्ज टांगल्यासंबंधीच्या वगैरे तुमच्या सूचनांचे पालन करण्यास मी चीफ इंजिनिअरना सांगितले आहे.

तुमची पत्नी व मुलगा यांना माझ्या शुभेच्छा!

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

## २०) महिलांसाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालय (कॉलेज ऑफ एज्युकेशन) स्थापन करण्यास मदत

२० जुलै १९१२

प्रिय सर जॉर्ज (गव्हर्नर ऑफ मुंबई),

आपल्याशी सकाळी झालेल्या अनौपचारिक गप्पांचा संदर्भ देऊन मी एक इच्छा प्रगट करू इच्छितो. मुंबई इलाख्यात महिलांसाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालय (कॉलेज ऑफ एज्युकेशन) स्थापन करण्याचे ठरल्यास त्यासाठी एक लाख रुपयांची देणगी देण्यास मला आनंदच होईल. ही योजना लवकर प्रत्यक्षात येईल, अशी मला आशा आहे. अर्थात, यासंदर्भात मला काही मुद्दे सुचवायचे आहेत; पण ते मुद्दे म्हणजे देणगीसाठीच्या अटी नाहीत.

आपला विश्वासू मित्र
सयाजीराव गायकवाड

## २१) कॉलेजमधील विद्यार्थीनींना स्कॉलरशिपसाठी मदत

बडोदा
१२ सप्टेंबर १९१२

प्रिय लेडी हार्डींग,

अलीकडेच मी वृत्तपत्रांत वाचले, की आपण दिल्ली येथे महिलांसाठी एक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सुरू करण्याच्या विचारात आहात. या कॉलेजमधील विद्यार्थीनींना स्कॉलरशिप्स देण्यासाठी एक लाख रुपये देणगी म्हणून द्यायला मला आनंद होईल. मी या विषयावर थेट आपणास पत्र लिहिले ही माझी चूक झाली नसावी, असा माझा विश्वास आहे. मा. व्हाईसरॉय यांची व आपली सिमला येथे लवकरच भेट घेण्याचे भाग्य मला लाभेल, अशी आशा आहे.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

२२) समाजकार्यासाठी मदत

माथेरान
२२ मार्च १९१३

प्रिय मि. वर्मवेल,

आपल्या २८ फेब्रुवारीच्या पत्राबद्दल धन्यवाद. आपल्या नियोजित समाजकार्यासाठी मी स्वखुशीने १०० पौंड इतकी रक्कम पाठवीत आहे. ही रक्कम मी एक आठवड्याने पाठवीन. त्या कार्यासाठी माझ्या शुभेच्छा. आपल्या कार्याला मी सुयश चिंतितो. कुशल असाल.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

२३) युद्धासाठी मदतनिधी

मकरपुरा पॅलेस, बडोदा
४ ऑगस्ट १९१५

प्रिय लेडी विलिंग्डन,

मी दक्षिण भारताच्या सफरीवरून परतताना पुण्यात दोन तास थांबलो होतो. अधिक वेळ असता तर मी आपणास व मि. विलिंग्डन यांना भेटायला आलो असतो. आपण युद्धासाठी व मदतीसाठी निधी गोळा करीत आहात असे समजले. मी रु. ६००० /- तुम्हाला युद्ध व मदत निधीसाठी पाठवू इच्छितो. तुम्ही या समितीच्या अध्यक्षा आहात असे समजले. माझी माहिती बरोबर असेल, तर मदतीचा धनादेश कुणाकडे पाठवायचा हे आपण कृपया कळवू शकाल का? माझ्या अज्ञानामुळे मी आपणास तसदी दिली असल्यास क्षमस्व. लॉर्ड विलिंग्डन यांना माझे स्मरण द्याल का? आपण दोघे कुशल असाल अशी आशा आहे.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

२४) युद्धासाठी मदतनिधी

बडोदा
१७ ऑगस्ट १९१५

प्रिय लॉर्ड हार्डींग (व्हाईसरॉय),

मी सध्या युद्धासंदर्भातील घडामोडींवर लक्ष ठेवून आहे आणि विविध ठिकाणच्या वृत्तांतांवरून विमानांचे (हवाईदलाचे) महत्त्व माझ्या लक्षात आले आहे. हवाईदलातील विमानांची संख्या वाढविण्यासाठी माझ्याकडून रु. ५,००,०००/- (रुपये पाच लाख) ही रक्कम स्वीकारावी. त्या रकमेचा विनिमय हवाईदलासाठी किंवा आपणास उचित वाटेल अशा कारणासाठी केला जावा. व्यापार उदीम आणि मानवी जीवन यांचा विध्वंस करणारे हे युद्ध लवकर थांबावे व दोस्तराष्ट्रांचा विजय व्हावा अशीच आपण सारेजण प्रार्थना करीत आहोत. जर्मन लोक फार क्रूर वाटताहेत.

सध्याच्या अवघड परिस्थितीत आपण, आपली कन्या व पुत्र ठीक असाल अशी आशा आहे. आपणाकडून पत्र आल्यानंतर वरील रक्कम (रु. पाच लाख) आपणाकडे पाठवावी, असे मी माझ्या मंत्रिमहोदयांना सांगितले आहे. कळावे.

आपला विश्वासू मित्र
सयाजीराव गायकवाड

## २५) लेडी हार्डींग मेडिकल कॉलेजसाठी देणगीरूपाने मदत

लक्ष्मीविलास पॅलेस, बडोदा
१० मार्च १९१६

प्रिय लेडी विलिंग्डन,

दिल्ली येथील लेडी हार्डींग मेडिकल कॉलेजसाठी देणगीरूपाने मदत करण्याचे आवाहन करणाऱ्या आपल्या पत्राबद्दल धन्यवाद. अशा उपक्रमांचे भारतीय लोक स्वागतच करतात व मदत करण्यासाठी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी ते तत्पर असतात. मी याआधी वरील कॉलेजला एक लाख रुपयांची देणगी दिली आहे हे आपणास ठाऊकच असेल. लेडी हार्डींगना मेडिकल कॉलेज काढण्याची कल्पना फार प्रिय होती. त्यामुळे मी कॉलेजमधील वॉर्डस् बांधण्याच्या कामासाठी रुपये ६२,०००/- देणगी देण्याचे ठरवले आहे.

बडोदा हे मुंबई राज्यात येत नसले तरी मैत्रीपूर्ण शेजारी म्हणून आमच्यामध्ये पक्के स्नेहसंबंध आहेत. महाराणी साहेबही आपल्या पत्राबद्दल आपणास धन्यवाद देऊ इच्छितात. लॉर्ड विलिंग्डन यांना आमचे नमस्कार सांगावेत.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

## २६) लालसिंहराव गायकवाड (पुतणे) यांना मदत

मकरपुरा
२० सप्टेंबर १९१९

प्रिय बाबासाहेब (श्री. आनंदराव गायकवाड यांचे पुत्र लालसिंहराव),

बरेचदा तुमच्या वडिलांचे व त्यांच्या निधनामुळे निर्माण झालेल्या पोकळीचे विचार माझ्या मनात येतात. तुमच्या शिक्षणासाठी त्यांना मदत करण्याचे माझ्या मनात होते; पण ते बोलून दाखवणे झालेच नाही. मी हा हेतू तुम्हास रु. २०,०००/- (वीस हजार) देऊन पूर्ण करीत आहे. ही रक्कम तुम्ही संस्थानास देणे असलेल्या कर्जातून दिली आहे. या पत्राची एक प्रत मी माझी ही इच्छा पूर्ण करण्यासाठी माझ्या दिवाणांकडे पाठवीत आहे. रु. २०,०००/- या रकमेवर आजपासून व्याज लागणार नाही. अर्थात रक्कम तुमच्या हाती पडेपर्यंत थोडा वेळ लागेल. मला वाटते मी स्वत:ला स्पष्टपणे व्यक्त केले आहे.

तुमचा प्रेमळ
सयाजीराव गायकवाड

२७) दिवाणांना भेट

लक्ष्मी-विलास पॅलेस बडोदा
२१ मार्च १९२१

प्रिय दिवाणसाहेब, मनुभाई मेहता

मी तुम्हाला एक चांदीचा टी-सेट भेट म्हणून पाठवत आहे. माझ्या अनुपस्थितीत तुम्ही आणि तुमच्या सहकाऱ्यांनी राज्याचा गाडा अतिशय उत्तम रीतीने हाकला. माझ्या प्रेमाचे प्रतीक म्हणून ही भेटवस्तू पाठवत आहे. भविष्यातही तुम्ही सगळे अशा प्रकारे काम करीत राहाल, अशी आशा व्यक्त करतो. प्रशासन सुरळीतपणे आपले काम करते हे पाहून निश्चितपणे आराम करणे शक्य होते आणि त्याचा माझ्या प्रकृतीवरही चांगला परिणाम होतो.

तशी आरामाची गरज सगळ्यांनाच असते. मग तो वरिष्ठ आणि जबाबदारीच्या पदावर असो की नसो किंवा त्या व्यक्तीला चिंता आणि काळजी असो वा नसो.

मला वाटते, ही पाठवलेली भेटवस्तू तुम्हाला नेहमीच माझी आठवण देत राहील. तुमच्या प्रगतीसाठी मी शुभेच्छा देतो.

आपला विश्वासू
सयाजीराव गायकवाड

२८) स्काऊट ऑर्गनायझेशनला मदत

लक्ष्मीविलास पॅलेस
बडोदा, ४ फेब्रु. १९३०

प्रिय लॉर्ड आर्यिवन,

मला आपले दि. २६ जानेवारीचे पत्र मिळाले. मी माझ्या मंत्र्याला सुचविले आहे की, त्यांनी तुमच्या खाजगी सचिवांकडे धनादेश* पाठवावा.

मला आनंद वाटतो की, बॉय स्काऊट ऑर्गनायझेशनची केंद्रीय नियंत्रण यंत्रणा तुम्ही उभारलेली आहे. त्यामुळे ही चळवळ कायमस्वरूपी सुरू राहणार आहे. तसेच याचा विकास योग्य रीतीने होण्यासाठीही याचा उपयोग होणार आहे. तुमच्या या प्रयत्नांसाठी माझ्या शुभेच्छा.

माझी तब्येत बरी नसल्यामुळे मी तुमच्या पत्राचे याआधी उत्तर देऊ शकलो नाही.

तुम्हाला आणि लेडी आर्यिवन यांना शुभेच्छा!

आपला विश्वासू मित्र
सयाजीराव गायकवाड

---

* रु. ६०००/- चा चेक हा हिज हायनेस यांची देणगी म्हणून इंडियन बॉय स्काऊट सेंट्रल असोसिएशनसाठी पाठविण्यात आला होता

२९) शिष्यवृत्तीसंबंधी पत्र

लक्ष्मीविलास पॅलेस, बडोदा
१९ ऑगस्ट १९१५

प्रिय राजेसाहेब, (कोलेनगोड),

आपल्या २७ जुलैच्या पत्रावरून समजले की, आपणास जरा अस्वास्थ्य आहे. खरेच हे ऐकल्यानंतर मला फार वाईट वाटले. आतापर्यंत आपणास बरे वाटायला लागले असेल अशी आशा करतो. आम्ही देत असलेल्या दोन पारितोषिकांचे रूपांतर शिष्यवृत्तीमध्ये करण्याचा आपला प्रस्ताव मला मान्य आहे. खरे तर या नितांत उपयुक्त अशा सूचनेबद्दल मी आपला खूप आभारी आहे, कारण असे केल्यामुळे त्या रकमेवरील व्याजातून येणाऱ्या पैशांचा उपयोग अधिक चांगल्या तऱ्हेने होणार आहे. आपण या शिष्यवृत्तींच्या नियमांचा मसुदा बनविण्यासाठी आणि त्यांचे अधिक उपयुक्त पद्धतीने लोकार्पण करण्यासाठी जी तसदी घेत आहात त्यातून खरेच तुमचा चांगुलपणा दिसून येतो, त्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

मुख्याध्यापकांच्या माहितीसाठी ते नियम त्यांच्याकडे द्या. मला वाटते दर महिन्याला द्यावयाची चार रुपयांची शिष्यवृत्ती कदाचित फारच कमी होईल. म्हणून प्रत्येक शिष्यवृत्ती प्रतिमाह किमान पाच रुपये इतकी ठेवावी. बंगलोरमध्ये आपली भेट होऊ शकली नाही. त्यामुळे माझी जरा निराशाच झाली होती. असे असले तरी आपण डिसेंबर महिन्यात बडोद्याच्या भेटीसाठी येण्याचे जे वचन दिलेले आहे त्यामुळे मी आनंदित आहे. आपल्या आईची आणि भगिनीची तब्येत उत्तम असेल अशी आशा करतो. पुनश्च एकदा माझ्या आणि महाराणीसाहेबांच्या वतीने आपणास अभिवादन !

आपला विश्वासू मित्र
सयाजीराव गायकवाड

○○○

# परिशिष्ट ६

# संदर्भ सूची

## मराठी ग्रंथ


१) अग्निहोत्री गणेश, श्रीमंत सयाजीराव गायकवाड, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००३.

२) अग्निहोत्री गणेश व पुंडे दत्तात्रय (संपादक), सयाजीनगरीतील साहित्यविचार खंड १ आणि २, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००१.

३) आपटे दा.ना., श्री महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र खंड १,२ व ३, प्रकाशक लेखक खुद, बडोदे, १९३६.

४) कीर धनंजय व इतर (संपादक), महात्मा फुले समग्र वाङ्मय, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पा.आ. २००९, (प्र.आ. २००३).

५) कुलकर्णी अ.अ. (संपादक), प्रदक्षिणा खंड-२, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे, २०१२, (प्र. आ. १९९१).

६) कुलकर्णी दीप्ती दामोदर, 'श्रीसयाजी साहित्यमाला एक चिकित्सक अभ्यास', पीएच.डी. अप्रकाशित प्रबंध, बडोदा, २००७.

७) कुलकर्णी सुहास व चंपानेरकर मिलिंद (संपादक), यांनी घडवलं सहस्रक, रोहन प्रकाशन, पुणे, ते.आ. २००९ (प्र.आ. २००३).

८) खानगीखाते निधी नियम, सरकारी छापखाना, बडोदे, १९३९.

९) खैरमोडे चांगदेव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड - १ ते ४, सुगावा प्रकाशन, पुणे, १९५२ ते १९६८.

१०) खोबरेकर वि.गो., गुजरातीतील मराठी राजवट, (१६६४-१८२०), राजहंस प्रकाशन, पुणे, १९६२.

११) गाडगीळ गंगाधर, एक होता राजा, ग्रंथायन प्रकाशन, मुंबई, २००८.

१२) गायकवाड सयाजीराव, कैसरकडून सुलतानाकडे, (भाषांतर - राजारामशास्त्री भागवत), नेटिव ओपिनियन प्रेस, मुंबई, १९०६.

१३) गोप्रदानाचे नियम, सरकारी छापखाना, १९०४.

१४) गोत्री का.ना., श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे संक्षिप्त चरित्र, माणेकलाल अंबादास डाक्टर, मुंबई, १९०५.

१५) गोत्री का.ना., श्रीमंत संपतराव गायकवाड यांचे चरित्र, इंदुप्रकाश प्रकाशन, मुंबई, १९१२.

१६) ग्रंथ संपादक व प्रसारक मंडळी, महाराष्ट्र साहित्य संमेलन संपूर्ण हकीकत, इंदुप्रकाश स्टीम प्रेस, मुंबई, १९१०.

१७) चावडा व्ही.के., सयाजीराव गायकवाड, (भाषांतर- मालशे स. गं.), नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, दिल्ली, १९८७. (पुनर्मुद्रण २०१३)

१८) जगताप अविनाश, गुरुवर्य बाबूराव जगताप यांचे चरित्र, राजहंस प्रकाशन, २००५.

१९) जगताप जयवंत बाबुराव, गेली पंचवीस अधिवेशने, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचा इतिहास, वत्सला साहित्यप्रकाशन, पुणे, १९४१.

२०) जाधव रा.ग. (संपादक), मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सातवा (भाग-१), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, २००९.

२१) तारकुंडे सीताराम रघुनाथ, ब्राह्मणेतर व मराठे ह्यांच्या चळवळींचा पूर्वेतिहास आणि मराठ्यांची पूर्वपीठिका, प्रकाशक लेखक खुद्द, १९२२.

२२) देशपांडे के.ना. व माळी आ.ल., भारतीय शिक्षण आणि विचारवंत, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१४.

२३) दांडेकर वि.पां., सयाजीराव गायकवाड, ग. ल. ठोकळ प्रकाशन. पुणे, १९५३.

२४) दंडवते गणेश रंगनाथ, बडोद्याचे मराठी साहित्य, प्रकाशक लेखक खुद, १९२५.

२५) धारणकर सरल, दादासाहेब बीडकर (वसा : आदिवासी सेवेचा), राजहंस प्रकाशन, पुणे, २०१२

२६) नेने दा.वि., श्रीमंत सयाजीराव गायकवाड, श्री गंधर्ववेद प्रकाशन, पुणे, २०१०.

२७) नेने वि.पां., बडोद्याचा राज्यकारभार, श्रीसयाजी साहित्यमाला, बडोदे, १९४२.

२८) पगार एकनाथ (संपादक), महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा पत्रसंग्रह, भाग १ ते ३, सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०१७.

२९) पडोळे ल.ना. (संपादक), मराठी ग्रंथालयांचा इतिहास, पूजा प्रकाशन, नागपूर, १९५१.

३०) परांजपे विनायक बी., बडोद्याचे राज्यकर्ते, सरकारी छापखाना, बडोदे, १९०६.

३१) पवार जयसिंगराव (संपादक), राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकुमनामे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. २०१८. (प्र.आ. २००६)

३२) पवार जयसिंगराव (संपादक), राजर्षी शाहू छत्रपतीं: पत्रव्यवहार आणि कायदे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. २०१८. (प्र.आ. २००७)

३३) पवार जयसिंगराव (संपादक), राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. २०१८. (प्र.आ. २००८)

३४) पवार निबाजीराव, जेव्हा गुराखी राजा होतो, राजहंस प्रकाशन, पुणे, २०११, (प्र.आ.१९८६)

३५) पवार निबाजीराव, राजरत्न प्रो. माणिकराव, सयाजी प्रकाशन, नाशिक, १९९१.
३६) पुराणिक रा.श्री., रियासतकार, चंद्रकला प्रकाशन, पुणे, २००२.
३७) पेंडसे सी.वा., बडोदे राज्याचा इतिहास, १९१९.
३८) फाटक ब.न., श्रीमंत सयाजीराव गायकवाड, चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९६२.
३९) फुले महात्मा, महात्मा फुले समग्र वाङ्मय, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.
४०) बापट ना.वि., श्रीमंत महाराणी जमनाबाई गायकवाड यांचे चरित्र, श्री. साहित्यमाला, बडोदे, १९००.
४१) बेंजमिन सिमियन, मार्क स ऑरेलियस बादशहाची बोधवचने, महाराष्ट्र ग्रंथमाला, बडोदे (तत्त्वविवेचक छापखाना, मुंबई), १८९३.
४२) भागवत स्मिता व कप्तान अविनाश, इये सयाजीचिये नगरी, मातृभूमी सेवा ट्रस्ट, मुंबई, २०१४.
४३) भोळे भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, ति.आ. २०१६.
४४) भांड बाबा, क्रांतिकारक खासेराव जाधव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१५.
४५) भांड बाबा, युगद्रष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, सा. आ. २०१४. (प्र. आ. २०१२.)
४६) भांड बाबा, लोकपाळ राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.
४७) भांड बाबा, सयाजीराव गायकवाड, म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.
४८) भांड बाबा (संपादक), महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची, सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०१७.
४९) भांड बाबा (संपादक), महाराजा सयाजीराव विचारधन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.
५०) भांड बाबा (संपादक), सृष्टीची सेवा ईश्वराची मैत्री धर्मविषयक विचार (सयाजीराव गायकवाड), साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१५.
५१) भांड बाबा, स्वातंत्र्यलढ्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१६.
५२) भेण्डे सुभाष व इतर (संपादक), आधुनिक भारताची जडणघडण शिल्पकार कोश खंड-२, हिंदुस्थान प्रकाशन, मुंबई, २००१.
५३) मराठा शिक्षण परिषद, पहिल्या बैठकीचा अहवाल, मिशनप्रेस कोल्हापूर, १९०८
५४) मालकर यमाजी, मगर राजेंद्र (संपादक), महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा चरित्रसंग्रह भाग-१, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१८.

५५) माने पाटील रा.शा. (संपादक), श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचा महाराष्ट्रातील सत्कार, सरकारी छापखाना, बडोदे, १९३३.
५६) माने पाटील रा.शा. (संपादक), श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग-१ ते ६, वाढदिवस मंडळ मुंबई व बडोदे, १९३३.
५७) मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा (खंड-१), राजहंस प्रकाशन, पुणे, २००७.
५८) रघुवंशी गजेंद्र विठ्ठल (प्रकाशक), महात्मा फुले यांच्या अप्रकाशित आठवणी, रघुवंशी प्रकाशन, पुणे, १९९०.
५९) राजवाडे वि. का. इतिहासाचार्य, राजवाडे लेखसंग्रह भाग- दोन व तीन (संकीर्ण निबंध), वरदा बुक्स, पुणे, १९९१.
६०) राजाध्यक्ष विजया (संपादक), मराठी वाङ्मयकोश खंड-४, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
६१) राज्यातील सर्व खात्यासंबंधाने हुजूराच्या झालेल्या हुकुमांची नोंद, सरकारी छापखाना, बडोदे, १९१७-१९३९.
६२) लिमये अनंत हरी, मराठी प्रकाशनांचे स्वरूप, प्रेरणा व परंपरा, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७२.
६३) वरखेडे रमेश, (संपादक), महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह भाग - १ आणि २, सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद २०१७.
६४) वार्षिक अहवाल, डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन पुणे, १९१७-१८ ते २०१६-२०१७
६५) शास्त्री पु.र., मराठ्यांच्या अमलाखालील गुजरात, अपरांत प्रकाशन, पुणे, २०१५.
६६) सरदेसाई गो.स., माझी संसारयात्रा, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, १९५६.
६७) सरदेसाई गो.स., श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, एस. जगन्नाथ आणि कंपनी, पुणे, १९५६.
६८) सरदेसाई गो.स., श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचा खासगी व कौटुंबिक वृतांत, बडोदा वत्सल, १९२५
६९) सार्दळ शंकर धोंडो, देशभक्त बॅरिस्टर केशवराव देशपांडे यांचे जीवन चरित्र, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, १९५४.
७०) सुखठणकर जगन्नाथ सदाशिव (संपादक), धर्मानंद (आचार्य धर्मानंद कोसंबी यांचे आत्मचरित्र आणि चरित्र), दि गोवा हिंदू असोसिएशन, मुंबई, १९७६, (पुनर्मुद्रण-२०१५)
७१) श्राद्धविधीसंबंधी माहिती, धर्माधिकारी कचेरी बडोदे, १९३५.
७२) हिंगुराव मंदा, महाराजा सयाजीराव आणि स्त्रीशिक्षण (अनुवाद- करोगल सुषमा), साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१५.

इंग्रजी ग्रंथ -

1) Baroda State, Baroda Administration Report (B.A.R from 1875-76 to 1939-40, Baroda Government.

2) Baroda State, Report of His Highness the maharaja Saheb's 23rd Trip to Europe (1934-35), Baroda Press, Baroda, 1936.

3) Barton W., The Princes Of India, Cosmo Pubulications, New Delhi, 1913.

4) Dar S. L. and Somaskandan, History of the Banaras Hindu University, Banaras Hindu University, 1966, (Reprinted 2007)

5) Dutt Newton Mohun, Baroda and Its libraries, Central Library, Baroda, 1928.

6) Desai Govindbhai H., 'Gazetter of the baroda state Volume I', The Times Press, Bombay, 1923.

7) Elliot F.A.H., The Rulers of Baroda, Baroda State Press, Baroda, 1879 Reprint 1934.

8) Gaekwad Chimanabai (II), The Position of Women in Indian Life, Longmans Green and Co., London, 1911.

9) Gaekwad Fatesinghrao, Sayajirao of Baroda, Popular Prakashan, Bombay, 1989

10) Gaekwad Sayajirao, From Caesar to sultan, Being Notes From Gibbon's 'Decline and Fall of The Roman Empire', Printed at The Chiswick Press, Tooks Court, London, 1895.

11) Gaekwad Sayajirao, Letters of H. H. Maharaja Sayajirao Gaekwad, Editor : G. S. Sardesai, (1886-1901) : Vol. I, for the uses of Huzur kamdar's office, ekikaran Branch, Baroda, No. of letter's 612, 1923.

12) Gaekwad Sayajirao, Letters of H. H. Maharaja Sayajirao Gaekwad, Editor : G. S. Sardesai, (1886 -1901) : Vol. II, for the uses of Huzur kamdar's office, Ekikaran Branch, Baroda, No. of letter's 651, 1923.

13) Gaekwad Sayajirao, Notes On The Famine Tour By His Highness The Maharaja Gaekwar, Macmillan and Co. Ltd, London, 1901,

14) Gaekwad Sayajirao, Notes On The Famine Tour By His Highness The Maharaja Gaekwar, Sayajirao Gaekwad Sanshodhan Sanstha, (Indian First Edition) Aurangabad, 2016.

15) Gaekwad Sayajirao and widgery Alban Gregory, Goods And Bads, Outline of Philosophy, published by The Manager, College of Baroda, 1920.
16) Gaekwad Sayajirao, Speeches and Addresses of His Highness III, Vol. I, University Cambridge, 1927.
17) Gaekwad Sayajirao, Speeches and Addresses of His Highness III, Vol. 2, University Cambridge, (1911-1927), 1927.
18) Gaekwad Sayajirao, Speeches and Addresses of is Highness III, Vol. 3, University Cambridge, (1934-1938), 1927.
19) Krishnamachari V. T., Baroba By Decades (1871-1941), Baroda State Press, Baroda,1942.
20) Limaye P.M., History of Deccan Education Socity, Deccan Education Socity, 1935.
21) Madhavrao T., Minor Hints, Baroda State Press, Baroda, 1881.
22) Pagar Eknath (Editated), Maharaja Sayajirao Gaekwad's Selected Letters, vol. 1,2,3 and 4, Secretary, Maharaja Sayajirao Gaekwad Source Material Publication Committee, Aurangabad, 2017.
23) Rice Stanley, Life of Sayajirao III, vol. 1, 2, Oxford University Press, London, 1931.
24) Rice Stanley, Hindu Customs and Their Origion, George Allen and Unwin Ltd. London, 1937.
25) Sardesai G.S. Account of the Education of His Highness the Maharaja Sayajirao Gaekwar, Jagriti press, Baroda, 1 November 1923.
26) Sapre Avinash, (Editated), Maharaja Sayajirao Gaekwad Speeches and Addresses, vol.1 and 2, Secretary, Maharaja Sayajirao Gaekwad Source Material Publication Committee, Aurangabad, 2017.
27) Sergent P. W., The Rulers of Baroda, John Hurray, London, 1928.
28) Waknis T.D., 'Library Department of the Baroda State' (year1938-39), Baroda State Press, Baroda,1940.
29) Weeden Edward st. Clair, A Year with the Gaekwad of Baroda, London, 1911.
30) Widgery Alban G., Comparative Study of Religions, The Luhana Mitra Printing Press, Baroda, 1922.

31) Baroda A Guide Book, Information office, Baroda, January, 1942.

32) World Tour Report of Maharaja Sayajirao Gaekwad 1 to 26.

हिंदी ग्रंथ

१) शर्मा श्रीराम, सयाजी चरित्रामृत, प्रकाशक -भगवद्दत्त शर्मा, १९१५

मासिके

१) जडणघडण, दिवाळी विशेषांक, २०१२.

२) साप्ताहिक चित्रलेखा, १९ फेब्रुवारी २०१८.

३) लोकराज्य, फेब्रुवारी २०१८.

४) साप्ताहिक साधना, १७ फेब्रुवारी २०१८.

५) साप्ताहिक साधना, ६ एप्रिल २०१९.

६) साप्ताहिक साधना, २३ ऑगस्ट २०१९.

७) साप्ताहिक विवेक, १८ फेब्रुवारी २०१८.

वेबसाईट

1) http://www.msubaroda.ac.in

2) http://www.virashinde.com

❍❍❍

महाराजा सयाजीराव गायकवाड प्रगल्भ विचारांचे राजे असल्यामुळे त्यांनी ज्ञानात्मक प्रबोधनातून समाजसुधारणा केल्या. राजगादीवर आल्यावर अल्पावधीतच त्यांच्या लक्षात आले की, प्रजेची उन्नती करायची असेल तर ज्ञानाबरोबरच धनाचीही आवश्यकता आहे.

सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यावर काही लक्ष तोट्यात असणारे बडोदा राज्य सुप्रशासनाने, काटकसरीने आणि राज्याची उत्पादकता वाढवत जगात सातव्या क्रमांकाचे श्रीमंत बनवले. या निर्माण केलेल्या धनसंपत्तीचा उपयोग इतर राजांसारखा हौसमौज करण्यासाठी केला नाही, तर याचा उपयोग प्रजेच्या आणि पर्यायाने जगाच्या उत्थानासाठी केला.

त्यांनी बडोद्याबरोबर, हिंदुस्थानातीलच नव्हे तर जगभरातील जे-जे समाजद्रष्टे गरीब-अनाथांसाठी झटत होते त्यांना उदारहस्ते साहाय्य केले. यामध्ये हिंदुस्थानातील त्यांचे समकालीन पितामह दादाभाई नौरोजी, जमशेटजी टाटा, न्या. रानडे, ना. गोखले, म. फुले, लो. टिळक, म. गांधी, म. शिंदे, म. कर्वे, क. भाऊराव पाटील, गंगारामभाऊ म्हस्के, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बाबूराव जगताप, अरविंद घोष या आणि अशा अनेक सामाजधुरिणांचा समावेश होता. सामाजिक परिवर्तन करू पाहणाऱ्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि इतर क्षेत्रातील संस्थांना त्यांनी उदारहस्ते मदत केली. त्यामुळेच आधुनिक भारतातील अनेक व्यक्ती आणि संस्था उभारल्या.

सयाजीराव महाराजांचे हे प्रचंड दातृत्व अद्भुत आणि अविश्वसनीय आहे. त्यांनी सत्पात्री दान दिलेल्या रकमांचा आकडा जवळजवळ ८९ कोटी रुपयांपर्यंत गेला होता. आजघडीला याची किंमत दीड लक्ष कोटीहून अधिक आहे. जगाच्या कल्याणासाठी एवढे दान देणारा हा जगातील कदाचित एकमेव राजा असेल. त्यांच्या प्रचंड दातृत्वाचा आढावा या ग्रंथातून घेतला आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.